UNIVERSAL
LIBRARY
OU_184375
UNIVERSAL
LIBRARY

हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत

याचें चरित्र.

(देवगिरीच्या यादव-राजांच्या इतिहासासह.)

लेखक,

केशव आप्पा पाध्ये, बी. ए. एल्एल् बी.

ॲडव्होकेट, मुंबई हायकोर्ट.

(कालिदास-सूक्ति-मंजूषा ग्रंथाचा कर्ता.)

फेब्रुवारी १९३१.

आवृत्ति पहिली.

(या ग्रंथासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें राखून ठेविले आहेत.)

(किंमत रु. ३-०-०.)

मुद्रकः—श्रीधर विष्णु कामत, कामत प्रिंटिंग प्रेस,
गोवर्धन बिल्डिंग, पारख स्ट्रीट, गिरगांव मुंबई नं. ४.

प्रकाशकः—केशव आप्पा पाध्ये, बी. ए., एल्एल्. बी., ॲडव्होकेट,
मुंबई हायकोर्ट, न्यू भटवाडी, गिरगांव मुंबई नं. ४.

अनुक्रमणिका.

विषय.		पृष्ठ.
	उपोद्घात	
भाग १	(प्रकरण १) चरित्रनायकाचा परिचय. ...	१
,, ,,	(,, २) श्रीकरणाधिप हेमाडपंत.	९
भाग २	हेमाद्रीची ग्रंथरचना.	३१
भाग ३	देवगिरीच्या यादवराजघराण्याचा इतिहास.	५२
भाग ४	रामदेवराव जाधवाचे राजवटींत मराठीचा उत्कर्ष. ...	१९०
भाग ५	उत्तर कोंकणांत देवगिरीच्या यादवांचें राज्य.	२२२
भाग ६	मोडी लिपि.	२६३
भाग ७	महानुभावपंथीय मराठी वाङ्मय.	२८६
भाग ८	हेमाडपंती देवळें.	३३४
भाग ९	उपसंहार.	३५२

परिशिष्टें:—

नं. १	व्रतखंडांत हेमाद्रीनें यादवराजांची पौराणिक कालापासून दिलेली वंशावळ व राजप्रशस्ति.	१
,, २	अलिबाग तालुक्यांतील शिलाहार राजाचे वेळचा शके ११०२ चा शिलालेख.	१०
,, ३	पूर्वकालीन व उत्तरकालीन यादवराजांच्या शिलालेखांची व ताम्रपटांची जंत्री.	११
,, ४	अश्वी येथील तांम्रपट.	२०
,, ५	ओंवळे (ठाणे) येथील तांम्रपट.	२४
,, ६	खिद्रापूरचा शिलालेख.	२६
,, ७	अण्जूरचा शिलाशासन.	२८

,, ८ वसईचा तांम्रपट. ३०
,, ९ पंढरपूरचा चौऱ्याशीचा शिलालेख. ३५
,, १० आंबे येथील तीन शिलालेख. ४८
,, ११ वेलापूरचे शिलालेख. ६३
,, १२ पिच्छोडीचा महजर. ६५
,, १३ चिमणाजी आप्पाची, अंताजी रघुनाथ कावळे यांस वसईच्या मोहिमेसंबंधीं पत्रें. ७०
,, १४ पाटणचा शिलालेख. ७३
,, १५ हरिहर येथील कानडी शिलालेख. ७४
,, १६ दावणगिरी येथील शिलालेख. ७५
,, १७ बाहाळ येथील शिलालेख. ७६

छायाचित्रें.

भारताचार्य चिंतामणराव विनायक वैद्य.... ... ... १
डॉक्टर भाऊ दाजी. ३२
डॉक्टर (सर) रामकृष्णपंत भांडारकर. ५६
इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे. २६४
विनायकराव लक्ष्मण भावे. २८८
हेमाडपंती देवळांचा सर्वसाधारण नकाशा. (अ)... ... ३३६
नीलांग येथील हेमाडपंती देवळाच्या गाभाऱ्याच्या दरवाज्यावरील नक्षीकाम. (ब) ३४०
नारायणपूर येथील हेमाडपंती पडकें देऊळ. (क)... ... ३४४
नारायणपूर येथील हेमाडपंती देवालयाच्या सभामंडपाच्या छतावरील नक्षी (ड) ३४८
सिन्नर येथील गोंडेश्वराच्या देवळाचें छायाचित्र. (ई) ... ३५२

हें पुस्तक लिहिण्याचें कामीं ज्या ग्रंथाचा आधार घेतला आहे त्यांचा नामनिर्देश.

१ हेमाद्रीचा चतुर्वर्गचिंतामणि (व्रतखंड, दानखंड, परिशेषखंड).
२ बोपदेवाचा मुक्ताफल ग्रंथ (हेमाद्रीचे टीकेसुद्धां).
३ नंदुर्गिकराचा रघुवंश.
४ कीर्तिकौमुदी (सोमेश्वराची).
५ हस्त्यायुर्वेद (पालकाप्य मुनिकृत).
६ बिल्हणाचें विक्रमांकदेवचरित.
७ इंडियन अँटिक्वरी सीरीज्.
८ मुंबई ग्याझेटिअर्स ,,
९ एपिग्रापिका इंडिका ,,
१० पाश्चिम हिंदुस्थानचे आर्किऑलॉजिकल व्हॉल्यूमस्.
११ Rice साहेबांचा कानडी शिलालेख संग्रह.
१२ फर्ग्युसनचे भारतीय शिल्पकलेवरील ग्रंथ
१३ बर्जेस् चे ,, ,, ,,
१४ हॉवेलचे ,, ,, ,,
१५ व्हिन्सेंट स्मिथचे ,, ,,
१६ प्रसन्न कुमार आचार्याचे ,, ,,
१७ भारत-इतिहास-संशोधक-मंडळामार्फत प्रसिद्ध झालेले ग्रंथ.
१८ राजवाडे यांची मराठ्यांच्या इतिहासाची साधने.
१९ विश्ववृत्त.
२० ग्रंथमाला.
२१ महाराष्ट्र-सारस्वत (भावे यांचे)

२२ महानुभावीय-मराठी-वाङ्मय (श्रीयुत यशवंतराव खुशाल देशपांडे).
२३ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरित्र (वे. शा. सं. लक्ष्मण पांगारकर).
२४ श्रीयुत यशवंतराव गुप्ते यांचे यादवकालीन शिलालेखावरील ग्रंथ.
२५ बंगाल रायल एशियाटिक सोसायटीचे व्हाल्यूम इ. स. १८७२.
२६ मुंबई रायल एशियाटिक सोसायटीचे जर्नल.
२७ ग्रेट ब्रिटन रायल एशियाटिक सोसायटीचे जर्नल.
२८ हिंदुधर्मशास्त्रकारांचा इतिहास [इंग्रजी] (श्रीयुत पां. वा. काणे) ॲडव्होकेट.
२९ वऱ्हाडचा इतिहास (श्रीयुत यादवराव माधव काळे).
३० महिकावतीची बखर इ. इ.



उपोद्घात.

आधुनिक काळांतील एखाद्या थोर पुरुषाचें तरुण पिढीस आदर्शभूत होईल, असें चरित्र न लिहितां, फुटके तुटके शिलालेख, गंजलेले ताम्रपट, फाटक्या तुटक्या बखरी वगैरे हुडकून काढून, त्यांत मिळालेल्या माहितीवरून प्राचीन काळच्या एखाद्या व्यक्तीचें चरित्र लिहिण्यांत कोणता फायदा आहे ? अशी वाचकवर्गाकडून पृच्छा करण्यांत आल्यास ती अस्थानीं होणार नाहीं ! परंतु प्रस्तुत ग्रंथाचा चरित्रनायक हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत ह्याच्या संबंधानें अशा प्रकारचा आक्षेप घेण्यांत येणार नाहीं, असें आम्हांस वाटतें. हेमाद्रि हा राजकार्यधुरंधर, युद्धकलापटु, उत्कृष्ट ग्रंथकर्ता, संस्कृतज्ञ, मराठी भाषेविषयीं अभिमान बाळगून तिच्या उत्कर्षाविषयीं सतत झिजणारा असा होता. सुमारें ६०० वर्षांपूर्वी त्यानें प्रचारांत आणलेली मोडी लिपी महाराष्ट्रांत खाजगी व राजकीय व्यवहारांत अद्याप प्रचलित आहे. वऱ्हाडांत, महाराष्ट्रांत व दक्षिणेंत हेमाडपंती देवळें जागोजाग दृष्टीस पडतात. यावरून त्याचें नांव महाराष्ट्राच्या स्मरणांतून अद्याप गेलेलें नाहीं.

त्याचा **चतुर्वर्गचिंतामणि** हा ग्रंथ, त्यानें सनातन वैदिक-धर्माच्या पुनरुज्जीवनार्थ जे परिश्रम केले त्याची साक्ष पटवित आहे. याखेरीज धर्मग्रंथकार व मीमांसाकार म्हणून तो सर्वत्र प्रख्यात आहे. अशा प्रकारचे सद्गुण ६०० वर्षांपूर्वीच्या ज्या महाराष्ट्रीय मुत्सद्यांत एकवटलेले होते, त्याच्याविषयीं कोणत्या महाराष्ट्रियास

आदर वाटणार नाहीं ? यूरोपांतील अगर अमेरिकेंतील एखाद्या व्यक्तींत, यापैकीं एखाद दुसरा गुण वास करीत असला तरी त्याचा कितीतरी गौरव करण्यांत येतो ! सुमारें ६०० वर्षांपूर्वी देवगिरीच्या राज्याचें वैभव वाढवून तें साम्राज्यपदास पोहोंचविण्याचें कामीं हेमाद्रि हा बऱ्याच अंशीं कारणीभूत झाला, असें त्याच्या चरित्रावरून दिसून येतें. मंत्रिपदाचे हुद्यावर बरीच वर्षें काम केल्यामुळें त्यास राजनीतींमधील सर्व डांवपेंच पूर्णपणें अवगत होते. देवगिरीचे अखेरचे यादवराजे महादेवराव व रामदेवराव यांचे राजवटींत गजसेनाधिपतीचें काम त्याजकडे सोंपविण्यांत आलें होतें, यावरून युद्धकलेमध्यें त्यानें बरेंच प्राविण्य मिळविलें असलें पाहिजे, असें अनुमान काढण्यास जागा आहे. **'चतुर्वर्गचिंतामणि'** सारख्या प्रचंड ग्रंथाची रचना त्यानें केली, यावरून श्रुति, स्मृति, पुराणें व इतिहास यांचा दांडगा व्यासंग त्यानें केला होता, यांत शंका नाहीं. **श्रीबोपदेवाच्या 'मुक्ताफल'** व **'हरिलीला'** या ग्रंथांवर त्यानें विद्वत्ताप्रचुर टीका लिहिल्या, यावरून त्याचें संस्कृतभाषेवर प्रभुत्व होते ही गोष्ट निर्विवाद होय.मराठी भाषेचा राजदरबारांत पहिल्याप्रथम प्रवेश करविण्याचें श्रेय त्यानें संपादिलें; तसेंच तिच्या उत्कर्षाविषयीं त्यानें आपल्या हयातींत अत्यंत परिश्रम केले. राजकीय व खासगी पत्रव्यवहार अल्पावधींत मोठ्या प्रमाणावर करतां यावा, म्हणून त्यानें मोडी लिपि प्रचारांत आणिली; व ती आज सहाशें वर्षें महाराष्ट्रांत अव्याहत चालू आहे. आयुर्वेदावर त्यानें श्रेष्ठ दर्जाची टीका लिहिली, यावरून वैद्यशास्त्राचाहि त्यानें अभ्यास केला होता, असें दिसतें. त्यानें यादवांचे राजवटींत करणाधिपाचे

हुद्यावर असतांना राजाश्रय मिळवून वऱ्हाडांत, महाराष्ट्रांत व दक्षिणेंत शेकडों देवालयें निर्माण केली; व सनातन हिंदुधर्माचें संवर्धन केलें. अशा रीतीनें राजकारण, ग्रंथकर्तृत्व, वैद्यशास्त्र, शिल्पशास्त्र व युद्धशास्त्र अशा परस्पर भिन्नविषयांत असलेलें आपलें प्राविण्य ज्यानें जगाच्या निदर्शनास आणलें, व ज्याची स्मृति आज भरतखंडांत ६००-७०० वर्षें कायम आहे, अशा थोर विभूतीचें चरित्र महाराष्ट्रासच काय, पण सर्व भरतखंडास ललामभूत होणें सहाजिक आहे.

अलिकडे पुराणवस्तुशास्त्राचा अभ्यास करण्याकडे व प्राचीन इतिहासाचें संशोधन करण्याकडे, तरुण पिढीचें बरेंच लक्ष वेधलें आहे. त्यांस हेमाद्रीचें चरित्र अनेक प्रकारें उद्बोधक होणार आहे. हेमाद्रीनें आपल्या व्रतखंडांत पूर्वकालीन व उत्तरकालीन यादव राजांचा संक्षिप्त इतिहास दिला आहे. त्यावरून हेमाद्रीची इतिहासलेखनाबद्दल आस्था दिसून येते. बौद्धिक गुणांखेरीज, हेमाद्रीच्या आंगीं स्वधर्मनिष्ठा, दानशूरत्त्व, सदाचारसंपन्नता वगैरे नैतिक गुण वास करीत होते. तो भागवतधर्माचा कट्टा अनुयायी होता, ही गोष्ट त्याच्या चरित्रावरून दिसून येते.

भारतीयांची इतिहास लेखनाबद्दल अनास्था सर्वश्रुत आहे. परंतु गेल्या ६०-७० वर्षांत फ्लीट, किलहॉर्न, बर्जेस, बुल्हर, वॉथेन, कॅम्बेल वगैरे आंग्लपंडितांनीं, व कै. डॉ. सर भांडारकर, डॉ. भाऊ दाजी, पं. भगवानलाल इंद्रजित, शंकर पांडुरंग पंडित, काशिनाथ त्रिंबक तेलंग, डॉ. गुणे, इतिहासाचार्य काशिनाथ विश्वनाथ राजवाडे, श्रीयुत भारताचार्य चिंतामणराव वैद्य, काशिनाथ बापू पाठक, डॉ. केतकर, डॉ. बेलवल्कर, डॉ. सुखटणकर, श्रीयुत पांडुरंग वामन

ऊर्फ अण्णासाहेब काणे ॲडव्होकेट,वगैरे एतद्देशीय पंडितांनीं प्राचीन शिलालेख, ताम्रपट, जुनीं नाणीं व हस्तलिखितग्रंथ यांचे संशोधन करून भरतखंडांतील गेल्या हजार दीडहजार वर्षांचा इतिहास उजेडांत आणण्याचें श्रेय संपादिलें. जुने कागद पत्राबद्दल ऐतिहासिक माहिती मिळविण्याचें कामीं व त्यांचें संशोधन करण्याचें कामीं किती अडचणी येतात याची कल्पना उपरिनिर्दिष्ट केलेल्या विद्वान् गृहस्थांचे लेख वाचल्यावांचून यावयाची नाहीं. शिलालेख व ताम्रपट ज्या राजांच्या नेतृत्वाखालीं अस्तित्वांत आलेले असतात, त्यांत त्यांची भरपूर स्तुति काव्यमय भाषेंत केलेली असते.त्यामुळें त्यांतील ऐतिहासिक सत्य शोधून काढणें कठीण जातें. स्वतंत्र पुराव्याची जोड मिळाल्या वांचून जबाबदार इतिहासकारांस त्याजवर भिस्त ठेवणें योग्य वाटत नाहीं. इतिहासाचार्य राजवाडे यानीं आपलें सर्व आयुष्य प्राचीन व अर्वाचीन काळांतील ऐतिहासिक सामुग्री मिळविण्याचे कामीं खर्ची घातलें व शेकडोंवर्षे अंधारांत दडून राहिलेले कागदपत्र उजेडांत आणलें. 'मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें'या ग्रंथाचे खंड त्यांच्या श्रमाचें फळ होय. दक्षिणेंतील आंध्रभृत्य, चालुक्य, गुप्त, शिलाहार, कदंब, पल्लव, होयसळ यादव (म्हणजे द्वारासमुद्र उर्फ हलेबीड येथील), देवगिरीचे यादव वगैरे वंशांतील राजघराण्याचा थोडाबहुत इतिहास, शिलालेख, ताम्रपट व जुनी नाणीं यांच्या सहाय्यानें उपलब्ध होण्यासारखा आहे. व तो प्रकाशित झाल्यास त्यावरून महाराष्ट्राच्या गतवैभवाची बरीच कल्पना होण्यासारखी आहे. युरोप खंडांतील पीटर धि ग्रेट, नेपोलिअन, नेल्सन, लूथर, जोसेफ मॅझिनी वगैरे थोर पुरुषांचीं चरित्रें मराठींत प्रसिद्ध झालीं आहेत. त्याप्रमाणें गौतमबुद्ध, महावीर,

अशोक, चंद्रगुप्त, पृथ्वीराज चव्हाण, सिंघणदेव, लवणप्रसाद, भोज, श्रीहर्ष, विजयानगरचे राज्यसंस्थापक, हेमाद्रि, हेमचंद्र, तोडरमल्ल, माधवाचार्य, सायणाचार्य, खोलेश्वर इत्यादि थोर पुरुषांचीं चरित्रें मराठींत, प्रसिद्ध झालीं पाहिजेत.

पुराणवस्तुसंशोधनाचें काम व्यवस्थित रीतीनें चालावें या हेतूनें पुणें येथील भारतइतिहास-संशोधक-मंडळ, भांडारकर ओरिएन्टल इन्स्टिटयूट या संस्था स्थापन झाल्यास बरीच वर्षें झालीं. सदरील संस्था आपलें कार्य व्यवस्थितरीतीनें करीत आहेत, ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे. मुंबई इलाख्याबाहेरही बंगाल, मद्रास, युनायटेड प्रॉव्हिन्सेस् वगैरे प्रांतातील पुराणवस्तुसंशोधक, भरतखंडाचा प्राचीन इतिहास प्रकाशित करण्याचे कामीं अव्याहत परिश्रम करीत आहेत. सर रामकृष्णपंत भांडारकर यांनीं वृद्धापकालीं देखील प्राचीन इतिहासलेखनाचा आपला व्यासंग कायम ठेवला होता, ही गोष्ट त्यांनीं 'महानुभावपंथाचा खरा इतिहास' सन १९०७–१९०८ चे सुमारास प्रसिद्ध केला, यावरून दिसून येते. भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनींही डॉक्टर भांडारकरांप्रमाणें आर्यांच्या प्राचीन-इतिहासाचे संशोधन करण्याचें काम आस्थेनें चालविलें असून मध्ययुगीन भारत नांवाचा विस्तृत ग्रंथ प्रसिद्ध केला आहे, ही गोष्ट त्यांस भूषणावह आहे. त्यांचे उदाहरण तरुण पिढींतील होतकरू अभ्यासकांनां अनुकरणीय आहे.

आभार प्रदर्शन.

प्रो. पांडुरंग वासुदेव कुळकर्णी एम्. ए. (एल्फिन्स्टन् कॉलेजांतील संस्कृत भाषेचे अध्यापक); श्रीयुत सदानंद लक्ष्मण कापडि बी. एस्. सी. (मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटीचे लायब्रेरियन,) या दोन विद्वान् गृहस्थांनीं जरूर ते ग्रंथ प्रस्तुत लेखकास वेळोवेळीं पुरविले, याबद्दल त्यांचे जितके आभार मानावे तितके थोडेच आहेत. श्रीयुत बळिराम जनार्दन आचार्य, संपादक (नवामनु) यांनीं हा ग्रंथ छापून तयार करण्याचे कामीं फार मदत केली; श्रीयुत द्वारकानाथ गोविंद वैद्य, (संपादक, सुबोधपत्रिका) गणपतराव लाड, (आर्टिस्ट्) रामराव पुरुषोत्तम जोशी बी. ए., म्यानेजर केसरी, सदानंद लक्ष्मण कापडि बी. एस्. सी. वसंतराव सखाराम राउत, जे. पी. वगैरे सद्गृहस्थांनीं या पुस्तकांत प्रसिद्ध झालेल्या छायाचित्रांचे ब्लॉक देऊन प्रस्तुत लेखकास उपकृत केलें याबद्दल त्या सर्वांचे आभार मानणें जरूर आहे.

या पुस्तकांत छपाईचे कामीं व विरामचिन्हांचे बाबतींत अपरिहार्य कारणामुळें बरेच दोष राहून गेले आहेत, त्याबद्दल वाचकवर्ग हंसक्षीरन्यायानें आम्हांस क्षमा करील अशी आशा आहे.



अर्पण-पत्रिका.

भारत इतिहास-संशोधक मंडळाचे अध्यक्ष,
मुंबई युनिव्हर्सिटीचे सन्माननीय सभासद,
टिळक महाविद्यालयाचे कुलगुरु वगैरे.
मध्ययुगीन भारत, संस्कृत-वाङ्मयाचा
इतिहास वगैरे अनेक ग्रंथांचे कर्ते.
श्रीयुत



भारताचार्य चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए. एल्एल् बी.

जन्म १८ ऑक्टोबर १८६१.

यांस

हें पुस्तक सप्रेम सादर अर्पण केलें आहे.

चैत्र शुद्ध १
शके १८५३.

ग्रंथकर्ता.

॥ श्री ॥

हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत
याचें चरित्र.

भाग पहिला.

प्रकरण १ लें

—परिचय—

शूराणामवधिर्निधिश्च यशसामेकाश्रयः संपदाम् ।
दातृणां प्रथमः कुलाकुलगृहं वैदग्धभाजां गुरुः ॥
धौरेयश्च विपश्चितां सुकृतिनामद्वैतवादास्पदम् ।
नैवासीन्न च वर्तते न भविता हेमाद्रिसूरेः परः ॥

हेमाद्रिपंडितासारखा विद्वान्, वैभवशाली, कीर्तिमान्, दानशूर, राज्यकार्यधुरंधर, सदाचरणी व धर्माभिमानी असा दुसरा पुरुष पूर्वीच्या कालांत झाला नाहीं व पुढें होणार नाहीं. अशा तऱ्हेचें प्रशंसोद्गार आमच्या चरित्रनायकासंबंधानें वर उद्धृत केलेल्या श्लोकांत काढलेले आहेत. हेमाद्रि ऊर्फ हेमाडपंत याचा जन्म कोठें व केव्हां झाला, तसेंच देवागिरी येथील यादव राजघराण्यांतील अखेरचे यादव राजे महादेव व रामदेवराव यांचे राजवटींत "करणाधिप" ही पदवी त्यास प्राप्त होण्यापूर्वी त्याचे आयुष्यक्रमांत कोणत्या गोष्टी घडल्या हें समजण्यास कांहींच साधन नाहीं. हेमाद्रि हा शुक्ल यजुर्वेदी शाखेचा वत्सगोत्री पंचप्रवरी

ब्राह्मण होता. त्याच्या वडिलांचें नांव कामदेव, आजाचें नांव वासुदेव व पणजाचें नांव वामन होतें, अशी माहिती त्यानें स्वतः रचिलेल्या **चतुर्वर्गचिंतामणि** ग्रंथावरून मिळते. श्रीपंढरपुर येथील श्रीविठ्ठलमंदिराचा जीर्णोद्धार करण्याच्या कामास शके ११८५ च्या प्रारंभी सुरुवात झाली, व नवें मंदिर शके ११९५ च्या अखेर तयार झालें अशी माहिती सदर मंदिरांत असलेल्या **चौऱ्यायशी**च्या शिलेवरील लेखावरून मिळते. जीर्णोद्धार करण्याचे कामीं ज्या थोर व धार्मिक लोकांनीं द्रव्यद्वारा मदत केली त्यांची नांवें, त्यांच्या देणगीचा उल्लेख करून सदरील शिळेवर खोदण्यांत आली आहेत. हा लेख खोदण्याचा प्रारंभ शके ११९५ श्रीमुखनाम संवत्सरी झाला व शके ११९९ मध्यें खोदण्याचें काम समाप्त झालें. हा शिलालेख नव्या देवळाच्या देवडीवर बसविला होता व तो " चौऱ्यायशीचा " दगड म्हणून प्रसिद्ध आहे. प्रस्तुत शिलेला " चौऱ्यायशीचा दगड " असें नांव पडण्याचें कारण कोणत्याही यात्रेकरूनें अगर भक्तानें या शिलेवर आपली पाठ घांसली असतां तो चौऱ्यायशीच्या फेऱ्यांतून म्हणजे चौऱ्यायशी लक्ष योनींत जन्म घेण्याचे खटाटोपांतून मुक्त होतो अशी भाविकांची समजूत आहे.

शके ११९५ त देवगिरीच्या यादव राजांचा महाराष्ट्र व कर्नाटक प्रांतावर पूर्ण अम्मल होता. त्यावेळीं यादव घराण्यांतील शेवटचा राजा रामदेवराव हा राज्य करीत होता. त्याचा दरारा दक्षिणेंत सर्वत्र होता. आमचा चरित्रनायक हेमाद्रि अगर हेमाडपंत हा

त्याचा प्रधान होता. हेमाडपंताचे राजकारणांत ज्याप्रमाणें रामदेवराव राजावर वजन होतें, तसेंच धार्मिक बाबतींतही त्याजवर त्याचें वर्चस्व असावें ही गोष्ट श्रीविठ्ठलमंदिराच्या जीर्णोद्धाराचे कामीं हेमाडपंत करणाधिप व त्याचे यजमान श्रीयादव (जाधव) नारायणप्रौढप्रतापचक्रवर्ति रामचंद्रदेवराय यां उभयतांनीं सढळ हातांनीं मदत केली होती, यावरून स्पष्ट दिसते.

चौऱ्यायशीच्या शिलेचे आठ 'र' काने केले असून त्यांत देवाच्या पूजे-अर्चेकरितां देणग्या देणाऱ्या भक्तांची नांवें एकाखालीं एक दिलीं आहेत. या आठ रकान्यावर शिळेच्या सबंध लांबीवर तीन ओळी खोदल्या असून पहिल्या ओळींत शेवटल्या वर्गणीदारांची नांवें खोदली आहेत, दुसऱ्या ओळींत श्रीविठ्ठलाच्या प्रशंसेचा एक संस्कृत श्लोक दिला आहे, व तिसऱ्या ओळींत खालील आठ रकान्यांत वर्गणी कोणत्या कामाकरितां जमविली याचा उल्लेख करण्यांत आला आहे. एका रकान्याखेरीज करून प्रत्येक रकान्यावर ज्या पुढाऱ्यामार्फत वर्गणीदारांनीं आपली वर्गणी भरली त्याचे नांव व खाते दिलें आहे. त्याचा प्रकार असा:—

पंढरपुरच्या शिलालेखाचा मथाळा

स्वस्ति श्री सकु ११९५ श्री मुख नाम संवत्सरे फागनीपूर श्री विठ्ठलरायासी तिसा सिति फुलें दांडे आचंद्रार्के चालवे आ नाना भक्त माली आं दत्त पैकाचा विवरू ॥ (स्वति श्री शके ११९५ श्री मुख नाम संवत्सरी फागनीपूर (पंढरपूर) येथील श्रीविठ्ठल

१ पंढरपुरच्या प्रस्तुत शिलालेखाची तपशीलवार माहिती परिशिष्ट ९ मध्यें दिली आहे.

देवास × × × × फुलें दांडे वहाणें, चंद्र–सूर्य आहेत तोंपर्यंत नेहमी चालविण्यासाठीं अनेक भक्तांनी देणगीदाखल दिलेल्या रकमांचा तपशील.) पहिल्या रकान्यांतील (३२) (३४) (३५) या संख्ये पुढील मजकूर आहे तो असाः—

(३२) **सोडवी**कार हेमाडपंडिती वामनादत्त + ग १

(३४) श्री पांढरी-फड-मुख्य समंतात भाग आचंद्रार्क देवदांडा

(३५) श्री जाधवनारायणप्रौढप्रतापचक्रवर्ति श्रीरामचंद्रदेव

राए द।

+ + श्री सर्वाधिकारी विठ्ठ————

मूळ शिलालेखांत तत्कालीन अनेक व्यक्तींची व गावांची नांवें असून शिवाय त्यावेळच्या चलनी नाण्यांचा उल्लेख त्यांत आला असल्यामुळें तो ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. जीर्णोद्धार झाल्यावरही ह्मणजे शके १८९९ सालीं श्रीविठ्ठलमंदिराकरितां आलेल्या देणग्यांचाही उल्लेख या शिलालेखांत असल्यामुळें वर्गणी गोळा करण्याचे व देणगी देणारांची नांवें शिलेवर खोदण्याचें काम पुढें बराच काल चाललें असावें असें अनुमान निघतें.

पहिल्या रकान्यांतील [३२] संख्येपुढें ज्या **हेमाडि**पंडिताच्या नांवाचा निर्देश केला आहे तो आमचा चरित्रनायकच असावा असें निःसंशय वाटतें. त्याच्या खालोखाल तत्कालीन देवगिरीचा यादव राणा त्याचा यजमान श्री प्रौढप्रताप-चक्रवर्ति यादव नारायण रामचंद्रदेवराय याच्या देणगीचा उल्लेख करण्यांत आला आहे, यावरून वरील विधानास पुष्टि मिळते. हेमाडिपंडितास " सोडवी "

कार या टोपण नांवानें संबोधिलें आहे ह्यावरून त्याचा गांव सोडवी असावा असें दिसतें. हा गांव कर्नाटक प्रांतात आहे अशी माहिती मिळते. त्यावरून व हेमाद्रि हे नांव महाराष्ट्रीय नसल्यामुळें आमचा चरित्रनायक कर्नाटक प्रांतांतील मूळ रहिवाशी असावा असें दिसतें ह्या शिलालेखांतील पहिल्या रकान्यांत असलेल्या [५७] [९५] या संख्येपुढें हेमाडिपंडित या नांवाच्या आणखी दोन वर्गणीदारांची नोंद आहे ती अशी:—

(५७) कोटौन हेमडिपंडिते द । (ग) १ दे दां १

(९५) कोहोर हेमाडिपंडि ग. १ दि दा. १

हेमाडपंडित या नांवाच्या तीन व्यक्ति या यादींत नमूद केलेल्या आहेत. त्या परस्परापासून भिन्न आहेत हें दाखविण्यासाठीं त्यांची गांववार नोंद करण्याची खबरदारी प्रस्तुत शिलालेख ज्यांच्या नेतृत्त्वाखालीं तयार करण्यांत आला त्यांनी घेतली असावी असें दिसते.

चतुर्वर्गचिंतामणि हा विस्तृत व धार्मिक दृष्ट्या अत्यंत उपयुक्त ग्रंथ हेमाद्रीनें रचिला ह्याबद्दलचा वर उल्लेख केलेला आहे. सदरील ग्रंथाच्या **परिशेषखंडांत** आमच्या चरित्रनायकाच्या वडिलांचे नांव **कामदेव** असें दिलें आहे. स्वतः रचिलेल्या ग्रंथांत आपल्या वडिलांचें नांव कोणी चुकीनें लिहिले हे संभवत नाहीं. पंढरपूरच्या शिलालेखांतील वर्गणीदारांच्या यादींत हेमाडपंडिताच्या वडिलांचे नांव **वामन** असें लिहिलें आहे. तेव्हां या दोन व्यक्ति अगदीं भिन्न असाव्यात असें सकृद्दर्शनी दिसतें. किंवा चौऱ्यायशीच्या शिलेवर हेमाडपंडिताच्या वडिलांचें नांवाऐवजीं त्याच्या पणजोबाचें

नांव नजर चुकीनें खोदलें जाण्याचाही संभव आहे. पण वर्गणीदारांच्या यादींतील संदर्भावरून त्यांत उल्लेखिलेला "सोडवीकार" हेमाडिपंडित व आमचा चरित्रनायक हेमाडपंत ह्या दोन व्यक्ति एकच असल्या पाहिजेत असें दिसतें; व त्याचे वडिलांचे नांवाऐवजी पणजाचें नांव चुकून खोदलें गेलें असावें हीच गोष्ट अधिक संभवनीय आहे.

पंढरपुरच्या चौऱ्यायशीच्या शिलालेखांत "सोडवीकार" हेमाडपंडिताखेरीज आणखी दोन हेमाडिपंडितांचा नामनिर्देश केलेला आहे. ह्यांच्या नांवाच्या मागें त्यांच्या स्थलांचा निर्देश केला असल्यामुळें त्या दोन व्यक्ति अगदीं भिन्न असून तत्कालिन प्रमुख गृहस्थांत अथवा सुप्रसिद्ध विद्वानांत त्यांची गणना होत असावी असें दिसतें. **कोटौन** व **कोहोर** हीं स्थलें कोणत्या प्रांतांत मोडतात याबद्दल खात्रीलायक माहिती मिळत नाहीं. तसेंच वरील दोन हेमाडिपंडितांनी कांहीं ग्रंथ लिहिले असल्यास त्याची माहिती उपलब्ध नाहीं. या बाबतींत संशोधकांनीं लक्ष घालणें जरूरीचें आहे.

संस्कृत व मराठी भाषेंत प्रतिभासंपन्न ग्रंथरचना केल्याबद्दल **हेमाद्रीची** सर्व भरतखंडांत प्रसिद्धी आहे. "**चतुर्वर्गचिंतामणि**" ग्रंथांत वैदिक व पौराणिक कालांतील व्रत-वैकल्यांचा व नित्य-नैमित्तिक कर्मांचा पद्धतशीररीतीनें संग्रह केलेला आहे. शिवाय "**मुक्ताफल**" "**हरिलीला**" इत्यादि ग्रंथावर मुद्देसूद टीकाकार म्हणून हेमाद्रीची कीर्ति आजवर अविच्छिन्नपणें गाजत आहे. कविश्रेष्ठ कालिदासाप्रमाणेंच हेमाडपंताच्या उज्वल कीर्तीमुळें बऱ्याच कमी दर्जाच्या ग्रंथाचें कर्तृत्व त्याजवर लादलें जातें.

पंढरपुरच्या शिलालेखांत आणखी दोन समकालीन हेमाडपंतांचा उल्लेख करण्यांत आला आहे, त्यांनीं कांहीं ग्रंथरचना केली असल्यास त्रिवर्गाच्या नामसादृश्यामुळें ग्रंथकर्तृत्वाच्या बाबतींत अशा तऱ्हेचा घोटाळा होणें स्वाभाविक आहे.

श्रीकालिदासाच्या **रघुवंश** काव्यावर ज्या विद्वानांनीं टीका केल्या आहेत त्यांत वल्लभ, हेमाद्रि व मल्लिनाथ यांची नांवें प्रामुख्यानें पुढें येतात. हेमाद्रीनें रघुवंशावर टीका लिहिली आहे ती "**दर्पण**" या नांवानें प्रसिद्ध आहे. कालिदास कवीचें हृद्गत उत्तम प्रकारें समजून घेऊन, त्या धोरणानें टीका करण्यांत हेमाद्रीनें आपलें सर्व कौशल्य खर्च केलें असून इतर टीकाकारांवर ताण केली आहे असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे. परंतु रघुवंशावर "दर्पण" नांवाची टीका करणारा हेमाद्री व आमचा चरित्रनायक हेमाद्री हे एकच आहेत कीं काय याबद्दल बरीच शंका येते, कारण "दर्पण" टीकेच्या समाप्तिसूचकवाक्यामध्यें ("कोलोफोनमध्यें") सदरील टीकाकाराच्या वडिलांचें नांव "ईश्वरसूरि" असें दिलें आहे. व आमच्या चरित्रनायकाच्या वडिलांचें नांव 'कामदेव' असल्याचें वर म्हटलें आहे. यादवांच्या राजवटींत 'करणाधिप' या हुद्यावर असतांना हेमाडपंतानें मराठी भाषेची अभिवृद्धि व्हावी या हेतूनें जे आटोकाट प्रयत्न केले त्यावरून संस्कृत भाषेप्रमाणेंच त्यांचें मराठी भाषेवर नितांत प्रेम होतें हें उघड आहे. रघुवंशावर "दर्पण" नांवाची टीका करणारा **हेमाद्री** ह्यानेंही आपल्या टीकेंत 'पारिभाषिक' संस्कृत शब्दांचीं मराठी रूपांतरें जागोजाग देऊन मराठी भाषेविषयीं आपलें प्रेम व्यक्त केलें आहे. तसेंच ह्या

टीकेंत 'चतुर्वर्गचिंतामणि' ग्रंथाचा बऱ्याच वेळां उल्लेख केला आहे. ह्या अंतर्गत प्रमाणावरून आमचा चरित्रनायक **हेमाडिपंत** व 'दर्पण' टीकाकार **हेमाद्री** ह्या दोन व्यक्ति भिन्न नसाव्या असें सकृद्दर्शनी वाटतें. उभयतांच्या वडिलांच्या नांवांत फरक आहे ही एकच गोष्ट वरील विधानास विरोधक आहे. पंढरपुरच्या **चौन्यायशीच्या** शिलालेखांत व **चतुर्वर्गचिंतामणी** ग्रंथांत आमच्या चरित्रनायकाच्या वडिलांचे नांवांत अशाच तऱ्हेचा फरक आहे. मूळ ग्रंथाची नक्कल करणाऱ्याच्या हलगर्जीपणामुळें अगर अज्ञानामुळें अशा चुका होण्याचा संभव आहे. तथापि या बाबतींत सबळ पुरावा पुढें येईपर्यंत ठाम मत देणें वाजवी होणार नाहीं. हेमाडपंत ह्याच्या चरित्राचें प्रामुख्यानें चार भाग करतां येतील.

(१) देवगिरीचे यादव राजे **महादेव** व **रामदेवराव** (रामचंद्रराव) यांचे राजवटींत 'करणाधिप' ह्या हुद्यावर असतांना अगर अन्य रीतीनें त्यानें मुत्सद्दी ह्या नात्यानें बजाविलेली अपूर्व कामगिरी; (२) त्याचें ग्रंथकर्तृत्व; विशेषतः सनातन हिंदुधर्माची नित्यनैमित्तिक कर्मे पद्धतशीर चालावी म्हणून अत्यंत परिश्रमपूर्वक केलेली ग्रंथरचना; (३) मराठी भाषेच्या अभिवृद्धिसाठीं केलेले प्रयत्न; व (४) विशिष्ट रीतीनें इमारती बांधण्याची नवीन कल्पना काढून भारतीय शिल्पकलेंत घडवून आणलेली क्रांति व त्याबरोबरच भरतखंडांत हिंदुधर्माचें अभ्युत्थान पुन्हां व्हावें म्हणून जागोजाग टोलेजंग देवालयें बांधून धर्मोद्धाराचे कामीं त्यानें दाखविलेली सक्रिय सहानुभूति.

प्रकरण २ रें

श्री 'करणाधिप' हेमाडपंत.

हेमाद्रीनें रचिलेल्या **चतुर्वर्गचिंतामणि** ग्रंथाचा **व्रतखंड** म्हणून एक भाग आहे. त्यांत राजप्रशस्ति नांवाचें प्रकरण आहे. सदरील प्रकरणांत एकंदर यादव राजाची पौराणिक कालापासून ऐतिहासिक कालांतील देवगिरीच्या यादवराजघराण्यांतील **महादेव** राजापर्यंत विस्तृत व संपूर्ण वंशवळ दिली आहे. शिवाय देवगिरीच्या यादव राजघराण्यांतील अखेरचे राजे **सिंघण, कृष्णदेव** अगर **कान्हेरदेव** व **महादेव** यांच्या पराक्रमांचे त्रोटक वर्णन दिलें आहे. सदरील राजप्रशस्तींतील शेवटचा श्लोक खाली दिला आहे.

यस्य श्रीकरणाधिपः स्वयमयं हेमाद्रिसूरीः पुरः ।
प्रौढप्रातिभवर्ण्यमानविलसद्वंशो भृगं शोभते ॥

या श्लोकांतील पहिला शब्द "यस्य" देवगिरीच्या यादव राजघराण्यांतील **महादेव** राजाबद्दल आहे. यावरून आमचा चरित्रनायक हेमाद्रि हा **महादेवा**च्या राजवटींत "करणाधिपाच्या" हुद्यावर होता हें स्पष्ट दिसतें. शिवाय **चतुर्वर्गचिंतामणि** ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं दिलेल्या कोलोफोनमध्यें (समाप्तिसूचक वाक्यांत) खालीं लिहिलेला मजकूर आहे त्यावरूनही या विधानास पुष्टि मिळते.

"इति श्रीमहाराजाधिराजमहादेवस्य समस्तकरणाधीश्वरसकलविद्याविशारदश्रीहेमाद्रिविरचिते" या मजकुरावरून **महादेव**

राजाच्या आज्ञेवरून किंवा त्याच्या आश्रयाखाली **चतुर्वर्ग-चिंतामणि** नांवाचा प्रचंड ग्रंथ रचिला गेला ही गोष्ट निःसंशय होय. हेमाद्री हा करणाधिपाच्या हुद्यावर असतांना त्याला कोणती कामें करावी लागत याबद्दल कोठेंही उल्लेख केलेला आढळत नाहीं. "करणाधिप" या शब्दाचें निव्वळ मराठी रूपांतर 'दफ्तरचा मालक' असें आहे. प्रधानमंडळाचा **आत्मा** असा साधा व सरळ अर्थ केल्यास, **करणाधिप** म्हणजे राज्यांतील मुख्यमंत्रि (Prime Minister) होय. या बाबतींत सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी आपल्या "दख्खनच्या इतिहासांत" करणाधिपाच्या कामगिरीबद्दल खुलासा केला आहे तो असा. "करणाधिप" याचा अधिकार म्हटला म्हणजे अलिकडच्या आमच्या चीफ सेक्रेटरीच्या (मुख्य चिटणिसाच्या) अधिकारासारखा दिसतो. म्हणजे त्यानें आपल्या यजमानाकडील राज्यांतील सर्व हुकूम व आज्ञापत्रें वगैरे लिहावीं व जिकडीलतिकडे पाठवावी व राज्याचे दफ्तर योग्य रीतीनें सांभाळावें. सारांश करणाधिप यास राजाला सल्लामसलत देणारा असें म्हटलें असतां वावगें होणार नाहीं. श्री बोपदेवानें आपल्या '**मुक्ताफल**' ग्रंथांत हेमाद्रीचें वर्णन करतांना त्यास **गणकाग्रणीः** असें म्हटलें आहे. यावरून फडनिशी खात्याच्या अधिकाऱ्याचे काम त्याजकडे होतें असें दिसतें. ठाणें शहरापासून सुमारें पांच मैलावर असलेल्या **ओवळें** गांवी कोणा एका मुसलमानाचें थडगें उकरतानां शके ११९४ व शके १२१२ (इसवी सन १२७२ व १२९०) सालचे देवगिरीचे यादवराजे **रामदेवराव** याचे वेळचे दोन ताम्रपट सांपडले आहेत. त्यांतील सारांश असाः—

रामचंद्रदेव याचे पूर्वींचा यादवराजा **महादेव** यानें कोंकण-प्रांत काबीज करून त्या प्रांतावर **अच्युत**नायक या नांवाचा आपले-तर्फे सुभेदार नेमिला होता. सदरील **अच्युत**नायकानें वर निर्दिष्ट केलेला **ओंवळें** गांव ३२ ब्राह्मणांस दान दिला. या ताम्रपटांत देवगिरीच्या यादवराजांचा मूळ पुरुष **भिल्लम याज**पासून अखेरचा **राजा**रामचंद्रदेव याजपर्यंतची वंशावळ दिली असून त्यांत त्याचे– (रामचंद्रदेवाचे) अलंकारिक भाषेंत वर्णन केलें आहे, तें मनोरंजक व उद्बोधक असल्यामुळें सारंशरूपानें येथें देतोः–रामचंद्रदेव राजाची बिरूदें दिलीं आहेत तीं येणें प्रमाणें १ एकांगवीर २ वीर नारायण ३ द्वारावतीपुरवराधीश ४ गुर्जरराजांचा फडशा उडविणारा केवळ सिंहच ५ तैलंगण देशाचे राजे हेंच कोणी वृक्ष त्यांचा उच्छेद करणारा हत्ती ६ मालव देशचे राजे हेंच कोणी दीप त्यांना मालविणारा.

वर उल्लेखिलेल्या ताम्रपटांत आमच्या चरित्रनायकासंबंधानें संस्कृतमध्यें दिलेला मजकूर अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें तो जशाचा तसाच येथें उध्दृत करितों.

"इत्यादि समस्तविरुदावलीविराजमाने सकलभूतलमनुशासति यदुकुलकुमदचंद्रे **रामचंद्रे** नरेंद्रे.....तयैतत्प्रसादावासनिखिलराज्य धुरीणतां वहति समस्त हस्तिप्रकाध्यक्षे निजगुणसुभगभावुके समस्तकरणाधिपत्यमंगीकुर्वाणेच निर्जित "झाडी" मंडले मंत्रि-चूडामणौ गुणदान रोहणाद्रौ हेमाद्रौ" या संस्कृत उताऱ्याचा सारांश मराठींत खालीं दिला आहेः—

"यदुकुलवंशीय देवगिरीचा राजा रामदेवराव राज्य करीत असतां त्याच्या पदरीं हेमाद्री या नांवाचा सर्वगुणसंपन्न व दानशूर

असा मुख्य मंत्रि होता. तो सर्व राज्याचा भार वहात असे. राज्यांतील हस्तिदलाचें आधिपत्य त्यांजकडे असून तो करणाधिपाचे हुद्यावर होता. झाडी नांवाच्या (रानटी अगर बंडखोर) जातीचा त्यानें बीमोड केला होता.

यावरून देवगिरीचें यादवराजघराण्यांतील शेवटचा पराक्रमी राजा रामचंद्रदेव याचे पदरीं निदान शके ११९४ (इ. स. १२७२) पर्यंत हेमाद्रि हा मुख्य मंत्रि असून त्याजकडे सर्व करणाधिपांचे आधिपत्य असून शिवाय हस्तिदलावर देखरेख करण्याचें काम त्याचेकडे असावें असें दिसतें. तसेंच हेमाद्रि सर्व सद्गुणांचा पर्वत होता असेंही त्याच्यासंबंधानें या ताम्रपटांत प्रशंसोद्गार काढले आहेत. देवगीरीच्या राज्यांत, 'झाडी' नांवाची एक रानटी जात होती तिजपासून राज्यास त्रास पोहोंचत असे. त्या मंडळाला चीत करण्याचे कामीं हेमाद्रीनें पुढाकार घेतला होता.

सदरील ताम्रपटाचे इंग्रजीमध्यें भाषांतर करतांनां मिस्तर वॉथन साहेबाने एक विलक्षण चूक केली आहे. त्यामुळें ताम्रपटाचें ऐतिहासिक स्वरूप नष्ट होण्याचा संभव आहे. यादव राजांच्या पदरीं " हेमाद्रि " नांवाचा मंत्रि होता ही गोष्ट वॉथन साहेबास माहित नसल्यामुळें मूळांत " हेमाद्रि " असा शब्द असूनही त्याऐवजीं " हिमाद्रि " असा पाठ गृहित धरून त्याचा अर्थ त्यानीं हिमालय पर्वत असा केला आहे. ताम्रपटांतील संदर्भाकडे लक्ष न दिल्यामुळें व इतिहासाच्या अज्ञानामुळें साहेब मजकूरांकडून ही चूक झाली असावी असें दिसतें.

" हस्तिपकाध्यक्षे " हें विशेषण फार महत्त्वाचें आहे व त्यावरून पूर्वीच्या काली युद्धकलेमध्यें हस्तिदलाचा प्रामुख्यानें उपयोग

केला जात होता असें दिसते. मोठे मदोन्मत्त हत्ती बाळगून त्याजकडून शत्रूंच्या सैन्यावर कशा रीतीनें हल्ला करावा याबद्दल त्यास विशिष्ट प्रकारचें शिक्षण दिलें जात होतें. नाहींतर हस्तिदलावर देखरेख करणारा अम्मलदार नेमण्याचें कांहीं प्रयोजन नव्हते. हत्तीनां कवायतीचें शिक्षण देऊन लढाईच्या कामीं त्यांचा कसा उपयोग करून घ्यावा याबद्दलचें शास्त्र आहे त्यास " पालकाप्य " अशी संज्ञा आहे. त्यावरून पूर्वी लढाईमध्यें सर्वसाधारणपणें हत्तींचा उपयोग केला जात होता असें दिसते.

रामचंद्रदेव याचे पूर्वीचा राजा महादेव यानें कोंकणावर स्वारी करून त्यावेळचा "कुंकुणेश" म्हणजे कोंकणचा राजा सोमेश्वर याचा पूर्ण पराभव केला. त्यावेळीं महादेव राजाने आपल्या बरोबर नेलेल्या फौजेंत हत्तींचा मोठा समुदाय होता असें हेमाद्रीनें आपल्या " व्रतखंड " ग्रंथांतील राजप्रशस्ति प्रकरणांत या लढाईचे वर्णन करितांना म्हटलें आहे, तो मूळ श्लोक असा—

यदीयगन्धद्विपगण्डपालीनिष्ठ्यूतदानांबुतरंगिणीषु ।
सोमः समुद्रप्लवपेशलोऽपी ममज्ज सैन्यैःसह कुंकुणेशः ॥

अर्थ—कोंकणचा राजा **सोम** हा समुद्रांत पोहण्याच्या कामीं मोठा तरबेज होता तरी त्या राजाच्या (महादेवाच्या) मदोन्मत्त असलेल्या हत्तींच्या गंडस्थलांतून स्रवणाच्या दानोदकांच्या नद्यांत आपल्या सैन्यासह बुडून मेला.

आमच्या चरित्रनायकाकडे मंत्रिपदाच्या हुद्याखेरीज हत्तीच्या पथकावर देखरेख करण्याचें काम सोंपविण्यांत आलें होतें असें दिसतें. फडणीस-कचेरीच्या एका कोपऱ्यांत बसून केवळ सल्लामसलत देण्याचे

अगर इतर राजेलोकांच्या दरबाराबरोबर पत्रव्यवहार करणें येवढींच कामें हेमाद्रिकडे सोंपविण्यांत आली होती असें ह्मणतां येणार नाहीं. युद्धकलानैपुण्य व मुत्सद्देगिरी हे दोन गुण हेमाद्रीच्या ठिकाणीं एकवटलेले होते असें ह्मटले असतां अतिशयोक्ति होणार नाहीं.

आपली इतर जबाबदारीची कामें सांभाळून परराज्याबरोबर आपल्या दरबारचा राजकीय बाबतींतील पत्रव्यवहार करण्याचें कामही हेमाद्रीस करावें लागे. राजकीय व खाजगी पत्रव्यवहाराच्या कामीं पूर्वापार चालत आलेल्या मायन्यांत बरीच सुधारणा करून त्यानें नवीन मेस्तकें तयार केलीं. तसेंच जमाखर्च लिहिण्याच्या मामूल पद्धतींत त्या कालानुरूप त्यानें उपयुक्त सुधारणा केल्या. सदरील मेस्तके हेमाद्रीनें फार कुशलतेनें तयार केली होती असा त्याचा लौकिक आहे. ही गोष्ट खालीं दिलेल्या मजकुरावरून सहज दिसून येईल. गोविंद कवि या नांवाच्या एका लेखकानें एक मेस्तक लिहिलें आहे त्यास शेणवाईपणाचें मेस्तक असें त्यानें नांव दिलें आहे, त्यांत तो लिहितोः—

" पूर्वीं तया देवगिरीसी । रामदेवराव राजापाशीं । असतां हेमाडपंतासी । युक्ति असे आठवली । मोडी लिपी लंकेहूनि आणिली । त्यावरी स्वमति युक्त रचिली । आणि कामराजाशीं आज्ञा दिधली । शेणवाई पद्धत रचावया । हेमाडपंताचे आज्ञेसरिसे । कामराजे स्वमति प्रकाशे । कामराजेमेस्तक केलें ऐसें । श्रवणे ऐकत होतो । त्या ग्रंथासि बहुत यत्न केला । परंतु ग्रंथ हातासी नाहीं आला ।

तेथील वेंचा प्राप्त झाला । ओंविया चाळिस । त्यासी अन्वय लावुनि । गोविंदे स्वयुक्ते करूनि । इतकें किंचित् विस्तारुनि । सांगितलें असें ।

हेमाडपंताच्या आज्ञेवरून कामराजानें एखादा ग्रंथ लिहिला असावा असें वरील उताऱ्यावरून दिसते. सदरील मेस्तकांच्या राजदरबारी शिस्त ठेवण्याच्या कामी फार उपयोग होत असला पाहिजे. कारण यादवांचे राज्य मुसलमानानीं नष्ट केल्यानंतरही सदरील मेस्तकांचा उपयोग थोड्या-बहुत फेरबदलानें मुसलमानी दरबारांत करण्यांत येत होता.

महाराष्ट्रांत चालुक्यघराण्याच्या राजश्रीस ओहोंटी लागून देवगिरीचे यादव अगर जाधव राजघराण्याच्या राज्यलक्ष्मीस भरती येऊं लागली व थोडक्यांच कालांत बृहन्महाराष्ट्रापासून म्हैसूरपर्यंत यादवांचे एकछत्री राज्य प्रस्थापित झालें. शके ११०९ पर्यंत देवगिरीच्या यादवराजांची गणना मांडलिकांत होत असे. परंतु भिल्लमाचा मुलगा सिंहण ऊर्फ सिंघण यानें आपल्या पराक्रमानें राज्याचा विस्तार माळव्यापासून तहत म्हैसुरापर्यंत वाढविला. सदरील सिंघणाच्या पराक्रमाची वर्णनें अनेक शिलालेखांतून दिलेली आहेत. त्याबद्दलची सविस्तर माहिती तिसऱ्या भागांत दिली आहे. **सिंघणाचे** नातू **कृष्ण** (कान्हेर) व **महादेव** यांनीं आपल्या आजाचें व्रत मोठ्या धडाडीनें चालवून त्याच्या कीर्तींत भर घातली. **महादेवाच्या** अमदानींत आमचा चरित्रनायक **हेमाद्रि** मंत्रिपदावर आरूढ झाला होता. **महादेवानें** कोंकण, कर्नाटक व गुजराथ हे प्रांत आपल्या पराक्रमानें जिंकून आपल्या

राज्यास जोडले. कृष्ण ऊर्फ कन्हेर याचा मुलगा महादेवाच्या पश्चात गादीवर बसला. त्यानें आपल्या पूर्वजांवर ताण करून आपला दरारा माळव्यापासून म्हैसुरापर्यंत बसविला. महादेव व रामदेवराव या उभय राजांच्या कारकीर्दीत यादवांच्या राज्याची विलक्षण भरभराट होऊन त्यांस सार्वभौमत्व प्राप्त झालें. या सर्व गुंतागुंतीच्या राजकारणांत हेमाद्रि हा विद्वान राज्यकार्यधुरंधर व युद्धकलानिपुण असल्यामुळें त्याचें तेज सहजच त्यावेळीं पडलें असलें पाहिजे. महादेव व रामदेवराव यांस आपल्या राज्याचें वैभव वाढविण्याच्या कामीं जें अलोट व अकल्पित यश प्राप्त झालें त्याचें बरेंचसें श्रेय त्यांच्या राज्यनौकेचा कर्णधार **हेमाद्री** याजकडे येतें असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. सदर बाबतींत पुढें-मागें ज्यास्त ऐतिहासिक माहिती मिळाल्यास या महाराष्ट्रीय मुत्सद्द्याच्या चरित्रांतील व देवगिरीच्या यादव राजघराण्याच्या इतिहासांतील एक अज्ञात दालन खुलें होईल अशी आशा आहे.

इतिहासाची पुनरावृत्ति होते असें म्हणतात. राघोबादादानें आपला पुतण्या नारायणराव याचा वध केल्यामुळें पेशवाईच्या अखेरीस मराठी राज्यांत ज्याप्रमाणें बेदिली उत्पन्न झाली त्याचप्रमाणें रामदेवराव यानें आपला चुलतभाऊ **आमण** (महादेवाचा मुलगा) याचे डोळे काढून त्याचा अमानुषपणें वध केला. त्यामुळें यादवांच्या राज्यांत भयंकर यादवी माजली. राज्यांतील विचारी व अब्रूदार लोक राज्य सोडून गेले. यादव राजघराण्याविषयीं अभिमान बाळगणाऱ्या लोकांना भावी संकट परंपरेची दुष्ट स्वप्नें पडूं लागली. या व इतर अनेक कारणामुळें हेमाद्रीनें राजकारणांतील आपलें अंग

काढून घेतलें असावें असें दिसतें. परंतु त्याच्या पुढील आयुष्यक्रमाबद्दल व तो केव्हां कालवश झाला याबद्दल कांहींएक माहिती उपलब्ध नाहीं.

रामदेवरावाच्या कारकीर्दीस आरंभ झाल्यानंतर कांहीं वर्षांनीं सनातन हिंदुधर्माचें वर्चस्व दरबारांत कमी होत जाऊन त्या ऐवजीं वैदिकधर्मविरोधीपंथाचे वजन वाढत चालल्यामुळें, हेमाद्रीनें आपण होऊनच राजकारणांतून अंग काढून घेतलें असावें असा कित्येकांचा तर्क आहे. अठराव्या शतकांतील महाराष्ट्रीय मुत्सद्दी नाना फडणविसांची, सवाईमाधवरावांच्या पश्चात् राजकारणांत सल्लामसलत घेण्याचे बंद झाल्यावर, ज्याप्रमाणें पेशवाईची व त्याबरोबरच सर्व मराठी राज्याची सत्ता नष्ट झाली, त्याप्रमाणें तेराव्या शतकांतील महाराष्ट्रीय राज्यकार्यधुरंधर हेमाद्रि याने राजकारणांतून आपलें अंग काढून घेतल्यानंतर योग्य सल्लामसलतीच्या अभावीं यादवांची सत्ता कायमची लयास गेली !!

अकबराच्या कारकीर्दींत ज्याप्रमाणें राजा तोडरमल यानें जमाबंदीची व्यवस्था लावून दिली, त्याप्रमाणें महादेव व रामदेवराव या उभयतांच्या राजवटींत हेमाद्रीनें राज्यांतील जमाबंदीची शिस्त लावून दिली. कोणताही देश जिंकून घेतल्यानंतर तो कायमचा अमलाखालीं ठेवणें अवघड असते. हेमाद्रीनें प्रजेच्या सुखासाठीं अनेक गोष्टी प्रचारांत आणिल्या. खाण्यांत बाजारी वापरण्याचा उपक्रम, लिहिण्याच्या बाबतींत सुलभता यावी म्हणून देवनागरी लिपीस नवे वळण देण्याची व्यवस्था व चुन्याच्या साहायावांचून विशिष्ट पद्धतीनें दगडी इमारती बांधण्याची पद्धत या तीन गोष्टी हेमाद्रीनें दक्षिणेंत पहिल्यानें सुरू

केल्या अशी परंपरागत समजूत आहे. या बाबतींत पुढें यथामति विवेचन करण्यांत येईल.

२. हेमाद्रीचें ग्रंथकर्तृत्व.

हेमाद्रीची कीर्ति आज सुमारें सात–आठशें वर्षें भरतखंडांत गाजत आहे याचें विशेष कारण त्याची निरनिराळ्या विषयावरील व विशेषतः धार्मिक विषयावरील ग्रंथरचना हें होय. हिंदुस्थानच्या उत्तर भागांत त्याचेपूर्वी सुमारें शें-दिडशें वर्षें मुसलमानी राजांचा अंमल जरी सुरू झाला होता, तरी त्याचा जम बरोबर बसला नव्हता ह्मणून ह्मणा किंवा अन्य कांहीं कारणानें ह्मणा मुसलमानास दक्षिणेकडे नजर फेंकण्यास रामदेवराव यादवाच्या कारकीर्दीपर्यंत संधि मिळाली नाव्हती. हिंदुधर्मांविषयीं मुसलमानांना अत्यंत तिटकारा होता व त्यांच्याकडून हिंदूंचा फार छळ होत होता, अशा बातम्या त्यापूर्वीच दक्षिणेंत पसरल्या होत्या. हिंदूनां अत्यंत पूज्य अशा **सोमनाथाच्या** मंदिराचा व त्यांतील मूर्तीचा महमद गझनीनें विध्वंस केल्याचें उदाहरण त्याचे डोळ्यापुढें होतेंच. शिवाय जैनधर्माखेरीज वैदिक धर्मास विरोध करणारे लिंगायत व महानुभावपंथ असे दोन नवे पंथ उदयोन्मुख होऊं लागले होते. हिंदुधर्मास आलेली ग्लानी नाहींशी होऊन त्यास पुन्हां उज्वल स्वरूप प्राप्त व्हावें या हेतूनें महादेवराजाच्या आश्रयाखालीं हेमाद्रीनें " चतुर्वर्गचिंतामणि " नांवाचा प्रचंड ग्रंथ रचिला. त्यांत हिंदुधर्मीयांनीं नेहमीं पाळावयाची व्रतवैकल्यें, नित्यनैमित्तिक कर्में, दानधर्म, तीर्थयात्रा व मोक्षसाधन या विषयांचे श्रुतिस्मृति व पुराणें यांचे आधार देऊन सांगोपांग विवेचन केलें आहे. हिंदुधर्माविषयक बाबतींत सदरील ग्रंथ अद्याप आधारभूत मानिला

जातो. स्मृति व पौराणिक कालापासून हिंदुधर्मांत चालत आलेले शेंकडों आचार व व्रत-नियमादि विधि संगतवार एके ठिकाणीं संकलित करून "चतुर्वर्गचिंतामणि" च्या रूपानें हेमाद्रीनें हिंदुधर्मास अत्यंत उपयुक्त व पोषक अशी आचारव्यवस्था तयार केली, व त्यायोगें हिंदुधर्मीयांस उपकृत केलें. सदरील ग्रंथाचे पांच भाग असून त्याचें सविस्तर वर्णन दुसऱ्या भागांत केलें आहे. **बोपदेवानें** "मुक्ताफल" या नांवाचा ग्रंथ लिहिला आहे त्यावर हेमाद्रीनें "कैवल्यदीपिका" नांवाची विद्वत्ताप्रचुर टीका लिहिली आहे. बोपदेव हेमाद्रीचा आश्रित होता तेव्हां त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथावर हेमाद्रीनें टीका करावी हें सकृत्दर्शनीं चमत्कारिक दिसतें, तथापी या ग्रंथाच्या कोलोफोन--समाप्तिसूचकवाक्यामध्यें--खालीं दर्शविल्याप्रमाणें उल्लेख आहे, त्यावरून या शंकेचें निराकरण होतें. बोपदेवानें "**हरीलीला**" नामक (भागवताचें सार) ग्रंथ लिहिला आहे. हे दोनही ग्रंथ हेमाद्रीच्या आज्ञेवरून लिहिले गेले असें त्या ग्रंथकर्त्याच्या पुढें दिलेल्या कबुलीवरून दिसतें.

विद्वद्धनेशशिष्येण भिषक्केशवसूनुना ।
हेमाद्रिर्बोपदेवेन मुक्ताफलमचीकरत् ॥
श्रीमद्भागवतस्कंधाध्यायार्थादि निरूप्यते ।
विदुषा बोपदेवेन मन्त्रिहेमाद्रितुष्टये ॥

बोपदेवाच्या बापाचें नांव केशव असून, गुरूचें नांव **धनेश** होतें. **वरदा** नदीच्या तीरीं **सार्थ** नांवाचें गांव होतें, त्या ठिकाणीं उभयतां राहत असत. **बोपदेवानें** संस्कृत--व्याकरण--शास्त्रावर 'मुग्धबोध' नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. सदरील ग्रंथकारानें आपल्या

वाडिलांचें नांव केशव असें असून, गुरूचें नांव **धनेश** होतें असें झटलें आहे. ह्या हकीकतीवरून वर निर्दिष्ट केलेले **बोपदेव** एकच होते हें निःसंशय होय. ह्याखेरीज हेमाद्रीनें संस्कृतांत बरेच टीकात्मक ग्रंथ लिहिल्याचें आढळून येतें. त्याबद्दल पुढें यथावकाश विवेचन करण्यांत येईल.

हेमाडपंताचें मराठी भाषेवर अलोट प्रेम होतें असें पूर्वी झटलें आहे. त्यानें मराठी भाषेंत बरीच ग्रंथरचना केली असावी असा तर्क आहे, परंतु त्याचे ग्रंथ उपलब्ध नाहींत. खाजगी व राजकीय व्यवहारांत लिहावयाच्या पत्रांचे **मायने** कसे असावेत अशाबद्दल त्यानें कांहीं मेस्तकें तयार केली होती. अशाबद्दल गोविंदकवीनें आपल्या मेस्तकांत केलेला उल्लेख पूर्वी येऊन गेला आहे. मात्र मराठी भाषेची भरभराट व्हावी म्हणून हेमाद्रीनें शक्य तितके प्रयत्न केले, याबद्दल शंका नाहीं. तत्कालीन यादवराजांच्या दरबारांत मराठीचा शिरकाव होऊन ती राजभाषा म्हणून ठरली गेली हें हेमाद्रीच्या खटपटीचें फळ होय. महानुभावपंथाचा, देवगिरीच्या आजुबाजूच्या प्रांतांत, व विशेषतः वऱ्हाडांत प्रसार होत होता. महानुभाव पंथाचे धार्मिक व इतर ग्रंथ बहुतेक मराठींतच लिहिले जात होते. त्यामुळें मराठी भाषेचा झपाट्यानें प्रसार होण्याचे कामीं अनायासें मोठी मदत झाली. हेमाद्री हा मराठी भाषेच्या उत्कर्षासाठीं फार झटत असे याबद्दल महानुभावपंथाचे ग्रंथांत जागोजाग पुरावा आढळतो.

देवगिरीचे यादवराजे कृष्ण ऊर्फ कान्हेर, महादेव व रामदेवराव यांच्या राजवटींत दरबारी भाषा मराठी होती व एकंदर राज्यव्यवहार मराठी भाषेच्याद्वारें चालत होता असें पूर्वी झटलें आहे,

'दख्खनचा प्राचीन इतिहास' या नांवाचा एक अमूल्य ऐतिहासिक ग्रंथ सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनीं लिहिला आहे, त्यांत संस्कृतांत लिहिलेल्या 'लेखपंचाशिका' नांवाच्या ग्रंथाचा त्यांनीं उल्लेख केला आहे. त्यांत, सनदा, खतें, दानपत्रें व राजेलोकांच्या दरम्यान होणाऱ्या तहनाम्याचे मायने ऊर्फ मसुदे दिले आहेत. यादवराजा महाराजाधिराज सिंघण व गुजराथचा राजा महामंडलेश्वर लवणप्रसाद यांच्या दरम्यान झालेल्या "यमलपत्रा"चा (तहनाम्याचा) मसुदा त्यांत दिला आहे. त्यावरून निदान यादवराजा सिंघण याचे वेळेपर्यंत दरबारचें काम संस्कृत भाषेंत चालत असावें असें दिसतें. परंतु हेमाद्रीनें ही प्राचीन वहिवाट बदलून राजकीय कागदपत्र म्हणजे, सनदा, दानपत्रें तहनामे वगैरे मराठींत लिहिण्याचा नवीन उपक्रम केला. भोजराजाचे दरबारांत संस्कृतकवि व पंडित यांचा ज्याप्रमाणें गौरव केला जात असे त्याचप्रमाणें यादवराजा चक्रवर्ति रामदेवराव याच्या देवगिरीच्या दरबारांत मराठी कवि व ग्रंथकार यांचा त्यांच्या गुणांप्रमाणें बहुमान करण्यांत येत होता ह्याबद्दल आमचे सन्माननीय मित्र कै. विनायकराव भावे यांनीं आपल्या महाराष्ट्र–सारस्वतांत व श्रीयुत यशवंतराव देशपांडे यांनीं आपल्या महानुभावीय मराठीवाङ्मयग्रंथांत बरींच उदाहरणें दिलीं आहेत. मुक्ताफल, हरिलीला वगैरे ग्रंथांचा कर्ता प्रख्यात संस्कृत पंडित व कवि श्रीबोपदेव [हेमाद्रीचा आश्रित] हा रामदेवराव यादव याच्या पदरीं होता असें मागें लिहिलेंच आहे. त्याचा शिष्य भीष्माचार्य यानें महानुभावपंथाची दीक्षा घेतली व संस्कृत आणि मराठी भाषेंत बरेच ग्रंथ लिहिले. 'रुक्मिणि स्वयंवराचा' कर्ता

नरेंद्रकवि हा रामदेवराव यादव ऊर्फ जाधव याच्या कारकीर्दीत होऊन गेला. शके १२१० मध्यें त्यानें 'रुक्मिणी स्वयंवर' नांवाचा ग्रंथ लिहिला. तो रामदेवराव जाधव यांस फार पसंत पडला, व त्याबद्दल रामदेवराव जाधवानें त्याचा बहुमान केला. याखेरीज कवीश्वर भास्कर दामोदर पंडित वगैरे प्रतिभासंपन्न महानुभावपंथीय ग्रंथकार यांचा यादव (जाधव) रामदेवराव ह्याचे दरबारांत बहुमान होत असे अशाबद्दल महानुभाववाङ्मयांत जागोजाग उल्लेख केलेले आढळतात. देवगिरीच्या यादव ऊर्फ जाधव राज्यांच्या अमदानींत महानुभावपंथाचा उदय होऊन, सदरील पंथाच्या मतांचा प्रसार यादवांचे राज्यांत झपाट्यानें झाला व खुद्द राजघराण्यांतही त्यांचा हळुहळु शिरकाव होऊन त्यांतील कांहींजणांनीं सदरील पंथाची दीक्षा घेतली, अशाबद्दलचा उल्लेख महानुभावपंथीय ग्रंथांत आढळतो. महानुभावपंथ, श्रीकृष्णाखेरीज अन्य उपास्य दैवतास मानीत नाहीं. ह्मणून त्या पंथास **जयकृष्णीयपंथ** अगर **अच्युत**सांप्रदाय अगर **महात्मापंथ** अशी निरनिराळीं नांवें दिलेलीं आढळतात. देवगिरीचे यादव राजांना आपण यदुवंशीय असल्याबद्दल फार अभिमान वाटत असे ह्मणून त्यांच्या विरुदावलींत "दारावतीपुरवराधीश" "यादव नारायण" अशी विरुदें प्रामुख्यानें आढळतात. ज्या पंथांत अगर सांप्रदायांत आपल्या मूळवंशांतील पुरुषांस ह्मणजे श्रीकृष्णास, 'एकमेवाद्वितीयम्' म्हणून **उपास्यदैवत** मानलें जात होतें, तो पंथ अगर सांप्रदाय देवगिरीच्या यादव घराण्यांतील राजांच्या परम आदरास पात्र झाला असल्यास त्यांत आश्चर्य कोणतें? परंतु या अवैदिक व चातुर्वर्ण्यविरोधकपंथाच्या अनुयायांचे राजदरबारांत उत्तरोत्तर वाढत चाललेलें दर्चस्व सनातन

हिंदुधर्मीयांस खचेनासें झालें. हेमाद्री हा तर सनातन हिंदुधर्माचा कट्टा अभिमानी ! तेव्हां त्याला या वेदविरोधी पंथीयांचें वाढतें वजन बिलकुल सहन झालें नसल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं !! 'शिशुपालवधा' चा महानुभवपंथीय ग्रंथकार भानुभट बोरीकर याच्या चरित्रावर 'भानुविजय' नांवाच्या लिहिलेल्या ग्रंथांत हेमाद्रीनें तुर्कांस मुद्दाम बोलावून यादवांचें राज्य नष्ट केलें असा त्याजवर महानुभावपंथीयांनीं राजद्रोहीपणाचा उघड आरोप केला आहे. यावरून हेमाद्री व महानुभावपंथीय लोक व त्यांचा अभिमानी रामदेवराव यादव यांचे परस्पर संबंध सलोख्याचे नसावेत असें उघड दिसतें. राजदरबारांत मराठी भाषेचा शिरकाव झाल्यावर राज्याचे सर्व व्यवहार त्या भाषेंत होऊं लागले. हेमाद्रीच्याकाळीं बऱ्याच लिपि प्रचलित होत्या; परंतु सर्व संस्कृत व मराठी ग्रंथ देवनागरी लिपींत लिहिले जात होतें. अर्थात् देवनागरी हीच दरबारची लिपि झाली. परंतु ह्या लिपींत सुबोध व सुवाच्य रीतीनें लिहावयाचें म्हटल्यास वेळाचा अपव्यय होतो, सबब अल्पकाळांत बराच मजकूर लिहितां यावा म्हणून सदर लिपीस एक विशिष्ट प्रकारचें वळण देऊन हेमाद्रीनें 'लघुलेखन–पद्धति' तयार केली. तिला 'मोडी' लिपि अशी संज्ञा असून तिचें जनकत्व बहुजनसमाजाकडून आज शेकडों वर्षें हेमाद्रीस दिलें जातें. लेखनसौकर्यामुळें सदरील लिपि महाराष्ट्रीयांस फार प्रिय असून मराठी राज्यांत खाजगी व राजकीय लेखनव्यवहार याच लिपींत चालत असत. 'मोडी' लिपी सरकारदरबारांत बंद करून सर्व काम देवनागरींत चालवावें असा थोड्या वर्षांपूर्वी आपल्या इंग्रज सरकारनें ठराव केला होता

तो महाराष्ट्रीयांच्या सुसंघटित विरोधामुळें सरकारास परत घ्यावा लागला ही गोष्ट वाचकांच्या स्मृतींतून अद्याप गेली नसावी !

हेमाद्रीची धर्मविषयक मतें

'चतुर्वर्गचिंतामणि' ग्रंथाच्या पुढें दिलेल्या मंगलाचरणांत हेमाद्रीनें गणपतीची आराधना केली आहे ह्मणून व 'संतमालिकेंत' "हेमाडपंत गणेशभक्त । पिशाच्य चैतन्याचे लिखित" असा त्याच्याबद्दल उल्लेख केला आहे यावरून हेमाद्रीचें उपास्यदैवत "गणपति" असावें असें पुष्कळ विद्वान् लोकांचें मत आहे. गणपति हा विघ्नहर्ता व विद्याधीश असल्यामुळें सर्व मंगलकार्यांच्या आरंभीं त्याचें पूजन प्राचीन काळापासून सर्व हिंदुलोक करितात, या परंपरेस अनुसरून हेमाद्रीनें ग्रंथाचे आरंभीं ग्रंथ निर्विघ्नपणें पार पडावा ह्मणून गणेशस्तवन केलें, यावरून हेमाद्रीचें उपास्यदैवत 'गणपति' असावें असें निश्चित अनुमान करणें चुकीचें होईल.

'कल्याणानि ददातु वो गणपतिर्यस्मिन्नतुष्टे सति ।
क्षोदियस्यपि कर्मणि प्रभुवितुं ब्रह्मापि जिन्हापते ॥
जाते तच्चरणप्रणामसुलभे सौभाग्यभाग्योदये ।
रङ्कस्याङ्कमनंकुशा निविशतेदैवेन्द्रलक्ष्मीऽपि ॥

श्री गजाननाच्या प्रसन्नतेची आवश्यकता मामूल वहिवाटीप्रमाणें वरील अवतरणांत नमूद केली आहे.

हेमाद्रीनें आपले ग्रंथांत श्रीगणेशासंबंधानें आदर व्यक्त केला असला तरी, भागवतधर्माकडे त्याचा विशेष ओढा होता ही

गोष्ट श्रीबोपदेवानें लिहिलेल्या 'मुक्ताफल' व 'हरिलीला' ह्या ग्रंथावर त्यानें केलेल्या अमूल्य टीकेवरून दिसून येईल. पैकीं मुक्ताफल ग्रंथांतील समर्पक वेंचे तिसऱ्या भागांत दिले आहेत. चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथाचे ३१ व्या अध्यायाचे आरंभीं श्लोक दिला आहे तो असाः—

"हेमाद्रिसान्निद्रमुरारिभक्ति
रधीत वेदाऽ खिलधर्मवेदः।
अशेषलोकोद्धरणेऽवतीर्णः॥

... ...

याखेरीज मुक्ताफल ग्रंथाच्या आरंभीच्या श्लोकावरून हेमाद्री हा परम विष्णुभक्त ऊर्फ भागवतधर्माचा कट्टा अभिमानी होता असें स्पष्ट दिसतें. तसेंच पंढरपूरच्या श्रीविठ्ठलमंदिराच्या जीर्णोद्धाराकरितां हेमाद्रीनें बरीच रक्कम देणगी म्हणून दिली, यावरूनही हेमाद्री हा भागवत धर्माचा पूर्ण अनुयायी होता ह्या विधानास पुष्टि मिळते.

सनातनहिंदुधर्मविरोधीपंथाविषयीं हेमाद्रीची सहिष्णुता.

सनातन हिंदुधर्मास कालवशात् प्राप्त झालेली क्षीणता नाहींशी करून त्याचें पुनरुज्जीवन करण्यासाठीं हेमाद्रीनें "चतुर्वर्गचिंतामणीं" नांवाचा प्रचंड ग्रंथ लिहिला, यावरून हेमाद्रीच्या मनांत हिंदुधर्माबद्दल किती जाज्वल्य अभिमान होता हें सहज दिसून येतें. तसेंच त्यानें भरतखंडांत जागोजाग देवालयें बांधून आपल्या विचारास मूर्तस्वरूप दिलें. यादवांच्या राजदरबारांत अवैदिक व चातुर्वर्ण्यास विरोध करणाऱ्या महानुभावपंथांच्या अनुयायांचें बरेंच वर्चस्व झालें तरी हेमाद्रीनें धार्मिक बाबतींत त्यांचा हेवा अगर छलं केल्याबद्दल कोठें उल्लेख

आढळत नाहीं. उलट जैनधर्मीयांनीं देवगिरी येथें जैनमंदिर बांधण्या-संबंधी खटपट चालविली असतां हेमाद्रीनें स्वतःचें वजन खर्च करून दरबारांतून त्याकामी परवानगी मिळवून दिली, याबद्दलचा उल्लेख जैनयति **श्रीमद्रत्नमंडणगणि** यानें लिहिलेल्या **"सुकृतसागर"** ग्रंथांत केला आहे. तो असा–परमार कुळांतील शेवटचा राजा धाराधीश जयसिंहदेव याचे पदरीं पृथ्वीधर ऊर्फ पेथडकुमार या नांवाचा जैन मंत्री होता. त्याची व हेमाद्रीची भेट झाल्याबद्दलची मनोरंजक हकीकत त्यांत नमूद केली आहे. या गोष्टींत ऐतिहासीक सत्य किती आहे हें सांगणें कठीण आहे. परंतु त्यावरून हेमाद्रीची परधर्मीयाच्या मतासंबंधीं बरीच सहिष्णुता होती अशी परंपरागत जी समजूत आहे तिला दुजोरा मिळतो. पृथ्वीवर हा जैनधर्माचा मोठा अभिमानी होता. व जैनमताच्या प्रसारार्थ त्यानें मांडव, मांधाता, नाशिक, चंद्रावति (हल्लीचें चांदवड) धार, चितोड, उज्जयनि, जुनागड, गोलका, देवगिरी वगैरे ठिकाणीं सुमारें ८३ जैन मंदिरें बांधलीं. खुद्द मांडव या ठिकाणींच त्यानें शेंकडों जैन मंदिरें बांधल्याचा या ग्रंथांत उल्लेख आहे !

आमचा चरित्रनायक हेमाद्रीपंडित हा कट्टा सनातन वैदिक ब्राह्मण होता व त्याचें देवगिरीच्या यादवराजाचे दरबारांत फार वजन होतें तसेंच देवगिरीचे यादवराजघराणें हिंदुधर्मीय असल्यानें देवगिरीसा-रख्या ठिकाणीं जैनमंदिरें बांधणें ही गोष्ट अशक्य कोटींतील होय अशी पृथ्वीधराची खात्री होती, तथापि पृथ्वीधराच्या शब्दकोशांत "निराशा" या शब्दास अवसर नव्हता. त्यानें आपला कार्यभाग सिद्धीस नेण्यासाठीं एक अजब युक्ति लढविली ती अशी

नर्मदातीरीं ओंकारेश्वर येथें बाराज्योतिर्लिंगांपैकीं एक स्वयंभु ज्योतिर्लिंग आहे. त्याठिकाणीं पृथ्वीधरानें एक भव्य धर्मशाळा बांधून ब्राह्मणसंतर्पण सुरूं केलें. आपल्या गुणावर लुब्ध होऊन एका परधर्मीयानें ओंकारेश्वरासारख्या निर्जन ठिकाणीं आपले स्मारक केल्याची बातमी हेमाद्रीच्या कानी आली. हेमाद्रीनें त्याठिकाणीं स्वतः जाऊन सदरील गोष्टीच्या खरेपणाबद्दल आपली खात्री करून घेतली. तेथील ब्रह्मवृंदांनीं पृथ्वीधरास हेमाद्रीकडे नेलें व उभयतांची गांठ घालून दिली. हेमाद्रीनें पृथ्वीधरास सनातनहिंदुधर्माविषयीं अत्यादर दाखविण्याचें कारण विचारिलें. पृथ्वीधरानें देवगिरी येथें जैनमंदिर बांधण्याचा आपला मनोदय आहे असें प्रांजलपणें त्यास कळविलें. हेमाद्रीनें त्याचा मनोदय पूर्ण करण्याच्या कामी होईल-तितकी खटपट करण्याचें आश्वासन दिलें.

हेमाद्रीनें पृथ्वीधरास कांहीं दिवस देवगिरी येथें रहावयास सांगि-तलें. अनुकूल परिस्थिति येतांच त्यानें पृथ्वीधराची रामदेवाबरोबर मुलाखत करून दिली. हेमाद्रीपंडिताचा जैनमंदिर बांधण्यास परवानगी देण्याचेकामीं विरोध नाहीं असें पाहून राजानें देवगिरी येथें जैनमंदिर बांधण्यास परवानरी दिली.

जैनयति श्रीमद्रत्नमंडणगणि शके १३८२ (इ. स. १४६०) सालीं कालवश झाला, देवगिरीचा अखेरचा यादवराजा रामदेवराव याची कारकीर्द शके ११९३ पासून शके १२३१ (इ.स.१२७१ ते १३०९) पर्यंत होती. याच सुमारास धाराधीश-जयसिंहदेव मुसलमानांच्या त्रासानें मांडवगडचा आश्रय धरून राहिला होता. वर दिलेल्या कालावरून ऐतिहासिक सत्याचा अंश नसावा हें वर दिलेल्या

हकिगतींत खास दिसतें. हेमाद्रीच्या अंगी परधर्माविषयीं सहिष्णुता हा अलौकिक गुण वसत असल्यामुळें स्वतःच्या धर्मासंबंधानें एकनिष्ठ राहूनही इतर धर्मियांबद्दल सहानुभूति दाखविणें अशक्य नाहीं हें तत्त्व त्याच्या चरित्रापासून घेण्यासारखें आहे.

हेमाडपंति शिल्पशास्त्रपद्धति.

भरतवर्षांत हिमालयापासून रामेश्वरापर्यंत हिंदूंची असंख्य देवालयें आहेत, त्यांत हेमाडपंति पद्धत्तीनें बांधलेलीं देवालयें बरींच आहेत. विशिष्ट पद्धत्तीनें इमारती बांधण्याची कल्पना हेमाद्रीनें प्रथम काढली म्हणून त्या पद्धतीस हेमाडपंति असें नांव पडलें अशी बहुजनसमाजाची शेंकडो वर्षांपासून समजूत आहे. चुन्याच्या मदतीवांचून दगडावर दगड रचून बांधकाम करण्याची नवी कल्पना बसवून त्यानें शिल्पशास्त्रांत क्रान्ति घडवून आणिली. खानदेश, वऱ्हाड, आंध्रप्रांत, कर्नाटक वैगेरे प्रांतांत हेमाडपंतीपद्धतीनें बांधलेलीं शेंकडों भव्य व सुंदर देवळें आहेत. कल्याण स्टेशन सोडल्यावर पुण्यास जातांनां "अंबरनाथ" हें पहिलें स्टेशन लागतें. त्याठिकाणीं हेमाडपंती पद्धत्तीनें बांधलेलें फार पुरातन शिवमंदिर आहे. या ठिकाणीं दरसाल महाशिवरात्रीस मोठी यात्रा जमते. स्थापत्यशास्त्रावर संस्कृत वाङ्मयांत उपलब्ध असलेल्या ग्रंथांत हेमाडपंतीपद्धतीचा उल्लेख नाहीं. आमचे मित्र कै. वझे यांचा प्राचीन हिंदी स्थापत्यशास्त्रासंबंधानें दांडगा व्यासंग होता. पण स्थापत्यशास्त्रावरील कोणत्याहि ग्रंथांत याबद्दल उल्लेख नाहीं असें त्यानी प्रस्तुत ग्रंथकर्त्यास पत्रानें कळविलें. परंपरागत असलेल्या ऐकीव माहितीशिवाय याबाबतींत ऐतिहासिक पुरावा कांहीं नाहीं असें मोठ्या दिलगिरीनें

म्हणावें लागतें. हेमाडपंती पद्धतीनें बांधलेल्या इमारतीसारख्या इमारती हेमाद्रीच्या कालापूर्वीही अस्तित्त्वांत होत्या असें पाश्चात्य स्थापत्यशास्त्रज्ञांचें मत आहे. **बोपदेवानें** आपल्या **मुक्ताफळ** ग्रंथांत हेमाद्रीनें मूर्तीचे व देवालयाचें नानाविधप्रकार चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथांत दिले आहेत असें म्हटलें आहे. त्यावरून हेमाद्रीनें बरीच देवालयें बांधली, या विधानास पुष्टि मिळते.

हेमाडपंती पद्धतीखेरीज, यादवांच्या राजवटींत इमारती बांधण्याच्या ज्या विविध पद्धती होत्या त्या, आर्यावर्त, आंध्र, "चालुक्य," "कदम्ब," "पल्लव" वगैरे नांवानें प्रसिद्ध आहेत. हेमाद्री करणाधिप असतांना देवागिरीच्या राज्याचा विस्तार नर्मदातीरापासून म्हैसुरापर्यंत पसरला होता. व खुद्द हेमाद्रीनें यादवांच्या राज्यांत बऱ्यांत प्रसिद्ध ठिकाणीं व उत्तर हिंदुस्थांनांतील तीर्थाच्या ठिकाणीं अनेक देवालयें बांधलीं. यावरून त्यानें बांधलेल्या देवालयाच्या विशिष्ट पद्धतीस हेमाडपंतीपद्धत असें नांव त्यावेळीं पडलें असावें. बुद्धधर्मीय लोकांनीं हिंदुस्थानांत जागोजाग लेणीं व विहारें बांधली आहेत तीं पांडवाचीं लेणीं या नांवानें संबोधिली जातात. बुद्धधर्मासंबंधानें सनातन हिंदुधर्माभिमान्यास तिटकारा वाटत होता. सबब बुद्धधर्माचें नांव साफ बुजून जावें या हेतूने अशा प्रकारची अचाट कामें **पांडवा**खेरीज व्हावयाचीं नाहींत असें लोकांस भासविण्याचा त्यांचा हेतु असावा. शेंकडों देवळें बांधून हेमाडपंतानें हिंदुधर्माविषयीं लोकांच्या मनांत पुन्हां जागृति उत्पन्न केल्यामुळें त्याचें चिरंतन स्मारक रहावें या हेतूनेंही, त्या पद्धतीस **हेमाडपंती** हें टोपण नांव तत्कालीन बहुजन समाजाकडून देण्यांत आलें असल्यास आश्चर्य नाहीं!

आतांपर्यंत राजकीय, धार्मिक, सामाजिक व बौद्धिक बाबतींत, आमच्या चरित्रनायकानें कसें यश संपादन केलें याचें त्रोटक वर्णन वर दिलें आहे. या गुणाखेरीज हेमाद्रीच्या अंगीं दानशूरत्त्व, सदाचारसंपन्नता वगैरे अनेक वैयक्तिक गुण होते, अशाबद्दल जागोजाग उल्लेख आढळतात. अशी सर्वगुणसंपन्न विभूति भरतवर्षांत भूतकाळीं झाली नाहीं व भविष्यकाळीं होणार नाहीं असें या ग्रंथाच्या आरंभी उद्धृत केलेल्या श्लोकांत जे उद्गार काढले आहेत ते यथार्थ आहेत असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.



भाग दुसरा.

हेमाद्रीची ग्रंथरचना

तस्य श्रीकरणेशस्य काऽपि लेखनचातुरी ।
यशः प्रशस्तिभिस्तूर्णं येन दिग्भित्तयोभृताः ॥
अनेन चिन्तामणिकामधेनु कल्पद्रुमानर्थि जनायदत्तान् ॥
विलोक्य शङ्के किममुष्य सर्वं गीर्वाणनाथोऽपि करप्रदोऽभूत ॥
अथामुनाधर्मकथादरिद्रं त्रैलोक्यमालोक्य कलेर्बलेन ।
तस्योपकारे दधतानुचिन्तां चिन्तामणिः प्रादुरकारिचारु ॥

आज सुमारें सहाशें-सातशें वर्षें महाराष्ट्रांत किंबहुना भरतखंडांत हेमाद्रीची कीर्ति ज्याकारणांमुळें अविछिन्नपणें गाजत आहे त्यांत त्याच्या ग्रंथकर्तृत्त्वाची प्रामुख्यानें गणना करण्यांत येते. हेमाद्रीची ग्रंथसंपत्ति संस्कृत भाषेंत आहे. मराठी भाषेंतही त्यानें बरेच ग्रंथ निर्माण केले असे म्हणतात पण ते आज उपलब्ध नाहींत याबद्दल देवगिरी वाटते. हेमाद्रीचें मराठी भाषेवर निस्सीम प्रेम होंते व तिच्या अभिवृद्धीसाठीं त्यानें आपल्या हयातींत शक्य ती खटपट केली, याबद्दल मागें उल्लेख केला आहे. हेमाद्रीनें तयार केलेल्या मेस्तकांचा तत्कालीन मराठी वाङ्मयांत वारंवार उल्लेख करण्यांत येतो, यावरून त्यानें मराठी भाषेंत कांहीं ग्रंथ रचिले असावे असा तर्क आहे. हेमाद्रीनें संस्कृत भाषेमध्यें जे ग्रंथ लिहिले आहेत त्यांवरून त्याचें गीर्वाण भाषेवरील प्रभुत्व, श्रुतिस्मृतिपुराणें वैगेरे ग्रंथाचा त्याचा दांडगा व्यासंग, मार्मिक टीका करण्याची त्याची शैली, ऐतिहासिक दृष्टि, स्वधर्माबद्दल कळकळ वैगेरे अनेक गुण दृष्टोत्पत्तीस येतात. हेमाद्रीच्या अगोदर सुमारें शें-दिडशें वर्षांपूर्वी

मुसलमानांचा उत्तर हिंदुस्थानांत अम्मल सुरू होऊन त्या भागांत त्यांचें चांगलें बस्तान बसलें होतें. बुद्ध व जैनधर्माचें वर्चस्व जरी कमी झालें होतें तरी त्याच सुमारास दक्षिण महाराष्ट्रांत लिंगायतांचा व बृहन्महाराष्ट्रांत महानुभावांचा असें दोन अवैदिक व चातुवर्ण्यविरोधक नवे पंथ उदयोन्मुख झाले होते. याकाळांत पौराणिक देवांची उपासना मोठ्या उत्साहानें करण्यांत येत होती. परंतु धार्मिक व्यवहार व आचार यासंबंधीं विधिनिषेधपर वाक्यें व वचनें अनेक स्मृति व पुराणें यांतून जिकडे तिकडे पसरली होती त्यांतील वर वर दिसणारा विरोध व विसंगतगणा यांचा समन्वय अथवा मेळ घालता न आल्यामुळें धर्मशास्त्राबद्दल तत्कालीन बहुजन समाजांत गोंधळ माजला होता. ही असमाधानकारक स्थिति नाहींशी करून धार्मिक व्यवहार व आचार यांची संगतवार जुळणी करून व परस्पर विरोधी दिसणाऱ्या वचनांचा मेळ घालून त्यास सुव्यवस्थित स्वरूप प्राप्त होईल अशा रीतीची ग्रंथरचना करण्याकडे तत्कालिन ब्राह्मणांचें व वैदिक धर्माभिमानी इतर वर्णांचें लक्ष्य वेधलें होतें. या धोरणानें **धारचा भोजराजा** यानें धर्मशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला व उत्तर कोंकणचा शिलहारवंशीय राजा **अपरार्क** यानें याज्ञवल्क्य स्मृतीवर शके ११०९ मध्यें टीका लिहिली. धर्मशास्त्रावर अशाप्रकारें ग्रंथ लिहिण्याची त्या कालांत उत्पन्न झालेली प्रवृत्ति १३ व्या शतकांत हेमाद्रीनें व १४ व्या शतकांत माधवाचार्य व सायणाचार्यानें चालू ठेविली.

थिओडोर आफ्रेटच्या देखरेखेखालीं तयार झालेल्या "क्याटलोगस् क्याटलागोरम्" या नांवाच्या पुस्तकांचे जंत्रीत संस्कृत



डॉ. भाऊ दाजी लाड.

जन्म १८२२] [मृत्यु १८७४ मे.

ग्रंथांची व ग्रंथकारांची सूची दिली आहे. त्यांत खालीं लिहिलेल्या ग्रंथाचें कर्तृत्व हेमाद्रीकडे दिलें आहे.

१ चतुर्वर्गचिंतामणि, २ कालनिर्णय, ३ कालनिर्णय संक्षेप ४ तिथिनिर्णय, ५ कैवल्यदीपिका (श्रीबोपदेवाच्या मुक्ताफल ग्रंथावरील टीका) **६ आयुर्वेद रसायण** (अष्टांग हृदयावरील टीका), **७ दानवाक्यावलि, ८ पर्ज्यन्यप्रयोग, ९ प्रतिष्ठा, १० लक्षणसमुच्चय, ११ हेमाद्रिनिबंध, १२ त्रिस्थलविधि, १४ अर्थकांड,**

यापैकीं बरेच ग्रंथ उपलब्ध नाहींत, व श्रीबोपदेवांनें "हरिलीला" नांवाचा ग्रंथ लिहिला आहे त्यावर हेमाद्रीनें लिहिलेली टीका सुप्रसिद्ध असून तिचा वरील यादींत उल्लेख नाहीं यावरून आफ्रेट साहेबांनें हेमाद्रीच्या ग्रंथाबद्दल दिलेली यादी अपूर्ण असावी असें दिसतें.

चतुर्वर्गचिंतामणि.

हेमाद्रीचा ' चतुर्वर्गचिंतामणि ' हा ग्रंथ विस्तारानें महाभारताइतका प्रचंड असून हिंदूच्या धार्मिक बाबतींत तो अद्याप आधारभूत व सर्वमान्य गणला जातो. एवढा प्रचंड ग्रंथ राजाश्रयावांचून रचला जाणें अशक्य होय. देवगिरीच्या यादवराजघराण्यांत सिंघण अथवा सिंहण हा मोठा पराक्रमी राजा (इ. स. १२१० ते १२४७) होऊन गेला. त्याचे दोनही मुलगे कृष्ण ऊर्फ कान्हेर, आणि महादेव हे आपल्या बापाप्रमाणें पराक्रमी असून त्यांची धर्माकडे प्रवृत्ति होती. चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथांतील व्रतखंडामध्यें दिलेल्या राजप्रशस्तींत

कृष्णदेव ऊर्फ कान्हेर यानें हिंदुधर्मास प्राप्त झालेली ग्लानि अथवा क्षीणता नाहींशी करून त्याचें पुनरुज्जीवन केल्याचा उल्लेख आहे.

येनानेकमहाफलक्रतुकृता संवर्ध्यमानोऽनिशम् ।
क्षीणः कालवशात्पुनस्तरुणतां धर्मोऽपि संप्रापितः ॥

कृष्णदेवानें अनेक यज्ञयाग करून क्षीणत्व पावलेल्या हिंदुधर्मास पुन्हां ऊर्जितावस्थेस आणलें, असा वरील उद्धृत केलेल्या श्लोकाचा सारांश आहे. ह्या ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायाचे शेवटीं दिलेल्या कोलोफोन (समाप्तिसूचक वाक्यांत) मध्यें 'महाराजाधिराज महादेव' याचें नांव प्रामुख्यानें दिलें आहे, त्यावरून यादवराजा महादेव याचे राजवटींत हा ग्रंथ त्याचे आश्रयाखालीं रचला गेला असें दिसतें. श्रीबोपदेवानें आपल्या ' मुक्ताफल ' ग्रंथांच्या आरंभीं व शेवटीं ह्या ग्रंथाचा आदरपूर्वक उल्लेख केला आहे.

ह्या ग्रंथाचे मुख्य चार भाग आहेत. प्रत्येक भागास ' खंड ' असें म्हटलें आहे. ह्या ग्रंथास 'पुरवणी' म्हणून परिशेष नांवाचें पांचवें खंड जोडलें आहे. त्याचे आणखी चार पोटभाग आहेत. (१) **व्रतखंड**, या खंडांत, श्रुति, स्मृति, इतिहास व पुराणें ह्यांचे आधारानें हिंदूंचीं नित्यनैमित्तिक व्रतें, अनुष्ठानें, उपोषणें, इत्यादिकांचें सांगोपांग वर्णन दिलें आहे. पुत्रप्राप्ति, अर्थप्राप्ति, व इतर इष्टफल प्राप्तिसाठीं, अनेक उपास्यदैवतांची आराधना करून त्यांचें उपशमन करण्याच्या हेतूनें वरील ग्रंथांत अनेक दैनिक, मासिक, पार्वणिक व्रतें निर्दिष्ट केली असून त्यांचें विस्तारानें विवेचन केलें आहे. तसेंच, गर्भाधान, पुंसवन, नामकरण, उपनयन, विवाह वगैरे हिंदूंच्या सोळा संस्कारांचें यथासांग विवरण केलें आहे. सारांश हिंदूंच्या नित्यनैमित्तिक धार्मिक बाबींचा

हा ग्रंथ हिंदुधर्मविषयक ज्ञानकोशच (Encyclo-pædia) होय असें म्हटलें असतां अतिशयोक्ति होणार नाहीं. (२) **दानखंड;** यांत धर्मदृष्ट्या ज्या दानांचें माहात्म्य मानलें जातें व जीं दानें केलीं असतां प्राप्त झालेल्या व भावी संकटांचें व क्लेशांचें निराकरण होतें अशी धार्मिक समजूत आहे त्यांचें विस्तृत व सांगोपांग वर्णन दिलें आहे. जसें; दानांची प्रशंसा; दानांचें लक्षण; दान करणारे व दान घेणारे यांच्या पात्रापात्रतेचा विचार; दान करण्यास योग्यायोग्य काल, दान देण्यास कोणते जिन्नस योग्य वगैरे. या **दानखंडांत** भागवतपुराणांतील बरेच उतारे दिले आहेत व दान घ्यावयास योग्य अशा वस्तूंच्या यादींत **'भागवत पुराणा'**चा समावेश केला आहे. **वैष्णवभागवतपुराण** ग्रंथाचें दान करणें अत्यंत फलदायक आहे असें हेमाद्रीनें म्हटलें आहे. (३) **तीर्थखंड;** या भागांत भरतवर्षांतील अनेक तीर्थांचें व पवित्र क्षेत्रांचें वर्णन दिलें आहे. या खंडाची हस्तलिखित अगर छापील प्रत उपलब्ध नसल्यामुळें तत्कालीन तीर्थस्थलांची यादी व त्यांचें ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्व ह्याबद्दल कांहींएक माहिती देतां येत नाहीं. (४) **मोक्षखंड;** यांत मुक्तीचा मार्ग स्पष्ट करून सांगितला आहे. तीर्थखंडाप्रमाणेंच या खंडाची हस्तलिखित अगर छापील प्रत उपलब्ध नसल्यामुळें त्यांतील अमूल्य माहिती देतां येत नाहीं. (५) पुरवणी अथवा **परिशेष खंड;** याचे चार पोटभाग केले आहेत व त्यांत अनेक धार्मिक विषयांचे विस्तृत विवेचन केलें आहे.

पोटभाग (१) यांत अनेक उपास्यदेवता व दैवतें ह्यांचें वर्णन दिलें आहे. पोटभाग (२) यांत श्राद्धें किंवा पितृपिंडोदक क्रिया ह्यांचे विविधप्रकार सांगितले आहेत. पोटभाग (३) यांत धार्मिक व नित्य-नैमित्तिक कर्मे करण्यास योग्य ऋतु व काल कोणते यांचा निर्णय

केला आहे व पोटभाग (४) यांत अनेक प्रायःश्चित्तांचें वर्णन देऊन, नानातऱ्हेच्या दोषांचें अगर पापांचें निरसन होईल असे उपाय सांगितले आहेत.

वाचकांच्या सोयीसाठीं या भागांचे अखेरीस **व्रतखंडांतील** व्रतांची व त्यांत उल्लेखिलेल्या श्रुति, स्मृति, पुराणें वगैरे ग्रंथांचीं संगतवार जंत्री दिली आहे.

'चतुर्वर्गचिंतामणि' हा ग्रंथ मीमांसा व धर्मशास्त्र या दृष्टीनेंही फार महत्वाचा आहे. श्रुति, स्मृति, इतिहास व पुराणें ह्यांतील सकृद्दर्शनी परस्परविरोधी दिसणाऱ्या वाक्यांचा मीमांसाशास्त्रास अनुसरून समन्वय करण्यांत हेमाद्रीनें बरेंच कौशल्य दाखविलें आहे. यामुळें मीमांसाकार या नात्यानें त्याचा नंबर बराच वर लागेल. हिंदुधर्मशास्त्रांतील दायभाग, दत्तकप्रकरण, स्त्रीधन,प्रायश्चित्त प्रकरण वगैरे बाबतींत निरनिराळ्या धर्मशास्त्रकारांचा देशकाल-भेदामुळें बराच मतभेद पडतो; सदरील बाबतींत साधार व युक्तिवादास अनुसरून आपलें मत देऊन गुंतागुंतीचे प्रश्न सोड-विण्याचें कामीं हेमाद्रीनें बरीच मदत केली आहे. दत्तकमीमांसाकार व हेमाद्री ह्या उभयतांचे दरम्यान धर्मशास्त्रांतील कांहीं महत्वाचे बाबतींत मतभेद आहेत. धर्मशास्त्रांत केवल व द्यामुष्यायण अशा दोन प्रकारच्या दत्तकपुत्रांचा निर्देश केला आहे. बिनशर्त दत्तक दिलेल्या पुत्रास **केवल** अशी संज्ञा आहे. जनकबापाचे मिळकतीवर हक्क ठेऊन कांहीं शर्तीवर दत्तक दिलेल्या पुत्रास द्यामुष्यायण अशी संज्ञा आहे. पार्वण व एकोद्दिष्ट श्राद्धकरतेवेळीं सपिंडी-करणाचे बाबतींत त्यांस कोणते हक्क प्राप्त होतात याबद्दल धर्म-शास्त्रकारांमध्यें मोठा वाद आहे. हेमाद्रीनें याबाबतींत दिलेलें मत बऱ्याच धर्मशास्त्रकारानां संमत आहे. द्यामुष्यायणपुत्र घेण्याची रूढि फार वर्षांपासून बंद पडली असल्यामुळें या वादाचें महत्व

आतां फारसें उरलें नाहीं. मात्र विवाह,रिक्थ,व अशौच या प्रकरणाशीं सांपिंड्याचा निकट संबंध असल्यामुळें, सदरील विषय धर्मशास्त्रांत फार महत्वाचा गणला जातो. **कमलाकरानें** आपल्या **निर्णयसिंधु** ग्रंथांत **हेमाद्रीचा** ५१० वेळां उल्लेख केला आहे.

मदनपारिजात, द्वैतनिर्णय, वैजयन्ती, निर्णयसिंधु, संस्कारकौस्तुभ वगैरे ग्रंथांत चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथाचा उल्लेख करण्यांत आला आहे. मीमांसाकार व धर्मशास्त्रकार या नात्यानें या दोनही शास्त्रांत हेमाद्रीनें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे.

चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथांत १ आचार (रुढि अथवा वहिवाट) २ व्यवहार (दिवाणी व फौजदारी कायद्याचा ऊहापोह) ३ प्रायःश्चित्त वगैरे (दंड) ४ (इष्टापूर्ति नैमित्तिक कृत्यें दान वगैरे) ५ अध्यात्मिकविद्या, वगैरे विषयांचा समावेश करण्यांत आला आहे असें पूर्वी लिहिलें आहे, हेमाद्रीच्यापूर्वी वरील विषयावर बरेच ग्रंथ लिहिले गेले होते; परंतु, विस्ताराच्या व विद्वत्ताप्रचुरतेच्या दृष्टीनें त्यापैकीं एकहि ग्रंथ चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथाच्या बरोबरीस येणार नाहीं, असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे, **परिशेषखंड** ह्या भागाचे श्राद्धखंड, कालखंड, प्रतिष्ठाखंड असे विभाग केलेले आहेत. **हेमाद्री** व **माधवाचार्य** या उभयतांस धर्मशास्त्राचे स्तंभ असें मानण्यांत येतें. जैमिनी मीमांसाग्रंथाचा ज्यानें अभ्यास केला असेल त्यास हेमाद्रीचे ग्रंथ समजण्यास अडचण पडणार नाहीं. हेमाद्रीनें तैत्तिरीय शाखेच्या ब्राह्मण ग्रंथांतील व अथर्ववेदाच्या **गोपथ** ब्राह्मण ग्रंथांतील बरेच उतारे चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथांत दिले आहेत. त्याप्रमाणेंच पुढें नमूद केलेल्या सूत्रांतून हेमाद्रीनें सदरील ग्रंथांत बरेच उतारे दिले आहेत ते ग्रंथ येणेंप्रमाणें:— शुक्लयजुर्वेदाच्या वाजसनेयशाखेतील कात्यायन अथवा काटीसूत्र, मैत्रायणीयकठसूत्र, मानवमैत्रायणीयसूत्र,

आपस्तंभसूत्र, बौधायनसूत्र, आश्वलायनसूत्र, शौनकसूत्र, कपोलाद-सूत्र, कौशिकप्रणितश्राद्धकल्पसूत्र, वैजवानगृह्यसूत्र, शौनकगृह्यसूत्र, सांख्यायनगृह्यसूत्र, छांदोग्यपरिशिष्ट, वाजसनेय परिशिष्ट, राणायनीय-सूत्र, पारस्करगृह्यसूत्र, चरअध्वर्यसूत्र, व चार वेदांतील इतर सूत्रें.

मैत्रायणीयसूत्रांतील उतारे बऱ्याच प्रमाणांत असल्याचें आढळून येतें, याचें कारण हेमाद्रीनें ज्याठिकाणीं चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथ लिहिला त्या देवगिरीनगरींत व तिच्या आसपासच्या प्रदेशांत मैत्रायणी ब्राह्मणांची वस्ति फार होती व अद्यापिहि सदरील शाखेच्या ब्राह्मणांची वस्ति सदरील ठिकाणी बऱ्याच प्रमाणांत असल्याचें आढळून येतें.

शौनक, पिप्पलाद आणि कौशिक हीं सूत्रें अथर्ववेदापैकीं आहेत. हेमाद्रीच्या या प्रचंड ग्रंथांत कल्पसूत्रांवरील टीकाकार देवस्वामी, धूर्तस्वामी, कर्कोपाध्याय, जयंतस्वामी, अपरार्क, विश्व-रूप, हरिहर, वामदेव, गोविंदोपाध्याय, शंखधर ऊर्फ शंखश्रीधर वगैरे विद्वानांचा उल्लेख वारंवार करण्यांत आला आहे. पैकीं देव-स्वामी ह्यानें बौद्धायन सूत्रांवर आणि आश्वलायन गृह्यसूत्रांवर टीका लिहिल्या आहे. धूर्तस्वामीनें जयस्तंभ सूत्रांवर टीका लिहिली आहे. कर्कोपाध्याय यानें काटिय ऊर्फ कात्यायन सूत्रांवर, व जैमिनीच्या पूर्वमीमांसेच्या धर्तीवर बहारीची टीका लिहिली आहे. सदरील ग्रंथ जर्मन देशांत प्रसिद्ध झाला आहे. कर्कोपाध्यायाची मतें उद्धृत करून आपलीं मतें कोणकोणत्या बाबतींत भिन्न आहेत याचा निर्देश हेमाद्रीनें बऱ्याच ठिकाणीं केला आहे. जयंतस्वामी यानें आश्वलायन गृह्यसूत्रांवर टीका लिहिली आहे. मनुस्मृतीचा टीकाकार मेधातिथी ह्याचा जागोजाग उल्लेख करण्यांत आला आहे. मेधातिथी हा कुमारीलभट्टाचे ग्रंथांतील उतारे देतो यावरून तो कुमारीलभट्टाच्या मागून झाला असावा असें दिसतें.

विश्वरूप यानें याज्ञवल्क्यस्मृतीवर टीका केली आहे व तो विज्ञानेश्वरापूर्वी होऊन गेला असावा असें दिसतें. कारण विश्वरूपाची टीका फार क्लिष्ट आहे असें विज्ञानेश्वरानें आपल्या ग्रंथांत विधान केलें आहे. विश्वरूपानें श्रीशंकराचार्यांच्या अद्वैत मतांवर टीका केली आहे यावरून तो श्रीशंकराचार्यांच्या पश्चात् व विज्ञानेश्वराच्या अगोदर झाला असावा. चतुर्वर्गचिंतामणिग्रंथांत ज्या पुराणांचा व उपपुराणांचा उल्लेख केला आहे, त्यांतील बरेच ग्रंथ आजमितीस उपलब्ध नाहींत.

हेमाद्रीनें **व्यवहार** ह्याविषयाचा संक्षिप्त रितीनें उहापोह केला आहे. परिशेषखंडांतील एका भागांत दाय, रिक्थ, संविभाग ह्या शब्दांच्या व्याख्या दिल्या आहेत तसेंच ब्राम्हणांच्या व इतर वर्णातील लोकांच्या मालमत्तेच्या हक्कासंबंधानें व स्त्रीधनासंबंधानें संक्षिप्त रितीनें उहापोह केला आहे. यामुळें हेमाद्रीची प्रख्यात धर्मशास्त्रकारांत गणना केली जात आहे.

श्री बोपदेवानें आपल्या **मुक्ताफल** ग्रंथाच्या आरंभीं हेमाद्रीसंबंधानें दिलेल्या श्लोकांत **चतुर्वर्गचिंतामणि** ग्रंथासंबंधानें खालीं लिहिल्याप्रमाणें उल्लेख केला आहे.

विष्णुप्रीत्यै चतुर्वर्गचिंतामण्यामजीगणत् ।
भेदान् व्रतानां दानानां तीर्थानां मोक्षवर्त्मनाम् ।
मूर्तिप्रासादपूजानां हेमाद्रिर्गणकाग्रणीः ।
विष्णुभक्ताङ्गभक्तानां गणयत्युक्तसारथीः ॥
मुक्ताफलेन ग्रंथेन सद्भागवत-शुक्तिना ।
भक्तिस्वात्यम्बुनामुग्धमार्कण्डेय शिशुश्रिया ॥

मुक्ताफलं सुखचितस्फुटभक्तिभेद-
प्रत्यक्षराजितलसत्पद-पद्मरागम् ।
हेमाद्रिसम्भवसुवर्णनिवेशरम्यं,
कण्ठे कुरुद्रुमवरुन्धमपूर्वलक्ष्मीम् ॥

या श्लोकांपैकीं पहिल्या श्लोकांत हेमाद्रीनें आपलें उपास्यदैवत विष्णु ह्यास प्रसन्न करण्याकरितां चतुर्वर्गचिंतामणि नांवाचा विद्वन्मान्य ग्रंथ रचून त्यांत व्रत, दान, मोक्ष, व तीर्थ ह्यांतील सुक्ष्म भेदांचें वर्णन केलें आहे असें म्हटलें आहे. दुसऱ्या श्लोकांत हेमाद्री हा श्रीविष्णुच्या भक्तांत परम श्रेष्ठ असून त्याचे गुणवर्णन करण्यांत तो नेहमीं मग्न असतो असें म्हटलें आहे. ह्याच श्लोकांत त्यांस **गणकाग्रणी** असें म्हटलें आहे. त्याचा अर्थ असा कीं, राज्यातील द्रव्यभांडाराचे जमाखर्चाचे खर्डे तयार करण्यांत त्याचा हातखंडा होता म्हणजे तो उत्तम दर्जाचा फडणीस होता. याच श्लोकांत मूर्ति, इमारती व उपासना यांच्या सूक्ष्म भेदांचें अथवा प्रकारांचें हेमाद्रीनें जागोजाग विवेचन केलें आहे असें म्हटलें आहे. यावरून इमारती विशिष्ठ प्रकारानें रचण्याची कल्पना त्यानें काढली या विधानास पुष्टि मिळते. तिसऱ्या व चौथ्या श्लोकांत भक्तिरसानें ओथंबलेल्या **श्रीमद्-भागवत** ग्रंथांतील समर्पक सुंदर-स्थळें ऊर्फ मोत्यें (मुक्ताफलें) या ग्रंथात दिली असून त्याचें श्रेय हेमाद्रीला देण्यांत आलें आहे व तें देतांना मोत्यांचे शिंपले व त्यांत निर्माण होणारीं मोतीं व सुवर्णमय मेरु पर्वत ह्याचें रुपक करून हेमाद्रीच्या विद्वत्तेचा मोठ्या मार्मिक रीतीनें गौरव केला आहे **मुक्ताफल** ग्रंथावर हेमाद्रीच्या लिहिलेल्या टीकेंत हेमाद्रीच्या आंगची विद्वत्ता व वादग्रस्त मुद्यावर समतोल व युक्तिवादास

धरून टीका करण्याची शैली जागोजाग दिसून येते. मम्मट, अभिनवगुप्त, हेमचंद्र वगैरे विद्वान लोकांचा या टीकेंत उल्लेख केलेला आढळतो.

गणकाग्रणी या विशेषणावरून **करणाधिप** या हुद्याच्या एका विशिष्ट अंगाचा खुलासा होतो. यादवांच्या राजवटींत **करणाधिपाकडे** फडणविसाची कामगिरी सोंपविण्यांत येत असे ही गोष्ट यावरून सिद्ध होते. **मुक्ताफल** ग्रंथांवर हेमाद्रीनें **कैवल्यदीपिका** नांवाची टीका लिहिली आहे तिचे अखेरच्या कोलोफोनांत स्वाीं लिहिलेला मजकूर आहेः—

" इति श्रीमत्प्रौढप्रतापचक्रवर्ति–महाराजाधिराजसोमयदुवंशोद्भव रामराजमन्त्रिवर्यहेमाद्रिविरचितामुक्ताफलटीका समाप्ता "

यावरून रामदेवराव यादव गादीवर बसल्यानंतर हेमाद्रीकडे मुख्य मंत्र्याचे काम कांहीं काल तरी असावें असें सिद्ध होतें. याशिवाय **मुक्ताफल** ग्रंथाच्या उपसंहाराच्या अखेरच्या श्लोकांत तत्कालीन देवगिरीचा राजा रामदेवराव याची श्रीबोपदेवानें प्रशंसा केली आहे. त्यावरून, श्रीबोपदेव व हेमाद्री हे समकालीन असून रामदेवरावाच्या राजवटींत त्यांची गणना थोर विद्वानांत केली जात होती असें दिसतें. तो श्लोक येणेंप्रमाणेंः—

सकलविबुधमानः श्रीनिकेतं वदान्यः ।
समदविबुधसिंहः श्रीनिवासांघ्रिस्नेहः ॥
जयति विनयसिन्धुर्वामनेशः सुबन्धुः ।
प्रणत-सकलभूपः कृष्णवंशैकदीपः ॥

यांत वर्णन केलेला कृष्णवंशांतील ऊर्फ यदुवंशांतील कुलदीपक तत्कालीन रामदेवरावराजावांचून दुसरा कोण असणार !!

कैवल्यदीपिकेच्या शेवटच्या पांच श्लोकांत हेमाद्रीनें श्रीबोपदेवाच्या बुद्धिमत्तेचें वर्णन केलें असून, त्याच्या **मुक्ताफल** ग्रंथावर आपण टीका लिहिल्याचें कबूल केलें आहे. व ती कामराजाचे घरीं राहून आपण पुरी केल्याचें म्हटलें आहे. यावरून हेमाद्री व बोपदेव या उभयतांचे परस्पर संबंध निकट होते असें दिसतें. **मुक्ताफल** ग्रंथावरून हेमाद्रीच्या चरित्रावर बराच प्रकाश पडतो. या ग्रंथांत श्रीमद्भागवताचें सार विशिष्ट पद्धतीनें केलें असल्यामुळें व त्यांतील काव्य उच्च दर्जाचे असल्यामुळें, तो विद्वान लोकांच्या आदरास पात्र झाला. **कैवल्यदीपिका** टीका समाप्त होईपर्यंत तरी हेमाद्री व रामदेवराव यांचे परस्पर संबंध सलोख्याचे असावे असें सदरील ग्रंथाच्या अखेरच्या कोलोफोनवरून स्पष्ट दिसतें. या सोम-यदुवंशीय रामदेवराव यादवाच्या राजवटींत यदुकुलावतंस श्रीकृष्णाची लीला व चरित्र वर्णन करणाऱ्या ग्रंथकारांचा-मग ते सनातन वैदिक असोत अगर अवैदिक असोत यांचा सारखा गौरव होत असे.

व्रतखंडात उल्लेखिलेल्या पुराणांची व त्यांतील व्रतवैकल्याची पुढें यादी दिली आहे. त्यावरून सुमारें सहाशें वर्षांपूर्वी कोणकोणतीं व्रतें प्रचलित होती त्याची कल्पना करतां येते. सदरील व्रतांपैकीं बरीच व्रतें आपल्या प्रांतांत हल्ली रूढ नाहींत असें दिसतें. तथापि मंगलागौरीव्रत, होलिकोत्सवविधि, श्रावणिकाव्रतम्, कौमुदीमहोत्सव (कोजागरीपूर्णिमा), सावित्रीव्रतम् वगैरे अनेक व्रतें अद्यापि प्रचारांत आहेत. चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथांत श्रुति, स्मृति, पुराणें वगैरे

नानाग्रंथांतून समर्पक उतारे दिले आहेत यावरून हेमाद्रीचा विद्याव्यासंग केवढा दांडगा होता ह्याची बरीच कल्पना होते.

चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथाचे तीर्थखंड व मोक्षखंड असे दोन भाग अद्यापि छापलेले नसावेत असें दिसतें. तीर्थखंडाची हस्तलिखित प्रत मिळविण्याचा प्रस्तुत लेखकानें बराच प्रयत्न केला परंतु त्याकामीं त्यास यश आलें नाहीं. सदरील खंडावरून सुमारें सहाशें वर्षांपूर्वी भरतखंडांत कोणती तीर्थें अस्तिवांत होतीं, याबद्दलची साधार माहिती मिळण्याचा संभव आहे.

चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथाच्या सर्व खंडाची अत्यंत संक्षिप्तरूपानें आतांपर्यंत माहिती दिली आहे. तेवढ्यावरूनही हेमाद्रीच्या बुद्धिमत्तेची व विविध शास्त्रांसंबंधीं त्यानें संपादिलेल्या प्राविण्याची थोडीबहुत कल्पना वाचकांस झाल्यावांचून राहणार नाहीं.

आयुर्वेद रसायन.

वाग्भटाच्या अष्टांगहृदय ग्रंथावर "आयुर्वेद रसायन" नांवाची टीका हेमाद्रीनें केली असून त्यांत टीकाकार हेमाद्री हा 'चतुर्वर्गचिंतामणिचा' कर्ता व रामदेवरावाचा करणाधिप होता असें ह्मटलें आहे. कै० अण्णा कुंटे यांनी अष्टांगहृदयग्रंथ अरुणदत्ताच्या टीकेसह फार वर्षांपूर्वी प्रसिद्ध केला आहे. वाग्भटाचा कालनिर्णय करतांना अण्णासाहेब कुंटे यांनीं २२ प्रमाणें दिलीं आहेत त्यांत अष्टांगहृदय ग्रंथांतील सूत्रस्थान व कल्पस्थान या प्रकरणावर हेमाद्रीनें भाष्य लिहिल्याचें ह्मटलें आहे. अष्टांगहृदयावर अरुणदत्तानें लिहिलेल्या टीकेंत हेमाद्रीच्या नांवाचा उल्लेख केल्याचें दिसून येत नाहीं. हेमाद्रीच्या प्रेरणेनें व त्याच्या

आश्रयाखालीं एखाद्या तत्कालिन विद्वान वैद्यानें आयुर्वेदरसायन नांवाची टीका लिहिली असावी अशी कल्पना केल्यास ती अस्थानी होणार नाहीं.

कैवल्यदीपिका टीका.

श्रीबोपदेव हा हेमाद्रीचा समकालीन होता. त्यानें **मुक्ताफल** या नांवाचा पद्यात्मक ग्रंथ रचून त्यांत श्रीमद्भागवताचे सार पद्धतशीर दिलें आहे. श्रीमद्भागवत हा ग्रंथ भक्तिरसप्रधान असून परमेश्वराशीं सायुज्यता संपादण्यास नवविधा भक्तिसारखें दुसरें उत्तम साधन नाहीं, असें त्यांत प्रतिपादन केलें आहे. श्रीमद्भागवतांतील उत्तम तत्त्वें साररूपानें एकेठिकाणीं केलेलीं असल्यामुळें त्यास 'मुक्ताफल' (श्रीभागवतांतील मोत्यें) असें यथार्थ नांव बोपदेवानें दिलें आहे. या ग्रंथाचे एकोणीस अध्याय असून त्यांचें वर्गीकरण शृंगार, वीर, करुण वगैरे नवरसाच्या अनुरोधाने केलें आहे. सदरहू ग्रंथावर हेमाद्रीनें " कैवल्यदीपिका " नांवाची विद्वत्ताप्रचुर टीका लिहिली आहे. आपला आश्रित व समकालीन याचे ग्रंथावर हेमाद्रीसारख्या थोर विद्वानानें टीका लिहावी ही गोष्ट सकृतदर्शनी अंमळ विलक्षण दिसते. परंतु स्वतः ग्रंथ लिहून त्यावर त्याच ग्रंथकारानें आपलें भाष्य अगर वार्तिक लिहिल्याची उदाहरणें या देशांत सांपडतात. ' मुक्ताफल ' हा ग्रंथ श्रीमद्भागवतग्रंथांचें सार असून हेमाद्री हा स्वतः भागवतधर्माचा कट्टा अनुयायी होता यामुळें पारमार्थिक दृष्टीनें त्यानें सदरील ग्रंथावर टीका लिहिण्याचें मनावर घेतलें असावें. मुक्ताफल ग्रंथाच्या अखेरीस बोपदेवानें 'ग्रंथोपसंहार' या सदराखालीं हेमाद्रीची प्रशंसा केली आहे. व त्यांत श्लेष साधून रामदेवराव यादवराजाची तुलना दाशरथी रामाबरोबर केली आहे. हा

उपसंहार ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्त्वाचा आहे. कारण त्यावरून हेमाद्री व बोपदेव हे देवगिरीचे रामदेवराजाचे पदरीं होते असें निखालस दिसतें. शिवाय रामदेवराव यादवाची दाशरथी रामाबरोबर तुलना करण्यांत रामदेवराव यादव हा आपल्या प्रजेचें पालन श्रीरामचंद्राप्रमाणें करीत होता असें ध्वनित केलें आहे. यावरून ज्ञानेश्वर महाराजांनीं रामदेवराव आपल्या प्रजेचें पालन न्यायानें करीत होता असें ज्ञानेश्वरीच्या अखेरीस ह्मटलें आहे त्या विधानास बोपदेवाच्या उपसंहारानें जोर मिळतो. बोपदेवानें हेमाद्रीच्या प्रशंसापर जे श्लोक लिहिले आहेत ते येणेंप्रमाणें:—

चतुरेण चतुर्वर्गचिन्तामणिविणज्यया ।
हेमाद्रिणार्जितं मुक्ताफलं पश्यत कौतुकात् ॥
निर्मथ्य पयसांराशिंमन्दरः कौस्तुभं न्यधात् ।
हेमाद्रिर्वचसां मुक्ताफलं रत्नं हृदिप्रभोः ॥
हेमाद्रिमाद्रियत एव गुणेन येन
तेनैव पूरितसुखेन सुबह्ममेतत् ।
मुक्ताफलं प्रतिफलज्जगदीशरूपं
यत्कर्णकंठकूहरे सुषमास्य काचित ॥
हे एव चित्रे रामस्य सिन्धुर्बह्वः पुराधुना ।
हेमाद्रि स्वमुपानीतः सुर्यावर्त प्रदक्षिणः ॥
विद्वज्जनेश-शिष्येण भिषक् केशव सूनुना ।
हेमाद्रिर्बोपदेवेन मुक्ताफलमचौकरत् ॥

हेमाद्रीच्या ग्रंथाची वर यादी दिली आहे. त्यापैकीं बरेच ग्रंथ उपलब्ध नाहींत **हेमाद्रिनिबंध** या नांवाचा ग्रंथ हेमाद्रीनें लिहिला होता असे ह्मणतात खाजगी व दरबारी पत्रें कशी लिहावी याबद्दलचे मसुदे यांत नमूद केलेले आहेत. व या दृष्टीनें तो महत्वाचा आहे.

परंतु या ग्रंथाच्या अंतर्गत पुराव्यावरून हा ग्रंथ बराच अर्वाचीन असावा असें दिसतें. हेमाद्री हा मराठी भाषेचा पुरस्कर्ता होता व त्यानें देवगिरीच्या दरबारांत मराठी भाषेचा प्रवेश करविला असें बऱ्याच विद्वानांचें मत आहे. परंतु त्यानें स्वतः लिहिलेला अगर दुसऱ्याकडून लिहिविलेला एकहो ग्रंथ उपलब्ध नसावा हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय! त्यानें कांहीं मेस्तके तयार केलीं यांत शंका नाहीं. मुक्ताफल ग्रंथांत बोपदेवानें हेमाद्रीस **गणकाग्रणी** अशा संज्ञेनें संबोधिलें आहे. खुद्द हेमाद्रीनें आपल्या टीकेंत या पदाचा अर्थ केला आहे तो असाः—**गणकाग्रणी** ह्मणजे देशकोषयो रायव्ययौ लिखत्सु, अग्रणीः मुख्यः (राज्याचे खजिन्याच्या जमाखर्चाची लिखाणें तयार करण्यांत वाकबगार). यावरून हेमाद्रीनें देवगिरीच्या राजाच्या दिवाणगिरीवर असतांना मोठ्या प्रमाणावर जमाखर्चाचे खर्डे तयार केले असले पाहिजेत. परंतु पुराव्याच्या अभावीं निव्वळ कल्पनेवर हवाला देणें इतिहास लिहिणाऱ्याच्यादृष्टीनें वाजवी होणार नाहीं.

पंडित भगवानलाल इन्द्रजित यांच्या हस्तलिखित संस्कृतग्रंथ संग्रहांत बोपदेवाच्या " हरिलीला " ग्रंथाची एक अर्थवट प्रत आहे त्यावरून सदरील ग्रंथावर हेमाद्रीनें **विवेक** नांवाची टीका लिहिली असें दिसतें. मधुसूदनसरस्वती यानें सदरील टीका पूर्णतेस नेल्याबद्दलचा उल्लेख कांहीं ठिकाणीं केलेला आढळतो.

हरिलीलाविवेकोयं कामराजस्य वेश्मनि ।
कटकेरचयांकार तुष्टयै हेमाद्रिणांसताम् ॥

.....

सरस्वती श्रीमधुसूदनेन निर्व्यूढमेतद्बुधमोदनेन ।
जनःसमस्तोऽपि रसायनेन व्रजेशभक्तिं व्रजतादनेन ॥

चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथाच्या व्रतखंडांत नमूद केलेल्या पुराणांची व व्रतवैकल्याची जंत्री.

आदिपुराण.....(युगादि विधि;) प्रदोषविधि.

आदित्यपुराण.....(श्येनप्रासनविधि; सुखसुप्रव्रत; पुत्रोत्पत्ति; वनश्यामा महोत्सव.)

कालिकापुराण.....(चतुर्दशी जागरव्रत; इशानव्रत; कालरात्रीव्रत; महाव्रत.)

कालोत्तरपुराण.....(अनंगव्रत; प्रतिमाव्रत; भूमिव्रत; देवव्रत; सूर्यव्रत; सोमाय व कृष्णचतुर्दशीव्रत; शिवव्रतम्; तिथिनक्षत्र व पारव्रताम (शिवव्रत).

कूर्मपुराण.....(यमव्रत; कृष्णचतुर्दशी; अमावास्याव्रतम्.)

गर्गपुराण.....(नक्षत्र होमविधी).

गारुडपुराण.....(गायत्रीव्रत; आयुर्व्रत कांचनपूरीव्रतं (प्रकिर्णक व्रतानि)

देवीपुराण.....(पुत्रप्राप्तिव्रतं; मंगलाव्रतम्; रथयात्रा; दमनकपूजा-विधि; उमामहेश्वरव्रतं; शंकरनारायणव्रतं; गोयुग्म-व्रतम्; गोरत्नव्रतम्; नक्षत्रार्थव्रतं; संक्रान्तिव्रतानि; देवीव्रतं (कृच्छ्रव्रतांपैकीं); नंदाव्रतम् मासव्रतम्; देवव्रतम्;

नरसिंहपुराण.....(नरसिंहत्रयोदशी; हरिव्रतम्; हरिक्रिडायनम्; पात्रव्रतम्.)

नारदीयपुराण.....(भीष्मपंचकव्रतम्; व्यातिपातव्रतम्; कार्तिकमासव्रतम्; माघमासव्रतानि.)

नृसिंहपुराण.....(सौरनक्त व्रतम्.)

पद्मपुराण.....(कामव्रत; त्र्यैंयंबकम्व्रतम्; चंद्ररोहिणी शयनव्रतम्; देवीव्रतम्.)

पद्मपुराण.....(वृषव्रतम्; अमावास्यापयोव्रतं; दूर्वात्रिरात्रव्रतम्; धामत्रि-रात्रवृतम्; रुद्रव्रतम्; मंगलव्रतोद्यापनय; आदित्यशयन व्रतम्; ब्रह्मगायत्रीचंद्र रोहिणीव्रतं; क्रान्तिव्रतम्;

सूर्यव्रतम्; स्नेहव्रतम्; शिवव्रतम्; फलव्रतम्;वैष्णवव्रतम्: वारिव्रतम्; सौगंधाव्रतम्; वैश्वानरव्रतम; शिवरहस्य: अंगलातिकाव्रतम्; देवव्रतम्: सारस्वतव्रतम्; श्रद्धाव्रतम्: कीर्तिव्रतम्; सामव्रतम्; अहिंसाव्रतम्: मुखव्रतं; नीलव्रतम् प्राप्तिव्रतं; दिप्तीव्रतं; शक्रव्रतम्: रुदव्रतम्; शंभूव्रतं: भूभाजनव्रतम्; प्राज्यापत्यव्रतम्; प्राज्यापतव्रतम्; इंदु-व्रतम्; भौमव्रतम्; चन्द्रश्रतम्; प्रभाव्रतम् ; ब्रह्मव्रतम्: वसुव्रतम्; नदापदयव्रतम्; वरव्रतम्; वरुणव्रतम्; पर्व-भूभाजनव्रतम्; धराव्रतम्, करुपवृक्षव्रतम्; अश्वव्रतम्: करिव्रतम्; करिष्याग्नि साधनम्.)

ब्रह्मांडपुराण .. ...(कश्यप नारद संवादे दशादित्यव्रतम्; कर्णव्रतम् अर्थ श्रावणिकाव्रतम्: महोग्रस्थानं.)

ब्रह्मवैवर्तपुराणम्...

भविष्यपुराणम्... (प्रदोषव्रत: कामत्रयोदशी: ईश्वरव्रतम्; सोमव्रतम् महा-पौर्णमासिव्रतम्; शैवोपवासव्रतम्; राशीव्रतम् पितृव्रतम्: महाफलव्रतम्; संभोगव्रतम्; शिवनक्तव्रतम्; रथयात्रो-त्सवा; सौख्यव्रतम्; मुखव्रतम्; अर्कव्रतम्; युगावतार-व्रतम्; नंदाविधि; भद्राविधि; आदिन्याधि; मुखाविधि: दिवाकरव्रतम्; आदित्यशान्तिव्रत; नक्षत्र पूजाविधी.)

ब्रह्मपुराण ... ...(सूर्यव्रतम्; रविव्रतम्; चांद्रायणव्रतम्; (पौपव्रतापैकी) ब्रह्मकूचव्रत;)

भविषोत्तरपुराण...(अनंगत्रयोदशी; यमदर्शनत्रयोदशी; दुर्गंधदौर्भाग्य नाशन त्रयोदशी; सर्वमंगलात्रयोदशी;

भविषोत्पुराणम्... (मदनमहोत्सव; चतुर्दशीव्रत; पालिचतुर्दशी; कदली श्रावणीकाव्रतम् ; ब्रह्मकूचव्रतम्; चंद्रदर्श्य अष्टमीनक्त-व्रतम्; जयपौर्णमासिव्रतम्; वैशाखी कार्तिकी माघीविधी; कृतिकव्रतम्; होलिकोत्सवविधी; रक्षाबंधन पौर्णमासि-व्रतम्; पञ्चघट पौर्णिमाव्रतम्; इन्द्रपौर्णमासीव्रतम्; संतानदव्रतम्; ब्रह्मसावित्रीव्रतम्; अशोकात्रिरात्रव्रतम्.)

भविष्यत्पुराण ... (योगव्रतम्; पर्वनक्तव्रतम्; सद्रस्तानम् घ्राटिकाभिषेका; वंध्याभिषेकविधी.)

भविष्योत्तर पुराण (जाति त्रिरात्रव्रतम्; वस्त त्रिरात्रव्रतम्; गोपादभिरात्रव्रतम्; कौमुदीमहोत्सव; भद्रचतुष्टयव्रतं; सदाव्रतंनाम्; अन्नदानमहात्म्य; दिपदानविधी; चंडिकाव्रतम्; आदित्यव्रतम्; सूर्यस्थवारे त्रिपुरसूदनव्रतं; रोगहाविधी; नंदाधिव्रतविधी; कामदानेवेश्याव्रत; संपूर्णव्रतम्; पुत्रव्रत; सप्तसुंदरव्रतम्; चंद्रनाक्षत्राशान्ति; भौपव्रतम्; बुध; गुरु; शुक्रव्रत; शैनश्चव्रतम्; शैनश्चारादिशान्ति; शांभरायणीव्रतं; योगव्रतम्; विष्टीव्रतम्; द्वितियभद्राव्रतं; पञ्चव्रतम्; आन्दोलनविधी; कोकिलव्रतम्; धाराव्रतम्; सौरभि विक्रमव्रतम्; वृतांत कल्याणविधी; कृतिकाव्रतम्; होलीकोत्सवविधी; रक्षाबंधनपौर्णिमासिव्रतम्; पञ्चघट पौर्णिमाव्रत; इन्द्रापौर्णिमासिव्रतम्; संतानदव्रतम्; ब्रह्मसावित्रीव्रतम्; गोपदात्रिरात्रव्रतम्; अशोकात्रिरात्रीव्रतम्; जातित्रिरात्रव्रतम्; वस्तात्रिरात्रव्रतम्; कौमुदी महोत्सवा; भद्रचतुःष्टयव्रतम्; सदाव्रतम् नाम अन्नदान माहात्म्य; दीपदानविधी; चंडिकाव्रत आदित्यव्रतम्; सूर्यस्यवारे त्रिपूर सूदनव्रतम्; रोगहाविधी; नंदाधिव्रतविधी; कामदानिवेश्याव्रतम्; चंन्द्रनक्षत्रशान्ति)

मत्स्यपुराण.....(शिवचतुर्दशी; नवम्यादि उपासनव्रतम्; सूर्य नक्तव्रतम्; नक्षत्र पुरुषौव्रतम्; चंद्रसूर्यउपरागस्नानं; अद्भुतशातिकानिव्रतानि.)

महाभारत पुराण...(यमव्रतं; यशतपो व्रतानि.)

याज्ञवल्क्य पुराण...(

वराहपुराण..... (त्रयोदशीव्रतः पितुःव्रत; संघाटकव्रतः व्यतिपातव्रत; फाल्गुनविधीः)

वायुपुराण.....(

लिङ्गपुराण.....(शिवरात्रीव्रतमाहात्म्यं; मलव्यपोहनं पाशुपतव्रतं; भवानिव्रतं; महाव्रतम्; जेष्ठाव्रतम्; तीव्रव्रतं)

विष्णुधर्मपुराण.....(कामदेवव्रतम्; नंदव्रतं; महेश्वरव्रतं; वायुव्रतम्; विरुपाक्षिव्रतं; यमव्रत; क्षेमव्रत; धनवाप्तिव्रतम्; सर्व कामः कामावाप्ति व्रतं; जयव्रतम्; सुखव्रतम्; अशोकपूर्णिमाव्रतम्; लक्ष्मीनारायणव्रतम्; संवत्सरव्रतम्; महाव्रतम्; नदीव्रतम्; लोकव्रतम्; विष्णुव्रतम्; शैलव्रतम्; समुद्रव्रतम्; दिपव्रतम्; श्रीव्रत; पञ्चमूर्तीव्रत; गुणत्वाप्तिव्रतम्; ब्रह्मण्यप्राप्तिव्रतम्; धनावाप्तिव्रतम्; सर्वाप्तिव्रतं; चतुर्युगव्रतम्; देवमूर्तिव्रतम्; पितृव्रतम्; पातालव्रतम्; सप्तसागरव्रतम्; सप्तर्षिव्रतम्.)

विष्णुधर्मोत्तरम् ... (मनोरथपौर्णिमा; सौभाग्यव्रतम्; चंद्रव्रतम्; वरुणव्रतम्; शक्तव्रतम्; ब्रह्मकूर्चव्रत; पुर्णिमाव्रतम् अदिव्रेध्वस्नानम्; सर्वकामाप्तिव्रतम्; शैवनक्षत्र पुरुषव्रतम्; भौगावाप्तिव्रतम्; धर्मावाप्तिव्रतम्; धनावाप्तिव्रतम्; आरोग्यव्रतम्; कार्तिकस्नानंविधी; दाक्षमूर्तिव्रतम्; शिवरथव्रतम्; ग्रहणोपवास दंत्तोत्पतीशांति.)

विष्णुधर्म ... ... (अश्विनीस्नान; शत्रुनाशनव्रतम्; कृत्तिकास्नान; रोहिणीस्नान; सुकलत्रप्राप्तिव्रतम्; पादोदकस्नानम्; शतभिषास्नानं; विष्णुपदव्रतम्; अनंतव्रतम्; रुपसत्रव्रतम्; निराञ्जनविधी; नवनक्षत्रशांति; सुजन्मावाप्तिव्रतम्; ज्ञानावाप्तिव्रतम्; लावण्याव्याप्तिव्रतम्; शिलावाप्तिव्रतम्; (पौषव्रतानि) विद्यावाप्तिव्रतम्; चातुर्मासव्रतानि; देवशयनोत्थानविधी; असिधाराव्रत; वदेवव्रतम्; सागरवृत्त ध्वजव्रतं; आयुधव्रतम्; विष्णुदेवभिव्रतम्; शैवमहाव्रतम्; त्रिविमावृतम्; नानाशुभफलानि; अनशनविधी; माहेश्वरस्थानविधि; नानास्नानविधी;)

विष्णुपुराण ..... (पितृव्रत; वन्हीवंत; धृतिव्रतम्;)

विष्णुरहस्य ..... (त्रिविक्रमिश्रात्रव्रतं; पवित्रारोणाविधिः कृच्छ्रव्रतानि-वासोपवासव्रतम्.)

शिवधर्म ... ... (कृष्णचतुर्दशीव्रत; गंधव्रत; शूलदानव्रतं; शिवोपवितधर्म;अपरशैवमहाव्रतं; मौनव्रत; शिवालिङ्गव्रत; घृतस्नपनविधी.).

शिवधर्मोत्तर..... (कृष्णचतुर्दशीव्रत; उमामहेश्वरव्रत; अपर उमामहेश्वरव्रतम्;)

सौरधर्म..... ... (सूर्यव्रत).

सौरपुराण..... (सर्वव्रत; कृष्णचतुर्दशी; पापमोचनव्रतम्).

स्कंधपुराण ..... (सोद्यापन शिवरात्रीव्रतम्; शिवयोग युक्त शिवरात्रीव्रतम्; महाराजव्रतम्;महोत्सवव्रतम्; मौनव्रतोद्यापनम्; महालक्ष्मीव्रतम्; दशरथललितावृतम्; धौमवारव्रतम्; रोहिणीव्रतम्, धान्यसक्रांतिव्रतम्; लवणसक्रान्तिव्रतम्; रुपसक्रांतिव्रतम्; तेजसंक्रातिव्रत; सौभाग्य संक्रांतिव्रतम्; फलसंक्रातिव्रतम्; धनसंक्रान्तिव्रतम्; आयुसंक्रांतिव्रतम्; आज्ञासंक्रांतिव्रतम्; कीर्तीसंक्रांतिव्रतम् विशोक संक्रांतिव्रतम्; महेशव्रतम्;

स्कंधमहाकाल खंड (यमव्रत)



देवगिरीच्या यादव राजघराण्याचा इतिहास

भाग ३ रा.



आस्ते मण्डितदण्डकापरिसरः श्रीसेउणाख्यः परं
देशः पेशलवेशभूषणवचोमाधुर्यधुर्याकृतिः ।
तस्मिन्देवगिरिः पुरी विजयते त्रैलोक्यसारश्रियां
विश्रान्तिः सुरशालिशैलशिखरस्पर्धिष्णुसौधावलिः ।

देवगिरीचे अखेरचे यादवराजे महादेव व रामदेवराव यांच्या राजवटींत हेमाद्री करणाधिप असतांना यादवांचे राज्याचा विस्तार फार वाढला होता. व ते आपणांस सार्वभौम राजे म्हणवून घेत असत. उत्तरेकडे नर्मदा, दक्षिणेस कावेरी, पश्चिमेस अरबी समुद्र, पूर्वेस विदर्भाचा कांहीं भाग व हल्लींचे निजामाच्या राज्यांतील पश्चिमेकडील दक्षिणोत्तर चिरटी या चतुःसीमेमधील बहुतेक सर्व प्रदेश त्यांच्या पूर्ण अमलाखाली आला होता. अपरांत, (उत्तर कोंकण) वनवासी, (दक्षिण कोंकण) सेउणदेश, (हल्लीच्या नाशिक, नगर या जिल्ह्यांत समाविष्ट होणारा बहुतेक भाग) देवगिरी व कोल्हापूर यांचे दरम्यानचा मुलुख, कर्नाटक, म्हैसूर, तैलंगण, लाट, गुजराथ वगैरे प्रांताचा वरील टापूंत समावेश केला जात असे. इ. स. ४७५ पासून चालुक्य, (पूर्व व उत्तर कालीन) राष्ट्रकूट, कदंब, शिलाहार, यादव (होयसल यादव व सेउणदेशचे व देवगिरीचे यादव) वगैरे घराण्यांतील महत्वाकांक्षी राजे उपरिनिर्दिष्ट टापूंतील प्रदेश आपापल्या पूर्ण अमलाखालीं यावा म्हणून परस्पराशीं झगडत असत. वरील आठशे–नऊशे वर्षांचे अवधींत केव्हां

चालुक्यांची, तर केव्हां राष्ट्रकूटांची, केव्हां कदंबांची तर केव्हां यादवांची सरशी होत असे. पैकीं चालुक्य घराण्यांतील राजे फार बलाढ्य असून त्यांचा अंमल वरील टापूंतील प्रदेशावर फार वर्षे होता. यापैकीं एखाद्या राजघराण्यांत पराक्रमी व धाडशी पुरुष निपजला कीं तो दुसऱ्या घराण्यांतील दुबळ्या राजाबरोबर कांहींतरी कुरापत काढून त्याजवर चढाई करी व त्यास आपला मांडलिक बनवी. यादव वंशवृक्षास बऱ्याचशा शाखा फुटून त्या वरील टापूंत जिकडे तिकडे पसरल्या होत्या व त्यानी आपली स्वतंत्र संस्थानें स्थापिली होती. यादववंशांत होयसलयादव, सेउणदेशचे यादव व देवगिरीचे यादव या तीन शाखांचा प्रामुख्यानें समावेश होत असे. ही तीनही घराणीं आपला संबंध द्वारकेंतील यदुवंशीय श्रीकृष्णापर्यंत पोहोंचवीत. होयसल यादव हे यदुवंशीय नसून त्यांचा सेउणदेशचे (पूर्वकालिन) व देवगिरीचे (उत्तरकालिन) यादवाशी कांहीं संबंध नव्हता असें कांहीं विद्वानांचें मत आहे. मुंबई येथील सेंट झेव्हिअर कॉलेजांतील अध्यापक व इतिहास संशोधक रे० फादर हेरास हे वरील मताचे आहेत. **गदग** येथील इ. स. १११३ तील शिलालेखांत होयसल राजघराण्याची थोडी माहिती दिली आहे. त्यांत यादववंशीय भिल्लमदेव यानें होयसल राजघराण्यांतील वीरबल्लाल याजबरोबर युद्ध करून होयसलांची राजधानी द्वारसमुद्र जामिनदोस्त केल्याचा उल्लेख आहे. शिवाय बऱ्याचशा शिलालेखांत **होयसल** राजघराणें यदुवंशीय असल्याबद्दलचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणें या घराण्यांतील राजे आपणांस द्वारावतिपुरवराधीश, विष्णुवंशोद्भव इत्यादि बिरुदे लावण्यांत भूषण मानीत असत. या तीन

शाखांशिवाय **सात्यकी** या नांवाची आणखी एक यादवांची शाखा वरील टापूंत होती असें आढळून येतें. कर्नाटक व म्हैसूर प्रांतांतील, कानडीत असलेले ताम्रपट व शिलालेख यावरून वरील तीनही घराणी मूळ यादववंशीय असलीं पाहिजेत असा निष्कर्ष निघतो. होयसल यादव घराण्यांतील वीरबल्लालानें भिल्लमदेवाचा पराभव करून त्यापासून कुंतल देश जिंकून घेतल्यावर सदरील भिल्लमानें देवगिरी हे नवीन शहर वसवून तेथें आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें, असे कित्येकांचें मत आहे. सेऊणदेशचे व देवगिरीचे यादव हे सामान्य संस्थानिकांत मोडत असून तत्कालीन बलाढ्य चालुक्य-राजाचे ते मांडलिक होते. कालांतरानें चालुक्य कुळांत दुर्बळ राजे निपजल्यामुळें यादव कुळांतील पराक्रमी राजांनी त्यांस जिंकून त्यांचे मांडलिकत्त्व झुगारून दिलें व ते आपणांस सार्व-भौम म्हणवूं लागले.

भारतवर्षीयांची इतिहास लेखनाबद्दलची अनास्था सर्वश्रुत आहे. त्यामुळें भारतवर्षांतील कोणत्याही राजघराण्याचा सुसंगत इतिहास लिहिण्यास जरूर ती सामुग्री मिळणें जवळजवळ दुरापास्त आहे. ऐतिहासिक माहितीच्या अभावीं शिलालेख, ताम्रपट, दानपत्रे, चलनीनाणी व परकीय देशांतील प्रवाशांनीं लिहिलेलीं वर्णने याजवर सर्व भिस्त ठेवावी लागते. एखाद्या गोष्टीचे वर्णन करतांना तें अलंकारिक भाषेंत खुलवून लिहिण्याची अनिष्ट संवय लेखकांना असल्याचे पदोपदीं अनुभवास येतें. एखाद्या राजाचे पराक्रम वर्णन करतांना त्याची वाजवीपेक्षां फाजील स्तुति केल्यानें त्यास इतिहासाऐवजीं प्रबंधाचें-पोवाड्याचें-स्वरूप प्राप्त झालेलें दिसतें. त्यांतून ऐतिहासिक सत्य निवडून काढणें अशक्य होते. मागील

शतकाच्या अखेरच्या तीस चाळीस वर्षांत सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, डॉ० भाऊ दाजी, पंडित भगवानलाल इंद्रजित, न्या. तेलंग वगैरे पौर्वात्य पंडितांनीं, त्याचप्रमाणें डॉ. फ्लीट, किल्हॉर्न, बर्जेस्, वॉथेन्, जार्विस्, कॅम्बेल वगैरे पाश्चिमात्य विद्वान लोकांनीं दाक्षिणेंतील प्राचीन इतिहासाची साधन--सामुग्री मिळविण्याचे कामीं अविश्रांत श्रम केले. व त्यांच्या संशोधनानें महाराष्ट्राच्या इतिहासावर बराच प्रकाश पडला आहे. परंतु महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास पूर्णपणें व सुसंगतरीतीनें लिहिण्याचे कामीं हल्लींचे विद्वान लोक बिलकुल लक्ष घालीत नाहींत याबद्दल वाईट वाटते. वर निर्दिष्ट केलेल्या व इतर कांहीं संशोधकांनीं वेळोवेळीं तत्कालीन इंग्रजी नियतकालिकांत लेख लिहून शेंकडों शिलालेख व ताम्रपट उजेडांत आणून भारतवर्षीयांस उपकृत केलें आहे.

यादवघराण्यांतील राजे आपणांस यदुवंशीय म्हणवीत असत त्याचेपैकीं महापराक्रमी राजे **भिल्लम, सिंघण, कृष्ण, महादेव, रामदेवराव** हे आपल्या नांवापूर्वी "**यादवनारायण**" द्वारावतीपुरवराधीश" विष्णुकुलोद्भव वगैरे बिरुदें लावून आपला पूर्वसंबंध द्वारकेच्या श्रीकृष्णापर्यंत पोहोंचविण्यांत भूषण मानीत, असें पूर्वी म्हटलें आहे. यादवकुलांचा नाश होऊन श्रीकृष्ण निजधामास गेल्यावर यादवांची जिकडे तिकडे फांकाफांक झाली त्यापैकीं कांहीं उत्तरेकडे व कांहीं दक्षिणेकडे गेले व त्यांनी त्या त्या ठिकाणीं वसाहती केल्या असाव्या असें दिसतें. यापैकीं कांहीं यादव राजघराणीं सौराष्ट्रांतून नर्मदेच्या खालीं उत्तरून नाशिक नजीकच्या प्रांतांत आली असावी. नाशिकापासून सुमारें

बारा मैलावर **सिंडिनेरा** (सिन्नर) या नांवाचें शहर त्यांनीं वसविलें व ते आपल्या राजधानीचें शहर केलें. **सिंडिनेरा**पासून तहत पूर्वेकडे **पैठण** शहरापर्यंत व उत्तरेकडील सातपुड्यापर्यंतच्या प्रदेशास, यादवघराण्यांतील **सेउणचंद्र** नांवाच्या एका पराक्रमी राजामुळें **सेउणदेश** असें नांव प्राप्त झालें. व सदरील यादवराजघराण्यांतील यादव राजे **सेउण**देशचे यादव ह्मणून संबोधिले जात असत.

प्रसिद्ध इतिहाससंशोधक चिंतामणराव वैद्य यांच्या मतें यादवकुल समूळ नष्ट झाल्यामुळें यदुवंशीय घराण्यापैकीं कोणतेही घराणें उत्तरेकडे अगर दक्षिणेकडे जाणें शक्य नव्हते. सबब वरील यादवराजांचा यदुकुलाशीं संबंध जोडणें बरोबर नाहीं. परंतु श्रीमद्भागवत पुराणांतील अकराव्या स्कंधांतील ३१ व्या अध्यायांत दिलेल्या हकीकतीवरून अर्जुनानें अवशिष्ट राहिलेली यादव मंडळी आपल्याबरोबर इंद्रप्रस्थास नेली व तेथील आधिपत्य **व्रजनाभ**नामक एका यादवास देऊन त्यास तेथील गादीवर बसविलें. या व इतर हकीकतीवरून यादवकुल समूल नष्ट झालेलें नव्हते असें दिसते. अवशिष्ट राहिलेल्या यादवांपैकीं कांहीं घराणीं वर लिहिल्याप्रमाणें सौराष्ट्र सोडून उत्तरेकडे व दक्षिणेकडे गेलीं असावीं यांत शंका नाहीं.

या भागाच्या शेवटीं यादववंशाच्या बारा वंशावळी दिलेल्या आहेत त्यांचा परस्पराशीं मेळ बसत नाहीं. परंतु हेमाद्रीनें आपल्या "चतुर्वर्गचिंतामणि" ग्रंथाच्या व्रतखंड भागामध्यें देवगिरीच्या यादव राजघराण्यासंबंधीं प्रशस्ति जोडली आहे, त्यांत दिलेली वंशावळ संपूर्ण असून ती ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्त्वाची आहे. सदरील प्रशस्ति परिशिष्ट **अ** मध्यें दिली आहे. या वंशावळीचे पौराणिक व



डॉ. (सर) रामकृष्ण गोपाळ भांडारकर, एम्. ए.

जन्म ता. ६ जुलै १८३७] [मृत्यु २४ ऑगस्ट १९२५.

ऐतिहासिक असे दोन भाग पाडता येतील. पौराणिक वंशावळीचा आरंभ इंदु (चंद्र) पासून होऊन तींत पुराणास धरून व दंतकथेस अनुसरून प्राचीन भारतवर्षीय राजांची नांवें यथाक्रम दिलीं आहेत. ऐतिहासिक वंशावळीस **सुबाहु** राजापासून प्रारंभ होऊन तींतील अखेरचा पुरुष देवगिरीच्या यादवराजघराण्यापैकीं **महादेव** होता असें म्हटलें आहे. सदरील **महादेव** देवगिरीच्या यादवराजघराण्यापैकीं अखेरचा राजा **रामदेवराव** याचा चुलता होय. हेमाद्रि हा महादेवाचे राजवटींत करणाधिपाचे हुद्यावर असून "**चतुर्वर्गचिंतामणि**" हा प्रचंड ग्रंथ त्याच्या आश्रयाखालीं रचला अशी हकीकत पूर्वी दिलेली आहे. यावरून महादेवाचे पश्चात् देवगिरीच्या गादीवर बसलेल्या यादवराजांची नांवें त्यांत दिली नाहींत हें साहजिक आहे. या वंशावळींतील पौराणिक भाग अजिबात वगळला असतां सुबाहुपासून महादेवापर्यंत दिलेल्या राजांची नांवें ऐतिहासिक सत्यास धरून आहेत यांत शंका नाहीं. विशिष्ट शिलालेख अथवा ताम्रपट ज्यांच्या नेतृत्त्वाखालीं तयार करण्यांत आले असतील त्यांच्या अज्ञानामुळें अगर नजरचुकीमुळें अशा तऱ्हेचे फरक होणें संभवनीय आहे. उदाहरणार्थ-कै.पां.गं.पटवर्धन यांस,अहमदनगर जिल्ह्यांतील मौजे अश्वी येथील ताम्रपट एका गृहस्थाकडून मिळाला तो त्यांनीं भा.इ.सं.मंडळाच्या तिसऱ्या वर्षाच्या त्रैमासिकांत दिला आहे. तो परिशिष्ट नं. ४ मध्यें उद्धृत केला आहे. यादववंशीय इरम्मदेवानें कोंकणेगांव ब्राह्मणांस दान दिल्याबद्दलचा हा ताम्रपट आहे. या ताम्रपटांत इरम्मदेव हा तिसऱ्या भिल्लमाचा मुलगा असें म्हटलें आहे. हेमाद्रीच्या प्रशस्तींत इरम्माच्या ऐवजी परम्मदेव अगर 'ऐरम्मदेव' असें नांव असून तो चौथ्या भिल्लमाचा नातु होता असें दिसते. 'परम्म' या

शब्दाचा 'इरम्म' असा अपभ्रंश होणें सहाजिक आहे. याप्रमाणें शके ९९१ मध्यें **वसईस** सांपडलेला ताम्रपट व शके ९४८ चा **कलस-बुद्रुक** येथील ताम्रपट व शके ९२२ चा **संगमनेर**चा ताम्रपट यांत दिलेल्या वंशावळी परस्पराशीं जुळत नाहींत. परंतु हेमाद्रीनें व्रतखंडांत सुबाहूचा मुलगा दृढप्रहार यापासून महादेवराजापर्यंत यादवराजांची दिलेली वंशावळ इतिहासाच्या कसोटीस उतरते म्हणून ती आधारभूत धरून दृढप्रहारापासून दरएक यादवराजाची उपलब्ध असलेली माहिती पुढें देण्याचें योजिलें आहे.

संगमनेर येथील ताम्रपट.

हेमाद्रीच्या वंशावळींत, सुबाहूनें आपल्या चार मुलांमध्यें राज्याची वाटणी करून त्यापैकीं दक्षिणेकडील भाग आपला दुसरा मुलगा दृढप्रहार यास दिला असा मजकूर आहे. ऐतिहासिक कालांतील यादवराजघराण्याचा विश्वसनीय माहिती देणारा हा पहिलाच ताम्रपट आहे. तो महासामंत दुसरा भिल्लम याचे वेळचा आहे. या ताम्रपटाचे तीन तुकडे असून ते एका वर्तुलाकार कडींत अडकविलेले आहेत व त्याजवर विष्णूचे वाहन गरुड याची मुद्रा आहे. यादवराजे आपली उत्पत्ति विष्णूपासून आहे असें मानीत असल्यामुळें त्यांनीं आपल्या राजघराण्याच्या शिक्कामोर्तबावर गरुडाचे चिन्ह ठेवणें साहजिक आहे. या ताम्रपटाची भाषा संस्कृत असून ती अशुद्ध आहे. त्यांत संधि नियमाकडे दुर्लक्ष केलें आहे. यादवघराण्याची उत्पति शंभुपासून झाली असें सांगून, आपल्या कुळांत ब्रह्मा, मरीचि, अत्रि, इंदु, पुरूरवा, आयुश, नघुश, ययाति वगैरे राजे निर्माण झाले असें सांगून ती यदुपर्यंत भिडविली आहे.

शके ९२२
इ. स. १०००

सदरील ताम्रपटांत दिलेल्या वंशावळींतील ऐतिहासिक भाग लक्षांत घेतला असतां त्यांतील मूळ पुरुष सेउणचंद्र होता, असें दिसतें. त्यास **दृढप्रहार** नांवाचा मुलगा झाला. सदरील दृढप्रहारास भिल्लम या नांवाचा मुलगा असून त्याचे पोटी **राजा** अगर **श्रीराज** (राजनि) या नांवाचा मुलगा निपजला. श्रीराजास वद्दगी अथवा वंदगी या नांवाचा मुलगा असून तो तत्कालीन बलाढ्य चालुक्य वंशीय **कृष्ण** अथवा **कृष्णराज** याचा मांडलिक होता. त्याचा विवाह महानृप धोरप्पा याची मुलगी व्होडीयव्वा हिजबरोबर झाला होता. त्यानें मालवदेशचा राजा **मुंज** याचा पराभव केला व सर्वकाळ चंचल असलेल्या राज्यलक्ष्मीस **रणरंग भीम** याच्या घराण्यांत पातिव्रत्याचा अंगिकार करण्यास त्यानें भाग पाडिलें वगैरे, काव्यमय वर्णन या ताम्रपटांत दिलें आहे. यावरून मालवदेशचा **मुंज** राजा पहिल्या भिल्लमाचा समकालिन नसून त्या उभयतांच्या युद्धांत मालवदेशाच्या राजास अपयश आलें असावें असें यावरून दिसते. पहिल्या भिल्लमाच्या राजवटींत **विजयाभरणनाथ** या नांवाचें भव्य शिवमंदिर बांधलें गेलें. शके १०२५ च्या **कलस-बुद्रुक** येथील ताम्रपटांत व शके १०६९ च्या **वसई** येथील ताम्रपटांत दिलेली हकीकत प्रस्तुत ताम्रपटांतील हकीकतीपेक्षां भिन्न आहे. **कलस**–बुद्रुक येथील ताम्रपट तिसऱ्या भिल्लमावेळचा असून **वसई** येथील ताम्रपट दुसऱ्या सेउणचंद्राचे वेळचा आहे. **संगमनेरचा** ताम्रपट दुसऱ्या भिल्लमाचे वेळचा असून त्यांत ज्या लक्ष्मीचें वर्णन केलें आहे ती त्याचीच राणी असली पाहिजे. शिवाय दुसऱ्या भिल्लमाच्या बिरुदावलींत विजयाभरणनाथाचा उल्लेख असल्यामुळें तें देऊळ त्याचें

राजवटींत बांधलें गेलें असावें हें उघड दिसते. तसेंच मालवदेशच्या मुंज राजाचा पराभव यादव घराण्यांतील दुसऱ्या भीमानें केला होता. व त्याजपासून त्यानें हिराऊन घेतलेली राज्यलक्ष्मी आपला सार्वभौम राजा रणरंगभीम यास अर्पण केली होती ही गोष्ट निर्विवाद आहे. असें असतां संगमनेरच्या ताम्रपटांत येवढी ऐतिहासिक ढोबळ चूक व्हावी याचें काय कारण असेल तें असो. ताम्रपट ज्याच्या नेतृत्त्वाखालीं तयार झाला त्याची कांहींतरी नजरचूक झाली असावी असा तर्क करण्यापलिकडे गत्यंतर नाहीं!

दुसरा भिल्लम इ. स. १० व्या शतकाचे अखेरीस राज्य करीत होता. व मालव देशचा राजा मुंज हा त्याचा समकालिन होता, दुसरा भिल्लम हा पश्चिमेकडील चालुक्यवंशीय रणरंगभीम ऊर्फ तैलप याचा सेनापति अथवा मांडालिक होता, व याच तैलपानें मालवदेशीय मुंज राजाचा पराभव करून त्याचा शिरच्छेद करविला अशी माहिती इतर शिलाशासनावरून दिसून येते. त्याची कारकीर्द इ. स. ९७३ पासून इ. स. ९९० पर्यंत होती. प्रस्तुत ताम्रपटांत वद्दुगि अथवा वंदगि हा कृष्ण अगर कृष्णराजाचा मांडलीक होता असें म्हटलें आहे. परंतु ही गोष्ट इतिहासास धरून नाहीं. कारण शके ८६७ ते ८७६ पर्यंत (इ. स. ९४५ ते ९५६) च्या कालावधींत राष्ट्रकूटवंशीय कृष्णराज (अमोघर्षवद्दीगाचा मुलगा) याचा तो मांडलीक असला पाहिजे. यावरून सेउणदेशचे यादवराजे इ. स. ९७३ पर्यंत तरी राष्ट्रकूट राजांचे मांडलकि होते यांत शंका नाहीं.

चालुक्य राजांनी राष्ट्रकूटांचा इ. स. ९७३ मध्यें विध्वंस केल्यावर यादवांचे मांडलिकत्त्व साहजिकच चालुक्य राजाकडे गेलें. प्रस्तुत

ताम्रपटांत नमूद केलेला चालुक्य राजा महान्धुरप्पा हा निःसंशय त्या घराण्यांतील असावा. **'धुरप्पा'** हें ध्रुव या संस्कृत शब्दाचे प्राकृत अपभ्रंष्ट रूप होय. राष्ट्रकूट वंशांत ध्रुव, धोरा, ऊर्फ निरुपम य नांवाचा राजा होऊन गेला हें राष्ट्रकूटांच्या इतिहासावरून दिसतें वद्दिगाचा सार्वभौमराजा कृष्णराज यास निरुपम या नांवाचा एव कनिष्ट भाऊ होता. व त्याचा मुलगा **कक्कल** हा कृष्णराजाचे पश्चात त्याचे गादीवर बसला. ह्या निरुपमास, त्याचा पूर्वज निरुपम याप्र माणेंच ध्रुव अथवा **धोरा** या दुसऱ्या नांवानें ओळखलें जात असावें त्याच्या मुलीबरोबर दुसऱ्या भिल्लमाचा विवाह झाला असावा. य ताम्रपटांत दुसऱ्या भिल्लमाची बिरुदावली पुढें लिहिल्याप्रमाणें आहे

महासामंत—अराति–निसूदन, संग्रामराम, कंदुकाचार्य सेल्लाविदेग.

पुराणांत विष्णु व कृष्ण हे यदुवंशीय होते असें म्हटलें आहे म्हणून सेउणदेशचे (पूर्वकालीन) यादवराजे व देवगिरीचे (उत्तरका लीन) आपणांस **विष्णुवंशोद्भव, द्वारावतिपुरवराधीश्वर, यादव नारायण** अशीं बिरुदें लावून घेत असत.

कलसबुद्रुक येथील शके ९४८ च्या ताम्रपटांत दुसऱ्य भिल्लमास **संग्राम-राम** या विशेषणानें संबोधिलें आहे ही गो महत्त्वाची आहे. शिवाय या भिल्लमानें **सेउण** देशांत **सिंडिनेर** अथवा **श्रीनगर** नांवाचे शहर वसवून तें आपलें राजधानीचे शह केलें. या ताम्रपटानें **मातुलिंग** नदीच्या कांठावर असलेला अर्जु नांधिका हा गांव ब्राह्मणांस दान दिला आहे. या शिवाय **लघुअर्जुनों** आणि **लघुवव्वुला-वेंद्र** या दोन खेड्यांमधील जमीन दान देण्यां

आली आहे. या गांवच्या चतुःसीमाः—पूर्वेस संगमनेर, दक्षिणेस चिखलीगांव, पश्चिमेस जम्मवलेनिव्ह (जव्हले-निव्ह) उत्तरेस वव्वुलवेंद्र याप्रमाणें दिल्या आहेत. तेवढ्यावरून हा गांव नक्की कोणता असावा हें नकाशावरून समजत नाहीं. डॉ. बर्जेस् यांचें असें मत आहे कीं प्रस्तुत दानपत्रांत उल्लेखिलेला अर्जुनोधिका गांव व मलुंगी नदीच्या कांठावर हल्लीं असलेलें राजापुर शहर हीं एकच असलीं पाहिजेत. कारण या दोन गांवच्या चतुःसीमा परस्परांशी बऱ्याच अंशीं जुळतात. गोदावरी व अडप्पा या दोन नद्यांच्या संगमावर सूर्यग्रहणाच्या पर्वणीवर हा गांव ब्राह्मणांस दान दिला आहे. दानपत्राची मिति भाद्रपद शुक्ल १ सर्वदीन संवत्सर शके ९४८ अशी दिली आहे. ज्या ब्राह्मणांस हा गांव दान दिला आहे त्यांत ऋग्वेदी, शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन, कृष्णयजुर्वेदी व मैत्रायणी शाखेचे ब्राह्मण आहेत. कौंडिण्य, कौशिक, भारद्वाज व गौतम अशीं कित्येकांची गोत्रें आहेत. **दृढप्रहारानें** दक्षिणदेशांत **श्रीनगर** या नांवाचें मोठें राजधानी शहर वसविलें होतें असें हेमाद्रीनें व्रतखंडांतील प्रशस्तींत म्हटलें आहे त्या विधानास प्रस्तुत ताम्रपटांतील मजकुरावरून दुजोरा मिळतो. या राजधानींत राज्य करीत असतां **दृढप्रहार** यास **सेउणचंद्र** या नांवाचा मुलगा झाला व त्याचे नांवावरून **दृढप्रहाराचे** अंमलाखालीं असलेल्या प्रदेशास **सेउणदेश** हें नांव कांहीं काळानंतर पडलें. यावरून नाशिक व त्याचे सभोंवतालच्या प्रदेशाचा सेउणदेशांत अंतर्भाव होत होता हें निर्विवाद आहे. तसेंच **दृढप्रहाराच्या** राज्याचा विस्तार कालगतीनें जरी बराच वाढला होता तरी त्याचे वंशज, "सेउणदेशचे यादवराजे" या टोपण नांवानें संबोधिले जात. सेउणदेशचे वंशजांपैकीं **भिल्लमानें**

श्रीनगर हें राजधानीचें ठिकाण बदलून देवगिरी हें नवीन नगर वसवून तें आपलें राजधानीचें शहर केलें म्हणून त्यानंतरच्या यादवकुळांतील राजांस 'देवगिरीचे यादव' असें नांव पडलें. वस्तुतः दृढप्रहार व तेराव्या शतकांतील अखेरचा रामदेवराव हे एकाच वंशांतील होत. कांहीं शिलाशासनांत व इतरत्र दृढप्रहारापासून रामदेवरावपर्यंतच्या सर्व यादव राजांना सेउणदेशचे राजे या नांवानें संबोधिलें आहे. सदरील संगमनेरच्या ताम्रपटांत नमूद केलेला गांव सूर्यग्रहणाच्या पर्वणीवर दान केल्याचें म्हटलें आहे. दानपत्राची मिति इ. स. ३१ आगष्ट १००० या दिवशीं पडते. परंतु या दिवशीं सूर्यग्रहणाचा योग नव्हता असें कांहीं विद्वानांचें मत आहे. इंग्रजी पद्धतीप्रमाणें ३० सप्टेंबर १००० रोजीं सूर्यग्रहण होतें पण तें हिंदुस्थानांत दिसण्यासारखें नव्हतें. दानपत्राच्या मितीस सूर्यग्रहणाचा योग नसतांना त्या पर्वणीचा ताम्रपटांत उल्लेख केला जाईल हें संभवत नाहीं. भरतवर्षांत कालगणनेच्या बऱ्याच पद्धति आहेत त्यांत अमांतपद्धत्तीनें केलेली कालगणना उत्तरेकडील उज्जैयनीच्या कालगणनेशीं जुळत नाहीं असा अनुभव आहे. त्यामुळें सूर्यग्रहणें अगर चंद्रग्रहणें यांच्या तारखांच्या बाबतींत बराच तफावत पडण्याचा संभव आहे.

कलसबुद्रुक येथील ताम्रपट.

नगर जिल्ह्यांतील अकोला शहरापासून तीन मैलावर कलसबुद्रुक नांवाचा गांव आहे. तेथें गंगाधर त्र्यंबक कुळकर्णी यांच्या जागेंत प्रस्तुत ताम्रपट सांपडला. त्याचे तीन तुकडे. असून ते एका वर्तुलाकार कडींत अडकविलेले आहेत व कडीवर गरुडाची मुद्रा आहे.

ताम्रपटाची भाषा संस्कृत असून लिपी देवनागरी आहे. सिंधिनगरच्या (हल्लीचे सिन्नर) नजीकच्या देवनदींत स्नान करून क्रोधननाम संवत्सरांत शके ९४८ कार्तिक अमावास्येस कलसबुद्रुक हा गांव यादववंशीय तिसऱ्या भिल्लमानें श्रीभट्टाचा नातु मणव्हनायक नांवाच्या ब्राह्मणास दान दिला. या ताम्रपटांत यादववंशीय राजांचा वृत्तांत दिला आहे त्यांत त्यांचा मूळ पुरुष सेउणचंद्र हा होता असें ह्मटलें आहे. या भागाच्या अखेरीस नं. ५ मध्यें ही वंशावळ देण्यांत आली आहे. या वंशावळी प्रमाणें सेउणचंद्र हा यादवांचा मूळ पुरुष असून या ताम्रपटाचे मितिपर्यंत या वंशांत तीन भिल्लम झाले. पैकीं दुसऱ्या भिल्लमाचा विवाह राष्ट्रकूट वंशांतील लक्ष्मी नांवाच्या राजकन्येबरोबर झाला होता असें ह्मटलें आहे. दुसऱ्या भिल्लमाचा मुलगा **वेसुगी** यास सामंतरत्न असें बिरुद लाविलें आहे. हेमाद्रीच्या व्रतखंडांत दिलेल्या वंशावळीशी सदरील वंशावळ बहुतेक अंशाने जुळत आहे. व्रतखंडांतील वंशावळींत वद्दिग-वादुगिच्या नंतर **धाडीयस** हें नांव असून वेसुगी नंतर **अर्जुन** याचें नांव आहे. परंतु या उभयतांचा उल्लेख कोणत्याही शिलाशासनांत अगर ताम्रपटांत केलेला नाहीं. शके ९४१ च्या वसईच्या ताम्रपटांत दिलेली वंशावळ व शके १०२० च्या आश्वि येथील इरम्मदेवाच्या वेळच्या ताम्रपटांतील वंशावळ या परस्पराशीं तंतोतंत जुळतात शके १०६३ च्या शिलालेखांत जी वंशावळ दिली आहे त्यांत थोडा फरक आहे. प्रस्तुत ताम्रपटांत पहिला भिल्लम हा श्रीराजाचा जनक व दुसरा भिल्लम हा त्याचा नातु म्हणून दार्शविला आहे.

शके ९४८
इ. स. १०२५

शके १०६३ च्या अंजनेरीच्या शिलालेखांत पहिला भिल्लम हा श्रीराजाचा बन्धु व दुसरा भिल्लम हा त्याचा पणतु असें म्हटले आहे.

तिसऱ्या भिल्लमानें नाशिकपासून सुमारें बारा मैलावर **सिंधिनगर** या नांवाची राजधानी स्थापिली. **कलस-बुद्रुक** गांवची भौगोलिक स्थिति अद्याप कायम आहे. हल्लीच्या सिन्नर गांवानजिक देवनदी व शिवनदी यांचा संगम होऊन त्या **नां**दूर मध्यमेश्वराच्या नैऋत्येस पांच मैलावर गोदावरीस मिळतात. कलस-बुद्रुक या गांवच्या चतुःसीमा ताम्रपटांत दिल्या आहेत त्या अशा—पूर्वेस संगमिका, दक्षिणेस ताम्रप्रस्तर, पश्चिमेस धूहगांव, उत्तरेस पयोधरा नदी. पैकीं संगमिका हा सांप्रतचा संगमनेर गांव होय. धूहगांव हल्लीचा धू गांव, **पयो**धरा ही हल्लीची **प्रवरा** नदी असून ती संगमनेर नजीकच्या महाळुंगी ऊर्फ मलुंगी नदीस मिळते. तिसऱ्या **भिल्लमानें** सूर्यग्रहणाच्या पर्वणीवर उपरिनिर्दिष्ट मणव्ह नांवाच्या माध्यंदिन शाखेच्या भारद्वाज गोत्रीय मध्यदेशांतलि तक्कारिका येथील रहिवाशी ब्राह्मणास कलस-बुद्रुक गांव दान दिला. तिसऱ्या भिल्लमानें सिंधिनगर ही आपली राजधानी केली, हें विधान हेमाद्रीच्या व्रतखंडांत दिलेल्या हकीकतीशीं विसंगत आहे. कारण सिंडिनगर ऊर्फ श्रीनगर ही दृढप्रहाराची राजधानी होती असें त्यांत लिहिलें आहे.

पंडित भगवानलाल इंद्रजित यांस नाशिकपासून पंधरा मैलावर अंजनेरी येथें जैन मंदिरांत शके १०६३ चा शिलालेख मिळाला आहे. त्यांत जिनप्रभासूरीच्या **नासक्यकल्पांतील** कांहीं माहिती दिली आहे. त्यांत **दृढप्रहार** या महापराक्रमी यादवराजानें नाशिकच्या आसपास **चंद्रादित्यपुर** नांवाचें नगर स्थापून तें आपलें राजधानीचें

शहर केलें असा मजकूर आहे. हल्लीचें चांदोड हेंच तें चंद्रपूर (चंद्रादित्यपुर) असावें, आणखी दृढप्रहाराचा मुलगा सेउणचंद्र यानें **सेउणचंद्र** नांवाचें नगर स्थापिलें असाही त्यांत मजकूर आहे.

पुढें दिलेल्या वसईच्या ताम्रपटांत दृढप्रहारराजानें पूर्वी अस्तित्वांत असलेलें **चंद्रादित्यपूर** नगर वैभवास चढविलें व त्याचा मुलगा सेउणचंद्र यानें सिंडिनेरामध्यें सेउणपूर नांवाचें नगर वसविलें असा मजकूर आहे तो, हेमाद्रीच्या व्रतखंडांतील दृढप्रहाराची राजधानी **श्रीनगर** येथें होती या विधानाशीं विसंगत आहे. **वसई** व **अंजनेरी** येथील ताम्रपट हे त्यांत दर्शविलेल्या काळीं लिहिले गेले असल्यास त्यांतील माहिती ऐतिहासिकदृष्ट्या विश्वसनीय मानली पाहिजे. या भागाच्या शेवटीं यादवांच्या निरनिराळ्या शिलाशासनांत व ताम्रपटांत आढळून आलेल्या वेगवेगळ्या बारा वंशावळी दिल्या आहेत. हेमाद्रीच्या व्रतखंडातील वंशावळींत दुसरा धाडियस व अर्जुन यांचा उल्लेख आहे. परंतु त्यांचा मागमूस इतर वंशावळींत नाहीं.

कलसबुद्रुकच्या ताम्रपटांत शके ९४८ क्रोधन संवत्सर कार्तिक आमावास्येस सूर्यग्रहण होतें असें म्हटलें आहे. परंतु कै० केरू-नाना छत्रे आणि शंकर बाळकृष्ण दिक्षित यांच्या गणितपद्धतीप्रमाणें सदर तिथीस सूर्यग्रहण येत नव्हतें. ता. २३ नोव्हेंबर १०२५ रोजीं सूर्यग्रहण नव्हतें असें त्यांच्या गणितावरून दिसतें. दक्षिणेकडील अमांत गणितपद्धतीप्रमाणें सूर्यग्रहण ता. २३ नोव्हेंबर सन १०२५ मंगळवार रोजीं होतें असें दिसतें. उत्तरेकडील (उज्जैनीकडील) गणितपद्धतीप्रमाणें क्रोधनसंवत्सर सन १०२३-२४

सालांत होतें. यावरून बऱ्याच शिलाशासनांत व ताम्रपटांत सूर्यग्रहणाच्या व चंद्रग्रहणाच्या मिति दिल्या आहेत त्या चुकीच्या आहेत असें धाडसाचें विधान करण्यापूर्वी उत्तरेकडील व दक्षिणेकडील ज्योतिषगणितपद्धतींत जो ठळक फरक आहे त्याचाही अवश्य विचार केला पाहिजे.

संगमनेर व **कलस**-बुद्रुक या दोनही ताम्रपटांत दृढप्रहाराचा मुलगा सेउणचंद्र याचा उल्लेख असून त्यानें सेउणपुर नांवाचें शहर स्थापिलें व त्याचे नांवावरूनच त्याच्या अमलाखालीं असलेल्या प्रदेशास सेउणदेश असें नांव पडलें असा मजकूर आहे. हेमाद्रीच्या व्रतखंडांत जी प्रशस्ती दिली आहे तिच्या २२ व्या श्लोकांत हीच गोष्ट नमूद केली आहे. तो श्लोक असा—

ततः स राजा निजराधानींमधिष्ठितः श्रीनगरं गरीयः ।
लेभे सुतं सेउणचंन्द्रसंज्ञं यत्संज्ञया सेउणदेशमाहुः ॥

पैठण येथील इ. स. १२७२ च्या ताम्रपटांत या प्रांतास सेउणदेश याच नांवानें उल्लेखिलें आहे. **वसई**च्या ताम्रपटांत सिंडिनेरामध्यें सेउणचंद्रानें सेऊणपुर नांवाचें नगर वसविलें असें म्हटलें आहे, यावरून सिंडिनेरा हें एका विशिष्ट शहराचें अगर गांवाचें नांव नसून तें एकाद्या प्रांताचें नांव असावें असें दिसतें व तें सेउणदेश याचें रूपांतर असावें. सेउणदेशाची मर्यादा नाशिकपासून पूर्वेकडे थेट देवगिरी (दौलताबाद) पर्यंत होती व त्यांत हल्लीच्या नाशिक, नगर व खानदेश यांत मोडत असलेल्या बऱ्याच भागाचा समावेश होत होता असें पूर्वी म्हटलें आहे. सेउण या शब्दापासून **खान** हें अपभ्रष्ट रूपांतर होऊन सेउणदेशास खानदेश असें सांप्रत नांव पडलें असावें असें

कित्येक विद्वानांचें मत आहे. परंतु हा समन्वय ओढून-ताणून केलेला दिसतो. सातपुड्याच्या खालच्या (पायथ्याशी असलेला) प्रदेश म्हणून त्यास खालदेश असें आरंभी म्हणण्याचा प्रघात पडला असावा व पुढें ल च्या ऐवजीं न येऊन खानदेश असें नांव प्रचारांत आलें असावें हें संभवनीय आहे. या प्रांतांत जंगली जातींत 'ल' च्या ऐवजीं 'न' वारंवार उच्चारिलेला ऐकण्यांत येतो. जसें-'लाकूड' या ऐवजी 'नाकूड' वगैरे. मुसलमानांच्या अमलाखालीं हा प्रांत आल्यावर गुजराथचा सुलतान पहिला अहमद यानें सेउणदेशास खानदेश असें नांव दिलें असावें असेंही कित्येकांचें मत आहे. भाषा शास्त्रांतील " ष ख योरभेदः पोटभेद " या पद्धतीप्रमाणें **षेउण** याचें **खेउण** असें अपभ्रष्ट रूपांतर होऊन 'खेउ' याचे 'खा' असें अपभ्रष्ट रूपांतर होऊन अखेरीस तें **खान** म्हणून प्रचारांत आलें असावें.

वसई येथील ताम्रपट.

प्रस्तुत ताम्रपट दुसऱ्या सेउणचंद्राच्या वेळचा आहे. हा ताम्रपट वसई येथील एका शेतकऱ्यास आपलें शेत खणित असतांना सांपडला व तो मुंबईचे पुराणवस्तु संशोधक डॉ. भाऊ दाजी यांचे हातीं आला व त्यांजकडून तो डॉ. बर्जेस यांचे हाती जाऊन पंडित भनवानलाल इंद्रजीत यांच्या वाचण्यांत आला. या ताम्रपटाचे तीन तुकडे असून ते एका वर्तुळाकार कडींत नेहमीच्या पद्धतीप्रमाणें अडकविलेले आहेत. कडीवर दोन्ही हात जोडलेल्या गरूडाचें राजचिन्ह कोरलेलें आहे. त्याच्या दोन्ही बाजूस शंख दाखविले आहेत. ताम्रपटाची भाषा संस्कृत असून लिपी देवनागरी आहे. ताम्रपटांतील मजकूर गद्य-पद्य

शके ९९१
इ. स. १०६९

आहे. ताम्रपटांत उपयोगांत आणलेली देवनागरी लिपी शिलाहाराच्या वेळच्या शिलाशासनांतील लिपीशी जुळती आहे. भाषा अशुद्ध आहे.

या ताम्रपटांतील यादवराजांची दिलेली वंशावळ या भागाच्या अखेरीस नं २ मध्यें दिली आहे. **कलस बुद्रुक**च्या ताम्रपटांत दिलेली वंशावळ व प्रस्तुत ताम्रपटांतील वंशावळ ह्या एकाच नमुन्याच्या असून त्या व्रतखंडांत हेमाद्रीनें दिलेल्या वंशावळी बहुतेकांशीं जुळतात असें पूर्वी म्हटलें आहे. यादवघराण्यांतील ऐतिहासिक मूळपुरुष दृढ-**प्रहार ह्याजपासून** तिसऱ्या भिल्लमाचे पश्चात् यादव कुळांत निपजलेल्या दुसऱ्या सेउणचंद्रापर्यंत सर्व यादवराजांची त्रोटक हकिगत या ताम्रपटांत दिली आहे. यादव कुळांत दृढप्रहार या नांवाचा एक विष्णुवंशोद्भव राजा होता तो द्वारावती (द्वारका) हून सेउणदेशांत आला. व त्यानें पूर्वी अस्तित्वांत असलेलें चंद्रादित्यपुर नांवाचे शहर लौकिकास आणलें. तो इतका पराक्रमी होता कीं शत्रूकडील सैनिकाची (पायदळांतील) व हस्तिदलांतील हत्तींची डोकीं तो सहज लीलेनें फोडी. त्याचा मुलगा सेउणचंद्र बापाप्रमाणें पराक्रमी असून त्यानें सिंडिनेरांत (सेउण देशांत) सेउणपूर नांवाचें शहर वसविलें. त्याचे पोटीं **धाडियप्पा** नांवाचा सद्गुणसंपन्न मुलगा निपजला व त्यानें पराक्रमाच्या व सदाचारीवर्तनाच्या जोरावर यादवघराण्यांतील कुलदीपक असें सार्थ नांव आपणास प्राप्त करून घेतलें. त्याचा मुलगा भिल्लम (पहिला) हाही आपल्या बापाप्रमाणेंच महापराक्रमी होता व तो पृथ्वीवर केवळ चंद्रच निर्माण झाला होता, असें त्याचें काव्यमय वर्णन केलें आहे. त्यास चंद्राची उपमा कोणत्या अर्थानें दिली हें समजण्यास मार्ग नाहीं. सुंदर स्त्रियांचे मुखास चंद्राची उपमा देण्याचा

कवींचा सांप्रदाय आहे व सुंदर पुरुषाची तुलना मदनाबरोबर करण्यांत येते. एखाद्या व्यक्तीचें श्रेष्ठत्व दर्शविण्यासाठीं त्यास 'चंद्र' असें उपपद लावण्याची पूर्वापार रूढी आहे. यावरून हा थोरला अथवा पहिला भिल्लम पराक्रमी असावा असें दिसतें. पहिल्या भिल्लमास श्रीराम या नांवाचा मुलगा होता व तो सर्व पृथ्वीचा केवळ अलंकार होता असें त्याचें वर्णन दिलें आहे. श्रीरामाचा मुलगा वद्दिग (वादुगी) याचा, राष्ट्रकूट वंशांतील झंझा नांवाच्या राजाची कन्या लस्थियव्हा हिजबरोबर विवाह झाला होता. वद्दिगास तेसुक नांवाचा मुलगा झाला, व तेसुकापासून भिल्लम झाला. यादववंशांत तिसरा भिल्लम या नांवानें तो प्रसिद्ध आहे. या भिल्लमास आहवमल्ल असेंही म्हणतात. त्याचा विवाह पश्चिमेकडील चालुक्य वंशीय जयसिंहराराजाची मुलगी व अहम्मलाची बहीण हम्मा हिजबरोबर झाला होता. व ही हकीगत पश्चिमदेशचे चालुक्य राजांच्या इतिहासावरून खरी आहे असें दिसतें. यानंतर दिलेली वंशावळ ऐतिहासिक दृष्ट्या सुसंगत नाहीं. भिल्लमाचा मुलगा दुसरा सेउणचंद्र हा फार पराक्रमी होता. शके ९९१, श्रावण शुद्ध १५ च्या (सौम्य सवंत्सरीं) दिवशीं नाशिक नजीकच्या सिंही परगण्यांतील चिंचोली नांवाचा गांव आपल्या सर्व प्रधानांदेखत आपला राजपुरोहित सर्वदेवाचार्य यास दान दिला. सदरील चिंचोली गांव नाशिकच्या आग्नेय दिशेस १२ मैलांवर अद्याप याच नांवानें प्रसिद्ध आहे. याच्या चतुःसीमा पूर्वेस टेकडी, आग्नेयेस नाला, दक्षिणेस चिंचोलीचा तलाव, वायव्येस वडगंथा गांवाचे पूर्वेकडील टेकडी, उत्तरेस सिंडीखेडयाचे टेकडीची उतरणी व एक वडाचें झाड, इशान्येस माहूल गांवचा निगुडीपाला तलाव व सेवाईगांव.

प्रस्तुत ताम्रपटांत सेउणचंद्राचे पदरीं असलेल्या प्रधान मंडळाचा उल्लेख केला आहे तो ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे तो येणेप्रमाणें **१ सेनापती** श्रीधर; २ मुख्यप्रधान-वासुदेव; ३ मुख्यमंत्री--भाभीयक; ४ युद्धमंत्री---श्रीनायक; ५ हरवैद्यनायक; ६ परराष्ट्रमंत्री--अपैयक राजपुरोहित--सर्वदेवाचार्य हा सोमदेवाचार्याचा शिष्य असून त्यानें शैवपंथीय ग्रंथावर अनेक टीका केल्या आहेत. शिवाय तो उत्तम वैय्याकरणी होता. पाशुपत पंथाचा **गोत्र**-सांप्रदाय आहे त्याचा तो अनुयायी होता.

या ताम्रपटावरून नाशिक प्रांतांतील चिंचोली गांव दान दिला असून सदर ताम्रपट वसई येथें कसा आला याबद्दल आश्चर्य वाटतें. यादवराजांचा अम्मल इ. स. बाराशेंच्या अखेरीस उत्तर कोंकणावर सुरू झाल्यावर त्या प्रांतातील प्रसिद्ध शहर शूर्पारक ऊर्फ सोपारे या ठिकाणीं सर्वदेवाचार्यांचे वंशज देवगिरीच्या यादवांचें राज्य नष्ट झाल्यावर त्या घराण्यांतील शिल्लक राहिलेल्या बिंबाबरोबर (रामदेवरावाचा दुसरा मुलगा) आले असल्यास न कळे ! व हा तर्क खरा असल्यास हा ताम्रपट वसई येथें कसा आला याचें निराकरण होतें.

वाघोली येथील शिलालेख.

शके ९९१
इ. स. १०६९

खानदेश जिल्ह्यांत चाळीसगांवच्या पूर्वेस सहा मैलावर वाघली या नांवाचा गांव आहे. तेथें तीन देवळें आहेत. पैकीं एक जुने पुराणें मथार देवीचे देऊळ आहे. त्याच्या उजवीकडे मानभावी पंथाचें एक पडकें देऊळ आहे. तें हेमाडपंती पद्धतीनें बांधलेलें असून त्याची

लांबी ३० फूट रुंदी २० फूट व उंची ३३ फूट आहे. या देवालयास नक्षीदार खांब आहेत. यावरून तें देऊळ राजाश्रयाखालीं बांधलेलें असावें असें वाटतें. मंदिराच्या बाहेरील अंगास नंदी अद्याप कायम असल्यामुळें तें शिवमंदिर असावें ही गोष्ट निर्विवाद दिसते. प्रस्तुत शिलालेखाचे अ, ब व क असे तीन भाग आहेत. पैकीं "क" मधील दुसऱ्या भागांत **मौर्यकुलप्रदीप गोविंदराज** यानें व त्याचा सम्राट **महामंडलनाथ सेऊण** या उभयतांनीं शके ९९१ आषाढ वा॥ ३० सौम संवत्सरांत सूर्यग्रहणाच्या पर्वणकाळीं संगमावर सिद्धेश्वर देवाचे व्यवस्थेकरितां संगमी व मधुवाटिका ही स्थळें दान दिल्याबद्दलचा मजकूर आहे. आषाढ वद्य ३० स्येस सूर्यग्रहण होतें किंवा नाहीं याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. अमांत गणित पद्धतीप्रमाणें सूर्यग्रहण २१ जुलै इ. स. १०६९ या दिवशीं पडलें पाहिजे. सदरील सूर्यग्रहणानंतर पंधरा दिवसानीं म्हणजे शके ९९१ च्या श्रावण शुक्ल १५ स दुसऱ्या **सेउणचंद्रानें** आणखी एक दानपत्र केलें असावें असें दिसतें. या शिलालेखावरून **गोविंदराज** हा दुसऱ्या **सेउणचंद्राचा** मांडलिक होता असें दिसतें. गोविंदराजाच्या पूर्वीच्या वीस पिढींतील राजांची नांवें यांत दिली असून तीं ऐतिहासिक दृष्ट्या फार महत्वाची आहेत. सौराष्ट्रांतील वल्लभीगांवाहून गोविंदराजाचे पूर्वज सेउणदेशांत (खानदेशांत) आल्याचा मजकूरही त्यांत आहे. हे "वल्लभी" राजे यादवराजाचे मांडलिक असून उभयतांचें मूलस्थान द्वारावती असावें असें दिसतें.

अश्वी येथील ताम्रपट.

हा ताम्रपट "**भारत इतिहास संशोधक मंडळाच्या**" त्रैमासिकांत तिसऱ्या वर्षाच्या पहिल्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे. तो गणपतराव मोडक यांजकडून गोविंद शंकर रानडे यांच्यामार्फत सदरील मंडळाचे संशोधकांच्या हातीं आला. वसईच्या ताम्रपटाप्रमाणें प्रस्तुत ताम्रपट एका शेतकऱ्यास आपल्या शेताची नांगरट करीत असतांना सांपडला. ताम्रपटाचे तीन तुकडे असून नेहमीच्या वहिवाटीप्रमाणें ते एका कडींत अडकविलेले आहेत. यादवांचा मूळ पुरुष विष्णु याचें वाहन गरुड याची मुद्रा प्रस्तुत कडीवर नाहीं, हें अम्मळ चमत्कारिक असून संशयास्पद दिसतें. ताम्रपटाची भाषा संस्कृत असून अक्षर-व-टिका अकराव्या शतकांतील देवनागरी आहे. ताम्रपटांत उल्लेखिलेले यादवराजे देवगिरीच्या यादवांचे पूर्वज होते हें निःसंशय होय. हें घराणें इतिहासांत चांदवड अथवा सेउणदेशचे यादवांचें म्हणून प्रसिद्ध आहे. प्रस्तुत ताम्रपट परिशिष्ट नं. ४ मध्यें दिला आहे. त्यांत दिलेली वंशावळ दृढप्रहारापासून सुरू होऊन तिसऱ्या भिल्लमाचा मुलगा इरम्मदेव (परम्मदेव ?) याजपर्यंत आहे. ती या भागाच्या अखेरीस नं. ४ त दिली आहे.

शके १०२०
इ. स. १०९८

हेमाद्रीच्या व्रतखंडांतील वंशावळीशीं सदरील वंशावळ जुळत नाहीं. व्रतखंडांतील वंशावळींत दुसरा धाडीयस, पहिला वेसुगी, अर्जुन, दुसरा वादुगी व दुसरा वेसुगी, भिल्लम (४) ह्या राजांची नांवें दिली आहेत तीं सदर ताम्रपटांत आढळून येत नाहींत. परंतु चवथ्या भिल्लमाचा मुलगा दुसरा सेउणचंद्र व त्याचा मुलगा परमर्दिदेव

ऊर्फ परम्मदेव अशी परंपरा व्रतखंडांतील वंशावळींत आहे. व त्याला सिंहराज या नांवाचा मुलगा होता असें म्हटलें आहे. व्रतखंडांत तिसरा भिल्लम व चवथा भिल्लम यांच्या दरम्यांत वादुगी (दुसरा) व बेसुगी (दुसरा) अशा दोन राजांची नांवें दिली आहेत ती प्रस्तुतच्या ताम्रपटांत नाहींत. परम्मदेव व इरम्मदेव हे एकच असले पाहिजेत. परम्मदेवाचें प्राकृतांत इरम्मदेव असें रूपांतर होणें शक्य आहे. सर भांडारकर यांच्या दख्खनच्या इतिहासांत व्रतखंडांतील प्रशस्ति दिली आहे त्यांत प (ए) रम्मदेव असा पाठ दिला आहे. सबब सदर ताम्रपटांतील इरम्मदेव याचे नांव पूर्वीच्या कोणत्याही वंशावळींत आढळून येत नाहीं असें भा. इ. सं. मंडळाच्या उपरिनिर्दिष्ट केलेल्या त्रैमासिकांतील प्रास्ताविक लेखांत जें विधान केलें आहे तें बरोबर नाहीं. शके १०२० च्या वैशाख ३० स बहुधान्यसंवत्सरांत (३ मे इ. स. १०९८) सोमवती अमावास्येच्या पर्वकालीं नर्मदापुर या नांवाच्या पवित्र क्षेत्रांत इरम्मदेवानें कोंकणे गांव ब्राह्मणास दान दिला असा उल्लेख प्रस्तुत ताम्रपटांत आहे. दानपत्रांत कोंकणेग्राम असा उल्लेख असून त्याच्या चतुःसीमा येणें प्रमाणें—संगमनेर चौऱ्याऐशीं मधील कोंकणगांवच्या चतुःसीमा (हा गांव अहमदनगर जिल्ह्यांतील संगमनेरपासून तीन मैलावर आहे) पूर्वेसः–दुंदुदेव म्हणजे हल्लींचे दुधेश्वर नांवाचें देवालय–आग्नेयेसः–कोवचीगांव–हल्लींचे कोची, दक्षिणेसः–मणियवल्ली म्हणजे हल्लींचें मनोली, नैऋत्येसः–जुइखे गांव म्हणजे हल्लींचें जोखें, पश्चिमेसः–वडगांव, वायव्येस संगवी म्हणजे हल्लींचें सांगवी, व उत्तरेस कपिथ्यक म्ह. हल्लींचें कवटें.

प्रस्तुत ताम्रपटांत इरम्मदेव हा तिसऱ्या भिल्लमाचा नातु व दुसऱ्या सेउणाचा मुलगा होता व त्याचा विवाह योगिल्ला नांवाच्या स्त्रीबरोबर झाला होता असें म्हटलें आहे. ही **योगिल्ला** कोणत्या राजकुलांतील असावी हें समजण्यास साधन नाहीं. त्रिभुवनमल्लानें संपादिलेले सात देश **इरम्मानें** आपल्या पराक्रमानें जिंकून आपला सार्वभौम राजा परमर्दिन यास परत मिळवून दिले अशी हकीकत या ताम्रपटांत दिली आहे. ' व्रतखंडात ' **परम्मदेव** हा चवथ्या भिल्लमाचा नातु व दुसऱ्या सेउणाचा मुलगा होता असें म्हटलें आहे. व दुसऱ्या सेउणानें पराक्रम करून **परम्मदेवाचा** त्याच्या शत्रूपासून बचाव करून कल्याणच्या राजाची गादी त्यास मिळवून दिली अशी हकीगत दिली आहे. दुसऱ्या **सेउण**राजानें केलेले पराक्रम त्याचा मुलगा इरम्मदेव अथवा परम्मदेव याच्या नांवावर या ताम्रपटांत लादलेलें असावेत असें दिसतें. व्रतखंडांतील प्रशस्तींत दुसरा सेउण व परम्मदेव यांचेसंबंधानें खालील श्लोकांत वर्णन दिलें आहे तें येणेंप्रमाणें:—

ततोऽपि नृपभिल्लमः समरसीमभीमक्रीया–
निरर्गलभुजार्गलायुगलकाललीलालयः ।
ततः समदमेदिनीपतिपतङ्गभेदव्रतः
प्रतापशिखिलंघिताखिजगदङ्गणः सेउणः ॥

समजृतो येन महाभुजेन द्विषां विमर्दात्परमर्दिदेवः ।
आस्थापि चालुक्यकुलप्रदीपः कल्याणराज्येपि स एव येन ॥

परम्मदेवः स ततो बभूव द्विषद्वधूनेत्रघनाम्बुवृष्टौ ।
प (ऐ) रम्मदेनेव रुचांचयेन यस्य प्रतापेन चिरं व्यराजि ॥

यावरून अश्विच्या ताम्रपटांत परम्मदेव अथवा इरम्मदेव यांचें नांव प्रथम उजेडांत आलें, या विधानाचा फोलपणा सहज दिसून येईल. प्रस्तुत ताम्रपटांत ज्या **श्रीपरमर्दिन** राजाचा उल्लेख केला आहे तो पश्चिमदेशीय चालुक्य कुळांतील त्रिभुवनमल्ल परमर्दि सहावा विक्रमादित्य होय. त्यास विक्रमार्क, विक्रमांक, विक्रम, परम्म, परमादि, परमनदी व संस्कृतरूपांत " परमर्दि " या नांवानें शिलाशासनांत, ताम्रपटांत, व इतरत्र उल्लेखिलें आहे. त्यास तीन भाऊ होते. (१) थोरला सोमेश्वर; (२) जयसिंह; व (३) विष्णुवर्धन (विजयादित्य). (पैकीं) सोमेश्वर हा शके ९७५ (इ. स. १०५३) मध्यें गादीवर बसला. तो आपल्या नांवामागें 'त्रिभुवनैकमल्ल' असें बिरुद लावून घेत असे. त्याचा बाप पहिला सोमेश्वर हा 'त्रैलोक्यमल्ल' असे बिरुद आपल्या नांवामागें लावीत असे. आपले पश्चात् आपले थोरले मुलास गादी मिळूं नये अशी पहिल्या सोमेश्वराची मनापासून इच्छा होती, व त्यानें हा मनोदय आपला दुसरा मुलगा विक्रमादित्य यास कळविला होता; परंतु पहिला सोमेश्वर हा विक्रमादित्याबरोबर स्वारींत गुंतला असतां एकाएकी कालवश झाला, त्यामुळें त्याचा हा मनोदय सिद्धीस गेला नाहीं. रीतीप्रमाणें थोरला सोमेश्वर आपल्या बापाचे मागें गादीवर बसला. थोड्याच काळांत सोमेश्वराच्या जुलमी व अन्यायी कारकीर्दीस त्याची प्रजा कंटाळली. त्याचा दुसरा भाऊ विक्रमादित्य ह्यास आपले भावाची राज्य करण्याची पद्धत आवडली नाहीं व तो आपला धाकटा भाऊ जयसिंह यासह **कल्याण** राजधानी सोडून बाहेर पडला. सोमेश्वरानें आपल्या फौजेसह त्याचा पाठलाग केला परंतु त्या कामीं त्यास यश आलें

नाहीं. विक्रमादित्यानें केरळ, चोल, वेंगी, येथील राजांना शह देऊन त्यांना आपलें अंकित केलें. पुढें वेंगीचा राजा **राजिग**, पूर्वचालुक्य वंशीय राजेन्द्र, व विक्रमादित्याचा भाऊ (दुसरा) सोमेश्वर या त्रिवर्गानी संगनमत करून विक्रमादित्याबरोबर घनघोर संग्राम केला. त्या कामीं यादववंशीय (दुसरा) सेऊण यानें ऐनवेळीं विक्रमादित्यास चांगली मदत केल्यामुळें त्यास पराकाष्ठेचें यश मिळालें व सोमेश्वर त्याच्या हस्तगत झाला. पुढें त्यास पदच्युत करून विक्रमादित्यानें कल्याणची गादी मिळविली. त्याचा पट्टबंधोत्सव (राज्याभिषेकोत्सव) शके ९९८ (इ. स. १०७६) बलनाम संवत्सरी झाला. (दुसरा) सेऊणचंद्र हा चालुक्यवंशीय परमर्दिन विक्रमादित्याचा समकालीन होता व तो शके ९९१ सालीं राज्य करीत होता. या हकीगतीवरून चालुक्यवंशीय परमर्दिन राजास इरम्मदेव अगर परम्मदेव याजकडून मदत झाल्याचें दिसून येत नाहीं व तशाप्रकारचा उल्लेखही कोठें आढळून येत नाहीं.

वसई व **वाघोली** येथील ताम्रपटांत दुसऱ्या सेऊणचंद्राचा प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. तो फार पराक्रमी होता असें त्याचें वर्णन केलें आहे. वाघोलीच्या ताम्रपटांत मौर्यकुलप्रदीप गोविंदराज यास महामंडळनाथ (दुसरा) सेऊणचंद्र ह्याचा मांडलिक असें म्हटलें आहे. वरील विवेचनावरून यादववंशीय दुसरा सेउणचंद्र व चालुक्यवंशीय परमर्दिन विक्रमादित्य (सहावा) हे समकालीन असून एकमेकाशीं मित्रत्वाच्या नात्यानें वागत असत असें दिसून येतें. प्रस्तुत ताम्रपटांतील "श्रीयोगिल्लेति य नाम्ना रंजिते भुवनत्रयम्" या वाक्याचा नीट बोध होत नाहीं. 'य' च्या ऐवजीं 'यया'

असा पाठ गृहीत धरल्यास, त्रिभुवनाला रंजविणारी केवळ लक्ष्मी-सारखी 'योगिल्ला' या नांवाची ज्याची भार्या असा इरम्मदेव, असा या ओळीचा सरळ अर्थ निघतो. परंतु 'योगिल्ला' असें नांव कोठेहीं आढळून येत नसून ती इरम्मदेवाची बायको असल्या-बद्दलचा कोठेंही उल्लेख नाहीं. या परमर्दिन विक्रमादित्यानें ५० वर्षे राज्य केलें व शालिवाहन शक झुगारून देऊन त्याने आपल्या नांवाचा शक सुरू केला. त्यास एकंदर सहा राण्या होत्या. पैकीं पट्ट-राणीचें नांव लक्ष्मादेवी असून ती शके १०१६ मध्यें **कल्याण** राजधानींत राहून आपला अम्मल गाजवीत असे. शके १०२७ मध्यें १८ अग्रहाराचा धर्मापुर येथें, व शके १०३१ मध्यें नित्तसिंगी गांवावर तीं आपला अंमल चालवीत असे, असें तिच्याविषयीं वर्णन दिलें आहे. यावरून विक्रमादित्याची वैभवशाली व प्रतापी पट्टराणी तीन ठिकाणीं आपला अंमल चालवीतं होती असें तत्कालीन चालुक्य-राजांच्या शिलाशासनावरून दिसतें. कदाचित् ताम्रपट ज्याच्या नेतृ-त्वाखालीं तयार झाला त्याच्या नजरचुकीमुळें अगर ऐतिहासिक-ज्ञानाच्या अभावामुळें 'परमर्दिन' व इरम्मदेव यादव हे एकच असावे असें समजून वरील प्रकारचा घोटाळा झाला असल्यास नकळे!!

प्रस्तुत ताम्रपट पंडित भगवानलाल इंद्रजित यांचे नजरेखालून गेला असावा असें दिसते. या ताम्रपटाच्या चौदाव्या ओळींत "अर्वाक्तस्य" असें पद आहे त्याचा अर्थ पंडित मजकूर ह्यांनीं 'त्याच्यापूर्वी' असा केला आहे. परंतु त्या पदाचा खरा अर्थ 'त्याचे पश्चात्' असाच केला पाहिजे असें सर रामकृष्णपंत भांडारकर ह्यांनीं सप्रमाण सिद्ध केलें आहे. ताम्रपटाच्या एकोणिसाव्या

ओळींतील "यदन्वया" ह्या पदाचा अर्थ पंडित मजकूर यांनी "राष्ट्रकूटवंशांतील झंझराजाची कन्या लस्थियव्हा हिला दत्तक घेतलें" असा केला आहे. हा अर्थ अप्रस्तुत असून ऐतिहासिक-दृष्ट्या चुकीचा आहे. म्हणून सर रामकृष्णपंत भांडारकर यांनीं 'यदन्वया' या पदाऐवजीं 'यद्वन्वया' असा पाठ सुचविला आहे. हा पाठ स्वीकारला असतां यांतील अर्थाची सुसंगत व्यवस्था लागते. शिलाहार वंशातील राजकन्या लस्थियव्हा हिचा विवाह यादववंशीय राजाबरोबर होऊन त्यास पुत्र झाला. तो अल्पवयस्क असतांना त्याचे वडील निवर्तले म्हणून तो बालराजा सज्ञान होईपर्यंत सर्व राज्यकारभाराचें ओझें तिजवर पडलें व ती यदुकुलाचा आधारस्तंभ झाली. या विलक्षण परिस्थितीमुळें सदरील लस्थियव्हा, ही राष्ट्रकूट, शिलाहार, व यादव या तिन्ही कुलाच्या आदरास प्राप्त झाली असा सरळ अर्थ लावण्याचें सोडून पंडितमजकूर विनाकारण आडरानांत शिरले असा सर रामकृष्ण-पंतानीं आपला अभिप्राय दरख्वनच्या इतिहासांत नमूद केला आहे.

व्रतखंडातील वंशावळींप्रमाणें वेसुकीनंतर अर्जुन या नांवाचा राजा झाला. परंतु पंडित भगवानलाल यांस मिळालेल्या दानपत्रांत अर्जुनाचे नांव गाळलें असून एकदम भिल्लमाच्या नांवाचा उल्लेख केला आहे. त्याचा विवाह चालुक्यवंशीय जयसिंव्हाची कन्या व आहवमल्ल याची बहीण हम्मा ऊर्फ अव्वलदेवीबरोबर झाल्याचें पूर्वी म्हटलेंच आहे. या भिल्लमानें अहवमल्लाचा (म्ह० दुसऱ्या सोमेश्वराचा) मांडलिक म्हणून अनेक लढाया मारिल्या. भिल्लमानंतर पंडितमजकूरांच्या दानपत्रांत सेउणाचें नांव दिलें आहे व तें दानपत्र त्याच्याच वेळचें आहे असें पंडितजीचें म्हणणें आहे.

उपरिनिर्दिष्ट भिल्लम (म्ह० अहवमल्लाचा मेहुणा) हा पंडितजींच्या दानपत्रांतील भिल्लमापासून भिन्न होता यांत संशय नाहीं. कारण प्रस्तुत ताम्रपटांतील २५ व्या ओळींत सेउण यास भिल्लमाचा पुत्र असें न म्हणता भिल्लमाच्या वंशांत उत्पन्न झालेला इतकेंच म्हटलें आहे. यावरून या उभयतांमध्यें जो तीन पुरुषांचा खंड पडलेला दिसतो, याचा उलगडा होतो. कदाचित् या वगळलेल्या तीन पुरुषांची कारकीर्द ताम्रपटकर्त्यास महत्वाची न वाटल्यामुळें त्यांचा त्यानें नामनिर्देश केलेला नसावा. खुद्द व्रतखंडांत वरील भिल्लमाचा मुलगा वासुगी याची, कवि मधुर शब्दानें प्रशंसा करीत असत एवढेंच म्हटलें आहे व त्याचेनंतर गादीवर बसलेल्या वेसुगीनें आपल्या राज्यांतील शिरजोर झालेल्या मांडलिकांचा बीमोड केला असा उल्लेख आहे. वेसुगीच्या पश्चात् बसलेला भिल्लम हा महापराक्रमी होता एवढाच त्याच्यासंबंधीं व्रतखंडांत उल्लेख केलेला आहे. पंडित भगवानलाल इंद्रजित यांस मिळालेलें दानपत्र शके ९९१ सोमनाम संवत्सरांतील आहे. व चालुक्यवंशीय विक्रमादित्यानें कल्याण राजधानी शके ९९८ नलनाम संवत्सरी हस्तगत केली व आपणांस राज्याभिषेक करून घेतला. पंडित भगवानलाल यांस नाशिकनजीकच्या अंजनेरी गांवीं शके १०६३ चा एक शिलालेख मिळाला त्यांत सेउणचंद्रासंबंधानें दिलेलें वर्णन व्रतखंडांतील माहितीशीं जुळतें. अश्वीच्या ताम्रपटांतील ३९ ते ४१ या ओळींतील मजकुरावरून दानपत्राच्या मितीस चालुक्यवंशीय त्रिभुवनमल्ल परमर्दिदेव याचें राज्य होतें असें दिसतें. तो आपणास पुढीलप्रमाणें बिरूदे लावीत असे " पृथ्वीवल्लभ, महाराजाधिराज, परमेश्वर,परमभट्टार्क, सत्याश्रय, चालुक्याभरण, इत्यादि "

इरम्मदेव यास महामंडलेश्वर असें संबोधिलें आहे. कोंकणें गांव, कऱ्हाड येथून आलेल्या शाकलशाखेच्या काश्यपगोत्री कुक्कुलपंडितादि तीस ब्राह्मणांस दान दिल्याचा मजकूर यांत आहे. त्याचे पूर्वज कऱ्हाडाहून सेउण देशांत येऊन राहिल्याचा या ताम्रपटांत उल्लेख केला आहे. ताम्रपटांतील मजकुरावरून तो क्रमवंत ब्राह्मणापैकीं असावा असें दिसतें.

अंजनेरी येथील शिलालेख.

हा शिलालेख तिसऱ्या सेउणचंद्राच्या वेळचा आहे असें त्यांतील मजकुरावरून दिसतें. नाशिकच्या वायव्यदिशेस १५ मैलांवर अंजनेरी हें गांव आहे, तेथें सदर शिलालेख सांपडला. तो उत्तम स्थितींत असून संस्कृतांत आहे. लिपि देवनागरी आहे. यांत दिलेली यादवांची वंशावळ या भागाच्या अखेरीस नं. मध्यें दिली आहे. ही वंशावळ व्रतखंडांतील वंशावळीहून बरीच भिन्न आहे. पहिल्या धाडीयप्पाचा मुलगा पहिला भिल्लम यास श्रीराज नांवाचा बंधु होता असें या शिलालेखांत म्हटलें आहे. व्रतखंडांत राजुगी हा पहिल्या भिल्लमाचा मुलगा होय असें म्हटलें आहे. त्यानंतर दुसरा धाडीयप्पा व दुसरा भिल्लम यांस वगळून तेसुक या पुरुषाचें नांव दिलें आहे. वसईच्या ताम्रपटांत वेसुकाच्याऐवजीं तेसुक असें नांव देऊन जशी चूक झाली आहे तशाच प्रकारची चूक या शिलालेखांत झाली असावी असें दिसतें. याशिवाय झंझराजाची कन्या लस्थियव्हा हिचा विवाह वद्दिगाबरोबर, चालुक्य वंशांतील एका कन्येचा विवाह तेसुकाबरोबर,

शके १०६३-६४
इ. स. ११४१-४२.

आणि चालुक्य वंशीय जयसिंहाच्या बहिणीचा विवाह दुसऱ्या भिल्लमाबरोबर झाल्याबद्दलचा मजकूर या शिलाशासनांत दिला आहे तो पूर्वी दिलेल्या कोणत्याहि शिलाशासनांत अगर ताम्रपटांत नसून त्यास इतिहासाचा आधार नाहीं. तसेंच व्रतखंडांत दिलेल्या वंशावळींत अगर इतर कोणत्याहि वंशावळींत या तिसऱ्या सेउणचंद्राचा उल्लेख केलेला नाहीं. यावरून या शिलालेखांत पहिल्या भिल्लमानंतर उल्लेखिलेले राजे यादववंशांपैकीं मुख्य शाखेंतील नसून त्यांच्या उपशाखेपैकीं असावे असें दिसतें. सर रामकृष्णपंत भांडारकर यांचें मत या प्रमाणेंच आहे.या शिलालेखांत अंजनेरी येथील जैन चंद्रप्रभा मंदिराचे व्यवस्थेसाठीं तिसऱ्या सेउणचंद्रानें तीन दुकानें त्या गांवांतील शेटजी वत्सराज व दशरथ यांच्या स्वाधीन केल्याचा उल्लेख आहे. जिनप्रभासुरीच्या "नासक कल्प" ग्रंथामध्यें पुढील आख्यायिका आहे. ती अशी "दिव्यांग ऋषीनें द्वारावती नगर जाळून भस्म केल्यानंतर यादवकुलाचा संपूर्ण नाश होईल या भीतीनें, यादवकुमार वज्र याची स्त्री पूर्ण मासाची गरोदर होती तिचा अग्निपासून बचाव व्हावा म्हणून त्यानें तिला आठवे तीर्थंकर चंद्रप्रभास्वामी यांचे मंदिरांत आश्रयासाठीं नेलें. तेथें तिला दृढप्रहार नांवाचा मुलगा झाला. तो फार पराक्रमी असून शत्रूंना केवळ कर्दनकाळ भासे. त्यानें चंद्रादित्यपुर नांवाचें नगर स्थापिलें त्या ठिकाणीं चंद्रप्रभासस्वामींचें जैन मंदिर अद्याप आहे. सदरील मंदिरांत यादव राजांची वंशावळ आहे ती प्रस्तुत शिलालेखांतील वंशावळीशीं जुळते.

प्रस्तुत ताम्रपटाची ऐतिहासिकदृष्ट्या कांहींएक किंमत नाहीं


असें पूर्वी म्हटलें आहे. जैन धर्माची महती वाढविण्याच्या हेतूनें तत्धर्मीयांनीं ऐतिहासिक सत्याची पर्वा न करितां कांहींतरी भरम-साट वंशावळ दिली आहे.

गदग येथील शिलालेख.

धारवाड जिल्ह्यांतील गदग या गांवीं नारायणदेव व त्रिकुटेश्वर या नांवाची दोन देवळें आहेत त्यांत संस्कृत व कानडी भाषेंत लिहिलेले बरेच शिलालेख आहेत. पैकीं त्रिकुटेश्वराचें मंदिर फार प्राचीन असून त्याच्या बांधणीवरून तें पूर्वी जैनधर्मीय असावें असें दिसतें. या दोन देवळांत एकंदर अकरा शिलालेख आहेत. पैकीं नऊ एकट्या त्रिकुटेश्वराचे सभामंडपांत असून बाकीचे नारायणदेवाचे मंदिरांत आहेत. यापैकीं कांहीं महात्वाच्या शिलालेखांतील त्रोटक माहिती पुढें देण्यांत येत आहे. नं. २ च्या शिलालेखांत अहवमल्ल देवाचा मांडलिक राजा शोभन यानें शके ९८४ मध्यें त्रिकुटेश्वर देवास स्थावर मिळकत दान दिल्याचा उल्लेख आहे. नं. ३ चा शिलालेख संस्कृत भाषेंत असून कानडी लिपींत आहे. द्वारावतीपुराशीं आपला मूळ संबंध जोडून आपण यादववंशीय आहों असें म्हणविणाऱ्या **होयसल** यादवकुलाची वंशावळ यांत दिली आहे. शके १०२३ मध्यें त्रिकुलेश्वरास कांहीं जमीन दान दिल्याचाही यांत उल्लेख आहे. चालुक्यवंशीय राजे जयसिंह, अहवमल्ल, दुसरा विक्रमादित्य व अहवमल्लाची राणी एचलादेवी यांची नांवें यांत

शके १११३
इ. स. ११९१

आढळतात. **होयसल यादवकुलाची** वंशावळ यांत दिली आहे ती येणेंप्रमाणें.



नं. ४ च्या शिलालेखांतील दानपत्रांत होयसल राजा वीरबल्लाळदेव याचा मंत्री रायदेव (वेळवाहळाचा सुभा),–बसीदेवाचा मुलगा, व मयूरपुरचा अधिपति–यानें दान दिलेल्या गांवांचा उल्लेख आहे. तसेंच वीरबल्लाळानें यादवराजा भिल्लमदेव याचा पराभव करून त्याचेकडून कुंतलदेश हिसकाऊन घेतला, व लुकुंडि येथें आपली राजधानी स्थापिली वगैरे मजकूर यांत दिला आहे. पांचव्या भिल्लमाच्या वेळचे प्रस्तुत शिलालेखाखेरीज पुढें लिहिलेले तीन शिलालेख आहेत:—(१) मत्तुगि [विजापुर] शके १११९, (२) अन्नेगिरि (धारवाड जिल्हा) शके ११०९ व (३) अमृतेश्वर येथील शिलालेख. प्रस्तुतच्या शिलालेखांत पांचव्या भिल्लमानें २३ सप्टेंबर ११९१ रोजीं सूर्यग्रहणाच्या पर्वकालीं हेरूरच्या छावणींतून आपला प्रधान जैतसिंह याचे विनंतीवरून कांहीं

गांव दान दिल्याचा उल्लेख आहे. तसेंच त्यानें आपल्या नांवापूर्वी पुढें दिलेली बिरुदें लाविली आहेत. १ 'समस्तभुवनाश्रय' २ 'महाराजाधिराज' ३ 'प्रतापचक्रवर्ति' ४ 'श्रीपृथ्वीवल्लभ' ५ 'परमेश्वर' ६ 'परमभट्टारक' वगैरे. इ. स. ११८७ च्या अगोदर पश्चिमेकडील चालुक्यवंशीय चौथ्या सोमेश्वराचा तो मांडलिक होता व त्यानें उत्तरेकडील बरेच प्रदेश जिंकून घेतले होते. इ.स. ११८९ च्या अन्नेगिरी येथील शिलालेखांत कर्नाटक प्रांताच्या राज्यलक्ष्मीचा तो वल्लभ झाला म्हणजे त्या प्रांतावर त्यानें आपला अम्मल बसविला असें म्हटलें आहे. तसेंच गदग येथील शिलालेखांत नमूद केलेल्या दानपत्रावरून तो त्यावेळीं हेरूर येथील छावणीमध्यें दक्षिणेकडील प्रांतावरील मोहिमेंत गुंतला होता असें दिसतें. पांचव्या भिल्लमाचा नातु सिंघण याचे वेळच्या शिलालेखांवरून असें दिसतें कीं गोवा व हंगल येथील कदंबराजे, कऱ्हाडचे शिलाहारराजे, सौंदत्तिच रट्टराजे, व होयसलचे यादव यांनीं पांचव्या भिल्लमाचे व त्याचा पहिला मुलगा जैतुगि (जैत्रपाल) याचें सार्वभौमत्त्व कबूल केलें नव्हतें. याशिवाय पश्चिमेकडील चालुक्यांच्या राज्यापैकीं बराच भाग त्याचे अंमलाखालीं आला नव्हता.

परम्मदेवाचे मागून सिंहराज गादीवर बसला. त्याचे पश्चात त्याचा भाऊ गादीवर बसला. त्याचें नांव वंशावळींत दिलेलें नाहीं. परंतु 'व्रतखंडांत' दिलेल्या वर्णनावरून तो महापराक्रमी होता असें दिसतें. लज्जीपुर (तंजावर) येथून कर्पूरातिलक नांवाचा हत्ती आणवून त्यानें कर्पूरव्रत पुरे केलें. त्याचे पश्चात मल्लुगी यास

राज्यपद मिळालें. त्यानें शत्रूशीं लढाई करून पर्णखेट (पैठण) नांवाचें शहर मोठ्या पराक्रमानें जिंकून घेतलें व तें आपलें वसति-स्थान केलें. उत्कल ऊर्फ ओरिसा देशच्या राजाचे पदरीं हत्तींचा मोठा समुदाय होता तो त्यानें मोठ्या पराक्रमानें आपल्या ताब्यांत घेतला. मल्लुगीच्या मागून अमरगांगेय हा राजा झाला व त्याचे पश्चात गोविंद-राज हा गादीवर बसला. त्याचे मागून मल्लुगीचा मुलगा अमरमल्लगी, व त्याचे पश्चात कालीयबल्लाळ हे अनुक्रमानें गादीवर बसले. या कालीय बल्लाळाचे पुत्र दुर्बल असल्यामुळें राज्यपदास मुकले व त्यांचें राज्य त्यांचा महापराक्रमी चुलता पांचवा भिल्लम यानें त्याजपासून हिराऊन घेतलें. 'व्रतखंडांत' या भिल्लमास कालीयबल्लाळाचा चुलता असें म्हटलें आहे. त्यावरून तो उपरिनिर्दिष्ट मल्लुगीचा मुलगा म्हणजे अमरमल्लगीचा भाऊ असावा असें दिसतें. त्यास राज्यपद मिळालें त्यावेळीं तो अतिशय वृद्ध असल्यामुळें त्यास राज्याचा उपभोग फार वर्षें घेतां आला नाहीं. तो शके ११०९ मध्यें गादीवर बसला व शके १११३ त कालवश झाला. सदरील भिल्लमानें चालुक्यांचा पराभव करून त्याचें सार्वभौमत्त्व हिरावून घेतलें.

म्हैसूर देशांतील हळेबीड येथील होयसल यादव हे चालुक्यवंशीय त्रिभुवनमल्ल ऊर्फ विक्रमादित्य याच्या राजवटींत फार बलाढ्य होत चालले होते व 'दक्खन' देशचें सार्वभौमत्व आपणांस मिळावें अशी त्यांची महत्वाकांक्षा होती. होयसल यादवराजा विष्णुवर्धन यानें चालुक्याच्या मुलखावर स्वारी केली व कृष्णावेण्या या नद्यांच्या कांठी तळ देऊन चालुक्यांच्या सैन्यास शह दिला. परंतु चालुक्य राजांचे सैन्य मोठे असून त्याचे मांडलिक आपल्या सार्वभौम राजाशी

पूर्ण राजनिष्ठ असल्यामुळें होयसलांचा त्यांच्यापुढें टिकाव लागला नाहीं. कांहीं वर्षांनीं चालुक्य वंशांतील राजे दुर्बल झाल्यामुळें त्याचे पदरीं असलेल्या कलचुरी वंशांतील विज्जलानें आपल्या धन्याचें राज्य बळकाविलें. हा विज्जल चालुक्यवंशीय तिसऱ्या सोमेश्वराचे मागून गादीवर बसलेल्या जगदेकमल्लाचा मांडलिक होता. परंतु पुढें थोड्याच वर्षांनीं चालुक्यवंशीय राजा चौथा सोमेश्वर यानें कलचुरी-वंशीय राजाकडून कांहीं प्रांत पराक्रमानें परत मिळविले. बाकीचे प्रांत यादवराजांनीं पूर्वीं जिंकून घेतले होते.

याप्रमाणें नर्मदा व कावेरी या नद्यांच्या टापूंत चालुक्य, होयसल यादव, व कलचुरि यांचा तिरंगी झगडा चालूं असतां उत्तरेकडील यादव स्वस्थ बसले नव्हते. मल्लुगीचा मुलगा पांचवा भिल्लम यानें अंसल राजाकडून श्रीवर्धन नांवाचें नगर युद्ध करून हस्तगत केलें, तसेंच प्रत्यंडक राजाचा त्यानें पुरा मोड केला. वरील राजाबद्दल कांहीं एक माहिती उपलब्ध नाहीं. **मंगलवेष्टक** (हल्लींचें मंगळवेढें) येथील श्रीबिल्लण नांवाच्या राजाशीं युद्ध करून त्यांस यमसदनीं पाठविलें. तसेंच कल्याणची राजसत्ता होयसल यादवांपासून हिरावून घेऊन तेथील राजाचा नाश केला. याप्रमाणें कृष्णानदीच्या उत्तरेकडील मुलखाचा तो मालक बनला. त्यानें देवगिरी येथें राजधानी स्थापून शके ११०९ इ. स. ११८७ सालीं देवगिरी येथें आपणास राज्याभिषेक करविला.

मतुंगि येथील इ. स. ११८९ च्या म्हणजे शके ११११ च्या शिलाशासनावरून यादवराजा पांचवा भिल्लम हा तेनिवल्लकोट येथें

राज्य करीत होता. परंतु या गांवासंबंधीं कांहींच माहिती मिळत नाहीं. तो मालवराजाबरोबर झगडला गुर्जर राजे हेच कोणी हत्ती यांना तो केवळ अंकुश होता असें त्याचें काव्यमय वर्णन प्रस्तुत शिलालेखांत केलें आहे. शके ११५९ च्या हरळाहल्लीच्या रतिग्राम येथील व शके ११९९ च्या हरिहर येथील ताम्रपटांत यादवांच्या वंशावळी दिल्या आहेत त्यांत पांचव्या भिल्लमाचा उल्लेख आहे. या वंशावळी या भागाच्या अखेरीस दिल्या आहेत.

पांचवा भिल्लम व होयसल यादव वीरवल्लाळ या उभयतांची दक्खनचें सार्वभौमत्त्व मिळविण्याचेबाबतींत स्पर्धा चालू होती. त्यांचे दरम्यान अनेक लढाया झाल्या त्यांत अखेर लोकिगुंडि (हल्लीचें लकुंडी) येथें निकराची लढाई होऊन भिल्लमाचा मुलगा जैतुगी याचा पूर्ण पराभव झाला; व वीरबल्लाळानें दक्षिणेकडील भाग आपल्या पूर्ण अंमलाखालीं आणिला. याप्रमाणें सेउणदेशच्या ऊर्फ पूर्वकालीन यादवांच्या वंशाची मूलस्थापना शके ६७६ (इ. स. ७५४) च्या सुमारास होऊन तिचा शेवट पांचव्या भिल्लमाच्या मृत्यूबरोबर म्हणजे शके १११३ मध्यें (इ. स. १२०१) झाला. याचा अर्थ यादवकुल नष्ट झालें असा नसून त्यांचा वंश, जैत्रपालापासून देवगिरीचे यादव (अथवा उत्तर कालीन यादव) म्हणून ओळखिला जाऊं लागला. पांचव्या भिल्लमाचे मागून शके १११३ इ. स. ११९१ मध्यें जैत्रपाल ऊर्फ जैतुगी हा गादीवर बसला त्यानें होयसल यादवराजा वीर बल्लाळ याजबरोबर पांचव्या भिल्लमानें

केलेल्या युद्धांत बराच पराक्रम गाजविला होता. व्रतखंडांत त्याच्या पराक्रमाचें वर्णन केलें आहे तें असें—

तदनु मदनमूर्तिः कार्तिकीचन्द्रसान्द्रद्युतिविशदयशोभिः
शोभिताशावकाशः ।
अभवदवनिपालो जैत्रपालः करालः प्रहरणरणरङ्गत्तुङ्गदुत्तुङ्गखड्गः ॥
दीक्षित्वा रणरङ्गदेवयजने प्रोद्दस्तशस्त्रस्रुवः
श्रेणीभिर्जगतीपतीन्हुतवतायेनप्रतापानले ।
तिलङ्गाधिपतेः पशोर्विशसनं रौद्रस्य रौद्राकृतेः
कृत्वापूरुषमेधयज्ञविधिना लब्धस्त्रिलोकीजयः ॥

वरील श्लोकाचा आशय असा कीं समरभूमी हेंच पुण्यक्षेत्र मानून जैत्रपालानें यज्ञकंकण बांधिलें आणि तेथें आपला प्रतापाग्नि सिद्ध करून त्यांत आपली शस्त्रें ह्याच कोणी समिधा असें कल्पून त्यांच्या सहाय्यानें प्रथम पुष्कळ राजांच्या आहुति देऊन अखेर तैलंगाचा स्वामी जो अत्यंत क्रर रुद्र नांवाचा राजा त्याचीही त्यांत आहुती देऊन तो नरमेध समाप्त केला, आणि तीन लोकांवर जय मिळविला. वारंगलानजीक अनमकोंड येथें काकटेय कुळांतील ज्या रुद्रदेवाचा शिलालेख सांपडला आहे तोच हा रुद्र असावा यांत शंका नाहीं. इतर शिलाशासनांतही तैलंगणचा राजा रुद्रदेव याजबरोबर जैत्रपालाचें युद्ध झाल्याचें वर्णन केलेलें आढळून येतें, व आंध्र राजांच्या स्त्रियांचें सर्व सौख्य याच जैत्रपालानें हरण केलें असें काव्यमय वर्णन इतर ठिकाणीं केल्याचें दिसून येतें.

प्रख्यात गणिति व ज्योतिषि भास्कराचार्य याचा मुलगा लक्ष्मीधर

हा जैत्रपाल राजाचे पदरीं होता व त्याच्या दरबारांतील सर्व विद्वानांत तो अग्रगण्य गणला जात होता. गणित व ज्योतिष याविषयांखेरीज न्याय व मीमांसा या दोन शास्त्रांतही तो पारंगत होता. पुढें दिलेल्या **पाटणच्या** शिलालेखांत याबद्दलचा उल्लेख केलेला आहे.

पाटण येथील शिलालेख (खानदेश)

खानदेशांत चाळिसगांवचे नैऋत्य दिशेस दहा मैलावर असलेल्या पाटणगांवीं प्रस्तुत शिलालेख डॉ. भाऊ दाजी यांस सांपडला. हा संस्कृत भाषेंत लिहिलेला असून गद्य–पद्य आहे. लिपी देवनागरी आहे. यादवराजाचे मांडलिक निकुंभ घराण्यापैकीं सोईदेव व हेमाडिदेव यांनीं ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनासाठीं वेधशाळा स्थापिली. या वेधशाळेच्या कायमच्या सुव्यवस्थेसाठीं त्यांनीं शके ११२८ प्रभव संवत्सरी श्रावण महिन्याच्या पौर्णिमेस चंद्रग्रहणाच्या पर्वणीवर भूमिदान केलें व भविष्यकाळींहि राजे लोकांनीं पुण्यवृद्धीसाठीं या वेधशाळेची जोपासना करावी अशी त्यांत इच्छा प्रदर्शित केली आहे. या श्रावण पौर्णिमेस चंद्रग्रहण नव्हतें. शके ११२९ च्या श्रावण १५ ला होतें. तत्कालिन जैत्रपाल यादवराजानें सदरील वेधशाळेस देणगी दिल्याचें कोठें आढळून येत नाहीं. या शिलालेखांतील मजकुरावरून तत्कालीन ज्योतिषविषयावरील ग्रंथ रचणारांस, व दृक्प्रत्यय येण्यासाठीं वेधशाळा वगैरे बांधण्याच्या कामीं, राजाश्रय कसा मिळत असे ही गोष्ट सिद्ध होते. या शिलालेखांत सुप्रसिद्ध ज्योतिषी **भास्कराचार्य** याची वंशावळ दिली आहे. ती ज्योतिष शास्त्राचा

शके ११२८-११२९
इ स. १२०६-१२०७

अभ्यास करणारांस महत्त्वाची व बोधप्रद आहे ती अशी––

त्रिविक्रम (कवि)
|
भास्करभट्ट (भोजराजाकडून ज्यास विद्यापति अशी पदवी मिळाली तो)
|
गोविंद
|
प्रभाकर
|
मनोरथ
|
महेश्वराचार्य (कवि)
|
भास्कराचार्य (सुप्रसिद्ध ज्योतिषी)
|
लक्ष्मीधर (यादवराजा पहिला जैतुगी याचे पदरचा मुख्य पंडित)
|
चांगदेव (सिंघणराजाचे पदरचा प्रख्यात ज्योतिषी व थोर विद्वान् गृहस्थ

या वंशावळींतील त्रिविक्रम हा मोठा कवि होऊन गेला. त्याच्या आजाचें नांव श्रीधर असून वडिलाचें नांव देवादित्य होतें. त्यानें 'दमयंतिकथा' या नांवाचा सुंदर ग्रंथ लिहिला, तो शांडिल्य गोत्री होता. त्याचा मुलगा भास्करभट्ट हा धारच्या भोजराजाचे पदरीं पंडित होता. त्यानें 'करणकुतूहल' नांवाचा ग्रंथ लिहिला. व त्यास 'विद्यापति' ही पदवी मिळाली होती. भास्करभट्टाचा मुलगा गोविंद हा 'सर्वज्ञ' या नांवानें प्रसिद्ध आहे. या गोविंदाचा पणतु महेश्वराचार्य हा नामांकित कवि होऊन गेला. त्यानें 'वृत्ततिलक' या नांवाचा ग्रंथ लिहिला. महेश्वराचार्यांचा मुलगा **भास्कराचार्य** हा सुप्रसिद्ध ज्योतिषी होऊन गेला. त्याचे लीलावती, वगैरे अनेक ग्रंथ आहेत. त्याचा मुलगा लक्ष्मीधर हा यादवराजा

पहिला जैतुगी ऊर्फ जैत्रपाल याच्या राजवटींत मुख्य पंडित होता. त्याचा मुलगा चांगदेव हा जैतुगीचा मुलगा देवगिरीचा यादवराजा सिंघण याच्या पदरीं प्रख्यात ज्योतिषी होऊन गेला. प्रस्तुत शिलालेखांतील संस्कृत भागाच्या शेवटीं असलेला मजकूर येणेंप्रमाणें:—

श्रीसोइदेवेन मठाय दत्तं हेमाद्रिना किंचिदिहा परैश्च ॥
भूम्यादि सर्व प्रतिपालनीयं भविष्यभूपैर्बहुपुण्यवृद्धौ ॥

स्वस्ति श्री शके ११२८ प्रभव संवत्सरे श्रावण मासे पौर्णिमास्यां चंद्रग्रहणसमये श्री सोइदेवेन सर्वजनसंन्निधौ हस्तोदकपूर्वकं निजगुरुरचितमठायस्थानंदत्तं ॥

या शिलालेखाचा विशेष असा आहे कीं, त्यांतील शेवटचा भाग तत्कालीन मराठींत आहे. त्यांतील भाषा बिकट आहे. चांगदेवानें बांधलेल्या वेधशाळेस पाटणं गांवांतील लोकांनीं यथाशक्ति मदत करावी असा त्यांतील भावार्थ आहे. तत्कालीन खानदेशी मराठीचा मासला पुढीलप्रमाणें आहे.

तद्यथा

इयां पाटणी जें केणें उघटे तेहाचा असि आउ जो राउला होता ग्राहकापासी तो मढा दीन्हला । ब्राह्मणी जे विक (ते) यापासीं ब्रह्मोत्तर ते ब्राह्मणी दीन्हले । ग्राहकापासी दामाचा वीसोवा आसूपाटी नगरी दीन्हला ॥ तुलदा इया बैला सिंद्ध (वै) ॥ बाहीरला आसूपाटी गिधवे ग्राहकापासी ॥ पांच पोफली ग्राहकापासी ॥ पहिले आघाणे आदाणाची लोटी मठा दीन्हली ॥ जेती घाणे वाहती तेती या प्रति पली पली तेला ॥ एथ (जे) मविजे ते मढीचेज मापे

मवावें मपाउ मढा अर्द्ध ॥ अर्ध मापदारी ॥ (रू) पाचे सुंक ॥ तया भूमि चतुराघाट विशुद्ध ॐ (डुग्रामु) ॥ अ....वाले कामता-मद्धेच–वं (टा.) ॥ एकत–(टा) ॥ पंडितां (चा) कायतु ॥ (ची) ते आमीचा (ऊ) रा ॥ धामी (जी) ची (अ) सेंढिआ यांतील शब्द " उघटे " ' आसुपाटी ' ' गिधवे ' वगैरे शब्द दुर्बोध आहेत. पाटणगांवीं ज्या तेल्यांचे घाणे असतील त्यांनीं प्रत्येकी पळी-पळी तेल वेधशाळेच्या उपयोगाकरितां द्यावें असा कांहीं वाक्यांचा अर्थ लागतो. प्राचीन मराठीभाषेचा चिकित्सक पद्धतीनें अभ्यास करणारांस वरील उतारा महत्त्वाचा वाटल्यावांचून राहणार नाहीं.

या शिलालेखांतील दुसरा विशेष असा आहे कीं खुद्द खानदेशांत निकुंभ नांवाचें घराणें असून तें अभिराप्रमाणें देवगिरीच्या यादवांचे मांडलीक होतें.

सिंघण ऊर्फ सिंहणदेव

(शके ११३२–११६०)

इ. स. १२१०–१२३८

तस्मादभूदभिनवस्मरचारुमूर्तिः कीर्तेः पदं स किल सिङ्घणदेवभूपः ।
उद्दण्डदोर्युगलगर्वितवैरिवीर–सीमन्तिनीवदनकैरवचण्डभानुः ॥

येनानीयत मत्तवारणघटा जज्झल्लभूमीभृतः
कक्कूलादवनीपतेरपहृता येनाधिराज्यश्रियः ।
येनक्षोणीभृदर्जुनोपि बलिना नीतःकथाशेषतां
येनोद्दामभुजेन भोजनृपतिः काराकुटुम्बीकृतः ॥

यद्रम्भागिरिकेसरी विनिकृतो लक्ष्मीधरः क्ष्मापति–
र्यद्बाहाबलिभिःप्रसह्य रुरुधे धाराधराधीश्वरः ।

बल्लालक्षितिपालपालितभुवां सर्वापहारश्च यः
श्रीसिंहस्य महीपतेर्विजयते तद्बाललीलायितम् ॥

वरील श्लोकांत हेमाद्रीनें सिंघणदेवाच्या पराक्रमाचें थोडक्यांत चटकदार वर्णन केलें आहे. कोणा एका जज्जल नांवाच्या राजाचा पराभव करून सिंघणराजानें त्याचे सर्व उन्मत्त हत्ती हिराऊन आणिले. तसेंच कक्कल नांवाच्या राजाचें राज्य त्यांनीं जिंकून घेतलें. अर्जुन राजाचा समूळ नाश केला व भोजराजास धरून कारागृहांत टाकलें. रंभागिरी येथील सिंहाप्रमाणें पराक्रमी राजा लक्ष्मीधर यास त्यानें युद्धांत लोळविलें व धारच्या राजाला आपल्या घोडदळानें घेरलें आणि बल्लाळाच्या हातीं असलेला सर्व मुलुख त्यानें काबीज केला. आणि हे सर्व पराक्रम जणुकाय बालक्रीडेप्रमाणें सहजगत्या केले. वर नमूद केलेल्या राजासंबंधीं थोडिशी माहिती देणें जरूर आहे. जनरल कनिंग हॅम् यानें आपल्या 'आर्किआलॉजिकल रिपोर्ट नांवाच्या ग्रंथांत (भा. १७ पान ७५) चेदी नामक राजकुलाच्या पूर्वेकडील शाखेची वंशावळ दिली आहे, त्यांत जज्जलाचें नांव दिलें आहे. त्याचें आधिपत्य छत्तिसगड प्रांतावर होतें. याच चेदि राजकुलाची पश्चिमेकडील दुसरी एक शाखा होती. त्याची राजधानी त्रिपुर ऊर्फ तेऊर ही होती. त्या शाखेंतील राजे आपणांस कक्कूल (कोक्कल) या नांवानें संबोधून घेत असत. यांत नमूद केलेला भोजराजा बहुतकरून पन्हाळचा भोजराजा असावा. हा भोजराजा शिलाहार राजकुलांतील होता. त्याचा पराभव केल्यानंतर यादवांनीं कोल्हापूरचें राज्य खालसा करून आपल्या राज्यांत सामील केलें. ही गोष्ट सिंघणाच्या राजवटींतील शिलाशासनावरून सिद्ध होतें. सिंघणानंतरच

कोल्हापूर येथें जे कोरीव लेख आहेत त्यांत यादवराजांची नांवें असून त्याबरोबर त्या प्रांताचा राज्यकारभार करण्यासाठीं त्यांनीं नेमलेल्या अधिकाऱ्यांची नांवें आहेत.

शके ११३२-११६० इ. स. १२१०-१२३८

सिंघणाचे वेळचे बरेच शिलालेख आहेत ते परिशिष्टांमध्यें दिलेल्या जंत्रींत दर्शविले आहेत. त्यांपैकीं गदग, खिद्रापुर, बहाल, तिलिवल्ली, हरळाहळ्ळी, अंबा, (आंबे,) येथील शिलालेख महत्त्वाचे आहेत. त्यावरून सिंघणदेवाच्या पराक्रमाची बरीच कल्पना येते व हेमाद्रीनें त्याचे पराक्रमाविषयींचें जें वर्णन केलें आहे त्यांत ऐतिहासिक सत्य असल्याचें दिसून येतें.

२ रा गदग येथील शिलालेख.

शके ११३५ इ. स. १२१३.

हा शिलालेख संस्कृत व कानडी भाषेंत आहे. सिंघणानें त्रिकुटेश्वरदेवास गांव इनाम दिल्याबद्दलचा प्रस्तुत शिलालेख आहे. या शिलालेखाचे आरंभीं अग्रहार केलेल्या क्रतुग गांवाचें वर्णन असून त्यांत दानाचें वर्णन दिलें आहे. शिलालेखाच्या मध्यभागीं शिवलिंग, ब्राह्मण व देवळाचा गाभारा दाखवून त्यांत पुजारी ब्राह्मण पूजा करण्यांत गुंतलेले असून, उजवे बाजूस गाय व तिचें वांसरू आणि वरचे बाजूस सूर्यबिंब दाखविलें आहे. डावे बाजूस बसवाची मूर्ति असून वर चंद्र दाखविला आहे. हें देऊळ लिंगायत पंथाचें असावें असें दिसतें. या देवास गांव इनाम देऊन सिंघणराजानें आपली वेदविरोधी पंथाविषयीं सहिष्णुता दाखविली आहे.

खिद्रापुर येथील शिलालेख.

हा शिलालेख संस्कृत भाषेंत असून कायस्थ लिपींत लिहिलेला आहे. या शिलालेखांत शके ११३६ च्या चैत्र व ३० स श्रीमुख संवत्सरी सूर्यग्रहणाची पर्वणी साधून कोपेश्वर नामक देवस्थानास सिंघणदेवानें एक गांव इनाम दिल्याचा मजकूर आहे. सिंघणदेवानें आपल्या नांवामागें "महाराजाधिराज, प्रतापचक्रवर्ति, द्वारावतीपुरवराधीश, श्रीपृथ्वीवल्लभ, यादवकुलकलिकाविलास वगैरे बिरुदें लाविलीं आहेत. कोल्हापूर येथील शिलालेखांत पन्हाळ्याच्या भोजराजास सिंघणानें आपल्या अंमलाखाली आणिल्याचा उल्लेख आहे. सदरील भोजराजा हा शिलाहार वंशांतील होता. मेजर ग्राहॅम यांनीं खिद्रापूर येथील नं. ११ च्या कानडी भाषेंत असलेल्या शिलालेखाचें इंग्रजी भाषांतर केलें आहे त्याचा आशय पुढें लिहिल्याप्रमाणें आहे. (राजा सिंघणदेव म्हणतो) "माझें राज्य फार भरभराटीचें आहे. तुमच्या वाडवडिलांनां व ब्राह्मणांना जो धर्म प्रिय होता तोच मी स्थापन करीत आहे. तो कल्पतरुप्रमाणें वृद्धिंगत होवो. व त्याच्या अंकुरापासून पानें फुटोत व त्याच्या फुलापासून फळें येवोत." शिलालेखाच्या मधोमध शंकराची पिंडी असून डाव्या बाजूस पुरुष व त्याचेवर चंद्र व उजव्याबाजूस नंदी व त्यावर सूर्य आहे.

शके ११३६.
इ. स. १२१४.

बहाल येथील शिलालेख.

खानदेश जिल्ह्यांत चाळीसगांव तालुक्यांतील बहाल गांवी हा शिलालेख आहे. तो संस्कृत भाषेंत असून लिपी देवनागरी

आहे. या शिलालेखांत एकंदर १९ ओळी आहेत. सिंघणराजाचा ज्योतिषी अनंतदेव यानें भवानीद्वारजा येथें मंदिर बांधिलें. या शिलालेखाचे दोन भाग आहेत. पहिल्यांत अनंतदेव व त्याचे वाडवडील यांचा उल्लेख असून हा भाग वाङ्मयाच्यादृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. दुसऱ्या भागांत देवगिरीचा यादव राजा सिंघण, त्याचा बाप व आजा यांची प्रशंसा केली आहे. अनंतदेव हा शांडिल्यगोत्री यजुर्वेदी माध्यन्दिन शाखेचा ब्राह्मण होता. त्याचे वंशांत मनोरथ व महेश्वर असे दोन विद्वान् ज्योतिषि होऊन गेले. पैकीं महेश्वरानें ग्रहासंबंधीं **शेखर** या नांवाचा करणग्रंथ लिहिला आहे. प्रतिष्ठादीपक, फलग्रंथ, व लघुजातक या नांवाचे आणखी तीन ग्रंथ त्यानें ज्योतिषशास्त्रावर लिहिल्याचें समजतें. महेश्वराचा मुलगा श्रीपति, व श्रीपतीचा मुलगा गणपति व गणपतीचा मुलगा अनंतदेव, अशी वंशपरंपरा या शिलालेखांत दिली आहे. तो विद्वान् ज्योतिषि होता. त्यानें ज्योतिषशास्त्रावर कांहीं ग्रंथ लिहिल्याचे समजतें. पाटणच्या शिलालेखांतील त्रिविक्रमाच्या वंशाशी त्याचा संबंध असावा असें दिसतें.

शके ११४४
इ. स. १२२२

सिंघण, जैत्रपाल व भिल्लम यांचें वर्णन दुसऱ्या भागांत दिलें आहे. यांतील ऐतिहासिक भाग एवढाच आहे कीं, सिंघणाचा बाप जैत्रपाल हा दयेचा सागर होता. व आंध्रदेशाचा राजा गणपति याची गादी दुसऱ्यानें बळकाविली होती ती त्यानें त्यास परत मिळवून दिली व गणपतीचा बचाव केला. सिंघणानें पराक्रमी अर्जुनाचा पराभव केला. या दोनही गोष्टी शके ११९३ च्या पैठणच्या

ताम्रपटांत नमूद केल्या आहेत. यांत ज्या अर्जुनाचा उल्लेख केला आहे, तो मालव देशांतील वर्मदेव राजा असला पाहिजे, सिंघणाच्या राज्यांत अनंतदेवानें एक देऊळ बांधिलें. गंगाधर या नांवाच्या नागर ब्राह्मणानें हा शिलालेख कोरला. अनंतदेवाचा बंधु महेश्वर यानें सिंघण देवाची प्रशस्ति लिहिली आहे.

हरळाहल्ली येथील ताम्रपट.

या ताम्रपटाचा बराच भाग संस्कृतांत असून कांहीं भाग जुन्या कानडींत आहे. लिपी देवनागरी आहे. धारवाड जिल्ह्यांतिल कराजगी तालुक्यांत हरळाहल्ली येथील उदचम्मादेवीचे देवळाचे मागील जागेंत हा ताम्रपट पुरलेला होता. त्यांत देवगिरीच्या यादव राजांची मल्लुगीपासून सिंघणदेवापर्यंत वंशावळ दिली आहे. ताम्रपटाचे तीन तुकडे असून ते $\frac{३}{८}$ इंच जाड कडींत अडकविलेले आहेत. दरएक पत्र्याची लांबी-रुंदी $११\frac{२}{८} \times ७\frac{१}{२}$ आहे. कडीवर गुडघे टेंकून, व हात जोडून उभा असलेल्या गरुडाचा ठसा आहे. त्याच्या उजवे खांद्यावर सूर्य व डावे खांद्यावर चंद्र यांच्या आकृति आहेत. ताम्रपटाचें वजन ४४१ तोळे आहे. सिंघणदेवाचा कर्नाटक प्रांतावरील सुभेदार बीचण या नांवाचा होता. त्याच्या थोरल्या बन्धूचें नांव मल्ल व वडिलांचें नांव चिक्क असें होतें. बीचणाच्या बायकोचें नांव आमंगण असें होतें. बीचणानें रट्टांचा, दक्षिण कोंकणांतील कदंबाचा, द्वारासमुद्र येथील होयसळांचा व पांड्यदेशच्या राजांचा पराभव केला. कावेरीनदीच्या आसपास त्यानें सिंघणदेवाच्या पराक्रमाचे विजयस्तंभ रोंविले हरळाहल्ली

शके ११५९-६०
इ. स. १२३७-३८

पासून सहा मैलावर वाराही (म्ह० हल्लीची वर्धा) नदी तुंगभद्रेला मिळते. वाराहीचे काठीं बीचणानें आपल्या वडिलांचें श्राद्ध करून त्यांचें ऋण फेडिलें. वाराही नदीचें काठांवर असलेल्या सोमनाथ देवालयाचा व चिक्कदेव व महादेव यांनीं बांधलेल्या शिवालयांचा उल्लेख केलेला आहे. दंडेश चिक्कदेव हा सिंघणाचा मांडलिक होता. त्यानें रतिग्राम गावांतील बरीच जमीन खरेदी करून तेथील ब्राह्मणांस दान दिली. येथील ग्रामाधिकारी रामगौंड व महामंडलेश्वर जोईदेव यांच्या नांवाचा उल्लेख आहे.

तिलिवल्ली येथील शिलालेख.

हा शिलालेख कानडींत असून त्यांत १२६ ओळी आहेत. देवगिरीचा सिंघण यादव राजा याची यांत भरपूर प्रशंसा केलेली आहे. त्याची बिरुदें दिलीं आहेत तीं अशीं " १ महाराजाधिराज २ द्वारावतीपुरवराधीश, ३ विष्णुवंशोद्भव ४ देवगिरीदुर्गतिलक वगैरे. "

शके ११६०
इ. स. १२३८

विर्दभाच्या राजाचा, तुरुकांचा (तुर्कांचा) व जज्जल देवाचा सिंघणानें पराभव केला. कोल्हापुरच्या भोजराजास सिंघणानें पळावयास लाविलें. विहंसराजा व होयसल राजा बल्लाळ आणि लक्ष्मीराज यांस त्यानें जिंकलें. मालव देशाच्या राजाचा व बलाढ्य अभिरांचा, त्याचप्रमाणें क्रूर पेंढाऱ्यांचा त्यानें नाश केला. त्यास नेपाळ, अंग, कलिंग, चोल येथील राजे व पांड्यराजे थरथर कांपत. त्याच्या हस्तिदलाचा नायक लक्षिदेव होता. या शिलालेखांत सैवत (सावत?) ठाकूर (कुंतल प्रांतांतील एका भागाचा अधिकारी) याचा उल्लेख केला आहे. विंगालीय ! प्रांतावर त्याचा ताबा होता. महाराष्ट्रांत मोडणारा कुंतल

देशाचा भाग त्याचे अमलाखालीं होता. या शिलालेखांत अभिरांचा उल्लेख केला आहे. यावरून देवगिरीचे यादवघराण्यांतील राजे व खानदेशांतील अभिर ऊर्फ गवळी राजे हे एक नव्हत असें सिद्ध होतें.

सिंघणदेवाची गुजराथेवरील मोहिम.

हेमाद्रीच्या प्रशस्तींत सिंघणानें गुजराथेवर स्वारी केल्याचा उल्लेख आढळत नाहीं. सिंघणानें गुजराथ काबीज करण्याचा दोन–तीन वेळां प्रयत्न केला परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं.उलट गुजराथच्या राजाबरोबर मित्रत्वाचा तह करून त्यास स्वस्थ बसावें लागले अशी माहिती **आंबे** येथील शिलाशासनें, **सोमेश्वराचा** कीर्तिकौमुदीनामक ग्रंथ, अहिनलवाडा येथील शिलाशासनें, वगैरेवरून मिळते. कोल्हापूर येथील नं. १० च्या शिलाशासनांत मात्र सिंघणास, गुर्जरराजा हाच कोणी हत्ति याचा अंकुश असें म्हटलें आहे. गुजराथेवरील सिंघणदेवाची मोहिम यशस्वी झाली नाहीं म्हणून हेमाद्रीनें व्रतखंडांतील प्रशस्तींत याबद्दलचा कदाचित् उल्लेख केला नसावा असें दिसतें.

आंबे येथील शिलालेख.

शके ११६२
इ. स. १२४०

हा शिलालेख संस्कृत भाषेंत असून त्याची लिपी देवनागरी आहे. या शिलालेखांत सिंघणाच्या गुजराथेवरील स्वारीची हकीगत आहे. सिंघणानें देवगिरीचें राज्य शके ११३२ पासून ११६९ पर्यंत केलें. त्याच्या पदरीं खोलेश्वर व राम या नांवाचे मौद्गल जातीचे ब्राह्मण दोन प्रधान होते. सिंघणानें त्यांस गुजराथच्या मोहिमेवर पाठविलें.

त्यावेळचा गुजराथचा राजा **लवणप्रसाद** व त्याचा मुलगा **वीरधवल** यांच्या सैन्याबरोबर सिंघणाच्या सैन्याचें घनघोर युद्ध झालें, त्यांत राम पडला. रामाची बहीण लक्ष्मी हिनें ब्रह्मपुरी येथें त्याचें स्मारक म्हणून रामनारायणाचें मंदिर बांधिलें. त्यांत हा शिलालेख आहे. त्यांतील मजकूर **कविराज** यानें संस्कृतांत पद्यमय रचिला असून तो परिशिष्ट ७ मध्यें दिला आहे. या शिलालेखांत सिंघणासारखा पराक्रमी राजा पूर्वी झाला नाहीं, व पुढें होणार नाहीं असें म्हटलें आहे. व खोलेश्वराचा मुलगा राम यानें गुजराथचे मोहिमेंत जो पराक्रम गाजविला त्याचे बहारीचें वर्णन केलें आहे. सिंहगड घेतानां शिवाजीचा उजवा हात तानाजी पडला, परंतु शिवाजीचें उदिष्ट कार्य पार पडलें! त्याचप्रमाणें सिंघणाचा राम जरी लढाईंत पडला तरी सिंघणाचा शह गुजराथला कायमचा लागला.

कीर्तिकौमुदी नांवाचें एक संस्कृत काव्य सोमेश्वरानें लिहिलें आहे. त्यांत गुजराथच्या चालुक्य राजांचें वर्णन दिलें असून वस्तुपाल व जैत्रपाल या बन्धुद्वय प्रधानांची भरपूर स्तुति केली आहे. चालुक्यराजांची व्याघ्रपाली (वाघेला ठाकूर) नांवाची एक शाखा होती. त्यापैकीं राजा लवणप्रसाद याचा गुजराथच्या एका भागावर अंमल होता. त्याचा मुलगा वीरधवल हा देखील आपल्या बापाप्रमाणेंच पराक्रमी होता. या बाप-लेकांनीं तुमुल युद्ध करून खोलेश्वर आणि राम यांचीं स्वारी परतविली. याच काव्यांत सिंघणानें गुजराथेवर आणखी एकदां स्वारी केली होती परंतु सिंघणाचें सैन्य भडोच (भृगुकच्छ) येथें पोहोंचल्यावर उभय पक्षांचें निकराचें

युद्ध होऊन त्यांत सिंघणास हार खावी लागली असें लिहिलें आहे.

कोणीएक मुद्गलगोत्री खोलेश्वर नांवाचा ब्राह्मण सिंघणाच्या पदरीं मोठा पराक्रमी मंत्री होता. त्यानें गुर्जर देशाच्या राजाची रग जिरविली, मालवदेशीय राजास कीटकाप्रमाणें चिरडून टाकिलें, अभिरराजाचें कुळ अजिबात नष्ट केलें, तो आपला धनी सिंघणदेव याच्या शत्रूस दावाग्निप्रमाणें भासत होता व त्यानें शत्रूंचें निर्दालन करण्याचे कामीं सिंघणास कांहींएक काळजी ठेविली नव्हती, वगैरे आशयाचें खोलेश्वराच्या पराक्रमाचें वर्णन बऱ्याच ठिकाणीं केलेलें आढळतें. या खोलेश्वरानें आपला पुत्र राम यास आपले पश्चात् आपल्या अधिकारावर नेमिलें होतें. त्याच्या नेतृत्त्वाखालीं सिंघणानें पुन्हां एकदां गुर्जर प्रांतावर स्वारी केली. **राम** नर्मदेपर्यंत चाल करून गेल्यावर त्याठिकाणीं गुजराथच्या सैन्यानें त्यास गांठलें. उभय पक्षामध्यें झालेल्या निकराच्या लढाईत गुजराथच्या राजाचे हजारो शिपाई धारातीर्थीं पडले ही गोष्ट खरी, परंतु सिंघणाकडील राम त्या लढाईत मारला गेला. यावरून सिंघणानें गुजराथेवर निदान दोन वेळां स्वाऱ्या केल्या असाव्या असें दिसतें. गुजराथच्या इतिहासांत या गोष्टीला पोषक असा वृत्तांत आहे.

कीर्तिकौमुदी काव्यांत देवगिरीच्या यादवराजांचा गुजराथच्या राजानां केवढा दरारा होता याचें हुबेहूब वर्णन केलें आहे.

श्रुतासिङ्गणसैन्यसिंहनादप्रसरा गुर्जरराजराजधानी ।
हरिणीव हरिन्मुखावलोकं चकितान्तः करणा मुहुश्चकार ॥ ४३ ॥
गृहमारभते न कोहि कर्तुं कुरुते कोपि न संग्रहं कणानाम् ।
स्थिरतां क च नापि नैति चेतः परचक्रागमशङ्कयाप्रजानाम् ॥ ४४ ॥

अवधीरितधान्यसंचयानां बहुमानः शकटेषु मानवानाम् ।
विपदामुदये हि दुर्निवारे शरणं चक्रभृदेवदेहभाजाम् ॥ ४५ ॥

समुपैति यथा यथा समीपं रिपुराजध्वजिनी मदात्तदानीम् ।
परतः परतस्तथा तथासौ जनता जातभयोच्छ्रया प्रयाति ॥ ४६ ॥

कीर्तिकौमुदी स. ४

सिंघणाच्या सैन्याचा सिंहनाद जिकडे तिकडे दुमदुमलेला ऐकून गुजराथची राजधानी, ज्याप्रमाणें सिंहाचें तोंड पाहून हरिणी चकित होते त्याप्रमाणें तिची स्थिति झाली. म्हणजे सिंघण राजाच्या दहशतीनें ती थरथरां कापूं लागली. त्या भीतीनें कोणीही नवीन घर बांधण्यास धजेना. अथवा धान्य सांठविण्यास कोणाचाहि धीर होईना. परचक्राच्या भीतीनें सर्वांची मनें उद्विग्न झालीं. शेतांतील धान्याचें रक्षण करण्याचें सोडून देऊन गाड्या मिळविण्याची सर्व लोक विलक्षण काळजी वाहूं लागले आणि शत्रूची फौज जसजशी अधिकाधिक जवळ येऊं लागली तसतशी सदरील राजधानींतील लोकांच्या काळजांत धडकी भरून जो तो आपापलीं घरें दारें सोडून पळूं लागला. यापुढें कीर्तिकौमुदींत पुढील श्लोकांत आणखी मनोरंजक वर्णन आहे.

तदवेत्य जवेन यादवेन्दोर्बलमागच्छदतुच्छवीरगर्वम् ।
भृकुटीकुटिलं चकार कोपादलिकं श्रीलवणप्रसाददेवः ॥ ४७ ॥

उपकण्ठमकुण्ठविक्रमस्य स्फुरदुस्रप्रसराहिरण्मयी स्रक् ।
शुशुभेस्य चुलुक्यभूपलक्ष्म्या भयवत्या निहितेव बाहुवल्ली ॥ ४८ ॥

परिपन्थिवरूथिनीं प्रभूतां स नृपस्तुच्छपरिच्छदोप्यगच्छत् ।
बलि नाप्यरिणा रणप्रवृत्तौ सुभटानां हिपदानि संमुखानि ।। ४९ ॥

बलवारिधिराजगाम शत्रोरुपतापीतटमुर्वरोपतापी ।
रभसादभिधावतिस्म वीरः स महीतीरमहीनबाहुशक्तिः ॥ ५० ॥

प्रचुरं तदरातिराजचक्रं तदजय्यं च बलं चुलुक्यभर्तुः ।
विमृशन्बहुशोपि संदिहानो न जानोनिश्चिनुते गतिं स्तितिवा ॥५१॥

रिपुसैन्यनिवेशभूः प्रजानांविदिताभूदनिवेदितापिदूतैः ।
गगनाङ्गणगाहनोल्बणैस्तज्ज्वलितग्राप्रसमूहधूमकूटैः ॥ ५२ ॥

भृगुकच्छमहीमहीनसस्यां चरतस्तानचिरेण वृष्णिवर्गान् ।
न बहूनपि दुर्जया जय्यः समरेमन्यत वीरकेसरी सः ॥ ५३ ॥

कीर्तिकौमुदी स. ४

" सिंघण राजाचें सैन्य फार त्वरेनें चाल करून येत आहे असें **लवणप्रसाद** यास समजतांच त्यानें रागानें आपल्या भुंवया वर चढविल्या. त्याची फौज लहान होती याची त्यास जाणीव होती तथापि ती बरोबर घेऊन शत्रूच्या मोठ्या सैन्यास तोंड देण्यासाठीं तो निघाला. सिंघणाचें सैन्य तापीच्याकाठीं पोहोंचलें तेव्हां लवणप्रसाद मोठ्या त्वरेनें चाल करून महीच्या काठीं जाऊन थडकला. शत्रूचें सैन्य फार मोठें व चालुक्यांची फौज अतिशय पराक्रमी यामुळें विजयश्री कोणास माळ घालील याबद्दल लोकांची मनें साशंक झालीं. सिंघणाकडील सैन्य आपल्या मार्गांतील खेड्या-पाड्यांची जाळ-पोळ

करीत जाई. त्यायोगानें उत्पन्न झालेल्या धुराच्या लोटामुळें **लवण**-प्रसादाकडील सैन्यास शत्रूचा तळ कोठें आहे याचा मागमूस लागेना. अशा बिकट परिस्थितींत शत्रूच्या सैन्यास तोंड देण्यासाठीं आपल्या सैन्याची हालचाल कशा रीतीनें करावी याबद्दल लवणप्रसादास मोठा पेंच पडला. शेतांत उभी पिकें असतांना यादवांच्या सैन्यानें भृगु-कच्छाच्या (हल्लीच्या भडोचच्या) आसपासच्या मुलखावर हल्ला करून तो व्यापून टाकिला; तरी देखील त्या गुजराथच्या सिंहास (लवणप्रसादास) शत्रूच्या सैन्यापुढें आपणांस हार खावी लागणार नाहीं असा पूर्ण आत्मविश्वास होता. ''

लवणप्रसाद व **वीरधवल** या पिता-पुत्रांची वर लिहिल्याप्रमाणें तारां-बळ उडाली असतां आणखी एक अकल्पित गोष्ट घडून आली; त्या-मुळें त्यांच्या संकटपरंपरेंत अधिकच भर पडली. त्यांच्या या संकटा-वस्थेचा फायदा घेऊन उत्तरेकडून चार राजांनीं गुजराथप्रांतावर स्वारी केली. ''विपद्विपदमनुबध्नाति'' संकटें एकदां येऊं लागली म्हणजे ती एकामागून एक अशीं येऊं लागतात. या जगाच्या रूढीस अनु-सरून प्रथमपासून लवणप्रसादाच्या गोटांत सामील असलेले **गोध्रा** व **लाट** प्रांताचे राजे यांनीं त्यास एकाएकी दगा दिला व ते उभयतां मारवाडच्या राजास जाऊन मिळाले. मौज ही कीं सर्व बाजूंनीं लवण-प्रसादाचे सैन्यास गराडा पडला असतांहि त्या पिता-पुत्रांचें धैर्य किंचितहि खचलें नाहीं. त्यांच्या या अचाट धैर्याचें कौतुक करावें तितकें थोडेंच आहे ! दक्षिणबाजूकडून यादवसैन्यानें जो शह दिला होता त्यास प्रतिकार करण्याचें कांहींकाल लवणप्रसादानें तहकूब करून उत्तरेकडून वर निर्दिष्ट केलेल्या तीन राजांच्या संयुक्त सैन्याबरोबर

सामना करण्यासाठीं आपल्या फौजेचा मोर्चा त्यानें उत्तरेकडे फिरविला. याप्रसंगाचें वर्णन सोमेश्वरानें आपल्या 'कीर्तिकौमुदी' मध्यें फार बहारीचें केलें आहे.

पुरतो यदि सिङ्घनस्य सैन्यं यदि पृष्ठे मरुभूभुजश्च तौ च ।
न बभूव तयोरचिन्त्यशक्त्योर्मुखरागस्य विपर्ययस्तथापि ॥ ५९ ॥
पुरतः सरतो यदुप्रवीराननुगच्छन्समरे करीव मत्तः ।
व्यथितः प्रतिपार्थिवैःस पश्चात्सपदि व्यावृते नृपः सकोपः ॥६०॥
जगति ज्वलिताखिलप्रदेशः प्रचुरीभूतमलिम्लुचप्रचारः ।
स परस्परविग्रहो ग्रहाणामिव तेषामभवन्नरेश्वराणाम् ॥ ६१ ॥
अवलोक्य चुलुक्यपार्थिवौ तौ विपरीतैर्बहुभिर्नृपैः परीतौ ।
खरशीतकरावि वाम्बुवाहैर्जनतेयं मनुतेस्म दुर्दिनं तत् ॥ ६२ ॥
बलितेपि चुलुक्यपार्थिवेस्मिन्न कृतं तैर्यदुभिः पुरः प्रयाणम् ।
हरिणैरनुगम्यते न मार्गो हरिणा तत्क्षणमाश्रितोज्झितोपि ॥ ६३ ॥

कीर्तिकौमुदी स. ४.

यांतील शेवटच्या श्लोकाचा सारांश असा आहे कीं, चालुक्य-राजानें यादवांच्या सैन्याचा समाचार घेण्याचें सोडून देऊन उत्तरेकडे आपल्या सैन्याचा मोर्चा फिरविला; तरीदेखील यादवांचें सैन्य पुढें सरसावलें नाहीं व लवणप्रसादाच्या सैन्याचा त्यांनीं पाठलाग केला नाहीं. याचें कारण कीर्तिकौमुदीकार सोमेश्वर त्याच श्लोकांत काव्यमय भाषेंत देतो तें असें; "सिंह आपला मार्ग सोडून गेला तरी हरिणें भीतीमुळें त्या मार्गानें जाण्यास धजत नाहींत."

लवणप्रसादाच्या सैन्याचा पाठलाग न करितां यादवांचें सैन्य जागच्याजागीं स्थिर राहिलें, यांत कांहींतरी विशेष कारण असलेंच

पाहिजे. सोमेश्वरानें कीर्तिकौमुदींत म्हटल्याप्रमाणें, यादवांची फौज तापी नदीच्या नजीक येतांच गुजराथच्या राजाचें व त्याच्या प्रजेचें धाबें दणाणून गेलें होतें, तेव्हां लवणप्रसाद यास शत्रूंच्या सैन्यांनीं चोहींकडून घेरलेलें पाहून त्याप्रसंगाचा फायदा घेण्यास ती पुढें सरसावली नसती ही गोष्ट संभवत नाहीं ! लवणप्रसादानें सिंघणाच्या सैन्याचा पराभव करून त्यास परतविलें असतें, तर खुद्द सोमेश्वरानें त्या विजयाचा मोठ्या गौरवानें उल्लेख केला असता. परंतु जी गोष्ट मुळांतच घडली नाहीं ती आपल्या ग्रंथांत नमूद करण्याचें धाष्टर्य सोमेश्वराकडून कसें होईल ? यावरून लवणप्रसादानें सिंघणाबरोबर सलोखा करून दक्षिणेकडून आपल्यावर आलेलें संकट निदान तात्पुरतें तरी टाळलें असावें असा तर्क करण्यास जागा आहे. पण सोमेश्वरानें गुजराथच्या राजाच्या गौरवार्थ म्हणून जें काव्य लिहिलें, त्यांत, त्यास कमीपणा आणणाऱ्या प्रसंगाचें दिग्दर्शन करण्याचें मोठ्या खुबीनें टाळलें आहे; व महत्त्वाचे मुद्यावर मुग्ध राहून ऐतिहासिक सत्य कथन करण्याचेकामीं कुचराई केली आहे. वास्तविक पाहिलें असतां चोहींकडून संकटें आलीं असतां लवणप्रसादानें त्यांतल्यात्यांत बलाढ्य राजाबरोबर सलोखा करून आपणावर आलेलें मोठें विघ्न मुत्सद्देगिरीनें टाळलें याबद्दल सोमेश्वरानें त्याचें कौतुक करावयास पाहिजे होतें !

कै. सर रामकृष्णपंत भांडारकर यांस " लेखपंचाशिका " नांवाच्या मिळालेल्या संस्कृत ग्रंथांत, दानपत्रांतील, तहनाम्यांतील व इतर राजकीय व खाजगी पत्रव्यवहारांतील मजकूर कसे लिहावे याबाबतचे मसुदे दिले आहेत. म्हणजे ज्या ज्या लोकांस दानपत्रें, तहनामे इत्यादि लिहिण्याचा प्रसंग येईल त्या त्या लोकांस या

ग्रंथांतून मसुदे घेण्यास सुलभ पडावें या हेतूनें हा ग्रंथ लिहिला असावा असें दिसतें. हल्लींच्या काळांत गहाणखतें, खरेदीखतें, उलट खरेदीखतें, बेदावेपत्रें, भाडेचिठ्या वगैरे कायदेशीर कागदपत्र कसे लिहावे याबद्दलचे मसुदे एका ठिकाणीं ज्यांत संकलित केले आहेत अशी पुस्तकें सॉलिसिटर्स लोक आपल्यापाशीं बाळगितात व आपल्या अशिलास ज्याप्रकारचा दस्तैवज करून घेणें अगर देणें असेल त्याचा नमुना अशा पुस्तकांतून ते घेतात. वरील 'लेखपंचाशिका' ग्रंथ याच नमुन्याचा असला पाहिजे. सदरील ग्रंथ कोणी लिहिला त्याचें नांव उपलब्ध नाहीं. परंतु हा ग्रंथ विक्रम संवत् १२८८ मध्यें कोणी-तरी विद्वान गृहस्थानें लिहिला असावा. कारण त्यांत नमूद केलेल्या निरनिराळ्या कागद-पत्रांची मिति एकच म्हणजे विक्रम संवत् १२८८ वैशाख शु॥ १५ ही दिली आहे. एका दानपत्राचा मसुदा नीट समजला जावा म्हणून त्यांत, तत्कालीन विशिष्ट व्यक्तींची नांवें नमूद केली आहेत. ग्रंथकारानें त्या मसुद्यांत अनहिलपट्टण येथील चालुक्यकुलाची वंशावळ, **मूळराजापासून दुसऱ्या भीमा**पर्यंत दिली असून त्या दानपत्रांतील देणगी, राजा लवणप्रसादानें दिली असें म्हटलें आहे. याचप्रमाणें दोस्तीच्या तहनाम्याला " यमलपत्र " असें नांव देऊन त्याचा नमुना त्यानें दिलेला आहे. त्यांत तह करणारे पक्षकार म्हणून, सिंघण व लावण्य-प्रसाद (लवणप्रसाद) या उभयतांचीं नांवें नमुन्यादाखल दिलीं आहेत. तो नमुना असाः—" संवत् १२८८ वर्षे वैशाख शुदी (शुद्ध !) १५ सोमेद्येह श्रीमद्विजयकटके महाराजाधिराजश्रीमत्सिंहणदेवस्य महामण्ड-लेश्वरराणकश्रीलावण्यप्रसादस्य च । संराज (साम्राज्य अथवा सम्राट)

कुलश्री श्रीमत्सिंहणदेवेन महामंडलेश्वर राणश्रीलावण्यप्रसादेन पूर्वरूढ्-यात्मीय २ देशेषु रहणीयम्। केनाऽपि कस्यापि भूमि र्न आक्रमणीया," विक्रम संवत् १२८८ वैशाख शु॥ १५ या दिवशीं विजयी तळाच्या छावणींत महाराजाधिराज प्रतापी सिंहणदेव (सिंघणदेव) व महामंडलेश्वर राणक प्रतापी लावण्यप्रसाद (लवणप्रसाद) यांच्या दरम्यांत तहनामा झाला तो असा; सार्वभौम राज्य हेंच ज्याचें वडिलोपार्जित धन असा जो श्रीमान् सिंहणदेव, व राणा प्रतापी लवणप्रसाद या उभयतांनीं पूर्वापार वहिवाटीप्रमाणें आपापल्या मुलखांत रहावें. कोणीही कोणाचा मुलुख बलात्कारानें घेऊं नये.

या तहनाम्यांत आणखीही कांहीं शर्ती आहेत त्या अशा कीं:—उभयतांपैकीं एखद्यावर शत्रूनें हल्ला केल्यास दुसऱ्यानें आपलें सैन्य त्याच्या मदतीस पाठवून संयुक्त सैन्यानिशीं त्याचा प्रतिकार केला पाहिजे. तसेंच उभयतांपैकीं कोणाहि एकाच्या मुलुखांत एखादा राजा मौल्यवान वस्तु घेऊन पळून गेल्यास त्याला दुसऱ्यानें थारा देऊं नये. म्हणजे हा तह परस्परांच्या बचावाकरितां केला होता असें दिसतें. या मसुद्यांत इतरांचीं नांवें दाखल न करितां सिंहण व लवणप्रसाद यांचींच नांवें दाखल करण्यांत ग्रंथकाराचा विशिष्ट हेतु असावा यांत शंका नाहीं. कारण वरील उताऱ्यांतील 'श्रीमत् विजयकटके' (विजयी सैन्याच्या तळांत) हें पद अर्थपूर्ण असून त्यांत सिंहणास सार्वभौम राजा असें म्हटलें आहे. यावरून हा तहनामा सदरील ग्रंथरचनेपूर्वी कांहीं काळ अगोदर झाला असावा, व त्याची स्मृति त्यावेळीं ग्रंथकाराच्या मनांत ताजी असावी. याखेरीज वि. सं. १२८८ च्या

अगोदर कांहीं वर्षें गुजराथेवर सिंघणानें स्वारी केली होती, अशाबद्दल ऐतिहासिक पुरावा मिळतो.

वरील विवेचनावरून लवणप्रसाद यानें देवगिरीचा सिंहणदेव (सिंघण) याचा पराभव केला ही गोष्ट खरी नसून गुजराथच्या राजास त्याच्या पराक्रमाची जाणीव असल्यामुळें त्यानें त्याजबरोबर दोस्तीचा तहनामा केला हीच गोष्ट निर्विवाद होय. सर रामकृष्णपंत भांडारकर यांस " लेखपंचाशिका ' हा ग्रंथ सांपडला नसता तर या मोहिमेच्या निकालाचा प्रश्न वादग्रस्त राहिला असता.

' कीर्तिकौमुदीं " त, यादवराजा सिंघण याच्या गुजराथेवरील ज्या मोहिमेचें वर्णन दिलें आहे ती पहिलीच असली पाहिजे. कारण या मोहिमेच्यावेळीं सिंहणाच्या सैन्याचें अधिपत्य खोलेश्वराकडे होतें. लवणप्रसाद यानें आपला धनी अनहिलपट्टणचा राजा दुसरा भीम याचें स्वामित्व शके ११४१ त, झुगारून दिलें होतें व तो आपणांस स्वतंत्र राजा असें म्हणवून घेऊं लागला होता. सिंघणाच्या कारकीर्दीला या सुमारास सुमारें नऊ वर्षें लोटली होती. वर निर्दिष्ट केलेला तहनामा शके ११५३ च्या सुमारास झाला असावा. आंबे येथील प्रस्तुत शिलालेख शके ११६० मधील आहे. या शिलालेखांतील मजकुरावरून सिंघणाच्या गुजराथच्या मोहिमेंत खोलेश्वराचा भाऊ राम हा मारला गेला असें दिसतें. त्याचे पश्चात् त्याचा मुलगा अज्ञान असल्यामुळें त्याच्या मिळकतीचा कारभार त्याची बहिण लक्ष्मी ही पाहूं लागली. शिवाय ज्या गुजराथच्या मोहिमेंत यादवाकडील राम पडला त्यावेळीं गुजराथच्या गादीवर वीरधवलाचा मुलगा विशलदेव हा होता. अनहिल

वाडयाच्या ११ नंबरच्या ताम्रपटांत सिंघणाच्या सेना–समुद्राला ज्या वडवानलानें सुकविलें तो मीच अशा प्रकाराचे गर्वोक्तीचे उद्गार गुजराथचा राजा विशलदेव यानें काढिले आहेत. विशलदेवाचा सदरील ताम्रपट महत्त्वाचा असल्यामुळें त्यांतील कांहीं भाग पुढें दिला आहे तो येणेंप्रमाणें:––

(१) स्वस्ति श्रीमद्विक्रमकालातीत सप्तदशाधिकत्रयोदशशतिक संवत्सरे लौकिक जेष्ठमासस्य––

(२) कृष्णपक्षचतुर्थ्यां तिथौ गुरावहाहे श्रीमदणहिल्लपाटके समस्तराजावलीविराजित परमेश्वर परम––

(३) भट्टारक उमापतिवरलब्धप्रसादप्रौढप्रतापचौलुक्यकुलकमलिनीकलिकाविकाशमार्तंड सिंघण––

(४) सैन्यसमुद्रसंशोषणवडवांनल मालवाधीशमानमर्दनमदे राटकदेश कलुषराज्य वल्लींक दोच्छे [द].

(५) न कुद्दालकल्पकर्ण्णाटराजजलधितनया स्वयंवर पुरुषोत्तम भुजबल भीम अभिनव सिद्धराज अप––

(६) रार्जनेत्यादिसकलबिरुदावलीसमलंकृत महाराजाधिराज श्रीमद्विशलदेवकल्याणविजयिराज्ये––

(७) तदनुशासनानुवर्तिनि महामात्यश्रीनागडे श्रीकरणादि समस्तमुद्रा व्यापरान् परिपंथयतीत्येव––

(८) काले प्रवर्तमाने अस्थैव परमप्रभोः श्रीमहाराजस्यप्रसाद पत्तलायांवर्द्धि पथके भुज्यमानमंडल्यां––

(९) जयश्रीनिर्भरालिंगितशरीरः महामंडलेश्वरराणकश्रीसामतसिंहदेवः नगरपौरान् अन्यानपिस—

(१०) वृं [न] धिकृत्य सर्वेषांविदितं पत्रशासनं रचयति यथा॥ यन्मया महादानोदकप्रक्षालितवामेतरकरत् ।

वरील उताऱ्यांत विसलदेवानें आपणांस प्रौढप्रताप चौलुक्यकुलकमलिनी मार्तंड वगैरे बिरुदें लाऊन घेतली आहेत व मालव, मेवाड वगैरे देशांच्या राजांना आपण पादाक्रांत केलें असें गर्वोक्तीनें म्हटलें आहे.

अनहिलवाड्याच्या गादीवर विसलदेव हा शके ११५७ म्हणजे इ. स. १२३५ सालीं बसला. गुजराथच्या दुसऱ्या मोहिमेंत यादवाकडील सेनापति राम पडला ही गोष्ट निःसंशय होय, परंतु त्या युद्धाचा अखेर निकाल काय झाला याबद्दल कांहींच माहिती उपलब्ध नाहीं.

महानुभाववाङ्मयांत "विराटपाठी चरित्र" या नांवाचा एक चरित्रग्रंथ आहे त्यांतील उतारा पुढें दिला आहे. त्यावरून सिंघणानें गुजराथ प्रांतावर केलेल्या दुसऱ्या मोहिमेवर थोडा प्रकाश पडत आहे. सदरील ग्रंथ त्या मोहिमेनंतर थोड्या वर्षांनीं लिहिला गेला असल्यामुळें त्यांत ऐतिहासिकसत्य असण्याचा संभव आहे.

"शके ११०३ विरोध संवत्सरी भाद्रपदमासी शुक्रवार द्वितीयेसी पुर स्वीकरिलें. भरवस (भडोच) त्रिमल्लीदेवराजा त्यासी भङ्कऋषीचा श्राप म्हणून पुत्र नाहीं. त्याचा प्रधान विशाळदेव तो सामक ब्राह्मण. लाडदेशीच्या त्रिमल्लदेवरायें मरणसमयीं विशाळदेवासी राज्य दीधलें व पालकपुत्र निरोधिला तोहि निवर्तला.

विशाळदेवासी पुत्र नाहीं मग हरिपालदेव बहुतां नवसें जाला तो बहुता प्रकारें पुरुषार्थी जाला. तयाचा विव्हाव जाला तयासि वरुषें २२ भरलीं. तंव सिंघणरायाचें कटक गुजरावर चालिलें. जें रायेवीण प्रधान राज्य करीत असे तर ते राज्य घ्यावे म्हणोनी सिंघणें चाल केली. जगळदेव विंझदेव आणि एक असें तीन योध्ये गुजरावर पाठविले. तें ऐकून विशाळदेवें आपले सकळही वल्हाने पाठविले. सवे झुंजमल्ल प्रधान दीधला मग येरयेरादळा जुंझ जाले. सिंघणाचेनि दळे प्रधानाचे दळ भंगले मग प्रधानपुत्रे कटकेची आइती मांडिली. पूर्वेच्या दारवंठे निघून स्वारी केली हे ऐकून जाधवी मुरड घेतली. ते प्रधानपुत्रें भंगिले ठाव बैसवित वेळापुरीवेन्ही आला. मागुतें आपल्या नगरासी गेला. मग सिंघणे शिष्टाई केली मग प्रधानाची कटके बहडली ऐसा पराक्रमाचा तो प्रधान पुत्र होता."

उत्तरेकडील प्रांत जिंकण्यास व जिंकलेल्या प्रांतांचें रक्षण करण्यास सिंघणानें आपला सेनापती खोलेश्वर याची नेमणूक केली होती. त्याचप्रमाणें दक्षिणेकडील कर्नाटक वगैरे प्रांताचा कारभार पहाण्यास व त्या बाजूनें परचक्र आल्यास त्यास टक्कर देण्यासाठीं सिंघणराजानें चिक्काचा मुलगा व मल्लाचा धाकटा भाऊ **बीचण्ण** ऊर्फ बीच यास नेमिलें होतें. हा बीचण्ण खोलेश्वराइतकाच पराक्रमी असून त्यानें दक्षिणेकडील राजांस सिंघणाविरुद्ध डोकें वर उचलूं देण्यास अवकाश दिला नाहीं. दक्षिण महाराष्ट्रांतील **रट्ट** या नांवाच्या संस्थानिकास गोवें प्रांतातील **कदंम** राजास व **गुप्त** ऊर्फ गुप्त या नांवाच्या संस्थानिकास, पांडे राजास, होयसल यादवास व दक्षिणेकडील इतर मांडलिक राजांस त्यानें जेरीस आणून त्यांजवर यादवांचा अंमल

बसविला. व कावेरी नदीच्या कांठीं विजयस्तंभ उभारून त्याजवर सिंघणाच्या पराक्रमाचें वर्णन लिहिलें. याप्रमाणें नर्मदेपासून तो थेट कावेरीपर्यंत सिंघणराजानें आपल्या साम्राज्याचें विजयी निशाण फडकविलें. सिंघणाचा मुलगा जैतुगी ऊर्फ जैत्रपाल हा आपल्या बापाप्रमाणेंच पराक्रमी होता. व तो आपल्या शत्रूस केवळ काळासारखा भासत असे. तो आपले बापाच्या हयातींतच कालवश झाला असें दिसते. कारण सिंघणराजाचा अंत शके ११६० मध्यें झाला, व त्याचा नातु (म्हणजे जैतुगीचा मुलगा) कृष्ण ऊर्फ कान्हेर हा त्याचेपश्चात् गादीवर बसला. यावरून 'व्रतखंडांतील' प्रशस्ति नं.१ मध्यें सिंघणाच्या पश्चात् त्याचा मुलगा जैत्रपाल यांचें नांव अजिबात गाळलें असून त्याचे नातु कृष्ण व महादेव यांचा उल्लेख केला आहे. 'व्रतखंडांतील' राजप्रशस्ति नं. २ मध्यें सिंघणाचा मुलगा जैत्रपाल ऊर्फ जैतुगी याच्या पराक्रमाचें वर्णन दिलें आहे तें असें:–सर्व गुणांचा तो आगर असून शत्रूस तो केवळ मूर्तिमंत यमाप्रमाणें भासत होता. आपल्या सैन्यापेक्षां शत्रूचें सैन्य मोठें असलें तरी त्याजबरोबर झगडण्यास तो डगमगत नसे. आपल्या वडिलांबरोबर लढायांत हजर राहून व शत्रूंबरोबर झुंजून त्यानें मोठा पराक्रम गाजविला होता असें या वर्णनावरून दिसतें.

कृष्णदेव ऊर्फ काव्हेर (कन्हर)

हेमाद्रीच्या व्रतखंडांत सिंघणाचे मागून त्याचे नातु (मुलाचे मुलगे) गादीवर आल्याचा उल्लेख आहे. "कृष्णो महादेव इति प्रतीतौ जातौ ततः सिंहनृपस्य पौत्रौ। तयोस्तु पूर्वप्रभवः पुरस्तात्कृष्णोतिविख्यात मतिर्नृपोभूत्॥" कृष्ण या शब्दाची प्राकृत रूपांतरें

शके ११६९-८२
इ. स. १२४७-१२६०

कन्हर-कान्हेर-कन्हार, कंधार अशीं केलेलीं आढळतात, व याप्रमाणें शिलालेखांत, ताम्रपटांत व महानुभवांच्या वाङ्मयांत वरीलपैकीं कोणत्यातरी नांवानें त्यांचा उल्लेख केलेला आढळतो.

व्रतखंडांत त्याच्या पराक्रमाचें वर्णन खालीं लिहिल्याप्रमाणें केलें आहे:—

येनाकारि विशालवीसलचमूसंहारकालानले
हेलोन्मूलितमूलराजसमरे निर्वीरमुर्वीतलम् ।
येनानेकमहाफलक्रतुकृता संवर्ध्यमानोनिशं
क्षीणःकालवशात्पुनस्तरुणतां धर्मोपि संप्रापितः ॥

व्रतखंड प्रशस्ति नं. २ मध्यें त्याच्या पराक्रमाच्या वर्णनांत आणखी भर घातली आहे ती अशी.

दृप्यद्दारुणवाजिवारणरणक्षोणीषु जित्त्वा बहून्
दासीकृत्य तथापरान्विहितवानन्यानरण्यौकसः ।
इत्थं पार्थिवराजराजिविजयव्यापारपारंगत
श्चक्रे शक्रजयाय कृष्णनृपतिःस्वर्लोकयात्रागतम् ॥

गुजराथचा राजा विसल याच्या सैन्याचा त्यानें बीमोड केला व आपल्या आजाचें, गुजराथप्रांत पूर्ण काबीज करण्याचें अपुरें राहिलेलें कार्य त्यानें पुरें केलें. मदोन्मत्त हस्तिदलें व घोडदलें बरोबर घेऊन समरांगणावर आलेल्या शत्रूस नामोहरम करून त्यांना आपले दास बनविलें व कित्येक राजांना अरण्याचा आश्रय करण्यास भाग पाडिलें. पृथ्वीवरील बरींच राज्यें जिंकून तो इंद्रास जिंकण्याकरितां स्वर्गलोकावर स्वारी करण्यास गेला. ही पवाडयाच्या स्वरूपाची काव्यमय स्तुति वगळली तरी तत्कालीन शिलालेख व ताम्रपट यांत दिलेल्या

हकीकतीवरून मालव, गुजराथ व कोंकण प्रांतावर त्याचा मोठा दरारा होता असें दिसतें. चौलदेशाचें राज्य जिंकून त्याजवर त्यानें आपला अंमल बसविला. तैलंगण देशाच्या पदच्युत केलेल्या राजास त्यानें पुन्हां गादी मिळवून दिली. कृष्णदेवाच्या वेळचे ताम्रपट व शिलालेख बरेच आहेत. पैकीं चिक्कबागेवाडी, बेहट्टी, मनोली व चंडदामपुर येथील महत्वाचे असून बाकीच्यांत कन्हरदेवानें अगर त्याच्या पदरच्या मंत्र्यांनीं निरनिराळ्या देवस्थानास दानें केल्याचा मजकूर आहे.

चिक्कबागेवाडी येथील ताम्रपट

चिक्कबागेवाडी हें गांव बेळगांव जिल्ह्यांत आहे. या ताम्रपटांतील मजकूर असा आहे कीं, सिंघण देवाचे राजवटींत देवगिरीच्या यादवांच्या अंमलाखालीं दक्षिणेकडील जे प्रांत होते त्यावर बीच ऊर्फ बीचण्ण या नांवाचा प्रतिनिधि (सुभेदार) नेमण्यांत आला होता. त्यास मल्ल ऊर्फ मल्लीशेटी या नांवाचा एक वडील भाऊ होता. तो मुद्गल येथील रहिवाशी असून कुहुंडी प्रांतावरील एक अधिकारी होता. त्यानें कृष्णदेवाचे परवानगीनें निरनिराळ्या गोत्रांच्या बत्तीस ब्राह्मणांस जमिनी दान दिल्या, त्यांत अर्वाचीन काळांतील महाराष्ट्रीय ब्राह्मणांची उपनांवें आढळतात. कोंकणस्थब्राह्मणांतील पटवर्धन व धैसास, आणि देशस्थ ब्राह्मणांतील घळीसास, पाठक व तिवाड या उपनांवांचा यांत उल्लेख केलेला आहे. तिवाड या उपनांवाचे देशस्थ ब्राह्मण घाटावर व उत्तर कोंकणांतही आहेत. बिचण्णाचे

शके ११७१
इ. स. १२४९

पश्चात् त्याचा अधिकार व दर्जा त्याचा मुलगा चौंड यास प्राप्त झाला होता. त्याचें नांव एका दानपत्रांत दिलेलें आढळते ! त्यानें कृष्णदेवाची देवगिरी येथें समक्ष भेट घेऊन दानपत्रांत नमूद केलेला गांव ब्राह्मणांस दान देण्याबद्दल त्याची मंजुरी मिळविली, अशा आशयाचा त्यांत मजकूर आहे.

मनोली येथील शिलालेख.

हा शिलालेख पंचलिंगदेवाच्या मंदिरांतील एका दगडावर खोदला आहे. बेळगांव जिल्ह्यांतील सौंदत्ति गांवापासून सहा मैलावर, मलप्रभा नदी व सौंदत्ति यांचे दरम्यान पंचलिंग नांवाचें एक पवित्र स्थान आहे. शिलालेखांतील भाषा जुनी कानडी आहे. सिंघणदेवाचा सेनापति पुरुषोत्तम यानें सदरील देवस्थानास शके १११५ त कांहीं जमीनी दान दिल्याचा यांत उल्लेख आहे. सदरील दानपत्रांत कृष्णदेव हा जैतुगीचा मुलगा, सिंघणाचा नातु, व देवगिरी येथील राज्यकर्ता होता असें त्याचें वर्णन केलें आहे. त्याच्या नांवापूर्वी पुढें लिहिल्याप्रमाणें बिरुदें लाविलीं आहेतः–'भुजबल ' 'प्रौढप्रताप' व 'चक्रवर्ति,' वगैरे.

शके ११७४
इ. स १२५२

चिक्केवाडी येथील ताम्रपट.

या ताम्रपटाचे तीन तुकडे असून ते एका कडींत अडकविलेले आहेत, त्यावर हनुमानाची मुद्रा आहे. कन्हरदेवाचा मंत्री मल्लीशेटी यानें तेथील महादेवाच्या मंदिराचे सेवाचारी बत्तिस ब्राह्मण होते त्यांस सांदेय बागेवाडी येथील कांहीं जमिनी दान दिल्या होत्या ! परंतु त्या कामीं देवगिरीचे कन्हरदेव राजाची मंजुरी घेतलेली नव्हती. मल्लीशेटीच्या

शके ११७५
इ. स. १२५३

पश्चात् त्याचा मुलगा चौंडशेटी यानें देवगिरीस जाऊन त्या दानपत्रास राजाची मंजुरी मिळविली. सिंघणदेवास जैतुगी या नांवाचा एक मुलगा होता असा यांत उल्लेख आहे.

बेहट्टी येथील ताम्रपट.

हा ताम्रपट संस्कृतभाषेंत असून कायस्थ लिपींत आहे. त्यावर हनुमानाची मुद्रा आहे. या ताम्रपटावर सूर्य-चंद्र कोरलेले आहेत. गांवाचें नांव बेहट्टी असें दिलें आहे. कृष्णदेवाचा प्रधान चौंडराज यानें कोक्कनूर गांव दोन ब्राह्मणांस दान दिल्याचा यांत उल्लेख आहे. कुंतल प्रांतांत तीनशें खेड्यांचा बेलगोला या नांवाचा परगणा आहे, त्यांत या गांवाचा समावेश होतो. हा ताम्रपट कन्हेरदेवाच्या राजवटीच्या प्रारंभापासून सातव्या वर्षांतील आहे.

शके ११७५
इ. स. १२५३

कोल्हापुर येथील शिलालेख.

कोल्हापुरच्या राजवाड्यांत हा शिलालेख आहे. यादवनारायण श्रीकन्हरदेव याचे राजवटींत कमय्या नाईक हा प्रधानगिरीचे कामावर असतांना कोल्हापुर येथील जकात (Customs duty) वसूल करण्याचें काम जैतमल्ल राऊत या नांवाच्या अधिकाऱ्याकडे सोंपविण्यांत आलें होतें.

शके ११७२
इ.स. १२५०

याखेरीज कोल्हापुर शहर व त्याच्या आसपासच्या प्रांतात कन्हरदेवाच्या वेळचे कानडी भाषेंत कोरलेले बरेच शिलालेख व ताम्रपट आहेत पण ते ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे नाहींत.

कृष्णदेव ऊर्फ कन्हर हा कट्टा हिंदुधर्माभिमानी होता. त्यानें पुष्कळ यज्ञ केले, व सनातन हिंदुधर्मास कालवशात् प्राप्त झालेली ग्लानि दूर करण्याचें श्रेय त्यानें संपादिलें असें व्रतखंडांत म्हटलें आहे. वैदिक कर्ममार्गावरील लोकांची श्रद्धा कमी होत चालली असें त्याच्या नजरेस आल्यामुळें त्याजमध्यें धर्मजागृति करण्याचे बरेच प्रयत्न त्यानें केले. कन्हेरदेवाच्या राजवटींत **महानुभावपंथ** उदयोन्मुख झाला होता. या पंथास "जयकृष्णीयपंथ अथवा कृष्णसांप्रदाय असें दुसरें नांव आहे. ज्याप्रमाणें वैष्णव पंथाचें उपास्य दैवत विष्णु, व शैवपंथाचें शिव, त्याप्रमाणें महानुभावपंथाचें उपास्यदैवत **श्रीकृष्ण** होय. या पंथाबद्दलची थोडी माहिती पुढील भागांत देण्याचें योजिलें आहे. महानुभावी वाङ्मयांत कन्हरदेवाचा उल्लेख केलेला आढळतो. या पंथाचा " लीलाचरित " या नांवाचा धर्मग्रंथ आहे. महानुभाव-पंथाचा संस्थापक व " लीलाचरिताचा " कर्ता श्रीचक्रधर हा कृष्ण-देवाचा समकालिन होता असें दिसतें. श्रीचक्रधर स्वामीच्या दर्शनास देवगिरीचा यादवराजा कृष्णदेव हा आपला बन्धु महादेवराव यासह शके ११७८ सालीं मौजे लोणार जिल्हा बुलढाणा येथें गेल्याचा उल्लेख महानुभावीय मराठी वाङ्मयांत केलेला आढळतो त्याबद्दलचा उतारा पुढें दिला आहे.

" कुंडी भैरवी अवस्थान राजया दर्शन (लोणारी) सोमवती पर्वी कान्हरदेयराय दर्शना आला. समागमें महादेवराव राय धाकुटा होता. रायेनीं आसु दर्शना केलिया परी न घेता तयाची आनि घृतकेची वास पाहतां बंदीजन भणती "घेइ जोजी सिंगनाचा कान्ह प्रसन्न झाला" त्या द्रव्याचा स्वीकार न करता कमलजेचा

मंडप, कुमारेश्वरीचा घाटु आणि पोली, मग चुना सारबिला, शके ११७८ वगैरे."

पुणें येथील महानुभाव मठांतील सुप्रसिद्ध महंत गोविंदराज दयाळराज महानुभाव, संपादक "ज्ञानसिंह" यांनीं याच बाबतींत लीलाचरित्रा (पूर्वार्ध) मधून प्रस्तुत लेखकाकडे उतारा पाठविला आहे तो येणेंप्रमाणें:–"लोणार भैरवी अवस्थान दीस वीस" लोणारी धारातीर्थी वडातळी गोसावी यांस, आसन असें तेथ कान्हर देवो आला होता. सरिसा महादेवो उमरवळी तेठें असे. कमळची आले होते. तेथ गुरुवे सांगितलें. पुरुष एक भैरवी असत. तया उमरी रायास धारातीर्थी गोसावियांचे दर्शन जाले. हडपाते वाखारी मागितली तया आसुची पूजा दर्शणा केली. कान्हरदेया जवाळिली भाटे भणीतले दे ओ हो घ्या घ्या सिंगनाचा कान्ह प्रसन्न जाला. तव देवे मृतिकाकडे पाहून आसुकडे पाहिले. तव राये भणीतले सरारेसरा ऐसे काइ म्हणत असारे कान्ह तो तुम्हासी कीं यांसी कान्ह मग दृष्टीचे राखण घातले. गोसावी आसु न घेतां निघाले. जातां भणीतले. राये हो. हें द्रव्य भंडारी घाला. भंडार दुणावेल. पण रायाने घे तेणें द्रव्ये राये कुमारेश्वरी पौळी केली ॥ ४२ ॥.

महादेवराय.

कृष्णदेवाचे पश्चात् त्याचा भाऊ महादेव हा गादीवर बसला. कृष्णदेवाचा मुलगा रामचंद्रदेव हयात असतांना महादेवरायास गादी कशी प्राप्त झाली याबद्दल कोठेंच खुलासा केलेला आढळत नाहीं. कृष्णदेवाचे मरणसमयीं त्याचा मुलगा रामचंद्र हा अज्ञान

शके ११८२–११९३.
इ. स. १२६०–१२७१.

असावा म्हणून त्यास गादीवर न बसवितां महादेवानें आपणांस राज्याभिषेक करवून घेतला असला पाहिजे. कृष्णदेवाच्या मागें गादीचा खरा मालक रामचंद्रदेव हा असल्यामुळें त्यास राज्याभिषेक करवून त्याचा प्रतिनिधि (Regent) म्हणून महादेवानें तो वयांत येईपर्यंत राज्यकारभार पाहिला असता तर ती गोष्ट न्याय व रूढी यास अनुसरून झाली असती; परंतु न्यायनीतीस झुगारून देऊन महादेवानें राज्याची सूत्रें आपले हातीं घेतलीं, यांत कांहींतरी गौड-बंगाल असलें पाहिजे! 'व्रतखंडांत' या बाबतींत हेमाद्रीनें मौन स्वीकारिलें आहे. महादेवाच्या पश्चात त्याचा पुतण्या रामचंद्रदेव (कृष्णदेवाचा मुलगा) हा गादीवर बसला. त्यानें महादेवाचा मुलगा आमण याचे डोळे काढून त्याचा अमानुषपणानें वध करविला. या हकीगतविरून वरील मुद्द्यावर थोडा प्रकाश पडतो. हेमाद्रीची वंशावळ महादेवाच्या कारकीर्दीपर्यंतची आहे. परंतु रामदेवरावाच्यावेळच्या कांहीं शिला-शासनांत व तत्कालीन महानुभावीय वाङ्मयांत आमणाच्या वधाचा उल्लेख केलेला आढळतो. याबद्दलचें विस्तृत विवेचन रामदेवरावाच्या कारकीर्दीचा इतिहास देतांना केलें आहे.

"व्रतखंडांत" महादेवाच्या पराक्रमाचें वर्णन पुढील चार श्लोकांत दिलें आहे:—

तिलङ्गक्षितिपालतूलनिचयप्रक्षेपचण्डानिलो
गर्जद्गुर्जरगर्वपर्वतभिदादम्भोलिदोर्विक्रमः ।
हेलोन्मूलितकौङ्कणक्षितिपतिः कर्णाटलाटोद्भट–
क्षोणीपालविडम्बनः स हि महादेवः कथं वर्ण्यते ॥ ४८ ॥
यो भोजदेवान्नृपतेः प्रतापी जग्राह वाहं मदमन्दसत्त्वः ।
सार्धं जनन्या सह जीवितेन सोमेश्वरस्यापि जहार राज्यम् ४९

यदीयगन्धद्विपगण्डपालीनिष्ठ्यूतदानाम्बुतरङ्गिणीषु ।
सोमः समुद्रप्लवपेशलोपि ममज्ज सैन्यैः सह कुङ्कुणेशः ॥५०॥
सीमोल्लङ्घनमेव यस्य जगतां संहार इत्युच्यते
क्रुद्धे वज्रधरेपि यः क्षितिभृतं मैनाकमत्रायत ।
स्मारं स्मारमपुष्य दुःसहमहः संदोहदावानलं
तेनाम्भोनिधिनापि कुङ्कुणपतिर्नारक्षि कुक्षिस्थितः ॥ ५१ ॥

वरील श्लोकांत महादेवराजानें गुजराथ, लाट, कोंकण व कर्नाटक या प्रांतांच्या राजांस जेरीस आणून त्यांना आपले मांडलिक बनविलें असें वर्णन केलें आहे. देवगिरीच्या राजाला (महादेवास) झंझावाताची उपमा देऊन त्यानें तेलंगदेशाच्या राजास कापसाप्रमाणें उडवून दिलें व गुजराथच्या गर्विष्ठ राजाची तुलना पर्वताबरोबर करून महादेवरायरूपी वज्रानें त्याचा चुराडा केला असें काव्यमय वर्णन वरील श्लोकांत दिलें आहे. कर्नाटकाचें आधिपत्य त्यावेळीं होयसल वंशांतील यादवांकडे असावें असें दिसतें. त्यावेळचा कोंकणचा राजा शिलाहारवंशीय सोमेश्वर हा होता. त्याजबरोबर महादेव यानें निकरानें युद्ध केलें त्यांत सोमेश्वर पडला व कोंकणप्रांत महादेवाच्या अंमलाखाली आला. ऐतिहासिकप्रसंगाचे वर्णन करतांना काव्यमय भाषा वापरण्याची प्राचीन ग्रंथकारांस जणुं काय लज्जतच लागून राहिली होती. कोंकणच्या लढाईचें वर्णन करतांना त्या प्रांताचा राजा सोमेश्वर हा समुद्रांत पोहण्याच्या कामांत अत्यंत तरबेज होता, तथापि यादवराजाच्या हत्तीच्या गंडस्थलांतून स्रवणाऱ्या दानरूपी पाण्याच्या नद्यांत तो बुडून मेला असें या युद्धाचें काव्यमय वर्णन वरील श्लोकांत दिलें आहे. महादेवरायाचा भाऊ कृष्ण-

देव यानें कोंकणावर स्वारी केली होती परंतु त्यास त्याकामीं यश आलें नव्हतें. परंतु महादेवरायानें आपल्याबरोबर हत्तींचें मोठें दळ घेऊन कोंकणावर पुन्हां एकदां स्वारी केली व त्यांत सोमेश्वराचा पूर्ण पराजय करून कोंकणप्रांत आपल्या कबजांत घेतला. कोंकणप्रांत समुद्रालगत असल्यामुळें सोमेश्वराच्या पदरीं आरमार असलें पाहिजे जमीनीवरील युद्धांत पराभव झाल्यामुळें आपला बचाव करण्यासाठीं त्यानें आपल्या आरमाराचा आश्रय केला असल्यास आश्चर्य नाहीं. परंतु आरमारी युद्धांतही सोमेश्वरास यश न येतां तो आपल्या जहाजांसह समुद्रांत बुडून मेला असावा असें अनुमान काढण्यास जागा आहे. उत्तर कोंकणावर शिलाहारवंशाच्या एका शाखेचें बरींच वर्षें राज्य होतें तें देवगिरीच्या महादेवरायाच्या राजवटींत सोमेश्वरानें गमाविलें. महादेवरायानें कोंकणप्रांत हस्तगत केल्यावर तेथील कारभार पहाण्यास आपला प्रतिनिधि नेमिला होता. पंढरपूर येथील शिलालेखांच्या (परिशिष्ट नं. ९) पहिल्या रकान्यांत महादेवराय व श्रीरामचंद्रदेवराव यांचा उल्लेख केलेला असून त्यांच्या नांवापूर्वी यादवनारायण प्रौढप्रताप, चक्रवर्ति अशीं बिरूदें लाविली आहेत. महादेवरायाच्या कारकीर्दीत काश्यपगोत्री केशवनायक या नांवाचा एक ब्राह्मण सुभेदार होता, त्यानें अप्तोर्याय नांवाचा यज्ञ केला होता, अशाबद्दल पंढरपूरच्या शिलालेखांत उल्लेख केलेला आहे. कोंकण काबीज केल्यावर महादेवरायानें त्या प्रांताच्या सुभेदारीवर माध्यंदिन शाखेचा काश्यपगोत्री केशवनायक (कृष्णदेव) याची नेमणूक केली होती. असें अंण्जूरच्या शिलाशासनावरून व ओंवळे येथील ताम्रपटावरून दिसतें **चतुर्वर्गचिंतामणि** नांवाचा प्रचंड ग्रंथ हेमाद्रीनें

महादेवरायाचेच राजवटींत लिहिला, असें त्या ग्रंथांतील प्रत्येक अध्यायाच्या अखेरीस दिलेल्या कोलोफोन (समाप्तिसूचक वाक्य) मध्यें दिलेल्या मजकुरावरून स्पष्ट दिसतें.

महादेवरायाच्या वेळचे सुमारें १८ शिलालेख आहेत त्याची यादी परिशिष्ट नं. २ मध्यें दिली आहे. बहुतेक शिलालेख कर्नाटकप्रांता-संबंधीं असून कानडी भाषेंत लिहिलेले आहेत. त्यांत ऐतिहासिक माहिती म्हणण्यासारखी नाहीं.

महादेवरायानें उत्तरकोंकणचा अखेरचा शिलाहारवंशीय राजा सोमेश्वर याचा पूर्णपणें पराभव करून तो प्रांत हस्तगत केला असें "व्रतखंडांत" म्हटलें आहे; परंतु ह्या गोष्टीस स्वतंत्र पुरावा असल्याचें आढळून येत नाहीं. कुलाबा जिल्ह्यांतील अलिबाग तालुक्यांत मांडवें व थळ या नांवांची गांवें आहेत. त्यांचे दरम्यान एक शिवालय आहे. त्यांत शके ११०२ (इ. स. ११८०) सालचें एक दानपत्र शिलेवर कोरलेलें आहे. सदरील दानपत्रांत कोंकणचा चक्रवर्तिराजा श्रीअपरादित्य यानें आपले आयुरारोग्याच्या वृद्धिसाठीं श्रीवैद्यनाथदेवाच्या पंचोपचाराचे पूजेकरितां पर्वणीचा योग साधून एक जमीन दान दिल्याचा मजकूर आहे. यावरून निदान इ. स. ११८० पर्यंत शिलाहारवंशीय राजांचा उत्तर कोंकणावर अंमल होता हें उघड दिसतें. तसेंच मुंबईबेटांतील परळ येथील गव्हर्नरच्या जुन्या बंगल्याजवळ शके ११०९ चा शिलालेख सांपडला आहे, त्यांतही उत्तर कोंकणचा तत्कालिन राजा महाराजाधिराजचक्रवर्ती अपरादित्य याचा उल्लेख आहे. सदरील शिलालेखांत उत्तर कोंकणांतील 'शतशष्टि' ऊर्फ साष्टी प्रांताचा उल्लेख केला आहे. या महादेवरायाचा भाऊ कृष्ण उर्फ कान्हेर यानें आपल्या

राजवटींत उत्तरकोंकण प्रांतावर स्वारी केली होती. परंतु त्यास त्या स्वारींत यश आलें नाहीं अशी हकीगत पूर्वी येऊन गेली आहे. उत्तरकोंकणाच्या शिलाहारराजांची संपूर्ण वंशावळ हल्लीं उपलब्ध आहे त्यावरून त्या वंशांतील शेवटचा राजा सोमेश्वर होता असें दिसतें. महादेवरायानें जमिनीवरील व आरमारी युद्धांत ज्या सोमेश्वराचा पराभव करून उत्तर कोंकण काबीज केलें तोच हा सोमेश्वर असावा यांत संदेह नाहीं. उत्तर कोंकणावर शिलाहार राजाचा अंमल शके ९३९ पासून शके ११९१ पर्यंत अप्रतिहत होता व त्या अवधींत इतर देशच्या कोणत्याही राजानें उत्तरकोंकणांत आपला अंमल चालविला नाहीं असें अनुमान काढण्यास पुष्कळ जागा आहे. महादेवरायानें निरनिराळ्या देशावर अनेक मोहीमा केल्या त्याबद्दल ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं. शके ११९४ च्या पैठणच्या ताम्रपटावरून महादेवरायानें अनहिलंपट्टणच्या विसलदेवाचा सपशेल पराभव केला होता असें दिसतें.

महादेवरायाचा महानुभावपंथाच्या वाङ्मयांत उल्लेख केलेला आहे. महादेवराजाचें राजवटींत आमचा चरित्रनायक हेमाद्री यास करणाधिपाच्या हुद्यावर नेमण्यांत आलें होतें, यावरून विद्वान व कर्तृत्ववान् पुरुषाच्या गुणांचा गौरव करण्याकडे त्याचा कल होता यांत शंका नाहीं. हेमाद्रीनें सनातन हिंदुधर्माची सुसंघटना करण्यासाठीं 'चतुर्वर्ग चिंतामणि' नांवाचा प्रचंड धर्मग्रंथ रचिला त्याचें सर्व श्रेय महादेवरायाकडेच आहे. ही गोष्ट सदरील ग्रंथाच्या प्रत्येक अध्यायाचे अखेरीस हेमाद्रीनें दिलेल्या **कोलोफोन**वरून दिसतें. महादेबराय हा जसा सनातन हिंदुधर्माचा कट्टा अभिमानी होता तसाच महाराष्ट्र भाषेच्या वृध्यर्थ

तो नेहमीं झटत असे. महानुभावपंथ उर्फ कृष्णपंथ नुकताच उदयोन्मुख झाला होता व त्या पंथाचा संस्थापक श्रीचक्रधर स्वामी हा मराठी भाषेचा पुरस्कर्ता होता. त्याचे राजवटींत संस्कृत मराठी ग्रंथकारांस चांगलें उत्तेजन मिळत होतें ही गोष्ट हेमाद्री व बोपदेव ह्यांस ग्रंथरचनेच्या कामीं त्याजकडून जो आश्रय मिळाला त्यावरून उघड दिसते. कृष्णदेवाच्या पश्चात त्याचा अज्ञान मुलगा रामचंद्रदेव ह्यास गादी न मिळतां महादेवास ती कशी प्राप्त झाली ह्याचें पूर्वी विवेचन केलें आहे. आमणाच्या वधामुळें देवगिरीच्या दरबारांत दुही माजून प्रजेंत बेदिली उत्पन्न झाली व या यादवीचा अनिष्ट परिणाम यादवघराण्यांतील शेवटचा राजा रामदेवराव याजवर झाला. पेशवाईंत राघोबादादा ह्यानें आपला पुतण्या नारायणराव ह्याचा राज्यलोभानें वध केल्यामुळें जो मराठीराज्यावर अनिष्ट परिणाम झाला व तें जसें नष्ट झालें; तद्वत् रामदेवरावानें आपला चुलतभाऊ आमण ह्याचा अमानुषपणें वध केल्यामुळें यादवांच्या राज्याची घडी कायमची मोडली व देवगिरीचें राज्य इ. स. १३१८ च्या अखेरीस लयास गेलें ! !

महादेवरायाच्या वेळेच्या कांहीं शिलालेखांत व ताम्रपटांत त्याच्या वेळच्या मांडलिकांचा व मुख्य प्रधानांचा उल्लेख केलेला आढळतो. त्यांचीं माहिती ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाची आहे. शके ११८३, ११८४ आणि ११८७ मध्यें गट्टावेल्लाळ येथें गट्टराज घराण्यांतील तिसरा गट्ट हा राज्य करीत होता. तसेंच देवगिरीच्या यादवराजांच्या राज्यापैकीं दक्षिणेकडील भागावर महाप्रधान देवराज ह्याची शके ११८६ मध्यें सुभेदार म्हणून नेमणूक करण्यांत आली होती

व त्या भागावर तो अंमल करीत होता. महाप्रधान सर्वाधिकारी तौरगलेय देवरास ह्या नांवाचा महादेवरायाचा मुख्य प्रधान होता. तसेंच महाप्रधान सिंगय्या देवणनायक हा शके ११८६ मध्यें प्रधान होता. तसेंच **हंगरट्टगे** प्रांतावर गणपति देवरास ह्या नांवाच्या मांडलिकाचा शके ११८७ मध्यें अंमल होता. व शके ११९१ मध्यें महाप्रधान सर्वाधिकारी **पिप्परस** आणि शके ११९२ मध्यें महाप्रधान सर्वाधिकारी वित्तरस अशी नांवें त्याच्या प्रधानमंडळांत निर्दिष्ट केलेली आढळतात. शिवाय **हेमाद्रि** हा त्याच्या मुख्य मंत्र्यांपैकीं एक होताच. हेमाद्रीनें एका विशिष्ट पद्धतीवर महादेवाच्या राजवटींत शेंकडों हिंदु देवालयें बांधिलीं अशी हकीकत पूर्वी येऊन गेली आहे. त्या कामीं हेमाद्रीस महादेवरायाचा संपूर्ण आश्रय असल्यावांचून त्याचे हातून अशी प्रचंड कामें होणें शक्य नव्हतें.

देवगिरीच्या राजांनीं आपला अम्मल दक्षिणेकडे कर्नाटक–तैलंगण वगैरे प्रांतावर मोठ्या धडाडीनें प्रस्थापित केला होता. कृष्णदेव ऊर्फ कन्हरदेव याचें मंत्रिमंडळांत मल्लीशेट्टी, चौंडीशेट्टी, कामय्या नाईक इत्यादि कानडी गृहस्थांची नांवें प्रामुख्यानें आढळतात. त्याचप्रमाणें महादेवरायाचे पदरीं असलेल्या मत्रिमंडळांतिल मुख्य प्रधानांची जी नांवें वर दिलीं आहेत तींही कानडी आहेत. यावरून या दोनही यादवराजांचा ओढा कानडी लोकांकडे विशेष होता हें निःसंशय होय. कर्नाटक व त्याचे आसपासचे प्रदेश जिंकून घेण्याचे कामीं या दोनही राजांनीं त्या प्रांतांतील कर्तबगार लोकांना हातीं धरून आपला कार्यभाग उरकून घेतला होता व त्यांना मोठमोठ्या हुद्यावर नेमून आपलेसें करून घेतलें होते. यावरून या

दोनही राजाच्या अंगची मुत्सद्देगिरी दिसून येते. खुद्द हेमाद्री हा महाराष्ट्रीय ब्राह्मण असून कर्नाटकप्रांतांतील रहिवाशी होता, असें पूर्वी म्हटलें आहे. आंध्र, चालुक्य, शिलाहार, राष्ट्रकूट यांचीं राज्यें दक्षिणेकडे कर्नाटक व त्याच्या आसपासच्या प्रदेशांत भरभराटीस आल्यामुळें त्या प्रांतांतील लोकांस आपली कर्तबगारी लोकांच्या निदर्शनास आणण्यास अवसर मिळाला होता. महाराष्ट्रांत त्या काळीं उच्च वर्णाच्या लोकांची फारशी वस्ती नव्हती व तें राजकीय केंद्र नसल्यामुळें महाराष्ट्रियांच्याऐवजीं राजकारणांत कर्नाटकीयांचें वर्चस्व होते ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. शिलाहारराजांची मुख्य शाखा कोल्हापूर, व कऱ्हाडच्या आसपास असल्यामुळें उत्तरकोंकणांतील शिलाहाराचे दरबारांत तेलंगी अथवा कर्नाटकीयांचें वर्चस्व असणें साहजिक होतें. निरनिराळ्या शिलाशासनांत व दानपत्रांत जीं ब्राह्मणांचीं नांवें आढळतात, त्यांच्या नांवापुढें "अय्या" "अपय्या" अशी बहुमानार्थी उपपदें जोडलेलीं आढळतात. उत्तरकोंकणांतील ठाणेनजीकच्या ओंवळे व अंजूर येथील दानपत्रांत ब्राह्मणांचीं जीं नांवें दिलेलीं आहेत त्यावरून वरील म्हणण्यास दुजोरा मिळतो. कर्नाटकप्रांताचा तत्कालीन राजकीय इतिहास त्या प्रांतांतील लोकांस फार भूषणावह आहे. अनुकूलपरिस्थितींत कर्नाटकीय लोक आपल्या अंगची कर्तबगारी व मर्दुमकी दाखविण्याचेकामीं महाराष्ट्रीयांस अथवा इतरांस हार जाणार नाहींत यांत संशय नाहीं. दक्षिणेकडील कल्याणचे चालुक्यराजे व कोल्हापूरचे शिलाहार राजे यांचे दरबारांत व विजयानगरचे राज्यांत तैलंगी लोकांबरोबर कानडी लोक जबाबदारीच्या जागेवर नेमले जात असत. विजयानगरचे राज्य भरभराटीस आणणेंचे कामी कर्नाटकप्रांतां-

तील लोक अग्रेसर होते ही गोष्ट त्या राज्याच्या इतिहासावरून स्पष्ट दिसते.

रामदेवराव ऊर्फ रामचंद्रदेव.

रामदेव ऊर्फ रामदेवराव हा देवगिरीच्या यादव राजघराण्यापैकीं अखेरचा राजपुरुष होय. त्याच्या मृत्युबरोबर दक्षिणेंतील हिंदूचें स्वतंत्र राज्य नष्ट झालें. शके १०२७ त महंमद गझनवीनें सोमनाथावर स्वारी करून तेथील देवालयाचा विध्वंस केल्यापासून हिंदुस्थानावर मुसलमानांचा कटाक्ष होता. रामदेवरावाची कारकीर्द सुरू होण्यापूर्वी सुमारें शें-सव्वाशें वर्षें मुसलमानांचा अंमल उत्तर-हिंदुस्थानांत भक्कम पायावर प्रस्थापित झाला होता. तथापि मुसलमानांचें दक्षिणेकडे अद्याप लक्ष वेधलें नव्हतें. रामदेवरावाच्यावेळीं दिल्ली येथें खिलजी घराण्याचा अंमल होता. दिल्लीच्या तक्तावर असलेल्या बादशहाचा पुतण्या अल्लाउद्दिन खिलजी हा करी येथें सुभेदारीचे हुद्यावर होता, तो फार धाडसी व साहसी वृत्तीचा पुरुष होता. त्यानें दख्खनवर स्वारी करून तो प्रांत दिल्लीच्या बादशहाच्या अंमलाखालीं आणण्याचा जणुकाय विडा उचलिला होता.

शके ११९३–१२३१
इ. स. १२७१–१३०९

महादेवाच्या पश्चात् त्याचा सिधा वारस त्याचा मुलगा आमण हा होता. परंतु रामदेवरावानें आपल्या मार्गांतील कांटा काढून टाकून आपण गादी कशी मिळविली याबद्दलचा वृत्तांत पूर्वी दिला आहे. शके ११९३ च्या पैठण येथील ताम्रपटांत व नाशिक येथील जैनांच्या वस्तीसंबंधींच्या शके ११९१ च्या दानपत्रांत मात्र सदरील आमणाचा उल्लेख आहे. बाकीच्या वंशावळींत

त्याच्या नांवाचा मागमूसही नाहीं. "व्रतखंड" हा ग्रंथ महादेवराजाच्या, कारकीर्दित पुरा झाला असल्यामुळें त्यांत दिलेल्या राजप्रशस्तींतील हकीगत त्या राजापर्यंतचीच आहे. महानुभावपंथाचा उदय शके १३००शेंच्या अखेरीस देवगिरीच्या आसपासच्या मुलुखांत झाला होता. तत्कालीन महानुभावीय ग्रंथांत रामदेवरावानें आमणाचा क्रूरपणें वध करून देवगिरीची गादी अन्यायानें बळकाविली असा उल्लेख केलेला आढळतो. महानुभावपंथाचा मुख्य धर्मग्रंथ "लीलाचरित" या नांवाचा आहे त्यांतील 'लीला संख्या ७२५' यांत दिलेल्या मजकुरावरून या प्रसंगावर चांगला प्रकाश पडतो. तो मजकूर येणेंप्रमाणेंः—

सविता नागनाथी वस्ती ॥ इंद्रभट राज्यांत शोधवणें प्रवेषू ॥
मग सर्वज्ञांस उदेयांचा । पूजावसरू जालेयां अनंतरें : ॥
तैसेंचि विलिचेया पाहारा । संवीतयांसी निगालें ॥
महादेव पाटक गांवा गेले । गोसावीः संवितेयाः बीजे केलें ॥
तेथ गावां पश्चिमें नैरुत्य । आश्राहत वीस्तीर्णः पूर्वामुख
नागनाथाची जगतीः । मंडपा तीन दारवठें ।
पूर्वीला दारवठां जगती आंतु साजेंः । मंडपासि भवंतीआं पवळी ॥
तेथचौकीः आसनः तंवं बाइसींः इंद्रभट्टातें तेल आणु पाठविलेंः
मग सर्वज्ञें माघौतें बाहीरि बीजें केलेंः
जगतीचेया दारवठाची । उत्तरीली सोंडीएवरीः बाहिरि आसनः
तथा उभे असोति ॥ छ ॥

तंवं इंद्रभट्ट तैलु घेवौनि आलेः सर्वज्ञे भणीतिलें 'इंद्रे ७० गावांतु वार्ता काइ भातु': 'जी कांहीं नाहीं जी' सर्वज्ञें भणीतलें 'वार्ता कैसी यां कांहीं नाहीं? राज्यांतरू जालेंः रामदेवो रावो राज्यीं

बैसलाः आमणदेवो खाली उतरीलाः देवगीरि पालटीली ॥ तथा हा नव्हे लोकु पळतु असें ॥ हा होएः जा वार्त्ता शोधाः तुमचे ए गावीं सोइरे असतिः आनवार्ता कैसी नाहीं ॥ कैसें कांही नाहींः एसणें राज्यांतर जालेंः **आमणदेयाचे डोळे काढीलेंः रामदेवो राजीं बैसलाः** ए नव्हें कींः घायालें जातें असेंति, भणौनि सर्वज्ञें तया खाटारें श्रीकरें दाखविलेंः सर्वज्ञे भणितलेंः 'एक वेळ शोधा पां जा': ॥छा॥

हो कां जी भणौनि इंद्रभट मागुते गेलेः शोधिलेः एवोनि सर्वज्ञांपुढें सांगीतलेंः 'साच जीः हें काई हो अपूर्व': तेही भणितलेः हाति सेहाणी मारिलाः पाट्सेहाणी भेदिला नरसिंह देॐपळालाः **आमणदेआचे डोळे काढिलेः रामदेऊ राॐराजी बैसलाः** ऐसे शोधौनु आलेः सर्वज्ञा पुढारां सविवरू सांघितलेंः तंव लोकु घरां वेंधौनि पाहात असेंः मग गोसावी देउळां तु बीजें केलें ॥

लीलाचरित्रकार हा देवगिरीच्या रामदेवराव यादव याचा समकालिन असल्यामुळें वरील उताऱ्यांत दिलेल्या मजकुरांत सत्यांश असलाच पाहिजे.

श्रीपरशुराम व्यासानें १३ व्या शकांत श्रीनागदेवाचें चरित्र लिहिलें आहे त्यांत रामदेवरायानें भ्रातृहत्या केल्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे तो येणेंप्रमाणेंः—

रामदेवरावो म्लेच्छबंधनीं राणिये विडंबना श्रवणें भविष्ये बंधमुक्तानुवादु ॥ दिल्लीचेया सुलतानांचीं कटकें आलीं: तेणें रामदेवरावो धरिलाः देवगिरीचे राणिया विटंबैलियाः ऐसेंः भटोवासीः निलंगेया आइकौनी भविष्य केलेंः आन भणितलेंः रामदेवरावो म्लेंच्छीं धरिला

लीला १७ वी.

परि सुटैलः तंव एकी भणितलें तो कांइसेनी सुटैलः तवं भटोबासी भणितलेः नामीजंव पर्गतवर्ते तंव महाराष्ट्रीं जाधवराज्य वर्तले तेचि केविः ॥ यस्मिन्देशे वसेत्ज्ञानी योगीवाधामचेतसः ॥ तन्मंडलं पवित्रं च सर्वोपल्ववर्जितम्॥ ऐसा भटोबासी श्लोक भाणौनि भणितलेः ते मा धरिलेना परितेणें **भ्रातृहत्या** आनसंतामहंतांचे या वोखटेया इतरांचेनि सांगातधर्मे राज्यनीति विध्वंसोनिया प्रवर्तला म्हणौनिचि धरिलाः हें जालें हातवणीः आझुई जेवण तें पुढें उरलेंचि असेः

महानुभावपंथाच्या वाङ्मयांत "भानुविलास" नांवाचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ आहे. त्यांत शिशुपालवध या काव्याचा कर्ता भास्कर कविश्वर ऊर्फ भानुभट्ट बोरीकर यांच्या ग्रंथांतील जो उतारा दिला आहे तो फार महत्त्वाचा आहे. त्यांत देधगिरीच्या यादवराजांचा कन्हरदेवापासून रामदेवरावापर्यंत त्रोटक वृत्तांत दिला असून रामदेवरावानें आपला पुतण्या आमण याचे डोळे काढून ठार केल्याचा उल्लेख आहे तो असाः—

सिंहणराये देवगिरी । तेयाचा कन्हरु अवधारी
तेआंपाठी राज्याधरी । महादेवराव बैसिला ॥
तयापाठी आमदये । राजी बैसला गताम्वये
तेया न मनीं रामरायें । ओखटेआं प्रवर्तिला ॥
हाति सेनिका वधिले । पाट सेनिका मर्दिले
आमदयाचे नेत्र काढिले । रामु राजी बैसिला ॥
रामाराया पासुनी । जमा आले पुत्र तीनी
वडील शंकरु प्रतापाग्नी । युद्धपटु ॥
तयाधारा बल्लाळ भुपू । जेयांत्रा वाणो नेणिजे प्रतापु
जेयांची दिठी नसहाती रिपु । समरांगणी

तयाधारा बिंबदेवो । जेणे वैरियाचा फेडला ठावो ।
जेया नरुचे हावभावो । कामिकांचा ॥
शंकरु आपणा रावो भणवी । ते बल्लाळ नरुचे जीवी ॥
असंसितु घातु पर प्रसवी । पाडन वचे ॥
जाणोनि दंदसंधु । दोघा केला विभागु ।
तेणें फिटला दुःखरोगु । यादवांचा ॥
भल्लाळा त्रिलिंगावरी । रक्षण ठेविलें सैंहाद्री ।
शंकरा राहविले देवगिरी । आपणाजवळी ॥
बिंबा गुजरातेवरी । गडे केले देशाउरी
स्वर्ग घायें जीणिले अरी । भूमंडळी ॥
ऐसा तो बल्लाळ भूपती । राणीव करीताये पर्वती ।
तेणेसी साधिली प्रीती । विनायक दीक्षितें ॥

वरील विस्तारपूर्वक दिलेल्या उताऱ्यावरून रामदेवरावाचे चरित्रावर चांगला प्रकाश पडतो. याच्या उलट श्री ज्ञानेश्वरमहाराजानें ज्ञानेश्वरीच्या अखेरीस रामदेवरावाबद्दल जी प्रसंशा केली आहे तीही येथें देणें जरूर आहे.

ऐसें युगीं परि कळीं । आणि महाराष्ट्रमंडळीं
श्री गोदावरीच्या कूळीं । दक्षिणलिंगी ॥ १ ॥
त्रिभुवनैकपवित्र । अनादि पंचक्रोश क्षेत्र ।
जेथ जगाचें जीवनसूत्र । श्रीमहालया असे ॥ २ ॥
तेथ यदुवंशविलास । जो सकलकलानिवास
न्यायाते पोषी क्षितीशु । श्रीरामचंद्र ॥ ३ ॥
तेइ महेशान्वयसंभूतें । श्रीनिवृत्तिनाथसुतें ।
केलें ज्ञानदेवें गीते । देशीकार लेणें ॥ ४ ॥

शके ११९३ च्या पैठणच्या ताम्रपटांत देवगिरीच्या यादव राजांचीं जी वंशावळ (परिशिष्ट नं. ९) मध्यें दिली आहे, तींत रामचंद्रानें महादेवाचा मुलगा आमण ह्याजकडून राज्य बळकावून घेतलें असें मोघम म्हटलें आहे. त्यावरून व महानुभावीय ग्रंथांतील दिलेल्या उताऱ्यावरून रामदेवानें आमणाचा वध केला ही गोष्ट निःसंशय होय. कै. राजवाडे यांनीं रामचंद्रदेवराजावर एका ग्रंथाच्या आधारें ब्रह्महत्त्येचें पाप लादलें आहे. या गोष्टीस जरी कांहीं आधार नसला तरी भ्रातृहत्त्येच्या अघोर पातकापासून रामदेवरावाची सुटका होणें अशक्य आहे. रामदेवरावाचा चुलता महादेवराय यानें अन्यायानें गादी बळकाविली म्हणून त्याच्या मुलास देहांत प्रायश्चित्त देणें केव्हांही न्यायाचें होणार नाहीं.

रामदेवराव जर इतका दुष्ट व दुरात्मा होता तर त्यास श्रीज्ञानेश्वर महाराजानीं न्यायी कसें म्हटलें हा प्रश्न उद्भवतो. श्रीज्ञानेश्वरमहाराज हे कोणाचीही अवास्तव स्तुति करणाऱ्यापैकीं नव्हते. तसेंच श्रीज्ञानेश्वरमहाराजासारख्या निरपेक्ष वृत्तीच्या संताला रामदेवरावाकडून कांहीं मिळवावयाचे नव्हते. कांहीं झाले तरी रामदेवरावानें आपला चुलतभाऊ आमण यास ठार मारल्याचा जो तत्कालीन वाङ्मयांत पुरावा सांपडतो त्याजकडे दुर्लक्ष करतां येत नाहीं. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वसतिस्थान देवगिरीपासून फार लांब नव्हतें, तेव्हां रामदेवरावाच्या अघोर कर्माची वार्ता त्यांच्या कानावर गेली नसेल ही गोष्ट संभवत नाहीं! या मुद्याचा विचार करतांना, श्रीज्ञानेश्वर महाराजांचा जन्म आमणाचे वधानंतर झाला होता, ही गोष्ट विसरतां कामा नये! ज्ञानेश्वरीच्या अखेरीस देवगिरीचा यादवराजा रामदेवराय याच्याबद्दल

दिलेला मजकूर प्रक्षिप्त आहे असें कांहीं विद्वानांचें मत आहे. वरील विवेचनावरून सदरील मत केवळ टाकाउ आहे असें म्हणतां येणार नाहीं. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं रामदेवरावासंबंधानें दिलेलें मत कदाचित् ग्राह्य आहे असें धरून चाललें तरी या वादग्रस्त मुद्याचा दुसऱ्या बाजूनें विचार करता येण्यासारखा आहे. कालिदासानें आपल्या कुमारसंभवांत हिमालयाचें वर्णन करतांनां " एकोहि दोषो गुणसन्निपाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः । असें म्हटलें आहे. या न्यायानें रामदेवरावाच्या एकंदर गुणराशींपुढें आमणाच्या वधाच्या गोष्टीचा श्रीज्ञानेश्वरमहाराजासारख्या धर्मराजास विसर पडणें शक्य आहे रामदेवराव हा संस्कृत व मराठी वाङ्मयाच्या अभिवृद्धिकरतां फार झटत असे व त्याच्या दरबारांत विद्वान लोकांचा फार गौरव होत असे यामुळें त्याची कीर्ति दूरवर पसरली होती. शिवाय त्यानें कर्नाटकांतील व उत्तरकोंकणांतील ब्राह्मणांसं जमिनी व गांवें दान दिल्यामुळें त्याची कारकीर्द लोकांस प्रिय झाली असली पाहिजे. या व इतर कारणामुळें घरगुती भांडणाकडे तत्कालीन लोकांनीं कानाडोळा केला असल्यास नकळे !!

रामदेवरावास शंकर नांवाचा एक मुलगा व एक मुलगी अशीं दोन अपत्यें होती असें सर रामकृष्णपंत भांडारकर यांच्या दक्खनच्या इतिहासांत देवगिरीच्या यादवांची जी वंशावळ दिली आहे त्या वरून दिसते. परंतु प्रस्तुत भागाच्या अखेर दिलेल्या नं. च्या वंशावळींत रामदेवराव यास भीम (बिंब) या नांवाचा आणखी एक मुलगा होता असें म्हटलें आहे. अलाउद्दीन खिलजीनें आपल्या मुलाकरितां करणवाघेल्याकडे त्याच्या कमलदेवी नांवाच्या मुलीला मागणी

केली होती त्याबद्दलची फेरिस्तानें आपल्या पुस्तकांत जी हकीकत दिली आहे त्यावरूनही रामदेवरावाला भीम अथवा बिंब–या नांवाचा मुलगा होता ही गोष्ट दिसून येईल. ती हकीकत अशी:–अल्लाउद्दिनानें गुजराथचा राजा करणवाघेला याची सुंदर स्त्री दिवाळदेवी हिला बलात्कारानें आपल्या ताब्यांत घेऊन तिला बेगमच्या पदवीस चढविलें. दिवाळदेवीला करणवाघेल्यापासून कमलदेवी नांवाची एक सुंदर कन्या झाली होती. तिला दिल्लीस आणण्याबद्दल दिवाळदेवीनें अल्लाउद्दिनाचे मागें नेट लावला. त्यामुळें अल्लाउद्दीनानें तिला हस्तगत करण्यासाठीं आपल्या सरदाराबरोबर बरेंच सैन्य पाठविलें. ही बातमी करणवाघेल्यास समजतांच तिच्या बचावाची तजवीज त्यानें आरंभिली. देवगिरीच्या रामदेवरावानें आपला युवराज शंकरदेव याजकरितां कमलदेवीची मागणी करणवाघेल्याकडे पूर्वी केली होती, परंतु आपण क्षत्रिय कुलांतील असून यादवांचें घराणें कमी दर्जाचें आहे, या सबबीवर कमलदेवीबद्दलची रामदेवरावानें केलेली मागणी त्यानें नाकारली होती. परंतु अल्लाउद्दिनानें आपल्या मुलासाठीं कमलदेवीची मागणी घातली हें करणवाघेल्यास समजतांच त्याच्या अंगाचा तिळपापड झाला. रजपूत घरण्यांतील मुलगी मुसलमानाकडे देण्यापेक्षां ती कमी दर्जाच्या हिंदु युवराजास देणें बरें, असा पोक्त विचार करून करणवाघेल्यानें आपली मुलगी **कमलदेवी**, शंकरदेवास देण्याचें ठरविलें, व तिला शंकरदेवाचा भाऊ भीमदेव याजबरोबर देवगिरीस पाठवून दिलें. आपणांस कोणी ओळखू नये म्हणून कमलदेवीनें पुरुषवेष धारण केला होता. कमलदेवीस बरोबर घेऊन भीमदेव देवगिरी जवळ येत नाहीं तोंच अल्लाउद्दिनाकडील सैन्याच्या तुकडीनें त्यांस

गांठलें व त्या उभयतांची चकमक उडाली त्यांत कमलदेवी मुसलमानाच्या तावडींत सांपडली व भीमदेवास आपला जीव बचावण्याकरितां पळ काढावा लागला !!

पेशव्यांकडून साष्टीप्रांत इंग्रजाकडे साल्वाईच्या तहानंतर आल्यावर, त्या प्रांतांतील जमीनींची पहाणी करून त्यांतील बऱ्याच जमिनी लागवडीस आणण्यासाठीं कंपनी सरकारानें कांहीं शर्तींवर सुखवस्तु लोकांस इनाम करून दिल्या. इ. स. १८०८ सालीं ईस्ट इंडिया कंपनीनें या प्रांताच्या जमीनमहसुलासंबंधानें रेग्युलेशन नं. १ चा कायदा प्रसिद्ध केला. त्यांत पोर्चुगीज अंमलाखालीं साष्टीप्रांत असल्यावेळीं तेथील जमीनमहसुलाच्या पद्धतीची हकीकत देतांना पुढें दिलेलें विधान केलें आहे:—

The fiscal policy under Raja **Bimb** was far superior to that of the Portuguese as will be found from records.

"बिंबराजाचे राजाचे राजवटींत साष्टीप्रांतांत त्यानें जमीनमहसुलाची जी पद्धत सुरू केली होती ती, तो प्रांत पोर्चुगीज लोकांच्या अंमलाखालीं असल्यावेळच्या पद्धतिपेक्षां पुष्कळ पटींनें श्रेष्ठ होती, असें जुन्या दप्तरावरून दिसतें." यांत ज्या दफ्तराचा (Record) उल्लेख केला आहे ते मिळविण्याबद्दल प्रस्तुत लेखकानें बराच प्रयत्न केला पण त्यास यश आलें नाहीं. संशोधकांनीं या बाबतींत नेटानें प्रयत्न केल्यास हें दफ्तर कदाचित् हातीं येण्याचा संभव आहे. अल्लाउद्दिनानें देवगिरीस शह देऊन रामदेवरावाचा पराभव केल्यानंतर देवगिरीचें यादवांचें साम्राज्य डळमळीत झालें. शंकरदेवानें

अल्लाउद्दिनास हांकून लावण्याचा मोठ्या नेटानें प्रयत्न केला परंतु दैव प्रतिकूल असल्यामुळें व अल्लाउद्दिनाच्या गनिमी काव्यापुढें त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाले. या धामधुमींत भीमदेवानें पैठणाहून कांहीं निवडक मंडळीसह उत्तर कोंकणचा रस्ता धरला. हा प्रांत महादेवरायानें शिलाहारवंशीय सोमेश्वरराजाकडून जिंकून घेतला होता, व त्यावर अंमल करण्याकरितां आपलें प्रतिनिधी नेमिले होते. शिवाय हा प्रांत सह्याद्रिपर्वताच्या पलीकडे समुद्रकिनाऱ्यालगत एका बाजूस असल्यामुळें सुरक्षितपणाच्या दृष्टीनें फार सोयीचा होता.

रामदेवरावास शंकरदेवाखेरीज भीम व बल्लाळ असे आणखी दोन मुलगे होते असा महानुभावीय ग्रंथांत उल्लेख सांपडतो. रामदेवरावानें आपल्या तीनही मुलांस निरनिराळ्या प्रांतावर देखरेख करण्याचे कामावर नेमिलें होते असें सदरील ग्रंथावरून समजतें. शंकरदेव हा युवराज असल्यामुळें त्यास रामदेवरावानें आपलेजवळ ठेवून घेतलें होतें. बल्लाळ याची नेमणूक त्रिंलिंग प्रांतावर केली होती व भीमदेवास गुजराथच्या सुभेदारीचे काम दिलें होतें.

बल्लाळ याचा उल्लेख महानुभावीय ग्रंथाखेरीज दुसरे कोठेंही आढळून येत नाहीं. परिशिष्टांत दिलेल्या निरनिराळ्या शिलालेखांच्या आधारें या भागाच्या अखेरीस ज्या वंशावळी दिल्या आहेत त्यावरून व वर दिलेल्या हकीकतीवरून रामदेवराव यास भीम ऊर्फ बिंब या नांवाचा मुलगा होता व त्यानें अल्लाउद्दिनाच्या देवगिरीवरील स्वारीनंतर उत्तरकोंकण हें आपलें कायमचें राहण्याचें स्थान केलें ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते.

"देवगिरीचे रामदेवराव यादव यास बिंब अथवा भीम या नांवाचा मुलगा नव्हता व त्यानें उत्तर कोंकणांत येऊन तेथील राज्यकारभार केव्हांहीं केला नाहीं" अशी विधानें कांहीं पंडितमन्य व बेजबाबदार लेखकानीं कित्येक ग्रंथांत केल्याचें आढळून येतें परंतु ती अगदीं निराधार असल्याचे वरील विवेचनावरून स्पष्ट दिसून येतें.

हेमाद्रीनें बोपदेवाच्या "मुक्ताफल" ग्रंथावर कैवल्यदीपिका नांवाची टीका लिहीली आहे. तिच्या उपसंहाराचा कोलोफोन (अध्याय समाप्तिसूचक वाक्य) आहे तो असाः—

"इति श्रीमत्-प्रौढप्रतापचक्रवर्तिमहाराजाधिराजसोमयदुवंशोद्भवरामराज-मन्त्रिवर्यहेमाद्रिविरचितामुक्ताफलटीका समाप्ता"

यावरून ही टीका लिहिली गेली तोपर्यंत तरी हेमाद्रि हा रामदेवरावाच्या राजवटीत मुख्य 'मंत्रिपदावर होता असें दिसते. तसेंच "मुक्ताफल" ग्रंथाच्या अखेरीस **ग्रंथोप**संहार म्हणून हेमाद्रिसंबंधीं श्रीबोपदेवानें एक प्रशंसापर लेख लिहिला आहे. त्यांत हेमाद्रि या शब्दाचा श्लेष साधून देवगिरीच्या रामदेवरावराजाची **दाशरथी रामाबरोबर** तुलना केली आहे, याबद्दलचें विवेचन दुसऱ्या भागांत विस्तृतपणें दिलें आहे.

शके ११९५–९८ च्या पंढरपुर येथील शिलालेखांत तेथील श्रीविट्ठलमंदिर बांधण्यास ज्या दानशूर गृहस्थांनीं देणग्या दिल्या त्यांची लांबलचक यादी आठ रकान्यांत दिली आहे. त्यांतील पहिल्या रकान्यांत हेमाडपंत व देवगिरीचे चक्रवर्ति श्रीरामचंद्रदेव यांची नांवें नमूद केली आहेत. यावरून रामदेवरावाच्या

कारकीर्दीच्या निदान आरंभीं तरी हेमाद्री हा त्याचा मंत्रि होता ही गोष्ट निर्विवाद होते.

रामदेवरावाच्या कारकीर्दीतील शिलालेखांची व ताम्रपटांची सिस्त्या जवळजवळ तेवीस आहे. त्याची यादी परिशिष्ट नं. २ मध्यें दिली आहे. त्यांपैकीं महत्त्वाचे ताम्रपट व शिलालेख यांची त्रोटक माहिती पुढें देण्यांत येत आहे.

दावणगोरे येथील शिलालेख.

हा शिलालेख कानडी भाषेंत आहे. या शिलालेखावरून रामदेवराव याचे कारकीर्दीत देवगिरी येथील यादवराजांचा अंमल म्हैसूर प्रांतावर होता हें सिद्ध होतें.

शके ११९३.
इ. स. १२७१.

पैठण येथील ताम्रपट.

सदरील ताम्रपटाचे तीन तुकडे असून ते फार भरींव आहेत. त्यांचें वजन २३०० शें तोळे असून त्यांना जोडणाऱ्या वर्तुळाकार कडींचें वजन ४५० तोळे आहे. ताम्रपटांची भाषा संस्कृत असून तो देवनागरी लिपींत कोरलेला आहे. कडीवर यादवराजाची राजमुद्रा-गरूड-आहे. या ताम्रपटांतील देवगिरीचे यादवांची वंशावळ या भागाच्या अखेरीस नं. ९ मध्यें दिली आहे. मल्लुगीचा बाप सिंहराज याजपासून या ताम्रपटांतील ऐतिहासिक वंशावळीस आरंभ होतो. या सिंहराजानें कर्नाटकाच्या राजास जिंकिलें. पांड्यदेशाच्या राजास शिक्षा केला, व गुर्जर देशाच्या राजास हुसकाऊन लाविलें. पांचव्या विक्रमाचा मुलगा जैत्रपाल ऊर्फ जैतुगी यानें त्रिकलींगदेशच्या राजास ठार

शके ११९३.
इ. स. १२७१.

मारलें, व चोल देशच्या पदच्युत केलेल्या गणपति नांवाच्या राजास त्याची गादी पुन्हां मिळवून दिली. या जैतुगीचा मुलगा सिंघण (कृष्ण उर्फ कन्हरदेवाचा बाप) याच्या पराक्रमाचे विस्तृत वर्णन या ताम्रपटांत केलें आहे तें असें:—

हम्मीरास (एक मुसलमान सरदार ?) १ सिंघणानें चांगलेच पाणी पाजिलें (त्याला आपल्या पराक्रमानें चीत केलें) २ बल्लाळास (एक होयसळ यादवराजा) जिंकिलें. ३ आंध्रराजा ४ कक्कल व भंबागिरीचे राजे यास त्यानें पदच्युत केलें. कृष्णदेवानें गुर्जर राजाचा पराभव केला.

महादेवरायानें अन्हिलपट्टण येथील चालुक्यवंशांतील वाघेला शाखेच्या विशाळदेव नांवाच्या राजाचा पराभव केला. महादेवाचा मुलगा आमण याजपासून रामदेवरावानें राज्य हिरावून घेतलें. या ताम्रपटांत रामदेवरावानें पैठण नजीकच्या वाडाथान गांवचा, २७ ब्राह्मणांना शके ११९३ प्रजापति संवत्सर माघ शु॥ १२ बुधवारी अग्रहार केला. या गांवाबरोबर आणखीही दोन गावें दान करण्यांत आलीं. त्यांची नांवें (१) पाठारपिंपळगांव व (२) वैद्यघोगरगांव.

ज्या ब्राह्मणांस सदरील गांव दान देण्यांत आले होते त्यांची गोत्रें येणेंप्रमाणें:—१ वसिष्ठ २ मुद्गल ३ विष्णुवृद्ध ४ भारद्वाज ५ कौंडिण्य ६ विश्वामित्र ७ हारित ८ गर्ग ९ गार्ग्य १० जामदग्न्य ११ वत्स १२ कनिष्क १३ वाध्रियस १४ आत्रेय १५ गौतम १६ काश्यप १७ देवरात.

या ताम्रपटांत गोदावरी नदीच्या कांठावरील, पैठण नजीकच्या कांहीं गांवांची नावें दिलीं आहेत तीं येणें प्रमाणें:—१ वादागांव

२ नेऊर ३ देवगांव ४ खारीगांव ५ अलुगांव ६ वागंथान ७ जाणतेगांव ८ पाणिल ९ वडखल. यांतील वरीच गांवें अद्याप विद्यमान आहेत.

दान दिलेल्या गांवासंबंधीं कांहीं शर्ती दानपत्रांत नमूद केल्या आहेत. त्या सामाजिकदृष्ट्या फार महत्त्वाच्या आहेत म्हणून त्या येथें देतों––१ जुगार खेळण्याची मनाई; २ विश्वयोषितांस गावांत राहाण्याची मनाई; ३ शस्त्रें वापरण्याची मनाई; ४ सदरील गावांत राजाचे नोकर येऊन राहिल्यास त्यास कराची माफी. यावरून दान दिलेल्या गावांत पवित्र वातावरण राखण्याबद्दल दान देणारे तत्कालिन राजे किती दक्ष असत याबद्दलची कल्पना करतां येते.

पैठणचा ताम्रपट म्हणजे देवगिरीच्या यादवराजांच्या आयुष्यक्रमांतील घडलेल्या गोष्टींची सर्वसाधारण सूचि होय. या ताम्रपटांत देवगिरीच्या यादवराजांची त्रोटक माहिती देण्यांत कांहीं विशिष्ट हेतु असावा असें दिसतें. निरनिराळ्या राजांनीं केलेल्या पराक्रमांची सूत्ररूपानें माहिती दिली असल्यामुळें दरएक बाबतीसंबंधानें संपूर्ण माहिती मिळविण्याबद्दलची अपेक्षा करणाऱ्यांची निराशा होते.

ठाणें नजीकच्या ओवळें गांवचा ताम्रपट

हा ताम्रपट संस्कृत भाषेंत असून गद्य-पद्यात्मक आहे. लिपी देवनागरी आहे. ओवळें येथील थडगें उकरीत असतां एका मुसलमानास हा ताम्रपट सांपडला. त्यांत दिलेल्या वंशावळीची सुरवात यादवराजांच्या पांचव्या भिल्लमापासून होते. ती या भागाच्या अखेरीस नं. ९ मध्यें दिली आहे. होयसळ यादवांच्या राजाबरोबर लढतांना पराभूत झाल्यामुळें कर्नाटकांतील कांहीं प्रांत ज्या भिल्लमास गमावून

शके ११२४
इ.स. १२०२

बसावें लागलें, व देवगिरी येथें स्वतंत्र राज्याची स्थापना करणें भाग पडलें तोच हा भिल्लम होय. प्रस्तुत ताम्रपटामध्यें रामदेवराव यादवाची भरपूर स्तुति केली आहे. त्याच्या नांवापुढें बिरुदें दिलीं आहेत तीं येणेंप्रमाणें " एकांगवीर " " यादव नारायण " " द्वारावतीपुरवराधीश " " प्रौढप्रतापचक्रवर्ति " " यदुकुलकलिकाविलास " वगैरे. याखेरीज त्याच्या पराक्रमाचें काव्यमयभाषेंत वर्णन केलें आहे तें येणेंप्रमाणें. १ " गुर्जरकुंजरदानकंठीरवः " (गुजराथ देश हाच कोणी मदोन्मत्त हत्ती त्याचा फडशा उडविणारा सिंह.) यावरून रामदेवरावाचे राजवटींत गुजराथेवर यादवांची आणखी एखादी मोहीम झाली असावी असें दिसतें " तेलिङ्गतुङ्गतरून्मूलनमत्तदन्तावल " (तेलंगण देशचा राजा हाच कोणी उंच वृक्ष त्यास उपटून टाकणारा हत्ती) यावरून रामदेवरावानें तैलंगण प्रांत जिंकून तो आपले अमलाखाली आणला असावा असें मानण्यास जागा आहे. २ " मालवप्रदीपशमनमलयाऽनिलः " (मालवदेशचा राजा हाच कोणी एक दिवा, त्यास मालविणारा वारा) यावरून मालवदेशचे राज्य रामदेवरावाचें राजवटींत संपुष्टांत आलें होतें. असें मानण्यास जागा आहे. बहुतेक शिलाशासनें व ताम्रपट हे प्रबंध उर्फ पोवाडयाचे स्वरूपाचे असल्यामुळें त्यांतील ऐतिहासिक सत्य निवडून काढणें फार कठीण आहे. इतर पुराव्याच्या अभावीं त्यावर ऐतिहासिक दृष्ट्या भिस्त ठेवणें जोखमाचें आहे.

रामदेवरावाचे राजवटींत हेमाद्रि हा मुख्य मंत्रि असून तो सर्व राज्याचा आधारस्तंभ होता व त्याजकडे हस्तिदलाचें आधिपत्य होतें. त्यानें यादवांचे राज्यांतील " झाडी " नांवाच्या बंडखोर

रानटी टोळीचा कायमचा बीमोड केला व तो गुणराशीचा केवळ पर्वतच होता अशा आशयाचें त्याजबद्दलचे वर्णन प्रस्तुत ताम्रपटांत दिलें आहे. त्यावरून हेमाद्रीच्या चरित्रावर चांगला प्रकाश पडतो.

महादेवरायानें उत्तरकोंकणाधिपति शिलाहारवंशीय सोमेश्वराचा पराभव करून तो प्रांत आपले कबजांत घेतल्यावर त्यावर आपले प्रतिनिधि नेमण्यास सुरवात केली. रामदेवरावाचे कारकीर्दीत उत्तरकोंकणावर अच्युत नायक नांवाचा एक पराक्रमी ब्राह्मण सुभेदारीचे काम पाहात होता. त्यानें ठाणे नजीकचा ओवळे गांव शके ११९४ अंगिरानाम संवत्सर; आश्विन शु॥ ५ रविवार या दिवशीं ३२ ब्राह्मणांस दान दिला. त्या गांवाच्या चतुःसीमा येणें प्रमाणें–पूर्वेस कामेश्वर देवाचा गांव (हल्लीचें कावेसर गांव) दक्षिणेस सीतलेश्वर पश्चिमेस कोपेश्वराचा गांव उत्तेरस सांभवज नदी (हल्लीची उल्हास नदी जी वसईच्या खाडीस मिळते ती); शिवाय हा गांव दान देतानां त्यांतील तृण, जळ, काष्ट, पाषाण, निधि निक्षेप वगैरे यांचा समावेश करण्यांत आला आहे. हल्लीचे जात इनामी गांवात अशा शर्ति नेहमी पाहाण्यांत येतात. त्यावरून यागांवातील जमिनीची पूर्ण मालकी दान घेणारास प्राप्त होते. या तांम्रपटांत ज्या अच्युत नाय-

१ हें ओंवळें गांव ठाणें शहरापासून पांच मैलावर अद्याप आहे. आगगाडी होण्यांपूर्वी घाटावरील माल भिंवडी मार्गानें यागांवातून ठाणें शहरांत येत असे. हा गांव इनामी असून एका प्रतिष्ठित कायस्थ प्रभू घराण्याकडे तो फार वर्षे होता. कोर्ट मार्फत त्याची विक्री होऊन ठाण्याचे नगरशेट रतनशी प्रेमजी यांनीं तो खरेदी केला व तो अद्याप त्यांच्या वारसाकडे आहे. हा गांव फार रम्य असून उत्पन्नाचा आहे. भिंवडी व ओंवळें यांच्या दरम्यांत मुंबई म्युनिसीपालिटीनें हल्लीं पूल बांधिला असल्यामुळें भिंवडीहून ठाण्यास येणे फार सोईचें झालें आहे.

काचा उल्लेख केला आहे, त्याची सविस्तर माहिती दिली आहे ती येणें-प्रमाणें–तो **सरवरिया** (उत्तर हिंदुस्थानांतील कनोज प्रांतांतील) जातीचा ब्राह्मण होता. त्याच्या आजाचें नांव जल्हण व बापाचें नांव मुधुर्गी असें होतें, तो सर्व शास्त्रांत प्रवीण असून युद्धकलेंत फार निष्णात होता. तो हयात असतांना सूर्य अथवा चंद्र यांस उगवण्याचें कांहीं एक कारण नव्हतें. तो केवळ चिंतामणीच होता, असें त्याचें काव्यमय वर्णन प्रस्तुत ताम्रपटांत केलें आहे. त्याचें घराणें उत्तरकोंकणच्या राजांचे मांडलिकांपैकीं होतें. म्हणजे त्यांची गणना तत्कालिन छोटे संस्थानिकांत होत होती. अच्युत नायकाच्या पराक्रमामुळें पश्चिमेकडील राजे त्याला थरकांप भीत असत.

अस्सल ताम्रपट नजरेखालून न गेल्यामुळें अच्युतनायकाच्या जाती संबंधानें बऱ्याच बेजबाबदार लेखकांनीं निराधार विधानें केलीं आहेत. कित्येकांनीं तो सारस्वत ब्राह्मण होता असें विधान केलें आहे, तर कांहींनीं तो देशस्थ यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचा ब्राह्मण होता असें आपलें ठाम मत दिलें आहे. प्रस्तुत ताम्रपटांत अच्युत नायक हा उत्तरहिंदुस्थानांतील **सरवरिया** जातीचा ब्राह्मण होता असें स्पष्ट म्हटलें आहे. त्यामुळें त्याच्या जातीसंबंधानें ओढाताण करण्याचें कारण नाहीं. शिवाय जल्हण व मुधुर्गी ही नांवें महाराष्ट्रीय नसून कान्यकुब्ज (कनोजे) ब्राह्मणांच्या नांवाशीं जुळती आहेत. या ताम्रपटांत ज्या ३२ ब्राह्मणांस ओवळें गांव दान दिला त्यापैकीं कांहीं ब्राह्मणांचीं नांवें वाचतां येण्यासारखीं असल्यामुळें ती पुढें देण्यांत येत आहेत.

१. विष्णु भानु दीक्षित (गार्ग्यगोत्री १ हिं)

२. विष्णु प्रभु (जामदग्न्य, वत्सगोत्र १ हि)
३. बापु नायक राघव नायक (अत्रिगोत्र १ हि)
४. वासुदेव भट्ट नारसिंह पंडित (जामदग्न्य–वत्स १ हि)
५. खेतमाचार्य कृष्णाचार्य (वसिष्ठगोत्र १ हि)
६. नागदे (व) भट्ट माधवभट्ट (जामदग्न्य–वत्स १ हि)
७. औथतृ सोमनाथ धैसास (गौमतगोत्र १ हि)
८. नागदेवभट्ट पुरुषोत्तमभट्ट (भारद्वाज १ हि)
९. रामेश्वरभट्ट सोमदेवभट्ट (भारद्वाज १ हि)
१०. कान्हुपाध्याय दामोदर–उपाध्याय (चंद्रात्रेयगोत्र १)
११. त्रिविक्रम धैसास वासुदेव धैसास (काश्यपगोत्र १)

यांतील बहुतेक उपनांवें ऋग्वेदी देशस्थ व यजुर्वेदी माध्यंदिन शाखेच्या ब्राह्मणांच्या उपनांवाशीं जुळतात. प्रभु हें उपनांव ब्राह्मणांतहि असल्याचें आढळून येतें. गोत्रापुढें '१ हि' अशीं अक्षरें आहेत त्याचा अर्थ समजण्यास मार्ग नाहीं.

अण्जूर (ठाणें नजीकचे) येथील शिलालेख.

प्रस्तुत शिलालेख रामदेवराव याचे राजवटींतील आहे. यांत देवगिरीच्या यादवराजांची दिलेली वंशावळ ओंवळे गांवच्या ताम्रपटांतील वंशावळीशीं जुळते. आरंभी श्रीगणेशाची प्रार्थना केल्यानंतर, परमेश्वरानें वराहावतार घेऊन क्रीडा केली असें वर्णन केलें आहे. देवगिरीच्या यादवराजघराण्याची गादी स्थापणारा पांचवा भिल्लम याचा उल्लेख पहिल्यानें करून नंतर त्याचा मुलगा जैत्रपाल, नातु सिंघण; पणतु कृष्ण; कृष्णाचा भाऊ महादेव व कृष्णदेवाचा मुलगा रामचंद्र

शके १२१२.
इ. स. १२९०.

अशी क्रमवार वंशावळ दिली आहे. त्यांत आमणाच्या नांवाचा उल्लेख केलेला नाहीं.रामदेवराव याची बिरुदें पुढें लिहिल्याप्रमाणें दिलीं आहेत: १ द्वारावतीपुरवराधिश्वर २ यादव कुलकमलकलिकाविकासभास्कर ३ रायनारायण ४ महाराजाधिराजप्रौढप्रताप ५ चक्रवर्ति इ. इ.

रामदेवरायाच्या राजवटींत उत्तर कोंकणप्रांताच्या कोशाधिपतीचे (खजिनदाराचे) काम चांगदेवाकडे होते, व महामात्याचे जागेवर एकदेव पंडित हा होता. रामदेवरावानें कोंकणप्रांताचा सर्व अधिकार श्रीकृष्णदेवाकडे सोंपविला होता. रामदेवरायाचें आयुरारोग्य व ऐश्वर्य यांची वृद्धि व्हावी म्हणून कोंकणच्या श्रीकृष्णदेवानें अण्जूर गांव (खाजण वराडी पल्लिसुधा) निरनिराळ्या शाखेच्या व गोत्राच्या ४० ब्राह्मणांस शके १२१२ विरोधिसंवत्सर वैशाख शुक्ल १५ या दिवशीं द न दिला. अण्जूर गांवच्या चतुःसीमा येणेंप्रमाणें–पूर्व, पश्चिम व दक्षिण या तीनही बाजूस नदी, उत्तरेस चोळींग्राम हल्लींचें चोळेगांव; दानपत्रांत तृण, जल, तरु-काष्ट, पाषाण, निधिनिक्षेप सुद्धां असें शब्द आहेत प्रस्तुत ताम्रपटांत उत्तर कोंकणावर रामदेवरायानें नेमिलेला प्रतिनिधी (Viceroy) श्रीकृष्णदेव ऊर्फ केशिदेव याची थोडी माहिती दिली आहे. ती ऐतिहासिक दृष्टया फार महत्त्वाची आहे. सिंघण राजाचें कारकीर्दीत पद्मनाभ या नांवाचा भारद्वाज गोत्री ब्राह्मण होता. त्यानें आपल्या सदाचरणानें सिंघण राजाची चांगली मर्जी संपादन केली होती. त्याचे पोटी बामदेव (ब्रह्मदेव) या नांवाचा मुलगा निपजला. तो कवि असावा असें दिसतें. त्यास श्रीकृष्ण नांवाचा मुलगा झाला. वरील चाळीस ब्राह्मणांपैकीं महाल्लभद्राचें गोत्र काश्यप असून तो अग्निहोत्री होता. त्यास दामोदर या नांवाचा मुलगा होता.

सदरील शिलाशासनांतील मजकूर श्रीहरदेवाच्या आज्ञेनें माधव-पंडितानें लिहिला.

या ताम्रपटांवरून असें दिसून येतें कीं,रामदेवरायानें उत्तर कोंकण-प्रांतांच्या सुभेदारीचें काम भारद्वाजगोत्री कृष्णदेव नांवाच्या ब्राह्मणाकडे सोंपविलें होतें, व या प्रांतांतील खजिनदाराचे हुद्यावर चांगदेव याची नेमणूक केली होती, व मुख्य अमात्याचें काम एकदेव पंडिताकडे दिलें होतें. या एकदेवासंबंधानें व चांगदेवासंबंधानें कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. शके ११९५ च्या पंढरपूर येथील शिलालेखांच्या पहिल्या रकान्यांतील दहाव्या ओळींत "कोंकणी केसव देवे" अशी नोंद आहे. उत्तरकोंकणचा सुभेदार कृष्णदेव व हा 'केसवदेव' हे एकच असण्याचा संभव आहे. देवगिरीवर अल्लाउद्दिन खिलजी यानें हल्ला करून रामदेवराव यास दिल्लीच्या बादशाहाचा मांडलिक बनविल्यावर त्याचा मुलगा बिंबदेव याने उत्तरकोंकणची वाट धरली, व तो स्वतः त्या प्रांताचा राज्यकारभार पाहू लागला. त्यानें आपल्याबरोबर देवगिरी व पैठण येथून बरीच निवडक मंडळी आणिली होती. त्यांत पुरुषोत्तम नायक कावळे ह्या नांवाचा भारद्वाज-गोत्री माध्यन्दिन शाखेचा ब्राह्मण होता. त्या सर्वांच्या उदरनिर्वा-हाची कायमची व्यवस्था करणें बिंबदेवास जरूर होतें.

उत्तरकोंकणप्रांत षट्षष्टी ऊर्फ साष्टी बेटाचा अंतर्भाव होतो. या बेटास अनेक कारणांमुळें प्राचीनकाळापासून महत्व प्राप्त झालें आहे. ईजिप्त, अरबस्तान, ग्रीस वगैरे देशच्या लोकांचा हिंदुस्थानबरोबर जलमार्गानें व्यापार पश्चिम किनाऱ्यावरील ज्या प्रमुख बंदराशीं होता त्यापैकीं **श्रीस्थानक** (हल्लीचें ठाणें शहर) हें एक होय.

हे बंदर या षट्‌षष्टी बेटांत आहे. बुद्धधर्मीयांची कृष्णगिरी ऊर्फ कान्हेरी येथील लेणी ह्याच बेटांत आहेत. शिवाय घाटावरून परदेशीं माल पाठविण्यास व तेथून घाटावर आणण्यास श्रीस्थानक ऊर्फ ठाणें हें बंदर त्यावेळीं फार सोईचे होतें. लोहमार्ग सुरूं होईपर्यंत ठाणें शहराचें याबाबतींत महत्व कायम होतें. सर्वबाजूनीं हा प्रांत पाण्यानें वेढला असल्यामुळें लष्करीदृष्ट्याही त्यास फार महत्व होते. या बेटाच्या उत्तरेकडील भागांत अरबी समुद्रा नजिक मालाड नांवाचा गांव आहे तेथील सरदेशमुखी व सरदेशपांडेपणाचें वतन गोविंद मिटकरी या नांवाच्या गोवर्धन ब्राह्मणाकडे होतें. शिवाय साष्टी व उत्तरकोंकणांतील बऱ्याच गांवची जोशी उपाध्येपणाची वृत्ति त्याजकडे पूर्वापार चालत होती. बिंबदेव उत्तरकोंकणांत आल्यानंतर सदरील गोविंद मिटकरी कालवश झाला. तो निपुत्रिक होता. बिंबदेवास आपलेबरोबर आलेल्या ब्राह्मणांच्या योगक्षेमाची तजवीज करावयाची होतीच.त्यानें त्या गोष्टीचा फायदा घेऊन गोविंद मिटकऱ्याचें सरदेशमुखी व सरदेशपांडेपणाचें वतन व वृत्ति त्याची विधवा चांगुणाबाई हिजला बरीच रक्कम देऊन तिजकडून विकत घेतली. बिंबदेवानें सदरील वतन व वृत्ति पुरुषोत्तम नायक कावळे यास शके १२२१ प्लव संवत्सरी वेशाख व॥ ३० रोजीं सूर्यग्रहणाचे पर्वणीचा योग साधून दान दिली. व तें दानपत्र शिलांवर कोरून जागोजाग त्या रोंवण्याची आज्ञा केली. कोंकणचा सुभेदार कृष्णदेव व पुरुषोत्तमनायक कावळे हे उभयता पैठणकडील सगोत्रीय ब्राह्मण असल्यामुळें सदरील वतनें बिंबदेवाकडून संपादन करण्याचें कामीं कृष्णदेवाकडून कावळे यास बरीच मदत झाली असली पाहिजे.

उत्तर कोंकणप्रांत शिलाहारांचें अंमलाखालीं असतांना त्या प्रांतात गोवर्धन ब्राह्मणाखेरीज इतर महाराष्ट्रीय ब्राह्मणांची वस्ति नसावी असें मानण्यास जागा आहे. नाशिक व त्याच्या आसपासच्या प्रदेशास गोवर्धन अशी संज्ञा होती. नाशिक नजीक त्रिरश्मि नांवाचा डोंगर आहे. त्याच्या गुहेतील शिलालेखांत शालिवाहनवंशीय गोतमीपुत्र शातकर्णी यानें विष्णुपतित नांवाच्या आपल्या प्रधानास दिलेला हुकूम कोरला आहे, त्यांत या प्रांतास गोवर्धन या संज्ञेनें दोनवेळां संबोधिलें आहे. ह्याखेरीज नाशिक व त्या शहराच्या आसपासचा भाग गोवर्धन प्रांतांत मोडत होता याबद्दल आणखीही पुरावा सांपडतो. गोवर्धन ब्राह्मणांशिवाय उत्तरकोंकणांत तेलंगी उर्फ द्रवीड ब्राह्मणांची वस्ती होती. शिलाहार राजाचे दरबारांत तेलंगी उर्फ द्रविड ब्राह्मणांचे बरेंच वर्चस्व होतें, ही गोष्ट त्यांचे शिलालेख व ताम्रपट यावरून सिद्ध होते! त्यांच्या प्रधानांची, अधिकाऱ्यांची व त्यांनी केलेल्या दानांचा स्वीकार करणाऱ्यांपैकीं बहुतेक जणांची नांवें तेलंगी अगर कानडी आहेत. शिलाहारवंशीय राजे मूळचे दक्षिणेंकडील असल्यामुळें त्यांचा ओढा तेलंगी आणि कानडी लोकांकडे असणें साहजिक होतें. शिलाहारांचें उत्तरकोंकणांतून उच्चाटण झाल्यावर यादव राजानीं उत्तरकोंकणांतील राज्यकारभार पाहण्यासाठीं जे लोक नेमिले होते ते देवगिरि व पैठणच्या बाजूचे होते. ओंवळे येथील ताम्रपटांत व अण्जूरच्या शिलालेखांत प्रधानमंडळाची जी नांवें दिली आहेत त्यांत बहुतेक महाराष्ट्रीय आहेत. गोविंद मिटकऱ्याचे पश्चात् त्याचें वतन शिलाहार राजांच्या वेळच्या पुरातन ब्राह्मणवर्गापैकीं कोणास न देतां बिंबदेवाने तें आपल्याबरोबर आलेल्या

ब्राह्मणांसच दिलें यांत फारसें आश्चर्य नाहीं.एखाद्या राजानें नवीन प्रांत जिंकल्यावर त्यांतील वृत्तींची व इनामांची विल्हेवाट कशी लाविली जात असे ह्याबद्दल पूर्वी हकिकत दिली आहे. या गांवच्या वृत्ति पुरुषोत्तम कावळ्याच्या वंशाकडे व त्याचे शाखेच्या ब्राह्मणांकडे अद्याप चालत आहेत. शिवाय साष्टी बेटांतील मालाडचे हल्लीचे खोत (मयत अहमदभाई हबीबभाईचे वारस) याजकडून मालाडच्या सरदेशमुखी व सरदेशपांडेपणाच्या हक्काबद्दल वार्षिक वेतन त्यांचे वंशजास अद्यापपर्यंत मिळत आहे, सदरील हक्क न्यायकोर्टात प्रस्थापित करण्यांत आले असून त्या हुकुमाची अंमलबजावणी होत असल्याची प्रत्यक्ष माहिती प्रस्तुत लेखकास आहे.

अण्जूर हा गांव ठाणें व कल्याण या दोन रेलवे स्टेशनच्या दरम्यान असलेल्या दिवगांवापासून नाजिक आहे. इ. स. १७३९ सालीं वसई प्रांत पोर्तुगीज सरकाराकडून जिंकून घेण्याचे कामीं, अण्जूरचे गंबानाईक, बुवानाईक वगैरे सोमवंशी क्षत्रिय ज्ञातीचे कांहीं वीरवृत्तीचे गृहस्थांनीं पेशव्यांस पराकाष्टेची मदत केली. या क्षत्रियवीरानीं कळकळीनें पेशव्यांस मदत केली नसती तर वसईप्रांत फिरंग्याकडून हस्तगत करण्याचे कामीं कालगति लागून मराठ्यांच्या सैन्याची फार खराबी झाली असती. वसई व साष्टी प्रांत पोर्तुगीजांच्या अंमलाखालीं असतांना त्यांतील हिंदु रहिवाशांस जबरीनें बाटवून ख्रिस्ती करण्याचा प्रयत्न तेथील अधिकाऱ्यांनीं नेटानें चालविला होता. धर्मच्छलामुळें बहुतेक सुखवस्तु हिंदु लोक आपलीं घरेंदारें जमीनजुमला वगैरे जागच्याजागीं टाकून देऊन इंग्रजांच्या अंमलाखालीं असलेल्या नजीकच्या मुंबई बेटांत व इतर ठिकाणीं पळून गेले.

पोर्तुगीज सरकारनें त्यांची वतनें जप्त केलीं. उपरिनिर्दिष्ट केलेले पुरुषोत्तमपंत नायक कावळे ह्यास बिंवदेव यादवराजाकडून मालाड येथील सरदेसाई व सरदेशपांडेपणाचें प्राप्त झालेले वतन, त्याचे वंशज अंताजी रघुनाथ व रामचंद्र रघुनाथ कावळे ह्या दोघा बंधुकडे इ. स. १७२० चें सुमारास चालत होतें, तेही जप्त करण्यांत आले. शिवाय साष्टी व वसई या प्रांतातील जोशी उपाध्येपणाची वृत्ति उपरिनिर्दिष्ट कावळे बंधु ह्यांचेकडेस चालत होती. त्यामुळें सदरील प्रांतातील हिंदुलोकांवर त्यांचें फार वजन होतें. सबब अंताजी रघुनाथ कावळे ह्यासी धर्म रक्षणासाठीं हिंदुलोकांचे पुढारीपण पतकरणें भाग पडले. पोर्तुगीजाची सत्ता झुगारून देऊन त्याऐवजी मराठ्यांची सत्ता स्थापन करण्याचा त्यानें जारीनें प्रयत्न सुरू केला. प्रथम याकामीं त्यानें मुंबईतील इंग्रजसरकाराकडे दाद मागितली, परंतु इंग्रज सरकार व पोर्तुगीज सरकार यांची दोस्ती असल्यामुळें अंताजी रघुनाथ कावळे याची या कामीं निराशा झाली. नंतर अंताजी रघुनाथ कावळे यानीं सातारचे श्रीछत्रपति शाहूमहाराज यांचेकडे दाद मागितली. श्रीशाहुमहाराजांनीं पेशव्यांस पत्र लिहून जरूर ती मदत अंताजी रघुनाथ यांस देण्याविषयीं त्यास आज्ञा केली. इ. स. १७२९ पासून इ. स. १७४१ चे दरम्यान श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे, चिमणाजीआप्पा आणि नानासाहेब पेशवे ह्यांचा, अंताजी रघुनाथ कावळे व त्यांचे बंधु रामचंद्रपंत ह्यांच्याबरोबर जो याबाबतींत पत्रव्यवहार झाला तो ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्वाचा आहे. त्यांतील कांहीं निवडक पत्रें ह्या पुस्तकाच्या परिशिष्टांत दिलीं आहेत. वसईप्रांतावर स्वारी करून तो पोर्तुगीज सरकारापासून हस्तगत करून घेण्याविषयीं अंताजी रघुनाथ कावळे व त्याचे

जिवलग मित्र व क्षत्रिय यजमान गंबानाईक वगैरे ह्यांनीं पेशव्यांच्या मागें सारखा नेट लावला होता.

पेशव्यांनीं याबाबतींत स्वतंत्र चौकशी करून वसईवर स्वारी केली, व तेथलि किल्यास वेढा दिला. पोर्तुगिजानीं मोठ्या चिकाटीनें व धैर्यानें किल्याचें रक्षण केलें. मराठ्यांकडील बरेच लोक खराब झाले. अखेरीस वसईचा किला पेशव्यांचे हस्तगत झाला. वसई व साष्टी प्रांत मराठ्यांस मिळवून देण्याचे कामीं अंताजी रघुनाथ कावळे व त्यांचे क्षत्रिय यजमान गंबानाईक, बुवानाईक वगैरे यानीं महत्वाची कामगिरी बजाविली, याबद्दलची कबुली श्रीमंत बाजीराव बल्लाळ पेशवे व चिमणाजी आप्पा यानीं अंताजी रघुनाथ यांस पाठविलेल्या पत्रांत दिली आहे. पेशव्यांनीं अंताजी रघुनाथ कावळे यांस दिलेल्या कौलातील मजकूर ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्वाचा आहे.

इष्ट कार्य साध्य झाल्यावर "तुमचे ऊर्जित करूं" असें पेशव्यांनीं अंताजी रघुनाथ कावळे व त्याचे मित्र गंबानाईक यांस वेळोंवेळीं आश्वासन दिलें होतें. त्याप्रमाणें वसईची मोहिम फत्ते झाल्यावर गंबानाईक यांस अण्जूर गांव इनाम दिला व तो त्यांचे वंशजाकडे अद्याप चालत आहे. वसईच्या मोहिमेवर प्रकाश पाडणारे जुने कागदपत्र त्यांचे वंशजापैकीं आमचे मित्र श्रीयुत दिवाकरभाई नाईक यांचेकडे आहेत असें समजतें. हे कागदपत्र उजेडात आल्यास वसईच्या मोहिमेसंबंधानें अद्यापपर्यंत अज्ञात असलेले एक महत्वाचे दालन खुलें होईल असा भरंवसा आहे. पोर्तुगीज सरकारने अंताजी रघुनाथ कावळे याचे जप्त केलेलें वतन पेशव्यांनीं त्यास परत दिलें.

देवगिरीचा यादव राजपुत्र बिंबदेव यानें आपल्याबरोबर उत्तरकोंकणांत देवगिरी व पैठण येथील ब्राह्मण व क्षत्रिय वर्गांपैकीं जी निवडक मंडळी आणली होती त्यांच्या वंशजांनीं ४००-५० वर्षांनंतर एका परकी राष्ट्राचा विध्वंस करून मराठ्यांचे राज्य वाढविण्याचे कामीं मदत केली ही गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे.

अण्जूरचे गंबानाईक, बुवानाईक वगैरे सोमवंशी क्षत्रियलोकांच्या क्षात्रतेजानें वसई व साष्टीप्रांतांत हिंदुधर्माचें रक्षण झालें ही गोष्ट या नाईक घराण्यास अत्यंत भूषणावह आहे. अंताजी रघुनाथ कावळे यानीं, याप्रांतातील लोकांचे पिढीजाद पुरोहित व धर्मगुरु या नात्यानें हिंदुधर्म रक्षणाचे कामीं जे प्रयत्न केले ते त्याचे पेशास साजतील असेच होते ह्याबद्दल दुमत होणें शक्य नाहीं.

अण्जूरच्या शिलालेखावरून उत्तरकोंकणच्या सुभेदारीचें काम श्रीकृष्णदेवाकडे होतें असें दिसतें. वसईप्रांत मराठ्यांनीं मोठ्या शौर्यानें लढून हस्तगत केला व तेथील पोर्तुगिजांची सत्ता नष्ट केली याबद्दलचा संपूर्ण इतिहास आजपर्यंत उपलब्ध नाहीं. वसईच्या मोहिमेवर आजपर्यंत प्रसिद्धी झालेल्या पुस्तकांत पेशवे व अंताजी रघुनाथ कावळे यांचे दरम्यान झालेल्या महत्वाच्या पत्रव्यवहाराचा कोणी उल्लेख केला नाहीं ही मोठ्या दिलगिरीची गोष्ट होय.

पंढरपूरचा " चौऱ्यायशीचा " शिलालेख.

शके ११९५ ते ११९८ (इ. स. १२७३ ते १२७६)

पंढरपूर येथील श्री विठ्ठलाचें नव्या मंदिराचे देवडीवर हा शिलालेख बसलेला अजून होता, तो चौऱ्यायशीचा दगड म्हणून प्रसिद्ध

आहे. ह्या दगडावर पाठ घांशिली असतां चौऱ्यायशीलक्ष योनींतून म्हणजे जन्ममरणाच्या खटाटोपापासून माणसाची सुटका होते अशी भाविकांची समजूत आहे. या शिलालेखाचें विस्तृत वर्णन पहिल्या भागांत दिलें असून त्यांतील देणगीदारांची नांवें आठ रकान्यांत दिलीं आहेत. (परिशिष्ट नं. ९). प्रो. विजापूरकर ह्यांनीं आपल्या ग्रंथमालेंत या शिलालेखाचें विस्तारपूर्वक वर्णन केलें आहे. या शिलालेखांत देणगी देणाऱ्यांची यादी दिली आहे, त्यांत देवगिरीच्या यादवराजांपैकीं महादेवराय व श्रीरामचंद्रराव यांची नांवें असून शिवाय त्यांच्या राजवटींतील नामांकित पुरुष, हेमाद्रि (आमचा चरित्र नायक) कोंकणचा सुभेदार कृष्णदेव, पैठणचे पुरुषोत्तम नायक चांगदेव वगैरेंची नांवें आहेत. आठ रकान्यांत दिलेल्या एकंदर देणगी देणाऱ्यांच्या नांवांवरून तत्कालीन महाराष्ट्रीय थोर लोकांचा परिचय अनायासें होतो.

हा शिलालेख कोरण्याचें काम शके ११९५ त सुरू झालें व तें शके ११९८ मध्यें समाप्त झालें.

पंढरपूरच्या श्रीविठ्ठलासंबंधानें महाराष्ट्रीयांचा व कर्नाटक प्रांतांतील रहिवाशांचा पूज्यभाव शके ११९५ च्या पूर्वीपासून असला पाहिजे. श्रीविठ्ठलाचे मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठीं उत्तरकोंकण देवगिरी वगैरे दूरदूरच्या प्रांताहून देणग्या देण्यांत आल्या यावरून पंढरपूरक्षेत्र फार प्राचीनकालापासून अस्तिवांत असलें पाहिजे यांत शंका नाहीं. भागवतधर्माचा उदय होण्यापूर्वी पंढरीच्या श्रीविठ्ठलराया-बद्दल लोकांच्या मनांत पूज्यभाव होता असें या शिलालेखावरून दिसतें.

श्रीज्ञानेश्वरमहाराज हे भागवतधर्माचे पुरस्कर्ते असून त्यांच्या ज्ञानेश्वरी ग्रंथात श्रीविठ्ठलाचा नामनिर्देशही नसावा यांचें आश्चर्य वाटतें!!

हेमाद्रि व श्री. ज्ञानेश्वरमहाराज समकालीन होते असे असतां रामदेवरावाचे दरबारांत महाराजांचा बहुमान झाल्याचे आढळून येत नाहीं. श्री. ज्ञानेश्वरमहाराजांच्या मौंजीबंधनासंबंधानें तत्कालीन ब्रह्मवृंदांत वितंडवाद माजला होता त्यामुळें अगर त्यांच्या निरपेक्ष व साध्या वृत्तीमुळें त्यांचे हयातींत त्यांच्या अलौकिक गुणांचे चीज झाले नाहीं ही गोष्ट निःसंशय होय! ज्ञानेश्वरीसारखा तत्त्वज्ञानपूर्ण व अधिकारी ग्रंथ हेमाद्रीच्या अगर रामदेवरावाच्या दरबारांतील विद्वानांच्या वाचण्यांत आला असता तर त्याचें चीज झाल्यावांचून खचित राहते ना!!

या शिलालेखांतील आठ रकानें, " गद्या " नामक पंधरा रुपये किंमतीचें सोन्याचें नाणें, देणगीरूपाने देणाऱ्यांच्या नांवानी भरलेले आहेत. त्यांपैकी कांहीं नांवें ऐतिहासिकदृष्ट्या महत्वाचीं आहेत. त्यांपैकीं कांहीं पुढें दिलीं आहेत. देणगी देणाऱ्यांचे यादींत, पुरुषांप्रमाणें स्त्रियांचीही नांवें आढळतात. महाराष्ट्रीय, कानडी व तेलंगी या लोकांनीं श्रीविठ्ठलमंदिराच्या जीर्णोद्धारांचें पवित्र काम पार पाडण्यासाठीं सढळ हातांनीं मदत केली यावरून महाराष्ट्र, कर्नाटक व तैलंगण या प्रांतातील लोकांचे मनांत श्रीविठ्ठलाबद्दल अत्यंत पूज्यभाव होता यांत शंका नाहीं. प्रत्येक रकान्यांत कोणाच्या मार्फत पैसे वसूल झाले त्याचा नामनिर्देश केला आहे, यावरून देणग्यांची रक्कम वसूल करण्यासाठीं प्रचारक नेमले असावेत असें दिसतें.

श्रीचक्रवर्तिरामचंद्रराव; सोडवीकार हेमाडपंडित, कौटोन हेमाडी-पंडित, कोहोर हेमाद्रिपंडित; गणपति नायक; पुरुषोत्तम पंडित; कोंकणचा महादेव, बागरस कराणिक; श्रीपतिदे णायके. श्रीपती-दणाक (नाईक), गंगाधर नायक, मांघोली येथील बाबा-सेणवे (फौजेचा नायक–फौजदार), पुरुषोत्तम नायक, केशव पंडित, विजापूर येथील गौरुबाहू, मांईबाई, दामोदर भट, कोकणा केसवदेव; श्रीचक्रवर्ति रामदेवराव; बामरसचा नावैए (जोइसि नाम अय्या जोशी), विठनायक, विनायक व देऊबाई हें त्रय, आंवढ्याचा जातिदेव, आंबे येथील कृष्णदेव, हाडगल येथील मलोदेव, सागंवीयेथील केशवसुत माधवदेव, पैठणचा चांगदेव, सिध (शिद्) नायक, सालीव येथील यादो सेणवै, आवडे येथील रासपंडीत, पुराणिक हय्यवाह अय्या, वाजसनेयसुत गुरुदेव, वाडदेव व चंगदेवसुत ही त्रयी, जाईदेव सेठवल, दें पेरु (तेलंगी) नामक हलीक (शेतकरी), सांय येथील बोपिसेठ, म्हैसगी येथील जगदेवराणा, अर्जुनभट व रामश्वेरभट, कैतोर येथील विठ्ठलदास, कोकणा महादेव, रुपदेवसुत तारदेव, रामणदेव; गिरि-पंडित, पदुबाई करणिक, वैराग येथील दांठीनायक, विजापूर येथील बळीदेव पंडीत, वोडवंग येथील भणगें झिंबदेव दळवै (दळवी), भिंगिआर (भिंगार) येथील हत्तिदेवसेंडा सेट्ठे (शेंडे आडनांवाचे श्रेष्ठी), मेहकर नांगणा, वणखेडचा महादेव पंडित, मारबाडी बादेवण्णा, उभेमार्गी (उभागर?) येथील तिंगवदेव लाडह-रिदेव, कान्हो राईआपा, श्रीधरदासी, यादो गणसेन इ. इ.

ह्या शिलालेखांच्या चौथ्या रकान्यांतील १४३ संख्येपुढें निर्दिष्ट केलेला पुरुषोत्तम नायक हा देवगिरीच्या तत्कालीन दरबारांतील मोठा अधिकारी असावा असें दिसतें. बिंबदेवानें उत्तरकोंकणप्रांताची राज्यसूत्रें शके १११७–१८ च्या (इ. स. १२९६) च्या सुमारास आपल्या हातीं घेतलीं, त्यावेळीं देवगिरी व पैठण येथील जी निवडक मंडळी आपले बरोबर नेली त्यांत पुरुषोत्तम नायक (कावळे) ह्यांचे नांव प्रामुख्यानें आढळते. शके १२२१ सालीं (इ. स. १२९९) ज्या पुरुषोत्तम नायक (कावळे) यांस बिंबदेवानें मालाडप्रांताचें सरदेसाई व सरदेशपांडेपणाचें वतन दिलें तोच हा असावा असा तर्क करण्यास जागा आहे.

श्रीपंढरपूरच्या देवळाचे जिर्णोद्धाराचे कामीं रामदेवराव जाधव व आमचा चरित्रनायक हेमाद्रि यानीं सक्रिय सहानुभूती दाखवून भागवतधर्मावरील आपले उत्कट प्रेम व्यक्त केलें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

उनकेश्वर येथील यादव कालीन मराठी शिलालेख.

उनकेश्वर उर्फ उनकदेव हे स्थळ निजामसरकारच्या हद्दींत असिकाबाद जिल्ह्यांतील किनवट तहसिलींत आहे. तें यवतमाळ जिल्ह्याच्या सीमेवर पाइनगंगा नदीपासून चार पांच मैलांवर आहे. तेथें उनकेश्वर नावाचें एक मंदिर आहे. त्या मंदिरांत दोन शिलालेख असून तिसरा मंदिराजवळच्या दीपमालेवर आहे. या शिलालेखांत उनकेश्वरा नजीकच्या नऊ गावांची नावें दिलीं असून तीं अद्याप विद्यमान आहेत तीं येणें प्रमाणें:—बोथिये; सांगविये; लिंगी; वुर्वली; पिंपळसेंडा; करंदी; परवदे; चीमतु; गुढ.

या तीन शिलालेखांपैकीं एक लेख ऐतिहासिक दृष्ट्या महत्वाचा आहे. शिलालेखाच्या प्रथम ओळीमध्यें शके '१२११' असा मजकूर आहे. प्रस्तुत शिलालेख मराठी मध्यें लिहिलेला आहे. यादव-कालीन बहुतेक शिलालेख व ताम्रपट संस्कृत अगर कानडींत आहेत. मराठीं भाषेंत संबंध लिहिलेला शिलालेख हा एवढाच आहे. पाटण येथील शके ११२८ च्या शिलालेखाचा अखेरचा थोडा भाग मात्र मराठीत लिहिलेला आहे. यालेखांत देवगिरीचा प्रतापचक्रवर्ति श्रीराम-चंद्रदेव व त्याचा मुख्याधिकारी व्यंकदेव, हेमाद्रिपंडीत व सोमदेव-पंडित यांची नांवें आढळतात. शिलालेखाच्या चौथ्या व पाचव्या ओळींत, त्रेतायुगीं श्रीरामचंद्र वनवासांत असतां शरभगऋषीच्या दर्शनासाठीं त्याचे आश्रमास गेले होते त्यावेळीं सदरील ऋषीच्या उपयोगासाठीं त्यानें उष्णोदक निर्माण केलें असा मजकूर आहे. उनकेश्वर येथील देव हरिहर (उनकेश्वर महादेवाचें लिंग आणि कोदंडधारी श्रीराम) या दोन देवांच्या पूजेअर्चेसाठीं निरनिराळ्या गांवच्या जमिनी लावून दिल्याचा यांत उल्लेख आहे. हा शिलालेख अपूर्ण आहे. सदरील शिलालेख भा. इ. सं. मंडळाच्या व्हा. ९ अं. १ मध्यें प्रसिद्ध झाला आहे. शिलालेख परिशिष्टांत दिला आहे.

या खेरीज रामदेवरावाच्या वेळचे म्हैसूर प्रांतांत सांपडलेले बरेच शिलालेख कानडी भाषेंत आहेत पैकीं बालगांव येथील शके १२०४ चा जयस्तंभ व सोराब येथील शके १२०७ चा जयस्तंभ हे महत्वाचे आहेत. कर्नाटक प्रांतावर रामदेवरावांचा पूर्ण अंमल बसला होता, ही गोष्ट त्या शिलालेखावरून निःसंशय शाबीत होते.

सोलापूर जिल्ह्यांतील वेलापूर येथील शके १२२२ व शके १२२७ चे शिलालेख उपलब्ध आहेत त्यांत रामदेवराव यांस प्रौढप्रतापचक्रवर्ति अशी बिरुदें लाविलीं आहेत.

अल्लाउद्दीन खिलजीनें शके १२१६ (इ. स. १२९४) मध्यें रामदेवरावाचा पराभव करून त्यास दिल्लीच्या बादशहाचे मांडलिक बनविल्यानंतरचे शिलालेख व ताम्रपट उपलब्ध नाहींत.

रामदेवराव हा दक्षिणच्या स्वतंत्र हिंदुराज्यांतील शेवटचा राजा होय. त्याची कारकीर्द सुरूं होण्यापूर्वी मुसलमानाचा अंमल उत्तर-हिंदुस्थानांत दिल्ली येथें पूर्णपणें स्थापित होऊन सुमारें एक शतक लोटलें होतें. इ. स. आठव्या शतकाच्या आरंभी मुसलमानानीं सिंधच्या बाजूनें हिंदुस्थानास शह देण्याचा प्रयत्न केला. प्रथमतः त्यांस यावें तसें यश आलें नाहीं, तरी वारंवार स्वाऱ्या करून सिंधप्रांतातील लोकांस त्यांनीं जर्जर केलें. इ. स. ९९८ पासून महम्मद गझनवी हा उत्तरेकडून हिंदुस्थानाकडे डोकाऊं लागला. त्यानें हिंदुस्थानावर एकंदर १७ स्वाऱ्या केल्या. त्यानें तत्कालीन हिंदु राजा जयपाळ ह्याचा पराभव करून त्याजपासून पेशावर प्रांत इ. स. १००१ कात हिसकावून घेतला. इ. स. १००५।६ मध्यें त्यानें मुलतान काबीज केले. इ. स. १००८ मध्यें पुन्हा स्वारी करून त्यानें जयपाळाचा मुलगा अनंतपाळ ह्याबरोबर युद्ध केलें. त्या युद्धांत अनंतपाळाच्या पराक्रमामुळें आरंभी त्यास यश आलें, परंतु ऐन यशप्राप्तीच्या वेळीं त्याचा स्वतःचा हत्ती उधळल्यामुळें त्याच्या सैन्यांत भयंकर गडबड उडाली. त्यामुळें विजयश्रीनें महम्मद गझनवीच्या गळ्यांत माळ घातली. महम्मद गझनवीनें लूट करून

अतोनात संपत्ति हिरावून नेली. इ. स. १०१८ मध्यें त्यानें हिंदुस्थानावर पुन्हां स्वारी केली. व कनोज व मथुरा ही शहरें लुटलीं. त्यावेळीं मथुरेची कीर्ति तिच्या अलोट संपत्तिमुळें व सौंदर्यामुळें दूरवर पसरली होती. शिवाय श्रीकृष्णभगवंताचें तें मूळस्थान असल्यामुळें धार्मिक दृष्ट्या त्या शहरास एक प्रकारचें महत्व प्राप्त झालें होतें. अशा पवित्र व प्रसिद्ध शहराचा मुसलमानांनीं विध्वंस केल्यामुळें उत्तरहिंदुस्थानांतील राजेलोकांत फार खळबळ उडाली. त्यांनीं एकजुटीनें महम्मद गझनवीशीं लढून त्याची खोड जिरविण्याचें ठरविलें. महमद गझनवीस ही बातमी कळतांच त्यानें पुन्हा हिंदुस्थानावर स्वारी केली. आपल्या विरुद्ध संघटित प्रयत्न करणाऱ्या हिंदुराजांचा प्रमुख कलंजरचा राजा **नंदराय** ह्याजबरोबर त्यानें निकराचा सामना केला. हिंदुराजाचें संयुक्त सैन्य मोठें असून त्यांत ५८० हत्ती होते. परंतु महमदगझनवीच्या धडाडीमुळें हिंदुसैन्याचा त्याचे सैन्यापुढें टिकाव लागला नाहीं अखेर हिंदुराजांस महमद गझनवीबरोबर तह करणें भाग पडलें.

इस्लामीधर्माचा संस्थापक महंम्मद पैगंबर ह्याचा मूर्तिपूजेवर मोठा कटाक्ष असल्यामुळें त्यानें कुराणांत मूर्तिपूजकास **काफीर** ह्या संज्ञेनें संबोधिलेलें आहे. महंमद पैगंबराच्या मृत्यूनंतर त्याच्या उत्साही अनुयायानीं मूर्तिपूजकांवर वाकडी नजर फेंकली. मूर्तींचा विध्वंस करून मूर्तिपूजकांना समशेरीच्या जोरावर महम्मदी धर्माची दीक्षा घेण्यास भाग पाडणें ही कुराणाची शिकवण आहे असा उपदेश सदरील धर्माचे गुरु आपल्या अनुयास वेळीं अवेळीं करीत. स्यामुळें महंमदी धर्माचा प्रचार करणें हें आपलें इतिकर्तव्य आहे असें

दरएक मुसलमानास वाटूं लागलें. ह्या धर्मवेडामुळें अरबस्तान व मध्य एशिया वगैरे देशांतील लोकांचें लक्ष हिंदुस्थानाकडे साहजिक वेधलें. ईश्वरप्राप्तीबरोबरच अकल्पित ऐहिक लाभाची जोड मिळते अशी खात्री पटल्यावर मुसलमान राजांस हिंदुस्थानावर स्वारी केल्यावांचून चैन पडेनासें झालें. या धर्मवेडाचा फायदा घेऊन कांहीं धाडसी मुसलमानानीं हिंदुस्थानांत आपली राजकीय सत्ता स्थापन करण्याची हांव धरिली व त्या कामीं त्यांस यश आलें. हिंदुराजांमध्यें, जूट व शिस्त बिलकुल नसल्यामुळें हिंदुस्थानावर स्वारी केली असतां त्यांजकडून सुसंघटित प्रतिकार होणें अशक्य होय. अशी स्वारी करणाऱ्या मुसलमानांची खात्री होती. हिंदुस्थानांवर केलेल्या स्वाऱ्यांत मुसलमानांना सारखें यश मिळत जाऊन त्यांत अतोनात लूट मिळाल्यामुळें, भरतभूमि ही एक कामधेनुच आहे अशी त्यांची समजूत झाली यांत कांहीं नवल नाहीं. ह्या समजुतीच्या जोरावर इ. स. १०२४ मध्यें महंमद गझनवीनें सोमनाथावर स्वारी केली. सोमनाथ हें स्थान हिंदुलोक फार पवित्र मानीत असत. राजस्थान, गुजराथ, व सौराष्ट्र ह्या देशांतील राजांकडून तेथील देवस्थानास बहुमोल देणग्या वारंवार मिळत असत; त्यामुळें तेथें अलोट संपत्ति होती अशी महंमद गझनवीस माहिती मिळाली होती. सोमनाथावर आपण स्वारी करीत आहों ह्याचा मागमूस महंमद गझनवीनें कोणासही लागूं न देतां त्याजवर एकदम छापा घातला. त्यावेळीं गुजराथच्या व सौराष्ट्राच्या राजांनीं महमद गझनवीस बरीच संपत्ति देण्याचें कबूल करून हिंदूंस परमपूज्य असलेल्या या देवस्थानास कोणत्याही प्रकारचा

उपद्रव करूं नये अशी विनंति केली. परंतु द्रव्यार्जनापेक्षां भावी इतिहासांत मूर्तिभंजक म्हणून आपली कीर्ति अजरामर राहिली पाहिजे अशी आपली महत्वाकांक्षा असल्याबद्दल त्यानें सदरील राजांना सडेतोड उत्तर दिलें. हिंदूच्या धार्मिक भावनांकडे बिलकूल लक्ष न देतां सोमनाथाच्या मूर्तीचा विध्वंस करून व तेथील संपत्ति लुटून त्यानें आपली राक्षसी महत्वाकांक्षा पुरी केली ! हिंदूंच्या धार्मिक भावनांना तुडवून, हिंदुराजांना आपला वचक बसावा व त्यांनीं आपणास शरण यावें असा महमद गझनवीचा अंतस्थ हेतु असावा असें दिसतें.

महमद गझनवीनंतर घोरी घराण्यांतील पुरुषानीं हिंदुस्थानवर स्वारी करून देशद्रोही हिंदूराजांच्या मदतीनें दिल्लीस मुसलमानी पातशाहाची स्थापना केली. महमदघोरीनें इ. स. ११७५ पासून इ. स. १२०६ पर्यंत दिल्ली येथें राज्य केलें त्यानंतर बलवन घराण्यानें राज्य केलें. व त्यानंतर खिलजी घराण्यांतील पुरुष जलालुद्दिन ह्यानें इ. स. १२९० मध्यें दिल्लीची पातशाही पटकाविली. ह्या दोन अडीचशें वर्षांच्या अवधींत, उत्तरहिंदुस्थानांतील हिंदुराजांच्या मुसलमानाबरोबर पुष्कळ लढाया झाल्या. परंतु संघटण व युद्धकलेंतील शिस्त यांचा अभाव, आणि परस्परांतील मत्सर यामुळें त्यांस त्यांच्यापुढें हार खावी लागली. संघटण व शिस्त ह्यांच्या अभावीं नुसत्या शौर्यानें कार्यभाग होत नाहीं ही गोष्ट वरील इतिहासापासून उत्तम प्रकारें निदर्शनास येते.

उत्तरहिंदुस्थानांतील राजेरजवाड्याबरोबर झगडून त्यांस कमकुवत केल्यावर सदरील प्रांतांत आपली राजसत्ता स्थिरस्थावर कर-

ण्यास मुसलमान राजांस बराच काळ लागला. त्यामुळें त्यांस दक्षिण हिंदुस्थानाकडे लक्ष देण्यास फुरसत मिळाली नाहीं. परंतु ही स्थिति फार दिवस टिकणें शक्य नव्हतें. जलालुद्दिन ऊर्फ फिरुझशहा खिलजी ह्यानें आपला पुतण्या अल्लाउद्दिन खिलजी ह्यास माणिकपूर (प्रयागनजीक) येथील सुभेदारीच्या जागेवर नेमलें होतें. तो साहसी असून महत्वाकांक्षी होता. दख्खन प्रांत सुसंपन्न व सुपीक असून तो सहज जिंकता येण्यासारखा आहे अशा बातम्या त्याच्या कानावर आल्या होत्या. दक्षिणेवर स्वारी करण्याचें त्यानें ठरवून त्याकामीं आपल्या चुलत्याची मंजुरी मिळविली. त्यानें आपल्याबरोबर आठ हजार निवडक सैन्य घेऊन देवगिरीवर अचानक छापा घालण्याचा घाट घातला. देवगिरीचा यादव राजा रामदेवराव ह्याजपाशीं सैन्याची तयारी नसून तो गाफील आहे अशी खबर अल्लाउद्दिनानें आपल्या गुप्त हेरांकडून काढली होती व कोणत्याही प्रकारची आगाऊ सुचना न देतां त्यानें आपलें सैन्य एलिचपुरच्या बाजूनें नेऊन देवगिरीच्या आसपास आणून भिडविलें. ह्या आकस्मिक परचक्राची बातमी कळतांच रामदेवरावाची तारांबळ उडाली. थोड्या अवकाशांत शक्य तितकें सैन्य जमवून देवगिरीपासून चार मैलांवर त्यानें शत्रूच्या सैन्यास तोंड दिलें. अल्लाउद्दिनाच्या सैन्यानें रामदेवरावाचा पराभव केला. रामदेवरावाच्या सैन्याची पिछेहाट होऊन त्यास देवगिरीच्या किल्ल्याचा आश्रय धरणें भाग पडलें. ह्या बिकट स्थितीचा फायदा घेऊन अल्लाउद्दिनानें रामदेवरावाचें सुंदर व संपत्तिमान राजधानीचें शहर देवगिरी हें लुटून फस्त केलें. अल्लाउद्दिन हा जसा साहसी त्याप्रमाणें धूर्तही होता. आपल्या बरोबर आणलेलें

सैन्य हें अघाडीचें असून मागाहून दिल्लीच्या बादशहाचें प्रचंड सैन्य येत आहे अशी त्यानें हूल उठविली; त्यामुळें देवगिरीच्या आसपासचे हिंदु राजे फसले व रामदेवरावाच्या मदतीस जाण्यास कचरले. ह्यावेळीं उत्तरहिंदुस्थानांतील स्वतंत्र हिंदुराजांनीं अल्लाउद्दिनाविरुद्ध जर संघटित प्रयत्न केला असता तर त्यास कदाचित् माघार घ्यावी लागली असती! वास्तविक पाहिलें असतां देवगिरीचा किल्ला मजबूत व अजिंक्य असल्यामुळें त्याच्या आश्रयानें रामदेवरावास कोणत्याही बलाढ्य शत्रूस, दुसरीकडून मदत येईपर्यंत नामोहरम करतां आलें असतें. पण त्याही बाबतींत रामदेवरावाची तयारी नव्हती असें दिसतें. रामदेवरावानें आपला मुलगा शंकरदेव ह्याच्या व इतर राजांच्या मदतीची वाट न पाहतां उतावीळपणानें अल्लाउदिनाशी तहाचें बोलणें लाविलें.

देवगिरी शहर लुटून जी संपत्ति मिळविली आहे तिच्या भारोभार आणखी रक्कम देण्यास आपण तयार आहों ती घेऊन आमचे लोकांस बंधमुक्त करावें व आमच्या प्रांतातून निघून जावें अशा तहाच्या अटी रामदेवरावानें अल्लाउद्दिनास कळविल्या. त्या त्यानें कबूल केल्या, व रक्कम हातीं पडतांच सर्व कैद्यांस बंधमुक्त करून दिल्लीस परत जाण्याचें आश्वासन दिलें.

दरम्यान शंकरदेव मोठ्या सैन्यासह अल्लाउद्दिनाबरोबर दोन हात करण्याच्या तयारीनें देवगिरीच्या आसपास येऊन थडकला. आपण अल्लाउद्दिनाबरोबर तह केला असून त्याजबरोबर लढाई करण्याचें कारण उरलें नाहीं असा रामदेवरावानें शंकरदेवास निरोप पाठविला; परंतु या गोष्टीकडे त्यानें दुर्लक्ष केलें. उलट लुटींत मिळविलेली रक्कम

परत देऊन देवगिरी शहर ताबडतोब सोडून जाण्याबद्दल शंकरदेवानें अल्लाउद्दिनास निर्वाणीचा खलिता पाठविला. अल्लाउद्दिन हा युद्धकलेंत फार निपुण होता. त्यानें शंकरदेवाच्या सैन्याचा, देवगिरीच्या किल्ल्यांत रामदेवरावाचे सैन्य होते त्याच्याशी मिलाफ होऊ न देण्याविषयीं खबरदारी घेतली व किल्ल्याभोंवतीं आपले एक हजार निवडक सैन्य ठेविलें. अल्लाउद्दिनानें शंकरदेवाच्या सैन्यावर निकराचा हल्ला केला. उभयतांचें तुंबळ युद्ध झालें; त्यांत शंकरदेवानें मोठ्या पराक्रमानें अल्लाउद्दिनाचा धुव्वा उडविला. इतक्यांत देवगिरीच्या किल्ल्याभोंवताली अल्लाउद्दिनानें ठेविलेलें सैन्य त्याच्या मदतीस आलें त्या सैन्याच्या दौडीमुळें जो धुरळा उडाला, त्यावरून दिल्लीच्या बादशहाचें मागें असलेलें खास सैन्य अल्लाउद्दिनाच्या मदतीला येत आहे अशी शंकरदेवाकडील लोकांची समजूत झाली. ह्या गैरसमजुतीमुळें शंकरदेवाच्या सैन्यामध्यें धुमाकूळ उडून त्याचें सैन्य सैरावैरा पळूं लागलें. अल्लाउद्दिनानें शंकरदेवाच्या सैन्याचा पाठलाग करण्याचें सोडून देऊन देवगिरीच्या किल्ल्यास पुन्हा वेढा दिला. अल्लाउद्दिनाच्या या धोरणामुळें रामदेवराव पेंचांत पडला. शिवाय आणखी एक अकल्पित गोष्ट घडून आल्यामुळें रामदेवरावाची फार निराशा झाली ! देवगिरीचा किल्ला अजिंक्य असल्यामुळें त्यांत धान्यसामुग्री विपुल असती तर त्या किल्ल्यात राहून रामदेवरावाच्या सैन्यानें बराच काळ टिकाव धरला असता. परंतु किल्ल्यांत सांठवून ठेविलेल्या धान्याच्या पोत्यांत, धान्याऐवजीं मीठ भरलेलें आढळून आलें. आपल्याच गोठांत अशा तऱ्हेची फंद–फितुरी असल्याचें रामदेवरावास आढळून येतांच, त्यांपुढें आपली धडगत नाहीं

अशी त्याची खातरी झाली व त्यानें अल्लाउद्दिनाबरोबर पुन्हां एकवार तहाचें बोलणें लाविलें. अल्लाउद्दिनानें तें मान्य केले. तहाच्या शर्ती फार अवजड होत्या. त्या येणेंप्रमाणें:—सहाशें मण मोत्यें, दोनशें मण जड जवाहीर, तितकेच सोनें व दोनशें मण उंची कापड वगैरे रामदेवरावानें अल्लाउद्दिनास दिल्यावर त्यानें देवगिरीप्रांत सोडून परत जावें व सदरील रक्कम पदरी पडेपर्यंत एलिचपूर प्रांत अल्लाउद्दीनानें आपल्या ताब्यांत ठेवावा. ह्यांतील अतिशयोक्तीचा भाग सोडून दिला तरी पहिल्या तहांतील शर्तींपेक्षां दुसऱ्या खेपेच्या तहांतील शर्ती अतोनात कडक होत्या यांत शंका नाहीं. वरील तहाच्या अटी रामदेवरावानें पुऱ्या केल्यावर अल्लाउद्दिनानें देवगिरी शहर मोठ्या इतमामानें सोडिलें.

अल्लाउद्दिनानें परत गेल्यावर आपली दक्षिणेवरील स्वारी यशस्वी झाली व त्यांत मनमुराद लूट मिळविली अशाबद्दलची हकीगत आपला चुलता जलालुद्दिन ह्यास दिल्ली येथें कळविली; व बादशहानें थोड्या लवाजम्यासह आपणांस करी [त्याचें सुभेदारीचें ठिकाण] येथें भेटावें अशी त्यास विनंति केली, त्याप्रमाणें बादशहानें अल्लाउद्दिनाची भेट करी येथें घेतली. बादशहाचें मनांत कांहीं किंतु नसल्यामुळें अल्लाउद्दिन आपणास दगा देईल असें त्याच्या स्वप्नीही नव्हतें. परंतु पूर्व संकेताप्रमाणें इ. स. १२९५ मध्यें अल्लाउद्दिनानें आपल्या चुलत्याचा दगलबाजीनें वध करवून दिल्लीचे तख्त बळकाविलें.

पुढें कांहीं वर्षें देवगिरीचे रामदेवराव यादव यास अल्लाउद्दिनाकडून कांहीं त्रास पोंचला नाहीं. परंतु कबुल केलेल्या खंडणीची

रक्कम रामदेवरावाकडून वक्तशीर येत नाहीं असें दिसतांच अल्लाउद्दिनानें आपला सरदार मलिककापूर ह्याच्या हाताखालीं एक लाख सैन्य देऊन देवगिरीवर पाठविलें; मार्गांत माळव्याचा सुभेदार ऐन-उल्-मुल्क मुलतानी आणि गुजराथचा सुभेदार अलफखान ह्या उभयतांची सैन्यें त्यास येऊन मिळाली. गुजराथचा राजा करणवाघेला ह्याजबरोबर दिल्लीच्या बादशहानें लढाई करून गुजराथ प्रांत काबीज केला होता त्या गडबडींत त्याची राणी कमलदेवी अल्लाउद्दिनाच्या हस्तगत झाली होती व त्यानें तिला आपली मुख्य बेगम [पट्टराणी] केली होती. कमलदेवीला देवलदेवी नांवाची सुस्वरूप मुलगी होती. ती जवळ नसल्यामुळें कमलदेवीस करमेनासें झालें. देवलदेवीस कसेंही करून आपले जवळ आणण्याविषयीं कमलदेवीनें अल्लाउद्दिनाच्या मागें तगादा लाविला होता. गुजराथ प्रांत पूर्णपणें काबीज करण्याचा अल्लाउदिनाचा फार दिवसाचा हेतु होता. गुजराथच्या राजाची कुरापत काढण्यास त्यास अनायासें संधि मिळाली. देवलदेवीला हस्तगत करून दिल्लीस आणण्याबद्दल अल्लाउद्दिनानें मलिककाफूर ह्यांस सक्त हुकूम दिला होता. करणवाघेला यास ही बातमी कळतांच तो देवलदेवीच्या बचावाकरितां गुजराथ व देवगिरीच्या राज्यांच्या सरहद्दीवर असलेल्या बागलाण प्रांती गेला. मलिककाफूरनें देवलदेवीस आपल्या स्वाधीन करण्याबद्दल करणवाघेला यास निरोप पाठविला. परंतु त्यानें ती गोष्ट साफ नाकारली. दरम्यान रामदेवरावानें आपला युवराज शंकरदेव यास देवलदेवी देणें बद्दल करणवाघेल्याकडे मागणी घातली होती. ती निरुपायास्तव मान्य करणें त्यांस भाग पडलें व त्याप्रमाणें त्यानें तिला शंकरदेवाचा भाऊ बिंबदेव उर्फ भीमदेव

याच्या स्वाधीन केली. बिंबदेव तिला घेऊन जात असतां मार्गात ती मुसलमानांच्या हाती अचानक कशी सांपडली ही हकीकत पूर्वी येऊन गेली आहे. अल्लाउद्दिनानें देवलदेवीचें लग्न आपला मुलगा खय्यरखान याजबरोबर लावून दिलें.

मलिककाफूरानें देवगिरीकडे आपला मोर्चा फिरविला. त्याचे सैन्यास तोंड देण्याचें आपले अंगी सामर्थ्य नाहीं ह्याची रामदेवरावास पूर्ण जाणीव होती. म्हणून त्यानें शंकरदेवास देवगिरीच्या किल्ल्यांत ठेऊन मलिककाफूरास मोठा नजराणा करून त्याजबरोबर तहाचें बोलणें लाविलें. मलिककाफूर ह्यानें मोहिमेच्या एकंदर खर्चाचें टांचण रामदेवरावाकडे पाठविलें व त्यास आपल्याबरोबर दिल्ली येथें येण्याविषयीं पाचारण केलें दिल्लीच्या बादशहानें रामदेवरावाचा दरबारांत बहुमान करून त्यास इतमामनें वागविलें आणि त्याजवर बहुमानाच्या पदव्यांचा वर्षाव केला. इतकेंच नव्हे तर देवगिरीचें राज्य त्याला परत देऊन गुजराथेंतील कांहीं प्रांत त्याचे राज्यास जोडण्याचा हुकूम केला शिवाय गुजराथेंतील नवसारी प्रांत त्यास जातइनाम करून दिला. या सर्व गोष्टीबद्दल दिल्लीच्या बादशहाचे आपण ताबेदार असल्याचें त्याजकडून बादशहानें कबूल करून घेतलें.

रामदेवरावानें मरेपर्यंत खंडणी देण्याचें कामी कुचराई केली नाहीं. उलट इ. स. १३०९ मध्यें मलिककाफूर आणि खराजाहाजी हे देवगिरीच्या मार्गानें वारंगळच्या राजास जिंकण्याकरितां जात असतां त्यांची रामदेवरावानें चांगली बडदास्त ठेविली.

इ. स. १३१० मध्यें अल्लाउद्दीन खिलजीनें वर निर्दिष्ट केलेल्या दोन सरदारांबरोबर मोठी फौज देऊन दोरासमुद्र येथील होयसलास

जिंकण्याकरितां दक्षिणेंत पाठविलें. देवगिरीजवळ त्यांचा मुक्काम पडला असतां रामदेवरावाच्या मृत्यूची त्यांस बातमी समजली. त्याचा मुलगा शंकरदेव ह्याची मुसलमानांविषयीं दिलसफाई नव्हती असें त्यास पक्कें ठाऊक होतें. शंकरदेव हा आपणांस केव्हांही अनुकूल होणार नाहीं अशी या दोन मुसलमान सरदारांची खात्री असल्यामुळें दोरासमुद्र येथील होयसल यादवराजास त्याजकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळूं नये म्हणून त्यांनीं आपलें बरेंच सैन्य पैठण येथें ठेविलें होतें; दोरासमुद्राचा तत्कालीन राजा तिसरा बल्लाळ ह्याचा पराभव करून त्याचें राज्य त्यांनीं घेतलें. दिल्लीस परत जातांना शंकरदेवाचे वाटेस उभयतां सरदार गेले नाहींत. इ. स. १३१२ मध्यें शंकरदेवानें दिल्लीच्या बादशहास खंडणी देण्याचें नाकारल्यावरून मलिककाफरास चौथ्यांदा दक्षिणेवर स्वारी करणें भाग पडलें. त्यानें शंकरदेवास पकडून त्याचा अमानुषपणें वध करविला; व महाराष्ट्र आणि कर्नाटक हे दोन्ही प्रांत बेचिराख केले. कोंकणच्या समुद्रकिनाऱ्यावरील चौलपासून दाभोळपर्यंत सर्व बंदरें त्यानें आपले ताब्यांत घेतलीं आणि आपण स्वतः देवगिरी येथें जाऊन राहिला.

थोडक्यांच दिवसांत दिल्लीदरबारांत अल्लाउद्दिनाविरुद्ध गुप्त कारस्थान चालूं असल्याबद्दलची खबर मलिककाफरास समजली; त्यामुळें त्यास दिल्लीस जाणें भाग पडलें. त्याचे गैरहजेरीचा फायदा घेऊन रामदेवरावाचा जांवई हरपाळदेव ह्यानें मुसलमानाविरुद्ध दक्षिणेंत चळवळ सुरूं केली; व त्यांना दक्षिणेंतून कायमचे हाकून देण्याचा संघटित प्रयत्न केला व त्या कामीं त्यास यश येऊन देवगिरीचें

राज्य त्यानें परत मिळविलें. दिल्लीच्या कारस्थानांत मलिककाफराचें अंग होतें; व त्यानेंच अल्लाउद्दिनास विषप्रयोग करून ता. १९ डिसेंबर १३१६ रोजीं ठार मारिलें असें म्हणतात. थोड्याच वेळांत मलिककाफरचा खून झाला, व अल्लाउद्दिनाचा तिसरा मुलगा मुबारक हा दिल्लीच्या गादीवर बसला.

इ. स. १३१८ त हरपाळदेवास शिक्षा करण्यासाठीं मुबारक हा आपलेबरोबर मोठें सैन्य घेऊन दक्षिणेवर मोहीम करण्यासाठीं निघाला. मुबारकाचें सैन्य देवगिरीवर येत आहे असें समजतांच हरपाळदेव व त्याचे सार्थीदार पळाले. मुबारक यानें हरपाळदेवाचा पाठलाग करण्याकरितां आपलें सैन्य पाठविलें व त्यास पकडून त्याच्या अंगाची सालटीं काढून त्याचा क्रूरपणानें वध केला; आणि त्याचें शिर देवगिरी शहराच्या मुख्य महाद्वारावर लटकत ठेविलें. ह्याप्रमाणें देवगिरीच्या यादवघराण्याचा शेवट झाला व दक्षिणेंतील हिंदुपादशाही नष्ट झाली !!

देवगिरीच्या गादीवर आल्यावर, रामदेवराव जाधवानें मोठ्या पराक्रमानें कर्नाटक व म्हैसूर प्रांत जिंकून तेथें आपला अंमल बसविला; व तेथील राज्यकारभार व्यवस्थित रीतिनें चालविण्यासाठीं आपले विश्वासांतील अंमलदार नेम्मिले वगैरे हकीगत पूर्वी येऊन गेली आहे. शिवाय तत्कालीन शिलाशासनें व ताम्रपट यावरून गुजराथ, माळवा वगैरे प्रांताच्या राजांना त्याचा मोठा दरारा होता असें दिसून येतें. ही गोष्ट जर खरी असेल, तर अल्लाउद्दिनाचें आठ हजार निवडक सैन्य देवगिरीच्या दरवाजानाजिक थडकेपर्यंत, रामदेवराव जाधव, अगर त्याचा युवराज शंकरदेव; व इतर अंमलदार

ह्यांस या परचक्राची दाद कशी लागली नाहीं यांचें आश्चर्य वाटतें!! इतकेंच नव्हे तर, अल्लाउद्दिनानें देवगिरीवर अकस्मात् छापा घालून रामदेवराव जाधवास अल्पावधींत नामोहरम करून त्याचे राजधानीचे शहर बिनदिक्कत लुटावें ही गोष्ट त्यास अत्यंत लांछनास्पद होय!! अल्लाउद्दिनानें केलेल्या आकस्मिक हल्ल्यानें गर्भगळित होऊन, रामदेवराव जाधवानें आपला युवराज शंकरदेव, अगर आपले प्रधानमंडळ यांच्या सल्ल्यावांचून त्याच्याशीं एकदम तह करावा व त्यानें लुटलेली सर्व संपत्ति नेण्यास त्यास संमत्ति द्यावी ही गोष्ट तर सर्वांत तिरस्करणीय होय! आयत्यावेळीं शंकरदेवानें लोक जमवून अल्लाउद्दिनाचे सैन्यास परतविण्याचा प्रयत्न केला; परंतु तो यशस्वी झाला नाहीं. देवगिरीच्या 'अजिंक्य' दुर्गांत निवडक लोकांनिशि राहून रामदेवराव जाधवानें आपला बचाव करण्याचा प्रयत्न केला. परंतु जेव्हां धान्यांच्या पोत्यांत धान्याऐवजीं मीठ सांठविलेलें आढळून आलें तेव्हां गोटांत फंदफितुरी असल्याबद्दल त्याची खात्री झाली; व त्यास दातीं तृण धरून अत्यंत अपमानकारक तह अल्लाउद्दिनाबरोबर करणें भाग पडलें. अल्लाउद्दिनानें या परिस्थितीचा फायदा घेऊन दुसऱ्या वेळच्या तहाच्या अटी प्रथम केलेल्या तहाच्या अटींपेक्षां जास्त जरब केल्या!! या उद्वेगजनक हकीकतीवरून, रामदेवराव जाधवाच्या राज्यकारभारावर चांगला प्रकाश पडतो!!

गृहकलह, मंत्रिमंडळांत अनुभवी व कर्तबगार माणसांचा अभाव, प्रजेंत भयंकर असंतोष, सैन्यांत बेशिस्तपणा व फंदफितुरी, राज्यकर्त्यांची विषयमग्नता व कर्तव्यशून्यता इत्यादि अनेक कारणां-

मुळें दुसऱ्या बाजीरावाच्या अमदानींत मराठ्यांची सत्ता लयास गेली ! रामदेवराव जाधवाचे राजवटींत यादवांचें साम्राज्य संपुष्टांत येण्यास ह्याच गोष्टी कारणीभूत झाल्या ! हेमाद्रीसारख्या राजनिष्ठ, राज्यकार्यधुरंधर, युद्धकुशल व राजघराण्याचा अभिमान बाळगणाऱ्या मंत्र्याचे दरबारांत वजन कमी झाल्यामुळें, त्यानें आपलें अंग राजकारणांतून काढून घेतलें ! वर्णाश्रमधर्मविरोधी व मूर्तिपूजकावर वक्रदृष्टि ठेवणाऱ्या महानुभावपंथीयांचें राजदरबारांत वर्चस्व वाढल्यामुळें सनातन हिंदुधर्माभिमान्यांचे मनांत रामदेवरावासंबंधीं असलेला पूज्यभाव नाहींसा झाला होता, व सनातन हिंदुधर्माचे कट्टे अनुयायी, रामदेवरावास धर्मभ्रष्ट म्हणून समजूं लागले होते.

या व इतर अनेक कारणामुळें त्याचे राज्याची घडी बिघडली होती. कर्नाटक, म्हैसूर, कोल्हापूर वगैरे दूर दूरचे प्रांतांवरील त्याचा अंमल शिथिल झाला होता असें दिसतें. राज्यांत अंदाधुंदी माजल्यामुळें प्रजेकडून कराची वसूली होण्याचें बंद झालें. तिजोरींत पैसा शिल्लक नसल्यामुळें राज्यांत खडे सैन्य ठेवण्याची अगर परचक्र आल्यास त्याला तोंड देण्याची राजकर्त्यास ताकद उरली नव्हती. आष्ट्याच्या लढाईत, सरबत्तींच्या दारूच्या पोत्यांत आयत्यावेळीं बाजरी भरलेली आढळून आल्यामुळें बापुगोखल्यास जो कटु अनुभव आला तोच अनुभव देवगिरीच्या दुर्भेद्य दुर्गात रामदेवराव जाधवास आला.

रामदेवरावाच्या पूर्वजांनीं मोठ्या पराक्रमानें भरभराटीस आणलेलें व साम्राज्य पदवीस पोहोंचविलेलें देवगिरीचें राज्य त्यांनीं आपल्या मूर्खपणामुळें अल्पावधींत गमाविलें ! इतिहासाची पुनरावृत्ति होते

असें म्हणतात. श्रीशिवाजी महाराजांनी महत्प्रयासानें स्थापन केलेल्या मराठ्यांच्या राज्याचीं सूत्रें कर्तृत्वहीन लोकांच्या हातीं गेल्यानंतर त्याचा काय अवस्था झाली, याची वाचकांस आठवण करून देण्याची जरूर नाहीं.

अल्लाउद्दिनानें देवगिरीवर एकाएकी छापा दिल्यामुळें रामदेवराव जाधवास आपलें सैन्य वेळेवर रणांगणावर नेऊन त्याच्याशी दोन हात करण्यास संधि मिळाली नाहीं असें कदाचित म्हणतां येईल. परंतु अल्लाउद्दिनाबरोबर तह केल्यानंतर रामदेवराव इ. स. १३०९ मध्यें कालवश होईपर्यंत जो काळ लोटला त्या मुदतींत त्यास कर्नाटक, म्हैसूर, कोल्हापूर, कोंकण वगैरे आपल्या अमलाखालच्या प्रांतांतून सैन्य जमवून दिल्लीच्या बादशहाशी दोन हात करून आपली गेलेली अब्रू पुन्हा मिळविण्यास कोणती हरकत होती? वास्तविक पाहिलें असतां वर नमूद केलेल्या प्रांतावर देवगिरीच्या यादवांचा नामधारी अंमल राहिला होता व रामदेवरावाविषयीं प्रजेच्या मनांत बिलकुल आदर वसत नव्हता! रामदेवराव जाधवाकडून खंडणी वक्तशीर न आल्यामुळें अल्लाउद्दिनानें त्याजवर आपला सरदार मलिक काफूर यास पाठविलें होतें. त्यावेळींही रामदेवानें बादशहाचा हुकुम निमूटपणें मानला सरतेशेवटीं दिल्लीस जाऊन बादशहाचे आपण तावेदार असल्याबद्दलची त्यानें कबुली दिली आणि दक्षिणेंत त्यावेळीं अस्तित्वांत असलेल्या हिंदुराज्यांचा नायनाट करण्याचें कामीं दिल्लीच्या बादशहास मदत करण्याचा त्यानें करारमदार केला. रामदेवराव जाधवास आपल्या कमकुवतपणाची पूर्ण जाणीव असल्यामुळें दिल्लीच्या परधर्मीयराजाची त्यानें तावेदारी

पतकरिली व स्वार्थाकरितां राष्ट्रद्रोह करण्यास तो प्रवृत्त झाला! याच्या उलट प्रकार साडेतीनशें वर्षांनंतर महाराष्ट्राच्या इतिहासांत श्रीशिवाजीमहाराजाचे वेळीं घडून आला; त्याची वाचकांस साहजिक आठवण झाल्यावाचून राहणार नाहीं.

औरंगजेब बादशहानें जयसिंगास श्रीशिवाजीमहाराजाकडे पाठवून मोंगल बादशहाचे आपण दरखनचे सुभेदार आहों अशी त्याजकडून कबुली मिळविण्यासाठीं हरएक प्रयत्न केले. परंतु मोंगलांचें मांडलिकत्व पत्करण्यास आपण केव्हांही तयार होणार नाहीं, असें महाराजांनीं औरंगजेबास सडेतोड व बाणेदार उत्तर देऊन आपल्या अंगी असलेल्या ओजस्वितेची व जाज्वल्य स्वाभिमानाची दिल्लीश्वरास ओळख करून दिली!

स्वतःचे उज्वल वर्तन, राष्ट्राचा पाठिंबा, हिंदुधर्माचा यवनाकडून होत असलेल्या छळामुळें हिंदुसमाजांत उत्पन्न झालेली संघट्टणशक्ति, धाडशी व कर्तृत्ववान लोकांचे साहाय्य, इत्यादि सर्व गोष्टी श्रीशिवाजीमहाराजांना त्यावेळीं अनुकुल होत्या हें विसरतांकामा नये.

महानुभावपंथीय एका ग्रंथात हेमाद्रीनें तुर्कास बोलावून रामदेवरावाचे राज्य बुडविलें असा त्याजवर बाष्कळ आरोप केला आहे. त्याचे निराकरण करण्याची फारशी जरूरी नाही. ओवळे येथील ताम्रपटांत हेमाद्रि हा देवगिरीच्या राज्याचा आधारस्तंभ असल्याबद्दल व तो सद्गुणांचा केवळ पर्वत होता असें खुद्द रामदेवरावानें म्हटलें आहे. हेमाद्रि हा महान् विष्णुभक्त असून भागवतधर्माचा कट्टा अभिमानी होता, ही गोष्ट **मुक्ताफल** ग्रंथांवरून दिसून येते. शिवाय महादेवराय जाधवाच्या सबंध कारकीर्दीत व रामदेवरावाच्या आरंभींच्या अमदानींत

ज्यानें देवगिरीच्या यादवांच्या राज्याची इभ्रत वाढविली, असा थोर, विचारी, सद्गुणसंपन्न, हिंदुधर्माचा कट्टा अभिमानी पुरुष, आपण स्वतः पाणी घालून वाढविलेला हिंदुपादशाहीरूपी वृक्ष परधर्मीयाकडून तोडून टाकण्याचें महत्पाप व नीच कर्म करण्यास प्रवृत्त होईल अशी शंका घेण्यास विचारी माणसाचें मन केव्हांही धजणार नाहीं !

यादवांच्या राज्याच्या ऱ्हासाची कारणें देतांना इतिहासाचार्य राजवाडे यांनीं सर्व दोषांचें खापर हेमाद्रीच्या डोक्यावर फोडलें आहे. " यादवांच्या अमदानींत म्हणजे इ. स. १३ शतकाच्या उत्तरार्धात मराठ्यांचें सर्व लक्ष परमार्थाच्या नांवावर ऐहिक उपभोग घेण्याकडे लागलें होतें. १३ व्या शतकांतील अत्यंत मोठा असा मानिलेला ग्रंथ म्हटला म्हणजे हेमाद्रीचा **चतुर्वर्गचिंतामणि** हा होय. या ग्रंथाच्या व्रतखंड नामक भागांत दर दिवसाला व दर तिथीला दहा दहा पांच पांच व्रतें सांगितलीं आहेत व त्या त्या व्रताला कोणत्या देवाची कोणतें पक्वान्न करून किती ब्राह्मण घालून प्रीति संपादन करावी ह्याचा श्रुति, स्मृति, व पुराणें यांतील उतारे देऊन गंभीरपणें निर्णय केला आहे. लोकांची व्रतें करण्याकडे, ब्राह्मणभोजनें घालण्याकडे, पक्वान्नें खाण्याकडे व तद्द्वारा मोक्ष मिळतो अशा मताकडे अतोनात प्रवृत्ति असल्यावांचून हेमाद्रीनें हीं व्रतें केवळ पांडित्य दाखविण्याकरितां किंवा करमणूक करण्याकरितां सांगितलीं असतील हें संभवत नाहीं. पक्वान्न आणि व्रत ह्यांची फारकत व्रतखंडांत एकही ठिकाणीं केलेलीं नाहीं. एवढी दोन हजार व्रतें ज्या ग्रंथांत सांगितलीं आहेत असा पृथ्वीवरील दुसऱ्या कोणत्याही भाषेंत

कोणत्याही काळीं एकहीं ग्रंथ अद्यापपर्यंत निर्माण झाला नाहीं. व्रतैकदृष्टि किंवा सुखैकदृष्टि लोकांच्या हातीं मुबलक पैसा असल्यावर त्यांच्याकडे बुभुक्षु, मेहनती, साहसी व निर्धन अशा लोकांचें लक्ष जावें ह्यांत आश्चर्य नाहीं. सिंघणादि वीरांच्या विजयानें लोक अत्यंत धनसंपन्न होऊन व्रतें, उद्यापनें करण्याच्या मिषानें सुखैकपरायण व विलासमग्न झाले; व हीच मराठ्यांच्या नाशाची तेराव्या शतकांत कारणें होती. परमार्थाच्या नांवाखालीं ही जी सुखैकपरायणवृत्ति नांदत होती तिचा फायदा घेऊन मुसलमानांनीं मराठ्यांचा पराभव केला. ”

रामदेवराव जाधव याच्या अमदानींत धार्मिक व सामाजिक बाबतींत ज्या अकल्पित घडामोडी झाल्या त्यांचा सूक्ष्म रीतिनें अभ्यास करणारांना राजवाडे ह्यांची सदरील विचारसरणी पटण्यासारखी नाहीं. कालपरत्वें हिंदुधर्मास आलेली ग्लानि नाहिशीं करून लोकांमध्यें धर्मजागृति व्हावी या हेतूनें, हेमाद्रीनें चतुर्वर्गचिंतामणि नांवाचा ग्रंथ रचिला. व्रतखंडाखेरीज दानखंड, मोक्षखंड, तीर्थखंड व परिशेषखंड असे चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथाचे आणखी भाग आहेत. हिंदुधर्मास प्राप्त झालेले मालिन्य नाहिसें होऊन सनातन धर्माविषयीं एकंदर हिंदुसमाजांत आस्था उत्पन्न व्हावी या उदात्त हेतूनें हेमाद्रीनें लिहिलेल्या ग्रंथाबद्दल राजवाडे ह्यांच्यासारख्या सनातन हिंदुधर्माबद्दल अभिमान बाळगणाऱ्या विद्वान् गृहस्थानें अशा प्रकारचे अनुदार उद्गार काढावे हे आमच्या देशाचें दुर्दैव होय!

यादवराजघराण्याची संपूर्ण वंशावळ. नं. १

हेमाद्रीच्या व्रतखंडांत दिलेल्या राजप्रशस्तीत, यदुकुलवंशीय राजांची पौराणिक काळापासून ऐतिहासिक काळांतील देवगिरीच्या यादवराजघराण्यांपैकीं महादेवराजापर्यंत जी त्रोटक हकिगत दिली आहे. त्यावरून तयार केलेली वंशावळः–

पौराणिक.

१	२	३	४	५
इन्दु	सुयज्ञ	वृष्णि	पुरुहोम	अनिरुद्ध
बुध	उशना	निवृत्ति	आयु	यक्ष
पुरुखा	स्थितेयु	व्योमाच्छ	सत्वत	वज्र
आयु	मरुत्त	जीमूत	अन्धक	प्रतिबाहु
नघुष	विक्रम	भीमरथ	भजमान	चक्रबाल
ययाति	कम्बलबर्हि	नवरथ	विदुरथ	सुबाहु
यदु	रुक्मक	दशरथ	स्वयंभोज	
क्रोष्टा	पराजित	शकुनि	हृदिक	
स्वाहित	जामय	करंभि	इदुष	
नृशंकु	विदर्भ	देवरात	वसुदेव	
चित्ररथ	क्रथ	देवक्षेत्र	मुरारी	
पृथुश्रवा	कुंति	मधु	प्रद्युम्न	
		कुरुबल		

ऐतिहासिक

(पूर्वकालीन ऊर्फ सेऊण यादवांची)

१.	२
दृढप्रहार	वेसुगी
सेऊणचंद्र (पहिला)	अर्जुन
धाडियस	भिल्लम (३)
भिल्लम (पहिला)	वादुगि
राजुगि	वेसुगि
वादुगि	भिल्लम (४)
धाडियस	सेऊण (२)
भिल्लम (२)	परम्मदेव (ऐरम्मदेव)

(उत्तरकालीन अथवा देवगिरीच्या यादवांची)

१	२
सिंहराज	जैत्रपाळ
मल्लुगि	सिंघण (सिंहण)
अमरगांगेय	कृष्ण
गोविंदराज	महादेव
अमरमल्लुगि	
कालीय बल्लाळ	
भिल्लम (५)	

चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथ महादेव राजाचे राजवटींत पुरा झाल्यामुळें त्याचे पश्चात् गादीवर बसलेल्या राजांची नांवें त्यांत असणें शक्य नाहीं.

वंशावळ नं. २

वसईच्या ताम्रपटांत नाशिक जिल्ह्यांतील चिंचोली गांव दान देतांना पूर्वकालीन यादवराजांची दिलेली वंशावळ शके ९९१ (इ. स. १०६९)

१

दृढप्रहार

|

सेऊणचंद्र

|

धाडियप्पा

|

भिल्लम (थोरला)

|

श्रीराज

|

वद्दिग

|

भिल्लम=लस्थियव्वा

|

तेसुक (वेसुक) ऊर्फ वासुगी=लाट देशचा चालुक्य राजा बाराप्पा (गोगीचा मुलगा) याची मुलगी नायलदेवी.

|

भिल्लम (आहवमल्ल)

|

सेउणचंद्र (दुसरा)

वंशावळ नं. ३.

संगमनेर येथील ताम्रपटांत यादव राजकुलाची दिलेली वंशावळः—शके ९९२ (इ. स. १०००).

पौराणिक	ऐतिहासिक
शंभू	सेऊणचंद्र
ब्रह्मा	दृढप्रहार
मरीचि	भिल्लम (पहिला)
अत्रि	राजा (श्रीराज) (राजनी)
इंदु	वंदगि (वद्दगि)
पुरुरवा	भिल्लम (दुसरा)
आयुष	
नघुष	
ययाति	

वंशावळ नं० ४

सेउणदेश (पूर्वकालीन) यादववंशीय इरम्मदेव (परम्मदेव) याचे वेळच्या आश्वि येथील ताम्रपटांत दिलेली वंशावळ शके १०२० (इ. स. १०९८)

दृढप्रहार
|
सेउणचंद्र (पहिला)
|

धाडियप्पा
|
भिल्लम (पहिला)
|
श्रीराज
|
वादिग
|
भिल्लम (श्रीकर) (दुसरा) = झंझराजाची कन्या लस्थियव्वा
|
श्रीवंसुक
|
भिल्लम (तिसरा)
|
सेऊण (२)
|
इरम्मदेव

वंशावळ नं. ५

कलसबुद्रुक येथील ताम्रपटांत पूर्वकालीन यादवराजांची दिलेली वंशावळ शके १०२५ (इ. स. ११०३)

१
सेऊणचंद्र (यादवनारायण)
|
धाडियप्पा
|
भिल्लम (पहिला)
|
राजा (श्रीराज)
|
वादिग
|

भिल्लम (दुसरा)=लक्ष्मी (राष्ट्रकूट वंशातील कन्या)
|
वासुगी ऊर्फ वेसुक
|
भिल्लम (तिसरा)

वंशावळ नं. ६


अंजनेरीचे शिलालेखांतील दानपत्रांत पूर्वकालिन यादवराजांची दिलेली वंशावळः–शके १०६३ (इ. स. ११४१).

१
दृढप्रहार (शके ७४०)
|
सेऊणचंद्र
|
धाडियाप्पा
|
भिल्लम (१) श्रीराज
|
वद्दिग=(झंझराजाची मुलगी लस्थियव्वा)
|
तेसूक=(चालुक्य राजवंशांतील मुलीबरोबर विवाह)
|
भिल्लम (२)=चालुक्य जयसिंह राजा याच्या मुलीबरोबर विवाह

सेऊणचंद्र (२) [शके ९९१]
.....
.....
सेऊणचंद्र (३) [६७६३]


वंशावळ नं. ७

हरळाहळ्ळीच्या रतिग्राम येथील ताम्रपटांत दिलेली वंशावळः– (जिल्हाः–धारवाड तालुकाः–कलादगी) हरळाहळ्ळी येथील उदचम्मा देवीच्या देवळाचे मागील आवारांत सांपडलेल्या ताम्रपटांवरूनः– शके ११५९–६० (इ. स. १२३७–३८)




वंशावळ नं. ८

जैनाच्या बस्तीस दान दिलेल्या ताम्रपटावरून:—शके ११९१ (इ. स. १२६९)



वंशावळ नं. ९


पैठण येथील ताम्रपटावरूनः– शके ११९३ (इ.स.१२७१)



वंशावळ नं. १०


ठाणें नजीक असलेल्या ओवळे गांवचे ताम्रपटांत दिलेल्या दानपत्रावरूनः–(शके ११९४) उत्तरकालिन देवगिरी येथील राजांची वंशावळः–(शतषष्टि=साष्टी).





वंशावळ नं. ११


हरिहर येथील ताम्रपटांतील दानपत्रावरून.--शके ११९९ (इ. स. १२७७)



वंशावळ नं. १२

सर रा. गो. भांडारकर यांच्या दख्खनच्या इतिहासांत दिलेली यादवांची वंशावळः––

पूर्वकालीन यादव



वंशावळ नं १३

उत्तरकालीन अथवा देवगिरी येथील यादवराजांची वंशावळ.

१
मल्लुगि
|
भिल्लम (१) (इ. स. ११८७-९१)
|
जैत्रपाल उर्फ जैतुगी (१) (११९१-१२१० इ. स)
|
सिंघण (१२१०-१२४७)
|
जैत्रपाल उर्फ जैतुगी (२)
|
कृष्ण (इ. स. १२४७-६०) — महादेव
|
रामचंद्र ऊर्फ रामदेव
(इ. स. १२७१-१३०९)
|
शंकर———कन्या = हरपाळ
(इ. १३०९-१३१२)



भाग ४ था.

रामदेवराव यादवाच्या (जाधवाच्या) राजवटींत मराठी वाङ्मयाचा उत्कर्ष

सकलविबुधमानः श्रीनिकेतं वदान्यः
समदविबुधसिंहः श्रीनिवासाङ्घ्रिस्नेहः ।
जयति विनयसिन्धु र्वामनेशः सुबन्धुः
प्रणतसकलभूपः कृष्णवंशैकदीपः ॥

– श्रीबोपदेवकृत मुक्ताफल.

श्रीबोपदेवानें आपल्या **मुक्ताफल** ग्रंथांत **देवगिरीश्वर** यदुकुलवंशीय रामदेवराव जाधव याच्या गुणांचें वर्णन वरील श्लोकांत लिहिल्याप्रमाणें केलें आहे. तो सर्व विद्वानांत श्रेष्ठ (कविकेसरी) असून अखिल गुणिजनांचा चहाता होता असें विद्वान्मान्य व कविश्रेष्ठ श्रीबोपदेवानें रामदेवरावासंबंधानें काढलेले प्रशंसोद्गार निव्वळ औपचारिक असतील असें वाटत नाहीं. हेमाद्रीनें मुक्ताफल ग्रंथावर ' कैवल्यदीपिका ' नांवाची टीका लिहिली आहे, तींतहि सदरील प्रशस्तीस पर्यायानें पुष्टी दिली आहे. महादेवराजाचे राजवटींत राजाश्रयामुळें हेमाद्रीस ' चतुर्वर्गचिंतामणि ' सारखा विस्तृत धर्मग्रंथ पुरा करता आला. हेमाद्रीनें संस्कृतांत ग्रंथरचना करण्याचा आपला व्यासंग रामदेवरावाच्या राजवटींतही सारखा चालू ठेविला होता. यामुळें विद्वान लोकासंबंधानें त्याची सहानुभूति असणें साहजिक होते. शिवाय देवगिरीच्या दरबारांत हेमाद्रि मुख्य मंत्रिपदावर असल्यामुळें त्याजकडून, महादेवराय व रामदेवराव यांस विद्वान् ग्रंथकारांस व कवीस राजाश्रय देण्याचें कामीं वेळोवेळीं सल्ला मिळत

असली पाहिजे. देवगिरीच्या दरबारांत संस्कृत व मराठी ग्रंथकारांचा जो गौरव होत असे त्याचे बरेंचसे श्रेय हेमाद्रीस देणें जरूर आहे. महानुभावपंथाच्या वाङ्मयांत या विधानास दुजोरा मिळतो ही गोष्ट त्यांतील पुढें दिलेल्या उताऱ्यावरून दिसून येईल.

रामदेवरावाचे पूर्वी भरतखंडांत विद्वान लोकांना आश्रय देणारे राजे बरेच होऊन गेले. **समुद्रगुप्त, विक्रमादित्य, श्रीहर्ष,** धारचे **मुंजदेव** (इ. स. ९७३ ते ९९७) व **भोजदेव** (इ. स. १०१० १०५५) वगैरे राजांनीं आपापल्या राजवटींत विद्वानास उदार आश्रय देऊन आर्यसंस्कृतीचें व संस्कृत विद्येचे संवर्धन केले म्हणून त्यांचीं नांवें भारतीय इतिहासांत चिरस्मरणीय झाली आहेत. श्री-हर्षाप्रमाणें कांहीं राजे स्वतः ग्रंथकार होते ही गोष्ट खरी. परंतु विद्वान लोकांकडून ग्रंथ लिहवून व ते आपल्या नांवावर प्रसिद्ध करून ग्रंथकार या नात्यानें आपली कीर्ति अजरामर राहावी अशी महत्वाकांक्षा बाळगणारे राजे प्राचीन काळांत कमी होते असे नाहीं. खुद्द रामदेवराव जाधव यास अशाप्रकारची महत्वाकांक्षा होती अशाविषयीं महानुभाव पंथाच्या वाङ्मयांत उल्लेख आढळतो. रामदेवराव जाधवाच्या राजवटींत **नरेन्द्र** नांवाचा प्रतिभासंपन्न कवि होता. त्यानें आपल्या ग्रंथांत या बाबतींत स्वतःचा अनुभव लिहून ठेवला आहे, त्यांतील उतारा पुढें दिला आहे.

रामदेवरावाच्या दरबारांत संस्कृत पंडित व कवि यांना पूर्वापार वहिवाटीप्रमाणें राजाश्रय मिळत असे यांत विशेष कांहीं नाहीं. परंतु त्याचे राजवटींत संस्कृत पंडित व कवि यांच्याशीं स्पर्धा करणारे नवीन भावंड उत्पन्न झालें होतें. हेमाद्री हा मराठी भाषेचा कट्टा

आभिमानी असून तिच्या उत्कर्षासाठीं सारखा झटत असे हेमाद्रीनें रघुवंशावर 'दर्पण' नांवाची टीका लिहिली आहे, असें कांहीं विद्वानांचें मत आहे. त्यांत संस्कृत पारिभाषिक शब्दांचे मराठी प्रतिशब्द (Synonyms) त्यानें जागोजाग दिले आहेत, जसे प्लवरोह= झाडाच्या पारंव्या; वगैरे शिवाय त्यानें राजदरबारांत मराठी भाषेचा शिरकाव करवून, दरबारचा पत्रव्यवहार थोड्या अवधींत मोठ्या प्रमाणावर करतां यावा म्हणून 'मोडी' लिपी प्रचारांत आणिली. यावरून मराठी भाषेची अभिवृद्धि सर्व बाजूंनीं झपाट्यानें व्हावी अशाबद्दल हेमाद्रीची सारखी खटपट चालू होती ही गोष्ट निःसंशय होय.

रामदेवराव जाधवाच्या कालापर्यंत भारतीय पंडित व कवि यांचा कल संस्कृत भाषेत ग्रंथरचना करण्याकडे असे. संस्कृताखेरीज इतर भाषेंत ग्रंथ लिहिण्याकडे कोणाचीही प्रवृत्ति नसे. याची कारणें काय असतील ती असोत ! संस्कृत भाषा ही देवाची भाषा; तींत श्रुति, स्मृति, पुराणें वगैरे धर्मग्रंथ लिहिलेले असल्यासुळें, तिला सर्व बाजूंनीं विशेष प्रकारचें महत्व प्राप्त झालें होतें. संस्कृतांत जो ग्रंथ लिहील त्याचीच विद्वानांत गणना होत असे. संस्कृत भाषा ही व्यवहारांतील बोलण्याची भाषा नव्हती, तरी त्या भाषेवर प्रभुत्व मिळवून एखादा विद्वन्मान्य ग्रंथ लिहावा अशी दरएक पंडितास महत्वाकांक्षा असे.

यूरोपखंडांत इ. स. १५।१६ शतकापर्यंत ल्याटिन भाषेंत ग्रंथरचना करण्याकडे विद्वानांची प्रवृत्ति होती. खुद्द (बायबल) (ख्रिस्तधर्माचे पुस्तक) ल्याटिन अगर ग्रीक भाषेंत लिहिलेलें

असल्यामुळें त्यांतील रहस्य समजून घेण्यास बहुसंख्याक समाजास धर्मगुरूंच्या तोंडाकडे पहावें लागे. ही शोचनीय स्थिति नाहींशी करून, दरएक देशांतील लोकांच्या नेहमीच्या बोलण्यांत असलेल्या भाषेंत बायबलाचें रूपांतर करून घेण्यासाठीं लूथर सारख्या समाजसुधारकास बरींच वर्षे यूरोपांत झगडावें लागले. इंग्लंडांतील विद्वान् गृहस्थ लॉर्ड बेकन ह्यास (Advancement of Learning) हा ग्रंथ इंग्रजी भाषेंत लिहिण्यापूर्वी लॅटिन भाषेंत त्याच अर्थाचा (Novum Organum) ग्रंथ लिहिणें भाग पडलें. नाहींतर त्याची युरोपखंडांतील विद्वानांत गणना झाली नसती.

संस्कृतभाषा अवगत असणाऱ्या लोकांची संख्या अत्यंत अल्प असल्यामुळें तिजमध्यें असलेलें ज्ञानभांडार मूठभर विद्वान लोकांच्या हातीं असे. यामुळें बहुजनसमाजास कित्येक शतकें अज्ञानांत राहावें लागलें. लोकांच्या बोलण्याच्या भाषेंत ग्रंथरचना होत नसल्यामुळें, त्यांस, आपली धार्मिक व नैतिक उन्नति करून घेण्याची साधनें उपलब्ध नव्हती.

ही शोचनीय स्थिति खिस्तशकापूर्वी सुमारें चौथ्या शतकांत **गौतम बुद्ध** याच्या लक्षांत आल्यामुळें त्यानें आपले सर्व धर्मग्रंथ पालि व मागधी भाषेंत लिहिण्याचा उपक्रम केला. संस्कृतांत बौद्धधर्माचा कोणताही ग्रंथ लिहिला जाऊं नये अशी त्यानें आपल्या शिष्यांना व प्रचारकांना आज्ञा केली होती. दरएक देशांत अगर प्रांतात लोकांच्या नेहमींच्या बोलण्याच्या भाषेंत बुद्धधर्माच्या तत्त्वांचा ग्रंथरूपानें अगर व्याख्यान द्वारें प्रसार करावा, अशी त्याची आपल्या शिष्यांना व प्रचारकांना स्पष्ट आज्ञा होती. त्यामुळें बुद्धधर्माचा

प्रसार बहुजन-समाजांत फार झपाट्यानें झाला. गौतम बुद्धानें जीं मतें प्रतिपादन केलीं तीं सनातन वैदिक धर्मग्रंथांत मुळींच नव्हतीं असें नाहीं. परंतु त्यानें अपल्या धर्माचीं तत्त्वें बहुजनसमाजास लोकांच्या नेहमींच्या बोलण्याच्या भाषेंत समजून देण्याचा सुसंघटित प्रयत्न केल्यामुळें सदरील धर्माचा प्रसार करण्याचे कामीं त्यास चांगलें यश आलें.

शके ११८० ते ११८५ च्या दरम्यान देवगिरीच्या आसपास एक अकल्पित योग घडून आला. त्यामुळें मराठी भाषेच्या उत्कर्षाची मुहूर्तमेढ रोविली गेली. श्रीचक्रधर नांवाच्या महाराष्ट्रीय ब्राह्मणानें कृष्णदेव व महादेव यांच्या राजवटींत महानुभावपंथाची स्थापना केली. सदरील सांप्रदायाचा त्रोटक इतिहास या पुस्तकाच्या ७ व्या भागांत दिला आहे.

श्रीचक्रधरानें महानुभाव पंथाचे धर्मग्रंथ मराठींत लिहिण्याचा स्तुत्य उपक्रम केला. त्याच्या पट्टशिष्यांनीं व अनुयायांनीं त्याच्या आज्ञेनुसार सदरील पंथाचें सर्व ग्रंथ मराठींत रचिले. महानुभाव पंथाचें मुख्य उपास्यदैवत श्रीकृष्ण असल्यामुळें, व देवगिरीचे यादवराजे आपल्या पूर्वजांचा संबंध यदुवंशीय श्रीकृष्णाशी जोडण्यांत अभिमान बाळगणारे असल्यामुळें, तत्कालीन यादवराजा रामदेवराव याचा ओढा साहजिकच त्या पंथाकडे असावा यांत कांहीं आश्चर्य मानण्याचें कारण नव्हतें. राजदरबारांत महानुभावपंथाचे ग्रंथकार व कवि ह्यांचे श्रीकृष्णाच्या लीलेसंबंधीं भक्तिरसानें ओथंबलेले अनेक ग्रंथ रामदेवरावाच्या दृष्टिपुढें येऊं लागले. देवगिरीच्या दरबारांत मराठी भाषेचा सर्व बाजूंनीं उत्कर्ष व्हावा हे हेमाद्रीचे ध्येय

असल्यामुळें सदरील सांप्रदायाचे ग्रंथास स्वतःचे पूर्वग्रह बाजूस ठेऊन त्यानें राजाश्रय देण्याचें कामीं मनःपूर्वक सहाय्य करून आपले मराठी भाषेवरील अकृत्रिम प्रेम व्यक्त केलें.

याच सुमारास (म्हणजे शके ११९७ चे सुमारास) रामदेव-राजाच्या राजवटींत पैठण येथें श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा अवतार झाला. २१ वर्षांच्या अल्पायुर्मर्यादेत संस्कृत व मराठी भाषांवर त्यांनीं मिळविलेले प्रभुत्व व षड्दर्शनशास्त्रांच्या अभ्यासांत संपादिलेले नैपुण्य त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची साक्ष पटवितात. त्यांचे काळांत विद्वान् लोकांची प्रवृत्ति संस्कृतांत ग्रंथ लिहिण्याकडे होती; असें असतां श्रीमद्भगवद्गीतेसारख्या गहन व तत्वज्ञानपूर्ण ग्रंथावर मराठींत टीका लिहिण्याचे त्यांनीं धाडस केलें ही फार महत्त्वाची गोष्ट होय. संस्कृत भाषेंत ग्रंथ लिहिण्याची पूर्वापार वहिवाट सोडून आपण मराठींत टीका लिहिण्याचा उपक्रम कां केला याची महाराजांनीं ज्ञाने-श्वरीच्या सहाव्या, दहाव्या व तेराव्या अध्यायांत कारणें दिलीं आहेत तीं फार मननीय आहेत. मराठी भाषा ही, जोम व गोडी याबाबतींत संस्कृत भाषेच्या बरोबरीची किंबहुना कांकणभर अधिक आहे असें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं प्रतिपादन केलें आहे. श्रीमद्भगवद्गीतेसारख्या अलौकिक धार्मिक ग्रंथांतील अमूल्य तत्वें प्राकृत जनास सहज सम-जलीं जावीं व त्यायोगें **भागवतधर्माचा** प्रसार बहुजन समाजांत व्हावा हा श्रीज्ञानेश्वर महाराजांचा अंतस्थ हेतु असावा असें दिसतें. त्यांच्या पश्चात् सुमारें चारशें वर्षें महाराष्ट्रांत अनेक संतांनीं त्यांचा कित्ता गिरवून त्यांचा हेतु सफल केला व भागवतधर्माची तत्त्वें महाराष्ट्रांत दृढमूल केली, ही गोष्ट वाचकांस नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं.

श्रीज्ञानेश्वरमहाराज हे महाराष्ट्रांतील भागवतधर्माचे आद्यप्रवर्तक होत असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. श्रीमद्भगवद्गीतेसारख्या ग्रंथावर मराठींत विवरण करितानां संस्कृत शब्दांस, व सांख्य, योग व इतर गहनशास्त्रांतील पारिभाषिक शब्दांस मराठींत प्रतिशब्द अगर अन्वर्थक शब्द मिळतील किंवा नांहीं अशी शंका श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या मनास बिलकुल शिवली नाहीं. कोणतीही गोष्ट नव्यानें प्रचारांत आणितांना त्या कामीं येणाऱ्या भावी अडचणींचा प्रतिकार करून उद्दिष्ट कार्य पार पाडण्याचें नैतिक धैर्य फार थोड्या लोकांच्या अंगी असतें. या बाबतींत लोकमान्य टिळकांनीं एका संमेलनप्रसंगीं काढलेले उद्गार फार महत्त्वाचे आहेत. " मराठी भाषेंत शब्दसंग्रह कमी असल्यामुळें कांहीं विषयावर लेख लिहितानां शब्दांचा तुटवडा भासतो अशी कांहीं विद्वान्गृहस्थ कुरकूर करितात ती व्यर्थ आहे. आपल्या देशबांधवांस एकादी महत्त्वाची गोष्ट सवजावून द्यावी असे ज्या लेखकास अंतःकरणपूर्वक वाटत असेल; आपले अज्ञ देशबांधव सूज्ञ होऊन त्यांची सर्वांगीण उन्नति व्हावी ह्या हेतूनें अत्यंत आस्थापूर्वक ज्याला एखादा संदेश त्यास सांगावयाचा असेल, त्याला शब्दांचा तुटवडा कधींही भासणार नाहीं. संस्कृतांतलें गूढ ज्ञान आपल्या महाराष्ट्र बांधवांस सुलभ करून द्यावें या उद्देशानें ज्ञानेश्वरमहाराजांनीं जेव्हां ज्ञानेश्वरी लिहिण्यास आरंभ केला तेव्हां सहाशें वर्षांपूर्वी सुद्धां त्यांना शब्दांचा तुटवडा भासला नाहीं. "

ज्ञानेश्वरींत मराठी भाषा व महाराष्ट्रदेश ह्या विषयीं प्रेमाचे व अभिमानाचे उद्गार श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं काढले आहेत ते येणें प्रमाणें:—

माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके ।
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥ ६–१४ ॥
जिये कोंवळिकेचे निपाडे । दिसती नादींचे रंग थोडे
वेधें परिमळाचें बीक मोडे । जयाचेनि ॥ १५ ॥
ऐका रसाळपणाचिया लोभा । कीं श्रवणांचि होती जिभा ।
बोलें इंद्रियां लागे कळंभा । एकमेकां ॥ १६ ॥
सहजें शब्दु तरी विषो श्रवणाचा । परिरसना म्हणे रसुहा आमुचा ।
घ्राणासि भावो जाय परिमळाचा । हा तोचि होईल ॥ १७ ॥
नवल बोलतीये रेखेची वाहणी । देखतां डोळा पुरो लागे धणी ।
ते म्हणती उघडली खाणी । रूपाचीहे ॥ १८ ॥
जेथ संपूर्ण पद उभारे । तेथ मनाचि धांवे बहिरें
वोलु भुजाही आविष्करे । आलिंगावया ॥ १९ ॥
ऐशीं इंद्रियें आपुलालिया भावीं । झोंबती परितो सरिसेपणेंचिबुझावी ।
जेसा एकला जगचेववी । सहस्रकरु ॥ २० ॥
तैसे शब्दाचें व्यापकपण । देखिजे असाधारण ।
पाहातयां भवज्ञांफावतीगुण । चिंतामणीचे ॥ २१ ॥

ज्ञानेश्वरी अध्याय ६ वा. श्लोक ६-२१

देशियेचेनि नागरपणें । शांत शृंगारातें जिणें ।
वरि वोविया होती लेणें । साहित्यासी ॥ ४२ ॥
मूळ ग्रंथीचिया संस्कृता । वरि मऱ्हाठी नीट पाहतां ।
अभिप्राय मानलिया चित्ता । कवण भूमी हे न चोजवे ॥ ४३ ॥
जैसें आंगाचेनि सुंदरपणें । लेणिया आंगचि होय लेणें ।
तेथ अळंकारिलें कवण कवणें । हें निर्वचेना ॥ ४४ ॥
तैशी देशी आणि संस्कृत वाणी । एका भावार्थाच्या
सुखासनीं शोभती आयणी । चोखट आइका ॥ ४५ ॥

ज्ञानेश्वरी अध्याय १० वा.

तीरें संस्कृताची गहनें । तोडोनि मऱ्हाठी शब्दसोपानें ।
रचिलीं धर्मनिधानें । श्रीनिवृत्तिदेवें ॥ ९ ॥
म्हणोनि भलतेणें येथ सद्भावें नाहावें ।
प्रयाग माधव विश्वरूप पहावें ।
आणि संसारासि द्यावें । तिळोदक ॥ १० ॥

ज्ञानेश्वरी अध्याय ११ वा.

तो कृष्णार्जुनसंवाद । नागरीं बोलीं विशद ।
सांगोनि दाऊ प्रबंध । वोवियेचा ॥ ११५६ ॥
नुसधींचि शांतिकथा । आणिजेल कीर वाक्पथा ।
जे शृंगाराच्या माथां । पाय देवी ! ॥ ११५७ ॥
दाऊं वेल्हाळ देशी नवी । जे साहित्यातें वोजावी ।
अमृतातें चुकी देवी । गोडसपणें ॥ ११५८ ॥
बोल वेल्हाळवितेनी गुणें । चंद्रासि घे उमाणें ।
रसगंगा भुलवणें । नाद लोपी ॥ ११५९ ॥

ज्ञानेश्वरी अ. १३ वा.

संस्कृताचें दुर्लंघ्य असें तट तोडून माझ्या श्रीगुरुनीं मराठी शब्दांचा सोपा दादर (जिना) तयार केला आहे ह्मणून याठिकाणीं वाटेल त्यानें भक्तिपूर्वक स्नान करावें व विश्वरूपप्रयागमाधवाचें दर्शन घेऊन संसारावर तिलोदक द्यावें अशा अर्थाच्या ११ व्या अध्यायांतील ओव्या आहेत. तसेंच संस्कृत व मराठी भाषा ह्या समान योग्यतेमुळें एका भावार्थाच्या सुखासनावर बसल्या आहेत असें १० व्या अध्यायांत म्हटलें आहे. मराठी भाषेची योग्यता फार मोठी आहे ही गोष्ट जगाच्या निदर्शनास श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं पूर्णपणें आणून दिली.

रामदेवरावाचे दरबारांत श्रीज्ञानेश्वर महाराज व त्यांचा समकालीन संत नामदेव या उभयतांचा गौरव झाला किंवा नाहीं याबद्दल कोठें उल्लेख आढळत नाहीं. तसेंच हेमाद्रि व श्रीज्ञानेश्वर महाराज यांची गांठ पडली होती किंवा नाहीं, ह्याबद्दल ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं. निवृत्तिदेव, ज्ञानेश्वर, सोपानदेव व त्याची बहीण मुक्ताबाई ही संन्याशाची मुलें म्हणून पैठण येथील ब्रह्मवृंदाकडून त्यांचा फार छळ झाला. निवृति, ज्ञानेश्वर व सोपानदेव यांस व्रतबंध करण्याचा अधिकार नाहीं असें ब्रह्मवृंदानीं ठरविलें होतें. या प्रतिकूल परिस्थितीमुळें त्यांच्या अमूल्य ग्रंथाचें चीज त्यांच्या हयातींत झालें नसावें, ही गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे.

पैठणच्या ब्राह्मणांनीं श्रीज्ञानेश्वरमहाराजांस शुद्धिपत्र दिलें होतें त्याची एक नक्कल भिंगारकरबुवानीं छापिली आहे, या शुद्धिपत्राच्या ऐतिहासिक खरेपणाबद्दल विद्वान लोकांत मतभेद आहे. हें शुद्धिपत्र बोपदेवानें संस्कृतपद्यांत लिहिलें होते असें त्यांतील २५ व्या श्लोकांत म्हटलें आहे. बोपदेव व हेमाद्रि हे समकालीन असल्यामुळें हेमाद्रिची व श्रीज्ञानेश्वरमहाराजांची गांठ पडली असावी असा तर्क करण्यास जागा आहे. श्रीज्ञानेश्वरमहाराज हे पूर्णपणें निवृत्तिमार्गातील असून स्वतःस विद्वान् म्हणवून घेण्याची त्यास महत्वाकांक्षा नव्हती, यामुळें राजदरबारांत आपल्या ग्रंथांचा गौरव करून घेण्यासाठीं जाण्याची त्यास बिलकूल गरज नव्हती. तत्वज्ञानाच्या अत्युत्य पायरीवरचे मराठींत रचलेले ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे ग्रंथ हेमाद्रीच्या वाचण्यांत आले असते तर महाराजांचा त्याजकडून फार गौरव झाला असतां, यांत शंका नाहीं.

श्रीज्ञानेश्वरमहाराजांपूर्वी मुकुंदराय हे शके ११५८ चे सुमारास हयात होते व सिंघणाचा मुलगा जैत्रपाल उर्फ जैतुगी ह्याचे ते गुरू होते असें म्हणतात. मुकुंदराज ह्यांनीं विवेकसिंधु नांवाचा ग्रंथ लिहिला असून त्यास मराठी भाषेंतील आद्यकवि असें म्हणतात. त्यानें 'विवेक सिंधु,' 'परमामृत' 'पवनविजय' 'मूलस्तंभ' 'मंचिकरण,' वगैरे ग्रंथ रचिले. विवेकसिंधु हा ग्रंथ शके १११० मध्यें मुकुंदराजकविनें शार्ङ्गधर नांवाच्या राजाच्या कारकीर्दीत जैत्रपाल नांवाच्या एका धनिक गृहस्थाच्या विनंतिवरून रचला असे या ग्रंथाच्या उत्तरार्धांत अकराव्या अध्यायाच्या शेवटीं मुकुंदरायानें म्हटलें आहे शिवाय नृसिंहाचा बल्लाळ याचा मुलगा जयंतपाळ याचे आज्ञेने सदरील ग्रंथ लिहिला असें मुकुंदराज या ग्रंथाच्या अखेरीस म्हणतो. देवगिरीच्या यादवांच्या वंशावळींत नृसिंह व बल्लाळ अशी नांवें आढळत नाहींत. ही त्रयी म्हैसूर येथील होयसलयादव वंशांतील राजपुरुषांपैकीं असावी असें दिसतें. मुकुंदराजानें दिलेल्या आपल्या परंपरेवरून व त्यांच्या हकीकतीवरून तो शिवभक्त असून श्रीज्ञानेश्वराप्रमाणें नाथसांप्रदायीं असावा असें दिसतें. मुकुंदराजाच्या कालासंबंधानें, विद्वान् लोकांत अद्याप एकमत नाहीं.

महानुभावपंथाचा संस्थापक श्रीचक्रधर ह्यानें शके ११८५ च्या कार्तिक महिन्यांत सिंहराशींत गुरु असतांना संन्यासदीक्षा घेतली, व शिष्यसांप्रदाय वाढवून आपल्या पंथाच्या विशिष्ट मतांचा प्रसार करण्यास तो गांवोगांव हिंडू लागला. बुद्धधर्माप्रमाणें त्यानें भिक्षुसंघ स्थापन केले व त्यांत प्रवेश करण्यापूर्वी भिक्षुसंबंधानें फार कडक निर्बंध घातले. श्रीचक्रधरानें आपल्या धर्ममतांचा

उपदेश आपले शिष्यवर्गास मराठी भाषेंत केला. त्यामुळें या पंथांतील बहुतेक सर्व ग्रंथांची रचना मराठी भाषेंतच झालीं असें पूर्वी म्हटलें आहे. श्रीचक्रधराचा नागदेवाचार्य या नांवाचा एक पट्टशिष्य होता. यास ह्या पंथाचे आद्य आचार्य म्हणतात. श्रीचक्रधरानंतर त्यानें ह्या पंथाचा प्रसार केला. त्याचा पुत्र महेश्वरपंडित यानें शके १२२४ त 'ऋद्धिपुर वर्णन' नांवाचा ग्रंथ लिहिला. तसेंच यक्षदेव उर्फ मुरारीमल्ल यानें गीतेवर' सुंदर टीका लिहिली. शके ११८७ मध्यें पारमांडल्य-आम्नाय-दीक्षित, पंडित हिरण्यगर्भ उर्फ हयग्रीव यानें '**गद्यराज**' या नांवाचा ग्रंथ रचिला. सुप्रसिद्ध ज्योतिषी **भास्कराचार्य** याचे वंशातील आपण असल्याबद्दल भानुभट्टानें आपल्या 'भानुविजय' ग्रंथाच्या अकराव्या अध्यायामध्यें स्वतःच्या वंशाची हकीकत दिली आहे तीं येणेंप्रमाणें:—

सिहाद्रीचिये पाठारीं । त्रिविक्रमाचा जन्मपुरा ।
पुनित गावो कासारबोरी । गंगे उत्तरें ॥ १ ॥
त्रिविक्रमु विद्यापती । भास्कराचार्य वेदमूर्ति ।
तयाचा गोविंदु अद्वैती । तिये शाखेसी ॥ २ ॥
प्रभाकराचा मनोरथु । तेआंचा महेश्वरु पुनीतु ।
तेयांचा कवीश्वरु पंडितु । वेदांतिया ॥ ३ ॥
कवीश्वराचार्यापासुनी । कमलापोटीं पुत्र दोनी ।
जेष्ठ चांगो फल्लस्थानीं । गुरु तो यादवांचा ॥ ४ ॥
चांगोचे राजनायकु । राजेंद्राचा पुत्र जनकु ।
तेया चांगदेवो अवतारिकु । मायापती ॥ ५ ॥

धारा कर्वाश्वराचा कुमरु । कमलेपोटी लक्ष्मीधरु ।
तेआंचा पोटी अनंतेश्वरु । ते आधारा चांगदेओ ॥ ६ ॥
चांगदेवो देशाउरी । अध्यापकु जाला अवधारी ।
अनंते घातली कासारबोरी । लौंड्याकारण शाला ॥ ७ ॥
अनंता यादवे आव्हाणौनी । राहाविले तीर्थी पैठणी ।
अध्यापकु वृत्ती स्वीकारौनी । राये वृत्ती वर्तती ॥ ८ ॥
कर्मोंचि अनंतापासौनी । उमांबाजठरी पुत्र दोनी ।
तल्लाभें दंपत्यु मनीं । अति सुखायिले ॥ ९ ॥
जेष्ठ नावें दिवाकरु । धारा भानु कर्वाश्वरु ।
अचाट प्राज्ञा साचोकारू । वाचस्पतीसा ॥ १० ॥
मग दिवाकराची ब्राह्मणी । जुर्दैवे झाली गर्भिणी ।
एक कन्या पुत्र दोनी । वरां ओपी ॥ ११ ॥
तीर्थां कर राची श्रीपुरी । व्याहिली कन्या दिवाकरी ।
तंव ती हातरिती जाली कुमरी । तोकडेनि कालें ॥ १२ ॥
तेचि भुआडी नागांबिकां । त्यागा पातली भानुचक्रिका ।
जेही बोधिले रघूनायका । नांदेडकरातें ॥ १३ ॥

(भानुविजय अ. १३)

वरील उताऱ्यावरून पाटण येथील शके ११२८ च्या शिलालेखांतील मजकुरास दुजोरा मिळतो. शिवाय या वंशांतील उमांबा व नागांबिका नांवाच्या दोन विदुषी स्त्रियांनीं महानुभावपंथ स्वीकारून बरीच ग्रंथरचना केली असें दिसतें. देवगिरीचे यादवराजाकडून भास्कराचार्यांचे कुटुंबांतील विद्वान् वंशजास कसकसा राजाश्रय मिळाला यांचें चटकदार वर्णन यांत दिलें आहे.

श्रीचक्रधराचे पट्टशिष्य श्रीनागदेवाचार्य यास, केशवराजसुरी उर्फ केशव पंडित यानीं ' उद्धरण ' ' संसरण ' इत्यादि प्रकरणें

संस्कृत भाषेंत रचूं कीं काय असा प्रश्न विचारिला असतां आचार्यांनें म्हटलें " नकोगाः केशवदेयाः येणें माझिये स्वामीचा सामान्यु परिवारू नागवैलकीः परमेश्वरें तरी जीवाचेया संकोचिता आन अनेक व्यसना अयोग्यता जाणौनीः आन काठिण्यता चुकवोनी सकळांसी अल्पायासें ब्रह्मविद्याचिये ठायें गिवसता येवौनि परमेश्वर लाभुद्यमा वावु. हो आवाः म्हणौनिची महाराष्ट्रीये निरोपिलें कींगाः एरव्हीं सर्वज्ञा (चक्रधरस्वामीला) कांई देववाणि निरोपून लाहे कीं गाः भणौनि केशवा संस्कृत सूत्रबद्ध प्रकरण न करी तूं कीः "

(कथा ४७)

याच उदात्त हेतूनें श्रीज्ञानेश्वरमहाराजानीं लोकसंग्रहार्थ भगवद्गीतेंतील रहस्य मराठींत जनतेपुढें ठेविलें व तोच कित्ता एकनाथ श्रीधर कवीनीं पुढें चालविला.

रामदेवराव जाधवाच्या राजवटींत नरेंद्रपंडित अयाचिते या नांवाचा एक प्रासादिक श्रेष्ठ दर्जाचा कवि होऊन गेला. त्यानें रुक्मिणी-स्वयंवर या नांवाचा एक उत्तम ग्रंथ लिहून तो रामदेवरावाचे दरबारांत वांचून दाखविला. रामदेवरावास तो ग्रंथ इतका पसंत पडला कीं त्याचे कर्तृत्वाचा मान कवीनें आपणास (रामदेवरावास) द्यावा व ग्रंथाच्या शेवटीं आपलें नांव घालावें अशी त्यानें नरेंद्रापाशीं आपली इच्छा प्रदर्शित केली व ती पूर्ण करण्यांत आल्यास ग्रंथांतल्या प्रत्येक ओवीबद्दल त्यानें नरेंद्रास मोबदला म्हणून सुवर्णद्रव्य देण्याचें आश्वासन दिलें. त्यावर नरेंद्रानें जें बाणेदार उत्तर दिलें तें मननीय आहे. सर्वच ग्रंथकार पैशाच्या मोहाला बळी पडून आपलें स्वत्त्व गमाविण्यास तयार नसतात ही गोष्ट या उदाहरणा-

वरून निदर्शनास येतें. नरेंद्रानें राजास उत्तर दिलें कीं "आपले इच्छेस मान दिल्यास इतर कवि मला हांसतील व नांवें ठेवितील आणि आमच्या **कविकुलास बोल लागेल**" हें नरेंद्राचें सडतोड उत्तर ऐकून राजास संताप आला व त्यानें नरेंद्राच्या हातून तो ग्रंथ हिसकावून घेतला. नरेंद्रानें राजास म्हटलें "महाराज या ग्रंथांत अजून कांहीं शोध घालावयाचे आहेत तर आज हा ग्रंथ मजला परत द्यावा म्हणजे तो घरीं नेऊन एकवार तपासीन आणि उदईक पुन्हां आणून देईन."

राजानें नरेंद्राचें हें म्हणणें ऐकून हेमाद्रिकडे साशंक मुद्रेनें पाहिलें. तेव्हां हेमाद्रि म्हणाला "आम्हीं ब्राह्मण लोक, आम्हांस आपलाच राजाश्रय, तरी ग्रंथ आपण मागावा व आम्हीं तो आपणांस देऊं नये, तर मग तो कोणास द्यावा!" असें राजास हेमाडपंतानें उद्देशून म्हटलें व अर्थपूर्ण दृष्टीनें नरेंद्राकडे पाहून त्यास विचारलें, "हे कविश्रेष्ठा! तुम्हांस राजाचें म्हणणें मान्य आहे काय?" हेमाद्रीच्या मनांतील आशय ओळखून नरेंद्रानें उत्तर दिलें कीं "आम्हीं राजाचेंच आहोंत; मग ग्रंथ देण्यास दोष कशाचा? आमचे बंधु शैल्यकवि व नृसिंह कवि यानीं केलेले रामायण आणि नलोपाख्यान हे दोनही ग्रंथ आपणास नाहीं कां दिलें? तसेंच हे रुक्मिणीहरणही कां देऊं नये? यांत शेवटीं राजवर्णन केलें आहे तें कां उगाच केलें आहे?" असें म्हणून नरेंद्रानें कांहीं भाग तेथल्यातेथें वाचून दाखविले; तें ऐकून राजास संतोष होऊन त्यानें तो ग्रंथ कवीस परत दिला. ह्याप्रमाणें नरेंद्रानें ती वेळ मारून नेली. तथापि रामदेवरावाचे वर्तनाबद्दल त्याचे मनांत

कायमची अढी राहिली, ही हकीगत लीलाचरित्रांतील १०१ लीला या सदराखालीं दिली आहे, ती येणें प्रमाणें.—

नरेंद्र कवे ग्रंथ भेटीसी अनुसरणें: नरेंद्रकविः शैल्यकविः नृसिंहकवि=अयाचिते हे तिघे बंधु देवगिरीयेसी रामदेवरायाचे या आश्राइतीयेतीः नृसिंह कवीयें नलोपाख्यान केलें: शैल्य कवीयें रामायण केलें: ते आपुलाले ग्रंथेनसी सभे माझारी जावौनी रामदेवो रायापुढें भणितलें: तेथींचि नरेंद्र कवि बैसले असतिः तेयांसी भटोकनन्नूनि श्रवण होतेः तेही ग्रंथ ऐकौनिया तोषलेः आनशैल्य कवि (अपभ्रंशें साल कवी) ते भणितलें: ऐसाचि ज़री द्वारकेचा रावो वर्णितेती तरि तुमचेया जन्मांतराचेया पापा पुरश्चरण होतें कीं: ऐसें रामदेवराया देखतांचि भणितिलें: तंव तेहीं भणितलें: तुम्हीही एक कवित्व करानाकाः मा पाहो तुमचा वर्णनुः मग नरेंद्रकवि तेणें चि सळें अठराशत वोवीये " ऋक्मिणी स्वयंवर " ग्रंथ केलाः मगतोही बंधुद्वया देखतांचि रामदेवराया पुढां भणितला सहर्षे वाचितां इये वोविये पर्यंत आला " देवचिया दादुलेपणाचा उवारा ॥ न साहेचि साताही सागरा ॥ भणे वोसरौनी राजसभा ॥ दिधली द्वारावती ॥" यावरीं रामदेवरायें भणितलें ग्रंथाचा अभंगीं (अंतीं) नाम आमुतें देयावेः मा ग्रंथचिया जेतुकीया वोवीयाः तेतुकोचि सोनटके आन चौथरीया आसु वोवाळणीये घालीजैलः जंव नरेंद्र कवें भणितलें: नराजे होः आमुचेया कविकुळा बोल लागैलः तंव रामदेवरावो बलात्कारें ग्रंथ तेया पासौनि घेतलाः तवं नरेंद्र कवियें रायातें विनविलें: जे राजे हो इया ग्रंथीं आझुई क्वचित ठायीं शोध उरलाचि असेः तो एक दीं ग्रंथ देयावाः मा शोधौनी देवोंः तंव रायें भणितलें: उदेयां-

चिये वेळें ग्रंथ आणौनी देयावेंः ना तरि आम्ही घेवोचि लाहोः ऐसें भणौनि हेमाडी पंडितांची (हेमाद्रि) वास पाहिलीः तंव हेमाडी पंडितीं भाणितलेंः ना राजे होः आम्ही ब्राह्मण राया श्रायितें कींः रायासी ग्रंथ नेदू तरि देवों कवणासीः ऐसें भणौंनि नरेंद्र कवीया-भाणितलेंः कविवरो राजे कांइ भाणितातीः ते तुम्हा प्रमाण आतीः नरेंद्रीं भाणितलेंः आम्ही रायाचीये कींः ग्रंथु देयावेया कांइ दूषण-आतीः रामायण नलोपाख्यान ते तुम्ही रायासी जैं दिधले तैं ऋक्मिणी स्वयंवरुहि करुनिया रायां अर्पावेंः शेखीं रामवर्णनु केलेंः तें कांइ वाउरेंचि केलें कींः एसें भणौनि सेवटील भागु वाचौनी दाखविलाः तैं रायें तो ग्रंथु नरेंद्र कवीया दिधलाः परि उदेयांची सभे आणौनीः येणेंचि आतीः हो राजेहोः आतीः एसें ग्रंथ घेवौनि गृहां गेलेः आन शैल्य नृसिंहातें भाणितलेंः तिघे बंधु मिळौनि लेखनकरौ पांःतरि तेही मानिलेंः ऐसेया परि तीन तीन शत वोयीयः येयांचि येयांचि लेखन केले पाः पुनलेंहों बैसलेतिः तंव ब्राह्म मुहुर्तेचि रायें बोलावो पाठविलेंः ग्रंथ शोधु जालाः तो आतांचि आणावाः तेया सारिसेंचि नरेंद्र कवीये ग्रंथु नेवौनि रामदेवरायासी आशिर्वाद मंत्रेनसी दिन्हलाः आन नरेंद्र गृहा येवौनि नूतन लेखक ग्रंथ नवशत ओवीयांचा घेवौनि संसाराचा त्याग करूनियाभटोबासा जवळी येवौनि तेंही भिक्षा केलीः ऐसीया परि ऋक्मिणीस्वयंवरासी नरेंद्र कवीया महात्म मार्गी आलेः आन तो ग्रंथुही आला असेः

(लीला १६१)

नरेंद्रपंडित-कवि आपल्या बाणेदार स्वभावामुळें राजाश्रयास मुकत आहे असें हेमाद्रीचे लक्षांत येतांच त्यानें मोठ्या चतुराइनें नरेंद्रास

उद्देशून जे शब्द उद्गारले त्यामुळें नरेंद्रानें आपल्या भाषणाचा ओघ बदलला आणि रामदेवरावाचा राग शांत केला. या एकाच उदाहरणावरून ग्रंथकारास दरबारांतून आश्रय मिळावा याबद्दल हेमाद्रीला किती कळकळ होती ह्या गोष्टीची सहज कल्पना होते.

नरेंद्रकविचा " ऋक्मिणी स्वयंवर " हा ग्रंथ अद्याप छापून प्रसिद्ध झाला नाहीं, परंतु त्यांतील दिलेल्या उताऱ्यावरून तें काव्य श्रेष्ठ दर्जाचें असावें असें दिसतें. नरेंद्रकविनें हें काव्य लिहिल्यावर **महानुभावपंथाचा** स्वीकार केला असें म्हणतात. या पंथाची दीक्षा घेतल्यावर त्यानें बरीच ग्रंथरचना केली व तो श्रीचक्रधरस्वामीचा पट्टशिष्य बनला. श्रीचक्रधरस्वामीचे पश्चात् ही हकीकत १६१ लीला या सदराखालीं दिली आहे.

या कथेंत ऐतिहासिक सत्य किती असेल तें असो, परंतु रामदेवरावास आपलें नांव ग्रंथकार या नात्यानें चिरकाल रहावें अशी श्रीहर्ष वगैरे राजाप्रमाणें हांव होती ही गोष्ट सिद्ध होते. रामदेवरावाच्या या महत्त्वाकांक्षेमुळें त्याचे राजवटींत महानुभावपंथाचें व इतर वाङ्मय मोठ्या प्रमाणावर निर्माण झालें यांत शंका नाहीं. रामदेवरावाच्या राजवटींत मराठी भाषेच्या भरभराटीची जी लाट उसळली ती पुढें कित्येक शतकें चालू राहिली ही गोष्ट मराठी भाषेचा वरवर अभ्यास करणाऱ्यासही कळून येईल. रामदेवरावाच्या हयातींत म्हणजे शके १२३१ पर्यंत महानुभावपंथामध्यें नांवाजलेले कवि व ग्रंथकार बरेच होऊन गेले ही गोष्ट भावे यांचे "महाराष्ट्र सारस्वता" वरून व श्रीयुत यशवंतराव खुशाल देशपांडे यांच्या "महा-

नुभावीय मराठी वाङ्मय" या ग्रंथावरून दिसून येते. भावे यांनीं महानुभावीय ग्रंथाची सूचि प्रसिद्ध केली आहे त्यावरूनहि या विधानास पुष्टि मिळते. श्रीचक्रधरस्वामीचे पट्टशिष्य नागदेवाचार्य हे होते. यानांच या पंथाचे आद्य आचार्य म्हणतात. त्यानें कांहीं ग्रंथ लिहिले असल्यास ते उपलब्ध नाहींत. **गौतम बुद्धाच्या** पश्चात् त्याचा पट्टशिष्य **आनंद** यानें बुद्धधर्माचा, तसेंच येशुख्रिस्तानंतर त्याचे पट्टशिष्य यांनीं ख्रिस्तधर्माचा, ज्याप्रमाणें प्रसार केला त्याप्रमाणें नागदेवाचार्यानें महानुभावपंथीय मतांचा प्रसार केला नागदेवाचार्यांचा जन्म शके ११५८ त होऊन त्याचा मृत्यु शके १२२४ त झाला. नागदेवाचार्यांची चुलत बहीण रूपाई नांवाची होती तिची आजी महदंबा या नांवाची असून ती कन्हरदेव व महादेव या यादवराजांच्या कारकीर्दीत कवयित्री व ग्रंथकर्ती म्हणून फार प्रसिद्धीस आली होती. महदंबेची गीतें फार प्रेमळ व भक्तिपूर्ण आहेत. रामदेवरायाचे कारकीर्दीत श्रीभास्कर कवीश्वर ऊर्फ भानुभट्ट बोरीकर यांनीं दोन ग्रंथ फार सुरस लिहिले. त्यापैकीं " शिशुपाल वध " हा ग्रंथ शके ११९५ त व " एकादश स्कंध " शके ११९६ त लिहिला यास्खेरीज दामोदर पंडितानें शके १२०० मध्यें " वत्सहरण " नांवाचें काव्य रचिलें. महींद्र उर्फ महिभट्ट व्यास हाही श्रीचक्रधर स्वामीचे पट्टशिष्यापैकीं होता.

रामदेवरायाचे राजवटींत म्हणजे शके ११९३ पासून तों शके १२३१ पर्यंत महानुभाव पथांत जे कवि आणि ग्रंथकार निर्माण झाले त्यांची व त्यांनीं लिहिलेल्या ग्रंथांची त्रोटक माहिती कोष्टकरूपानें पुढें दिली आहे.

ग्रंथकार.	ग्रंथ.
नरेंद्रपंडितः—	रुक्मिणीस्वयंवर (शके १२१०): वियोगचंद्रिका, गद्यश्लोक.
शैल्यकवि (नरेंद्राचा थोरला बंधु):—	रामायण.
नृसिंह केसरी (नरेंद्राचा धाकटा बंधु):—	नलोपाख्यान.
महेश्वर पंडित (नागदेवाचार्याचा पुत्र):—	ऋद्धिपुर वर्णन (शके १२२४): निर्वेदस्तोत्र; संकटस्तोत्र.
महींद्र ऊर्फ **महीभट्टः—**	लीलाचरित्रः पद्यखरडा. (शके ११८५).
भास्कर कवीश्वर (द्वितीयाचार्य): — (पूर्वाश्रमीचे भानुपंडित भानुभट्ट बैरीकर)	शिशुपालवध (श. ११९६ भागवत. एकदशस्कंध (श. ११९६) श्रीकृष्ण चरित्र.
भावेदेव व्यास (भास्कर कविश्वराचा थोरला मुलगा)	प्रश्नावलि, मूर्तिज्ञान, पूजावसर.
केशवव्यास ऊर्फ **केशवसूरि** (श्रीचक्रधराचा शिष्य):—	सिद्धांत सूत्रपाठः मूर्तिप्रकाश; वादलापनिक (गद्य) गुढे (गद्य) अन्येव्यावृत्ति युगधर्म, विद्यामार्ग, संसर्ण संहार, महावाक्या, निर्वचन, उद्धर्ण, अस्तिपरि. आचाराविचार, विधिनिषेधसूत्रें, दृष्टांतवदृष्टांतीक, लापीका, नौगुढें, अवस्ताभूतगीतपूजा अवस्वरें मूर्तिप्रकाश ओवी, (ओवी ३०४४) द्विभार्यादृष्टांतप्रमे.

आनेराजव्यास ऊर्फ गोपाळ

पंडितः– सूत्रपाठ, लक्षण, रत्नाकर (संस्कृत),
(नागदेवाचार्याचा शिष्य) सुभाषितांतक्षरी, द्वात्रिंश लक्षण (संस्कृत)
दामोदर पंडितः— वत्सहरण, चौपद्यापाठ (श १२००)
परशुराम व्यास (तृतीयाचार्य):– आम्नाय तेरावा, भिक्षेचा गूढार्थसंकलित, ओ. वि. मालिका भाष्य
भीष्माचार्यः— मार्गमंजरी, दिनकर प्रबंध (संस्कृत) मूर्तिप्रकाश सुभाषितप्रदीपिका ब्रह्मोपनिषदावरील धारा विंव नांवाचें भाष्य, लक्षण सारोद्धार, रुद्रपूरमाहात्म्य, सिद्धांतसार.
हयग्रीव व्यास (पंडित हिरण्यगर्भ दीक्षितः— गद्यराजस्तोत्र श्लो. २८१ धवळे.
रुपाई ऊर्फ महदांबाः— धवळे (गीतेवरील स्तोत्रें.)
हिरांबा (दामोदर पंडिताची स्त्री.) महानुभाव, नाम–महिमा वर्णन.
मुरारिमल्ल ऊर्फ यक्षदेवः— गीता टीका श. १२२४ (श्रीकृष्ण बाळ-क्रिडा ओ. ७२५).
वहाळ नारोव्यासः — रुद्रपूर वर्णन.
रवळो व्यासः— रत्नाद्रि वर्णन.
पंडित विश्वनाथः— ज्ञानप्रबोध.

रामदेवराव जाधवाच्या राजवटींत जें महानुभावपंथीय वाङ्मय निर्माण झालें त्याची रूपरेखा वर दिली आहे. महानुभावपंथाचे समग्र ग्रंथ अद्याप उजेडांत आले नाहींत व ते प्रसिद्ध होईपर्यंत ह्या भागांत दिलेली माहिती अपुरी आहे असें म्हणणें भाग आहे. लीलाचरित्र हा महानुभावपंथाचा धर्मग्रंथ आहे. या ग्रंथांत रामदेव-

राव जाधव ह्याचे कारकीर्दीवर प्रकाश पाडणारे बरेच उल्लेख आहेत असें महानुभावपंथीय महंतांचें म्हणणें आहे; परंतु हा ग्रंथ प्रसिद्ध होईपर्यंत या बाबतींत कांहीं लिहितां येत नाहीं. दामोदर-पंडितांचें वत्सहरण व कवीश्वर भास्कर व्यास यांचें **शिशुपालवध** व नरेंद्र पंडितांचें **रुक्मिणी**–स्वयंवर हे ग्रंथ श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे पूर्वीचे अगर समकालीन ग्रंथ आहेत.

सदरील ग्रंथांतील भाषेवरून मराठी भाषा फार वर्षांपासून महाराष्ट्रांत प्रचारात असली पाहिजे. महानुभाव पंथाची स्थापना होण्यापूर्वी मराठी भाषेंत बरींच ग्रंथरचना झाली असावी असें अनुमान काढण्यास जागा आहे. देवगिरीचा अखेरचा राजा रामदेवराव ह्याच्या राजवटींत, यक्षिणीची कांडी फिरवून, तीं एकाएकीं निर्माण झालीं असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं. मराठी भाषेचा अभिमान बाळगणाऱ्यांनीं ह्या कामीं नेटानें संशोधन केल्यास प्राचीन काळच्या मराठी वाङ्मयाचा ठेवा हातीं लागण्याचा संभव आहे. रामदेवराव जाधव ह्याच्या राजघराण्यापैकीं कांहींजणांनीं महानुभावपंथाचा स्वीकार केला होता ह्याबद्दल महानुभावीय ग्रंथांत उल्लेख आढळतो. (नागदेवाचार्य कथा १६८). गोपाळ पंडित हा पैठण शहराजवळील वरखेड, वाडेगांव येथील मूळ रहिवासी होता, त्याच्या धाकट्या भावाचें नांव केशवराजसूरि असें होतें. गोपाळ पंडित हा आपलें गांव सोडून देवगिरीस जाऊन राहिला, तेथें असतांना रामदेवराव जाधवाची धाकटी राणी कामाइसा किंवा कामाईदेवी हिचा तो पुराणिक व खाजगी खजिनदार होता. कामाईदेवीनें ह्याचेमार्फत नागदेवाचार्याचा मंत्रोपदेश घेतला होता, ह्याबद्दल नागदेवाचार्याचे चरित्रांत उल्लेख सांपडतो तो येणेंप्रमाणें:–

" भद्रकार कामाइसेः तिये रामदेव रायाची धाकुटी राणीः तिये सव्वाये लक्षाचा व्यापारू गोपाळ पंडिता होता. कामाइसें सदापुराण ऐकितें असती ! "

रामदेवराव जाधवाच्या अनेक राण्यांपैकीं कामाई नांवाची एक राणी होती. नवऱ्याच्या मरणानंतर त्याच्या पत्नीनें सती गेलें पाहिजे अशी हिंदु लोकांत पूर्वापार रुढि होती. तीस अनुसरून कामाई-खेरिज रामदेवरावाच्या सर्व राण्या सती जाण्यास सिद्ध झाल्या. परंतु कमाईच्या मनांतून सती जावयाचें नव्हतें. रामदेवरावाचा ज्येष्ठ मुलगा शंकरदेव यानें, सती जाण्याविषयीं तिचें मन वळविण्याचा प्रयत्न केला. परंतु ती आपला आग्रह सोडीना. सती न जाणेबद्दल तिनें शंकरदेवास कारणें सांगितली तीं अशीः --

" आपण नागदेवाचार्याकडून महानुभावपंथाचा मंत्र अथवा उपदेश घेतला असून त्याअन्वयें आत्महत्या करणें म्हणजे नरकाचें साधन होय " असें तिनें सर्व लोकांसमक्ष शंकरदेवास व आपले बापास निक्षून सांगितलें, शिवाय, आपलें अवशिष्ट आयुष्य भगवच्चिंतनांत घालवून पतिव्रता धर्मानें वागण्याचा आपला निश्चय असल्याबद्दल तिनें त्यास स्पष्ट कळविलें. याउप्पर जबरदस्तीनें सती जावयास आपणांस लावूं नये अशी तिनें शंकरदेवाची काकळूत केली. परंतु शंकरदेवाचें मनास द्रव आला नाहीं. उलट तिनें सती गेलेंच पाहिजे असा त्यानें आग्रह धरिला. शंकरदेवाचा हा दुराग्रह पाहून तिनें त्यास शाप दिला कीं, " तूं कोणाच्या तरी तावडींत सांपडला जाऊन तुझ्या अंगाची कातडी काढली जाईल व तुझे निसंतान होईल व यादवांचें राज्य अल्पावधींत नष्ट होईल. " सदरील हकी-

कत लीलाचरित्रांतील १७३ लीला ह्या सदराखालीं दिली आहे ती येणेंप्रमाणें:—

कामाई अग्नि प्रवेशाद्भाव चुकविणें: शिष्यें प्रश्नें मग किर्ती एका दिवसा रामदेवरायो निवर्तैला: तंव सकळहीं रायांचेया स्त्रिया पतिसवेंचि अग्निप्रवेशायाः परि कामाइसें लाहो न करितां देखौनीः रामदेव रायाचेनि ज्येष्ठ पुत्रें सिंगणराये (शंकरदेवरायें) भणितलें: कामाई आतां वेग कराः तुह्मी अग्निप्रवेशाची आइती कां न कराचिः तंव कामाइसी भणितलें: सिंगणा मज सत्व नाहीं. मी तुझिये भानवसीयेचा ठोंबरा खावौनि तुझें कल्याण चिंतीनः पतिव्रता धर्मेनसी असैनः तंव सिंघणें भणितलें: जेयातें ये वेळी सत्व नाहीं तेयातें: बांधौनीया रायांचेया सहगमनें चिंतसी घालावें लागैलः तंव कामाईसांचा पिता मादळी माहादेव-दरणा आलाः तेणें कामाईसातें हातीं धरौनि भणितिलें: हें कांई कामाईः गोड तें खाइजेः आन कडू तेया सांडिजेः तुम्ही रायाची अर्धांगी कींः जी जी महादेव दरणे याच्ये कन्येसी सिंगणरायें पतिसवें बांधौनिया घातलीः ऐसें काई अवघा भिनलेया लोकांचेया मुखीं म्हणवौनिया आंमुचेया नांवा बोलु लाविसी तियेवेळां न नाहातींचि निगाली आन प्रेत शिळेवरी उभी ठाकौनी परमेश्वरू नामस्मरण करुनि पुनति सकल लोकां भोवतें पाहौनि भणति जालीः वा सिंगणा मज वैधवंतां नागदेवाचार्याचा मन्त्रोपदेश असेः आम्हनने नर्क होती ऐसी मातें जाणीव असेः वा सुपुत्रा मातें सोडीः मा भिक्षा करौनी सुखें कल्याण चिंतीत परमेश्वरा आराधनें भूदेशीं असैनः तुमतें कांहींचि मागेनाः आन तुमचेया कुला बोलही लांग ऐसा घृणितु आचार ही करैनाः माझेया परमेश्वर चिंतनें तुझें आयुष्य आन राज्यें अखंड टिकैलः ना आइकसी तरि तुझें चामुडें कवणांचेनि हातें सोलवैलः आन निसंतान होवौनि यादववंशांय राज्य छात्राचाही अल्पावकाशेंचि निःपातु होईल गाः ऐसें आईकौनि तेणें भणितलें: लोटारे लोटा कांईसाः भविष्यु साच मानितायेः भणौनि कामाईसा चिंतेसी लोटिलेः आन ते अवघेचि भट्टोबासा गोपाळ पंडितें जाणविलेः तंव भट्टोबासातें शिष्यें पुसिलें: हा भट्टो

कामाईसे तळमळीत दग्धली तरि तियेसी कांई होईलः भट्टोबासी भणितलेः बेधः बोधः अनः अनुसरणाचि तळमळ असैलः तरिः देहविद्या होईलः अथवा अडणिये अनुसरण प्रतिबंधले तरि परमेश्वर होईलः तथा बेध बोध असौनि तळमळ नाहीं तरी प्रमाद अक्षेपौनी चैतन्य फळ होईलः तथा बोध राखिला जेणें तयांचा तोपु उपजेलः तथा बोध नाहीं आन बेध तळमळ असे तरि पुढतीं पुरुष होऊनि जन्मली मग परमेश्वर-ज्ञान हावोनि भिक्षाचार करीतीः थरा साध्या तेथातें परमेश्वर उधरी जैलः ऐसिया परि भट्टोबासी कामाई साचेया संशयोच्छेद प्रकर्णी आचार भेदाचें निरोपण केलेः एकी पुनर्ती पुसिलेः हा भट्टो कामाईमें रायांसी निस्संतानत्वाचा तथा छत्रभंगाचा थापु दिधलाः तो कांई साचु होईलः तंव भट्टोबासी भणितलेः कामाईयेचा मुखा धर्माधिष्ठात्री देवतेनी जें बदविलें तें ब्रह्मादिकांचेनि आनां चुकवितांही न चुकेचि ते आडळवाणो का गा ऐसे सांधितलेः (लीला १७३)

वरील उताऱ्यांत रामदेवराव जाधवाची राणी कामाई हिनें महानुभावपंथाचा स्वीकार केल्याबद्दलची जी माहिती दिली आहे ती खरी असल्यास या पंथाच्या मतांचा पगडा राजघराण्यांतील मंडळीबर व खुद्द रामदेवराव जाधवावर बसला होता असें मानण्यास बरीच जागा आहे. महानुभाव पंथासंबंधानें सनातन हिंदुधर्माच्या अनुयायांना तिरस्कार वाटत होता त्यामुळें एकंदर हिंदुसमाजांत रामदेवराव जाधवासंबंधानें तिटकारा उत्पन्न झाला होता. त्यांच्या प्रजेमध्यें असंतुष्टता उत्पन्न होण्यास जीं अनेक कारणें झालीं त्यापैकीं हें एक मुख्य कारण होय.

महाराष्ट्रांतील साधु-संतांच्या अनेक परंपरांपैकीं नाथपरंपरा ही एक होय. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या ग्रंथांत, ही गुरुपरंपरा दिली आहे, ती येणेंप्रमाणेंः—

आदिनाथ-मच्छींद्रनाथ-गोरक्षनाथ-गैनीनाथ-निवृत्तिनाथ-ज्ञाननाथ उर्फ ज्ञानदेव. या भावंडांचें घराणें यजुर्वेदी वत्सगोत्री वाजसनीय शाखेचें होतें. म्हणजे श्रीज्ञानेश्वर महाराज हे आमच्या चरित्रनायकाच्या शाखेचे ब्राह्मण असून समानगोत्री होते. श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं आपल्या पंधराव्या वर्षीं **ज्ञानेश्वरी** ग्रंथ पुरा केला. व त्यानंतर '**अमृतानुभव**' या नांवाचा वेदांतपर ग्रंथ त्यांनीं लिहिला तो भाषेच्या व विवेचनाच्या दृष्टीनें अंमळ दुर्बोध आहे. या दोन मुख्य ग्रंथाशिवाय '**भक्तराज**' '**स्वात्मानुभव**' हेहि ग्रंथ त्यांनीं लिहिले आहेत. ह्याखेरीज '**चांगदेव पासष्टी**,' '**सश्रिता-नंद लखोटा**,' 'कल्याण पत्रिका,' 'नमन' 'पंचीकरण,' 'महावाक्य,' 'हरिपाठ' 'शुकाष्टकटीका' 'गायत्रीरहस्य' 'अन्वयव्यतिरेक' वगैरे लहानमोठे ग्रंथ श्रीज्ञानेश्वर महाराजांचे म्हणून समजले जातात परंतु हे ग्रंथ त्यांनीं लिहिले ह्याबद्दल ऐतिहासिक पुरावा नाहीं. व या बाबतींत विद्वानांत एक मत नाहीं. श्रीज्ञानेश्वर महाराजाप्रमाणेंच त्यांची इतर भावंडें विद्वान व विरक्त असून त्या सर्वांनीं मराठींत ग्रंथ-रचना केली आहे. निवृत्तिनाथांनीं **हरिपाठ** या नांवाचा एक सुंदर ग्रंथ लिहिला आहे. 'निवृत्तिसार' या नांवाचा आणखी एक ग्रंथ त्यांनीं लिहिला अशाबद्दल नामदेवाच्या एका ग्रंथांत उल्लेख केलेला आढळतो. परंतु याखेरीज या बाबतींत दुसरा आधार नाहीं. सोपानदेव ह्यानें पंचीकरण, हरिपाठ, नमन वगैरे प्रकरणें लिहिलीं असून 'सोपानदेवी' या नांवाची एक समश्लोकी ओवीबद्ध टीका श्रीमद्भगवद्गीतेवर लिहिली आहे. मुक्ताबाईचे अभंगाची भाषा गोड असून ते भक्तिरसानें ओथंबलेले आहेत. तिनें रचिलेले

"तार्टीचे अभंग" प्रसिद्ध असून, त्यावरून तिच्या भावंडाचा तत्कालीन ब्राह्मणाकडून जो छळ झाला त्या प्रसंगावर चांगला प्रकाश पडतो. तिनें सुमारें सहाशें वर्षांपूर्वी रचलेल्या 'हरिपाठा'चें लोक अद्याप आवडीनें पठण करितात.

श्रीज्ञानेश्वर महाराजांचे समकालीन संत व ग्रंथकार नामदेव, विसोबा खेचर, चोखामेळा वगैरे होते. ते पंढरपुरच्या श्रीविठ्ठलाचे निःसीम भक्त असून भागवत धर्माचे पुरस्कर्ते होते. त्यांनीं स्वतः ग्रंथ लिहिले नाहींत. परंतु स्वयंस्फूर्तीनें त्यांनीं जी कविता केली ती त्यांच्या शिष्यवर्गानी लिहून ठेविली. विसोबा खेचर हा शके १२३१ श्रावण शु० ११ शीस समाधिस्त झाला. यांतील कांहीं ग्रंथकार रामदेवराव जाधवाचे राजवटींत निर्माण होऊन ते त्याच्या पश्चात् कालवश झाले. व त्यांचे कांहीं ग्रंथ यादवांचें राज्य नष्ट झाल्यानंतरचे आहेत.

रामदेवराव जाधवाच्या राजवटींत ज्ञानेश्वरी हा एकच ग्रंथ निर्माण झाला असतां तरी त्याची कारकीर्द मराठीवाङ्मयाच्या उत्कर्षाच्या दृष्टीनें संस्मरणीय झाली असती. ज्ञानेश्वरी ग्रंथाची योग्यता फार मोठी आहे. ह. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर ह्यानीं श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र लिहिलें आहे. त्यांत ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या थोरवी संबंधानें जे उद्गार काढले आहेत ते यथार्थ असून अत्यंत मननीय आहेत त्यांचा उतारा पुढें दिला आहे.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ मराठी भाषेंत जसा कालानें तसा योग्यतेनेंही पहिलाच आहे. धर्मग्रंथ म्हणून, काव्य म्हणून, व्यवहारनीति शिकविणारा म्हणून–कोणत्याही दृष्टीनें ज्ञानेश्वरीकडे पहा–ज्ञानेश्वरीचें सिंहासन डळमळायला लावणारा

दुसरा ग्रंथ झाला नाही. कोणी ज्ञानेश्वरींतले सिद्धांत व विषयप्रतिपादनाची रम्य शैली पाहून डोलेल, कोणी भाषागौरव व उपमादृष्टांतादिकांची समर्पक योजना पाहून नाचेल, कोणी दृष्टांतद्वारां महाराजांनी व्यक्त केलेलें व्यवहारज्ञान पाहून चकित होईल, कोणी महाराजांची निस्सीम गुरुभक्ति व त्यांच्या वाणींतलें अद्भुत प्रेम पाहून रंगेल, कोणी कर्म, ज्ञान व उपासना. त्यांतील सिद्धांत–शास्त्र व व्यवहार यांचा उत्कृष्ट मेळ बसेल अशा पद्धतीनें–महाराजांनीं मांडलेले पाहून संतुष्ट होईल. पण एवढें खरें कीं, जो जो ज्ञानेश्वरीचा परिचय करूं जाईल तो तो परम समाधान पावेल. ज्ञानेश्वरींचे अंतरंग संतसज्जनांना सुखवील व शब्द-सौष्ठव रसिकांना रमवील. शब्दही गोड व अर्थही गोड. महाराजांनींच आपल्या वाचकांचें द्विविधत्व ओळखूनच की काय कोण जाणे " तैसे अध्यात्मशास्त्रीं इये। अंतरंगचि अधिकारिये । परि लोक वाक्चातुर्ये । होईल सुखिया " (अ. १८–१७५०) असें म्हटलें आहे. ज्ञानेश्वरींत परमार्थ व प्रपंच दोन्ही सांगितले आहेत. **महाराजांनीं सिद्धांतात परमार्थ व दृष्टांतात व्यवहार शिकविला आहे.** उपमा, रूपक व दृष्टांत यांच्या द्वारें त्यांनीं व्यवहारनीतिबोध केला आहे. सोन्याचे मणि सोन्याच्याच सुतानें ओवावेत तसा त्यांनी आध्यात्माच्या दोरांत व्यवहार असा उत्कृष्ट ओंवला आहे की प्रपंच परमार्थ यांत बिलकुल वेगळीत करतां येत नाहीं असा बोध ज्ञानेश्वरीच्या वाचकांस होतो हा एकच ग्रंथ पुरे आहे. अशी सर्वांगपूर्णता त्यांत आहे.

श्रीमद्भगवद्गीतेप्रमाणेंच ज्ञानेश्वरीचे अठरा अध्याय आहेत; व या सर्वांमिळून सुमारें ९००० (नऊ हजार) ओव्या आहेत. मार्मिक उपमा व दृष्टांत यांच्या द्वारें श्रीमद्भगवद्गीतेचे रहस्य सामान्य जनास सुलभ रीतिनें समजेल अशा तऱ्हेनें विवेचन करण्याची महाराजांची शैली अप्रतिम आहे यांत शंका नाहीं. व या वैशिष्ट्यामुळें ज्ञानेश्वरी हा ग्रंथ महाराष्ट्र सारस्वताचा मुकुटमणि होऊन बसला

आहे. ज्ञानेश्वरींतील एक उतारा नमुन्यादाखल पुढें दिला आहे. तो येणेंप्रमाणें:--

मावळवीत विश्वाभासु । नवल उदयला चंडांशु । अद्वयाब्जिनीविकासु । वंदूं आतां ॥१॥ जो अविद्यारातीं रुसोनियां । गिळी ज्ञानाज्ञानचांदणियां । जो सुदिनु करी ज्ञानियां । स्ववोधाचा ॥२॥ जेणें विवळतिये सवळे । लाहोनि आत्मज्ञानाचे डोळे । सांडिती देहाहंतेचीं अविसाळें । जीवपक्षी ॥ ३ ॥ लिंगदेह कमळाचा । पोटीं वेंचु तया चिद्भ्रमराचा । वंदि मोक्षु जयाचा । उदैला होय ॥४॥ शब्दाचिया आसकडीं । भेदनदीच्या दोहीं थडी । आरडत विरहवेडी । बुद्धिबोधु ॥५॥ तया चक्रवाकांचे मिथुन । सामरस्याचें समाधान । भोगावीं जो चिद्गगन । भुवनदिवा ॥ ६ ॥ जेणें पाहालिये पाहांटे । भेदाची चोर वेळ फिटे । रिघती आत्मानुभववाटे । पांथिक योगी ॥७॥ जयाचेनि विवेककिरणसंगें । उन्मेखसूर्यकांत फुणगे । दीपले जाळिती दांगें । संसाराचीं ॥७॥ जयाचा राशिमपुंजु निवरु । होता स्वरूप उखरी स्थिरु । ये महासिद्धीचा पुरु । मृगजळतें ॥९॥ जो प्रत्यग्बोधाचिया माथयां । मोहंतेचा मध्यान्ही आलिया । लंपे आत्मभ्रांति छाया । आपणपां तळां ॥१०॥ ते वेळीं विश्वस्वप्नासहितें । कोण अन्यथामती निद्रेतें । सांभाळी नुरेचि जेथे । मायारातीं ॥११॥ म्हणौनी अद्वयबोधपाटणीं । तेथ महानंदाची दाटणी । मग सुखानुभूतीचीं घेणीं देणीं । नंदावों लागती ॥१२॥ किंबहुना ऐसैसें । मुक्तकैवल्य सुदिवसें । सदा लाहिजे ह्मां प्रकाशें । जयाचेनि ॥१३॥ जो निजधामव्योमींचा रावो । उदैलाचि उदैजतखेवो । फेडी पूर्वादि दिशांसि ठावो । उदोअस्तूचा ॥१४॥ न दिसणें दिसणेंनगी भावळवी । दोहीं झांकिलें तें सैंघ पालवी । काय बहु बोलां ते आघवी । उखाचि आनी ॥१५॥ तो अहोरात्रांचा पैलकडु । कोणे देखावा ज्ञानमार्तंडु । जो प्रकाश्येंवीण सुरवाडु । प्रकाशाचा ॥१६॥ तया चित्सूर्या श्रीनिवृत्ती । आतां नमो म्हणों पुढतपुढती । जे बाधका येइजतसे स्तुती । बोलाचियां ॥१७॥

ज्ञानेश्वरी (अ. १६ ओव्या १-१७).

नामदेवमहाराज यांचे भक्तिरसानें ओथंबलेले असे पुष्कळ अभंग आहेत. त्याच्या सारखा परमेश्वराचा प्रेमळ भक्त क्वचितच सांपडेल ! श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या उपदेशाची छाप नामदेवमहाराजावर पडलेली जागोजाग दृष्टोत्पत्तीस पडते. नामदेवमहाराजांच्या घरची दासी जनाबाई हिजवरही श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या उपदेशाचा पगडा पडल्याचें दिसून येतें. जनाबाईनें स्वतः बरींच अभंगरचना केली आहे. महाराष्ट्रांतील सर्व भक्तमंडळीपेक्षां जनाबाईच्या वाणींत प्रेमळपणा विशेष रीतीनें भरलेला आहे असें आढळून येतें. श्रीविठ्ठलास आळवितांना तिच्या प्रेमळ वाणींतून जे अभंग बाहेर पडले ते सहृदय मनुष्याच्या कानांवर पडले असतां त्याच्या भक्तिरसाला भरती आल्यावांचून रहाणार नाहीं. तिनें रचिलेल्या हरिश्चंद्राख्यान, प्रल्हादचरित्र, कृष्णजन्म, बालक्रिडा वगैरे काव्यांत भक्तिरस पूर्णपणें भरलेला आहे. 'थालिपाक' नांवाचा तिचा ग्रंथ फार उत्कृष्ट आहे. श्रीज्ञानेश्वर महाराज व नामदेव यांचा संवाद चालूं असतां नामदेवानें आपला 'सुखानुभव' पुढील अभंगांत विदित केला, तो ऐकून श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले असें म्हणतातः––

नामसंकीर्तन वाचे मज गोड । येर ते कावाड वायांवीण ॥१॥
नमन तें नम्रता न देखे गुणदोष । अंतरीं प्रकाश आनंदाचा ॥२॥
ध्यान तया नांव निर्विकार निकें । जें विश्वीं माझ्या देखे विठोबासी ॥३॥
अखंड हृदयीं तेंचि आठवण । साजिरें समचरण विटेवरी ॥४॥
व्यवसायीं चित्त ठेउनी कृपण । लाभाचें चिंतन सर्वकाळ ॥५॥
कीटकी भिंगुरटीचें जैसें अनुसंधान । निकें निजध्यासन एकविध ॥६॥
सर्वभावें एक विठ्ठलचि ध्यायें । सर्वांभूतीं पाहे रूप त्याचें ॥७॥

सर्वांहूनि निराळा रजतमावेगळा । भोगी प्रेमकळा तेचि **भक्ती** ॥८॥
अनुरागें गोविंद ध्यायिजे एकांतीं । यापरती **विश्रांती** आणिक नाहीं ॥९॥
काया वाचा मनें हा माझा अनुभव । सांगितला सर्व आवडीचा ॥१०॥
नामा म्हणे हेंहो बोलविलें तेणें । उदार सर्वज्ञे पांडुरंगें ॥११॥

जनाबाईचे अभंगाचा नमुनाः—

गंगा गेली सिंधूपासीं ॥ त्याणें अव्हेरिलें तिसी ॥ १ ॥
तरि तें सांगावें कोणाला ॥ ऐसें बोलें बा विठ्ठला ॥ २ ॥
जळ कोपलें जळ-चरा ॥ माता अव्हेरी कुमारा ॥ ३ ॥
जनी म्हणे शरण आले ॥ पाहिजे ते उद्धरिले ॥ ४ ॥

विवेक–सागर ॥ सखा माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥
मरोनियां जावे ॥ बा माझ्याच्या पोटा यावें ॥ २ ॥
ऐसें करीं गा माझ्या भावा ॥ बापा माझ्या ज्ञानदेवा ॥ ३ ॥
जाईन वोवाळोनी ॥ जन्मोजन्मीं म्हणें **जनी** ॥ ४ ॥

ज्याचा सखा हरी ॥ त्यावरी विश्व कृपा करी ॥ १ ॥
उणें पडों नेदी त्याचें ॥ वारें सोशी आघाताचें ॥ २ ॥
तयावीण क्षणभरी ॥ कदा आपण नव्हें दूरी ॥ ३ ॥
अंग आपुलें वोढोनि ॥ त्याला राखे जो निर्वाणीं ॥ ४ ॥
ऐसा अंकीत भक्तासी ॥ म्हणे **नामयाची दासी** ॥ ५ ॥

जेवीं जेवीं गा मुरारी ॥ तुज वाढितें शीदोरी ॥ १ ॥
कनकाचे ताटी ॥ रत्न-जडित ठेविली वाटी ॥ २ ॥
आमुचें ब्रह्म सारंग-पाणी ॥ फिरतसे वनोवनी ॥ ३ ॥
गोपाळांचे मेळीं ॥ करीतसे हो राडोळी ॥ ४॥
तुळसीच्या वनीं ॥ उभा राहे दासी **जनी** ॥ ५ ॥

एकदम व्हावी हें एक ईश्वरी सूत्र समजलें पाहिजे. सनातन हिंदु धर्माचे अभिमानी श्रीज्ञानेश्वरमहाराज, नामदेव वगैरे संतकवि, व महानुभावपंथीय ग्रंथकार व कवि, या सर्वांचा भागवतधर्माचा प्रसार करणें हा सर्वसाधारण हेतु होता. बहुजन समाजांत अध्यात्मिकज्ञानाचा फैलाव त्यांच्या नेहमींच्या बोलण्याच्या भाषेंत करून परमेश्वरासंबंधानें त्यांच्या मनांत प्रेम उत्पन्न करावें असा या सर्वांच्या लिखाणांचा रोख होता असें दिसतें. रामदेवराव जाधव व हेमाद्रि हे कालवश झाल्यास सुमारें ६०० वर्षे होऊन गेलीं; परंतु मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठीं त्यांनीं जे प्रयत्न केले त्यामुळें मराठी भाषा अस्तित्वांत असेपर्यंत त्यांची कीर्ति कायम राहील यांत संदेह नाहीं.



भाग पांचवा.

उत्तरकोंकणांत देवगिरीच्या यादवांचें राज्य.

सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामन्तचक्रं च तत्
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत् ताश्चंद्रबिबानना ।
उद्रिक्ता स च राजपुत्रनिवहस्ते बंदिनस्ताः कथाः
सर्वं यस्य वशादगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥

सह्याद्रिपर्वत व त्याच्या पश्चिमेकडील अरबीसमुद्राला लागून असलेला किनारा याचे दरम्यान उत्तरेकडे दमणपासून तो ग्वालीं थेट गोव्यापर्यंत जमिनीची जी चिरटी आहे तिला प्राचीन कालापासून अपरांत, अथवा अपरांतक अशी संज्ञा आहे. या अपरांताचा उल्लेख महाभारतांत* केलेला आढळतो. बुद्धवाङ्मयांतील "महावंसो"+ या प्राचीन ग्रंथांतही अपरांताचा उल्लेख केलेला आहे. **अशोकाच्या** आज्ञेवरून **मौद्गली**–पुत्र यानें महारठ. अपरांत व वनवासी या प्रांतांत आपले धर्मप्रचारक पाठविले होते, असें या ग्रंथावरून दिसतें.

---

* सोऽपरांतेषु तीर्थानि पुण्यान्यायतनानिच ।
सर्वाण्येव वानु पूर्वेण जगामामित विक्रमः ॥
समुद्रे पश्चिमे यानी तीर्थान्यायतनानिच ।
तानि सर्वाणि गत्वास प्रजानामुपपत्तिमान् ॥
" महाभारत आदिपर्व "

+ तस्यानीकैर्विसर्पद्भिरपरान्तजयोद्यतैः ।
रामास्त्रोत्सारितोऽप्यासीत्सह्यलग्न इवार्णवः ॥ ५३ रघु. स. ४.
अवकाशं किलोदन्वान्रामायाभ्यर्थितो ददौ ।
अपरान्तमहीपालव्याजेन रघवे करम् ॥ ५८ रघु. स. ४.

नाशिक-प्रांतांतील तिरश्मि-पर्वताच्या एका गुहेंत सांपडलेल्या लेखावरून असें समजतें कीं, आंध्रभृत्य वंशांतील पुलुमाई राजाच्या कारकीर्दीच्या एकोणिसाव्या वर्षी त्याची आजी (आईची आई) व गौतमी–पुत्र शातकर्ण याची आई गौतमी बलश्री हिनें ही गुहा तयार करवून भाद्रायणी पंथाच्या भिक्षु–संघास अर्पण केली होती. हा गौतमी पुत्र शातकर्णी राजाचा आजा असून त्याचा अंमल असिक, सुराष्ट्र, **अपरांत**, विदर्भ, अनुपआकरावंति इत्यादि देशावर होता.

कालिदासानें आपल्या रघुवंशांत रघूच्या दिग्विजयाचें वर्णन करितांना अपरांताच्या राजांनीं रघूस करभार दिल्याचें म्हटलें आहे. जुनागड येथील रुद्रदामन याच्या वेळचा एक शिलालेख सांपडला आहे त्यांतहि अपरांताचा उल्लेख आहे षट्षष्टि (हल्लींचें साष्टी) बेटांत ठाणें शहरापासून सुमारें दोन-तीन मैलावर कान्हेरीची लेणी आहेत; त्यांतील शिलालेखांत अपरातांचा उल्लेख आहे.

या भागास कालगतीनें ' कोंकण ' असें नांव प्राप्त होऊन त्याचे उत्तर व दक्षिण कोंकण असे पोटभाग पडले. सुरतजिल्ह्याच्या दक्षिण हद्दीपासून रत्नागिरी जिल्ह्याची उत्तरहद्द यांच्या दरम्यानचा प्रदेश उत्तर कोंकणांत मोडत असे. रत्नागिरी जिल्ह्याची उत्तर व कारवार जिल्ह्याची दक्षिणहद्द यांतील प्रदेश दक्षिण कोंकणांत मोडत असे. या भागास ' कोंकण ' हे नांव केव्हां व कसें प्राप्त झालें याबद्दल खात्रीलायक आधार मिळत नाहीं. ख्रिस्ती शकापूर्वी शूर्पारक (सोपारें) येथें एका श्रीमंत व्यापाराचा **पूर्ण** नांवाचा

दासीपुत्र होता. तेथील सावकारांत तो प्रमुख म्हणून गणला जात असे. त्यानें बौद्धधर्माची दिक्षा घेतली होती.

कोंकणांत बुद्धधर्माचा प्रसार करण्याकरितां गौतमबुद्धानें आपले धर्मप्रचारक ऊर्फ भिक्खु पाठविले होते अशी हकीगत बुद्धधर्मीय एका सूत्रांत दिली आहे, कोंकणांतील बऱ्याच लोकांस त्यानें बुद्धधर्माची दीक्षा दिली. या सूत्रांत दिलेल्या मजकूरावरून अपरांतास कोंकण हें नांव फार प्राचीन कालापासून पडलें होतें असें दिसतें. कान्हेरी येथील गुहेंत एक शिलालेख सांपडला आहे त्यांत शिलाहार वंशांतील पहिला राजा कपर्दी याचा मुलगा पुलकेशी यानें आपणांस कोंकणांतील मंगळपुरीचा अधिपती असें म्हटलें आहे. रघुवंशांत (स. ४ श्लो. ५९) अपरांताचा उल्लेख असल्याचें वर म्हटलें आहे. या शब्दाची व्याख्या करतांना टीकाकार वल्लभानें त्यास ' कोंकण ' असें दुसरें नांव दिलें आहे. हा वल्लभ हेमाद्रीच्या पूर्वी होऊन गेला असें विद्वानांचें मत आहे.

कोंकणच्या किनाऱ्यावर पुरी, शुर्पारक, श्रीस्थानक (हल्लीचें ठाणें) वसई, चौल या नांवाची बंदरें असून या बंदराबरोबर, ईजिप्त (मिसर देश) अरबस्तान, इराण, ग्रीस वगैरे देशांतील लोकांचें व्यापारी दळणवळण होतें, अशाबद्दल पारशी व ग्रीक लोकांचे ग्रंथांत भरपूर पुरावा आहे. ग्रीस व अरबस्तान येथील कांहीं प्रमुख व्यापाऱ्यांनीं आपलें कायमचें स्थान ठाणें व सोपारें येथें केल्याचा उल्लेख सदरील ग्रंथांत आढळतो. टॉलेमी नामक भूगोलशास्त्रज्ञाच्या वेळीं (इ. स. १३५-१५०) ग्रीक लोकांनां हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील दुसऱ्या कोणत्याहि भागापेक्षां कोंकण प्रांताची जास्त

माहिती होती असें दिसतें. ग्रीक लोकांचा **चौल** बंदराबरोबर फार मोठा व्यापार होता. त्यांजपासून टॉलेमी यानें पश्चिम–हिंदुस्थाना-संबंधीं बरीच माहिती मिळविली होती असें दिसतें. त्यानें हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्याचे चार भाग केले होते ते असेः–सुराष्ट्रेने, लारिके, आरियेके व दामुरिके; पैकीं पहिल्या भागांत कच्छ, काठेवाड, व उत्तरगुजराथप्रांत यांचा समावेश केला जात होता; दुसऱ्यांत लाटदेश ऊर्फ दक्षिणगुजराथप्रांत यांचा समावेश केला जात होता. टॉलेमीच्या ग्रंथांत वर्णन सोपारें, चौल, नाशिक, पैठण वगैरे व्यापारी शहरांचीं वर्णनें दिलीं आहेत. याशिवाय ठाणें जिल्ह्यांतल्या सात स्थळांची नांवें दिलीं आहेत, तीं येणेंप्रमाणेंः–नवसारी, गोरे, भिवंडी तालुक्यांतील दुगाड, वसईच्या खाडी नजीकचे भाईंदर, चौल, महाडजवळची पाल व कुलाबा जिल्ह्यांतलें घोडेगांव. या बंदरांतून परदेशचा माल हिंदुस्थानांतील सर्व भागांत जात असे म्हणून व्यापारीदृष्ट्या हिंदुस्थानचा पश्चिम किनारा परदेशच्या लोकांस फार महत्वाचा वाटत असे. प्रस्तुत काळींही, मुंबई, कराची वगैरे बंदरामुळें या किनाऱ्याचे महत्व अद्याप कायम आहे.

कोंकण प्रांतावर इ. स. ४ थ्या शतकापर्यंत आंध्रभृत्य राजाचा अंमल होता. त्यानंतर गुप्तराजे यांचा अंमल कांहीं काळपर्यंत होता. गुप्त राजानंतर राष्ट्रकूटांचे कोंकणांवर आधिपत्य होतें. नाशिक जिल्ह्यांतील बागलाण, व सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड, या दोन ठिकाणीं सांपडलेल्या नाण्यांवरून राष्ट्रकूट वंशांतील **कृष्णराजा** हा इ. स. ३७५ पासून इ. स. ४०० पर्यंत कोंकणावर राज्य करीत होता असें दिसते. त्यानंतर इ. स. सहाव्या शतकांत मौर्यवंशीय राजाचा

कोंकणावर अंमल होता. चालुक्यवंशीय राजा कीर्तिवर्मा ह्यानें इ. स. ५६७ ते ५९१ चे दरम्यांत उत्तर कोंकणावर स्वारी करून मौर्यांचा पराभव केला. त्याचा मुलगा पुलकेशी यानें कोंकण प्रांतावर पुन्हां स्वारी करून मौर्यांचें उच्चाटण केलें व तो प्रांत पुन्हां काबीज केला. या पुलकेशीनें आपल्या पराक्रमाच्या जोरावर माळवा, गुजराथ कनोज व वनवासी हे प्रांत आपल्या अंमलाखालीं आणिले. इ. स. ८१० पर्यंत चालुक्यवंशीय राजांचा अंमल कोंकणावर होता. उत्तर कोंकणावर शिलाहारवंशीय राजांचा अंमल शके ७३२ (इ. स. ८१०) वर्षीं सुरूं झाल्याबद्दल पुरावा मिळतो. या शिलाहार वंशाच्या तीन शाखा होत्या, पैकीं मुख्य शाखा कऱ्हाड, कोल्हापूर येथें असून दुसरी कोंकणांतील वनवासी येथें होती, व तिसरी उत्तर कोंकणांतील पुरी (जंजिऱ्या नजिकची दंडा–राज–पुरी) येथें होती. या तीनही शाखांचें मूळ ठिकाण टगर (हल्लींचें जुन्नर) नांवाचें शहर होतें. कारण तीनही शाखेंच्या राजांचे बिरुदावलींत तगरपुरवराधीश्वर हे बिरुद सर्वसाधारण आहे. रामदेवराव जाधवाचा चुलता महादेवराय यानें उत्तर कोंकणावरील शिलाहारांची सत्ता शके ११८८ चे सुमारास नष्ट केली; तोंपर्यंत या प्रांतावर शके ७३२ (इ. स. ८१०) पासून शके ११८८ (इ. स. १२६६) पर्यंत सुमारें साडेचारशें वर्षें त्यांचा अंमल अव्याहत चालूं होता, ही गोष्ट त्या वंशाची संपूर्ण वंशावळ पुढें दिली आहे तिजवरून व तत्कालीन ताम्रपट व शिलालेख याजवरून सिद्ध होते.

उत्तर कोंकणांतील शिलाहारवंशीय राजांची वंशावळ.

१ कपर्दि

२ पुलशक्ति

३ दुसरा कपर्दि ऊर्फ लघुकपर्दि (शके ७७५–७९९)

४ वप्पुवन्न

५ झंज (इ. स. ९१६)

लस्थियव्वा कन्या
(हिचा चांदूर येथील
यादव वंशीय राजा चवथा
भिल्लम याच्याशी विवाह
झाला होता.)

६ गोग्गि

७ वज्जडदेव (वज्रदेव)

८ अपराजित (शके ९१९)

९ दुसरा वज्जडदेव (वज्रदेव)

१० अरिकेसरी (शके ९३९)

११ चित्रराज (शके ९४८)

१२ नागार्जुन

१३ मुम्मुनि (शके९८२)

१४ अनंतदेव (शके १००३–१०१६)

१५ अपरादित्य (शके १०६०)

१६ हरिपालदेव(शके १०७१, १०७२, १०७५)

१७ मल्लिकार्जुन (शके १०७८ व १०८२)

१८ दुसरा अपरादित्य (शके ११०६ व ११०९)

१९ केशिदेव (शके ११२५ व ११६१)

२० सोमेश्वर (शके ११७१ व ११८८)

या वंशावळींत नमूद केलेल्या कांहीं राजाचे वेळचे ताम्रपट व शिलालेख उपलब्ध आहेत त्याचे टांचण पुढें दिलें आहे. त्यावरून शके ७३२ (इ. स.८१०) पासून तो शके ११८८ (इ. स. १२६६) पर्यंत उत्तर कोंकणावर शिलाहारवंशीय राजाखेरीज दुसऱ्या कोणत्याही राजांचा अंमल असणें शक्य नव्हतें असें दिसतें.

राजाचे नांव (वंशावळीतील नंबरा प्रमाणें)	**तांम्रपट अगर शिलालेख**
२ **पुलशक्ति** (पुलुमायी)	साष्टी(पत्-शष्टी) बेटांतील कान्हेरीच्या लेण्यांत असलेला शिलालेख.
३ **दुसरा कपर्दी** अगर **लघुकपर्दि**... (शके ७७५–७९९)	कान्हेरी लेण्यांतील नं.१० व ७८ वा. शिलालेख.
८ **अपराजित** (शके ९१९) (इ. स. ९९८) ...	भादाणे (भेरेंगांव तालुका भिवंडी) येथील तांम्रपट, भाषा संस्कृत, लिपि देवनागरी हा तांम्रपट फार महत्वाचा आहे.
१० **अरिकेसरी** (शके ९३९) (इ. स. १००७) ...	ठाणें येथील किल्ल्यांत(हल्लीचा तुरुंग) जनरल कार्न्याक यास सांपडलेला ताम्रपट (संस्कृत भाषा; लिपि देवनागरी) शके ९३९; हाही ताम्रपट फार महत्वाचा आहे. संजान ऊर्फ हंजमान येथील पारशी लोकांच्या धर्मगुरुस उद्देशून आहे.
११ **चित्रराज** अथवा **चित्तरंजन** ... (शके ९४८; इ. स. १०२०)	ठाणें व भांडुप यांचे दरम्यान असलेल्या नाहूर गांवीं सांपडलेला ताम्रपट शके ९४८.

१३ **मुम्मुनी** (शके ९८२) ... अंबरनाथचा शिलालेख.
(इ. स. १०६०)

१४ **अनंत देव** ... ... व्याहाड (विहार) येथील ताम्रपट
(शके १००३–१०१६) शके १००३ साष्टी तालुक्यांतील गांव हें गांव अस्तित्वांत नसून त्या ठिकाणीं तलाव बांधला आहे व त्यांचें पाणी मुंबई शहरास पुरविले जातें. खारेपाटणचा ताम्रपट (संस्कृत भाषेंत शके १०१६) या ताम्रपटाचे कै. न्यायमूर्ति तेलंग यांनीं संशोधन केलें आहे. या ताम्रपटावरून त्याचे राजवटींत घडलेल्या गोष्टींवर प्रकाश पडतो.

१५ (पहिला) **अपरादित्य** ... चांजे (उरण पेठ्यांतील) येथील
(शके १०६० इ. स. ११३८). शिलालेख कोंकणेश्वर पहिल्या अपरादित्यानें काश्मीर येथील विद्वत्परिषदेस सोपारे येथून तेजकंठ नांवाचा विद्वान गृहस्थ आपला प्रतिनिधी म्हणून पाठविला होता. (श्रीकंठ चरितांत याबद्दलचा उल्लेख स्पष्ट आहे.)

१६ **हरिपालदेव**, ... सोपारें व वटार येथील तीन शिला-
(शके १०७१ ते १०७५) लेख. (शिलालेख १०७८).
(इ. स. ११४९ ते ११४३)

१७ **मल्लिकार्जुन** ... ... १ गुजराथचा राजा कुमारपाल यानें
(शके १०७८ ते १०८२) मल्लिकार्जुनाचा पराभव केला या-
(इ. स. ११५६ ते ११५८). बद्दलचा आहे. कीर्तिकौमुदींत या-
बद्दलचें वर्णन आहे. (अध्याय २,
श्लोक ४६ ते ४९ वसईचा शिलालेख.)

१८ (दुसरा) **अपरादित्य** ... मांडवें (अलिबाग तालुका) येथें
(शके ११०२) १०८२ (१) शिलालेख ११०२
परळच्या गव्हर्नमेंट हाऊसनाजिक
सांपडलेला होता. हा राजा मोठा
विद्वान असून याज्ञवल्क्य स्मृतीवर
त्यानें संस्कृतांत टीका लिहिली आहे.

१९. **केशिदेव** (शके ११२५) ... लोनाड येथील शिलालेख, माघ
(इ. स. १२०३) ... व॥ १३, सोमणकवि यास बाबगांव
दान दिल्याचा मजकूर आहे.

२० **सोमेश्वर** ... ... रानवडचा (उरणनजीकचे) शिला-
(शके ११७१ ते ११८८) लेख. यांत सोमेश्वराच्या पांच
प्रधानांची नांवें आहेत. (१) झांपद
प्रभु; (२) मार्यनाकु; (३) बेबल
प्रभु; (४) परंदे पंडित; (५) पाथिगे
विनाकु, ठाणे येथील श्रीकोपिनेश्वराचे
देवळाचे मागें उत्तरेश्वराचें देवालय
आहे त्यास सोमेश्वरानें चांजे गांवां-
तील बागेचें उत्पन्न लावून दिल्याचा
शिलालेखांत उल्लेख आहे.

उत्तरकोकणच्या शिलाहार राजांच्या वर दिलेल्या वंशावळी-

वरून व त्यांच्या शिलालेखावरून शके ९२२ पासून शके ११८८ पर्यंत उत्तरकोंकणावर या राजघराण्याचा अव्याहत अम्मल होता असें दिसून येतें.

या वंशांतील शेवटचा राजा सोमेश्वर याची कारकीर्द शके ११७? पासून ११८८ (इ. स. १२४९ पासून १२६६) पर्यंत होती. देवगिरीच्या महादेवरायाची कारकीर्द शके ११८२ (इ. स. १२६०) पासून शके ११९३ (इ. स. १२७१) पर्यंत होती. या महादेवरायाचें, ' कुंकुणेश्वर ' सोमेश्वराबरोबर तुंबळ युद्ध झालें व त्यांत सोमेश्वराचा पूर्ण पराभव होऊन तो समुद्रांत बुडाला असें हेमाद्रिनें या युद्धाचें व्रतखंडांत चटकदार वर्णन दिलें आहे. उत्तरकोंकणप्रांत देवगिरीच्या साम्राज्याचा भाग झाल्यानंतर महादेवरायानें त्यावर आपले प्रतिनिधी नेमून तेथील राज्यकारभार चालविला, ही गोष्ट ओवळें येथील ताम्रपटावरून व अण्जूरच्या शिलाशासनावरून सिद्ध होते. अण्जूरच्या शिलाशासनांत रामदेवराव जाधवाच्या राजवटींत उत्तरकोंकणचा प्रतिनिधी देवगिरीकडील भारद्वाजगोत्री श्रीकृष्णदेव नांवाचा ब्राह्मण होता असें दिसतें.

अल्लाउद्दिन खिलजीनें इ. स १२९४ मध्यें देवगिरीवर अचानक छापा घालून रामदेवरावाचा पराभव केला व त्यास दिल्लीच्या बाहशहाचे मांडलिक म्हणून कबूल करण्यास भाग पाडिलें. या धामधूमींत रामदेवरावाचा दुसरा मुलगा बिंब उर्फ भीमदेव यानें उत्तरकोंकणची वाट धरिली व त्या प्रांताची राज्यसूत्रें आपले हातीं घेतलीं व देवगिरी व पैठण येथून आपलेबरोबर आणलेल्या ब्राह्मण व क्षत्रिय मंडळीस निरानिराळ्या अधिकाराच्या जागेवर नेमिलें त्यापैकीं

पुरुषोत्तमपंत नायक कावळे यास सरदेसाई व देशपांडेपणाचें वतन देऊन इतर ब्राह्मणास जोशी उपाध्येपणाच्या वृत्त्या दान दिल्या.

बिंबदेवांच्या वेळचे शिलालेख व ताम्रपट प्रत्यक्ष उपलब्ध नाहींत. परंतु त्यांचे पश्चात् उत्तर कोंकणप्रांत मुसलमानराजांच्या अंमलाखालीं गेल्यावर बेदरच्या बादशहाच्या वेळचा शके १३३८ (इ. स. १४१६) सालचा एक महजर उपलब्ध आहे त्यांत बिंबदेवाच्या वेळच्या शिलालेखाचा उल्लेख आहे. याखेरीज त्याचे कारकीर्दीबद्दल ऐतिहासिक पुरावा म्हणण्यासारखा नाहीं. बिंबदेवानें उत्तर कोंकणावर किती वर्षे राज्य केलें व त्याच्या पश्चात् या प्रांताची राज्यसूत्रें कोणाच्या हातीं गेलीं याबद्दल विश्वसनीय हकिकत मिळत नाहीं.

उत्तरकोंकणप्रांतावर अनहिल–पट्टण येथील श्रीभोलोभीम अगर भीमदेव यानें शके १०६२ (इ.स. ११४०) चे सुमारास राज्य केलें असा कांहीं ग्रंथांत उल्लेख केलेला आढळतो. परंतु भोलोभीम हा चालुक्यवंशीय होता. गुजराथच्या इतिहासांत त्याच्या कारकीर्दीचें वर्णन दिलें आहे, त्यावरून उत्तर कोंकणांत तो केव्हांही आला नव्हता असें दिसून येतें. तसेंच पैठण येथें **राम** या नांवाचा एक मांडलिक राजा असून त्यास भीम नांवाचा एक मुलगा होता; व त्यानें उत्तर कोंकणावर राज्य केलें अशा आशयाचा कांहीं ग्रंथांत उल्लेख केलेला आढळतो. परंतु या दोन्हीं विधानास इतिहासाचा आधार नाहीं. शिवाय वर दिलेला शिलाहार राजांचा इतिहास या विधानास पोषक नाहीं.

बिंबदेवास केशवदेव अगर प्रतापसिंह या नांवाचा मुलगा होता; व त्यानें मरोळ (साष्टीबेटाच्या उत्तर भागांतील अंधेरी व कुर्ले यांचे

दरम्यानचा गांव) नजीक प्रतापपुर नांवाची राजधानी स्थापिली असें म्हणतात. परंतु दंतकथेशिवाय या विधानास दुसरा आधार नाहीं.

रामदेवराव जाधव यास दिल्ली येथें नेऊन त्याजकडून बादशहानें कांहीं करारमदार करून घेतले याबद्दल फेरिस्तानें आपल्या प्रवास-वर्णनांत पुढील हकीगत दिली आहे. रामदेवराव जाधवानें दिल्लीच्या बादशहाचें मांडलिकत्व कबूल केल्यामुळें अल्लाउद्दिन खिलजीनें देवगिरीचें राज्य त्यास परत दिलें, व त्याच्या राज्याच्या लगत असलेल्या गुजराथप्रांताचा कांहीं भाग त्यास तोडून दिला. ह्याखेरीज नवसारी प्रांत त्यास जातइनाम करून दिला. दक्षिणेंतील तत्कालीन हिंदु-राज्यें जिंकण्याचें कामीं रामदेवराव जाधवानें दिल्लीच्या बादशहास पूर्णपणें मदत करावी अशीही शर्त सदरील करारांत होती. रामदेवराव जाधवानें या सर्व शर्ती मान्य केल्या. दिल्लीहून परत आल्यावर त्यानें नवसारीच्या सुभेदारीच्या कामावर आपला मुलगा बिंबदेव याची नेमणूक केली. ' भानुविजय ' नांवाच्या महानुभावीय ग्रंथातील एक उतारा मागील भागांत दिला आहे; त्यांत रामदेवराव जाधवानें बिंबदेवास गुजराथेंत पाठविल्याचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे, त्यावरून फेरिस्तानें दिलेल्या वरील हकिगतीस दुजोरा मिळतो. नवसारी प्रांतावर बिंबदेवाची सुभेदार म्हणून नेमणूक झाल्यावर त्यानें ठाणें येथें असलेलीं आपली कचेरी तेथून हालवून अनहिलपट्टण येथें नेली असावी असें दिसतें. कारण तेव्हांपासून उत्तरकोंकणप्रांत अनहिलवाड्याचा पोटभाग म्हणून समजण्यांत येऊं लागला. देवगिरीच्या यादवांचें राज्य नष्ट होईपर्यंत उत्तरकोंकणप्रांताचा राज्यकारभार अनहिलपट्टण येथून चालत असावा असें दिसतें गुजराथ-

प्रांताच्या सुभेदारीच्या कामावर असतांना तेथील राज्यकारभार चालविण्यासाठीं, बिंबदेवानें देवगिरी व पैठण येथून आपल्या विश्वासांतील महाराष्ट्रीयब्राह्मण व क्षत्रिय या वर्गांतील बरीच मंडळी नेली असावी असें मानण्यास जागा आहे. देवगिरीचें राज्य नष्ट झाल्यावर गुजराथप्रांत मुसलमानांच्या ताब्यांत कायमचा गेला. त्यामुळें या सर्व दक्षिणीमंडळीस उत्तरकोंकणांत परत येणें भाग पडलें. त्यापैकीं बऱ्याच ब्राह्मण व क्षत्रिय कुळांनीं मुंबई बेटांत आणि ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत वसाहत केलीं. व ह्या तीनही प्रांतांत सदरील ब्राह्मणकुळांतील वंशजाकडे-जोशी उपाध्येपणाच्या वृत्त्या अद्याप चालत आहेत;तसेंच सदरील सोमवंशीय क्षत्रिय ज्ञातींत,नाईक,चौधरी,चौघुले, राऊत(रावटे)वगैरे आडनांवाचीं कुळें अद्याप आहेत.देवगिरीचे यादवांचे राज्यांत लष्करी खात्यांत मोठमोठ्या हुद्यांची कामें त्यांचेकडे असावी असें त्यांच्या आडनांवावरून अनुमान काढण्यास जागा आहे. अण्जूरच्या सोमवंशीय नाईक घराण्यांतील ज्या वीर पुरुषांनीं वसईप्रांत फिरंग्याकडून हस्तगत करण्याचे कामीं इ. स. १७३९ सालीं **चिमणाजी आप्पास** महत्वाची मदत केली, (याबद्दलचा उल्लेख) तिसऱ्या भागांत येऊन गेला आहे. नाईक घराण्यांतील मूळ पुरुष बिंबदेवाबरोबर आलेल्या विधानास पोषक असे कागदपत्र त्यांचे वंशजाकडे आहेत असें समजतें. उत्तरकोंकणांत व गुजराथेंत जी ब्राह्मण व क्षत्रिय मंडळी गेली ती महाराष्ट्रीय होती याबद्दल शंका नाहीं. इ.स.१४१४ (हिजरी८१७)सालचा बेदरच्या बादशहाचा **महजर**,शके १२२३ चें **बिंबदेवानें पुरुषोत्तम** श्रीधर **कावळे** पैठणकर यास दिलेलें **दानपत्र**, तसेंच ओवळें येथील **ताम्रपट** व अण्जूरचें **शिलाशासन**, यांत

उल्लेखिलेल्या व्यक्तींच्या नांवावरून या विधानास दुजोरा मिळतो. देवगिरीचे यादवराजे सोमवंशी होते ही गोष्ट निर्विवाद आहे. **महादेवरायानें** उत्तरकोंकणप्रांत शिलाहारराजाकडून जिंकून घेतल्यावर,तेथील राज्यकारभार पाहण्यासाठीं देवगिरीकडील श्रीकृष्णदेव, अच्युत नायक वगैरे विश्वासू अधिकारी पाठविले होते. त्याप्रमाणेंच बिंबदेवानें देवगिरीहून उत्तरकोंकणांत जातेवेळीं आपलेबरोबर आपल्या घराण्यांशीं संबंध असलेल्या क्षत्रिय कुळांस व अधिकारी मंडळीस तसेंच धार्मिक कृत्यें करण्यासाठीं आपल्या कुलगुरूस बरोबर नेलें असल्यास त्यांत कांहीं वावगें नाहीं. या ब्राह्मण व क्षत्रिय मंडळींचे दरम्यान त्यावेळीं असलेले यजमान व पुरोहितपणाचे संबंध त्यांचे वंशजांनीं अद्याप कायम ठेविले आहेत, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

बेदरचा बादशहा सुलतान अल्लाउद्दिन गाजी ह्याचे वेळचा महजर शके १३३८ ? (१३३६)-हिजरी ८१९ ? (८१७)-इ. स. १४१६ ? (१४१४).

हा महजर फारशी भाषेंत असून त्यावर बेदरच्या बादशहाचा शिक्कामोर्तब आहे. शिवाय त्याच्या दोनही बाजूस त्यावेळच्या दरबारी पद्धतिप्रमाणें तत्कालीन काझींचे शिक्के आहेत. महजर म्हणजे खुद्द राजानें अगर त्यानें नेमिलेल्या न्यायाधिशानें दिलेला निकाल. साष्टी बेटाच्या उत्तरभागांत समुद्रकिनाऱ्या नजिक **मालाड** नांवाचा गांव आहे. त्या गांवच्या सरदेसाई व सरदेशपांडेपणाचें वतन बिंबदेवानें पैठणहून आपलेबरोबर आणलेल्या ब्राह्मणांपैकीं पुरुषोत्तमपंत श्रीधर नायक कावळे यांस शके १२२१ (शके १२२३ ?) मध्यें वैशाख व ॥ अमावास्येस प्लवसंवत्सरी दान दिलें होतें. उत्तरकोंकण

प्रांताची राज्यसूत्रें बिंबदेवाचे हातीं आली त्यावेळीं मालाडचे सरदेसाई व सरदेशपांडेपण गोविंद मिटकरी नांवाच्या एका गोवर्धन ब्राह्मणांकडे होतें. सदरील गोविंद मिटकरी हा कांहीं कालानंतर दिवंगत झाला. त्याच्या पोटीं पुत्रसंतान नव्हतें. त्याची विधवा चांगुणाबाई हिला चोविस हजार होन देऊन बिंबदेवानें सदरील वतन विकत घेतलें. व वर लिहिल्याप्रमाणें तें पुरुषोत्तमपंत नायक कावळे यांस दान दिलें. साष्टी व मालाड प्रांतांतली दरएक गांवच्या उत्पन्नांतून या वतनदारास पन्नास फदे (तत्कालीन नाणें) घेण्याचा हक्क असे. या हक्कास **पिछोडी** असें म्हणत. या खेरीज स्थानिक जोशीउपाध्ये पणाचे व मानपानाचे हक्काचा ही त्यांत समावेश होत असे. हें दानपत्र बिंबराजानें त्यावेळच्या पद्धतिप्रमाणें शिलावर कोरविण्याचा व त्या जागोजाग रोंवण्याचा हुकूम केला होता. तेव्हांपासून शके १३३६ पर्यंत पुरुषोत्तमपंत कावळ्यांच्या वंशजांनीं ह्या वतनाचा निर्वेधपणें उपभोग घेतला असावा असें दिसतें. कारण शके १३३७ च्या सुमारास मालाड येथील सोमदेसले याचा पुत्र देवदेसला ठाकूर ह्यानें या वतनावर आपला हक्क आहे असा वाद प्रथमच उपस्थित केला. कावळे व ठाकूर यांचा तंटा महंमद दलील (दिवाण) या नांवाच्या स्थानिक अधिकाऱ्यापुढें निकालाकरितां गेला. त्यानीं दिलेला निकाल उभय पक्षांस पसंत न पडल्यामुळें पक्षकारांच्या विनंतीवरून कज्जाचे सर्व कागदपत्र महंमद दलील यानें बेदरचा बादशाह सुलतान सुलेमान अल्लाउद्दीनगाझी याजकडे अखेर निकालाकरितां पाठविले. त्यावेळच्या न्यायपद्धतिप्रमाणें दिवाणी मुकदम्याची चौकशी योग्य रीतीनें व्हावी म्हणून स्थानिक पंचाच्या समक्ष उभय

पक्षकारांचा लेखी व तोंडी पुरावा कोर्टापुढें घेण्यांत येत असावा असें दिसतें. इंग्लंड देशांत दिवाणी व फौजदारी मुकदम्यांत पंचाच्या सल्ल्यानें कोर्ट निकाल करीत असतें. हिंदुस्थानांत कांहीं फौजदारी खटल्यांत मात्र आरोपीस ज्यूरीची सवलत मिळते. बादशहानें स्थानिक पंच जमवून उभयपक्षांकडील लेखी व तोंडी पुरावा घेतला. हें वतन बिंबराजानें कावळे याच्या पूर्वजास दान दिलें होतें. सदरील दानपत्र ज्या शिलांवर कोरलेलें होतें त्या बादशहानें आपल्यापुढें आणवून त्याच्या खरेपणाबद्दल आपली खात्री करून घेतली. याप्रमाणें पुढें आलेल्या एकंदर पुराव्याचा विचार करून बादशहानें कावळ्यांच्या तर्फे निकाल दिला. बिंबदेवाच्या वेळचा दुसरा एखादा शिलालेख उपलब्ध असल्याचें दिसून येत नाहीं.

या महजरांत बिंबदेवानें पुरुषोत्तम कावळे यास, शके १२२१ प्लवसंवत्सरी वैशाख महिन्याच्या अमावास्येस सूर्यग्रहणाची पर्वणी साधून मालाड येथील सरदेसाई व सरदेशपांडेपणाचें वतन दान दिल्याबद्दलचा उल्लेख असून, तें ज्या शिलांवर कोरलें होतें त्या बादशहानें आपल्या खात्री करितां दरबारांत आणविल्या होत्या असें स्पष्ट म्हटलें आहे, यावरून सदरील शिलालेखाच्या अस्तित्वाबद्दल शंका घेण्यास जागा उरत नाहीं. परंतु अस्सल शिलालेख उपलब्ध नसल्यामुळें या बाबतींत संशोधनदृष्ट्या जास्त लिहितां येत नाहीं.

अलिबाग तालुक्यांतील नागांव येथील भीमेश्वराच्या देवळांत शके १२८९ चा हंबीररावाचे वेळचा एक मराठी शिलालेख उपलब्ध आहे. ग्रंथमालेच्या सन १९०५ सालच्या १०. व्या अंकांत इतिहासाचार्य कै. राजवाडे यांनीं ह्या शिलालेखाचें संशोधन करितांना

प्रस्तुत (पिछोडीच्या दाव्याच्या) महजराबद्दल पुढें लिहिल्याप्रमाणें आपलें मत दिलें आहे. " देवगिरीच्या बिंबराजानें शके १२२१ (शके १२२३ ?) मध्यें पुरुषोत्तम नायक कावळे यास दिलेलें दानपत्र खरें असून या महजरांतील मजकूर त्याच्या खरेपणाबद्दल साक्ष पटवीत आहे. हा महजर बेदरचा बहामनी पातशहा अल्लाउद्दीन (दुसरा) ह्याच्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षी लिहिला गेला. हें वर्ष हश्त सद् व हफ्दह म्हणजे ८१७ हिजरी म्हणजे शके१३३५ व इ.स. १४१४ होय. ह्या सालीं बेदरच्या पातशहापुढें भीमदेवाचें (बिंबदेवाचें ?) मूळ आज्ञापत्र प्रतिवादीनें मांडले होतें. भीमदेव ठाण्यास यादवांची सुभेदारी करीत असतां शके १२२१ च्या माघांत चांगुणाबाई मिटकरीण इजकडून देशपांडेपणाचें वतन विकत घेऊन तें एक वर्ष व तीन महिन्यांनीं म्हणजे शके १२२३ च्या वैशाखांत पुरुषोत्तमपंत कावळे राजगुरु यास दान देतां झाला. पिछोडीच्या दाव्याच्या महजरांत सदरील दानपत्राचा उल्लेख केलेला आहे. या महजरांत बिंबदेवाच्या मूळ जुन्या मराठी आज्ञापत्राचें फारशी भाषांतर शके १३३५ त केलेलें आहे; व त्याबरोबर मूळ जुन्या मराठी आज्ञापत्राचें मराठी भाषेंत तात्पर्य दिलें आहे. या तात्पर्यांत शार्वरी संवत्सराला शक १२२२, व प्लवसंवत्सराला शक १२२३, पाहिजे. कारण शके १२२२ च्या माघानंतर एक वर्ष तीन महिन्यांनीं म्हणजे शके १२२३ च्या वैशाखांत बिंबराजानें दानपत्र दिलें असें फारशी व मराठी तर्जुम्यांत म्हटलें आहे. या शकांच्या आंकड्यामध्यें चूक होण्याचें कारण फारशी व मराठी भाषांतर

करणाऱ्यांना ज्ञानेश्वरकालीन मूळ जुनें मराठी अक्षर व आंकडे नीट न वाचतां आल्यामुळें ही गफलत झालेली आहे. ह्याच-प्रमाणें फारशी भाषांतरांतील फसली सनाच्या आकड्यांतही दुरुस्ती केली पाहिजे. ह्या दुरुस्त्या फार खोल विचार करून करावयाला नको आहेत. वर वर पाहाणाऱ्यालाही त्यांची अवश्यकता दिसेल, हा लेख येणेंप्रमाणें दुरुस्त करून घेतला म्हणजे त्यांतील मजकूर पूर्णपणें विश्वसनीय आहे असें दिसून येतें. प्रस्तुत महजर बेदरचा बाहमनी पातशहा अलाउद्दीन (दुसरा) ह्याच्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षी लिहिला. हें वर्ष हस्तसद् व हफ्दह् म्हणजे ८१७ हिजरी (शके १३३६) (इ. स. १४१४) होय ह्या सालीं बेदरच्या पातशहापुढें भीमदेवाचें (बिंबदेवाचें शके १२२३ चें) मूळ आज्ञापत्र प्रतिवादीनें मांडलें होतें त्यांतील मजकूर प्रस्तुत महजरांत दिला आहे; व तो पूर्णपणें विश्वसनीय आहे. फारशी नक्कल अस्सल वरहूकूम असून तिचें मराठी रूपांतर मागाहून बऱ्याच वर्षांनीं केलें आहे. त्यामुळें त्यांतील मराठी भाषा यादवकालीन नाहीं. तथापि आंतील मजकुराला धक्का बिलकूल बसलेला नाहीं. ह्या महजरांत बहामनी पातशहा सुलतान सुलेमान अलाउद्दीन (दुसरा) ह्याच्या कारकीर्दीचें पहिलें वर्ष ८१७ हिजरी होतें असें म्हटलें आहे. ८१७ हिजरी म्हणजे इ. स. १४१४ होय. फेरिस्ता ह्यानें दिलेल्या हकिगती प्रमाणें या दुसऱ्या अलाउद्दीनाची कारकीर्द इ. स. १४३५ त सुरूं झाली. या दोन सनांत एकवीस २१ वर्षांचा फरक पडतो यावरून महजराच्या खरेपणाबद्दल कांहीं विद्वान लोकांनीं शंका प्रदर्शित केली. आहे. परंतु फेरिस्तानें अलाउद्दीनाच्या कारकीर्दीच्या सुरवातीचें

साल (इ. स. १४३५) दिलें आहे त्याबद्दल मुसलमान इतिहास लेखकांत अद्याप एकमत नाही. दुर्गादेवीच्या दुष्काळाच्या फर्मानासंबंधानें लिहितांना फेरिस्तानें अशाच तऱ्हेची चूक केली आहे. या एकंदर विवेचनावरून पिछोडीच्या दाव्याचा महजर पूर्णपणें विश्वसनीय आहे. "

बिंबदेवानें पुरुषोत्तम नायक कावळे यास वैशाख व० ३० स प्लव. नाम संवत्सर शके १२२१ सूर्यग्रहणीं जें दानपत्र दिलें आहे त्यांतील शक चुकीचा आहे यांत शंका नाहीं. कारण प्लवनाम संवत्सर वास्तविक शके १२२३ सालीं होते व त्या वर्षाच्या वैशाख वा॥ ३० स उत्तर कोंकणांत ग्रहण होतें ही गोष्ट ज्योतिर्गणितावरूनहि स्पष्ट दिसतें. यावरून इतिहासाचार्य कै० राजवाडे यांनीं या दानपत्राच्या शकासंबंधीं घेतलेला आक्षेप बरोबर आहे असें दिसतें. बिंबदेवानें दिलेलें सदरील दानपत्र मुळांत पाहावयास न मिळाल्यामुळें ते संस्कृत अगर मराठींत होते हें समजण्यास मार्ग नाहीं. त्यांतील मजकूर ज्ञानेश्वरकालीन जुन्या मराठींत होता असें कै. राजवाड्यांनीं कोणत्या आधारावरून म्हटलें आहे तें समजत नाहीं.

यादवकालीन बहुतेक शिलालेख व ताम्रपट संस्कृत व कानडी भाषेंत आहेत. तेव्हां सबल पुराव्याच्या अभावी सदरील दानपत्र मराठींत कोरलें गेलें होतें असें म्हणणें वाजवी होणार नाहीं.

सदरील महजर (निवाडा) ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्वाचा आहे. बिंबदेवानें ज्या पुरुषोत्तम नायक पैठणकरास मालाडचें सरदेसाईपण व सरदेशपांडेपण दिलें त्याचें नांव पंढरपूरच्या देवळाच्या जीर्णोद्धारासाठीं ज्यां दानशूर गृहस्थांनीं देणग्या दिल्या त्यांच्या

यादींत आढळतें. पैठणचें नायक घराणें हें प्रतिष्ठित व सुसंपन्न होतें. सदरील यादींत **गंगाधर नायक. गणपती नायक, सिध नायक, श्रीपती नायक, पुरुषोत्तम नायक** यांची नांवें आढळतात. त्यापैकीं गंगाधर नायकानें एकापेक्षां अधिक वेळां देणग्या दिल्याचें आढळून येतें. पंढरपूरच्या देवळाचें जीर्णोद्धाराचें काम शके ११९५ पासून शके १२०० पर्यंत चालू होतें. बिंबदेवाचे दानपत्राचा शक १२२३ आहे. यावरून ह्या दानपत्रांत नमूद केलेला पुरुषोत्तम नायक हा वरील नायक घराण्यापैकींच असावा असें दिसतें. बिंबदेवाचे दानपत्रांत कर्णीक शंकर प्रभू व कर्णीक देवदास प्रभू यांची नांवें आढळतात. पंढरपूर येथील श्रीविठ्ठलमंदिराचे जीर्णोद्धाराचे मदतीसाठीं तत्कालीन ज्या उदार पुरुषांनीं देणग्या दिल्या त्यांची यादी पंढरपूरच्या शिलालेखांत दिली आहे. त्यांत कर्णिक घराण्यांतील पुरुषांची नांवें आढळतात. यावरून रामदेवराव जाधवाचे राजवटींत ' कर्णिक ' घराणें सुसंपन्न असून राजदरबारांत सदरील घराण्यांतील पुरुषांचें बरेंच वजन असावें असें दिसतें. देणगी देणाऱ्यांच्या यादींत, देवगिरीचे यादवराजे, **महा**देवराय व **राम**देवराव व त्यांचा करणाधिप आमचा चरित्रनायक **हेमाद्रि** यांची नांवें प्रामुख्यानें नमूद करण्यांत आली आहेत वगैरे हकीगत पूर्वी येऊन गेली आहे. वरील विवेचनावरून बिंबदेवानें उत्तरकोंकणांत येतेवेळीं आपलेबरोबर देवगिरी व पैठणकडील माहाराष्ट्रीय मंडळी आणली होती या विधानास पुष्टि मिळते. या महजरावरून शके १३३८ सालीं उत्तरकोंकणप्रांत मुसलमानांच्या अंमलाखालीं होता असें दिसतें.

हा महजर इ. स. १४१४ मध्यें (हिजरी सन ८१७) बेदरचा बादशहा सुलेतान अहमद गाझी ह्यानें दिला असें म्हटलें आहे,

परंतु त्या सालीं बेदरचे गादीवर अल्लाउद्दीनशहा बहामनी (दुसरा) हा होता व त्याचे पश्चात् इ. स १४३४ (हिजरी सन ८३८) मध्यें सुलतान अहमद गाझी हा बेदरच्या गादीवर बसला. यावरून ह्या महजराच्या खरेपणाबद्दल कांहीं विद्वान गृहस्थांनीं आक्षेप घेतले आहेत. परंतु बहामनी वंशांतील वेगवेगळ्या पुरुषांनीं दक्षिणेंत जी निरनिराळीं राज्यें स्थापन केलीं त्याचा समग्र व खराखुरा इतिहास आजपर्यंत कोणी लिहिण्याचा प्रयत्न केला नाहीं. मुसलमानी बखरकारांमध्यें एकाच प्रसंगाबद्दल दिलेल्या हकीकतींत बरीच तफावत दिसून येते. अशापरिस्थितींत महजराच्या सालांत चूक आहे इतक्याच कारणावरून इतर पुराव्याच्या अभावीं तो बनावट आहे असें म्हणणें वाजवी होणार नाहीं.

अहमदशहा बहामनी (दुसरा) हा बेदरचे गादीवर असतांना उत्तरकोंकणप्रांताच्या सुभेदारीचें काम अल्लाउद्दीन गाझी ह्यांचेकडे असावें असें दिसतें. व त्यानें बेदरच्या तक्तनशीन बादशहाच्या तर्फे निकाल दिला असल्यास अशी चूक होण्याचा संभव आहे. अगर मूळ हुकूमाची नक्कल करणाऱ्यानें, हिजरी सन ८३८ ऐवजी नजरचुकीनें ८१७ हा आंकडा घातला असल्यास नकळे ! बहामनी राज्याचा विश्वसनीय इतिहास बाहेर येईपर्यंत या वादग्रस्त मुद्याचा कायमचा निकाल लागणें शक्य नाहीं. दुसरा आक्षेप असा आहे कीं, शके १२२१ सालीं प्लव संवत्सर नसून त्या सालच्या वैशाख वद्य ३० स सूर्यग्रहण उत्तरकोंकणांत नव्हतें. परंतु इतिहासाचार्य राजवाडे ह्यानीं ह्या आक्षेपाचें निरसन केलें आहे. शिलालेखांतील भाषा व मजकूर बरोबर न समजल्यामुळें

शके १२२३ च्या ऐवजीं १२२१ असा आंकडा नजरचुकीनें पडला असला पाहिजे. कारण शके १२२१ सालीं प्लव संवत्सर नसतांना तें शिलालेखांत लिहिण्याची ढोबळ चूक कोणताही हिंदूराजा करणार नाहीं. शिवाय ज्योतिर्गणितशास्त्रावरून शके १२२३ त प्लवसंवत्सर असून त्या सालच्या वैशाख व॥ ३० रोजीं उत्तरकोंकणात सूर्य ग्रहण होतें असें स्पष्ट दिसतें. मूळ फारशी महजरांत फसली सनाचा नामनिर्देश नसतांना त्याच्या इंग्रजी तर्जुम्यांत फसली सन दिला आहे, ही भाषांतरकाराची चूक आहे. शहाजहान बादशहाच्या कारकीर्दीपर्यंत दक्षिणेंत फसली सन प्रचारांत आला नव्हता, यामुळें अस्सल महजरांत फसली सनाचा निर्देश जबाबदार आधिकाऱ्यांकडून केव्हांहि करण्यांत आला नसता, ही गोष्ट निर्विवाद होय.

या महजरावरून पैठणकर कावळे व मालाडचे देसले यांचे दरम्यान पिछोडीच्या हक्कासंबंधानें जो तंटा चालला होता त्याचा निकाल लागला आहे. या हक्काचा तपशील कोर्टापुढें आणलेल्या शिलावर कोरलेला होता, त्यावरून तो महजरांत उतरून घेतला असावा असें दिसतें. सदरील तपशिलावरून तत्कालीन सामाजिक स्थितीवर थोडा प्रकाश पडतो म्हणून तो पुढें देण्यांत येत आहे.

१. दर गावांतून दरसाल पुरुषोत्तमपंत कावळे पैठणकर यास एक विडा देत असावा (विड्याची पानें १६ व सुपाऱ्या ५)

२. प्रत्येक गावांतून मृगसालीं एक "पिच्छोडी" देत जावी. "पिच्छोडी न दिल्यास तिच्याऐवजी रोकड पन्नास फदे द्यावे.

३. ज्याकडेस सोयरीक होईल त्यानें आमन्त्रणाचेवेळीं दहा सुपाऱ्या

व पन्नास पानांचा 'विडा' वाजतगाजत पुरुषोत्तमपन्ताकडेस पाठवावा.

८. प्रत्येक गांवाच्या उत्पन्नांतून 'सरदेसाईपणाचे' रुपये तीन, व 'सरदेशपाण्डेगिरीचे' रुपये दोन, मिळून रुपये पांच (दरशेकडा) पुरुषोत्तमपंतास देत जावे.

९. कोणाकडेस लग्नकार्यसम्बन्धी मण्डप घातल्यास 'मण्डवटक्का' पुरुषोत्तमपंतास द्यावा. म्हणजे तन्निमित्त दोन रुपये देत जावे.

१०. बहिष्कारानिमित्य प्रायश्चित देऊन कोणास शुद्ध करणें असल्यास प्रत्येक 'प्रायश्चित्तांचे' द्रव्यांतून दहावा हिस्सा पुरुषोत्तमपन्तास द्यावा.

११. हव्य कव्यादि प्रत्येक कार्यात प्रथम 'टिळा' व (सन्मान प्रीत्यर्थ) 'विडा' पुरुषोत्तमपन्तास द्यावा.

१२. लग्नकार्यसम्बन्धी 'घटिकापाट' पुरुषोत्तमपंतास देत असावा.

१३. प्रत्येक गावांतून दोन 'बिघे जमीन' सरकारच्या करांपासून, पुरुषोत्तमपन्तास माफ असावी.

१४. प्रत्येक परगण्यांतून सरकारच्याकरांपासून माफ असा 'एक गांव' पुरुषोत्तमपन्तास इनाम द्यावा.

१५. वरील चौदा परगण्यांतील गांवांतून दर बिघ्यास सरदेसाईपणाच्या हक्काबद्दल व सरदेशपाण्डेगिरीच्या हक्काबद्दल 'चार चार पायली भात,' असें पुरुषोत्तमपन्तास देत असावे.

१६. अष्टाधिकारांपैकीं जे सरकारचे कर असतील ते सर्व पुरुषोत्तमपन्तास माफ असावे.

वरील तपशिलावरून ६०० शें वर्षांपूर्वी उत्तर कोकणांत सरदेसाई व सरदेशपांडेपणाचें वतनांत कोणकोणत्या हक्काचा समावेश होत असे ह्याची कल्पना होते. स्थानिक विडा, टिळा वगैरे मानपानाचें

हक्काखेरीज, लग्नकार्यांत घटकापत्रिका घालण्याचा व बहिष्कृत इसमास प्रायश्चित देऊन शुद्ध करण्याचा वगैरे धार्मिक हक्कांचाही त्यांत समावेश होतो असें दिसतें. वरील तपशीलांत **पिच्छोडी** ह्या शब्दाचा उपयोग केला आहे. हा शब्द मराठी अगर गुजराथी नसून मूळ हिंदी भाषेंतला आहे. हिंदी भाषेच्या कोशांत पिछोडा म्हणजे पासोडा (अंगावर घेण्याचें उपवस्त्र) व पिच्छोडी म्हणजे पासोडी असा या शब्दांचा अर्थ दिला आहे. प्रत्येक गावांतून सरदेशपांडे यास एक पिच्छोडी अगर तिच्या ऐवजीं पन्नास रोकड फद्ये घेण्याचा हक्क होता. यावरून उत्तर कोंकणांत पासोडी घेण्याचा हक्क ६०० शें वर्षांपूर्वी अंमलांत होता असें दिसतें.

पासोडीचा हक्क घेण्याची वहिवाट महाराष्ट्रांत फार वर्षे प्रचलित आहे. याबद्दलचा उल्लेख "**मावजी व पारसनीस**" ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'पेशव्यांच्या दफ्तरांतील वतनपत्रें व निवाडे पत्रें' या पुस्तकांत आढळून येतो. सदरील पुस्तकांत मावळ प्रांतांतील मौजे गहुजे येथील कृष्णाजी बिन नरसोजी बोडका मोकदम ह्यास मौजे मजकुरचें मोकदमीचे वतन दिल्याबद्दलचें वृत्तिपत्र (नं. ९) छापलें आहे. * सदरील वृत्तिपत्रांत पासोडी घेण्याच्या हक्काचा उल्लेख केला आहे त्याचा तपशील येणेंप्रमाणें:—

* मावजी व पारसनीस ह्यांनी शाहु व पेशवा ह्यांचे दप्तरांतील छापलेले निवडक कागदपत्र. पा. ४२-४५

तुजकडे मान बितपशील आधी	हिरोजी व बावाजी यांजकडे मान बितपशील मागें.
१ नांगर.	१ होळीचा पोळी.
१ दसरीयाचा मान.	१ दिपवाळीचा मान.
१ शिराळशेट.	१ गौरीचा मान.
१ पासोडी निमे.	१ पासोडी निमे.
१ खोबऱ्याची वाटी निमे.	१ खोबऱ्याची वाटी निमे.
१ तश्रीफ आधीं.	१ तश्रीफ मागें.
१ विडा आधीं.	१ टिळा.
१ चांभारापासून पायपोस जोडा.	१ चांभाराकडून पायपोस.
१ फांटीयाची मोळी आधीं.	१ म्हैस, घर पालक.
१ म्हैस, घर, पालक.	१ फांटीयाची मोळी मागें.
१०	१०

तसेंच हिरोजी बिन शिवाजी बिन भिकाजी इंगुळकर मोकदम मौजे कामथडी तर्फ खेडे बारे प्रांत यांस दिलेल्या वतनपत्रांत मजकूर आहे तो येणेंप्रमाणें:—

मौजे मजकूरच्या पाटिलकिच्या वतनाची सेवा दंडक प्रमाणें करित जाणें वतन संबंधी हक्क लाजी मानपान **इनाम पासोडी** बाजे उत्पन्न काळीं व पांढरीचे सुदामतप्रमाणें पुत्र पौत्रादि वंशपरंपरेनें अनभवून सुखरूप राहणें + ह्याशिवाय "पिच्छोडी" हा शब्द पुष्कळ जुन्या सनदांत व हक्कांचें कागदांत येतो. त्याचा अर्थ वस्त्र असा असून वतनदाराच्या कुटुंबाच्या निर्वाहाकरितां दिलेलें वेतन असाहि त्याचा

+ **टीप**:--राजवाडे खंड १०. (मराठ्यांच्या इतिहासाची माहिती)

सामान्य अर्थ असावा. पट्टीपछोडी म्हणजे पिच्छोडीचा हक्क, हा शब्द पुष्कळ ठिकाणीं दिलेला आढळतो. महाराष्ट्र, वऱ्हाड, मध्यप्रांत वगैरे सर्व प्रांतांत पट्टी-पासोडीचा हक्क पाटील व देशमुखास अद्याप मिळतो. मारवाडांत व गुजराथेंत लग्नकार्यांत जामा-पिछोडीचा पेहेराव करण्याची अद्याप चाल आहे. जामा म्हणजे अस्तन्या लांब असलेला पायघोळ आंगरखा; व पिच्छोडी म्हणजे कमरेस गुंडाळण्याचा शेला (उपवस्त्र); यावरून प्राचीनकाळीं अंगावर घेण्याच्या उपवस्त्रास पासोडी म्हणण्याचा प्रघात असावा असें दिसतें. मुंबई येथें पारशी लोकांच्या लग्नकार्यांत व हिंदुसमाजांत पाताणे प्रभूंच्या लग्नसमारभांत जामा-पिछोडीचा पेहराव करण्याची अद्याप वहिवाट आहे. यावरून मुंबतील पाताणे प्रभु हें मूळचे सौराष्ट्रांतील प्रभासपट्टण अगर गुजराथेंतील चापानेर पाटण येथील मूळचे रहिवासी असावे व गुजराथप्रांत मुसलमानांनीं काबीज केल्यावर तेथील कांहीं चालीरीती त्यांनीं आपणाबरोबर उत्तरकोंकणांत आणिल्या असाव्या. असें अनुमान काढण्यास जागा आहे.

या महजरांत फद्या, टक्का (दोन फद्ये), रुपया, ह्या नाण्यांचा उल्लेख असून, शिवाय पायली (धान्य मोजण्याचे माप) व बिघा (जमिनीचे क्षेत्रमापन करण्याचें प्रमाण) यांचा उल्लेख केलेला आहे. या महजरांतील मजकुरावरून तत्कालीन सामाजिक स्थितीवर बराच प्रकाश पडतो.

नागांवचा शिलालेख शके १२८९.

सदरील शिलालेखाचें संशोधन कै. इतिहासाचार्य राजवाडे यांनीं ग्रंथमालेच्या वर्ष ११ अंक १० मध्यें केल्याबद्दलचा उल्लेख वर

आला आहे. सदरील शिलालेख ठाणे-कोकणचा राजा हंबीरराव यांचे वेळचा असून तो आपणांस "श्रीमत्यप्रौढिप्रतापचक्रवर्ति महाराजाधिराज" म्हणवीत होता असें त्याजवरून दिसतें. सदरील शिलालेखावर शालिवाहन शकाबरोबर हिजरी सन दिला आहे व त्याचा प्रधान **सिहिप्रो** नांवाचा मुसलमान होता असें म्हटलें आहे. शके १२८९ मध्यें उत्तरकोंकणांत मुसलमानी राज्याचा जम बसला नव्हता असें असतां आपणांस "प्रौढिप्रतापचक्रवर्ति" म्हणविणारा कोणता स्वाभिमानी हिंदुराजा आपले शिलाशासनावर मुसलमानी सन लिहील ? तसेंच त्यावेळीं दिवाणगिरीची कामें करण्यास हिंदू लोकांमध्यें कर्तबगार माणसांचा तुटवडा होता अशा तऱ्हेचा उल्लेख कोठेंही आढळून येत नाहीं. यादवकालीन शिलालेख व ताम्रपट संस्कृत अगर कानडी भाषेंत आहेत. यादवांच्या शिलाशासनांतील कांहीं बिरुदापैकीं एक बिरुद या शिलालेखांत दिलें आहे, यावरून हंबिरराव हा इतर पुराव्याच्या अभावी देवगिरीच्या यादवराजघराण्यापैकीं असला पाहिजे हें विधान इतिहास व युक्तिवाद यास धरून नाहीं. मुसलमानासंबंधानें हिंदूंच्या मनामध्यें अत्यंत पीळ होता अशा वेळीं हिजरी सन दक्षिणेंत सुरूं होण्यापूर्वी त्यास सदरील शिलालेखांत प्राधान्य दिलें आहे ही गोष्ट फार चमत्कारिक दिसते. कै. राजवाडे यांनीं शिलालेखाचें संशोधन करितांना त्याचा खरेपणा प्रस्थापित करण्याविषयीं जीं कारणें दिलीं आहेत तीं अपुरी असून संशोधकांना बिलकुल पटण्यासारखीं नाहींत.

नागांव हा गांव अष्टागरांत असून त्या प्रांतांत चौल हें व्यापाराचें एक मोठें बंदर होतें. त्या ठिकाणीं ईजिप्त, अरबस्तान, इराण वगैरे देशांतील बरेच लोक व्यापाराकरितां येत असत व बरेच अरब लोक

त्याठिकाणी स्थाईक रहिवासी झाले होते कांहीं अरबी व्यापाऱ्यांनीं तत्कालीन भारतीय ग्रंथांची आरबी भाषेंत रूपांतरें करून आपले देशांत नेल्याचा उल्लेख मुसलमानी तवारिखांतून केलेला आढळतो. उत्तरकोंकणांतील चक्रवर्ति हिंदुराजाच्या प्रधानाचें पद एखाद्या मुसलमान गृहस्थास मिळालें असतें तर मुसलमानी तवारिखांतून त्याबद्दल गौरवपूर्वक निर्देश करण्यांत आला असता. पण एकंदर परिस्थितीवरून या शिलालेखाच्या खरेपणाबद्दल जबरदस्त शंका येते असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागतें. इ. स. १९१४ सालीं प्रसिद्ध झालेल्या महिकावतीच्या बखरीस इतिहासाचार्य राजवाडे यांनीं प्रस्तावना लिहिली आहे, त्यांतही शके १२८९ सालीं उत्तर-कोंकणांत हंबीरराव नांवाचा राजा होता, अशाबद्दल बिलकुल उल्लेख नाहीं. यावरूनही हा शिलालेख खरा नाहीं ही गोष्ट सिद्ध होतें.

प्रस्तुत शिलालेखांतील अपभ्रष्ट संस्कृत भाषेचा नमुना पुढें दिला आहे:--

" श्रीमत्य प्रौढिप्रतापचक्रवर्ति महाराजाधिराज हंबीरु राओ ठाणें कोकणराज्यं क्रोति सत्येतस्मिन् काळे प्रवर्तमानें धरमादिपत्रं लिखितं यथा सर्वव्यापारिसिंहिप्रो तंनिरोषितं अठागर अधिकारिआ कुसना अहासण नाकाचा सणवै देऊ प्रोण्हो-ह्वेळितः

सदरील शिलालेखांतील मजकुराचा चांगला बोध होत नाहीं. श्रीरायाचा प्रधानु म्हणजे हंबीररावाचा प्रधान ह्यानें तेथील मोठा व्यापारी सिहिप्रो यांस मोठमोठी झाडें ज्यांत आहेत अशी वाडी विकली असावी व त्याकामीं अष्टागरांतील आगऱ्यांनीं त्यास उपद्रव करूं नये असा धरमु (धर्म) या धरमपत्रांत नमूद केला असावा

असें दिसतें. या धरमपत्रांतील साक्षीदारांत 'नागदेऊ भाई दार्युभ्सदे शेटि' व नागांवच्या जमातीपैकीं प्टैगु महामद्र दाउवार आया राजि दाउवार आया असे साक्षीदार आहेत. पहिलें नांव पारशी गृहस्थाचें असावें. दुसरें महामद्र (मुसलमान) अरबी गृहस्थाचे असावें.

शके १२८९ च्या सुमारास पारशांची वसाहत नागांव येथें असल्याचा कोठें उल्लेख नाहीं. दुसरा इसम मुसलमान अरब असावा. त्यास **महामद्र** अशा नांवानें संबोधिलें आहे. हंबीरराव हा कदाचित् चौल प्रांताकडील आगरी लोकांचा सरदार असल्यास न कळे? परंतु याकामीं संशोधन झाल्यावांचून हा शिलालेख खरा आहे असें म्हणणें रास्त होणार नाहीं. तसेंच या शिलालेखांत उल्लेखिलेला हंबीरराओ (राव) देवगिरीच्या यादव कुळांतील होता असें म्हणणें ऐतिहासिकदृष्ट्या बरोबर नाहीं.

देवगिरीचे बिंबदेवाचा उत्तरकोंकणप्रांतावर अम्मल होता असें दाखविणारे दोन ग्रंथ आमचे पाहण्यांत आले आहेत. पैकीं बिंबाख्यान नांवाचें पुस्तक रघुनाथ पुतळाजी राणे यांनीं इ. स. १८७७ सालीं छापून प्रसिद्ध केलें. या पुस्तकाच्या प्रति अद्याप बऱ्याच ठिकाणीं उपलब्ध आहेत. हाच ग्रंथ महिकावतीची ऊर्फ माहिमची बखर या नांवानें कल्याण येथील आमचे मित्र श्रीयुत सदाशिव महादेव दिवेकर यांनीं इतिहासाचार्य कै. राजवाडे यांचे प्रस्तावनेसह इ. स. १९१४ मध्यें छापून प्रसिद्ध केला. बिंबाख्यान ऊर्फ महिकावतीची बखर प्रथम उजेडांत आणण्याचें श्रेय रघुनाथ पुतळाजी राणे यांस देणें वाजवी आहे. कै. राजवाडे यांस या ग्रंथाची माहिती होती

असें त्यांनीं आपल्या प्रस्तुत बखरीच्या प्रस्तावनेंत कबूल केलें आहे. असें असून "या बखरीचा पत्ता आजपर्यंत नव्हता, व नापत्ता असलेल्या या इतिहासप्रांताच्या आड येणारा पडदा प्रस्तुत बखरीच्या प्रकाशनानें दूर सारला जावा; व इतिहास रंगभूमीवरील एक अज्ञात चित्रपट खुला होत आहे तें पाहून सहृदय वाचक बखरीचा पत्ता लावणाऱ्या व ती हस्तगत करणाऱ्या दिवेकरांना दुवा देतील" अशा आशयाचें राजवाडे यांनीं सदरील बखरीचे प्रस्तावनेंत दिलेलें मत ऐतिहासिक सत्यास धरून नाहीं. तसेंच "आजपर्यंत सांपडलेल्या सर्व बखरींत आपण प्रसिद्ध करीत असलेली महिकावतीची बखर सर्वांत जुनाट आहे" असें सदरील बखरीच्या प्रस्तावनेंत कै. राजवाडे यांनीं विधान केलें आहे त्यासही कांहींएक आधार दिला नाहीं. राणे यांच्या बिंबाख्यानांत अथवा महिकावतीच्या बखरींत देवगिरीच्या यादवराजांची अगर बिंबदेवाची ऐतिहासिक माहिती मिळेल अशी कोणाची अपेक्षा असेल तर ती व्यर्थ आहे, ही गोष्ट पुढील विवेचनावरून वाचकांच्या सहज ध्यानांत येईल.

या ग्रंथांत पौराणिककालांतील दशावताराचे उत्पत्तिपासून उत्तरकोकणांत फिरंग्यांचा अम्मल सुरूं होईपर्यंत हजारों वर्षांची हकीकत वेगवेगळाल्या लेखकांनीं गोंवण्याचा प्रयत्न केला आहे.

भगवान् दत्तानें व केशवाचार्यांनें देवगिरीच्या यादव घराण्याच्या ज्या दोन वेगवेगळ्या वंशावळी या बखरींत दिल्या आहेत त्या, प्रस्तुत पुस्तकाच्या तिसऱ्या भागाच्या शेवटीं दिलेल्या कोणत्याही वंशावळींशीं जुळत नाहींत. महिकावतीच्या बखरींतील पृ. ७३-७४ मध्यें भगवान् दत्तानें वंशावळ दिली आहे ती येणेंप्रमाणें:—

सूर्यवंश.

सविता

आजानबाहू	गंगाधर	श्रीधर

१ नइनंदन

२ सुदिमन्य (४००० दिवस राज्य)

३ सावतासनु (तीन संवत्सर)

४ भद्रसेन	रघुतम

५ महासिद्धि (३०२२ दिवस राज्य)

६ ०

७ विजयावंश (एकोणिस संवत्सर)

८ सोमप्रभू (वीस संवत्सर,बारामास,चार दिवस)

९ कृष्णदेव

१० रघुपति (पंधराशत–संवत्सर)

११ रघुपतिकुमर (१० वर्षे, ७ मास, ६ दिवस)

१२ कमळादीन (१८०३ दिवस)

१३ अश्विनदेव (सातशत संवत्सर)

१४ श्रीभानु (सहाशत संवत्सर)

१५ ० (दोनशत संवत्सर)
|
१६ जयसवन (दीडशत वर्षे)
|
१७ रामराजा (तुर्कीण जाळें)

या बखरीच्या ८९ पानावर केशवाचार्यांनें दिलेली वंशावळ येणें प्रमाणें:—

१ रामराजा (संवत ५७४)
|
त्रिपाळराजा
|
त्रिंबकराजा
|
गोविंदराजा
|
कृष्णराजा
|
०
|
०
|
०
|
०

रामराजा(कृष्णराजाचा वंशिक (शके ११९३)

या दोन्हीं वंशावळी, 'बारगळ, विचित्र अर्थात अविश्वसनीय' आहेत अशी कबुली इतिहासाचार्य राजवाडे यांनीं दिली आहे. ताम्रपट, शिलालेख, मुसलमानी तवारिखा, प्रवासवृत्तें, काव्यें किंवा अन्य सजातीय, विजातीय संस्कृत, प्राकृत लेख यापैकीं कशाचाच पडताळा बिंबवंशीय राजांच्या किंवा **नागरशाहि** राजांच्या बखरींत

दिलेल्या कथासंबंधानें किंवा हकीगतीसंबंधानें उपलब्ध नाहींत, असा शेरा खुद्द राजवाडे यांनीं महिकावतीबखरीच्या प्रस्तावनेंत (पान ७५) दिला आहे. बिंबवंशीयादि राजे उत्तरकोंकणांत साक्षात् झाले अगर वावरून गेले असें ठाम म्हणण्यास बहिःपुराव्याच्या अभावी सकृत्दर्शनी मोठी अडचण पडते असें राजवाडे यांनीं महिकावतीच्या बखरीसंबंधानें तिला जोडलेल्या प्रस्तावनेंत उद्गार काढले आहेत. ह्या बखरींत देवगिरीच्या यादवांची हकीकत देतांना जीं ढोबळ प्रमादस्थळें दृष्टोत्पत्तीस येतात तीं येणेंप्रमाणें:—

(१) देवगिरीचे यादव (यदुवंशीय) असून त्यांचा मूळपुरुष इंदु म्हणजे चंद्र होता असें व्रतखंडांतील वंशावळीवरून व यादवांच्या शिलाशासनावरून दिसतें. महिकावतीच्या बखरींत देवगिरीचे यादवराजे सूर्यवंशीय होते असें म्हटलें आहे. देवगिरीचे यादव आपल्या बिरुदावलींत आपण सोमवंशीय असल्याचें दरएक शिलाशासनांत साभिमानानें लिहितात.

(२) या बखरींत देवगिरीच्या यादवांच्या ज्या दोन वंशावळी वर दिल्या आहेत त्या हेमाद्रीच्या व्रतखंडांत दिलेल्या वंशावळीशीं अगर खुद्द यादवकालीन शिलालेख व ताम्रपट यांत दिलेल्या वंशावळीशीं बिलकुल जुळत नाहींत. (या पुस्तकाचा भाग ३ रा पान)

(३) देवगिरीच्या महादेवरायानें उत्तर कोंकणचा शिलहार वंशीय सोमेश्वर राजा ह्याचा पराभव शके ११८८ मध्यें करून उत्तर कोंकणावर आपली सत्ता स्थापिली ही गोष्ट महादेवरायाचा समकालीन मंत्री हेमाद्रि ह्यानें व्रतखंडांतील राजप्रशस्तींत नमूद केली आहे. शिवाय, शके ११९४ चा ओवळें येथील ताम्रपट व शके

१२१२ तील अण्जूरचा शिलालेख यांतील मजकूरावरून शके ११८८ पासून उत्तरकोंकणप्रांत हा देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्याचा भाग होता असें स्पष्ट दिसतें. असें असतां देवगिरीचे रामदेवराव जाधव यानें शके ११९३ मध्यें उत्तरकोंकणांवर स्वारी केली, व त्यांत तेथील बिंबघराण्यांतील राजा केशवदेव यानें त्याचा पराभव केला; व त्या लढाईंत रामदेवराव जाधवाचा मंत्रि हेमाद्रि ह्यानें भाग घेतला होता अशी हकीगत सदरील बखरींत दिली आहे. तसेंच शके १२१६ त रामदेवरावानें दुसऱ्यांदा उत्तर कोंकणावर स्वारी केली व त्यांतही त्याचा पराभव झालाअशी हकीगत दिली आहे. ह्या दोन्हीं हकिकतीस ऐतिहासिक आधार बिलकुल नाहीं.

ओवळें येथील ताम्रपटावरून व अण्जूरच्या शिलाशासनावरून असें दिसतें कीं, रामदेवराव जाधवाचे पदरीं अच्युतराव नायक व श्रीकृष्णदेव असे दोन लढवय्ये सरदार उत्तरकोंकणप्रांताचें रक्षण करण्याकरितां नेमिले होते. ओवळें हा गांव ठाणें शहरापासून सुमारें चार पांच मैलावर आहे व अण्जूर हाही गांव जलमार्गानें ठाण्याहून तितक्याच अंतरावर आहे. शके ११९३ त रामदेवराव जाधवाचा, उत्तरकोंकणांत बिंब आडनांवाच्या वंशांतील केशवदेव यानें पराभव केला ही गोष्ट खरी असेल तर ओवळें येथील ताम्रपट (शके ११९४ चा) खरा नाहीं असें म्हणावें लागेल. शिवाय रामदेवराव जाधव यास तीन कर्ते सवरते मुलगे असल्यामुळें त्यास स्वतः स्वारीवर जाण्याचें कांहीं कारण नव्हतें.

(४) रामदेवराव जाधव यास केशवदेव यां नांवाचा मुलगा अस-

ल्याचें दख्खनच्या इतिहासांत, महानुभावीय वाङ्मयांत अगर इतर कोणत्याही ग्रंथांत आढळून येत नाहीं. रामदेवरावाच्या पश्चात् त्याचा मुलगा शंकरदेव हा गादीवर बसला व त्याचे पश्चात् शंकरदेवाचा मेव्हणा (रामदेवरावाचा जांवई) हरपाळदेव बसल्याबद्दल ऐतिहासिक पुरावा आहे. परंतु या बखरींत रामदेवराव जाधवाच्या मागें केशवदेव व त्याचे पश्चात् त्याचा मुलगा रामदेवराव (दुसरा) हा गादीवर बसला असें म्हटलें आहे. राजवाडे यांच्या मताप्रमाणें रामदेवराव जाधव हा हरिदासाच्या कथा शास्त्र्यांच्या संभावना, महानुभावांचे संवाद हेमाद्रीची व्रतखंडातील व्रतें, उद्यापनें इत्यादि गोष्टींत निमग्न असल्यामुळें, सैन्य व राज्य ह्यांच्या व्यवस्थेकडे सातारच्या शाहु महाराजाप्रमाणें त्याचें बिलकुल लक्ष नव्हतें. अशा तऱ्हेचा रामदेवराव जाधव स्वतः होऊन उत्तरकोंकणावर दोनदां अगर तीनदां स्वारी करण्यास धजेल असें संभवत नाहीं. शिवाय या गोष्टींत ऐतिहासिक सत्य असतें तर त्याबद्दलचा मजकूर ओवळें येथील ताम्रपटांत अगर अण्जूरच्या शिलालेखांत अवश्य नमूद करण्यांत आला असता.

रामदेवरावाचा मुलगा बिंबदेव ह्यानें उत्तरकोंकण, नागरशहाचा मुलगा त्रिपुरकुमर याजपासून शके १२१६ सालीं जिंकून घेतलें असतें तर त्यावेळचा एकादा शिलालेख अगर ताम्रपट खचित उपलब्ध असता. बिंबदेवानें अल्लाउद्दीनास शह देण्याकरितां गुजराथेंत जाऊन माळव्याच्या बाजूनें पायबंद देण्याचा त्याचा विचार होता असें राजवाड्यांचें मत आहे. परंतु ह्या विधानास ऐतिहासिक आधार नाहीं. अल्लाउद्दीन ह्याच्या मूळ पीठिकेची जी हकिकत बखरींत दिली आहे, ती निव्वळ दंतकथा असून हास्यास्पद आहे.

(५) बिंबदेवानें शके १२१६ पासून शके १२२५ पर्यंत उत्तर-कोंकणांत राज्य केलें; व त्याचे पश्चात् त्याचा मुलगा प्रतापशहा हा गादीवर आला. या प्रतापशहावर नागरशहाचा मुलगा त्रिपुरकुमर ह्यानें स्वारी केली. परंतु प्रतापशहापाशीं असावें तसें सैन्यबळ नसल्यामुळें त्यानें आपला वृद्ध आजा देवगिरीचा रामदेवराव जाधव ह्याजकडे सैन्याची मदत मागितली. रामदेवराव जाधवानें जीवन नाईक सांवखेडकर व हेमपंडित (हेमाडि पंडित ?) ह्यास प्रतापशहाच्या मदतीस उत्तरकोंकणांत पाठविलें. या संयुक्त सैन्याचा त्रिपुरकुमारानें पराभव केला. या पराजयानंतर रामदेवराव जाधव व प्रतापशहा या उभयतांनीं पुन्हां युद्धाची तयारी केली. रामदेवरावानें अनहिल-पट्टणचा राजा जयसिंग यास मदतीस बोलाविलें. या तिघांचें सैन्य नागरशहा व त्रिपुरकुमर यांजवर चढाई करून गेले. उभयतांच्या सैन्याचें अंधेरीच्या रानांत तुंबळ युद्ध झालें. त्यांत रामदेवरावाचा नातू प्रतापशहा ह्याचा पूर्ण पराभव झाला. या युद्धानंतर प्रतापशहाचे अगर त्याचे उत्तरकोंकणच्या राज्याचे काय झालें. याबद्दल बखरकार कांहींच हकीकत देतनाहींत. दुसरा नागरशहा व त्रिपुरकुमर ह्यांनीं त्याच्या प्रजेंत भेद उत्पन्न करून शके १२५४ त प्रतापशहाचें राज्य कायमचें खालसा केलें, असा मजकूर सदरील बखरींत दिला आहे.

देवगिरीच्या यादवांची जी हकीकत या बखरींत दिली आहे ती निराधार व अविश्वसनीय अशी असूनही इतिहासाचार्य राजवाडे यांनीं ती खरी आहे असें भासविण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहास-संशोधनाची ही पद्धति अश्रुतपूर्व आहे हें कोणाही निःपक्षपाती इतिहाससंशोधकास कबूल करणें भाग आहे.

बखरींतील कांहीं गोष्टींवर लांबलचक मल्लिनाथी करून बखरींतील दंतकथांना ऐतिहासिक पेहराव चढविण्यांत त्यांनीं आपलें बरेंच चातुर्य खर्च केलें आहे. परंतु कल्पनेच्या पायावर रचलेली इमारत थोड्याशा संशोधनानें ढांसळून पडते ही गोष्ट नव्यानें सांगण्याची जरूरी नाहीं. राजवाडे हे एकादी गोष्ट खरी आहे असें गृहित धरून तिच्या समर्थनाकरितां कारणें हुडकून काढण्याचा खटाटोप करितात. यामुळें त्यांच्या संशोधनांत घोटाळा उडतो अशी आमची प्रामाणिक समजूत आहे. ह्याचा एक मासला पुढें देण्यांत येत आहे. अंधेरी येथें नायकोराव ह्यास देवीचा दृष्टांत होऊन त्यानें सर्व जातीचे लोक जमवून महाराष्ट्रधर्माचा उपदेश माहाल्जापुरी येथें केला व तो सर्वांस पसंत पडला असें बखरीत म्हटलें आहे. समर्थ रामदास स्वामी यांचे ग्रंथांत "**मराठा तितुका मेळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा**" अशी शिकवण आहे. सदरील शिकवणींचें प्रतिबिंब नायकोरावाचे उपदेशांत आहे अशी आपली समजूत करून घेऊन राजवाडे यांनीं नायकोरावाच्या महाराष्ट्रधर्माच्या विवरणावर बरींच पानें खर्च केलीं आहेत. वास्तविक ह्या दोन्हीं शिकवणींत जमीन अस्मानाचा फरक आहे असें पूर्ण विचारांती कोणासही दिसून येईल. नायकोरावांनीं स्वतःच्या महाराष्ट्र-धर्माची रूपरेखा दिली होती ती अशी:—'सर्व ब्राह्मणेतरांनीं ब्राह्मणांचें वर्चस्व राजकीय, धार्मिक व सामाजिक बाबतींत पूर्णपणें मानिलें पाहिजे; व त्यांच्या नेतृत्वाखालीं सर्व कामें केलीं पाहिजेत; वेळेस त्यांनीं ब्राह्मणांचें उच्छिष्टही खालें पाहिजे व असें झालें तरच हिंदु समाजांत जुट होऊन म्लेच्छांचें उच्चाटन होईल.' राजवाडे ह्यांच्या मतें श्रीसमर्थांच्या महाराष्ट्र-

धर्मांतील शिकवणीपेक्षां नायकोरावांची शिकवण जास्त व्यापक आहे. वास्तविक पाहिलें असतां अशा तऱ्हेची सर्व जातींची बैठक अंधेरी येथें खरोखर झाली होती किंवा नाहीं; तसेंच बखरींतील हा लेख समर्थांच्या लिखाणानंतर झाला किंवा कसें या मुद्यांचें संशोधन करण्याचें सोडून, राजवाडे यांनीं वरील गोष्टी खरोखरच घडल्या असें गृहित धरलें आहे, व त्यावरून मन मानेल तशी अनुमानें काढिली आहेत. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या संशोधनपद्धतीचा आणखी एक मासला देणें जरूर आहे.

बखरीच्या प्रस्तावनेच्या (३४) पानावर मजकूर आहे तो येणेंप्रमाणें:–ह्यावेळीं शके १०६२ पासून ११६३ पर्यंत पैठणावरून जीं ब्राह्मण मंडळी आलीं त्यांची याद बखरकार देतो. ती अशी:–

(१) गंगाधर नाईक सांवखेडकर–शेष वंशिकांचे कुळगुरु
(२) विश्वनाथपंत कावळे––राजपुरोहित
(३) भास्कर पंडित चामरे
(४) गोवर्धचार्य देवधर––प्रधान याशिवाय
(५) अनंत नायक छत्रे (१०) पैठणकर
(६) केशव राम घोडे (११) जीवन नाईक सांवखेडकर
(७) मोगरे (१२) हेमडी [हेमाद्रि पंडित]
(८) जाधवे शेवटच्या तिघांची नांवें बखरींत दिलीं आहेत.
(९) हेमटे

इत्यादि यजुर्वेदी देशस्थ माध्यंदिन मंडळींपैकीं गंगाधर नाईक सांवखेडकरांस पसपवली गांव व विश्वनाथपंत कावळ्यास वृत्त्या राजहस्तें मिळाल्या. ही सर्व यजुःशाखीय 'मंडळी देवगिरीच्या

प्रजाजनांपैकीं असून महाराष्ट्रीय होती असें बखरींतील मजकुरावरून उघड दिसतें.

ह्याप्रमाणें बिंबाबरोबर उत्तरकोंकणांत आलेले ब्राह्मण पैठण, सांवखेड वगैरे गांवचे मूळ रहिवाशी असून महाराष्ट्रीय माध्यंदिन शाखेचे ब्राह्मण होते असें निर्विवाद दिसतें. असें असतां बखरीमध्यें ह्याबाबतींत कांहींएक उल्लेख नसतांनाही, ते मगध देशांतून आले असावे अशी राजवाडे ह्यांनीं कल्पनेची भरारी मारिली आहे. मगध देशाचे कोनाकोपऱ्यांतील अप्रयुक्त असें दुसरें नांव हुडकून काढून त्या नांवावर कोटीक्रम करून ते गौडब्राह्मण असावे असें त्यांनी ध्वनित केलें आहे. तसेंच 'जरी ते शुक्लयजुर्वेदी होते तरी महाराष्ट्रांतील प्राचीन यजुर्वेद्याहून त्यांचे आचार चालीरीति भिन्न होत्या' असें राजवाडे यांनीं विधान केलें आहे. परंतु ह्या दोन्हीं विधानास त्यांनीं कांहींएक आधार दिला नाहीं.

वरील विधानावरून 'बिंबाख्यान' अगर 'महिकावतीची बखर' या ग्रंथांची ऐतिहासिकदृष्ट्या कांहीं किंमत नाहीं असें दिसून येईल. देवगिरीच्या यादवांचा उत्तरकोकणप्रांतावर शके ११८८ [इ. स. १२६६] पासून अंमल सुरू झाला. व तो सदरील प्रांत मुसलमानांच्या अंमलाखालीं जाईपर्यंत सुमारें ७५-८० वर्षे तो चालू होता असें दिसतें. ह्या कालांतील इतिहासावर प्रकाश पाडण्याच्या कामीं सदरील ग्रंथावरून बिलकुल मदत होत नाहीं.

शके १०६० पासून शके ११६३ पर्यंत शिलाहारांचा अंमल उत्तरकोंकणावर साक्षात असतांना साष्टी बेटाच्या उत्तरभागांतील वांद्रें गांवापासून भाईंदरपर्यंत व मुंबई बेटाच्या उत्तरेकडील माहिम

[दादर] भागांत, **बिंब** नांवाच्या घराण्यांतील कांहीं अप्रसिद्ध मांडलिकांचें राज्य होतें, अशाबद्दल साधार पुरावा कोठेंही उपलब्ध नाहीं. श्रीस्थानक [हल्लींचें ठाणें] सोपारें, चऊल, दंडाराजपुरी व संजाण हीं गांवें भरभराटीच्या स्थितींत असतानां, माहिमासारख्या कोनाकोपऱ्यांतील गावांत, बिंब घराण्यांतील राजांनीं शेजारच्या पराक्रमी शिलाहार राज्याच्या उपसर्गावांचून व त्यांच्या नजरेआड राज्य केलें असावें हें संभवनीय दिसत नाहीं. महिकावतीची बखर लिहिणारे भगवानदत्त व केशवाचार्य ह्याच्याबद्दल कांहींएक माहिती उपलब्ध नाहीं असें राजवाडे कबूल करतात. या लहानशा बखरींत पौराणिक काळांपासून तों साष्टी, वसईप्रांत व मुंबई बेट पोर्तुगीज लोकांच्या अंमलाखालीं जाईपर्यंत त्या प्रांतावर राज्य करणारांची हकिगत दिली आहे. तीं जसजशीं कानावर पडलीं तसतशीं बेजबाबदार लेखकांनीं त्याची योग्य छाननी न करितां लिहून ठेविल्याचें दिसतें. ऐतिहासिक लेख लिहिण्याचे कामीं जी साधनसामुग्री लागते ती मिळविण्याचे कामीं इतिहासाचार्य राजवाडे यांनीं जी अपूर्व कामगिरी केली आहे, त्याबद्दल त्यांच्याविषयीं आदर ज्यास वाटत नाहीं, असा महाराष्ट्रांत क्वचितच मनुष्य सांपडेल ! परंतु संशोधनकार्य करतांना निव्वळ ऐतिहासिकदृष्टि न ठेवितां, कल्पनेच्या वातावरणांत विहंगमवृत्तीनें वावरण्याचा मोह त्यास आवरून धरतां येत नव्हता असें मोठ्या दिलगिरीनें म्हणावें लागतें ?

देवगिरीचे यादवांचें राज्य शके १२३९ (इ. स. १३१८) त कायमचें नष्ट झालें. त्यानंतर थोड्याच वर्षांनीं मुसलमानांचा अंमल दक्षिणेंत व उत्तरकोंकणांत झाला. उत्तरकोंकणांत बिंबदेवाचा अम्मल

असतांना जमीन महसुलाच्या बाबतींत बऱ्याच सुधारणा करण्यांत आल्या व त्याचे वेळच्या जमीन महसुलाची पद्धत पोर्तुगीज लोकांचे पद्धतिपेक्षां श्रेष्ठ दर्जाची होती अशाबद्दल (इ. स. १८०८ चे रेग्युलेशन १ [Rebulaim I] मध्यें उल्लेख केलेला आहे. याबद्दलचे दिग्दर्शन मागील भागांत केलें आहे.



भाग ६ वा.


मोडी लिपि.

लिपि विधात्रा लिखितां जनस्य
भाले विभूत्या परिमृज्य दुष्टाम् ।
कल्याणिनीमेष लिखत्यथैनां
चित्रां प्रमाणी कुरुते विधिश्च ॥

(चतुर्वर्गचिंतामणि)

प्राचीन काळच्या इतिहासाचें संशोधन करणारांस व पुराण-वस्तु-संशोधन-शास्त्राचा अभ्यास करणारांस लिपिशास्त्राचें ज्ञान असणें अवश्य आहे. प्राचीन काळचे शिलालेख, ताम्रपट, चलनीनाणीं, भूर्जपत्रें व ताडपत्रावरील लेख, निरनिराळ्या लिपींत लिहिलेले आढळतात. लिपींच्या अज्ञानामुळें संशोधन कार्य अपुरें राहातें. सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी भरतखंडांत जवळ जवळ चौसष्ट लिपी प्रचारांत होत्या असें दिसून येतें. बुद्धवाङ्मयामध्यें **ललित विस्तार** या नांवाचा एक प्राचीन ग्रंथ आहे, त्यांत गौतमबुद्धाच्या वडिलानें त्यास धूळ पाटीवर बसविलें त्यावेळची हकिकत दिली आहे. उरगसार जातीच्या चंदनाच्या लाकडाच्या पाटीवर सोन्याच्या लेखणीनें धुळाक्षरें काढण्यास विश्वामित्र नांवाच्या पंतोजीनें जेव्हां आपल्या बालशिष्यास सांगितलें, तेव्हां गौतमबुद्ध आपल्या गुरुजीस म्हणाला कीं, मला चौसष्ट लिपि माहित आहेत त्यापैकीं कोणत्या लिपींत धुळाक्षरें काढूं ? आपल्या बालशिष्याच्या कुशाग्रबुद्धीबद्दल त्याचे गुरुजीस कौतुक वाटलें. या गोष्टींत ऐतिहासिक सत्य किती असेल तें असो; परंतु त्याकाळीं भरतखंडात निदान चौसष्ट लिपि प्रचारांत असल्या पाहिजेत. या लिपींची नांवें येणेंप्रमाणें:—

ब्राह्मी	अनुलोम
खरोष्टी	अर्धधनु
पुष्करसारी	दरद
अंग	स्वास्य
वंग	चिन
मगध	हूण
मांगल्य	मध्याक्षर विस्तार
मानुष्य	पुष्पलिपि
अंगुली (आंगठ्यानें लिहिण्याची लिपि.)	देवलिपि
सकारा	नागलिपि
ब्राह्मवल्ली	यक्ष
द्राविडी	गंधर्व
किनारी	किन्नर
दक्षिण	महोदव
उग्र	असुर
चित्रलिपि (आकृतीची लिपि) (Hyro gly)	गरुड
मृगचक्र	गणनावर्त
चक्रलिपि	उत्क्षेपवर्त
वाधुमारुत	निक्षेप वर्त.
भौम–देव	पाडलिखि
अंतरिक्षदेव	द्विरुच्चर पदं संधि
उत्तर कुरु	यावद् सोत्तर पदसंधि
पूर्व विदेही	अध्या हारिणी
उत्क्षेप (लंबाकृती)	सर्व रूप संग्रहिणी



इतिहासाचार्यः—**विश्वनाथ काशीनाथ राजवाडे.**

जन्म आषाढ शु॥ ८ शके १७८५] [मृत्यू मार्गशीर्ष व॥ १२ शके १८४८

निक्षेप (Pendulues writing)
सागर
वज्र
लेख–पतिलेख
अनुद्रुत (Slow writing
शास्त्रावर्तलि
विद्यानुलोप
विमिश्रीत
क्रिषितपस्तहान
रोचमानान्धरणी-प्रेक्षण
गगन प्रेक्षिणी
सर्वौषधि निस्यन्दतं
सर्वसार संग्रहणी
सर्वभूतरुत संग्रहणी

ह्या चौसष्ट लिपींचें पुढें लिहिल्याप्रमाणें वर्गीकरण करतां येईल. (१) देशविषयक=विवक्षित देशांत प्रचलित असलेली लिपि. (२) जातिविषयक=विवक्षित जातींत प्रचलित असलेली. (३) संमिश्र= निरानिराळ्या अक्षरवाटिकांनीं मिश्रित. (४) सांकेतिक.

यापैकीं बऱ्याच लिपी प्राचीनकाळांपासून नामशेष झाल्या आहेत. भरतखंडांत ऐतिहासिक काळांत सुमारें १४ लिपि प्रचारांत होत्या, असें लिपि शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. त्या येणेंप्रमाणें:––

ब्राह्मी लिपी
गुप्त
कुटिल
नागरी
शारदा
बंगलीय (Benguli)
पश्चिमी
मध्यमदेशी
तेलगु–कानडी
ग्रंथलिपि
कालिंग
तामील
वट्टेलुट्टु
खरोष्टी

या १४ लिपींपैकीं ब्राह्मी व तिजपासून निर्माण झालेल्या उपलिपि भरतखंडांतील बहुतेक भागांत अद्याप प्रचलित आहेत. ब्राह्मीलिपि

ब्रह्मदेवानें निर्माण केली म्हणून ती पवित्र मानण्यांत येते. या लिपीच्या वर्ण मालेंतील पहिले स्वराक्षर 'अ' हें ॐ ह्या प्रणव चिन्हापासून अस्तित्वांत आलें; व 'क' हे व्यंजनाक्षर स्वस्तिक चिन्हापासून झालें अशी सार्वत्रिक समजूत प्राचीन काळांपासून आहे. वर निर्दिष्ट केलेल्या चौदा लिपींपैकीं ब्राह्मी व खरोष्टी ह्या मुख्य लिपी होत. खरोष्टी लिपी भरतखंडाचे वायव्येकडील प्रांतांत म्हणजे पंजाब, गांधार वगैरे देशांत अशोकाचेवेळीं चालू होती. सदरील प्रांतात अशोकाचे जे शिलालेख सांपडले आहेत ते या लिपींत लिहिलेले आहेत. अशोकाच्या पूर्वीचे शिलालेख खरोष्टी लिपिंत लिहिल्याचें आढळून येत नाहीं. इराण देशांतील प्राचीनकाळच्या चांदीच्या नाण्यावर लिहिलेला मजकूर ब्राह्मी व खरोष्टी या दोन्ही लिपींत आहे. अशोकानंतर भरतखंडाच्या उत्तरेकडील कांहीं भागांत विदेशी राजांचा अंमल होता, त्यावेळच्या नाण्यांत, शिक्क्यामोर्तबांत, व शिलालेखांत खरोष्टी लिपीचा उपयोग केला जात होता असें दिसतें. इराण देशांत खरोष्टी लिपि मुख्यत्वें प्रचारांत होती. या लिपीखेरिज "अरमिइन" या नांवाची लिपी इराणदेशांत प्रचलित होती.

वेदकालामध्यें लिपींचे अस्तित्व नव्हतें व पाणिनीच्या ग्रंथांत लिपींचें अस्तित्व सुचविणारा एकही शब्द नाहीं असें मॅक्समुल्लर साहेबांचें मत आहे. परंतु अलिकडे उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून हें मत साफ चुकीचें आहे असें दिसतें. भूर्जपत्र, ताडपत्र व कापसापासून तयार केलेल्या कागदावर लिहिलेला मजकूर हवेमुळें बहुत काळ टिकत नाहीं म्हणून दानपत्रें व शासनपत्रें शिलावर व तांब्याच्या धातूच्या पत्र्यांवर कोरण्याचा प्रघात अशोकाच्या-

वेळेपासून पडला. परंतु यावरून प्राचीन काळीं भरतखंडांतील लोकांस कागदाची माहिती नव्हती असें म्हणतां येणार नाहीं. दानपत्रें व राजशासनें याखेरीज सर्वसाधारण लेखनव्यवहाराचे कामीं कागदाचा उपयोग केला जात असे यांत शंका नाहीं.

ख्रिस्तपूर्व ३२६ वर्षांत अलेक्झांडर धि ग्रेट् ह्याचा **नियार्कस** या नांवाचा एक सेनापति पंजाबमध्यें होता. त्यानें आपल्या ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं, कापूस अगर कापडाच्या चिंध्या कुटून त्यापासून हिंदुस्थानचे लोक कागद बनवीत असत व कागद करण्याची कला त्यास फार वर्षांपासून अवगत होती. मेग्यास्थिनीस ह्यानेंही आपलें ग्रंथांत वरीलप्रमाणेंच मत नमूद केलें आहे. इसवीसनापूर्वीच्या बौद्ध-वाङ्मयांत लेखन-कलेची प्रशंसा केली असून तत्कालीन गृहस्थाश्रमी लोकांनां तो एक निर्वाहाचें साधन होतें असें म्हटलें आहे.

मिसरदेशांत नाईल नदीकांठच्या दलदलींत पंपासरस (बोरू; सर्कंडा) यापासून प्राचीनकाळीं कागद तयार करीत असत. देवगिरी येथें कागद तयार करण्याचे कारखाने प्राचीनकाळीं होते, अशी माहिती बऱ्याच ठिकाणीं आढळून येते. दौलताबाद (मूळचें देवगिरी) शहरच्या एका भागास कागदपुरा हें नांव अद्यापीहि चालत आहे. हिंदुस्थानांत मुसलमानांचा अंमल होईपर्यंत एतद्देशीय लोकांस कागद हा पदार्थ माहित नव्हता असें जें कांहीं विद्वानांचें म्हणणें आहे तें वरील विवेचनावरून चुकीचें आहे असें दिसून येईल.

ब्राह्मी व तीजपासून निर्माण झालेल्या लिपी डावीकडून उजवीकडे लिहिण्याचा प्रघात आहे. परंतु खरोष्टी व तिजपासून उपस्थित झालेल्या लिपी आरबीक, फारशी, हिब्रू वगैरे उजवीकडून डावीकडे

लिहिल्या जातात. खरोष्टी लिपीचा उगम सेमिटिक देशांत (मध्य एशिया) झाला असावा असें बऱ्याच विद्वांनांचें मत आहे.

ब्राह्मी लिपी भरतखंडांत फार वर्षांपासून चालूं आहे. तिजपासून गुप्त लिपि बनली गेली. सदरील लिपि गुप्तराजांचे कारकीर्दींत उत्तर हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत प्रचलित होती. ब्राह्मी लिपीपासून कुटिल लिपि निर्माण झाली. तिच्या नांवावरूनच तिच्या वैशिष्ट्याचा बोध होतो. ब्राह्मी लिपींतील स्वर, व्यंजनें व मात्रा यांच्या आकृतींत व वळणांत लेखनसौकर्यासाठीं जरूर ते फरक करण्यांत येऊन सदरील लिपी बनविली आहे. हे फरक करतांना वर्णमालेंतील मूळाक्षरांचे वळणांत वक्रता उर्फ वांकडेपणा दिसून येतो म्हणून या लिपीस कुटिल उर्फ मुरडलेली अर्थात मोडी असें म्हणतात. इ. स. ६ व्या शतकांत सदरील लिपी प्रचारांत होती असें दिसतें. कुटिल लिपीला, कायस्थ अगर कैथी लिपि असेंही म्हणतात. कुटिल लिपीपासून मोडी लिपी बनली असावी असें कांहीं विद्वानांचें मत आहे. कुटिल (संस्कृत) व मोडी (मराठी) हे दोन शब्द एकाच अर्थाचे आहेत. ज्या अक्षराच्या मूळ वळणांत मोड पाडली गेली आहे, अगर जें मुरडलेलें आहे, अशा अक्षरांच्या वर्णमालेस अगर अक्षर-वाटिकेस मोडी अगर कुटिल लिपी असें म्हणतात. विल्हण कवीनें इ. स. ११ व्या शतकांत **विक्रमांकदेवचरित** नांवाचा एक ग्रंथ लिहिला; त्यांत कायस्थ लिपीचा त्यानें प्रामुख्यानें उल्लेख केला आहे; तो येणेंप्रमाणें:—

नो कायस्थैः कुटिललिपिभिः नोंविटैश्चाटुदक्षैः

(विक्रमाङ्कचरित सर्ग १८ श्लोक ४२)

यावरून कुटिललिपि हेमाद्रीच्या पूर्वी शेंदीडशें वर्षे तरी प्रचारांत होती असें दिसतें. देवनागरी व कायस्थ लिपि ह्याच्या वळणांत बराच फरक दिसून येतो. मोडी लिपी ही कायस्थ लिपीचे बऱ्याच कालानंतर झालेले उत्क्रांत स्वरूप होय, असें मानण्यास जागा आहे. **कायस्थ** ह्या नांवाची, लिहिण्याचा व्यवसाय करणारी एक जात भरतखंडांत प्राचीन काळीं होती. निव्वळ लिहिण्याचा धंदा करून उदरनिर्वाह करणाऱ्या आणखी कांहीं जाति भरतखंडांत होत्या. गुजराथेंत ह्याप्रकारची एक धंदेवाईक जात होती, तिला 'धुरु' अथवा 'ध्रु' असें म्हणत. कायस्थामध्यें **करण** ह्या नांवाची एक पोटजात होती, तिला **करणिक** अथवा **कर्णिक** (संक्षिप्त रूपांत कर्ण) असें म्हणत. कनोजच्या राजाचें दफ्तर ठेवणाऱ्या अधिकाऱ्यास "कायस्थ" अथवा "करणिक" अशी संज्ञा असे. यावरून "कर्ण" अथवा "करणिक" या शब्दाचा अर्थ राजकीय व्यवहाराचे कागदपत्र सांभाळणारा अंमलदार असा अर्थ निष्पन्न होतो व करणांचा अधिप (करणाधिप) यास दफ्तरदार असें म्हणण्यास हरकत नाहीं.

वरील विवेचनावरून कायस्थ,कर्ण अथवा करणिक हे शब्द निव्वळ धंद्याचे निदर्शक आहेत; जातिवाचक नाहींत असें दिसून येईल. अमोघ वर्षाच्या कारकीर्दीत या कायस्थांचा राजकीय कागदपत्र लिहून घेण्याचे कामीं उपयोग करीत असत. अमोघवर्ष राजाच्या वेळच्या एका लेखावरून कायस्थ हे हिंदुस्थानच्या दक्षिणभागांत धंद्या निमित्त आले होते असें दिसतें. अमोघवर्ष राष्ट्रकूट ह्याच्या कारकीर्दीत **वाल्ह व कायस्थ** यांस जो आश्रय मिळाला होता तो

त्याच्या नंतरच्या राजांनीं कायम ठेविला असें पुढील उताऱ्यावरून दिसतें.

लिखितं चैतद्बलभकायस्थवंशजातेन धर्माधिकरणस्थेन भो.

आमचा चरित्रनायक हेमाद्रि हा देवगिरीच्या यादवांचे दरबारांत करणाधिपाचे हुद्यावर होता ही गोष्ट निर्विवाद आहे. वरील विवेचनावरून करणाधिपाच्या हुद्याच्या कार्यक्षेत्रावर बराच प्रकाश पडतो.

ब्राह्मी लिपीपासून नागरी उर्फ देवनागरी लिपी इ. सन ६ व्या शतकांत निर्माण झाली असावी. राष्ट्रकूटवंशीय दंतिदुर्गराजाच्या वेळचा इ. स. ७५४ तील शिलालेख या लिपींत कोरलेला उपलब्ध आहे. देवनागरी लिपी लिहिण्यांत सुबक व सुवाच्य असल्यामुळें ती भरतखंडांत सर्वत्र लोकप्रिय झाली व प्राचीन काळापासून संस्कृत भाषेंत रचिलेले बहुतेक सर्व ग्रंथ याच लिपींत लिहिलेले आहेत. यादवांचे राजवटींत देवनागरी हीच लिपी प्रचारांत होती. हेमाद्रि व बोपदेव ह्यानीं लिहिलेले संस्कृत ग्रंथ देवनागरी लिपीतच आहेत. तसेंच रामदेवराव जाधवाचे राजवटींत सनातन हिंदुधर्मियांनी अगर महानुभावपंथीयांनीं मराठींत लिहिलेले सर्व ग्रंथ देवनागरी लिपींतच आहे.

हेमाद्रि हा करणाधिपाचे हुद्यावर असतानां यादवांच्या राज्याचा विस्तार फार वाढला होता; त्यामुळें दरबारचा राजकीय पत्रव्यवहार मोठ्या प्रमाणावर करणें ओघानें प्राप्त झालें होतें. हात न थांबवितां एका लेखणीच्या टाकानें थोड्या वेळांत पुष्कळ मजकूर लिहितां येईल अशा लिपीची हेमाद्रीस जरुरी भासली असल्यास नवल

नाहीं. हेमाद्री हा स्वतः विद्वान् लेखक असल्यामुळें खाजगी पत्रव्यवहार मोठ्या प्रमाणावर करण्याचा प्रसंग त्यास वारंवार आला असला पाहिजे. तेव्हां सुलभ रीतीनें अल्पावधींत पुष्कळ मजकूर लिहितां येईल अशी एखादी लघुलिपी नव्यानें शोधून काढण्याची, अगर या नमुन्याची पूर्वी अस्तित्वांत असलेली एखादी लिपी प्रचारांत आणण्याची कल्पना त्याच्या सुपीक व कल्पक डोक्यांतून निघाली असल्यास आश्चर्य नांहीं !

हेमाद्री ह्याचें संस्कृत भाषेवर प्रभुत्व होतें ही गोष्ट त्यानें रचिलेल्या अनेक ग्रंथावरून दिसून येते. अनेक लिपींत लिहिलेले संस्कृत ग्रंथ त्यांच्या नजरेखालून गेले असले पाहिजेत, ही गोष्ट त्यानें 'चतुर्वर्गचिंतामणि' मध्यें श्रुति, स्मृति, पुराणें वगैरे शेंकडों ग्रंथांतील उतारे दिले आहेत यावरून सिद्ध होते. त्याच्या दांडग्या विद्याव्यासंगावरून, ब्राह्मी लिपीपासून निर्माण झालेल्या बहुतेक लिपी त्याच्या नेहमींच्या परिचयातील असाव्या असें दिसतें.

या लिपींपैकीं पश्चिमी व कुटिल लिपि या, मोडी लिपीच्या धर्तीवर होत्या म्हणजे ह्या लिपींत हात थांबविल्यावांचून एका लेखणीच्या टांकानें थोडक्या वेळांत पुष्कळ मजकूर लिहितां येत असे. पश्चिमी लिपी कोंकणामध्यें इ. स. ५ व्या शतकांत प्रचलित होती असें कांहीं ग्रंथावरून दिसून येतें. कोंकणप्रांत भरतखंडाच्या पश्चिम भागांत असल्यामुळें तिला पाश्चिमी असें म्हणत. कायस्थ ऊर्फ कायथ अथवा कैथी ही नागरी लिपीचें परिवर्तन होऊन तयार झाली आहे. कायस्थांचे लेखनकलेंत पिढीजाद प्रावीण्य असल्यामुळें त्यांनीं ह्या लिपींस, शीघ्रता व सुलभता आणिली होती ह्यांत संशय नाहीं

हेमाद्रीच्या फडणीशी खात्यांत अशा लिपींत निष्णात असलेले बरेच लोक नोकरीवर असले पाहिजेत त्यांच्या लिपींत, शीघ्रता, सुलभता वगैरे विशिष्ट गुण असल्याचें हेमाद्रीचे निदर्शनास आल्यामुळें तिचा राजकीय व खाजगी व्यवहारांत उपयोग करण्याचें त्यानें ठरविलें असावें हें म्हणणें जास्त सयुक्तिक दिसतें.






देवनागरीच्या एकंदर वर्णमालेंतील कांहीं वर्णांस एकप्रकारचें विशिष्ट वळण देऊन मोडी लिपी तयार झाली आहे. ही गोष्ट पुढें दिलेल्या तिच्या मूळ व विकृत स्वरूपावरून दिसून येईल.

देवनागरी

अ, आ, इ, ई, उ ऊ ऋ ॠ ऌ ॡ ए ऐ ओ औ अं अः



या स्वर मालेंत फक्त **चार** स्वरांस मात्र विशिष्ट वळण दिलेलें आहे.

देवनागरी.	विकृत स्वरूप मोडीमध्यें
क ख ग घ ङ	
च छ ज झ ञ	
ट ठ ड ढ ण	
त थ द ध न	
प फ ब भ म	
य र ल व श	
ष स ह ळ	
क्ष ज्ञ	

वरील कोष्टकावरून **क** वर्ग, **च** वर्ग, व **ट** वर्ग, ह्यांपैकीं प्रत्येक वर्गांतील फक्त दोन अक्षरांस मुरडलेलें वळण दिलें आहे. **त** वर्गांतील तीन, **प** वर्गांतील चार, व य, र, ल, व या अंतस्थ वर्णांतील सर्व अक्षरांस, तसेंच श, ष, स, ह ह्या उष्मन् वर्गांतील तीन अक्षरांस विशिष्ट वळण दिलेलें आहे. एकंदर तीस अक्षरांपैकीं फक्त १९ अक्षरांसच विशिष्ट वळण दिलें आहे.

वरील विवेचनावरून 'मोडी' ही स्वतंत्र लिपी नसून देवनागरीची अगर कुटिल लिपीची एक उपलिपी आहे असें सिद्ध होतें. अशा तऱ्हेच्या उपलिपी देशकालपरत्वें प्रत्येक देशांत प्राचीनकाळीं होत्या व वर्तमानकाळींही अस्तित्वांत आहेत. **मोडी** लिपी, यक्षिणीची कांडी फिरवून एकाएकीं तयार झालेली नाहीं. तसेंच ती पैदा करण्यांस सिंहलद्वीपास उर्फ लंकेस जाण्याची कोणासही जरूरी नव्हती. हेमाद्रीला 'मोडी' लिपी आणण्यासाठीं लंकेस जावें लागलें असें विधान करणें म्हणजे त्याच्यासारख्या लोकोत्तर विभूतिचा अपमान करणें होय !!

ब्राह्मी लिपी:—पूर्वी निर्दिष्ट केलेल्या चौदा लिपींपैकीं गुप्त, कुटिल, नागरी, शारदा, ग्रंथ, कलिंग, पश्चिमी व मध्यमदेशी या, **ब्राह्मी**ची विकृत रूपें होत. ग्रंथलिपी मद्रास इलाख्यांतील अर्काट, त्रिचनापाल्लि, सालेम, मदुरा वगैरे ठिकाणीं प्रचलित आहे. कलिंग लिपी ही मद्रास इलाख्यांतील गंजम वगैरे प्रांतांत प्रचारांत आहे. तामील ही मलबार प्रांतांत प्रचलित आहे. वट्टेलट्टु ही तामील लिपीची एक पोटलिपी आहे.

इसवी सनाच्या आठव्या शतकांत शारदा-लिपि, ही काश्मीर व पंजाबप्रांतांत प्रचलित होती. **शारदा**-लिपीपासून **ठाकरी** नांवाची एक

शीघ्र उपलिपी निर्माण झाली. कैथी अगर मोडी लिपीप्रमाणें अल्पावधींत पुष्कळ मजकूर लिहिण्याचे कामीं या लिपीचा उपयोग करीत. वंगलीय लिपि बंगालप्रांतांत प्रचलित होती. बहाल येथील एका स्तंभावर नारायणपालच्या काळचा एक लेख या लिपींत कोरलेला आहे. वंगलीय लिपीपासून नेपाळी, मैथिली, उरिया व बंगालप्रांतांत हल्लीं प्रचलित असलेली बंगाली लिपी ह्या निर्माण झाल्या.

कैथी अथवा कायथ (कायस्थ) लिपी ही नागरीचे परिवर्तन होऊन बनली आहे. कुटिल व कैथी या लिपींचा परम्पर निकट संबंध आहे. **कैथी** ही जलद लिहिण्याची लिपी आहे. संस्कृतांतील संपूर्ण वर्णमालेचा उपयोग या लिपींत करतां येत नाहीं. ऋ, ॡ, ञ, न, व अगर ब या वर्णांत कांहीं फरक नाहीं. अ, ख, थ हीं अक्षरें नागरीपासून भिन्न आहेत. मोडी लिपीही कैथी अथवा कायस्थ लिपीपासून फारशी भिन्न नाहीं.

फारशी भाषेंत **नस्ख** व **शिकस्ता** अशा लिहिण्याच्या दोन पद्धति आहेत. ग्रंथ रचनेच्या कामीं ज्या लिपीचा उपयोग केला जातो त्या पद्धतिला **नस्ख** अशी संज्ञा आहे. व जलद लिहिण्याच्या पद्धतीस **शिकस्ता** असें म्हणतात. इंग्रजी भाषेंत ग्रंथ लिहिण्याचे कामीं रोमन लिपिचा उपयोग करितात. जसें:—A, B, C, D, E F, G, H, वगैरे. परंतु पत्रव्यवहारांचें कामीं ज्या लिपीचा उपयोग केला जातो तिला *Italics* असें म्हणतात, जसें:—*abcdefgh*. म्हणजे रोमन लिपि ही फारशी भाषेंतील **नस्ख** पद्धति होय; व *Italics* ही **शिकस्ता** पद्धति होय. याप्रमाणें दरएक भाषेंत, ग्रंथ लिहिण्याची लिपि, व्यवहारांतील कागदपत्र लिहिण्याचें कामीं उपयोगांत येत असलेल्या लिपीपासून भिन्न असते.

इतिहासाचार्य राजवाडे ह्यांच्यामतें श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांत मोडी लिपीचा अप्रत्यक्ष रीतीनें उल्लेख केला आहे. तो येणेंप्रमाणें:—

हें बहू असो. पंडितू धरूनु बालकाचा हातू
वोळा लेहे वेगवंतू आपणचि ।

या ओवींतील वेगवंतू हें पद फार महत्वाचें आहे असें राजवाडे यांचें मत आहे. बालबोध अक्षर वेगानें लिहितां येत नाहीं, तेव्हां त्या लिपीसंबंधानें वेगवंत हा शब्द योजण्यांत विशेष अर्थ नव्हता. हें पद मोडी अक्षराच्या संबंधानें मात्र सार्थ आहे. यावरून श्रीज्ञानेश्वरीच्या पूर्वी मोडी अक्षर प्रचारांत आलें होतें असें राजवाडे अनुमान काढितात. हेमाद्री व ज्ञानेश्वर महाराज हे समकालीन होते. तेव्हां हेमाद्रीच्यापूर्वी मोडी लिपि अस्तित्वांत होती हें उघड दिसतें. यावरून मोडी लिपीचें जनकत्व हेमाद्रीकडे येत नसून ती त्यानें महाराष्ट्रांत राजकीय व खाजगी कागद पत्र लिहिण्याचे कामीं नव्यानें प्रचारांत आणिली ह्याच मतास पुष्टि मिळते.

मराठ्यांच्या इतिहासाची साधनें या ग्रंथाच्या आठव्या खंडांत इतिहासाचार्य राजवाडे यांनीं मोडी लिपीसंबंधानें आपले विचार प्रगट केले आहेत ते येणेंप्रमाणें:—

"ज्ञानेश्वरी हा ग्रंथ शके १२१२ (इ. स. १२९०) मध्यें लिहिला गेला. हेमाद्री हा इ. स. १२६० पासून देवगिरीच्या जाधवांचा दफ्तरदार होता. हेमाद्री हा दफ्तरदार होण्याच्या पूर्वी उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचें राज्य होऊन ८०-९० वर्षें झालीं होतीं. सिंघण राजानें माळवा वगैरे विंध्याद्रिच्या पलिकडील प्रांत जिंकून

घेतले होते तेव्हां मुसलमानांची व म्लेंच्छांची ओळख मराठ्यांना झाली होती. ही ओळख होत असतांना मुसलमानांची कागद करण्याची कला महाराष्ट्रांत सुरू झाली; व ही सुरू झाल्यावर मोडी लिहिण्याची पद्धत हेमाद्रीला सुचली. ही मोडी लिहिण्याची पद्धत हेमाद्रीनें मुसलमानांच्या **शिकस्ता**नामक पद्धतिवरून घेतली. फारशीत लिहिण्याच्या पद्धति अनेक आहेत; त्यांत **नस्ख** व **शिकस्ता** ह्या पद्धति आपल्याकडील बालबोध व मोडी ह्या पद्धतिशीं जुळतात.

नस्ख अक्षर बालबोधीप्रमाणें स्पष्ट व सुवाच्च असें लिहावें लागतें. व शिकस्ता अक्षर मोडून लिहिलेलें असतें. जलदीनें लिहिण्यांत खंडें अक्षर मोडून लिहिण्याचें जें वळण त्याला फारशींत **शिकस्ता** म्हणतात. मोडी हा शब्द फारशी **शिकस्ता** ह्या शब्दाचें हुबेहुब भाषांतर आहे. मोडी ह्या शब्दाचा वाचक शब्द संस्कृतांत अगर महाराष्ट्रांत नाहीं. हा शब्द हेमाडपंतानें फारशी शिकस्ता या शब्दाच्या अर्थाकडे लक्ष देऊन मराठींत अक्षर लिहिण्याचा एका पद्धतीला नव्यानें लागूं केला. हेमाडपंतानें अक्षर लिहिण्यांत ही नवी सुधारणा केली तोंपर्यंत महाराष्ट्रांत सर्व लेखी व्यवहार बालबोध अक्षरांत होत असे. मोडी लिहिण्याचा प्रघात आज ६५० वर्षें चालूं असतां भरतखंडांतील इतर कोणत्याही भाषेला हा प्रघात उचलण्याची आवश्यकता दिसली नाहीं. कागदावर लिहिण्याचा प्रघात पडल्यानरोबर मोडी लिहिण्याचाही प्रघात महाराष्ट्रांत लवकरच पडला; व हा प्रघात पाडण्याचें प्रथम श्रेय जाधवांचा दफ्तरदार जो हेमाद्री त्यांस विद्वत्तेच्या व अधिकाराच्या बळावर सहजासहजी घेतां आलें. मोडी अक्षर देवनागरी अक्षरें मोडून तयार केलें आहे, हें चार पांचशें

वर्षांपूर्वीचीं जुनीं पत्रें व महजर पाहिले म्हणजे सहज दिसून येतें."

इतिहासाचार्य राजवाडे यांनीं वरील विचारसरणींत बऱ्याच गोष्टी गृहित धरल्या आहेत त्या येणेंप्रमाणें:—

(१) मुसलमानांचा हिंदुस्थानांत प्रवेश होण्यापूर्वी कागदाची माहिती एतद्देशीय लोकांस बिलकूल नव्हती.

(२) कागदावर लिहिण्याचा प्रघात पडल्याबरोबर, मोडी लिहिण्याचाही प्रघात महाराष्ट्रांत लवकरच पडला.

(३) हेमाद्रीचे वेळीं फारशी भाषेचा प्रसार महाराष्ट्रांत झाला होता.

(४) हेमाद्रीस फारशी भाषेचें उत्तम ज्ञान होतें.

वरील विधानास राजवाडे यांनीं कांहींएक आधार दिले नाहींत. उलट अलेक्झांडर धि ग्रेट ह्याचा सेनापति नियार्कस यानें हिंदुस्थानांत कापूस अगर चिंध्या कुटून कागद फार प्राचीन काळापासून तयार करीत व तो लिहिण्याच्या उपयोगांत आणीत असे आपले ग्रंथांत ख्रिस्तपूर्व सुमारें तीनशें वर्षांच्या पाठीमागें लिहून ठेवलें आहे. ग्रीक व चिनी लोकांनींही हिंदुलोकांस कागद तयार करण्याची कला फार प्राचीनकाळापासून अवगत होती असें आपल्या प्रवासवर्णनांत लिहून ठेविलें आहे. यावरून मुसलमानांनीं हिंदुस्थानच्या लोकांस कागदाची ओळख प्रथम करून दिली ह्या म्हणण्यांत तथ्य नाहीं. फारशी भाषेचा प्रवेश दक्षिणेंत तेरावें शतकांत अगर त्यापूर्वी झाल्याबद्दलची माहिती कोणत्याही ग्रंथांत उपलब्ध नाहीं. हेमाद्रीस फारशी भाषा अवगत होती व हेमाद्रीनें मोडी लिहिण्याची पद्धत मुसलमानांच्या शिकस्तानामक लेखनपद्धतीवरून

घेतली या विधानास राजवाडे यांनी कांहींएक आधार दिला नाहीं. उलट, संस्कृत भाषेंत ब्राह्मी, देवनागरी, वगैरे लिपीविरून अनेक उपलिपी कालांतरानें निर्माण झाल्या व त्यांत पश्चिमी, मध्यमदेशी, कुटिल कैथी, ठाकरी, वगैरे जलद लिहिण्याच्या लिपी हेमाद्रीच्या पूर्वी हिंदुस्थानांत अस्तित्वांत होत्या अशी माहिती लिपिशास्त्रावरील ग्रंथांत मिळते. 'मोडी या अर्थाचा वाचक शब्द संस्कृतांत नाहीं; व तो शब्द हेमाडपंतानें फारशी **शिकस्ता** या शब्दाच्या अर्थाकडे लक्ष देऊन मराठी अक्षर लिहिण्याच्या एका पद्धतीला नव्यानें लागू केला, असें राजवाडे यांचें म्हणणें आहे. परंतु सदरील विधानें वस्तुस्थितीस धरून नाहींत. संस्कृतांत कुटिल हा शब्द मोडी शब्दाचा वाचक आहे. 'कुटिल' म्हणजे वांकडा, मुरडलेला, मोडलेला; 'मोडी' हें 'कुटिल' शब्दांचें मराठींत हुबेहुब रूपांतर होय.

हेमाद्रीचा विद्याव्यासंग दांडगा होता ह्यामुळें तत्कालीन वेगवेगळ्या लिपीतले ग्रंथ त्याच्या वाचण्यांत आले असले पाहिजेत. एखादी नवी लिपी शोधून काढण्यास अगर प्रचारांत आणण्यास फारशी भाषेंतील लेखनपद्धतिकडे धांव मारण्याची त्यास जरूरी नव्हती. देवनागरी लिपी जलद लिहिता यावी म्हणून तिला वळण देण्याचें यत्न लेखनकलेंत निष्णांत अशा कायस्थांकडून, फारशी भाषेचा हिंदुस्थानांत प्रवेश होण्यापूर्वी चालूं होते, वगैरे हकिगतीचा पूर्वी उल्लेख येऊन गेला आहे.

हेमाद्रीनें मोडी लिहिण्याची पद्धति लंकेहून आणिली. ह्या दंतकथेवद्दल इतिहासाचार्य राजवाडे ह्यांचें मत पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:–

'देवगिरीच्या जाधवांचें साम्राज्य सर्व दक्षिणभर कन्याकुमारीपर्यंत होतें हें प्रसिद्ध आहे. साम्राज्यांतील दफ्तरें तपासण्यास कन्या-

कुमारी किंवा रामेश्वर ह्या दक्षिणेकडील प्रांतांत जाऊन व कदाचित् लंकेची यात्रा करून परत आल्यावर सर्व दफ्तर मोडींत लिहिण्याचा वटहुकूम हेमाद्रीनें काढला असावा असें दिसतें. लंकेहून परत येण्याला व हा नवा वटहूकूम काढण्याला एकच गांठ पडल्यामुळें लंकेचा व मोडी अक्षराचा लोकांनीं विनोदानें संबंध जोडून दिला असेल असें वाटतें. बाकी लंकेंतील त्यावेळच्या सिंहलीभाषेचा व मोडीचा कांहीं संबंध होता ह्याला बिलकूल प्रमाण नाहीं.'

वरील उताऱ्यांतील प्रत्येक विधान कल्पनेच्या पायावर रचलेलें असून त्यास इतिहासाचा आधार नाहीं. देवगिरीच्या यादवांचा अंमल, म्हैसूर व कर्नाटक या प्रांताच्या दक्षिणेकडील प्रांतावर होता असें दाखविणारा एकही शिलालेख अगर ताम्रपट उपलब्ध नाहीं. हेमाद्रीच्या हातचें, अगर देवगिरीच्या यादवांच्या दफ्तरांतील मराठींत लिहिलेलें एकही चिठोरें उपलब्ध नाहीं. त्यानें तयार केलेलीं मेम्तकेंही उपलब्ध नाहींत, हेमाद्री हा दरबारचे कामासाठीं यादवांच्या राज्यांत दौऱ्यावर निघाल्याबद्दलचा कोठें उल्लेख नाहीं. त्याचे वेळचा एकही वटहुकूम उपलब्ध नाहीं. हेमाद्रीनें **मुक्ताफल** ग्रंथावर लिहिलेल्या कैवल्यदीपिका नामक टीकेंत, अगर त्याच्या चतुर्वर्गचिंतामणि ग्रंथांतही याबाबतींत कांहींएक उल्लेख केलेला आढळत नाहीं. इतिहाससंशोधनाच्या बाबतींत कल्पनाशक्तीस स्वैरक्रीडा करूं देणें केव्हांही चांगलें नाहीं

लंकेंत मोडी–लिपी प्रचारांत नव्हती; त्याठिकाणीं बौद्धधर्मांतील हीनयान पंथ चालूं होता; व तेथील सिंहली भाषेचा मोडी लिपीशीं कांहींएक संबंध नव्हता, असें राजवाडे कबूल करितात.

मोडी लिपीच्या जनकत्वासंबंधानें सुमारें तीस चाळीस वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत मोठा वाद उपस्थित झाला होता. इतिहासाचार्य राजवाडे व प्रोफेसर रा. रा. भागवत वगैरे विद्वान् गृहस्थांच्या मतें हेमाद्रीनें सदरील लिपी शोधून काढली. सदरील मत प्रस्थापित करण्यासाठीं इतिहासाचार्य राजवाडे यांनीं त्यावेळीं जीं कारणें दिलीं होतीं, तींच त्यांनीं आपल्या म. इ. साधनें या ग्रंथाच्या ८ व्या खंडांत विस्तृत रूपानें नमूद केली आहेत. परंतु तीं, इतिहास व युक्तिवाद यांचे कसोटीस उतरत नाहींत हें दाखविण्याचा आम्हीं यथामति प्रयत्न केला आहे.

रा. ब. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते यांनीं Indian Antiquary नांवाच्या इंग्रजी नियतकालिकांत सुमारें २५ वर्षांपूर्वी एक लेख लिहून त्यांत श्रीशिवाजीमहाराजांचे चिटणीस बाळाजी आवजी यांनीं मोडी लिपी इ. स. १५६५ त प्रथम शोधून काढली असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्या मतांचें समर्थन करण्यासाठीं त्यांनीं जीं कारणें दिलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:–(१) श्रीशिवाजीमहाराजांचे पूर्वीचा एकही मोडी लेख उपलब्ध नाहीं; (२) पंढरपूरच्या देवळांतील जमाखर्चीं लेखांत मोडी लिपीचा मागमूस नाहीं; व (३) प्राचीन ताम्रपटांत, मोडी लिपी आढळत नाहीं. नाशिक येथील तीर्थोपाध्ये वे. गिरिधर ऊर्फ गिरीभट क्षेमकल्याणी यांचेकडे जुन्यांत जुनी वही त्यास सरकारमार्फत मिळाली होती. त्यांत ८५ मोडी लेखांपैकीं ८० लेख कायस्थ प्रभूंचे निघाले. जुन्यांत जुना मोडीलेख शके १५६५-इ. स. १६४३ पलिकडला नाहीं. असें या वह्यांच्या संशोधनांत निष्पन्न झालें. बाळाजी आवजी यांचे वडील जंजिऱ्याचे शिद्याचे नोकरींत

असतां, त्यास आपल्या यजमानाबरोबर दिल्लीदरबारांत पुष्कळ वेळां जाण्याचा प्रसंग येत असे. तेथें असतांना फारशी भाषेंतील जलदी लिहिण्याच्या **शिकस्ता** पद्धतीच्या वळणावर मोडी लिपीची कल्पना त्यानें प्रथमच काढली' व देवनागरी लिपींत योग्य फरक करून चिटणीशी वळणाची नवी लिपी बनविली असें रा. ब. गुप्ते यांनीं या लेखांत म्हटलें आहे. फारशी भाषेंतील **शिकस्ता** पद्धतीवरून 'मोडी' लिपीची कल्पना निघाली याबाबतींत मात्र राजवाडे व गुप्ते यांचें एकमत दिसतें. परंतु तिच्या जनकत्वासंबंधानें त्यांच्यांत मतभेद आहे. राजवाडे यांचे मताप्रमाणें मोडी–लिपीची कल्पना पहिल्या-प्रथम हेमाद्रीनें काढली. रा. ब गुप्ते यांच्या मताप्रमाणें 'कारकुनी वेशाचे आदिस्थानीं विराजमान असलेले राजकारणी खरे सूत्रकार बाळाजी आवजी यांनीं आपल्या बुद्धिकौशल्यानें मोडी लिपी शोधून काढली व श्रीशिवछत्रपतीनें ती प्रचारांत आणली.' आमच्या मतें या वादांत शास्त्रीयसंशोधनापेक्षां उभयपक्षीं ज्ञातिविषयक वृथा-भिमानाची छटा दिसून येते.

भरतखंडांत मुसलमानांचा प्रवेश होण्यापूर्वी, ब्राह्मी, देवनागरी, वगैरे ऐतद्देशीय प्राचीन लिपीमध्यें कालपरत्वें जीं परिवर्तनें अगर फेरफार झाले त्यांचा सूक्ष्म रीतिनें अभ्यास केल्यानें व निरनिराळ्या लिपींत वेळोवेळीं कसकसे फेरफार झाले याचें मनन केल्यानें या वादग्रस्त विषयाचा निकाल सहज लागणार आहे.

लिपिशास्त्राच्या अनुरोधानें आम्हीं या भागांत जें विवेचन केलें आहे. त्यावरून राजवाडे व गुप्ते यांचीं मतें विचारांत घेण्यास फार अडचणी येतात. पेशवाईंत, या मोडी लिपीस आणखी एक प्रकारचें

नवीन वळण मिळालें, व तें ' बिवलकरी ' वळण या नांवानें प्रसिद्ध आहे. खुद्द हेमाद्रीच्या वेळचा मोडी लेख उपलब्ध झाल्यास त्यांत व हल्लींच्या मोडीच्या स्वरूपांत बराच फरक असल्याचें दिसून येण्याचा संभव आहे.


मोडी हा शब्द मौर्य–मौर्यी–मोडी–मोडी या परंपरेनें सिद्ध झाला असें मानून ही लिपी मौर्यराजा चंद्रगुप्त व त्याचा नातु अशोक ह्यांचे राजवटींत बनली असें आंग्ल विद्वानांचें मत आहे. परंतु अलिकडे लिपिशास्त्रावर तज्ज्ञांनीं सोपपत्तिक ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचा अभ्यास करून या बाबतींत अधिक संशोधन करतां येण्याजोगें आहे.


लेखनकलेंत फार प्राचीनकाळापासून निष्णात असलेल्या कायस्थानी देवनागरीस एक प्रकारचें वळण अगर लपेट देऊन लिहिण्याचे कामीं तिला सुलभता आणली व अशा तऱ्हेची लिपी हेमाद्रीचे वेळीं अस्तित्वांत होती असें पूर्वी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. व्यवहारदक्ष हेमाद्रीनें ती फक्त प्रचारांत आणली असें म्हणण्यास प्रत्यवाय दिसत नाहीं.

मोडी लिपी बंद करून मराठी प्रांतांतील सर्व कोर्टांतील व्यवहार बालबोधींत चालवावे असा मुंबई सरकारनें कांहीं वर्षांपूर्वी वटहुकूम काढला होता. त्यावेळीं बालबोध अक्षर कितीही जलदीनें लिहिलें तरी त्याला मोडी लिपीची सर येत नाहीं असें दिसून आलें. शिवाय अशा रीतीनें जलद लिहिलेलें लिखाण अत्यंत दुर्बोध होत असे, असा कटु अनुभव आल्यामुळें सरकारास आपला वट हुकूम परत घेणें भाग पडलें. हेमाद्रीनें मोडी लिपी स्वतः तयार केली याबद्दल कांहींएक ऐतिहासिक पुरावा नाहीं. शिवाय मोडींत लिहिलेलें तत्कालिन एकही लिखाण अस्तित्वांत नाहीं. सबब या बाबतींत साधार पुरावा पुढें येईपर्यंत

परंपरागत आलेल्या गोष्टीवर अथवा दंतकथेवर भरंवसा ठेवणें योग्य दिसत नांहीं.

इ. स. १७३९ तील मोडी लिपीचा मासला म्हणून थोरल्या बाजीरावाचे धाकटे बंधु चिमणाजी आप्पा यांचें स्वदस्तुरचें मोडींत लिहिलेले पत्र पुढें दिलें आहे:—





वरील मोडी लिपीचें देवनागरींत रूपांतर.

श्री.

अखण्डित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री अन्ताजी रघुनाथ गोसावी यांसीः–

सेवक चिमणाजी बल्लाळ नमस्कार सुरुसन सलासिनमया व अलफ तुम्हीं पत्र पाठविलें ते प्रविष्ट जाहलें. लेखनार्थ विस्तारें कळला.

ऐशियास मुख्य भावार्थ कीं, अवघा प्रसंग सत्य भासून कर्तव्य असेल तें तैसीच आज्ञा करावी नाहीं तरी दुरांशेंत गुतावें सारिखें नाहीं म्हणून लिहिलें; ऐशियास अवघा प्रसंग तुम्हीं प्रत्ययास आणून दिला आहे, त्यास अनृत्य काये निमित्य भासेल. अवघा प्रसंग सत्यच आहे. व कार्यही कर्तव्य आहेच आहे. तुम्हीं चित्तांत संशय आणोवा ऐसा अर्थ नाहीं. कर्णाजी शिंदे यांजकडून मनुश्य देविलें ते आले नाहीं म्हणून लिहिलें, त्यास मनुश्याविसी पहिलें लिहिलें होतें; हल्लीही लिहिले आहे. ते मनुश्य देतील. जाणिजे छ २२ शाबान आज्ञांकित.



भाग ७ वा.

महानुभाव-पंथीय मराठी वाङ्मय.

सर्वं मद्भक्तियोगेन मद्भक्तो लभतेऽञ्जसा ॥
स्वर्गापवर्गं मद्धाम कथंचिद्यदि वाञ्छति ॥ १ ॥
नैरपेक्ष्यं परं प्राहुर्निःश्रेयसमनल्पकम् ॥
तस्मान्निराशिषो भक्तिर्निरपेक्षस्य मे भवेत् ॥ २ ॥
एवमेतान्मयादिष्टाननुतिष्ठति मे पथः ॥
क्षेमं विंदन्ति मत्स्थानं यद्ब्रह्म परमं विदुः ॥ ३ ॥

श्रीमद्भागवत (एकादश स्कंध अ. २०)

नानामतें पाखांडें । कर्मठता अति वाडें ।
त्यांचीं ठेंचावीं तोडें । हरिभजनें ॥ ३ ॥
जें जें हरीचें लीलाचरित । तें तें माझेंचि स्वतंत्र ।
देव भक्त एकत्र । भेद नाहीं. ॥ ४ ॥
जो जो अवतार हरी धरी । तो तो मीच अवधारी ।
हरिनाम गजरीं । जगदोद्धारी ॥ ५ ॥
सर्वांभूतीं भगवद्भावो । हा भक्तांचा निजनिर्वाहो ।
धर्माचा आग्रहो । वाढणें ॥ ६ ॥
सर्वाभूतीं दया शांती । प्रतिपाळावी वेदोक्ति ।
हेंचि एक निश्चिती । करणें आह्मां ॥ ७ ॥
लीलाविग्रही भगवंत । तया म्हणती नित्यमुक्त ।
आह्मां काय तेथें । वेगळे असों ! ॥ ८ ॥ (एकनाथ)


भरतखंडांत श्रुतिकालापासून, सृष्टीची उत्पत्ति कशी व केव्हां झाली ? तिचा उत्पादक कोण ? आत्मा नित्य कीं अनित्य ? जीवात्मा व परमात्मा यांचे परस्पर संबंध काय आहेत ? वगैरे गहन विषया-

कडे तत्कालिन तत्त्ववेत्त्यांचें लक्ष वेधलें होतें. ह्या विषयावर चिकित्सकबुद्धीनें विचार करून तत्कालिन ऋषींनीं जे सिद्धांत ठरविले ते त्यांनीं आरण्यकें, ब्राह्मण, उपनिषदें वगैरे ग्रंथांत लिहून ठेविले आहेत. ज्या त्या तत्त्ववेत्त्यानें आपापल्या दृष्टीनें ह्या आध्यात्मिक विषयांचा अनेक बाजूंनीं विचार केला होता, त्यामुळें त्यांच्यामध्यें एकवाक्यता दिसून येत नाहीं. ह्या मत-वैचित्र्यामुळें एकाच विषयासंबंधानें अनेक तत्त्ववेत्त्यांचीं भिन्न भिन्न मतें असलेली दिसतात. कांहींच्या मतें, एका अगम्य व अनिर्वचनीय शक्तीच्या योगानें सृष्टि निर्माण झाली असून तिचें चालकत्व या शक्तीकडे आहे. या मताचे लोकांस सेश्वरवादी म्हणतात. उलट पक्षीं, सृष्टीची उत्पत्ति स्वयंभू असून निसर्गाच्या कांहीं ठराविक नियमान्वयें तिचे व्यापार सुरळितपणें चालतात; आणि प्रत्येक सृष्ट पदार्थास उत्पत्ति, स्थिति व लय असून दरएक स्थितींतून त्यास क्रमाक्रमानें जावें लागतें, असें कित्येकांचें मत आहे. या मतवाद्यास निरीश्वरवादी (पाखंडी) असें म्हणतात. ब्रह्मसूत्रकार, योगसूत्रकार व नैय्यायिक ह्यांची गणना सेश्वरवाद्यांत होऊं लागली. सांख्य, वैशेषिक, लोकायतिक (चार्वाकमतानुयायी) ह्यांचा अंतर्भाव निरीश्वरवाद्यांत होऊं लागला. सर्व उपनिषदांचें सार जी श्रीमद्भगवद्गीता, तिच्यांत ईश्वराचें आस्तिक्य प्रतिपादिलेलें असून सकृद्दर्शनी भिन्न दिसणाऱ्या सांख्य व योग मतांचा गीताकारानें समन्वय करण्याचा प्रयत्न केला आहे. निरीश्वरवाद्यांना श्रीमद्भगवद्गीतेंत बिलकुल थारा नाहीं. गीताकाल व ख्रिस्तिधर्माचा उदय यांचे दरम्यान जो काल गेला त्यांत जैन, बुद्ध वगैरे धर्मांची स्थापना झाली. या दोनही धर्माचे संस्थापकांना वेदाचें

प्रामाण्य, ईश्वराचें आस्तिक्यमणि वर्णाश्रमधर्म हीं संमत नसल्यामुळें त्यांची गणना निरीश्वरवाद्यांत होत असे.

खुद्द वेदान्तमतवाद्यांत दोन मुख्य पक्ष निर्माण झाले. अद्वैतवादी व द्वैतवादी; अद्वैतवाद्यांत, केवलाद्वैती व विशिष्टाद्वैती असे दोन पोट भाग निर्माण झाले. श्रीमच्छंकराचार्य हे केवलाद्वैती मताचे पुरस्कर्ते होते. श्रीरामानुजाचार्य हे विशिष्टाद्वैतमताचे प्रवर्तक होते. श्रीमध्वाचार्य व श्रीवल्लभाचार्य हे द्वैतमतवादी होते. श्रीमच्छंकराचार्यांनीं आपल्या लोकोत्तर बुद्धिमत्तेच्या व तर्कशास्त्राच्या जोरावर अद्वैतमतांचें मंडण करून, सांख्य, वैशेषिक, जैन, बौद्ध, चार्वाक् वगैरे अवैदिक मतांचें खंडण केलें. व एकंदर जनसमूहांत आपल्या अद्वैतमताचा पगडा बसविला. त्यामुळें त्यास **जगद्गुरू** ही पदवी प्राप्त होऊन भरतखंडाच्या चार दिशेस आचार्यांच्या चार मठांची स्थापना झाली. ही गोष्ट सन इ. स. ७ व्या अथवा ८ व्या शतकांत घडून आली.

वेदांतमताच्या प्रसारामुळें जैन व बौद्धधर्मास उतरती कळा लागली. परंतु त्यामुळें सदरील धर्मांचें भरतखंडांतून उच्चाटन झालें, अशी जी सार्वत्रिक समजूत आहे ती बरोबर नाहीं. बौद्धधर्म हा अहिंसा, भूतदया, विश्वबंधुत्व व समाजसेवा वगैरे उदात्त तत्वांच्या पायावर उभारलेला असून, सनातन हिंदुधर्मांतील पुनर्जन्म, पूर्वकर्म शील, प्रज्ञा, समाधि वगैरे तत्वें त्यास मान्य होतीं. बौद्धधर्म भरतखंडांत सुमारें हजारबाराशें वर्षें प्रचलित असल्यामुळें अहिंसा, विश्वबंधुत्व वगैरे त्यांतील विशिष्ट मतें सामान्य लोकांत दृढमूल झालीं होतीं. या परिस्थितीमुळें सनातन वर्णाश्रमधर्माच्या मूळस्वरूपांत बराच ढिलेपणा आला होता



महाराष्ट्र–सारस्वत–मयूर.

कै. विनायक लक्ष्मण भावे.

जन्म ६–११–१८७१] [मृत्यु १२–९–१९२६

इ. स. आठव्या व नवव्या शतकांच्या दरम्यान श्रीमद्भागवत-पुराण रचलें गेलें, असें विद्वान लोकांचें मत आहे. ह्या पुराणाच्या रचना-कालासंबंधानें अद्याप एकमत नाहीं. परंतु श्रीमदाद्यशंकराचार्यांचे अगोदर सदरील पुराण अस्तित्वांत नव्हतें, ही गोष्ट निर्विवाद होय. इ. स. आठव्या शतकाच्या सुमारास भरतखंडांत निरनिराळे धर्म व पंथ प्रचलित होते. भागवतकारांनीं दशावताराच्या कल्पनेनें त्या सर्वांचें मोठ्या खुबीनें एकीकरण करण्याचा प्रयत्न केला व तो बऱ्याच अंशानें सिद्धीस गेला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. उदाहरणार्थ **रामायणांत** ज्या **गौतमबुद्धास** चोर असें म्हटलें आहे, (यथा चोरस्तथा बुद्धः) त्याचा भागवतकारांनीं दशावतारांत समावेश केला आहे. ही विचारक्रांति होण्यात कोणती कारणें झालीं असतील याचा सर्वधर्मांचा तौलनिक रीतीनें अभ्यास करणारांनी (Students of Comparative religions) अवश्य विचार करावा.

श्रीमद्भागवतपुराण हा ग्रंथ श्रीमद्भगवद्गीतेची आधुनिक कालांतील सुधारलेली आवृत्ति होय, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सदरील पुराणांत श्रीकृष्णाच्या कथानकास व त्याच्या अतर्क्य लीलांच्या वर्णनास प्राधान्य दिलें असून तो परमेश्वराचा पूर्णावतार होता असें प्रतिपादन केलें आहे. सनातन वैदिक धर्माच्या मूळ स्वरूपास धरून निव्वळ भक्तीच्या जोरावर परमेश्वरप्राप्ति करून घेतां येतें, असें या पुराणांत प्रतिपादिलें आहे. परमेश्वराच्या स्वरूपाचें ज्ञान भक्तिमार्गानें करून घेणें हा भागवत पुराणाचा मुख्य विषय असून सर्व गोष्टी दुय्यम प्रतीच्या मानिल्या आहेत. वर्णाश्रमधर्म हें

भागवतधर्माचें सर्वस्व नसल्यामुळें त्याचें उल्लंघन या धर्माच्या आड येत नाहीं. एकंदरीत भागवत पुराणांतकर्माला गौणपणा दिलेला असून तांलीक उपासना पद्धतीला प्रामुख्य दिलें आहे असें दिसतें. सामान्यजनांनीं आपल्या उपास्य देवतेची अन्यभावनेनें पूजा करून त्याचें गुणानुवाद गावे व ते नित्य श्रवण करावें व सदाचरणानें वागावें अशी भागवतधर्माची शिकवण आहे. भगवंताविषयीं प्रेम-भक्ती अशा रीतीनें उत्पन्न होऊन ती स्थिर झाल्यावर, त्याचें खरें स्वरूप कळूं लागतें; व त्या स्वरूपाची जाणीव झाल्यावर त्याचेविषयीं भक्ति उत्पन्न होऊन तिजमध्यें जीव पूर्णपणें नित्य रंगून जातात व हरिगुण-गायन हेंच त्यांच्या आयुष्याचें इतिकर्तव्य होतें. अजामिळ, प्रल्हाद, उद्धव, अक्रूर, सुदाम वगैरे भक्तांच्या उदाहरणांवरून, भागवतकारांनीं सदरील तत्व लोकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. अखिल भूतमात्र हेंच परमेश्वराचें स्वरूप होय असें ओळखून सर्वांकडे समदृष्टीनें पाहणें हेंच श्रेष्ठ भक्तीचें लक्षण होय, असें भागवतांत प्रतिपादिलें आहे. शालिवाहान शकाच्या बाराव्या शतकापर्यंत भरतखंडांत वैष्णव, शैव, वीरशैव (लिंगायत) शाक्त (बाममार्गी, अघोरी पंथ), नाथपंथ वगैरे नानाविध पंथ अस्तित्वांत होते.

हेमाद्री हा शके ११७१ पासून देवगिरीचा यादवराजा महादेवराय व रामदेवराव जाधव यांचे राजवटींत करणाधिपाचे हुद्यावर असतानां महाराष्ट्रांत आणखी एका नव्या पंथाची भर पडली. देवगिरी येथें अगर त्याच्या आसपासच्या प्रांतात श्रीचक्रधर नांवाचा निवृत्तिमार्गी महाराष्ट्रीय ब्राह्मण राहात होता. तो पूर्ण वैराग्यशील असून

श्रीकृष्णाचा निस्सीम भक्त होता. त्याचा पूर्वाश्रमीचा इतिहास उपलब्ध नाहीं. **भावे** यांच्या '**महाराष्ट्र सारस्वतां**'त अगर श्रीयुत यशवंत खुशाल देशपांडे यांच्या '**महानुभवीय**-मराठी-वाङ्मय' नांवाचे ग्रंथांत त्याचें त्रोटक चरित्र दिलें आहे. परंतु तें सांप्रदायिक स्वरूपाचें असल्यामुळें इतिहासाच्या कसोटीस कितपत उतरेल याबद्दल शंका आहे. शके ११८५ चें सुमारास त्यास श्रीदत्तात्रयांचा साक्षात्कार होऊन त्यानें संन्यास दीक्षा घेतली. श्रीकृष्ण हा पूर्णावतार असून त्याची अव्यभिचारी भक्ति केल्यानें मोक्षप्राप्ति त्वरित होते असें त्याचे ठाम मत होते. त्यानें श्रीकृष्ण उपासना, अहिंसा, भूतदया व वैराग्य वगैरे विषयांवर लोकांस उपदेश करण्याचा उपक्रम केला. तीव्र विरक्ति सदाचारसंपन्नता, श्रीकृष्णावरील अढळ भक्ति, सर्व प्राणिमात्राविषयीं भूतदया व समाजसमता वगैरे त्याचे अंगी असलेल्या अलौकिक गुणांमुळें सर्व प्रकारच्या लोकांवर त्याची छाप ताबडतोब बसली. गौतम बुद्धाप्रमाणें लोकांच्या नेहमीच्या बोलण्याच्या भाषेंत उपदेश करण्याचा व ग्रंथ लिहिण्याचा त्यानें उपक्रम केल्यामुळें, त्याच्या मताचा फैलाव असंख्य लोकांत झाला. सनातन वैदिक धर्मांतील कांहीं विद्वान् लोक त्याचे पट्टशिष्य बनले. भागवतपुराणांतील मुख्य तत्वें या पंथास मान्य असल्यामुळें श्रीचक्रधराचा उपदेश सामान्य जनास सहज पटूं लागला. आपल्या मातृभाषेंत भागवतधर्माच्या उच्चतत्वांनें भरलेलें उपदेशामृत प्यावयास मिळाल्यामुळें, सामान्य जनास मोक्षाचेंद्वार अनायासें खुलें झालें असें वाटू लागलें. श्रीचक्रधर स्वामीचा शिष्य–सांप्रदाय फार वाढल्यामुळें दूरदूरचे लोक त्याचे अनुयायी बनले. या सांप्रदायास "**महानुभाव** अथवा **महात्मापंथ** असें नांव पडलें. या पंथाचें उपास्य दैवत

केवळ **श्रीकृष्ण** असल्यामुळें या सांप्रदायास **जयकृष्णीपंथ** असेंहि म्हणतात.

देवगिरीचा यादवराजा कान्हेर अगर कन्हरदेव हा आपला धाकटा भाऊ महादेव यांस बरोबर घेऊन श्रीचक्रधरस्वामीचे भेटीस गेला होता असा उल्लेख लीलाचरित्रांत केलेला आहे. कन्हरदेवानें स्वामीस दक्षिणा म्हणून बरेंच द्रव्य देऊं केलें असतां त्यानें तें स्वीकारण्याचें नाकारिलें. त्यामुळें स्वामींच्या निस्पृहतेबद्दल व कडकडीत वैराग्याबद्दल यादवराजाची खात्री झाली.

रामदेवराव जाधवाचे राजवटींत महानुभावपंथाचा व तत्पंथीय वाङ्मयाचा अनपेक्षित रीतीनें उत्कर्ष झाला याची कारणें पूर्वी (भा. ४ पृ. १९४-१९५ मध्यें) दिलीं आहेत. महानुभावीय ग्रंथकारांस राजाश्रय मिळाल्यामुळें त्यांनीं मराठी भाषेंत मोठ्या प्रमाणावर ग्रंथरचना केली. सदरील पंथाच्या अनुयायांमध्यें प्रतिभासंपन्न ग्रंथकार व कवि बरेच निर्माण झाले. श्रीज्ञानेश्वरमहाराजाचे जन्मापूर्वी या पंथाचा लीलाचरित्र नांवाचा धर्मग्रंथ लिहिला गेला असें म्हणतात. प्रस्तुत ग्रंथाच्या २०९ पृष्ठावर यादवकालीन महानुभावीय ग्रंथाची यादी दिली आहे तिजवरून ज्ञानेश्वरीच्यापूर्वी महानुभाव पंथाचे कांहीं ग्रंथ लिहिले गेले असावेत असें दिसतें. देवगिरीच्या यादवांचें राज्य नष्ट झाल्यावरहि या पंथांत नाणावलेलें कवि व ग्रंथकार बरेच निर्माण झाले; व त्यांनीं मराठी वाङ्मयांत चांगली भर घातली. या वाङ्मयांतील ग्रंथांची संख्या सुमारें ४ पासून पांच हजार असावी असा अंदाज आहे. व त्यांत श्रेष्ठ दर्जाचे ग्रंथ बरेच आहेत असें भावे व देशपांडे यांचे मत आहे. इ. स. १९०७ सालापर्यंत विवेकसिंधु व ज्ञानेश्वरी हे मराठी

वाङ्मयांतील आद्यग्रंथ समजले जात असत. येवढें मोठें मराठी वाङमय सुमारें ६००-७०० वर्षे कालाच्या उदरांत कसें दडून राहिलें व तें एकाएकी उजेडांत कसें आलें याबद्दल पुष्कळ लोकांस अचंबा वाटतो. प्रस्तुत लेखकाचा या प्रश्नाशीं निकट संबंध असल्यामुळें त्याचा वृत्तांत थोडक्यांत पुढें देण्यांत येत आहे. त्यावरून या प्रश्नाचा उलगडा सहज होईल.

पुणें येथील राहिवाशी ब्रह्मीभूत विष्णुबुवा जोग हे वारकरी पंथापैकीं एक प्रमुख होते. इ. स. १९०७ सालीं पूर्वखानदेशांतील एणगांव येथें एका कीर्तनप्रसंगीं त्यांनीं महानुभावपंथाच्या उत्पत्तीबद्दल, खोटसाळ विधानें करून सदरील पंथाची मोठ्या जनसमूहापुढें बदनामी केली. त्याचा सारांश असा कीं, कृष्णंभट नांवाच्या एका ब्राह्मणानें एका मांग जातीच्या स्त्रीबरोबर लग्न केलें; व या संबंधापासून त्यास चार मुलगे झाले; त्यापैकीं एकाचें नांव मांगभाव असें होतें. त्याजपासून मांगभाव–मानभाव–महानुभाव पंथाची उत्पत्ति झाली. अशा तऱ्हेची या पंथाची नालस्ती केल्यामुळें खानदेशांत महानुभाव पंथीय भिक्षूंस भिक्षा मिळण्याचें बंद झालें; व त्यांचेबद्दल लोकांचें मनांत असलेला आदर कमी झाला. महानुभावपंथातील प्रमुख मंडळीनीं विष्णुबुवा जोग ह्यांजवर जळगांव येथें मेहरबान बोलस् साहेब यांचे कोर्टांत आपल्या पंथाची बदनामी केल्याबद्दल फौजदारी खटला केला. त्याकामीं फिर्यादी महानुभावांतर्फे पुण्याचे सुप्रसिद्ध वकील कै. रा. ब. आपटे, व प्रस्तुत लेखक काम चालवीत होते. फिर्यादी तर्फेच्या साक्षीच्या यादींत लोकमान्य टिळक यांचे नांव होतें. परंतु त्यांच्या पुराव्याची जरूरी न भांसल्यामुळें कोर्टानें

जोगांवर इं. पी. कोड ५०० अन्वयें महानुभाव-पंथाची बेअब्रू केल्याबद्दलचा आरोप ठेविला. आरोपीतर्फे पुरावा घेण्याची तारीख नेमिली होती त्या दिवशीं त्यांचेतर्फे काम चालविण्यास मुंबईतील एक युरोपियन सॉलिसिटर हजर झाले. त्यांनीं इंपीरियल गॅझेटिअर व्हाल्यूम १२ पृ. ८२ मध्यें महानुभावपंथासंबंधीं सरकारी-रीत्या जी हकीकत प्रसिद्ध झाली होती ती कोर्टाच्या नजरेस आणिली. आरोपीनें केलेली विधानें या हकीकतीशीं जुळत असल्या-मुळें आरोपीस त्याचा फायदा मिळून कोर्टानें त्यास दोषमुक्त केलें. खटल्याचा निकाल झाला त्यादिवशीं विष्णुबुवा जोग यांचे नेतृत्वा-खालीं त्यांचे वारकरी अनुयायांनीं महानुभावास खिजविण्याकरितां जळगांव येथें एक प्रचंड मिरवणूक काढिली होती. सदरील खटल्याच्या प्रतिकूल निकालामुळें खानदेशांतून आपलें उच्चाटन होईल कीं काय अशी महानुभावीयांनां मोठी दहशत पडली !!

बिनसरकारी फौजदारी खटल्यांत आरोपीवर कोर्टानें आरोप ठेव-ल्यानंतर तो क्रि. प्रो. कोडच्या विवक्षित कलमाखालीं दोषमुक्त झाल्यास फिर्यादीस त्या निकालावर अपील करण्याचें कामीं कायद्याच्या फार अडचणी असतात. यामुळें जोगांच्या विरुद्ध वरिष्ट कोर्टाकडे अपील करण्यांत आलें नाहीं. पूर्व खानदेश जिल्ह्याचें त्यावेळचें कलेक्टर मेहेर-बान् सिन्कॉक्स् यांचेकडे या निकालाविरुद्ध फिर्यादीतर्फे तपासणी अर्ज करण्यांत आला होता. परंतु त्याकामीं त्यांस यश आलें नाहीं. याप्रमाणें कायद्यानें आपला बचाव करून घेण्याचे सर्व मार्ग खुंटल्यामुळें महानुभवपांची अत्यंत निराशा झाली.

इंपीरिअल गॅझेटिअर व्हा. १२ पा. ८२ मध्यें महानुभाव-पंथा-संबंधीं दिलेला मजकूर सपशेल खोटा आहे असें ठरवून त्याऐवजीं

सदरील पंथाची साधार माहिती प्रसिद्ध केल्यांवाचून या वादाचा कायमचा निकाल लागणार नाहीं अशी प्रस्तुत लेखकानें महानुभाव-पंथाचे पुढारी महंतास सल्ला दिली, व ती त्यांस पसंत पडली. हा हेतु सिद्ध व्हावा म्हणून महानुभावीय धर्मग्रंथावरून व अन्य पुराव्यानें इंपीरिअल गॅझेटिअर ज्या विद्वान् गृहस्थांच्या नेतृत्वाखालीं सरकाराकडून प्रसिद्ध केलें जात होते त्यांची खात्रीकरून देणें जरूर होते. याकामीं मदत करण्यासाठीं रामचंद्रबुवा वडगांवकर, जामोदकरबुवा वगैरे महानुभव पंथाचे पुढाऱ्यांनीं आपलेबरोबर जरूर ते ग्रंथ आणून आमचे येथें बरेचदिवस वास्तव्य केलें. त्यांच्या मदतीनें प्रस्तुत लेखकानें इंग्रजीं भाषेंत विस्तृत निबंध तयार केला. इंपीरिअल गॅझेरीअरमध्यें या पंथाबद्दल दिलेली माहिती सपशेल खोटी होती असें सदरील ग्रंथावरून आम्हांस दिसून आले.

त्यावेळीं मुंबईचे कलेक्टर ए. एम्. टी जॅक्सन या नांवाचे एक सिव्हिलीयन होते. त्यांचें संस्कृत भाषेवर प्रभुत्व असून शिवाय मराठी भाषेवर प्रेम होतें. कै. विनायकराव भावे यांचें "महाराष्ट्र कवि" ह्या नांवाचें मासिक तें मोठ्या आस्थेनें वाचीत असत. त्यांनीं उत्तरकोकणांतील folklore या नांवाचें पुस्तक मोठ्या परिश्रमानें तयार करून छापिलें. निरनिराळ्या इंग्रजीनियतकालिकांत त्यांनीं विद्वत्ताप्रचुर लेख प्रसिद्ध केले होते, त्यावरून त्यांची गणना विद्वानांत होत असे. फावल्यावेळांत प्राचीन-इतिहाससंशोधनाचें काम ते आस्थापूर्वक करीत असत. प्रस्तुत लेखकानें उपरिनिर्दिष्ट निबंध साहेबमजकुरांस दाखविला. त्यांनीं महानुभावीय मूळ ग्रंथांतील समर्पक उतारे स्वतः वांचून निबंधांतील मजकुराच्या खरेपणाबद्दल

खात्री करून घेतली. महानुभावीय वाङ्मयांत श्रीमद्भगवद्गीतेवर **कैवल्यदीपिका** या नांवाची संस्कृतांत लिहिलेली टीका आहे, ती त्यांचे अवलोकनांत आली; व ती त्यांस फार आवडली. इंपीरिअल गॅझेटिअरमधील महानुभावपंथासंबंधानें प्रसिद्ध झालेला खोडसाळ मजकूर काढून टाकण्याबद्दल त्यांनीं मे. एन्थोव्हेन् यास एक शिफारस पत्र लिहिलें. मे. एन्थोव्हेन साहेब यांनीं याकामीं बरीच सहानुभूति दाखविली. परंतु सदरील विषय ज्यास प्राचीन मराठी भाषा नीट समजत असेल त्याचा असून, आपणांस याबाबतींत कांहीं करितां येत नाहीं असे त्यानीं मोठ्या दिलगिरीनें कळविलें. नंतर सदरील लेख व महानुभावीय ग्रंथ डॉ. भांडारकर ह्यांस प्रस्तुत लेखकानें दाखवून, याकामीं मदत करण्याबद्दल त्यास विनंति केली. डॉ. रामकृष्णपंतानी आम्हीं तयार केलेलें टांचण व महानुभावीय ग्रंथ आपलेपाशीं ठेवून घेतले; व गुप्तलिपींतील मजकूर सभजून घेण्यासाठीं महानुभावीय महंतास पुणें येथें राहण्यास सांगितलें. डॉ. भांडारकरांनीं त्यांच्या ग्रंथाचें निरीक्षण करून एक स्वतंत्र लेख तयार करून तो टाईम्स ऑफ इंडियामध्यें प्रसिद्ध केला व महानुभावपंथासंबंधानें सरकारी रीतीनें प्रसिद्ध झालेली हकीकत खोडसाळ व निराधार आहे असें त्यांनीं आपलें ठाम मत दिलें. त्यांच्या परिश्रमाचें फळ मुंबई एथ्नालॉजिकल मालेंतील (Ethnological Survey Series) १३१ नंबरचा मोनोग्राफ् हें होय. सर रामकृष्ण पंत भांडारकर यांच्या परिश्रमामुळें महानुभावपंथासंबंधानें खरी व ऐतिहासिक माहिती इंपीरिअल गॅझिटिअर व्हॉ. १३ मध्यें प्रसिद्ध करण्यांत आली. याप्रमाणें महानुभाव पंथासंबंधानें जो अन्याय

करण्यांत आला होता तो दूर झाला. व त्याचा वेळीं अवेळीं बदनामी करण्यांत उद्युक्त असलेल्या विरोधी पक्षाचे तोंड कायमचे बंद झालें.

मेहरबान जॅक्सन साहेब, डॉ. भांडारकर व त्यास मदत करणारे गृहस्थ यांचे महानुभावपंथीयांनीं तत्कालीन दैनिक पत्रांतून कृतज्ञबुद्धीपूर्वक आभार मानिले. जळगांव नजिक भादली गांव आहे तेथें महानुभावपंथाचा एक मठ आहे. त्या ठिकाणीं महानुभावीय महंतांची व प्रस्तुत लेखकाची एक बैठक होऊन त्यांत महानुभावीय वाङ्मयाचें एकाद्या महाराष्ट्रभाषाभिज्ञ गृहस्थाकडून संशोधन करवून ते प्रसिद्ध करण्यांचें बहुमतानें ठरलें. व याकामीं ठाणें येथील आमचे सहाध्यायी मित्र व महाराष्ट्र भाषेचे निस्सीम भक्त कै. विनायक लक्ष्मण भावे यांचें नांव आम्हीं साहजिकच सुचविलें. विनायकराव भावे यांनीं ठाणें येथें मोठ्या परिश्रमानें मराठीग्रंथसंग्रहालयाची स्थापना करून व महाराष्ट्र कवि नांवाचें मासिक स्वतःच्या हिंमतीवर काढून मराठी भाषेविषयीं आपलें नितांत प्रेम व्यक्त केलें होतें. शिवाय पुणें येथील भारतइतिहाससंशोधकमंडळांत त्यांनीं बरेंच निबंध वाचून इतिहासिकसंशोधन भारत-इतिहास-संशोधक-मंडळाचें कामीं आपली पात्रता विद्वान् लोकांच्या निदर्शनास आणिली होती. यामुळें भादली येथें ठरलेली योजना पार पाडण्यास विनायकराव भावे हे पूर्णपणें लायक होते अशी प्रस्तुत लेखकाची प्रामाणिक समजूत होती. विनायकराव भावे यांस भादली येथील बैठकींत ठरलेली योजना प्रस्तुत लेखकानें कळविली व ती मान्य करण्याबद्दल त्यांस विनंति केली. एकाद्या मनुष्यास भूमिगतद्रव्य (Treasure Trove) हस्तगत झाल्यानें जुना

अत्यानंद होतो त्याप्रमाणें महानुभावीयवाङ्मयभांडार आपल्या हातीं आल्याबद्दल विनायकराव भावे यास आनंद झाला. भावे ह्यांनी महंत दत्तराज व इतर महंत यांच्या सहाय्यानें ह्या वाङ्मयाचें संशोधनदृष्टया निरीक्षण करून त्याबद्दल एक निबंध मुंबई येथील मराठी ग्रंथसंग्रहालयांत वाचला. त्यानीं अत्यंत परिश्रम करून हें वाङ्मय उजेडांत आणण्याचें श्रेय संपादिलें, व **महाराष्ट्र सारस्वत** ग्रंथ प्रसिद्ध करून आपली कामगिरी जगाच्या निदर्शनास आणिली. महानुभावपंथीय वाङ्मयाचें अज्ञात दालन कसें खुलें झालें याची मूळ पीठिका विस्तारपूर्वक देण्यांत विषयांतर झालें आहे याची आम्हास जाणीव आहे. परंतु ह्याबाबतींत कोणकोणाकडून कसकशी मदत झाली ह्याची साधारण कल्पना वाचकांना व्हावी म्हणून ती देण्यांत आली आहे? याबद्दल वाचक वर्गाची क्षमा मागणें जरूर आहे. कार्यकारण न्यायानें अगर स्थूल दृष्टीनें पाहिलें असतां हे वाङ्मय उजेडांत आणण्यास ब्र. भू विष्णुबुवा जोग हे कारणभूत झाले ही गोष्ट विसरता कामा नये. सर डॉ. रामकृष्ण भांडारकर ह्यांनीं ह्या पंथाच्या वाङ्मयाचें आस्थापूर्वक व सहानुभूतिपूर्वक संशोधन करून, या पंथाच्या उत्पत्तिसंबंधानें इंपीरियल गॅझेटिअरमध्यें पूर्वी प्रसिद्ध झालेला लेख निराधार व खोडसाळ असें ठरवून त्याऐवजी साधार माहिती प्रसिद्ध केली व या पंथासंबंधाने लोकांचे मनांत उत्पन्न झालेला गैरसमज दूर केला. सदरील पंथाबद्दल ऐतिहासिक माहिती प्रसिद्ध करून सर रामकृष्ण पंतांनी महानुभावीयपंथीयास कायमचें उपकृत केल्यामुळें, त्या उपकाराची फेड म्हणून त्यांनीं आपले पूर्वग्रह बाजूस ठेवून आपल्या पंथाचें वाङ्मय प्रकाशित करण्यास

आपली संमति दिली. ह्यावरून या पंथाचें वाङ्मय उजेडांत आणण्याचें मुख्य श्रेय डॉ. भांडारकर यांस देणें वाजवी आहे.

महानुभाव पंथाचा संस्थापक श्रीचक्रधर ह्याजबद्दल ऐतिहासिक माहिती उपलब्ध नाहीं. परंतु या पंथाच्या सांप्रदायिक ग्रंथात जी त्याजविषयीं माहिती दिली आहे ती कै. विनायकराव भावे ह्यांनीं आपल्या 'महाराष्ट्रसारस्वतांत' दिली आहे. तिचा सारांश येणेंप्रमाणें:—सुमारें आठशें वर्षांपूर्वी त्रिमलदेव नांवाचा राजा होऊन गेला. त्याचा प्रधान विशालदेव नांवाचा एक सामवेदी ब्राह्मण होता. त्रिमलदेव निपुत्रिक असल्यामुळें त्यानें आपलें सर्व राज्य विशालदेवास दिलें. या विशालदेवासही फार दिवस संतान नव्हतें म्हणून त्यानें श्रीदत्तात्रयाची आरधना केली. त्याच्या कृपेनें त्यास एक पुत्र झाला. त्याचें नांव त्यानें हरपाळ असें ठेविलें. तो फार तैल बुद्धीचा असून सात्विक स्वभावाचा होता. विशालदेवानें त्यास राज्यकारभार करण्याचें कामीं आपल्या मदतीस घेतलें. परंतु त्यास द्यूत खेळण्याचा नाद इतका लागला कीं त्यानें आपलेंजवळचें सर्व द्रव्य गमाविलें. हें व्यसन पुढें वाढत वाढत इतक्या थरापर्यंत गेलें कीं राज्यकारभारांत तो लक्ष घालीनासा झाला. त्यास कमलादेवी नांवाची सुशील पत्नी होती. तिला धाकदपटशा देऊन तिजकडून द्रव्य घेऊन द्यूत खेळण्याची आपली हौस पुरविण्यापर्यंत त्याची मजल गेली. अखेर तिनें आपलें जवळचें द्रव्य देण्याचें नाकारिलें. त्यामुळें त्यानें अन्नत्याग केला. त्याचा बाप विशालदेव व आई मल्हाणदेवी ह्या उभयतांनीं त्यास आपला हट्ट सोडण्याविषयीं मोठ्या काकुळतीनें सांगितलें. परंतु तो आपला हट्ट सोडिना. अखेरीस पुत्रवात्सल्यामुळें त्यास द्रव्य देऊन आपल्या

मुलाचा निदान त्या दिवसापुरता हट्ट पुरविणें त्यांना भाग झाले.

हरपाळदेव ह्यास कांहीं कालानें विरक्ति उत्पन्न होऊन त्याचे मनांत रामटेकची तीर्थयात्रा करण्याचें आलें. त्यानें आपला मनोदय आपल्या आईस कळविला. त्यावेळीं विशालदेवाचें व देवगिरीचे यादव (जाधव) याचे दरम्यान युद्ध चालूं होतें. त्यामुळें आपला राजपुत्र हरपाळदेव हा जाधवांचें तडाक्यांत सांपडेल म्हणून विशालदेवानें त्यास जाण्याची मनाई केली. परंतु हरपाळदेव रामटेक येथें जाण्याबद्दल आपला दुराग्रह सोडीना. सबब त्याजबरोबर निवडक लोक देऊन यात्रेकरूच्या साध्या पोषाकांत त्यास पाठविण्याचें त्याच्या आईबापानीं ठरविलें.रस्त्यांत त्याची व त्याजबरोबर असलेल्या निवडक लोकांची चुकामूक झाली व हरपाळदेव हा रामटेकचा रस्ता सोडून ऋद्धिपुराकडे वळला व तेथें जाऊन पोहोंचला. तो दिवस शके ११०७ विश्वावसू संवत्सर चैत्र शु. १५ होता, अशी नोंद या पंथाच्या धर्मग्रंथात आहे. त्यावेळीं ऋद्धिपूर येथें श्रीगोविंदप्रभू नांवाचा पूर्ण वैराग्यशील विद्वान ब्राह्मण अयाचित वृत्तीनें राहात होता. हरपाळानें त्यांची गांठ घेतली व त्यांच्या सन्निध तो कांहीं दिवस राहिला. श्रीगोविंदप्रभूनें, त्यास मंत्रोपदेश देऊन त्याचें नांव 'चक्रधर'असें ठेविलें. सदरील गोविंदप्रभूबद्दल थोडीशी माहिती स्थानपोथींत दिली आहे. प्रभू हें आडनांव ब्राह्मणांतही असल्यामुळें तो ब्राह्मण असावा असें वाटतें. हरपाळदेवानें कांहीं वर्षें अशा स्थितींत काढल्यावर औरंगल येथील कमलनाइक नांवाच्या एका सामवेदी ब्राह्मणाच्या मुलीबरोबर त्यानें लग्न केलें. ती फार रूपवती व विदुषी असन तिचें नांव हंसांबा असें होतें. विवाहाचा काल शके ११२२

रौद्र संवत्सर ज्येष्ट शुद्ध ७ मीस गोरज मुहूर्तावर होता. परंतु हा वैवाहिक संबंधही फार दिवस टिकला नाहीं. वैराग्याच्या भरांत चक्रधर आपलें घरदार सोडून पुनः तीर्थयात्रेस निघाला. तीर्थयात्रा करीत असतां तो एलिचपूर, (अचळपूर) येथें गेला तेथें रामदेवोराऊ दरणा या नांवाचा एक स्वतंत्र संस्थानिक होता. त्यानें देवगिरीचा यादवराजा महादेवराय ह्याचे आग्रहावरून झाडीमंडळाचे राजावर स्वारी केली होती; परंतु झाडीमंडळाच्या राजानें महादेवरायाच्या बरोबर सलोखा केल्यामुळें एलिचपूरच्या राजास परत जावें लागलें. ह्या राजाची व चक्रधराची रस्त्यांत अकस्मात गांठ पडली. चक्रधर त्याचे बरोबर एलिचपूर येथें गेला व त्यानें त्या राजाची कन्या गौरी हिजबरोबर विवाह केला. हें चक्रधराचें तिसरें लग्न होय. या लग्नाचाही शेवट दुःखपर्यवसायी झाला. अखेर चक्रधरास कायमची विरक्ति होऊन त्याचें लक्ष परमेश्वराकडे वळलें व त्यास श्रीदत्तात्रयाचा साक्षात्कार झाला. शके ११८५ च्या कार्तिक महिन्यांत सिंहराशींत गुरु असतांना त्यानें संन्यास दीक्षा घेतली. महानुभावांचा लीलाचरित्र नांवाचा धर्मग्रंथ आहे, त्यांत श्रीचक्रधराच्या तीर्थयात्रेची दरएक दिवसाची नोंद केली आहे असें म्हणतात. ही रोजनिशी प्रसिद्ध झाल्यास तत्कालीन लोकस्थितीवर बराच प्रकाश पडण्याचा संभव आहे. या रोजनिशींत श्रीचक्रधरस्वामी शके ११९४ मध्यें बद्रिकाश्रमीं कायमचा निघून गेले असें म्हटलें आहे. त्याचेबरोबर त्याचा पट्टशिष्य नागदेवाचार्य हा होता परंतु त्यास निराश होऊन परत यावें लागलें.

या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत (पृष्ठें १०० ते ११० मध्यें)

देवगिरीच्या सिंघणदेवाच्या गुजराथेवरील मोहिमेचें सविस्तर वर्णन दिलें आहे. सिंघणदेवाची कारकीर्द शके ११३२ पासून ११६० पर्यंत होती, या मोहिमेच्या वेळीं गुजराथचा राजा लवणप्रसाद हा होता, त्याला वीरधवल या नांवाचा मुलगा होता. ह्या पितापुत्रांनीं वरील मोहिमेंत पराकाष्टेचें शौर्य दाखविलें. देवगिरीच्या सिंघणराजानें गुजराथेवर दोन तीन वेळां स्वाऱ्या केल्या असाव्या,असें दिसतें. पहिल्या मोहिमेंत लवणप्रसादानें उत्तरेकडून आलेल्या परचक्रांचा मारा चुकविण्याकरितां मोठ्या मुत्सद्देगिरीनें सिंघणाबरोबर तह करून त्याची स्वारी परतविली. परंतु गुजराथेवरील दुसऱ्या मोहिमेंत सिंघणास विजयश्रीनें माळ घातली नाहीं असें दिसतें. वीरधवलाचा मुलगा विशलदेव याचे वेळचा अनहिलपट्टणचा नं. ११ चा ताम्रपट उपलब्ध आहे. त्यांत आपण सिंघणाचा पराभव केला, असे गर्वोक्तीचे उद्गार त्यानें काढले आहेत. हा विशालदेव (विसलदेव) गुजराथचे गादीवर शके ११५७ सालीं बसला. या पुस्तकाच्या ११२ पृष्टावर 'विराटपाटी चरित्र' नामक ग्रंथांतील उतारा दिला आहे. त्यावरून श्रीचक्रधराच्या चरित्रांत ज्या विशालदेवाचा उल्लेख केला आहे, तो व वीरधवलाचा मुलगा विशालदेव हे एकच असावे, यांत शंका नाहीं. अनहिलपट्टणच्या गादीचा खरा मालक भीम (दुसरा) असून लवणप्रसादानें वस्तुपाल व जैतपाल या जैन प्रधानांच्या सहाय्यानें त्यास बाजूस सारून गुजराथप्रांताचीं राज्यसूत्रें हस्तगत केलीं होतीं. हा भीम, चालुक्य कुलांतील होता व तो आपणास 'महाराजाधिराज' असें म्हणवीत असे. लवणप्रसाद हा वाघेला (व्याघ्रपाली) या क्षत्रियकुळांतील होता. व तो आपणांस 'राणक' असें बिरुद लावीत

असे. **कीर्तिकौमुदींत** गुजराथच्या चालुक्य राजांचें वर्णन दिलें असून त्यांत वस्तुपाल व जैतपाल ह्या बंधुद्वयांची भरपूर स्तुती केली आहे. वर उल्लेख केलेल्या विशलदेवास हरपाळ या नांवाचा मुलगा असल्याचें कोठें आढळून येत नाहीं. तसेंच त्रिमलदेव हा गुजराथचा राजा होता, असाही कोठें उल्लेख नाहीं. 'सिंघणदेवाच्या सेनासमुद्रास विशलदेवरूपी वडवानळानें सुकविलें' असे गर्वोक्तीचे उद्गार वर उल्लेख केलेल्या अनहिलपट्टणच्या ताम्रपटांत विशलदेवानें काढले आहेत. शिवाय कीर्तिकौमुदीवरून भृगुकच्छ (भडोच, भरवस्) हें शहर लवणप्रसादाच्या अंमलाखालीं होतें असें म्हटलें आहे. यावरून श्रीचक्रधरस्वामीचें पूर्वाश्रमीचें नांव हरपाळ असून तो गुजराथचा राजा विशालदेव याचा मुलगा होता, या हकीगतीस ऐतिहासिक आधार असल्याचें दिसून येत नाहीं. महानुभावपंथाचे सर्व ग्रंथ अद्यापि प्रकाशित न झाल्यामुळें या बाबतींत ठाम मत देणें बाजवी होणार नाहीं. महानुभावीय धर्मग्रंथांत दिलेलें श्रीचक्रधरस्वामीचें चरित्र ऐतिहासिकदृष्ट्या खरें ठरल्यास, गुजराथ-प्रांताच्या राजपुत्रानें मराठी भाषेचा अभ्यास करून शके बाराव्या व तेराव्या शतकांत मराठी वाङ्मय निर्माण करण्याचा अग्रमान मिळवावा, ही गोष्ट त्या प्रांतास भूषणावह आहे असें म्हटल्या वांचून राहवणार नाहीं.

महानुभावपंथाची धर्ममतें.

सदरील पंथाची धर्ममतें सनातन वैदिक धर्माशीं विसंगत नाहींत. श्रीकृष्ण हा पूर्णावतार असून त्याच्याखेरीज अन्यदैवत नाहीं. श्रीकृष्णाच्या अतर्क्य लीलांचे व चरित्राचें श्रवण व मनन करून त्याच्याठायीं अढळ निष्ठा ठेवल्यानें मोक्षप्राप्ति सहज होते. यज्ञयाग

प्राणिमात्रांवर दया करणें व अखिल मानवजातींत भेदाभेद न मानणें, असें गौतमबुद्धाप्रमाणें या पंथाचेंही एक तत्त्व आहे. विश्व-बंधुत्व व अहिंसा हीं तत्त्वें श्रीचक्रधरानें बुद्ध धर्मांतून घेतलीं असावीं, असें सकृद्दर्शनीं दिसतें. परंतु भागवतधर्मांत ह्या दोन तत्त्वांस प्रमुख स्थान दिलें असल्यामुळें, श्रीकृष्णाच्या उपासनेबरोबर हीं तत्त्वें त्यानें स्वीकारलीं असावीं मूर्तिपूजा त्यास संमत नव्हती. श्रीकृष्णाखेरीज श्रीदत्तात्रय या देवतेस ते पूज्य मानतात.

श्रीमद्भागवतपुराणांप्रमाणें या पंथांत श्रीकृष्णाच्या उपासनेस प्राधान्य दिलें आहे. ज्ञान, तप, वैराग्यवगैरे सहाय्यावांचून निव्वळ भक्तिमार्गानें परमेश्वराशीं सायुज्यता प्राप्त होते, अशी या पंथाची शिकवणूक आहे. श्रुति, स्मृति, आणि पुराणें यांचा उल्लेख ते आपल्या ग्रंथांत वारंवार करतात. सर्व उपनिषदांचें सार जी भगवद्गीता ती या पंथांतील लोकांस परमपूज्य असून तिजवर संस्कृतांत व मराठींत अनेक टीका या पंथाच्या अनुयायांनीं लिहिल्या आहेत, यावरून महानुभावपंथ हा वैदिक धर्माविरुद्ध नाहीं असें दिसतें. भूतदया व विश्वबंधुत्व या उदात्त तत्त्वांवर महानुभाव पंथाची उभारणी झाली असल्यामुळें वर्णाश्रमधर्म अगर चातुर्वर्ण्य त्यांस संमत नाहीं. पूर्वजन्म वगैरे सनातन धर्मांतील तत्त्वें त्यांस मान्य आहेत. आपापल्या कर्मांप्रमाणें स्वर्गाची अथवा नरकाची प्राप्ति होते व मनुष्य पूर्वकर्मानुसार याजन्मीं फळें भोगतो हीं तत्त्वें या धर्मास संमत आहेत. परमेश्वर निराकार व निर्गुण असून तो आपल्या लीलेनें सगुण होतो; माया ही निर्गुणास सगुणत्व

आणते व जीवाला जीवित्व देते; म्हणजे जीवाकडून ती सर्व कर्मे करविते, अशी त्यांचीं मतें आहेत.

भागवतांतील भिक्षुगीतेंत दिलेल्या आचारव्यवस्थेस अनुसरून श्रीचक्रधरानें आपल्या धर्माचा प्रसार करण्यासाठीं भिक्षुसंघाची स्थापना केली; व संघाच्या अंतर्व्यवस्थेसाठीं घालून दिलेली शिस्त उत्कृष्ट रीतीनें पाळली जावी म्हणून त्यानें कडक निर्बंध घातले. एखाद्या भिक्षूनें शिस्तीचें उल्लंघन केल्यास अगर दुसऱ्याची आगळीक केल्यास त्यास कडक शासन केलें जात असे. नियमबाह्य वर्तन केल्यामुळें बऱ्याच भिक्षूंना श्रीचक्रधरस्वामीनें कडक शासन केल्याची अनेक उदाहरणें या पंथाचे ग्रंथांत दिलीं आहेत.

महानुभावपंथाच्या मुख्य तत्त्वांचा स्थूलमानानें विचार केला असतां हा पंथ, भागवतपुराणांतील भागवत धर्माची सुधारलेली आवृत्ति होय, असें म्हटल्यास हरकत नाहीं. वैदिक धर्मांत मूर्ति-पूजेचा कोठेंही उल्लेख आढळत नाहीं. यावरून ती सनातन हिंदु-धर्माचें एक मुख्य अंग आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. अहिंसा व विश्वबंधुत्व ह्या तत्त्वांचा पुरस्कार भागवत पुराणांत केला असल्या-मुळें सदरीलतत्त्वें श्रीचक्रधरानें जैन अथवा बौद्ध धर्मांतून घेतलीं असें म्हणणें वाजवी होणार नाहीं. गौतमबुद्धाप्रमाणें श्रीचक्रधरानें पूर्वापार वहिवाट सोडून आपले सर्व धर्मग्रंथ लौकिक (लोकांच्या नेहमींच्या बोलण्याच्या) भाषेंत लिहिण्याचा व आपल्या धर्ममतांचा प्रसार लोकांच्या भाषेंतून करण्याचा उपक्रम केला ही गोष्ट तत्कालीन विद्वान लोकांस रुचली नसावी यांत शंका नाहीं. शिवाय, सनातन वैदिक-धर्माच्या चातुवर्ण्यव्यवस्थेस त्यानें कायमची मूठमातीं दिली.

वस्तुतः भागवतधर्माच्या श्रेष्ठ तत्वांवर उभारेलला पंथ सर्व लोकांस मान्य व्हावयास पाहिजे होता. वैष्णव व शैव या दोन पंथांपेक्षां, महानुभाव पंथाचे ध्येय व्यापक स्वरूपाचें होतें; असें असतां महानुभावपंथाचा, सनातन धर्मीय अत्यंत तिरस्कार करूं लागले, याचें आश्चर्य वाटते. याचीं कारणें निरनिराळ्या लोकांकडून वेगवेगळीं दिलीं जातात. जैन व बौद्ध हे धर्मनिरीश्वरवादी असून त्यांची अध्यात्मिक तत्त्वें सनातन वैदिक-धर्माहून कांहीं बाबतींत भिन्न आहेत यामुळें हिंदुधर्मीयांस वरील दोन धर्मांबद्दल आदर वाटत असल्यास त्याबद्दल त्यांना तात्विक दृष्ट्या कदाचित् दोष देतां येणार नाहीं. परंतु हिंदूंनां अत्यंत पूज्य अशा श्रीमद्भगवद्गीता व श्रीमद्भागवत या ग्रंथांतील उदात्त तत्वांवर उभारलेल्या पंथाविषयीं सनातन हिंदुधर्मीयांना तिरस्कार वाटावा हें मोठें गूढ आहे !! महानुभावांचे मराठी भाषेवरील अकृत्रिम प्रेम, त्यांची श्रीकृष्णावरील अचल ऊर्फ अढळ भक्ति, त्यांची अभक्ष्याभक्ष्य-सेवनपराङ्मुखता [अहिंसा], त्यांनीं मराठी भाषेंत केलेलीं अमोलिक ग्रंथरचना, तसेंच पंजाबासारख्या दूर प्रदेशांत त्यांनीं केलेला मराठीचा प्रसार, इत्यादि अनेक गोष्टीवरून हा पंथ महाराष्ट्रीयांच्या अत्यादरास पात्र व्हावयास पाहिजे होता. भावे यांनीं आपल्या 'महाराष्ट्र सारस्वत' ग्रंथांत या प्रश्नाचा व्यापक रीतीनें विचार केला असून सनातनधर्मीयांचें वर्तन याबाबतींत अक्षम्य आहे, असें आपलें स्पष्ट मत दिलें आहे. त्यांतील महत्वाचा उतारा पुढें दिला आहे:—

" हिंदुधर्म सोडून धर्मांतर केलेला कोणी परधर्मी आमच्या सभांना आणि संमेलनाला अध्यक्ष खपेल, व त्याच्या सटरफटर लेखांचें एकवेळ कोणी कौतुक देखील करील, पण त्याच्यापेक्षां शतपट सुंदर

ग्रंथरचना करणारा व आजन्म मद्यमांसापासून अलिप्त रहाणारा महानुभाव त्याठिकाणीं खपणार नाहीं, इतकी ही द्वेषाची मुळी खोल गेली आहे.....कोणीहि इसम आमचें चातुर्वर्ण्य टाकून व धर्महि सोडून बाहेर गेला तरी त्याचें तें करणें महाराष्ट्र एकवेळ सहन करील, परंतु आमच्यांत राहून आमच्या चातुर्वर्ण्यावर आघात करील तर तें मात्र महाराष्ट्रास खपणार नाहीं."

गौतमबुद्धाप्रमाणें, श्रीचक्रधरानें चातुर्वर्ण्यव्यवस्थाबद्ध हिंदु-समाजावर आघात करून अक्षम्य अपराध केला. चातुर्वर्ण्य हें हिंदु-समाजाचें व हिंदुधर्माचें मर्मस्थान आहे. त्याजवर जो आघात करील, तो हिंदुधर्माचा कट्टा शत्रू होय. वे. शा. सं. दिवेकर शास्त्री यांनीं 'आर्यांच्या जातींचें एकीकरण' या नांवाचें पुस्तक अलीकडे प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं याच विचारसरणीचा अवलंब केला आहे. वैदिकवर्णाश्रम-धर्मास जो धर्म अगर पंथ विरोध करील, तो सनातन हिंदुधर्माचा हाडवैरी आहे असें पक्कें समजावें.

महानुभावपंथांत कांहीं अनीतिवर्धक चालीरीति प्रचलित आहेत, म्हणून हिंदू त्यांचा द्वेष करितात, असें कित्येकांचें म्हणणें आहे. परंतु या म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हिंदुधर्मांत, घटकंचुकि, वाममार्ग,मुरळ्या, भाविणी वगैरे अनिष्ट प्रकार कालगतीनें घुसडले गेले आहेत तरी पवित्र अशा मूळ वैदिक धर्मास ज्याप्रमाणें कमीपणा येत नाहीं, त्याप्रमाणें महानुभावपंथांतील भिक्षुणी अथवा भिख्खुणी यांजकडून एखादेवेळीं प्रमाद घडले असल्यास, श्रीचक्रधरानें स्थापिलेल्या पंथास दूषण देणें वाजवी होणार नाहीं.

महानुभावपंथीय मराठीवाङ्मयाच्या उदयाची व त्याच्या

अव्याहत वाढीची ज्यास पूर्णपणें माहिती करून घेणें असेल, त्यानें विनायकराव भावे यांचे 'महाराष्ट्र सारस्वत' व श्रीयुत देशपांडे यांचे 'महानुभावपंथीय मराठी वाङ्मय' हे ग्रंथ अवश्य वाचावे. 'महाराष्ट्र सारस्वतांत' या पंथाची सविस्तर माहिती दिली असून त्या पंथाच्या वाङ्मयाची संक्षेप रूपानें माहिती दिली आहे. भावे यांचा महाराष्ट्र-सारस्वत ग्रंथ प्रसिद्ध होण्यापूर्वी, या पंथाचे कांहीं किरकोळ ग्रंथ सोलापूर येथें छापून प्रसिद्ध झाले होते. शिवाय १८९७ सालीं केसरी पत्रांतून महानुभाव पंथाचा व त्यांच्या वाङ्मयाचा इतिहास छापून प्रसिद्ध झाला होता. महंत दत्तराज, महत हरिराजबुवा वगैरे सुप्रसिद्ध महानुभावीय पंडितांनीं ग्रंथप्रकाशन करण्याचेकामीं आपले धार्मिक पूर्वग्रह बाजूस ठेऊन मोकळ्या मनानें भावे यांस मदत केली ही गोष्ट त्यांना भूषणावह आहे. भावे यांनीं सदरील पंथाच्या वाङ्मयाचें आस्थापूर्वक संशोधन करून व तें प्रकाशित करून महानुभावपंथीयांस व त्याबरोबरच अखिल महाराष्ट्रास व मराठी भाषेचा अभिमान बाळगणाऱ्या लोकांस कायमचें उपकृत करून ठेविलें आहे. भावे यांनीं अंगीकृत केलेलें कार्य, ठाणें येथील मराठीग्रथसंग्रहालयाचे विद्यमान चालक त्यांचे पश्चात् चालवून ठाणेकरांचे लौकिकांत भर घालीत आहेत. ही गोष्ट समाधानाची आहे. भावे यांनीं आपले हयातींत पंडित दामोदर यांचें 'वच्छहरण' व महानुभावपंथीय ग्रंथकारांची व त्यांच्या ग्रंथांची 'सूचि' असे दोन ग्रंथ प्रसिद्ध केले. कवीश्वर भास्कर यांचें 'शिशुपालवधकाव्य' मराठी ग्रंथ-संग्रहालयाच्या विद्यमानें प्रसिद्ध झालें आहे. आमचे विद्वान मित्र व व्यवसाय बंधु श्रीयुत यशवंतराव खुशाल देशपांडे यांनीं महानुभावीयग्रंथप्रकाशनाचें कार्य मोठ्या नेटानें चालविलें

आहे. **शारदाश्रम** नांवाची संस्था स्थापून तिच्या द्वारें प्राचीन मराठीवाङ्मयमाला छापण्याचें काम सदरील संस्थेमार्फत चालू आहे. व थोडक्याच कालांत नरेंद्र कवीकृत 'रुक्मिणी स्वयंवर' भास्कर कवीश्वरकृत 'एकादश स्कंध' व 'श्रीकृष्णचरित्र (गद्य)' हे ग्रंथ छापून तयार होतील, अशी उमेद वाटत आहे. देशपांडे यांनीं पंडितनारायण व्यास याचें 'श्री ऋद्धिपूरवर्णन छापून प्रसिद्ध केलें आहे. सदरील ग्रंथ, दामोदर पंडिताचें 'वच्छहरण' व कवीश्वर भास्कर याचें 'शिशुपालवध या ग्रंथावरून या पंथाचें वाङ्मय किती श्रेष्ठ दर्जाचें आहे, याची सहज कल्पना करतां येते.

श्रीचक्रधरस्वामीचे पश्चात् सुमारें ८०-९० वर्षांनीं, या पंथाचे धर्मग्रंथ वेदाप्रमाणें गुह्य मानले जावे, असे त्यावेळच्या आचार्यांनीं ठरविलें. व तेव्हांपासून महानुभावीय ग्रंथ सांकेतिक अगर गुप्त लिपींत लिहिण्यास सुरवात झाली. पहिल्या सांकेतिक लिपीस 'सकळी लिपी' असें म्हणतात. आणखी कांहीं वर्षांनी सातआठ लिपी निर्माण झाल्या त्याचीं नांवें येणेंप्रमाणें:—(२) सुंदरलिपी (३) पारमांडल्य-लिपी (४) अंक-लिपी (५) शून्य-लिपी (६) सुभद्रा-लिपी (७) श्री-लिपी वगैरे याचा परिणाम असा झाला कीं, ज्याला या लिपींची गुरुकिल्ली माहिती नाहीं त्याला हे ग्रंथ वाचणें अशक्य झालें. ही परिस्थिति या पंथाच्या मूळ संस्थापकाच्या धोरणाविरुद्ध होती. एका अक्षराऐवजीं दुसऱ्या अक्षराची योजना करून जी लिपी तयार करतात तिला सांकेतिक लिपी म्हणतात. ह्यापैकीं सकळी, सुंदरी व पारमांडल्य ह्या सांकेतिक लिपींचे कांहीं नमुने खालीं दिले आहेत.

बालबोध	सकळी	सुंदरी	पारमांडल्य
अ — —	स — —	अ — —	त
इ — —	षि — —	उ — —	दि
उ — —	ह — —	इ — —	य
क — —	य — —	न — —	१
च — —	प — —	झ — —	०
ट — —	त — —	ठ — —	३
त — —	ट — —	स — —	व
प — —	च — —	क — —	४
य — —	क — —	र — —	ढ
ल — —	ग — —	च — —	ह
व — —	ध — —	म — —	स
ह — —	इ — —	ण — —	भ

सुंदरी लिपीचा एक नमुना.

॥ ॥ श्रीज्ञन्य भयारे भवाः ॥ ॥ श्री कंज्ञनुल्षारे भवाः ॥ ॥ क्षात्रधन्सि मैयाज्ञ अेनु वोज्ञनु अेनु अवोज्ञनुः अैतास्यिमिभ शोभुः से अज्ञ ग्रामुस्सिः ॥ १ ॥

वरील उताऱ्याचें देवनागरी लिपींत रूपांतर.

॥ ॥ श्री चक्र धराये नमः ॥ ॥ श्री पंच कृष्णाये नमः ॥ ॥ ज्ञानभक्ति वैराग्य अेकु मोचकु अेकु अमोचकु अैसा त्रिविध बोधुः ते अन्य व्यावृत्तिः भागजे ॥ १ ॥

१५७ हा आंकडा महानुभावीय गुप्त लिपींत लिहिण्याची पद्धत पुढील प्रमाणेः—भूमि–बाण–निधि 'भूमि' या शब्दानें १ हा

आंकड्याचा बोध होतो; 'बाण' यानें ५ या आंकड्याचा बोध होतो (पंच-बाणस्तु बाणः); व 'निधि' यानें ७ या आंकड्याचा बोध होतो.

श्रीचक्रधराचा, नागदेवाचार्य या नांवाचा एक पट्टशिष्य होता. त्यास आद्यआचार्य म्हणत. नागदेवाचा शिष्य कवीश्वर व कवीश्वराचा परशुराम अशी आचार्यपरंपरा आढळून येते. परशुरामाचार्यानंतर या पंथांत आपसांत भांडणें सुरूं झालीं व त्यामुळें त्यांच्यांत निरनिराळीं तेरा संस्थानें उत्पन्न झालीं. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणेः—
(१) कवीश्वर (२) उपाध्ये (३) पारिमांडल्य (४) अमृते (५) मदालस (६) कुमार (७) यक्षदेव (८) दामोदर (९) हरिदेव (१०) जयदेव (११) शालकर (१२) दिवाकर (१३) महेश्वर.

महानुभाव पंथांत अस्पृश्य वर्ग खेरीज करून बाकीच्या वर्णांतील कोणत्याही इसमांस संन्यास घेतां येतो व तो महंतपदास चढतो. रोटीव्यवहार व बेटीव्यवहार या संबंधानें कोणत्याही प्रकारचे प्रतिबंध या पंथांत नाहींत. संन्यासदीक्षा घेऊन भिक्षावृत्तीनें रहाणें, हा श्रेष्ठ मार्ग मानला जातो. घरभारी अगर गृहवासी यांस या पंथाचीं मतें पाळूनही संसारांत रहातां येतें. तसेंच सनातन हिंदुधर्मांत राहूनही महानुभाव पंथाविषयीं सहानुभूति दाखविण्यास कोणत्याही प्रकारची हरकत येत नाहीं संन्यासी हे ३०० पासून ५०० पर्यंत लोकांचा संघ करून राहातात. संघाच्या मुख्याधिकाऱ्यांस महंत हें नांव आहे. त्याच्या खालच्या अधिकाऱ्यास **पंडित, कर्परी, पालेकर** अशीं अनुक्रमें नांवें आहेत. भिक्षुणींचे संघ अलग रहातात. भिक्षु-

णीसंघाच्या मुख्य अधिकाऱ्याच्या खालच्या अधिकाऱ्यांस बिडे कराई, पंडिताई, भोजनाई व कोठनाई अशीं नांवें आहेत. पट्टधारी यांस अर्घ्य-पूजेचा मान असून, याखेरीज छत्र व चामर हीं राजचिन्हें वापरण्याचा अधिकार असतो. वनधारी हे जंगलामध्यें फिरतात. जे संन्यासी वार्धक्यामुळें देशपर्यटन करण्यास अगर फिरतीवर जाण्यास नालायक असतात त्यांस मलधारी असें म्हणतात. ह्याप्रमाणें या पंथांतील समाज-रचना आहे. महानुभावी लोकांपैकीं कोणी मृत झाल्यास त्यास पुरण्याची चाल आहे . ते काळ्या अगर लाल रंगाची लुंगी परिधान करतात. मोंगल बादशहांचे कारकीर्दींत बसविलेल्या 'जिझिया' कराची त्यांस पूर्ण माफी असे. अवरंगजेब बादशहाकडून मिळविलेल्या सनदेंत 'कोणत्याही हिंदूनीं अगर ब्राह्मणांनीं त्यांस त्रास देऊं नये' अशी सक्त ताकीद देण्यांत आली आहे. यामुळें मुसलमानांच्या कृपाछत्रा-खालीं या पंथाचे लोक आहेत अशी सार्वत्रिक समजूत झाली व हिंदूंच्या द्वेषास ते पात्र झाले असें म्हणतात.

रामदेवराव जाधव याचे कारकीर्दींत महानुभावपंथीय जे ग्रंथकार होऊन गेले त्यांच्या अप्रसिद्ध ग्रंथांतील कांहीं उतारे या ग्रंथाच्या चौथ्या भागांत दिले आहेत. या पंथाच्या वाङ्मयापैकीं आतांपर्यंत जे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत, त्यावरून त्यांतील भाषा, साहित्य, विचारसरणी, प्रसाद, रस, काव्य वगैरेची चांगली कल्पना होते.

'**श्रीऋद्धिपूरवर्णन**' हें काव्य श्रीयुत यशवंतराव खुशाल देशपांडे यानीं इ. स. १९२९ सालीं प्रसिद्ध केलें. या ग्रंथास देश-पांडे यांनीं विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहिली असून त्यांत महानुभाव-पंथीयांच्या दृष्टीनें ऋद्धिपूराचें महत्व किती आहे, हें दाखविलें आहे.

याग्रंथात निरनिराळ्या स्थलांचें वर्णन देतानां कवीचें रचनाचातुर्य जागोजाग दिसून येतें. याशिवाय या ग्रंथात प्रसाद, ओज, माधुर्य वगैरे गुण ओतप्रोत भरलेले आहेत. शिवाय या पंथाचें तत्वज्ञानही संक्षेपरूपानें दिलें आहे. या ग्रंथाचा दुसरा असा विशेष आहे कीं, यांत दुर्बोध शब्दांचा अर्थ सुलभ व्हावा म्हणून त्यांत जागोजाग टिपा दिल्या आहेत. या टिपा अलिकडच्या नसून १६ व्या शतकांतील असाव्या असें दिसतें. हा ग्रंथ मराठीभाषेच्या दृष्टीनें महत्वाचा आहे. त्यांतील ठळक उतारे संक्षेपरूपानें पुढें दिलें आहेत.

सरोवर वर्णन.

तया देवऱ्यतनां जवळिकेः सरोवरें देखे सुलक्षणिकेंः
तेथ **टाहुवा** करीति चक्रवाकेः विरह कातरेंः ॥ ९१ ॥
निर्दोष निःपाप निर्मलेंः वोसंडत परिपूर्ण जळेंः
सर्वांगें जालीं वाचाळेंः कळखीं पंक्षियांचेनीः ॥ ९२ ॥
ठाइं ठाइं बरवटः निवृत मंडीत घाटः
जैसे प्रवृत्ति पाथावरि तांबटः तपोनिधिः ॥ ९३ ॥
आपुलेनि प्रसन्नपर्णेः दृष्टीसि मांडीति धरणेंः
अमृता आणीति उर्णेः गोडिया आंगचियाः ॥ ९४ ॥
जे आंचेनि चरणे पुनैतुः जगीं वाणिजेति तीर्थेः
तो देवराऽजेथूः क्रीडा करीः ॥ ९५ ॥
मंदें मळयानिळेंः झगटलें पाणी हालेंः
तें मज पां सुखें डोलेंः परम पुरुषाचेंनिः ॥ ९६ ॥
सकळ शास्त्रां विचारूः करिता नोहेचि निर्धारूः
तो तियें आपेंपरूः लाहातीं जालीं ॥ ९७ ॥

असो हे पोखरणी वावीः जेआ श्रीचरण–कमळें बरवीः
देऊनि गोसावीः बीजे करीतिः ॥ ९८ ॥
कव्हणीं सुक्षेत्र नाहीं ऐसेः जेथ फीटे भव–पाशेः
गुणिये आधिष्ठीले हृषीकेशेः ते वांचौनिया ॥ ९९ ॥
ऐसीं पवित्रें परिकरेः जियें क्रीडा–स्थानें केलीं दातारें
ते तीर्थें पांतां न स्मरेः आपण पेः ॥ १०० ॥
नाना तापीं तपतः हृदय असे जळतः
तें होए शांतः जें देखिलेआः ॥ १०१ ॥

जीवेश्वर भिन्नत्व दर्शक ओव्या.

आहोजी आइकाः केउता संबंधु रायां रंकाः
ना तरि कृपाळुवांचिया सोइरिकाः निमित्तेंवीण ॥ २८१ ॥
देऊ आत्मरमणुः मी कामबाणीं विच्छिन्नुः
देऊ सकुळ सुरशरण्युः मी हीनु बहुतें पाडेः ॥ २८२ ॥
देऊ निजानंदें तृप्तः मी क्षुत्पिपासीं ग्रस्तुः
देऊ अगाधु अलेखु अनंतुः मी अती सोच्यः ॥ २८३ ॥
देऊ परावर नायकुः मी अनादि प्रणीतु रंकुः
देवो मायापर एकुः मी नाना वस्य तीएः ॥ २८४ ॥
देऊ परात्परु तरुः मी आधेागामिया निरंतरुः
देऊ पूर्ण सुखसागरूः मी दुःखग्रस्तः ॥ २८५ ॥
देऊ अप्रेमयू अनिर्वाच्युः मी अल्प जीव शोच्यूः
ऐसाही दीनु वंच्यूः कहीं नव्हेंचि तुजः ॥ २८६ ॥
असमाना अद्वेताः केवळा घनीभूताः
तुज प्रभु पाहुनि केउताः मीं जीवुः ॥ २८७ ॥
उच्छळिंध्र आणि पूर्णचंद्रः वच्छपद के समुद्रः
पंचानन आणि दर्दुरः जेणें पाडेः ॥ २८८ ॥

शरभा आणि सुपर्णाः का रासभा आणिः ऐरावनाः
पाड कां जैसा हरिचंदनाः पुष्करेंसीः ॥ २८९ ॥
परमाणु के सुवर्णाचळुः चिंतामणिसी हरळुः
दैत्य गुरु पाहुनि उजाळुः कांइ शुक्तिखंडे ॥ २९० ॥
चक्रवाहा कां देवेंसीः केंवि कुलाळा करूं सरिसीः
तेवि तूं जगदात्मा हृषीकेशीः पाहुनि मी जीवु कांईः ॥ २९१ ॥
ऐसा अपाडेंसी हीणुः भवपाशबंध दीनुः
निर्दयो निष्ठुरु कृतघ्नुः सर्व दोषियाः ॥ ९२ ॥

'राजमठ प्रवेशवर्णन'

तैसा भरला ॐ रसुः करितां मठ प्रवेशुः
तेथ प्रमेय बोलावेया सौरसुः वाचे नाहींः ॥ ३८० ॥
तऱ्हीं आळंकारें वीणः न मिरवे काव्य लक्षणः
रत्नें नव्हाति कां पाषाणः पुन राज्या योग्य कींः ॥ ३८१ ॥
भणौनि शब्द-रत्नां सोहोज्वळाः जाउनि साहित्याचिआ वेलाउळाः
भरौनि आणै खोळाः उन्मेषांचेआः ॥ ३८२ ॥
ग्रंथु सुवर्ण मुद्रिकेंः खेवणु भाव माणिकेंः
मग दरुशना दे ॐ कवतिकेंः श्रीप्रभुरायां ॥ ३८३ ॥
काइ काज.एणेंः मठु प्रवेशिजे बोलणेंः
ते अवधारा नारायणु भणेः श्रोतेयांतेंः ॥ ३८४ ॥
व्याधा पासौनि सुटलेंः आर्तु पक्षिणीचें पीलेंः
जेवी निडी गिवीसु आलेंः जननिएतेंः ॥ ३८५ ॥
जेवी असंभवियांचें लेंकरूंः घे पयो पानी हावरूः
तै दैवदत्त क्षीरसागरूः जेवि लाहेः ॥ ३८६ ॥
साधनांचा चरीतार्थीः जैसी साध्याची प्राप्तीः
नातरि व्याधिग्रस्ता अमृतींः सौरस लाहेः ॥ ३८७ ॥

जळा बाहीरीं अवचिता: मीन पडे चडफडीता:
तो दैववशें मागौता: जळेंचि लाहे: ॥ ३८८ ॥
तेवि तिए राजभुवनीं: जो आनंद भरला मनीं:
तो कांइ एकी वाचा वाणी: प्राकृत मीं: ॥ ३८९ ॥
संभ्रमाचेनि पुरें: झांपैलीं बुद्धिचीं तीरें:
तो उत्साहो न संवरे: इंद्रिय ७० घां: ॥ ३९० ॥
मना चांचल्यता न स्फुरे: बुद्धि बोधत्व विसरे:
अहंकारु अहंत्वेसि मुरे: आपणपेंचीं: ॥ ३९१ ॥
इंद्रियें चित्रस्थें: जालीं गात्रें स्तिनितें:
हालि चालि कुंठिली जेथें: बाह्याभ्यांतरीं: ॥ ३९२ ॥

.....

भोजन पक्वान्न वर्णन.

आसन सोरठा उर्णपटीं: पुढां मांचळी चौपुटी:
वरि प्रतिष्ठीला ताटीं: वोगरीति नानापरीसीं: ॥ ५०५ ॥
देवा करितां आरोगण: पूर्णचंद्रें लाधलें रवण:
तैसे ताटाचें चोखाळपण: विस्फुर्ति देखा: ॥ ५०६ ॥
सपुर **सोजिएचें** चोखट: फेडुनि सदळ कांट:
तें कनक वर्ण वेंठ: वाढिजति **मांडेयांचे**: ॥ ५०७ ॥
निज किंकरीचिए भुकें: जे वंचिलें वंचकें:
तें पक्वान्न **पोळी** भणौनि जवळिकें: करुंनए ॥ ५०८ ॥
दोहीं मुनै सरिसे सतार: जैसे अमृताचे परांकुर:
ते मध्यें राजाऽअन्नाचे वोगर: वोळगवीतीं: ॥ ५०९ ॥

.....

पूर्ण चंद्राचेनि पाडें; वाढिजेति **शिखरणिचे** वडे
रुची छिद्रांचे परि आवडे: सर्वज्ञासि: ॥ ५१२ ॥

दृष्टि चंचल परि एकसरें: जयामाजि वावरे:
बरवा गुंपली कीन मोहरें: कांहीं केली: ॥ ५१३ ॥
मीटिमीटि स्वर्ग देवा: पाताळीं पीयूषाचा ठेवा:
भणौनि तळौनि काढिला हावा: अमृतरूप: ॥ ५१४ ॥
मोकळी मोतियें जाति पसरीं: भणौनि पायसें आळिलि या सरवळीआचीआ
क्षीरी:
वरि पंच धारगौरी: आळंगी चोखाळपणें ॥ ५१५ ॥
सुप्रभा स्नेहवशें: भीतरि पूर्णत्वें असे:
वाढितां **उदंबरें** सरिसें: पूरिकांसी: ॥ ५१८ ॥
कीं ब्रह्मण्य देवां पुढें: ब्रह्मपुरीसीं **मांडे**:
कीं कवचां लेइलीं कोडें: मीषें **पुरिकांचेनि:** ॥ ५१९ ॥
कापुर गौरी चोखट: छिद्रांची परि नव्हे नष्ट:
त्रिर्यंच नामधारी बरवंट: ब्रह्मपुरीसीं ॥ ५२० ॥
गोक्षीर धार धवळें: भीतरु भरला साकर गुळें:
कीं देवाचिये सन्निधी अमृतफळें: पावतें जालां ॥ ५२१ ॥
ताटी तेचि गगनु: वटिका पूर्णचंद्राचें मानु:
भणौनि अमृत फळें तारांगणु: सारिखी दीसेति: ॥ ५२२ ॥
नाखिवा माळतिया सळिवें: इत्यादि वळिवटू बरवें:
ताटीं वाढिति सदैवें: सेवकजनु: ॥ ५२३ ॥
सोलिवा तीळांचीं तीळुवैं: गोडी मिसळौनि सेवैं:
ते **मोदकु** आरोगितां देवें: गुळु थोडा भणे: ॥ ५२४ ॥
बहुतां छिद्रांचिया: कीं सरिया रूपेंया चिया:
तिया वाढिती **कुरवंडिया: पर्पटेंसीं:** ॥ ५२५ ॥
नानारुची केली उपेणी: कीं पाचि प्रभेची वाणी:
कीं माध्वर्यावरि **सांधनी:** अन्ये रसाची: ॥ ५२८ ॥

दोहीं विभागीं कुसंबीरी पत्र शाकेः रूप सस्नेह भर्जिकेः
अभावां मागिजेति वृथा केः सर्वज्ञ रायेः ॥ ५३० ॥
सम बुद्धि ईश्वरीः भणाल जवळि एके कां दुरिः
भणौनि **कानवले** थेटरीः भाकरी मागिजांत बळेः ॥ ५३२ ॥
दधि दुर्धे तक्रेः कढिया कालवणें विचीत्रेः
निज दृष्टी होति पवीत्रेः प्रसादा लागिः ॥ ५३५ ॥
कापुर वेलीची चोखडीः उजळिली परीवडीः
तेही सकर्पुरी वीडीः विराजिता श्रीमुखीः ॥ ५४१ ॥
जेथ लवंग जातीफळ एळाः क्कात गोळिया सुपरिमळाः
तिआं परतलिया तांवुळाः हात वोडवीती निज किंकराः ॥ ५४२ ॥

शालिवाहनशकाच्या बाराव्या शतकांत महाराष्ट्रांत कोणतीं पक्कानें प्रचारांत होतीं, ह्याचा इतिहास वरील उताऱ्यांत वाचावयास मिळतो. याशिवाय कोशिंबिरी, वडे, पापड, तांबूलविहार यांचाहि उल्लेख या उताऱ्यांत आहे. **बाणा**च्या **कादंबरींत** व मृच्छकटिक नाटकांत वर्णन केलेल्या पक्कानांची यावरून आठवण होते.

वच्छहरण.

वृंदावनाचें वर्णन.

पापिअें न देखतीं वृंदावनः जेथ अखंड असेंति सुरगण ॥
तेथ मोकारा केलासे जनांः दिव्य फल—पुष्पांचां ॥ १३१ ॥
वृंदावनाची सुनीळताः गगंणीसे प्रतिबिंबता ॥
सुमनसे उमटतः ते जैसें तारागणु ॥ १३२ ॥
कां दी असतां तारा न दिसेंः तें ऊणें फेडावेआं दोसें ॥
वनश्रिआ वेढिलें जैसेः अंबरूं नक्षत्रे सीं ॥ १३३ ॥

वनां बाहिरीली आंगीं विशाळः साल ताल तमाल ॥
आंगें जतन करीतें परिमळः ते जैंवी राखणांइतु ॥ १३४ ॥
तेआं भीतरींली ओळीः गगनचुंबितां नारिअेळी ॥
उच्चां तेआं **खर्जुरी** पोफळीः आंदौळतांती ॥ १३५ ॥
तेआं हीं आंतुली आंगींः साकरानिंबोनीं नारंगी ॥
मधुकाकडियां मातुलंगीः फनसु गंभीरी ॥ १३६ ॥
वरिखतु रसा चें वडपः तैसें निबिडतरूं द्राक्षिमंडप ॥
उघडिलें माणिका चें मोपः तैसें पक्क **दाळिंबू** ॥ १३७ ॥
कवण गणी तें **चंपकः** जेथ असांख्यातु **पाजतिक** ॥
पल्लवीतु दीसतीं **अशोकः** लक्षसंख्या ॥ १३८ ॥
जेआं कैलासीं उमावनीः अमरावतिचिअे चा **नंदन-वनीं** ॥
सकलद्वीपी चिआं वृंदावनींः रायां मुरारी चां ॥ १६० ॥
जेथ सानुरागें सु-मनसेंः मकरंदआस्वादनमिषें ॥
श्रीकृष्ण पावावेआं दी–वसेंः मुनीं षट्पदु जालें ॥ १६१ ॥
जेथ क्रीडैलु श्रीमंत–सुन्दरूः भणओनि मळयानील निरंतरू ॥
अनंगु राहिला स-परिवारूः रूपसौभाग्या लागी ॥ १६२ ॥
वेणुध्वनीं चे ओतवरूः तैसें मकरंदमत्त भ्रमरू ॥
प्रिया तें बोलांवितांतीं द्विजवरूः पंचमालांपीं ॥ १६३ ॥
देखौनी मेघ-सांवळी श्रीमूर्तीः आनंदें मयुरें नृत्ये करीती ॥
शुकसारिका सवादेतिः वेदातासिध्दान्ती ॥ १६४ ॥
वेधें एओनि वृंदावनांः आडी गातांतीं देवांगणां ॥
तेथ क्षेणु एकु श्रीकृष्णमनाः स्छीराविलें ॥ १६५ ॥
जेथ सदा ऋतु सीं ऋतु-पतीः यक्ष यक्षिणी क्रीडा करींती ॥
वन-देवतां नाचेतीः आनंदभरीतें ॥ १६६ ॥
असो हे शब्दरचनाः वर्णो नेणिजें वृंदावनां ॥

नवविधी भक्तीचें वर्णन.

जो सकळविद्यांचें जन्मस्थानः नवां रसां चें निधान ।।
तो वांचौनि सदैवुं कवीजनः आण कांई वाणीतिं ।। ४९ ।।
जेआं चां बहूंरूप खेळु खेळतांः योगिअें परमसिद्धिं पावतां ।।
ताप-त्रयो निवारितांः सकळजनां चें ।। ५० ।।
जै देऊ रास-क्रीडा खेळींविलाः तै मूर्ती शृंघारूं जालां ।।
गौळनीं विनोदें नाचविलाः तै हास्यरसू ।। ५१ ।।
जै जसोदां भेडाविलाः तै करुणारसू उठाविला ।।
विखारूं काळिआं जिंतिलाः तै रुद्रु जाला ।। ५२ ।।
मातें श्रीमुखं दाखविलेंः तै अद्भुतां सी रूप जालें ।।
विश्वरूपु प्रकटिलेः तै भयानकूं ।। ५३ ।।
जै दैत्यां करी संहारूंः तै विभत्सु अणिवारू ।।
शान्तु तो निरंतरूंः तेथ चिं असें ।। ५४ ।।
ऐसें नंवरसुं नाटकुः देऊ खेळें जन-मोहकु ।।
निज-रूपु तें ब्रह्मादिकुः ठाउकें न होअे ।। ५५ ।।

श्रीबोपदेवानें 'मुक्ताफल' ग्रंथाच्या ११ ते १९ अध्यायांत नवविधा भक्तीचें विस्तारपूर्वक वर्णन केलें आहे, तें वरील उतान्यांत सारांशरूपानें दिलें आहे.

श्रीकृष्णाच्या नामोच्चाराचें महत्व.

श्रीकृष्णगुणनामी कराल आदरूः तरि तुम्हां तुटैलु संसारू ।।
जैसां दिनकरें अंधकारूंः नासौनि जाअे ।। ३८ ।।
जैसें तरंगु सागरांः तैसें अनंतावतारूं ईश्वरां ।।
परि लीलां मांचिजे संसारांः ऐसा एक श्रीकृष्ण चि होअे ।। ३९ ।।

आतां सांडा अन्य-भजनें: कां नाइकां वेदपुराणें ॥
मुंचिजे नां आनां कव्हणें: एकु श्रीकृष्णसेवा ॥ ४० ॥
जेआं ची नामें उच्चारितु: नारद ब्रह्मानंदें पावतु ॥
तो ध्वनी आइकौनि देश-धडी होतु: महापातकें ॥ ४१ ॥
कव्हणा हीं जप-तप तीर्थें: यागदानेंव्रतां ॥
कृष्णमहिमे सीं समता: आथी चि ना ॥ ४२ ॥
तीर्थें जन्मैलीं श्रीचरणीं: सकळ देवतां जेआंची करणी ॥
तो कैवल्यनाथु श्रीचक्रपाणी जैसें तोरवें ॥ ४३ ॥
जे अज्ञानतमाची तरणी: कैवल्यपदा ची निशानी ॥
ते श्रीकृष्णकथा वत्साहरणीं: सांधीजैलु ॥ ४४ ॥

शके तेराशेपासून पुढें तीन चारशें वर्षें महाराष्ट्रांतील संत मंडमंडळीनीं भगवंताच्या नामोच्चाराचा महिमा याच रीतिनें आपल्या अधिकारयुक्त वाणीनें आपापल्या ग्रंथातून वर्णिला आहे.

शिशुपालवध कथा.

मंगलाचरण.

.....

साहित्याचेनि परिमळें: शृंगाराचेनि मेळें ॥
प्रबंधें होती मातावळें: कवी-जनांचे ॥ १५ ॥
एर्थे नाहीं नवलु: वाणितां परब्रह्म केवळु ॥
कैसें दीसतीं बोलु रसाळु: तें आइकावें श्रोता ॥ १६ ॥
मोतियांचें घोषें: रांविलें कुंकुम रसें ॥
तऱ्हीं न एति करौं सरिसें: प्रबंधें सीं ॥ १७ ॥
पांतां प्रमेयांची गोडी: अ-मृता उपजे अ-नावडी ॥
साकरेची कीजे कुरौंडी: कविता लते सीं ॥ १८ ॥

बोलु जेवि सुधारसें घोळिलें: कीं चांदिनां चुभाळिलें ॥
नां ते परिमळें वोंबिलें: चांपे याचेनि ॥ १९ ॥
पढतां श्रीकृष्ण पवाडें: ढिकसां बोलां घोंषु पडें ॥
रस रंगाचें पाहाळ उघडे: श्रोतें यांसीं ॥ २० ॥

या कथेचें महत्व.

नाते मुक्ती-वनितेची दूतिका: कीं ज्ञानांजनाची शलाका ॥
कीं कैवल्यमंदिरीची पताका: झळकतुसें ॥ २१ ॥
ना तरी शांतरसें सींपतां: साखीनली ज्ञान-लता ॥
कीं विवेकाची सौभाग्यदेवता: मूर्तिजाली ॥ २२ ॥
कीं प्रबंधवसंतीची कोकिळा: जीवु-चकोर-संजीवनी चंद्र-कळा ॥
का निम्होळ संसार-वाटेची विश्रामुशाळा: आर्त्तजनां लागी ॥ २३ ॥
कीं अ-विद्यादुर्गी अवघंडी: अवचिती मोक्षाची धाडी ॥
भणौनि विंषया चिया नायकु-वाडी पळतां दीसती ॥ २४ ॥
कीं धर्मकुढावेनि शार्ङ्गपाणी : महापातकांवरी सांधीतली सांधनी ॥
तेवीं कथा अंतःकरणी : मजे पढियासली ॥ २५ ॥

.....

(कवीश्वर-भास्कर)

ज्ञानेश्वरींतील उपमा व उत्प्रेक्षा यांचा नमुना वरील उताऱ्यांत पहावयास मिळतो. ज्ञानेश्वरकालीन वाङ्मयाचा हा एक विशेष आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं.

द्वारकेचें वर्णन.

तंवं द्वारका देखीनिली: जिआं रूपें अमरावती जिंतिली ॥
चिंतामणीचा राज-भरूं घेतली: अमरावती ॥ ३१६ ॥
जिआं सत्य-लोकु दुहऊं केला: कैलासां पाणी वाहाविला ॥

कमलविकाशा पुरतांः जेथ सदां उदैजे सविता ॥
न तपें परौताः बारां हीं मासां ॥ ३१८ ॥
अमृता चेनि वडपेंः शृंगरा चें दपनें सिंपे ॥
तो चंद्र संपूर्णरूपेंः सदा उदै जे ॥ ३१९ ॥
जेथ आनंदरसें दुलतीः अठरां हीं वंशजा जातीं ॥
दुमदुमा दाबुक वातीः संसारा वरी ॥ ३२० ॥
जेथ पांतां चहूं कडीः आठरां गाउआं बाहीरि वाडी ॥
मुदमदित भीतरीनिली वाडीः बारां गांउवें ॥ ३२१ ॥
तेथ सप्त पौळींः रत्नतेजा ची बाहाळी ॥
उच्चपणें देतीं कवळीः धूमंडळां सीं ॥ ३२२ ॥
रत्नगिरी चीं विचित्रें शिखिरेंः तैसीं आणआणी परि चीं गोपुरें ॥
तेयां भीतरीं रीगे घसरेंः वीरचूड तो ॥ ३२३ ॥
पुढां कनका चें कळसु देखिलेंः जैसें तेजा चें पाहाल उघडिलें ॥
कां आधारीं ठाणें घातीनिलेंः सूर्य्य बिंबा चें ॥ ३२४ ॥
ती नि सहस्त्रां हटवटियांः तेयां माजी तेरांशतें ती खणियां ॥
कणैरियां पांच खणियांः सतरां शतें ॥ ३२५ ॥
एसनीं सांधितां रचनाः कवतीकु होइलु मनां ॥
परि करावीसे वर्णनाः भीतरीलु वाडिअें ची ॥ ३२६ ॥
जेथ पांच लक्ष केसरादिः च्यार लक्षें कुंजरादि ॥
ऐसियां सोनेआं चां प्रसादीः गगणु झांकौळलें ॥ ३२७ ॥
मांडौनि नवरत्नां चें चीरेंः उभिलीं नंदजायांदिकें मंदिरें ॥
जिअें घडितां साधुनूक सरेंः विश्वकर्मयां ची ॥ ३२८ ॥
कापूरवाणियां चां हाटीः घेइजे पोतासा ची पेटी ॥
एकीं तारे साटीः तुकें विण ॥ ३२९ ॥
कैलासवैकुंठीं जेयां ची सिरियाणीः तिअें रत्नें विकिती कवडेनी ॥
आळोंआळिआं चिंतामणीः बोडिअें बचकूं ॥ ३३० ॥

मेणिका तारा उर्वशीः वोळी धर न लहाती कव्हणीं दीसीं ॥
ते हाटवटी वाणौ कैसीः सामाण्यु वनितां ची ॥ ३३१ ॥
चालावेआं वैराग्यमंडळांः श्रृंगारें आपुला दाखाळा पाहिला ॥
कवतिकें दाखविलाः मन्मथा सीं ॥ ३१२ ॥
कीं मदना चां मेळींः पूर्णचंद्रा ची नाइकवडी आली ॥
कीं आकाशां इड थांधिलीः कापूर केळी चां ॥ ३३३ ॥
कीं श्रृंगारा चीं बाणलिंगेः माडा वरी थापिलीं अनंगें ॥
तैसीं स्त्रीरत्नें दोहों आंगेंः देखता जाला ॥ ३३४ ॥
नवरत्नां चां चौबरांः पद्मरागा चा लंबोदरा ॥
वाटारंभी साउंबराः नाचतु दिसें ॥ ३३५ ॥
ऐसें हाट चौहटें पांतुः दळा चेनि धसरें असें जातु ॥
दरणावेआं अनंतुः मंगलमूर्ती ॥ ३३६ ॥
तव देखिलें महाद्वारः जेथ एकवीस खनां चें दामोदर ॥
उभिलें निगुतीं अरुवारः विश्वकर्मेनि ॥ ३३७ ॥
दळ बाहिरी पारुखाविलेंः रिगालां सारितु मांदियालें ॥
तंव देखीनिली राउळेंः गोपीनाथा चीं ॥ ३३८ ॥
तेथ क्षीरपुरां भ्रांतीः राजहंस स्फटिकांगणें चाटिती ॥
पाइचेआं पूसेआं क्षेंपावतीः मांजरूं जवादिअे ॥ ३३९ ॥
चंद्रकांता चेयां बाळानेयां वरीः घोंसाळेयां कांकणां चां करीं ॥
नाचवितांति विद्याधरीः मयूरां तें ॥ ३४० ॥
कनककमळां चें चारें वाटितुः मदन ॐकारा सारिखे कूजतु ॥
मुग्धागती विलासां सराऊं देतींः राजहंसां ॥ ३४१ ॥
आंगिचेनि सुगंधपणेंः कस्तुरीमृगें सी करौनि साजनें ॥
उमानिती डोळेआं ची वडीलपणेंः कृष्णकुमरी ॥ ३४२ ॥
आंगणां चें नि चोखाळपणेंः प्रतिबिंबली तारीगणें ॥
तिअें फळें भणौनिं शिहाणेंः वेचों धांवतीं ॥ ३४३ ॥

पार्जातकां चां उद्यानीं: कृष्णविरहें तातलिआं कामिनीं ॥
तिआं विजीजतीं गाभवनीं: कापूर केळीं चा ॥ ३४४ ॥
ऐसीं राउळें पाहिलीं: मग साउमां दृष्टीं सुदली ॥
तंवं सु-धर्म्म-सभा देखीनिली: यादवा चीं ॥ ३४५ ॥

(कवीश्वर-भास्कर)

श्रीकृष्णाचें स्तोत्र.

कीं कुंकुमें रावीलियां: आनंदा चियां कापडगादिया ॥
कीं रंग-दळां चाउरियां: चैतन्या चियां ॥ ३८० ॥
कीं मुक्ती चें वश्यकरण: कीं ब्रह्म-विद्ये अनुरागा चें ध्यान ॥
कीं चरतें मोक्षनिधान: मोहांधकारीं ॥ ३८१ ॥
जें योगियां चें जीवन: ब्रह्मविद्ये चें जन्मस्थान ॥
तें सुरेख दिसें चिन्ह: पद्ममुद्रें चें ॥ ३८३ ॥
जेयां चां देखौनि उमाळा: पळे महामोहा चा पाळा ॥
तो ध्वजू ढळाळा: सरळूं दिसें ॥ ३८४ ॥
जरि चैतन्यां पालवीं नीगती: वरि तारांगणें फूलेंती ॥
तरि तें नखें उपमीजेती: श्रीकृष्णाचीं ॥
गाजता कलरवीं: अरी वधूंचें वैधव्य पढवीं ॥
तो तोडरूं घवघवीं: वामचरणीं ॥ ३८८ ॥
मुक्ति चिआं पिकां दोषें: ब्रह्मपोटरिआं आलें जैसें ॥
जंधाद्वयें तैसें: गमलें मज ॥३८९ ॥
आनंदा चिआं केळीं: जरि दिसतिआं एकीं वेळीं ॥
तरि मांडियां ची जाऔळी: उपमीजेती ॥ ३९० ॥

(कविश्वर-भास्कर)

शिशुपालयुद्धवर्णन.

खवळैला कृतांतु डाडाइला: की निदुसुरा महाकाळु औसानाइला ॥
तैसा हिंहिंकारू केला: वारुवें तेणें ॥ १००५ ॥

धालाधाली चें आंग सांधौं कैसेंः चालितां बिंबु न दिसें ॥
वेगां समुद्रांचें तारूं जैसेंः पुआळितु ॥ १००६ ॥
तेयां मुरारी चे सैन्य पालाणिलेंः जैसे मूर्तिसंहारू तेजे वेठले ॥
कीं भूमी जैल लोटलः प्रलय मेघांचें ॥ १०१५ ॥
शौर्यसरितां चा ओघु सुटलाः कीं प्रलयसमुद्रा चा तुंब फूटला ॥
तैसा घसरें निगालाः दळभारूं तो ॥ १०१६ ॥
ढळतु फरारें पताकाः मिंळतु चवरें सडका ॥
मांडौ होतसें मृत्युलोकांः कुळाचळ वेन्हीं ॥ १०१७ ॥
जगचवर जगमल्लः रणसोयरे रणबागुल ॥
तोडरराजे तोडरमल्लः खांडे मडाडा ॥ १०२४ ॥
तेथ वाजती शंख काहाळाः तुररिआं तोंडी खरटिवाळा ॥
डौंडी चीं ढवंस ठोलाः वीरघंटा तांबाकिया ॥ १०२६ ॥
निशान पटहो भेरीः राअ-गिडागिडिआं रणमोहरी ॥
ऐसेंआं वाद्यंत्रां चां गजरीः पातिला रणभूमी तो ॥ १०२७ ॥
रणभूमी चा घाणा करौनि सरिसांः महाकाळु इक्षु गाळीतुसें जैसा ॥
गरगरां आतु भवंतुसें तैसाः दोहीं दळांचा ॥ १०४३ ॥
कीं दळावेआं पृथिवी चां जातांः काळरात्री वैरणें घातलें मजपांतां ॥
तेवि दोंनि दळें भिडतांः वीरां चें पीठ झालें ॥ १०४४ ॥
निशानु काहांळां ताबाकिआंः रायगिडागिडि बोबडिआं ॥
वाजतां अंबरूं जाले चिराटिआंः तिअें वेळें ॥ १०५३ ॥
जुझंतां रणीं शीणलेंः शौरें घाईं मातलें ॥
हातींचें रुधिरूं पीतांतीं तान्हैलेः तडस भणौनी ॥ १०५६ ॥
चैद्ये भालेआं ची हुली घातिलीः तिआं देवां चीं वज्रांगी फोडिली ॥
अळुमाळु चिरटी गेलीः फुण रुपे चि ना ॥ १०६५ ॥

(कवीश्वर-भास्कर)

गुरुकृपेचें महत्व.

म्हणे कैं हें बिरडे फिटेल । कैं तो स्वामी भेटेल ।
युगाहूनि वडिल । निमिषमानी ॥ ३७९ ॥
ऐसेया गुरुग्रामींचें आलें । कां स्वये गुरुनींचि धाडिलें ।
तरी गतायुष्या जोडलें । आयुष्य जैसें ॥ ३८० ॥
कां सुकतया अंकुरा । वरि पडलिया पीयूषधारा ।
ना ना अल्पोदकींचा सागरा । आला मासा ॥ ३८१ ॥
नातरी रंकें निधान देखिलें । कां आधळिया डोळे उघडले ।
भणंगाचिया आंगा आलें । इंद्रपद ॥ ३८२ ॥
तैसा गुरुकुळाचेनि नांवें । महासुखें अति थोरावें ।
जे कोडेंही पोटाळवे । आकाश कां ॥ ३८३ ॥
पै गुरुकुळीं ऐसा । आवडी जया देखसी ।
जाण ज्ञान तयापासीं । पाइकी करी ॥ ३८४ ॥
आणि अभ्यंतरिलियेकडे । प्रेमाचेनि पवाडें ।
श्रीगुरुवें रूपडें । उपासी ध्यानीं ॥ ३८५ ॥
हृदय शुद्धीचिया आवारीं । आराध्यु तो ध्रुव करी ।
मग सर्व भावेसीं परिवारीं । आपण होय ॥ ३८६ ॥
कांचैत्यन्याचिये पोवळीं । माजि आनंदाचिया राउळीं ।
श्रीगुरुलिंगा ढाळी । ध्यानामृत ॥ ३८७ ॥
उदयिजतां बोधार्का । बुद्धीची डाळ सात्त्विका ।
भरोनियां त्र्यंबका । लाखोली वाह ॥ ३८८ ॥
काळशुद्धी त्रिकाळीं । जीवदशा धूप जाळी ।
ज्ञानदीपें वोवाळी । निरंतर ॥ ३८९ ॥
सामरस्याची रससोय । अखंड अर्पितु जाय ।
आपण भराडा होय । गुरु तो लिंग ॥ ३९० ॥

नातरी जीवाचिये सेजे गुरु कांतु करूनि भुंजे ।
ऐसी प्रेमाचेनि भोजें । बुद्धी वाहे ॥ ३९१ ॥
कोणेएके अवसरीं । अनुरागु भरे अंतरीं ।
कीं तया नाम करी । क्षीराब्धी ॥ ३९२ ॥
तेथ ध्येयध्यान बहुसुख । तेचिशेषतुळिकानिर्दोख ।
वरिजळशयन देख । भावी गुरु ॥ ३९३ ॥
मग वोळगती पाय । ते लक्ष्मी आपण होय ।
गरुड होऊनि उभा राहे । आपणाचि ॥ ३९४ ॥
नाभी आपण जन्मे । ऐसें गुरुमूर्तिप्रेमें ।
अनुभवीं मनोधर्मे । ध्यानसुख ॥ ३९५ ॥
एकाधिये वेळे । गुरु माय करी भावबळें ।
मग स्तन्यसुखें लोळे । अंकावरी ॥ ३९६ ॥
नातरी गा किरीटी । चैतन्यतरुतळवटीं ।
गुरु धेनु आपण पाढीं । वत्स होय ॥ ३९७ ॥
गुरु कृपा स्नेह सलिलीं । आपण होय मासोळी ।
कोणे एके वेळीं । हेंचि भावी ॥ ३९८ ॥
गुरु कृपामृतार्चे वडप । आपणसेवावृत्तीचें होय रोप ।
ऐसेसे संकल्प । विजे मन ॥ ३९ ॥
चक्षुपक्षेंवीण । पिलूं होय आपण ।
कैसें पैं अपारपण । आवडीचें ॥ ४०० ॥
गुरुतें पक्षिणी करी । चारा घे चांचूवरी ।
गुरु तारू धरी । आपण कास ॥ ४०१ ॥
ऐसे प्रेमाचेनि थावें । ध्यानचि ध्यानातें प्रसवे ।
पूर्णसिंधू हेलावे । फुटती जैसे ॥ ४०२ ॥
किंबहुना यापरी । श्रीगुरुमूर्ति अंतरीं ।
भोगी आतां अवधारीं । बाह्यसेवा ॥ ४०३ ॥

ज्ञानेश्वरी (अध्याय ७ श्लोक ३७९ ते ४०३)

दामोदर पंडित, कवीश्वर भास्कर, नरेंद्र पंडित व ज्ञानेश्वर हे समकालीन होते. कवीश्वर भास्करानें शिशुपालकाव्य शके ११९५ त रचिलें. दामोदर पंडिताचें 'वच्छहरण' शके ११९४ ते १२२६ या सालांचे दरम्यान निर्माण झालें असावें असें **भावे** यांचें मत आहे. नरेंद्रपंडित यांचा उल्लेख पूर्वी येऊन गेला आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ शके १२१२त लिहून पुरा झाला. वर दिलेल्या उताऱ्यांवरून या सर्व कवींची काव्यरचनेची शैली एकाच प्रकारची होती असें दिसून येतें. उपमा, उत्प्रेक्षा वगैरे अलंकारांनीं काव्य सजविण्याची दरएकास आवड होती, असें त्यांच्या ग्रंथावरून स्पष्ट दिसतें. वच्छहरणांतील **वृंदावनाचें** वर्णन, शिशुपालवधांतील **द्वारकेचें** वर्णन व ऋद्धिपुरवर्णनांतील **राजमढप्रवेश** वर्णन व **पक्कान्न**वर्णन हीं प्रकरणें फार बहारीचीं आहेत. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ अध्यात्मविषयक असल्यामुळें त्यांत वर्णनात्मक भाग क्वचित् दिसून येतो. तथापि अध्यात्मासारख्या गहन व रुक्ष विषयाचें विवरण, उपमा व उत्प्रेक्षा यांच्या योगानें सुलभ करण्याची श्रीज्ञानेश्वराची हातोटी अप्रतिम आहे. हे चार ग्रंथ वाचतांना ते एकाच साच्यातून निर्माण झाले आहेत कीं काय अशी वाचकांस भ्रांति पडते ! परंतु ज्ञानेश्वरीतील मराठी भाषा तत्कालीन महानुभावीय ग्रंथांतील भाषेपेक्षां वेगळ्या स्वरूपाची आहे यांत शंका नाहीं. ज्ञानेश्वरींतील भाषा दुर्बोध वाटते;याचें कारण त्यांत तत्कालीन कोंकणी, खानदेशी ऊर्फ अहिराणी वगैरे भाषांतील शब्दांचा भरणा जास्त दिसून येतो. महानुभावीय ग्रंथांतील भाषा ज्ञानेश्वरीतील भाषेपेक्षां जास्त शिष्ट ऊर्फ नागर असून, तिच्यांत वैदर्भीरीतीची छटा जागोजाग दिसून येते. ज्ञानेश्वरीनंतर, तेरा ते सोळा शतकांत महाराष्ट्रांत जें

वाङ्मय निर्माण झालें त्यांतील भाषा नागर ऊर्फ शिष्ट आहे. चवदा, पंधरा, सोळा या शतकांतील महानुभावीय ग्रंथांचें व त्यांतील भाषेचें स्वरूप कसें होतें, या विषयीं सविस्तर वर्णन श्रीयुत यशवंतराव देशपांडे यांनीं आपल्या महानुभावीय-मराठी-वाङ्मय या ग्रंथांत दिलें आहे. वच्छहरणांतील पुढें दिलेल्या उताऱ्यावरून नागरी बोली ही किती रसपोषक आहे व हिचा काव्यांत उपयोग केला असतां सामान्य जनांचें कसें रंजन होतें, ह्याचें हुबेहुब चित्र दामोदरपंडितांनीं रेखाटलें आहे.

उपमा श्लेष वर्णुकः एहीं रंज ॐ सकळैंकु लोक ॥
कीं पवाडें संसारुमोचकः वाणी मुकुंदा चे ॥
प्राकृत जण मानवतीः तैसी ॐ ड ॐ कयासंगती ॥
कीं पढों परब्रह्माची कीर्तीः जें जीवणु संतां चे ॥
नागरीं बोलीं स्छल वाणिजे : सकल रसां तें पोखिजे ॥
कीं निरसां होऔनि श्रीकृष्णीं भजीजेः यां दों कवणु चांग ॥

ह्यावरून दामोदर पंडिताचे वेळीं म्हणजे बाराव्या शतकाचे अखेरीस मराठी भाषेचे शिष्ट व अशिष्ट असे दोन भाग अस्तित्वांत होते असें दिसून येतें बाराव्या शतकांतील मराठी भाषा इतक्या प्रौढदशेस पोंहोंचली होती, यावरून त्याकाळापूर्वी मराठींत मोठ्या प्रमाणावर ग्रंथरचना झाली असलीच पाहिजे यांत शंका नाहीं. हें सर्व वाङ्मय नष्ट व्हावें, हें महाराष्ट्राचें दुर्दैव होय ! देवगिरीच्या यादवांच्या वेळचे बहुतेक शिलालेख व ताम्रपट संस्कृत अगर कानडी भाषेंत कोरलेलें आहेत. कर्नाटक, म्हैसूर वगैरे प्रांतांत ज्या राजांचा अंमल होता, त्या राजांच्या वेळचे बहुतेक शिलालेख कानडींत आहेत व ते Rice साहेबांनीं छापले आहेत. यावरून कानडी भाषा फार प्राचीन

काळपासून दरबारी भाषा होती असें दिसून येतें. आतांपर्यंत प्रसिद्ध झालेल्या महानुभावीय ग्रंथांत श्रीकृष्णाचें चरित्र व त्याच्या लीला ह्यांसच प्राधान्य दिलेलें आहे. यावरून हें वाङ्मय एकदेशीय आहे, असें दिसतें. श्रीवल्लभाचार्य ह्यांच्या सांप्रदायांत श्रीकृष्णाच्या उपासनेस प्राधान्य दिलें आहे, त्यामुळें त्या सांप्रदायाचें वाङ्मय एकदेशीय झालें आहे. निदान या बाबतींत तरी या दोन सांप्रदायाचें परस्पराशीं बरेंच साम्य आहे. असें म्हटल्यास हरकत नाहीं. महानुभाव पंथांतील लोकांनीं आपल्या ग्रंथांची जोपासना विशिष्ट प्रकारानें केल्यामुळें त्यांचें वाङ्मय जसेच्या तसें कायम राहिलें, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

वच्छहरण, शिशुपालवध व ऋद्धिपुरवर्णन या ग्रंथांत 'ष' च्या ऐवजीं 'ख' चा उपयोग केलेला आढळून येतो. जसें, मनुख (मनुष्य), तोख (तोष), वर्खति (वर्षति) तसेंच 'ण' च्या ऐवजीं 'न' चा सर्व ठिकाणीं उपयोग केलेला दिसतो. महानुभाव पंथाचा प्रवेश पंजाबांत पंधराव्या शतकांत झाला व त्या प्रांतांत ह्या पंथाचे बरेच अनुयायी आहेत. पंथाच्या प्रसाराबरोबर मराठी भाषेचाहि प्रवेश तेथें झाला. याप्रमाणें महानुभावपंथीयांनीं महाराष्ट्र भाषेचें निशाण पंजाब व काबूल प्रांतांत मराठी राज्याचा उदय होण्यापूर्वी शेंदिडशें वर्षे अगोदर फडकाविलें, ही गोष्ट या पंथास अत्यंत भूषणावह आहे, यांत शंका नाहीं हेमाद्रीच्या हयातींत या पंथाची स्थापना होऊन, त्यांतील ग्रंथकाराकडून थोडक्या काळांत मराठींत मोठ्या प्रमाणावर प्रतिभासंपन्न वाङ्मय निर्माण व्हावें, हें एक ईश्वरी सूत्र होय, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. या पंथांतील संतोष मुनि कृष्णदास यानें शके १४८६

मध्यें ' रुक्मिणी स्वयंवर ' नामक ग्रंथ लिहिला. त्यांत त्यानें ज्ञानेश्वरीच्या धर्तीवर मराठी भाषेची स्तुती केली आहे. त्यांतील उतारा पुढें दिला आहे:—

मागा व्यासादिकी मुनी ॥ कथा बोलिलेी संसंस्कृता वानी ॥
ते आता मऱ्हाटीया भाषा करूनी ॥ सांगीजताया ॥ ४१ ॥
अपभ्रंश पीशाच जाने ॥ मागधी आनी सूरसेने ॥
संसकृत प्राकृत या षटवाणी ॥ आनीकी छपन्न भाषा ॥ ४२ ॥
या भाषाचे पाक विस्तार ॥ करावया मऱ्हाटी एक चतुर ॥
तयाचेन प्रसादे जानीजति विचार ॥ सर्व भाषाचे ॥ ४३ ॥
म्हनोनी संसकृताची टीका ॥ मऱ्हाटी म्हनीजताय आईका ॥
जैसी हेमाची मुद्रीका ॥ वरी गरूड पाच ॥ ४४ ॥
तैसी छपन्न भाषाचीय मुगटी ॥ शोभे सुहावी सुंदर मऱ्हाटी ॥
आनी संसकृत वाढवीले पोटीं ॥ वागवी पुढा करूनी ॥ ४५ ॥
जैसी स्नेहाळु जननी ॥ अपत्य वागवी करी धरूनी ॥
तैसी षट्भाषा लागुनी ॥ व्यापारवीत असे ॥ ४६ ॥
येने श्रोते कोणते ज्ञनी ॥ म्हने ती संसकृत तव देववानी ॥
ती यसी उपमाकारे सानी ॥ दीधली तुवा ॥ ४७ ॥
मऱ्हाटी स्त्रीलिंग वाक्य ॥ आनी **संसकृत** तव **नपुसक** ॥
म्हनोनि बाळकत्व आईक ॥ तयासीच साजे ॥ ४८ ॥
ऐसी ते सर्व भाषांची जननी ॥ उत्तम पवित्र मऱ्हाटी वानी ॥
आदि पुरुषें अंगी केली म्हनोनि ॥ अनीवार ब्रीदे जाली ॥ ४९ ॥

अपभ्रष्ट पैशाची, मागधी, शौरसेनी, संस्कृत, प्राकृत, व इतर अनेक छप्पन्न भाषांची जननी मराठी भाषा आहे असें वरील

उताऱ्यांत ध्वनित केलें आहे. मुसलमानी राजांच्या अमदानींत फारशी भाषेंतील बरेच शब्द मराठींत घुसले. महाराष्ट्रभाषेवरील ही आपत्ति दूर करण्यासाठीं श्रीशिवाजी महाराजांनीं आपल्या राजवटींत एक शब्दकोश तयार करविला होता ही गोष्ट सर्वश्रुत आहे.

कै. भावे ह्यांनीं प्रसिद्ध केलेल्या 'महानुभावीय कविकाव्यसूचि'-मध्यें दर्शविलेले सर्व ग्रंथ शारदाश्रमातर्फे प्रसिद्ध करण्याचें काम, आमचे मित्र श्रीयुत यशवंतराव देशपांडे यांनीं अंगीकृत केलें आहे. त्याकामीं त्यांस यश येवो, अशी परमेश्वरापाशीं प्रार्थना करून हा भाग समाप्त करितो.



भाग ८ वा.

हेमाडपंती देवळें.

विष्णुप्रीत्यै चतुर्वर्गचिन्तामण्यामजीगणत् ।
भेदान व्रतानां दानानां तीर्थाणां मोक्षवर्त्मनाम् ॥
मूर्तिप्रासादपूजानां हेमाद्रिर्गणकाग्रणीः ॥

(बोपदेवाचें "मुक्ताफल"

Where towers are crushed and unforbidden weeds
Over mutilated towers shed their seeds,
And temples doomed to milder change unfold
A new magnificence that vies with old.

words-worth.

वरील संस्कृत श्लोकांत 'प्रासाद' शब्द आहे. हेमाद्रीनें मुक्ताफल ग्रंथावर टीका लिहिली. आहे; त्यांत प्रासाद शब्दाचा अर्थ **देवकुल** म्हणजे **देवालय** असा केला आहे. त्यानें इमारती बांधण्याचे पद्धतींत महत्वाच्या सुधारणा करून शिल्पकलेंत क्रांति घडवून आणली, अशी परंपरागत समजूत आहे. हेमाद्रि हा सनातन वैदिक धर्माचा कट्टा अभिमानी होता, व या धर्माच्या अभिवृध्यर्थ त्यानें कसकसे परिश्रम केले, या विषयीं पूर्वी हकिगत येऊन गेली आहे. **चतुर्वर्गचिंतामणी**सारखा ग्रंथ लिहून हिंदुधर्मास काल-वशानें आलेली ग्लानि दूर करण्याचें श्रेय त्यानें संपादिलें. याद-वांच्या साम्राज्यांत करणाधिपाचे हुद्यावर असतांना हेमाद्रीनें राजा-श्रयाचे जोरावर जागोजाग देवालयें बांधून धर्मजागृतीचें काम नेटानें पार पाडलें.'


नगर, खानदेश, नाशिक व पुणें या चार जिल्ह्यांत, तसेंच वऱ्हाडांत व निझामच्या राज्यांतील कांहीं भागांत 'हेमाडपंती' या टोपण नावानें संबोधलेलीं असंख्य देवळें अद्याप दृष्टीस पडतात. हेमाद्रीनें उर्फ हेमाडपंतानें ज्या एका विशिष्ट रीतीनें देवालयें बांधण्याचा उपक्रम केला, तिला 'हेमाडपंती' हें टोपण नांव पडलें. हेमाद्रीच्या पूर्वी भरतखंडांत आर्यावर्त, चालुक्य, द्राविडी पल्लव, कदंब, जैन, बौद्ध, गांधार वगैरे इमारती बांधण्याच्या अनेक पद्धति अस्तित्वात होत्या. ही विशिष्ट नांवें कांहींना देशपरत्वें व कांहींना राजघराण्यांवरून पडलीं आहेत. चालुक्य घराण्याच्या राजवटींत इमारती बांधण्याची जी एक विशिष्ट पद्धति प्रचलित होती, तिला 'चालुक्य' हें नांव पडलें. तसेंच पल्लववंशीय व कदंबवंशीय राजांच्या अमदानींतील इमारती ज्या विशिष्ट पद्धतीनें बांधल्या जात, त्या अनुक्रमें 'पल्लव' व 'कदंब' या नावांनीं प्रसिद्ध आहेत. जैनधर्मीयांनीं आपल्या धर्माच्या प्रसारार्थ हिंदुस्थानांत जागोजाग जीं देवळें बांधिलीं, तीं शिल्पशास्त्रदृष्ट्या फार महत्वाचीं आहेत हीं देवालयें ज्या विशिष्ट पद्धतीनें बांधण्यांत आलीं, तिला 'जैन' पद्धति म्हणतात. अबूच्या पहाडावरील जैनांच्या देवालयांतील नक्षीकाम इतकें बहारीचें आहे कीं, त्याजबद्दल पाश्चिमात्य शिल्पशास्त्रज्ञांस अत्यंत कौतुक वाटतें. या पद्धतीस 'गुजराथी' असेंही दुसरें नांव केव्हां केव्हां देण्यांत येतें.

भरतखंडांत शिल्पशास्त्र ऊर्फ वास्तुशास्त्र फार प्राचीनकाळीं परिणतावस्थेस पोहोंचलें होतें. या शास्त्रावरील सर्व ग्रंथ संस्कृतांत

लिहिलेले आहेत. कै. वझे यांनीं, स्थापत्यशास्त्रावर संस्कृतांत लिहिलेल्या कांहीं ग्रंथांचें मराठींत रूपांतर केल्याचें समजतें.

प्रसन्नकुमार आचार्य यांनीं प्राचीन आर्यशिल्पकलेचा इतिहास लिहिला असून, या शास्त्रावरील ग्रंथकार व त्यांचे ग्रंथ याची सविस्तर सूचि तयार केली आहे. देवगिरीच्या यादवांच्या अमदानींत दक्षिणेंत जे प्रख्यात शिल्पकार निर्माण झाले, त्यांपैकीं कांहींचीं नांवें त्यानें दिलीं आहेत तीं येणें प्रमाणें:—कालिदास, जनकाचार्य, (हलेबीड येथील); थाळु (ह्याचें नांव बहाळ येथील शके ११४४ च्या शिलालेखांत दिलें आहे.); देवनाग; विधे (थे); देमोज (अल्हणदेवी येथील शिलालेखांत उल्लेखिलेला), भूतपाल, विमनस, मान, महीधर, सुभदेव, शूलपाणि (राणक), कमल, सिंगायभट्ट, झांपून, वगैरे. ह्यापैकीं सिंगायभट्टानें बुक्कराया च्या हुकुमानें **कलडि**पासून **शिखेर**तलावापर्यंत दहा मैल चुनेगच्ची पाणी नेण्याचा नळ बांधिला होता, असा उल्लेख तत्कालीन ग्रंथांत केलेला आढळतो. याशिवाय प्रसन्नकुमारानें शिल्पशास्त्रीय पारिभाषिक शब्दांचा सविस्तर कोश तयार केला आहे.

वास्तुशास्त्राचे निरनिराळे भाग असून प्राचीनकाळीं त्यांतील प्रत्येक भागावर तज्ज्ञांनीं ग्रंथ लिहिले आहेत. ह्यांपैकीं मानसार, काश्यप व अगास्ति यांनीं रचिलेलें शिल्पशास्त्र, शुक्रनीति, सुप्रभेदागम, सनत्कुमार-वास्तुशास्त्र, हस्तप्रमाण वगैरे प्रमुख ग्रंथ आहेत. शिवाय, कांहीं पुराणांत मधून मधून शिल्पशास्त्रासंबंधीं विवेचन केलेलें आढळून येतें. भरतखंडांत निरनिराळ्या वेळीं इमारती बांधण्याच्या ज्या पद्धति प्रचलित होत्या, त्यांचें सांगोपांग वर्णन



हेमाडपंती देवळाच्या पद्धतीचा नकाशा (ground-plan.)

प्रसन्नकुमारानें लिहिलेल्या शिल्पकलेच्या इतिहासांत आहे. फर्ग्युसन, बर्जेस, हावेल, व्हिंसेंट स्मिथ वगैरे आंग्लपंडितांनीं आर्यशिल्पकलेवर पूर्ण माहितीनें भरलेले ग्रंथ लिहिले आहेत. ग्रीस, ईजिप्त, अरबस्तान व मध्यएशिया या देशांतील शिल्पकलेची छाप आर्यशिल्पकलेवर दिसून येते, असें कित्येक आंग्ल-शिल्पशास्त्रज्ञांचें मत आहे. परंतु सदरील मत **हॉवेल** या आंग्ल पंडितास संमत नाहीं. आर्यशिल्पकलेचा उगम आर्यधर्माच्या भावनेंत व आर्यसंस्कृतींत झाला, असें हॅवेल साहेबांचें मत आहे. कमळ, त्यांचीं दळें (पांकळ्या), कलश, घंटा, बुद्धांचा स्तूप, यांच्या आकारावरून घुमटें, व शिखरें याची मूळ कल्पना निघाली असली पाहिजे, असें आंग्लशिल्पशास्त्रज्ञांचें मत आहे. समुद्रमंथन करतांना त्याच्या उदरांतून निघालेलें ' अमृत ' धन्वंतरीनें कलशांत घातलें म्हणून 'कलश' हा प्राचीन कालापासून पवित्र मानला जातो. पुराणांत ब्रह्मा, विष्णु व लक्ष्मी यांचा कमळाशीं निकट संबंध दर्शविला जात असल्यामुळें **कमळ** पुष्प पवित्र मानलें जातें. तसेंच कमळ, घंटा, व बुद्धांचा स्तूप ह्यांच्या आकारावरून हिंदु कारागिरांनीं घुमटाची कल्पना बसविली, असे हॅवेल साहेबांचें मत आहे. **रामेश्वर** येथील भव्य मंदिर हें द्राविडी पद्धतीचा नमुना होय. ओरिसा प्रांतांतील **भुवनेश्वरमंदिर, परमेश्वरमंदिर, राजाराणीचे मंदिर** व **सूर्यमंदिर**, हीं देवालयें **आर्यावर्त** प्रद्धतीचे नमुने आहेत. विजयानगर येथील विठ्ठलस्वामींचा मठ हा चालुक्य पद्धतीचा नमुना होय. **द्वारासमुद्र** उर्फ **हलेबीड** येथील देवालयें शिल्पकलेच्या दृष्टीनें फार प्रेक्षणीय असून तीं होयसळ यादवांनीं चालुक्य पद्धतीस थोडाबहुत फेरफार करून बांधिलीं आहेत. देवगिरीच्या यादवांचें राज्य

खानदेश व वऱ्हाड यांच्या सरहद्दीवर असल्यामुळें, हेमाडपंती पद्धतीनें बांधिलेलीं देवालयें तेथें बरींच आढळतात; परंतु या पद्धतीचा विशेष काय आहे, याबद्दल शिल्पशास्त्रावरील प्राचीन संस्कृत ग्रंथांत उल्लेख आढळून येत नाहीं. कै. वझे यांनीं प्राचीन आर्य-शिल्पशास्त्राचा परिश्रमपूर्वक अभ्यास केला होता. त्यांसही हेमाड-पंती पद्धतीचा सदरील ग्रंथांत मागमूस लागला नाहीं. त्याचप्रमाणें प्राचीन शिल्पशास्त्रांसंबंधीं आंग्ल तज्ञांनीं जे ग्रंथ लिहिले आहेत, त्यांतही या पद्धतीसंबंधानें कांहीं माहिती उपलब्ध नाहीं.

कोणतीहि इमारत बांधण्याच्या कामीं विटांचा व दगडांचा उप-योग करावा लागतो; व ते एकमेकांस घट्ट चिकटून बसले जावे म्हणून चिकणमातीचा किंवा चुन्याचा उपयोग अवश्य करावा लागतो. भूमितिशास्त्राच्या आधारें दगडाचें चिरे, काटकोन, त्रिकोण, चौकोन, वर्तुळ अशा निरनिराळ्या आकाराचे तयार करून ते एकमे-कावर कुशलतेनें बसविले असतां चुन्याच्या सहाय्याशिवाय मजबूत व फार वर्षें टिकणारी इमारत बांधतां येते ही कल्पना हेमाद्रीनें काढली अशी सार्वत्रिक समजूत आहे. हेमाडपंती देवळाचीं जीं वर्णनें वाचण्यांत येतात, त्यावरून या घाटाची देवळें, दगडाचे चिरे एकमेकावर अगर एकमेकांत विशिष्ट रितीनें बसवून चुन्याच्या सहाय्यावांचून बांधलेलीं असतात, व तीं फार वर्षें टिकतात असें दिसतें. त्रिकोण, चतुष्कोण, काटकोन, वर्तुळ, अर्धवर्तुळ वगैरे आकाराचे दगडांचे चिरे बनविण्यांत येऊन ते एकमेकांत इतक्या कुशलतेनें बसविले असतात कीं त्यामुळें इमारतीच्या दरएक भागास आधार मिळून त्यावर इमारतीचें छतही बिनधोक राहूं शकतें. याखेरीज इमारती बांधण्याच्या योजनेंत


पुढील विशिष्ट प्रकार जागोजाग आढळून येतात. बहुतेक देवळांच्या दर्शनी भागीं, भोगमंडपाची (Portico) योजना केलेली असते. तसेंच देवालयाच्या सभामंडपाकरितां वेगळे स्तंभ उभारण्यांत येऊन, शिवाय त्यांतील दरएक कोपऱ्यांत चारचार खांब चौकोन साधून उभारलेले असतात. देवळाच्या दर्शनी खांबांवर, सभामंडपांतील खांबांवर व छतावर पौराणिक काळांतील देवतांचीं चित्रें कोरलेलीं असतात. कित्येक ठिकाणीं तर बीभत्स चित्रें कोरून शिष्टाचाराचा भंग केलेला दृष्टोत्पत्तीस पडतो.

शालिवाहनाच्या बाराव्या शतकांच्या अखेरीस व तेराव्या शतकांत दक्षिणेंत जीं देवळें चुन्याच्या सहाय्याविना निव्वळ दगडाच्याच चिऱ्यांनीं बांधिलीं आहेत, व ज्यांना पुष्कळसे कंगोरे (Mouldings) असून ज्यांच्या बाहेरील व आंतील बाजूस पौराणिक काळांतील देवतांच्या मूर्ति कोरलेल्या असतात,त्यांना 'हेमाडपंती देवळें' म्हणण्याचा सर्वसाधारण प्रघात आहे. परंतु हेमाद्रीचे पूर्वी बांधलेल्या देवालयांतहि ह्या पद्धतीचा थोडाबहुत नमुना पहावयास मिळतो.निलांग व नारायणपूर येथील देवालयें शुद्ध हेमाडपंती पद्धतीचे नमुने होत. या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत पृष्ठ १०१ वर आंबे येथील शिलालेखाचें वर्णन दिलें आहे. तो शिलालेख आंबे येथील जोगाईच्या देवळांतील आहे. हें देऊळ शके ११६० पूर्वी बांधिलेलें असून त्याचा सर्वसाधारण घाट हेमाडपंती देवळासारखा आहे. हिंदुस्थानांत मुसलमानांचा अंमल झाल्यावर ज्या इमारती बांधल्या गेल्या, त्यांत प्राचीन भारतीय शिल्पकलेच्या पद्धतीचा अंगिकार केलेला दिसतो. हिंदु देवतांच्या मूर्ति खेरीजकरून, नक्षी वगैरेच्या बाबतींत हिंदी कारागिरांनीं

इमारती बांधण्याचें धोरण प्राचीन भारतीय पद्धतीवर ठेविलें होतें, असें बऱ्याच आंग्ल संशोधकांचें मत आहे.

या भागाचे अखेरीस, निजामच्या राज्यांतील नीलांग व नारायण पूर येथील हेमाडपंती पडकीं देवळें व त्यांतील नक्षीकाम यांचीं छायाचित्रें दिलीं आहेत. नं. **अ** हा नीलांग येथील देवालयाचा नकाशा (ground-plan) आहे. नीलांग हा गांव निजामच्या राज्यांत थेर्णा नदीच्या कांठीं असून एका प्रांताचें मुख्य ठिकाण आहे. त्या ठिकाणीं हेमाडपंती पद्धतीचें एक शिवालय पडक्या स्थितीत आहे. ह्या देवालयास तीन गाभारे आहेत. त्यापैकीं प्रत्येकावर एक एक शिखर होतें. हीं तिन्हीं शिखरें देवालयाच्या सभामंडपासुद्धां हल्लीं नष्ट झालीं आहेत. या देवळाचा सभामंडप ३०॥ फूट लांब-रुंद असून चौरस आहे. सभामंडपाच्या दरएक कोपऱ्यांत चार खांब, याप्रमाणें एकंदर १६ खांब आहेत. हें देऊळ बांधण्याच्या कामीं उपयोगांत आणलेला दगड काळा आहे. प्रत्येक गाभाऱ्यास नक्षीदार दरवाजा आहे. मुख्य गाभाऱ्याच्या दरवाजावरील नक्षीकाम फार बहारीचें आहे. नं. **ब** हें एका गाभाऱ्याच्या दरवाजाचें छायाचित्र आहे, या दरवाजाची उंची ५ फूट ४ इंच असून रुंदी २ फूट ७ इंच आहे. ह्याचा उंबरठा फार उंच असून त्याच्या मध्यभागाला एक पायरी आहे. या दरवाजावर देवतांचीं चित्रें आहेत, मध्यभागीं देवीचें चित्र कोरलें आहे. प्रत्येक दरवाजाच्या खालच्या बाजूस हातांत माणसाची कवटी धरलेली अशी शिवाची मूर्ती आहे. मुख्य गाभाऱ्यांत शिवाचें लिंग असून, बाकीच्या दोन गाभाऱ्यांत दगडांत कोरलेल्या शिवाच्या

प्लेट ब.



नीलिंग येथील हेमाडपंती देवळाच्या गाभाऱ्याच्या
दरवाजाचें नक्षीकाम. (छायाचित्र).

मूर्ती आहेत. या देवळाच्या चौथऱ्यावर दहाव्या शतकांतील निरनिराळें कंगोरे (mouldings) दाखविले आहेत. व दरएक गाभाऱ्याच्या दर्शनी-भागास एकेक कोनाडा आहे;व त्यांत निरनिराळ्या देवतांच्या मूर्ति बसविल्या आहेत. एका कोनाड्यांत अस्थिपंजर महाकाळी देवीची मूर्ति असून तिच्या पोटावर विंचू आहे असा देखावा दाखविला आहे. दुसऱ्या कोनाड्यांत महिषासुरीचें व तिसऱ्या कोनाड्यांत शिवाचें चित्र आहे. या शिवाय इतर बाजूंवर योगी, अप्सरा, वगैरेची चित्रें आहेत. छायाचित्र नं. **ब** वरून गाभाऱ्याच्या दरवाजावरील नक्षीकामाची थोडीबहुत कल्पना येईल.

कल्याण हें शहर चालुक्यांची दक्षिणेंतील राजधानी होती. तेथून कांहीं अंतरावर एका तलावाचे काठीं **नारायणपूर** नांवाचें एक खेडें आहे. त्या तलावास पूर्वी घाट बांधलेले असून त्यावर भव्य देवळें असावींत, असें दिसतें. हें ठिकाण चालुक्य राजघराण्याचें पवित्र ठिकाण होतें. परंतु गेल्या ६०० वर्षांत हें स्थान मुसलमानांच्या स्वाऱ्यामुळें बेचिराख झालें आहे. इ.स. १६३५ मध्यें खान दुराण ह्यानें हें खेडें हस्तगत करून लुटलें. येथील दोन देवळांचे कांहीं भाग हल्लीं अवशिष्ट आहेत. पैकीं एक जमिनदोस्त झाला आहे. याचा मध्यवर्ति सभामंडप व गाभाऱ्याचा चौथरा मात्र कायम आहे. हें देवालय नीलांग येथील देवालयाचे धर्तीवर असून हेमाडपंती पद्धतीनें बांधिलेलें होतें. काळ्या दगडाच्या चार खांबावर या देवळाचे सभामंडपाची उभारणी काटकोनी, त्रिकोनी अगर चौकोनी, दगडाचे चिरे कुशलतेनें बसवून केली आहे. या देवळाचा घाट बाराव्या शतकांतील देवालयाच्या घाटाप्रमाणें आहे, दुसरें देवालय

साधारण चांगल्या स्थितींत असून त्यावर नक्षीचे काम जास्त केलेलें आहे. या देवळांतील खांबावर व देवळाच्या बाहेरील भिंतीवर नक्षीकाम केलेलें दिसतें; परंतु भिंतीवरील चित्रें बीभत्स आहेत. या देवालयाचा सभा-मंडप खांबावर उभारलेला असून दरएक खांबाची उंची ९ फूट ६ इं. आहे. या सभामंडपांत जाण्यासाठीं तीन बाजूंनीं दर्शनी मंडप (प्रवेशमंडप) होते. परंतु उत्तर व दक्षिण बाजूकडील मंडप जमिनदोस्त झालेले आहेत. पश्चिम बाजूस देवालयाचा गाभारा असून त्यांत शिवाचें लिंग स्थापिलेलें आहे. गाभाऱ्याच्या दरवाजावर मनुष्याच्या आकृति असून शिवाय वाघ व इतर प्राण्यांचीं चित्रें कोरलेली आहेत. सभामंडपावर छत असून त्याच्या प्रत्येक कोपऱ्यास त्रिकोणाकृति चार चिरे बसविलेले आहेत. दरवाजाच्या दर्शनीपट्टीवर लक्ष्मीचें चित्र खोदलेलें आहे. तिच्या शिरोभागावर मुकुट असून प्रत्येक हातांत कमळाची कळी आहे. नक्षीकाम केलेले दगड आजूबाजूला अस्ताव्यस्त पडलेले आढळून येतात. हें देवालय निव्वळ हेमाडपंती पद्धतीनें बांधिलेलें होतें असें दिसते.

या देवस्थानाची कोणी काळजी न घेतल्यामुळें, त्याच्या भिंतींत जागोजाग झाडें रुजलीं आहेत, व त्यामुळें भिंती ठिकठिकाणीं फाटल्या आहेत. देवालयाचें शिखर पार जमीनदोस्त झालें आहे. नंबर ड छायाचित्रावरून या देवालयाच्या छतावरील नक्षीची कल्पना होते. नं. क हें येथील पडक्या देवळाच्या सभामंडपाचें छायाचित्र होय.


निझाम सरकारच्या राज्यांत पैठण वगैरे ठिकाणीं हेमाडपंती देवालयें बरींच असावीत असें दिसतें, परंतु तीं मूर्तिभंजक मुसलमानांच्या

अमदानींत नष्ट झालीं. नाशिक शहरापासून १८ मैलावर सिन्नर नांवाचें गांव आहे, हें पूर्वकालीन यादवांच्या राजधानीचें शहर होतें. त्याचे मूळचें नांव श्रीनगर हें होतें, असें व्रतखंडांतील राजप्रशस्तीवरून दिसते. त्याचे कांहीं काळानें सिंडिनेर (श्रीनगर-सिंडिनगर-सिंडिनेर) असें रूपांतर झालें असावें. हेमाडपंती पद्धतीनें बांधलेलीं बरीच देवळें या ठिकाणीं आहेत. त्यांचीं नांवें. गोंडेश्वर, ऐश्वर्येश्वर, चितळेश्वर, नागेश्वर व विठ्ठलेश्वर. पैकीं श्रीगोंडेश्वराचें छायाचित्र आमचे मित्र श्री. यशवंतराव गुप्ते यांनीं कृपा करून आम्हांस दिलें, तें नं. ३ मध्यें दिलें आहे. सदरील देवालय पूर्वकालीन यादवराजांपैकीं एकानें बांधिलें, असें म्हणतात. हें शिवालय असून आंतील शिवलिंगापुढें नंदी आहे. या देवालयाचे चार कोपऱ्यांत गणेश, नारायण, सूर्य व दुर्गा या देवता आहेत. अर्थात् तें शिवपंचायतन आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. या देवालयाचा सभामंडप उत्तम नक्षी केलेल्या चार खांबावर उभारला आहे. मध्यवर्ति सभामंडप वीस फूट उंचीचा आहे. ह्या देवालयाचा दर्शनी मंडप (भोग-मंडप) फार सुंदर असून, त्यामुळें देवालयास फार शोभा आली आहे. या देवालयाचें शिखर उत्तरेकडील देवालयाच्या शिखरांहून वेगळ्या धर्तीचें आहे.

ठाणें जिल्ह्यांतील कल्याण शहरापासून कांहीं अंतरावर अंबरनाथ नांवाचे रेल्वे स्टेशन आहे, तेथें फार प्राचीनकाळीं बांधलेलें एक देवालय आहे. त्याची बांधणी जवळ जवळ सिन्नर येथील गोंडेश्वराच्या देवालयासारखीच आहे. हें देऊळ शके ९८२ त बांधलें असावें, असें तेथील शिलालेखांवरून दिसतें. त्या देवालयांतील खांबावर व

छतावर सुंदर नक्षी खोदलेली आहे. सोरटीसोमनाथाच्या देवालयाचा घांट अंबरनाथाच्या देवळाच्या घाटासारखाच होता, असें पुराण-वस्तु-संशोधकांचें मत आहे. शिलाहारांच्या एका शिलालेखांत सोमनाथाच्या देवालयाचा व अंबरनाथाच्या देवालयाचा उल्लेख एके ठिकाणींच केलेला आहे. महंमद गझनवीनें इ. स. १०२४ त सोमनाथाच्या देवालयाचा विध्वंस केला. यावरून सोरटी सोमनाथाचें देवालय फार प्राचीनकाळीं बांधलें असावें असें दिसतें. दक्षिणेंत चालुक्यांचें राज्य फार वर्षें होतें. त्यांच्या अमदानींत गुजराथेंत व दक्षिणेंत बरीच देवालयें बांधलीं गेली. चालुक्यवंशीय राजांनीं जैनधर्मीयांचीं देवळें बांधल्याचा उल्लेख बऱ्याच ठिकाणीं आढळतो, यावरून त्यांची परधर्मसहिष्णुता दिसून येते. भरतखंडांत बाराव्या शतकांत इमारती बांधण्याच्या ज्या निरनिराळ्या पद्धति प्रचलित होत्या, त्या सर्वांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यावांचून हेमाडपंती पद्धतीची कल्पना नीट रीतीनें ध्यानांत येणें शक्य नाहीं. तोंपर्यंत ही कल्पना त्यानें नव्यानेंच शोधून काढली, असें विधान सबळ पुराव्याचें अभावीं करणें वाजवी होणार नाहीं. त्या काळांत जैनधर्मीयांनीं अबूचे पहाडावर व इतरत्र बरीच जैनमंदिरें बांधण्याचा सपाटा चालविला होता. हेमाद्रीनें राजाश्रयाचें जोरावर सनातन हिंदुधर्माच्या संरक्षणार्थ जागोजाग शिवालयें बांधिलीं. त्याकरितां विशेष पद्धतीनें देवालयें बांधण्याची त्यास जरूरी नव्हती. मात्र जैन, बुद्ध व हिंदु हे आपापल्या धार्मिकभावनांस पोषक अशा तऱ्हेचा, देवालयावर खोदावयाच्या मूर्तींत व इतर महत्त्वाच्या बाबतींत फेरफार करीत. हिंदूंच्या देवळांवर पौराणिक कालांतील देवतांचीं चित्रें कोरलीं जात, तर जैनांच्या देवळावर त्यांच्या धर्मास पोषक अशीं त्यांच्या सांप्रदायिक

प्लेट क.



नारायणपूर येथील हेमाडपंती देवळाच्या सभामंडपाचे
दगडी छतावरील नक्षीकामाचा नमुना.

ग्रंथांत वर्णन केलेल्या तीर्थंकरांची चित्रें कोरण्यांत येत असत. शिवाय हिंदुदेवालयांची घुमटें प्रायः शिखराच्या आकाराची असून त्यावर गोपुरें काढलेलीं असत. बुद्धधर्मीय लोक डोंगरांतील खडक फोडून त्यांत बुद्धभिक्षूंनां रहाण्यासाठीं विहारें तयार करीत; व त्यांत बुद्धांच्या मूर्ति कोरून धर्मप्रचाराचें काम आस्थेनें चालवीत असत. अशा तऱ्हेची विहारस्थानें त्यांनीं एल्लोरा (देवागिरीनजिक), औरंगाबाद, अंजिठा, नाशिक, जुन्नर, कान्हेरी, (ठाणें शहरानजीक) कार्ले वगैरे ठिकाणीं फार प्राचीन काळीं तयार केली. औरंगाबाद, अजिंठा, वेरूळ (एल्लोरा) वगैरे ठिकाणच्या लेण्यांवरून बौद्धांनीं शिल्पकलेंत व चित्रकलेंत सर्वांच्या पुढें अघाडी मारली होती असें दिसतें. हेमाद्रीनें अमूल्य ग्रंथरचना करून व जागोजाग देवालये बांधून हिंदु धर्माच्या अभ्युत्थानासाठीं आटोकाट प्रयत्न केले, म्हणून त्याचें नांव भरतखंडांत प्रख्यात झालें; व त्यानें बांधलेल्या देवळाच्या पद्धतीस त्यांचें नांव साहजिक पडलें. त्याच्या हयातींत बांधलेल्या इमारतीच्या धर्तीवर ज्या इमारती त्याचे पश्चात् बांधल्या गेल्या त्यांसही 'हेमाडपंती' हें नांव ओघानें प्राप्त झालें.

मेजर गिल् यानें वऱ्हाडप्रांतांत दौरा काढून हेमाडपंतीं देवळांविषयीं बरीच माहिती गोळा केली; व ती बंगाल एशियाटिक सोसायटीच्या १८७३ च्या नियतकालिकांत प्रसिद्ध केली. त्यावरून या प्रांतांत हेमाडपंती देवळें बरीच होतीं असें दिसून येतें. जयपूर-कोटली (बुलढाण्यापासून १४ मैलांवर), अमदापूर (बुलढाण्यापासून २० मैलांवर), शिरपूर (बुलढाण्यापासून ५६ मैलांवर) मेहेकर (शिरपूरपासून २० मैलांवर), लोणार (मेहेकरपासून १२

मैलांवर),धोत्रा(मेहेकरपासून ३० मैलांवर) व सातगांव(धोत्र्यापासून २४ मैलांवर) या गांवीं हेमाडपंती पद्धतीचीं देवळें अनेक आहेत. ह्या सर्व देवळांचा घाट या भागाचे शेवटीं नं.अ यांत दाखविलेल्या नकाशांतील (ground plan) नमुन्या प्रमाणें आहे. सदरील देवालय बांधण्याचे कामीं चुन्याचा बिलकूल उपयोग केलेला नाहीं. भूमितिशास्त्रास अनुसरून दगडाचे चिरे काटकोन, त्रिकोण, चतुष्कोण आकाराचे बनवून, ते कुशलतेनें एकमेकांत बिनचूक बसविले आहेत. सदरील स्थलांपैकीं **लोणार** येथें हेमाडपंती देवालयें बरीच आहेत. या देवालयांजवळ खारेपाण्याचा एक मोठा तलाव आहे. त्याबद्दल पुष्कळ दंतकथा प्रचलित आहेत. गांवाबाहेर एक सुंदर देवालय आहे. त्याजवर कोरलेलीं चित्रें फार वाखाणण्यासारखीं आहेत. देवालयावर असलेल्या बीभत्स मूर्ति मूर्तिभंजकांनीं नष्ट केल्या असाव्यात असें दिसतें. मि. लायल यांच्या मतें पुरातनपणा व कारागिरी या बाबतींत **लोणार** येथील **दैत्यसूदनाचें** देवालय फार महत्वाचें आहे. ह्या देवळाच्या भोंवतालीं एक पटांगण असून तें सर्व बाजूनीं दगडांनीं बांधलें आहे. देवळाच्या बाहेरील भागावर देवतांचीं असंख्य चित्रें कोरलेलीं दिसतात. मेहेकर येथें बालाजीची मूर्ति आहे. तिच्या प्रभावळीवर दशावताराची सुंदर चित्रें कोरलेली आहेत. ह्या मूर्तींच्या सर्व आगांवर सुंदर नक्षी काढलेली आहे. ह्यावरून तत्कालीन कारागिरीचें सौंदर्य सहज लक्षांत येते. याच ठिकाणीं पैनगंगा नदीच्या कांठीं एक इमारत आहे. ती लांब दगडी चिऱ्यांची बांधलेली असून तिच्यांत चुन्याचा बिलकूल उपयोग केलेला नाहीं. या इमारतीस लावलेले चिरे गणित व भूमितिशास्त्र यांच्या अनुरोधानें तयार केलेले दिसतात. ही

इमारत चालुक्यांच्या अमदानींत बांधली गेली असावी, असें मेजर गिल् यांचें मत आहे. या धर्तीवर बांधलेल्या इमारती गुजराथेंत कोठें कोठें पहावयास मिळतात. याशिवाय उत्तरवऱ्हाडांत, बार्शीटाकळी, पुसद, पातुर, पिंजर आणि पूर्णाकाठ वगैरे ठिकाणीं हेमाडपंती पद्धतीच्या इमारती बऱ्याच आढळतात.

वऱ्हाडांत जैनधर्मी देवळेंही बरीच आहेत. त्यांपैकीं सातपुड्यांतील मुक्तागिरी येथील धबधब्याजवळचीं देवळें व शिरपूर येथील प्रसिद्ध जैनमंदीर हीं स्थानें कारागिरीच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. एलिचपूर येथें ११ व्या शतकांत राज्य करणाऱ्या **ईल** नामक जैन राजानें बरीच देवळें बांधलीं असावी असें पुराणवस्तुसंशोधकांचें म्हणणें आहे.


दृढप्रहरापासून सोळावा पुरुष जो पांचवा भिल्लम त्यानें चौथ्या सोमेश्वर चालुक्याचें राज्य शके ११११ च्या सुमारास बुडवून देवगिरी येथें आपलें राज्य स्थापिलें. देवागिरीचे यादवराजे सनातन-धर्मी असल्यामुळें त्यांनीं विष्णु व शंकर यांचीं देवळें जागोजाग बांधिलीं. **सिंघण**देवानें आपल्या कारकीर्दीत (शके ११३२ ते ११६०) सातारा जिल्ह्यांतील खटाव तालुक्यांतील मायणी गांवीं दोन नद्यांच्या संगमावर, संगमेश्वर नांवाचें महादेवाचें देऊळ बांधिलें. याशिवाय शिखरशिंगणापुरचें देवालय, भूषणगडचा किल्ला वगैरे त्यानेंच बांधिलीं. सिंघणदेवाचे पदरीं **खोलेश्वर** या नांवाचा मोठा पराक्रमी ब्राह्मण सेनापती होता. त्यानें खानदेशांतील शेंदुरणी गांवीं खोलेश्वर नांवाचें महादेवाचें देऊळ बांधिलें. शके ११४४ त जैत्रपाळानें **बहाळ** येथें महादेवाचें देऊळ बांधिलें याखेरीज. खानदेश जिल्ह्यांत यादवकालीन विष्णूच्या अनेक

मूर्ति सांपडतात. शेंदुरणींचें त्रिविक्रमाचें मंदिर व त्यांतील मूर्ति, एरंडोलची केशवरावाची मूर्ति, शिंदखेडें तालुक्यांतील **देवाचें-विखरण,** यादवकालीन शहादें तालुक्यांतील मंदाणें, वाघणी व पारोळें वगैरे गांवांतील देवालयांमध्यें असलेल्या विष्णूच्यामूर्ति आज विद्यमान आहेत; व आणखीही मधुनमधून जमिनींत सांपडतात. पांचव्या भिल्लमापासून शेवटच्या रामदेवराव जाधवापर्यंत(म्हणजे शके ११०० पासून १२३० पर्यंतच्या कालांत) देवळें, किल्ले, पायविहीरी वगैरे असंख्य इमारती निव्वळ राजाश्रयानें बांधल्या गेल्या. याखेरीज हेमाडपंती देवालयांचा आणखी असा विशेष आहे कीं त्यांवर मूर्ती कोरलेल्या असतात. त्यावरून तत्कालीन लोक कोणत्या तऱ्हेचे पोषाख वापरीत व स्त्रिया कोणते दागिणे आंगावर घालीत वगैरे सामाजिक स्थितिदर्शक गोष्टींवर चांगला प्रकाश पडतो. हेमाडपंती देवळांत प्राचीन काळच्या बरेच लेख दृष्टोत्पत्तीस पडतात. ते लेख सुस्थितींत असून त्यांची वेळींच जोपासना न केल्यास ते नष्ट होण्याचा संभव आहे.

आमचे मित्र व सुप्रसिद्ध पुराणवस्तुसंशोधक श्रीयुत यशवंतराव गुप्ते यांनीं प्राचीन काळच्या इमारतींचें संरक्षण व संशोधन या विषयांवर कळकळीचे लेख लिहिलेलें आहेत. त्यांनीं नाशिक जिल्ह्यांतील देवळें व त्यांतील लेख यांची यादी करण्याचें काम सुरूं केलें आहे.

शालिवाहनाचे दहावे शतकांत, माळव्यांतील परमार कुळांतील प्रसिद्ध भोजराजानें, सौराष्ट्र, महाराष्ट्र, कर्नाटक वगैरे प्रांतांत अनेक देवालयें बांधल्याचा उल्लेख आढळतो. उत्तरेस हिमालयांत केदारेश्वर, दक्षिणेस हिंदुस्थानच्या टोकांस रामेश्वर, पश्चिम किनाऱ्यावर

प्लेट ड.



नारायणपूर येथील पडक्या हेमाडपंती देवालयाचें छायाचित्र.

सोमनाथ,पूर्व किनाऱ्यावर सुंडीर,अशी देवालयें बांधून शिवाय आपल्या मुख्य राजधानींत म्हणजे महाताल येथें त्यानें बरीच मंदिरें बांधिलीं. धारानगरींतील धोरेश्वराचें देऊळही त्यानेंच बांधिलें. सम्राट अशोकानें ज्याप्रमाणें आपणांस प्रिय असलेल्या बौद्धधर्माच्या आज्ञा धर्मप्रसारार्थ स्तंभावर कोरून ते स्तंभ आपल्या साम्राज्यांत जागोजाग रोवले, व आपले नांव अजरामर केलें; त्याप्रमाणेंच हेमाद्रीनें हिंदुधर्मप्रसारार्थ भरतखंडांत ठिकठिकाणीं विशिष्ट पद्धतीनें देवळें बांधून आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेविलें आहे. हेमाद्रीच्या वेळीं भरतखंडांत शिल्पकला व चित्रकला श्रेष्ठ दर्जास पोहोंचल्या होत्या, ही गोष्ट अबूच्या पहाडावरील जैनमंदिरें, हलेबीड (म्हैसूर) येथील यादव-कालीन हिंदु देवालयें, ओरिसाप्रांतांतील भुवनेश्वराचें मंदिर, एल्लोरा (देवगिरीनजीकचें) येथील हिंदु लेणी, अजंटा, व औरंगाबाद येथील बौद्धांचीं लेणीं इ. इ. यावरून सिद्ध होते.

देवगिरी नजीक एल्लोरा (Ellora एलापूर) येथें बौद्धांची व सनातनी हिंदुधर्मीयांची लेणीं जवळ जवळ आहेत. हिंदूची लेणीं 'कैलास' या नांवानें सुप्रसिद्ध आहेत. बौद्धाप्रमाणेंच, राष्ट्रकूट वंशीय राजानीं देवगिरीनजिक (एलापूर) येथें खडक फोडून हिंदु-पद्धतीचें **कैलास** या नांवाचें लेणें तयार केलें; व त्यांत पौराणिक कालांतील हिंदु देवतांचे व त्यांतील निरनिराळ्या धार्मिक प्रसंगाचे देखावे दाखविले आहेत. शिल्पशास्त्राच्या दृष्टीनें सदरील लेण्यांतील काम अत्यंत सुंदर असल्याबद्दल युरोपियन व एतद्देशीय तज्ञांचे मत आहे. दक्षिणेंत राष्ट्रकूटांचे राज्य इ. स. ६०० पासून इ. स.७५५ पर्यंत होते. या लेण्यांत राष्ट्रकूटांचे वेळचा एक

शिलालेख सुमारें २९ ओंळींचा आहे. त्याचें पंडित भगवानलाल इंद्रजित यांनीं संशोधन केलें आहे. या शिलालेखांत पहिल्या दन्तिवर्म्या (इ. स. ६०० ते ६३०) पासून तों दन्तिदुर्ग ऊर्फ दुसरा दन्तिवर्मा (इ. स. ७०० ते ७५५) याचे पर्यंत, राष्ट्रकूटवंशीय ६ राजांची वंशावळ दिली आहे. यापैकीं **कृष्णराज** हा एलापूर (एल्लोरा) येथील डोंगरी किल्ल्यांत राहत होता असा उल्लेख या शिलालेखांत आहे. यावरून देवगिरीच्या आजुबाजूचा प्रदेश, चालुक्य व राष्ट्रकूट यांच्या दरम्यानच्या लढायाचें, एकेकाळीं रणक्षेत्र होऊन राहिला होता असें दिसते. हीं हिंदुलेणीं राष्ट्रकूटांचे अमदानींत निर्माण झाली असें यावरून दिसतें.

एलापूर अथवा एल्लोरा येथील लेण्यांचे सविस्तर वर्णन या पुस्तकांत देणें शक्य नाहीं. परंतु या लेण्याचे प्रामुख्यानें ६ भाग करतां येतील ते येणें प्रमाणें; (१) रावणाचा खै; (२) दशावतार गुहा; (३) कैलास अथवा रंगमहाल; (४)लंकेश्वर;(५) रामेश्वर आणि (६) दुमार लेणें; त्यांतील पुढें दिलेले देखावे, शिल्पशास्त्रांच्या दृष्टीनें अत्युत्कृष्ट आहेत असें तज्ञांचें मत आहे:–(१) चतुर्भुज शिव व पार्वती खेळत आहेत अशावेळीं रावण आपल्या मस्तकावर कैलास घेत आहे; (२) सहा हाताचा कृष्ण गोवर्धनपर्वत उचलित आहे त्यावेळचा देखावा; (३) चार हत्ती आपल्या सोंडेतून लक्ष्मीवर पाणी टाकीत आहेत (४) विष्णूच्या हातांत कमळ व त्रिशूळ असून त्याच्या उजव्या हातांतील पदार्थ एक मोठा पक्षी खात आहे. या लेण्यांत बऱ्याच खिडक्या असून एक भाग दुसऱ्या भागास जोडण्या-साठीं पूल केले आहेत. शिवाय यांत अनेक सुंदर सभामंडप दाखविले आहेत. पैकीं लंकेश्वरातील सभामंडप ३१ फूट लांब, २६ फूट रुंद, व १०॥ फूट उंच आहे. हा सभामंडप चार खांबावर उभारलेला

आहे व त्यांचे कोपऱ्यांत चार ब्रॅकेटस् (घोडे) दिलेले आहेत. हेमाडपंती देवाळांतील सभामंडप या धर्तीवर बांधलेले आहेत, असें दिसतें.

हेमाद्रीच्या नजरे समोर हिंदु कारागीरीचा उत्तम नमुना असतांना त्यास नवे शोध लावण्याची गरज नव्हती. तत्कालीन कारागिरानीं त्यावेळीं प्रचलित असलेल्या शिल्पकलेच्या निरानिराळ्या पद्धति आपले नजरे समोर ठेवून हेमाद्रीच्या इच्छेप्रमाणें थोड्याबहुत फेरफारानें देवालयें बांधिली असावीत. असें दिसतें. भारतीय प्राचीन शिल्पकलेचें सांगोपांग अध्ययन केल्यावांचून, यादवांचे राजवटींत हेमाद्रीनें पूर्वी कधीही अस्तिवांत नसलेली अशी नवी पद्धति शोधून काढली असें विधान करणें इतिहासाच्या दृष्टीनें वाजवी होणार नाहीं. हेमाडपंती पद्धतीप्रमाणें, दगडाचे चिरे एकमेकांत कुशलतेनें बसविल्यानें बांधकामांत चुना अगर इतर मसाला वापरण्याचें कारण राहिलें नव्हतें; व इमारती थोड्या खर्चांत मजबूत व टिकाउ अशा तयार हाऊं लागल्या यांत शंका नाहीं. ही योजना हेमाद्रीनें नव्यानें अंमलांत आणली अशी परंपरागत समजूत आहे. हेमाद्रीच्या काळांत इमारती बांधण्याच्या द्राविडी, चालुक्य, जैन, वगैरे ज्या पद्धति प्रचारांत होत्या, त्यांच्या अंतरबाह्य रचनेंत त्यानें कोणतें फेरफार केलें याचा शास्त्रीय रीत्या निर्णय करणें ही गोष्ट शिल्पशास्त्रज्ञांच्या कार्यक्षेत्रांतील होय.


जैनधर्मीयांनीं आपल्या धर्माच्या प्रसारार्थ जागोजाग देवळें बांधिली व त्याचा प्रतिकार करण्यासाठीं हेमाद्रीनें राजाश्रयाच्या जोरावर हजारों हिंदु देवालयें बांधून स्वधर्माचें रक्षण केलें. या त्याच्या सत्कृत्यामुळें प्राचीन शिल्पकलेंतील सूक्ष्म भेदांकडे लक्ष न देतां सर्वसाधारण लोक एकंदर हिंदु देवालयानां **हेमाडपंती** या टोपण नांवानें संबोधूं लागले असें दिसतें.

भाग ९ वा.

उपसंहार.

हेमाद्रिसंबंधानें जितकी माहिती उपलब्ध झाली, तितकी मागील आठ भागांत देण्याचा आम्हीं प्रयत्न केला आहे. देवगिरीचे यादवांच्या राज्यांत लागोपाठ तीन राजांच्या कारकीर्दीत त्यानें करणाधिपाचें काम केलें यावरून तो मोठा राजकार्यपटु होता, ही गोष्ट निर्विवाद होय. त्याचा **चतुर्वर्गचिंतामणि** हा ग्रंथ, हिंदुधर्मविषयक बाबतींतील Encyclopædia म्हणजे एक प्रचंड ज्ञानकोशच होय. श्रुति, स्मृति, **इतिहास, पुराणें**, धर्मशास्त्र, मिमांसा व न्याय ह्या विषयांवरील ग्रंथाचा त्यानें चांगला अभ्यासकेला होता, ही गोष्ट त्याच्या सदरील ग्रंथावरून निदर्शनास येते. आमचे व्यवसायबंधु व सन्माननीय मित्र श्रीयुत काणे ॲडव्होकेट यानीं 'हिंदुधर्मशास्त्राचा इतिहास' या नांवाचा पूर्ण माहितीनें भरलेला व विद्वत्ताप्रचुर ग्रंथ लिहिला असून त्यांत हिंदुधर्मशास्त्रावरील ग्रंथांचें सांगोपांग विवेचन केलें आहे. सदरील ग्रंथांत त्यांनीं हेमाद्रि व माधवाचार्य यांची तुलना अनुक्रमें कॅस्टॉर (Castor) व पोलक्स (Pollux) यांजबरोबर केली आहे. शिवाय हेमाद्रीचा, पूर्वमीमांसाशास्त्रावरील ग्रंथाविषयींचा व्यासंग दांडगा होता, असें त्यानीं म्हटलें आहे. मीमांसाशास्त्रांतील विविध न्यायांचा सांगोपांग अभ्यास केल्यावांचून हेमाद्रीनें, श्राद्ध व कालनिर्णय या विषयांतील वादग्रस्त मुद्यासंबंधीं केलेलें विवेचन नीट समजणें शक्य नाहीं, असें श्रीयुत काणे यांचें मत आहे. हेमाद्रीनें आपल्या ग्रंथांत उल्लेखिलेल्या धर्मशास्त्रकारांचा व त्यांच्या ग्रंथांचा

प्लेट ई.



सिन्नर (नाशिक जिल्हा) येथील गोंडेश्वराचें देवालय.

निर्देश या पुस्तकांत (पृ. ३७-३८) पूर्वी केलेला आहे. हेमाद्रीच्या मतें, कोणत्याहि शाखेच्या ब्राह्मणास, इतर शाखा, कल्प, गृह्यसूत्रें, स्मृति व पुराणें यांत सांगितलेल्या श्राद्धविषयक नियमाप्रमाणें श्राद्ध करण्यास हरकत नाहीं. एका वेदाच्या शाखेंतील इसमास, दुसऱ्या वेदाच्या शाखेंतील इसमाबरोबर (जर ते भरतखंडांतील एकाच देशांतील रहिवाशी असतील तर,) बेटीव्यवहार करण्यास हरकत नाहीं, असें हेमाद्रीनें आपलें मत दिलें आहे. (आर्यावर्तेषु च समान-देशवासिनां नानाशाखाध्यायिनाममप्युपलभ्यन्त एव परस्परमनवगी-यमानाः सर्वतो विवाहसंबन्धाः। .... अतो न कन्यादाने नापि हविर्दाने स्वशाखीयद्विजानियम इति सिद्धम्। परिशेष खंड ३-१. पा. २८१.) ह्यावरून वैवाहिकसंबंधाचे बाबतींत त्याची दृष्टि बरीच व्यापक होती, असें दिसून येतें. **हिंदुधर्मशास्त्राचे** बाबतींत **हेमाद्रीचा व्रतखंड** प्रमाणभूत ग्रंथ आहे असें **माधवाचार्यानें** आपल्या कालनिर्णयग्रंथांत म्हटलें आहे. पहिला **बुक्कराय** याचा मुलगा भास्कर ऊर्फ भवदुर ह्यानें शके १२९१ (इ. स. १३६९) च्या शिलालेखांत असें म्हटलें आहे कीं, हेमाद्रीच्या दानखंडाच्या अनुरोधानें राजा दानकृत्यें करीत आहे. (हेमाद्रिकृतिमार्गेण कुर्व-न्दानान्यनेकशः।). यावरून **तेलंगणांतही** हेमाद्रीचा ग्रंथ धर्मविषयक बाबतींत आधारभूत मानला जात असे, असें दिसतें. **अन्नवेम**च्या शके १३०० च्या **वनपाली** ताम्रपटांत असें म्हटलें आहे कीं, हेमाद्रीच्या ग्रंथान्वयें जो व्रतवैकल्यें नियमानें पाळीत असे, त्यासच अन्नवेमराजा दानधर्म करी. शके १३४४ च्या सनदेप्रमाणें पेत्त-कोमटी-वेम हा हेमाद्रीनें सांगून दिलेल्या मार्गाप्रमाणें दानधर्म करण्याचें कामीं नेहमीं दक्ष असे. (हेमाद्रिकल्पोदितदानदक्षः।)*.

शके ११९४ च्या ओवळें येथील ताम्रपटांत (पृ. १४२), हेमाद्रि हा देवगिरीच्या यादवांच्या राजवटींत **हस्तिपकाध्यक्षाच्या** हुद्यावर होता असें म्हटलें आहे. हस्तिपक म्हणजे महात. त्यांच्यावरील मुख्य अधिकाऱ्यास हस्तिपकाध्यक्ष असें म्हणत. यावरून हस्तिदलाच्या सेनाधिपतीचें काम हेमाद्रीकडे होतें असें दिसतें. भरतखंडांत युद्धाचे कामीं हत्तींचा उपयोग प्रामुख्यानें केला जात असे, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. आपल्या राज्याच्या बळकटीकरितां हत्ती बाळगणें हा प्रत्येक राजाचा धर्म आहे, असें प्राचीन ग्रंथांत म्हटलें आहे. **पालकाप्य** नांवाच्या ऋषीनें '**हस्त्यायुर्वेद**' नांवाचा एक विस्तृत ग्रंथ लिहिला आहे, त्यांत हत्तींची लक्षणें, त्यांचा युद्धाचे कामीं होणारा उपयोग, त्यांचे रोग व त्यांची चिकित्सा, व त्यावर उपाय वगैरे विविधविषयांचें विवेचन केलें आहे. **पालकाप्य** ऋषीनें, **चंपा** नगरीचा राजा **अंग** यास, हत्तींची जोपासना करणें हा एक राज-धर्म आहे, असा सदरील ग्रंथांत उपदेश केला आहे. त्यांतील आशय येणें प्रमाणें:–

हेमाद्रि हस्तिपकाध्यक्ष

ज्या राजाच्या पदरीं हत्ती असतात, त्याच्या राज्यास चांगली शोभा येते. प्रत्येक राजानें आपल्या पदरीं हत्ती बाळगून त्यांची जोपासना केली पाहिजे. माणसाळलेला हत्ती ऋषीप्रमाणें शांत असतो; पण जर कां तो एकदां पिसाळला तर तो राक्षसासारखा भयंकर भासतो. कितीहि विपन्न स्थिति प्राप्त झाली तरी पाळलेला हत्ती आपल्या पालकास दगा देत नाहीं. पदार्थ कितीहि कठीण असला, तरी तो सहज लीलेनें फोडतो; म्हणून त्यास वज्रांची उपमा दिली आहे. हत्ती हे आपल्या राजाच्या सैन्याचें रक्षण करून, शत्रूच्या सैन्याचें निर्दालन करतात.

(१) गजस्थः शोभते नृपः (२) भंजने मर्दने चैव नागा वज्रोपमाः

युद्धशास्त्रानुरोधानें हत्ती एका रांगेनें उभे केल्यास ते किल्ल्याच्या तटाचें कार्य करतात. ज्याप्रमाणें पाण्याच्या कितीही जोराच्या प्रवाहास पूर्ण हटवितो, त्याप्रमाणें हत्ती हे शत्रूच्या सैन्याची पिछेहाट करतात. एका हत्तीची शक्ती सहा हजार घोड्यांच्या शक्तीबरोबर आहे. अर्थात् हत्ती नजीक येतांच घोडे निरुत्साह होऊन परत फिरतात. लढाईत हत्ती शस्त्रास्त्रांचे आघात सहन करतात. दरेक मनुष्यास मरणोत्तर ज्या गती प्राप्त होतात, त्यांत ज्याप्रमाणें **मोक्ष** श्रेष्ठ आहे, सर्व वेदांत ज्याप्रमाणें **श्रुति** श्रेष्ठ आहे, सर्व भूतमात्रांत ज्याप्रमाणें **कृष्ण** श्रेष्ठ आहे, त्याप्रमाणें हत्ती हा सर्व वाहनांत श्रेष्ठ आहे. ज्याप्रमाणें मेरुपर्वतानें पृथ्वीला, चंद्रामुळें रात्रीला, विद्येमुळें नराला शोभा येते त्याप्रमाणें हत्तीमुळें सैन्याला शोभा येते.

याप्रमाणें हत्तींची प्रशंसा केल्यावर गजसेनेवर जे अधिकारी नेमावयाचे त्यांचीं लक्षणें दिलीं आहेत. त्यानंतर गजाध्यक्षांचीं लक्षणें सांगितलीं आहेत. त्यांतील कांहीं लक्षणें येणेंप्रमाणें:—

"गजायुर्वेदांत प्रत्येक गजाध्यक्ष प्रवीण असून शिवाय तो व्युत्पन्न असला पाहिजे. तो धार्मिक वृत्तीचा असून मितभाषणी असला पाहिजे. तो गणितज्ञ असून यज्ञकर्मात निष्णात ब्राह्मण असला पाहिजे."(भिषिग्विनीतो मेधावी ग्रंथार्थप्रतिपत्तीमान) संतोषावाचून सौख्याची किंमत नाहीं, राजावांचून राष्ट्राची किंमत नाहीं; विश्वासाच्या अभावीं मित्राची किंमत नाहीं; त्याप्रमाणेंच हत्तीवांचून सैन्याची किंमत नाहीं. ज्याप्रमाणें उत्तम शिलामुळें (स्त्रीच्या) रूपाला शोभा येते, पवित्र आचरणानें कुळाला शोभा येते, फुलामुळें अरण्याला शोभा येते; त्याप्रमाणें हत्तीमुळें सैन्याला शोभा येते. हत्तीसारखा मित्र नाहीं, हत्तीसारखा बंधु नाहीं, हत्तीसारखा योद्धा नाहीं.

स्मृताः (३) घटाभिरचिता नागाः प्राकाराः इव दुर्जयाः (४) दर्पिताः प्रतिबन्धति सेतुबन्ध-इवार्णवे (५) मोक्षात्परा गतिर्नास्ति नास्ति वेदात्परः श्रुतिः ॥ नास्ति कृष्णात्परं भूतं नास्ति यानं गजात्परम् । गजाध्यक्षेण ॥

हेमाद्रिचे आंगीं वर नमूद केलेले सर्व गुण वास करीत असल्यामुळें हस्तिपकाध्यक्षाचे जागीं त्याची नेमणूक करण्यांत आली असावी असें दिसतें !

हेमाद्रीच्या काळीं पुढील नाणीं चालूं होतीं, असें यादवकालीन शिलालेख व ताम्रपट यांवरून दिसून येतें.शके ११९५ च्या पंढरपूरच्या शिलालेखांत ज्या नाण्यांचा उल्लेख केलेला आढळतो, तीं येणें प्रमाणें:—**गद्याान** हें नाणें गुजरांथेंत गध्यान अथवा गधिया या नांवानें प्रसिद्ध आहे. हें नाणें सोन्याचें असून त्याचें वजन एक तोळा असे. त्याची किंमत पंधरा किंवा साडे पंधरा रुपये असावी, असें दिसतें. गद्यानापेक्षां कमी किंमतीच्या नाण्यांस **कशुत्रि, धष्ट, महाजनि** वगैरे नांवें असून त्यांचा उल्लेख सदरील शिलालेखांत केलेला आहे (परिशिष्ट नं. ९) याशिवाय द्राम-द्रम्य-दाम हें नाणेंहि प्रचारांत होतें.

यादवकालीन नाणीं

पाटणच्या शिलालेखांत **आसु**नामक एका नाण्याचा उल्लेख केलेला आहे. हें नाणें सोन्याचें असावें, असें दिसतें. या व्यतिरिक्त, **चामी** म्हणजे चामड्यावर राजाचिन्हें कोरलेलीं करन्सीची [Currency] पद्धति हेमाद्रीचे वेळीं प्रचलित होती, असें ज्ञानेश्वरीवरून दिसतें. शके १३३६ च्या महजरांत पिछोडीच्या हक्काचा जो तपशील दिला आहे,पृ.२४३-२४४ त्यांत फद्या (किंमत ४ पै), टक्का [किंमत २ फदे], रुपया, होन [एक सोन्याचें नाणें] यांचा उल्लेख आहे. ह्याच महजरांत पायली [धान्य मोजण्याचें माप] व बिघा [जमिनीचें क्षेत्रमापन करण्याचें प्रमाण] यांचाहि उल्लेख केलेला आहे.

आमचे मित्र कै. चांदोरकर वकील यांनीं भा. इ. सं. मंडळाच्या सातव्या वर्षाच्या त्रैमासिकांत देवागिरीचे यादव हे गौळी

देवगिरीचे राजे अभीर होते काय?

उर्फ अभीर होते, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न एका विस्तृत लेखांत केला आहे; व आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ महाभारत व पुराणें यांतील बरेच उतारे त्यांनीं दिले आहेत. शिवाय, पूर्वकालीन यादवांपैकीं सेऊणचंद्रानें आपल्या राज्याचा विस्तार खानदेशांत वाढविला यामुळें आपल्या मतास बळकटी येते, असें त्यांनीं म्हटलें आहे. खानदेशांत अभिराणी उर्फ अहिराणी भाषा शके २०० च्या सुमारास म्हणजे मराठीच्याहि पूर्वी खानदेशांत निर्माण झाली, अशाबद्दल त्यांनी विस्तृत विवेचन केलें आहे. परंतु खुद्द **भागवत** पुराणांत **अभीर** ही एक विशिष्ट जाति असल्याबद्दलचा उल्लेख केलेला आढळतो. सिंघणाच्या वेळच्या **आंबे** येथील शिलालेखांत **अभीर** राजा **लक्ष्मीदेव** यांचें कुळ सिंघणदेवाचा ब्राह्मण सेनापती **खोलेश्वर** यानें समूळ नष्ट केलें, असें म्हटलें आहे. यावरून देवगिरीचे यादवांचा व अभीरांचा परस्पर कांहींहि संबंध नव्हता, असें दिसतें. वरील लेख फार मननीय आहे; व त्यांतील विधानें खोडून टाकण्यास यापेक्षां सबळ पुरावा पाहिजे या गोष्टींची आम्हांस जाणीव आहे. चांदोरकरांनीं खानदेशांतील आभिराणी उर्फ अहिराणी भाषेचें या लेखांत व्याकरण व व्युत्पत्तिदृष्ट्या सांगोपांग विवेचन केलें आहे. त्यावरून हेमाद्रीचे वेळीं वऱ्हाडांत व खानदेशांत प्रचलित असलेल्या मराठी भाषेवर चांगला प्रकाश पडतो.

ज्ञानेश्वरींत, खानदेशी ऊर्फ अहिराणी भाषेंतील शब्दांचा बराच भरणा असावा असें या विवेचनावरून दिसून येतें. तसेंच, तिच्यांत कोंकणी, भाषेचीही छटा मधूनमधून दिसते. खुद्द

यादवांची मूळ भाषा संस्कृत होती. ती उत्तरोत्तर अनेक भाषांत मिश्रित झाली. अपभ्रष्ट भाषा, महाराष्ट्री, शौरसेनी व मागधी या तीन भाषांचें मिश्रण म्हणजेच अभिराणी भाषा होय. **पाटण** (खानदेश) येथील शके ११२८ च्या शिलालेखाच्या अखेरच्या भागांतील कांहीं मजकूर तत्कालीन खानदेशी भाषेंत आहे. त्यांतील शब्दांवरून खानदेशी भाषेचें स्वरूप थोडेंबहुत लक्षांत येतें. श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वेळेच्या महानुभावपंथीय ग्रंथांतील भाषा शिष्ट ऊर्फ नागरी दिसते; यावरून तिच्यांत वैदर्भी उर्फ अवंतिजा भाषेतील शब्दांचा बराच भरणा दिसून येतो. बालरामायणांत विदर्भदेशाचें वर्णन करतानां रामानें ह्या देशास विद्येचें माहेरघरच म्हटलें आहे. व **भासह** ह्या काश्मिरी अलंकारिकानें वैदर्भकाव्य श्रेष्ठ दर्जाचें असल्याबद्दल अप्रत्यक्ष रीतीनें कबुली दिली आहे. **दंडी, बाण** वगैरे प्रसिद्ध संस्कृत ग्रंथकारांनीं वैदर्भी रीतीची फार स्तुति केली आहे. श्लेष, प्रसाद, माधुर्य, ओज, अर्थव्यक्ति वगैरे गुण वैदर्भरीतीचे प्राण आहेत असें सदरील ग्रंथकारांनी म्हटलें आहे. खानदेशाच्या पश्चिम भागाचें प्राचीन नांव अश्मक हें होतें. तेथील काव्य वैदर्भकाव्यापेक्षां कमी दर्जाचें होतें, असेंहि त्यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे. यावरून महानुभावीय ग्रंथांतील भाषा व ज्ञानेश्वरीची भाषा यांच्यांत फरक कां दिसतो, ह्याचा खुलासा होतो.

देवगिरी-विद्येचें केंद्र

हेमाद्रीचे वेळीं देवगिरी हें शहर सर्व विद्वत्तेचें केंद्र बनलें होतें. प्रसिद्ध ज्योतिषी व गणिती भास्कराचार्य ह्याचा मुलगा लक्ष्मीधर हा जैत्रपालाचा आश्रित होता. व त्याचा पुत्र चांगदेव यासहि यादवांच्या राज्यांतील गांव इनाम असून त्यानें खानदेशांतील एक मोठी पाठशाळा चालविली

होती (पाटणचा शिलालेख पहा). कृष्णदेवाच्या पदरीं **अमलानंद** या नांवाचा पंडित होता. त्यानें आचार्यांच्या वेदान्तसूत्रावर वेदान्त-कल्पतरु नांवाचा ग्रंथ लिहिला.

वैदर्भीय पंडित बोपदेव हा त्याचा उजवा हात होता. मुक्ताफलग्रंथांत हेमाद्रीचें वर्णन करितांना बोपदेवानें त्यास सारथि असें श्लिष्ट विशेषण लाविलें आहे. वर्धेच्या कांठी **सार्थ** अथवा **सार्धे** या नांवाचें गांव आहे. हें ठिकाण बोपदेवाचें जन्मस्थान होय. तेथें तो शके ११८२ त जन्मला. त्यावरून हेमाद्रीचें मूलस्थान तेंच असावें असा कित्येकांचा तर्क आहे. परंतु पंढरपूरच्या शिला-लेखांत हेमाद्रीला 'सोडवीकार' असें म्हटलें आहे, त्याची वाट काय? यादवराज्यांत ज्योतिषशास्त्राच्या अध्ययनास चांगला राजाश्रय मिळत असे. **पाटण** येथील शिलालेखांत प्रसिद्ध ज्योतिषी भास्करा-चार्य ह्याची संपूर्ण वंशावळ दिली आहे. त्याचा मुलगा लक्ष्मीधर ह्यास पहिला जैतुगी ऊर्फ जैत्रपाळ यानें मोठ्या सन्मानानें बोलावून आपले राजदरबारांत सभापंडित म्हणून ठेविलें होतें. त्याचा पुत्र चंगदेव हा सिंघणाच्या पदरीं ज्योतिषी होता. चंगदेवानें ज्योतिष-शास्त्रावरील ग्रंथांचें अध्ययनाकरितां एक मठ बांधला होता. सिंघणाचा मांडलिक निकुंभ वंशांतील **सोईदेव** व त्याचा भाऊ **हेमाडीदेव** यानीं सदरील मठास नेमणूक करून दिली होती. सांप्रत तो मठ अस्तित्वांत नाहीं, पण त्याच्या गतवैभवाच्या खाणाखुणा शिल्लक आहेत. शके ११४४ च्या **बहाळ** येथील शिलालेखांत (पृष्ट ९६) **अनंतदेव** याची वंशावळी दिली आहे. पाटणच्या शिलालेखांतील २२ व्या श्लोकांत **भास्कराचार्याचा** पुत्र **लक्ष्मीधर** ह्यास जैत्रपालानें

पाटणहून बोलावून नेलें असें म्हटलें आहे. हें शहर देवगिरीपासून जवळच आहे, व तें सह्याद्रीचे फांटे जे चांदवडचे डोंगर यानां लगतच आहे; शिवाय अनंतदेवानें ज्या गांवीं देवालय बांधिलें, तें बहाळगांव, पाटणपासून वीस मैलावर आहे. अनंतदेवानें ब्रह्मगुप्ताच्या सिद्धांतांसि ग्रंथाच्या विसाव्या अध्यायावर आणि बृहज्जातकावर टीका लिहिल्या, असें ११४४ व्या शिलालेखांत म्हटलें आहे. हेमाद्रीचा आश्रित बोपदेव ह्याच्या ग्रंथांची माहिती या पुस्तकांतील पृष्ठ ४३ वर दिली आहे.

देवगिरीच्या यादवांच्या अमदानींत ज्योतिष, धर्मशास्त्र, व व्याकरण या शास्त्रावर अनेक ग्रंथ निर्माण झाले. भास्कराचार्य यानें सिद्धांतशिरोमणी, करणकुतूहल व लीलावती वगैरे सर्वमान्य ग्रंथ रचिले. त्यानें आपला सर्व जन्म ज्योतिषशास्त्राचे अध्ययनांत घालविला. आर्यभट्ट व वराहमिहिर यांच्याप्रमाणें त्यानें ज्योतिषशास्त्रांत नैपुण्य मिळवून आपलें नांव अजरामर केलें आहे. भास्कराचार्याच्या घराण्या-शिवाय ज्योतिषशास्त्रांत वाखाणलेले असें आणखी एक सुप्रसिद्ध घराणें वऱ्हाडांत होतें. रामदेवराव याचे दरबारांत **राम** या नांवाचा भारद्वाज गोत्री विद्वान ज्योतिषी होता. तो पैठणच्या पूर्वेस ७० मैलांवर गोदेच्या उत्तर तीरांवर पाथरी नांवाच्या गांवीं रहाणारा होता. या राम ज्योतिषाचे घराण्यांत ज्ञानराज, सूर्यराज, व धुंडिराज वगैरे ज्योतिषी झाले. व त्यांनीं ज्योतिषशास्त्रावर अनेक सर्वमान्य ग्रंथ लिहिले. भास्कराचार्याच्या 'लीलावती'वर सूर्य-पंडिताची **अमृत कूपिका** नांवाची टीका उपलब्ध आहे. सदरील घराण्यांतील अकरावा पुरुष विज्ञानेश्वर नांवाचा

होता. तो दुसऱ्या बाजीराव पेशव्याच्या दरबारांत ज्योतिषी म्हणून होता. सिंघणाचा करणाधिप **सोढल** नांवाचा एक काश्मिरी-ब्राह्मण होता. त्याचा पुत्र **शार्ङ्गधर** यानें 'संगीतरत्नाकर' नामक एक सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिला. कृष्णदेवाच्या हस्तिदलाचा सेनापति शूर असून विद्वान होता. त्यानें सुभाषितांवर सूक्ति**मुक्तावली** नांवाचा ग्रंथ रचिला असून तो उपलब्धही आहे. कृष्णदेवाच्या दरबारांत **अमलांग** या नांवांचा पंडित होता. त्यानें आचार्यांच्या वेदांतसूत्रभाष्यांवर 'वेदांतकल्पतरू' नामक ग्रंथ लिहिला आहे. हा हेमाद्रीचा समकालीन होता. बोपदेवानें आपला आजा महादेव यांस 'महादेवो **वेदपदा**भिधानमहाराष्ट्रनिवासी विप्रः असें म्हटलें आहे. बोपदेवाचा बाप केशव व आजा महादेव हे दोघे वैद्य होते. केशवानें 'सिद्धमंत्र' नांवाचा ग्रंथ लिहिला असून त्यावर बोपदेवानें 'सिद्धप्रकाशनामक' टीका लिहिली आहे. बोपदेवानें आपल्या शतःश्लोकी ग्रंथांत वर्धा नदीच्या कांठीं **वेदपद** नांवाचें गांवीं आपला जन्म झाला असें म्हटलें आहे. बोपदेवानें व्याकरणावर १० प्रबंध, ज्योतिषशास्त्रावर १ साहित्यावर ३ वैद्यकावर ९ व भागवतपुराणावर ३, असे एकंदर सव्वीस प्रबंध लिहिले असें हेमाद्रीनें व्रतखंडांत म्हटलें आहे. हेमाद्रीच्या प्रेरणेनें व आश्रयानें आपण वर निर्दिष्ट केलेले सर्व ग्रंथ रचिले असें बोपदेवानें मुक्ताफल-ग्रंथांत कबूल केलें आहे.

यादवांचे अमदानींत देवालयाचें पूजेअर्चेकरितां एखादा गांव दान देतेवेळीं, दानपत्रांत एक महत्वाची शर्त घालण्यांत येत असे; ती सामाजिक दृष्ट्या फार महत्वाची होती. दान दिलेल्या गावांत

जुगार खेळण्यास व विश्वयोषितांस वस्ती करण्यास मनाई असे. यामुळें निदान देवालयाच्या नजीकच्या प्रदेशांत अनीतिवर्धक गोष्टीस आळा घालण्याकडे यादवराजांचे लक्ष होतें असें दिसून येतें.

स्त्रिया, मुलें व शरणांगत यांजवर शस्त्र धरणें ही गोष्ट राजधर्मा-विरुद्ध आहे असें **महादेवराय** यादवराजाचे मत होतें. व हें व्रत तो अक्षरशः पाळीत असें. या गोष्टीचा फायदा घेऊन आंध्रानीं आपल्या गादीवर स्त्रीस, व मालवदेशाच्या राजानें मालव्याच्या गादीवर एका अर्भकास बसविलें. यावरून धर्मयुद्धाचे नियम पाळण्यांत **महादेव**-रायाचे आंगचे औदार्य व खरें शौर्य दिसून येतें. याच जाधव घराण्यांत सोळाव्या शतकांत जन्मलेल्या जिजाबाईच्या पोटीं जन्म घेऊन महाराष्ट्रांत पुन्हां मराठी राज्य स्थापन करणाऱ्या श्रीशिवाजी महाराजांनीं आपल्या थोर पूर्वजांच्या पवित्राचरणाचा कित्ता गिरविला यांत आश्चर्य नाहीं. (अयं शिशुस्त्रीशरणांगतांना हन्ता महादेवनृपो न जातु । इत्यं विनिश्चित्य ततोतिभीतै रान्ध्रैः पुरन्ध्री निहिता नृपत्वे॥ अत एव हि मालवेश्वरः शिशुमेव स्वपदे न्यवेशयत् । (व्रतखंड)

सिंघणराजाचें पदरीं खोलेश्वर या नांवाचा एक पराक्रमी ब्राह्मण सरदार होता. सिंघण हें सिंह याचें अपभ्रष्ट रूप होय. तो सिंहाप्रमाणें पराक्रमी असून त्यानें खोलेश्वराच्या मदतीनें देवगिरीच्या राज्याचा विस्तार महाराष्ट्र, कर्नाटक, गुजराथ, माळवा वगैरे देशांत कल्पने-पलिकडे वाढविला. श्रीशिवाजीमहाराजांचे बरेच गुण सिंघणदेवांत होते, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

निरनिराळ्या प्रांतावर त्यानें आपले प्रतिनिधि नेमिले.यादवांचे'सुवर्ण-गरुडध्वज' नांवाचें निशाण कावेरीवर नेऊन तेथें त्यानें आपला जयस्तंभ

उभारिला. शके ११३७ सांत **मायीदेव पंडित** यांजकडे त्यानें सर्वाधिकार सोपविले होते. व शके ११४८ सांत त्यानें आपल्या विश्वासांतील सरदार **हेमनायक** ह्याला १२००० गांवावर सुभेदार म्हणून नेमिलें होतें. राज्याच्या व्यवस्थेसाठीं त्यानें निरनिराळ्या अधिकाऱ्यांची योजना केली होती. महाप्रधान, मंडलेश्वर, दंडनायक, अथवा बहात्तरनियोगाधिप अशी सदरील अधिकाऱ्यांची नामाभिधानें होती. सिंघणाचे वेळच्या शिलालेखांवरून त्याचें राज्य पंजाब, बहार, नेपाळ वगैरे देशांपर्यंत पसरलें होतें असें दिसतें.

शके ११५० व ११६० (६२) च्या आंबे येथील शिलालेखांत खोलेश्वराच्या पराक्रमाचे व दानशूरत्वाचें सुंदर वर्णन केलें आहे; व त्यांच्या मातापितरांच्या उभय कुळांची वंशावळ दिली आहे. खोलेश्वरानें हेमाद्रीप्रमाणें जागोजाग देवालयें बांधिलीं. वऱ्हाड प्रांतात ठिकठिकाणीं विहीरी खणून लोकांची पाणी मिळण्याची सोय केली; व गरीब लोकांकरितां अन्नसत्रें बांधिलीं. सिंघण देवाचा तो उजवा हात होता. लोकांच्या सुखाकरीतां तो अविश्रांत श्रम करीत असे त्याच्या संबंधानें आंबे येथील शिलालेखांत वर्णन केले आहे. पयोष्णि नदीच्या तीरावर खोलपूर व वर्धा नदीच्या काठांवर वाराणशी अशी नवीन गांवें त्यानें वसविलीं. आंबे येथील शिलालेखांत भरतखंडांतील बऱ्याच देशांचा व राजांचा उल्लेख केलेला आढळतो. दक्षिणेकडील प्रांत काबीज करून त्यांची व्यवस्था करण्याचें काम सिंघणदेवानें बीचण्ण नांवाच्या एका पराक्रमी सरदाराकडे सोपविलें होतें. त्यानें आपल्या पराक्रमाच्या

जोरावर कर्नाटक, म्हैसूर वगैरे दक्षिणेकडील प्रांत यादवांच्या छत्राखाली आणले.

राष्ट्रीय भावना व संघटण यांचा अभाव

भरतखंड हें आपलें राष्ट्र असून त्याचे परधर्मी व विदेशी लोकांपासून संरक्षण करणें हें आपलें राष्ट्रीय कर्तव्य होय या भावनेचा प्राचीनकाळीं भारतीय लोकांत पूर्ण अभाव होता ही गोष्ट आपल्या देशाच्या प्राचीन इतिहासाचें विहंगमदृष्टया अवलोकन करणारास सहज दिसून येते. विशिष्ट कुळाचा अगर घराण्याचा अभिमान बाळगून त्यांचें वर्चस्व इतरांवर असावें, अशी महत्वाकांक्षा ज्याला त्याला असे. राष्ट्रीय भावनेपक्षां वैयक्तिक महत्त्वाकांक्षेसच जास्त महत्व दिलें जात असे. खुद्द दक्षिणेंत गेल्या हजार अकराशें वर्षाच्या ऐतिहासिक कालात आंध्रभृत्य, राष्ट्रकूट, रट्ट, गट्ट, गुप्त, चालुक्य, शिलाहार, कदंब, यादव वगैरे अनेक घराण्यांतील पुरुषांनीं राज्य केलें. उत्तरहिंदुस्थानांत हीच स्थिति होती. रजपूत घराण्यांपैकीं चोहण उर्फ चव्हाण, सोळंकी, वाघेले, चालुक्य वगैरे घराणीं आपापलें वर्चस्व दुसऱ्यावर प्रस्थापित करण्याकरितां परस्परांशीं झगडण्यांत गुंतलेले असत. आर्यांची संस्कृति कायम ठेवून तिची अभिवृद्धि सर्व बाजूंनीं व्हावी, या हेतूनें भरतखंडावर एकछत्री राज्य असावें,या राष्ट्रीय भावनेचा भारतीयांमध्यें पूर्ण अभाव होता. महंमद गझनवीनें हिंदुस्थानावर अकरा स्वाऱ्या केल्या,व हिंदूंच्या धार्मिक भावनेवर भयंकर आघात केले. परंतु राष्ट्रीय भावनेनें प्रेरित होऊन हिंदु राजांनीं त्याचा प्रतिकार करण्यासाठीं सुसंघटित प्रयत्न केलेला दिसत नाहीं.हिंदुलोकांना अत्यंत पूज्य अशा सोमनाथा-

सारख्या पवित्र स्थानाचा महंमद गझनवीनें विध्वंस केला.त्यावेळीं कांहीं हिंदु राजांनीं धार्मिक भावनेनें प्रेरित होऊन त्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला ही गोष्ट खरी आहे. परंतु भरतखंडांतील तत्कालिन प्रमुख अशा सर्व हिंदु राजांनीं त्यावेळी सुसंघटित प्रयत्न केला असता, तर महंमद गझनवीस हार खावी लागून, त्यास हिंदुस्थानास कायमचा रामराम ठोकावा लागला असता! भारतीयसमाजाच्या विस्कळितपणामुळें मुसलमान राजांना हिंदुस्थानावर केलेल्या स्वाऱ्यांत सारखें यश मिळत गेलें, ही गोष्ट इतिहासावरून स्पष्ट दिसून येतें.

मुसलमानांची संस्कृति हिंदु लोकांपेक्षां कोणत्याहि प्रकारें श्रेष्ठ दर्जाची नसतांना त्यांना हिंदुस्थानांतील बहुतेक युद्धांत यशप्राप्ति झाली, याचें कारणहि वर नमूद केलेल्या राष्ट्रीय भावनेच्या अभावांत आहे. युद्धकलेंतील प्राविण्य, कणिकनीतींतील नैपुण्य व शौर्य या एकंदर गुणांत हिंदूंची ख्याति महाभारतकालापासून आहे. तथापि संघशक्तीच्या अभावामुळें हे सर्व गुण परकी शत्रूंच्यापुढें फिक्के पडले, ही दुर्दैवाची गोष्ट होय!!

उत्तरहिंदुस्थानांत मुसलमानराजांनीं प्रवेश करून दिल्ली येथें गादी स्थापिली व हिंदूंना नामोहरम केलें. तरीहि त्यापासून दक्षिणेंतील हिंदू राजांनीं धडा घेतला नाहीं; ही गोष्ट देवगिरीच्या यादवांचें राज्य अल्लाउद्दिन खिलजीनें थोडया सैन्यानिशीं अल्पावधींत नष्ट केलें, यावरून दिसून येतें. देवगिरीचें राज्य अस्तास गेल्यावर जाधवांची एक शाखा शिंदखेड येथें जाऊन राहिली. तेथील घराणें बहामनी राजांच्या अमदानींत मोठ्या नांवारूपास आलें. तें श्रीशिवाजीमहाराजांचें मातुल घराणें होय.. ह्या घराण्याच्या

आश्रयानें श्रीशिवाजीमहाराजांचे आजे मालोजी भोसले मोठ्या वैभवास चढले. शिवाजीमहाराजांचे वडील शहाजी यांनीं आपल्या आंगच्या पराक्रमाची जाणीव तत्कालीन मुसलमान राजांस करून दिली ही गोष्ट सर्वश्रुत आहे. हीं दोन घराणीं तत्कालीन मुसलमान राजास डोईजड झालीं होतीं. या दोन घराण्यांतील पुरुषांनीं एकदिलानें सुसंघटित प्रयत्न केला असता, तर दक्षिणेंत कोणत्याहि मुसलमान राजास टिकाव धरतां आला नसता. परंतु त्यांच्या आपसांतील हाडवैराचा फायदा केव्हां मोंगलांस तर केव्हां निजामास मिळून, मुसलमानी राज्याचा पाया दक्षिणेंत उलट भक्कम झाला. श्रीशिवाजीमहाराजानां मात्र भारतीयांच्या आंगच्या या व्यंगाची पूर्ण जाणीव होती असें दिसतें. कारण त्यांनीं उच्चराष्ट्रीय भावनेनें प्रेरित होऊन आपल्या कार्याची दिशा अगोदरच आंखून लोकसंग्रह केला व संघटितप्रयत्नाच्या जोरावर मुसलमानांना शह दिला. याकामीं आपले वडिलांची देखील त्यांनीं परवां केली नाहीं. यामुळें त्यांचे प्रयत्नास यश येऊन मुसलमानांस कायमचा शह बसला व मराठी राज्याची स्थापना करण्याचें कामीं त्यांस यश आलें.

यादवकालीन शिलालेख

यादवकालीन बहुतेक शिलालेख संस्कृत व कानडी भाषेंत आहेत. पाटण, आंबे, उनकेश्वर येथील शिलालेख मात्र अर्धवट संस्कृत व अर्धवट मराठी भाषेंत आहेत. यावरून कानडी भाषेचा प्रवेश राजदरबारांत फार प्राचीनकाळापासून झाला होता असें दिसतें. सिंघण व रामदेवराव यादव ह्यांचे वेळचे कानडींत लिहिलेले बरेच शिलालेख आहेत. सिंघणानें बीचण याच्या साहाय्यानें कर्नाटक म्हैसूर वगैरे प्रांत हस्तगत करून

घेतले होते. रामदेवराव जाधवाचा दक्षिणेंतील सुभेदार 'टिप्परस' या नांवाचा होता. त्याच्या सहाय्यानें दक्षिणेकडील बरेच प्रांत त्यानें काबीज केले. दक्षिणेंतील शूर, सहासी व कर्तबगार पुरुष पदरीं ठेऊन त्यांच्याकडून तेथील देश जिंकून घेण्यांत वरील यादवराजांची मुत्सद्देगिरी दिसून येते. कानडींतील शिलालेखांचे सूक्ष्म निरीक्षण केलें असतां वरील विधानांची यथार्थता दिसून येईल. व्रतखंडांत हेमाद्रीनें यादवराजांचा जो त्रोटक इतिहास दिला आहे, तो त्यानें आपल्या दफ्तरांतील ताम्रपट व शिलालेख यांतील दाखल्यावरून तयार केला असावा असें दिसतें, व यामुळें तो सुसंगत व सप्रमाण झाला आहे. यादवकालीन शिलालेख व ताम्रपटांवरून तत्कालीन राजकीय व सामाजिक स्थितीवर चांगलासा प्रकाश पडत नाहीं. गुजराथ, माळवा, चोल, कर्नाटक वगैरे प्रांतावर स्वाऱ्या करून दरएक राजानें जय मिळविला, असें वर्णन बहुतेक शिलालेखांत दिलेलें आढळतें. परंतु त्यापैकीं कोणतेंहि राज्य कायमचें नष्ट करून तें आपल्या राज्यांत सामील केल्याचें दिसून येत नाहीं. जिंकलेल्या राजाचीं पाळेंमुळें खणून काढण्याकडे विजयी यादवांची प्रवृत्ति नव्हती, असें त्यावरून दिसून येतें.

पराभूत केलेल्या राजांना आपलें मांडलिकत्त्व कबूल करावयास लावून त्यांचेकडून चौथाई व सरदेशमुखी वगैरे हक्क घेण्याचा श्री शिवाजी महाराजानीं १७ व्या शतकांत जो प्रघात पाडला त्याचें रहस्य यांत बीजरूपानें दिसून येतें.

हेमाद्रि या नांवावरून तो महाराष्ट्रीय नसावा, असें सकृद्दर्शनीं वाटण्याचा संभव आहे. परंतु सदरील नांव त्या काळांत वऱ्हाडांत

व खानदेशांत प्रचालेत होतें अशाबद्दल बऱ्याच ठिकाणीं उल्लेख केलेला आढळतो. देवगिरीच्या यादवांचे मांडलिक निकुंभ कुळांतील सोईदेव व हेमडीदेव हे बंधुद्वय खानदेशांतील रहिवासी होते व त्यांनीं ११२७ सालीं पाटण येथील चंगदेवाच्या ज्योतिषपाठशाळेस चांगला आश्रय दिला होता. (पाटणचा शिलालेख पृष्ठ ९०). शिवाय पंढरपूरच्या शिलालेखांत वर्गणीदाराचे यादींत हेमडी:हेमाडी या नांवाचा उल्लेख केलेला आहे. हेमाद्रीचा बालपणांतील स्नेही श्री-बोपदेव हा वऱ्हाडांतील सार्थ उर्फ सार्ध येथील रहाणारा होता. बोपदेवाने आपल्या एका ग्रंथांत **वेदपद** हें गांव आपलें जन्मस्थान होतें असें म्हटलें आहे. यावरून त्याचें खरें जन्मस्थान कोणतें असावें हें समजत नाहीं. तत्कालीन विदर्भ देशांतील प्रसिद्ध विद्वान पुरुषांचीं नावें अशाच तऱ्हेचीं आहेत. श्रीबोपदेव व हेमाद्रि हे एकाच गांवचे असावे, असें अनुमान करण्यास जागा आहे. श्रीयुत पां. वा. काणे यांनीं विविधज्ञानविस्तारांत (पुस्तक ४३ पान ४८१.) 'विदर्भ व महाराष्ट्र या संबंधानें चार शब्द' या आपल्या निबंधांत, चतुर्वर्गचिंतामणि या ग्रंथाचा कर्ता हेमाद्रि हा वैदर्भ अर्थात् दाक्षिणात्य होता असें आपलें मत दिलें आहे. मराठी भाषेवर त्याचें नितांत प्रेम होतें, यावरूनही तो महाराष्ट्रीय होता यांत शंका नाहीं.

हेमाद्रि हा महाराष्ट्रीय होता काय ?

देवगिरी हें आपल्या राजधानीचे शहर करण्यांत पाचव्या भिल्लमास कांहीं सबळ कारणें दिसली असावींत. यादवांच्या पूर्वी देवगिरीनजीकचें एलापूर हें गांव राष्ट्रकूट राजांचें वसतिस्थान

असावें, असें एल्लोरा येथील शिलालेखांवरून दिसून येतें. देवगिरीचा

देवगिरी ऊर्फ दौलताबाद

किल्ला फार प्राचीनकाळापासून अभेद्य म्हणून गणला जात असे. अल्लाउद्दिन खिलजीनें देवगिरीवर एकाएकीं छापा घातला, तेव्हां रामदेवराव जाधव या किल्ल्याचा आश्रय धरून राहिला. त्याच्या गोटांत फंदफितुरी झाली नसती तर त्यानें या किल्ल्यांत राहून अल्लाउद्दिनास जेरीस आणिलें असतें यांत शंका नाहीं! औरंगाबादचे वायव्य दिशेस नऊ मैलांवर दौलताबाद (पूर्वीचे देवगिरी) शहर आहे; तेथील किल्ला खडकावर बांधलेला आहे. किल्ल्याचा पायथा जमिनीपासून १२० फूटावर आहे. त्यांत प्रवेश करण्यास एक आडवाट असून भोंवतालीं खंदक आहे. खंदकावरून आंत जाण्यास एक पूल आहे. त्यावरून फक्त दोन माणसें जाऊं शकतात. किल्ल्यांतील कांहीं दालनें खडक फोडूनच तयार केलेलीं आहेत. युद्धकलेच्या दृष्टीनें हा किल्ला फार महत्त्वाचा आहे. यादवांचें राज्य नष्ट झाल्यावर मुसलमानांनीं ह्या किल्ल्याच्या जोरावर दक्षिणेकडील बरींच हिंदु राज्यें काबीज केलीं. महंमद तघलघ ह्यानें या शहराचें नांव दौलताबाद असें ठेविलें व दिल्लीं शहराऐवजीं देवगिरी हें राजधानीचें शहर करण्याचें त्यानें एकेकाळीं ठरविलें होतें; व त्याप्रमाणें दिल्ली येथील नागरिकांस तें शहर सोडण्याचा प्रसंगही आला होता. परंतु कांहीं अकल्पित कारणांमुळें त्याचा सदरील हेतू सिद्धीस गेला नाहीं. निजामशाहींतील बादशहांना मोंगलापासून आपलें संरक्षण करण्याचे कामीं सदरील किल्ला वेळोवेळीं उपयोगी पडला असें मुसलमानी बखरीवरून दिसून येतें. दौलताबाद शहर प्रसिद्ध

असून त्याच्या आसपास मोठमोठी शहरें असल्यामुळें तें दाक्षिण हिंदुस्थानचें केंद्र बनलें होतें. दिल्लीहून दौलताबादचा रस्ता सातपुड्याच्या बगलेंतून पश्चिम वऱ्हाडांतून जात असे. त्यावेळीं रस्ते फारच वाईट असल्यामुळें हल्लींच्याप्रमाणें वाटेल तेथून डोंगर व घाट चढून जातां येत नसे. देवगिरीनगर विद्वत्तेचें केंद्र म्हणून त्याकाळीं समजलें जात होतें. देवगिरीपासून थोड्या अंतरावर असलेलें पैठण शहर व्यापाराकरितां फार प्रसिद्ध होतें. टॉलमीनें या शहराचा उल्लेख आपल्या प्रवासवर्णनांत केला आहे; व श्रीस्थानक, (हल्लीचें ठाणें), पुरी [हल्लीची दंडाराजपुरी] व चेमूल्य [हल्लीचें चउल] ह्या बंदरांतून ईजिप्त व अरबस्तान येथील माल खुष्कीच्या मार्गानें पैठणाकडे जात असे, असेंही त्यानें म्हटलें आहे.

श्रीशिवाजीमहाराजांची मातुश्री राजमाता जिजाबाई ही शिंदखेडच्या जाधवरावाच्या कुळांतील असून प्रसिद्ध लुकजी जाधवरावाची मुलगी होय. लुकजी जाधवरावाचें नोकरीनिमित्त दौलताबादेस नेहेमीं वास्तव्य असे.

रंगपंचमीच्या दिवशीं मामूल वहिवाटीप्रमाणें लुकजी जाधवरावानें इतर सरदारांबरोबर मालोजीस **दौलताबादेस** आपले येथें बोलाविलें होतें. त्यावेळीं मालोजीबरोबर त्याचा पांच वर्षांचा मुलगा शहाजी हा होता. शहाजीचें सौंदर्य व चलाखी पाहून लुकजी जाधवरावाचे मनांत आपली मुलगी जिजाबाई त्यास द्यावी असें आलें; व त्यानें आपला मनोदय मालोजीस तेथल्यातेथें कळविला. हें बोलणें खरें ठरून इ. स. १६०४ मध्यें शहाजी व जिजाबाई यांचा विवाह **दौलताबादेसच** झाला. शिवाजी

महारांजाच्या जन्मानंतर शहाजीचे जिजाबाई बरोबर वितुष्ट आलें. तेव्हां इ. स. १६३४ त जगदेवराव जाधवांच्या सांगण्यावरून जिजाबाई आपल्या मुलासह दौलताबादेस कांहीं दिवस राहिल्या होत्या. याप्रमाणें दौलताबाद शहर प्राचीनकालापासून ऐतिहासिक-दृष्ट्या फार महत्वाचें समजलें जात होतें.

हेमाद्री व यादवराजप्रशस्ति

हेमाद्रीनें व्रतखंडात यादवराजांची सविस्तर व संगतवार वंशावळ दिली असून **दृढप्रहरा**पासून **महादेवराय**जाधवापर्यंत जे राजे होऊन गेले त्यांची त्रोटक हकिगत दिली आहे.सदरील वंशावळ पृ. १७८-१७९ वर दिली असून राजप्रशस्तिप्रकरण परिशिष्ट १ मध्यें दिलें आहे. श्रीकृष्णादि सर्व यादवराजे मूळचे द्वारकेकडील असून मथुरेचे आधिपत्य त्यांचेकडे होते असें हेमाद्रीनें सदरील राज-प्रशस्तींत म्हटलें आहे. देवगिरीच्या यादवराजांचे मूळ पुरुष द्वारकेडून नाशिकच्या आसपासच्या प्रदेशांत आले व त्यानीं तेथें आपलें राज्य स्थापिलें. नाशिकापासून सुमारें बारा मैलावर दृढप्रहारानें श्रीनगर या नांवाचें शहर स्थापून तेथें आपली राजधानी केली. पूर्वी अस्तित्वांत असलेलें चंद्रादिव्यपुर (हल्लीचें **चांदवड**?) वैभवास चढविलें. दृढप्रहारास सेऊणचंद्र या नांवाचा मुलगा झाला. त्यावरून त्याच्या अंमलाखालीं असलेल्या प्रदेशास **सेउण**देश असें नांव प्राप्त झालें. व त्याच्या वंशजास **सेउणदेशचे** यादवराजे असें म्हणण्याचा प्रघात पडला. पांचव्या भिल्लमानें श्रीनगर येथून आपली राजधानी हालवून देवगिरी येथें नेली..

व्रतखंडांतील राजप्रशस्तींत, चंद्रादित्यपुर (हल्लीचें चांदवड ?) श्रीनगर, सेउणपूर, पर्णखेट (हल्लीचें पैठण), मंगलवेष्टक (मंगळ वेढें), श्रीवर्धन, कल्याण (दक्षिणेकडील), रंभागिरी, धारानगर, लज्जापूर, वगैरे शहरांचा प्रामुख्यानें उल्लेख केलेला आहे. गुजराथ, लाट, कर्नाटक, माळवा, तेलंगण, चोलदेश, कोंकण, कुंतल, प्रत्यंडक वगैरे देश यादवानीं पराक्रमानें जिंकून आपल्या अंमलाखालीं आणले असें म्हटलें आहे. **श्रीवर्धन** शहर अंसल (अंतल) राजांच्या ताब्यांत होतें; व मंगळवेढें श्रीबिल्हण राजाच्या ताब्यांत होतें. पर्णखेट (पैठण) हें शहर मल्लगीनें जिंकून हस्तगत केलें व तेथें तो राहूं लागला. श्रीबिल्हण व अंसल याबद्दल कांहीं एक माहिती उपलब्ध नाहीं.

हेमाद्रीनें यादवराजांसंबंधानें दिलेली हकिगत, उपलब्ध असलेले शिलालेख व ताम्रपट यांत दिलेल्या मजकुराशीं जुळते ही गोष्ट या पुस्तकाच्या तिसऱ्या भागांत देवगिरीच्या यादवराजघराण्याचा त्रोटक इतिहास दिला आहे त्यावरून दिसून येतें. हेमाद्रीनें यादवराजांसंबंधी दिलेला वृत्तांत त्रोटक असला तरी तो ऐतिहासिक सत्यास धरून आहे; यावरून हेमाद्रीची इतिहासलेखनाबद्दल आस्था दिसून येतें.



परिशिष्ट

नं. १ (अ).

हेमाद्रीच्या व्रतखंडात यदुवंशीय राजांची पौराणिक कालापासून ऐतिहासिक कालांतील देवगिरीच्या यादवराजांपैकीं महादेवराजापर्यंत दिलेली वंशावळ व राजप्रशस्ति.

हेमाद्रीच्या व्रतखण्डाचा उपोद्घात.

श्रीगोपालमपारवैभवभवस्वच्छन्दलीलालयं
सान्द्रस्निग्धतमालकोमलदलश्यामाभिरामाकृतिम् ।
कूजत्कोकिलकामिनीकलरवप्रोल्लासिगोपाङ्गना-
गीतस्फीतपवित्रचित्रचरितव्रातं नमस्कुर्महे ॥ १ ॥

उन्मीलत्कमनीयकान्तिसरसीमध्ये विबुद्धप्रभं
सारासारविचारचारुमनसा हंसेन संसेवितम् ।
नित्यानन्दपरागसङ्गसुभगं वन्दारुवृन्दारक-
श्रेणीभङ्गमनङ्गवैरिचरणाम्भोजद्वयं पातु वः ॥ २ ॥

राजप्रशस्तिः १

जीयान्नूतनभूतसर्गसमयाविर्भावसंभावना-
तुष्यत्तल्पभुजङ्गपुङ्गवशिरः श्रेणीशतैर्वन्दितः ।
कल्पान्तोपरमेषु नाभिकमले प्रोद्दामसामस्वर-
स्वैरोच्चारणचारणायितविधिव्याधूतनिद्रो हरिः ॥ १ ॥

अस्ति प्रशस्तं पुरुषोत्तमस्य शय्यागृहं क्षीरमयः पयोधिः ।
यदीयपीयूषरसायनेन स्वर्लोकभाजामजरामरत्वम् ॥ २ ॥

संतानचिन्तामणिकामधेनुकल्पद्रुमश्रीजननैकहेतोः ।
सिन्धोरमुष्मादुदभूदमन्दनिस्यन्दमानामृतबिन्दुरिन्दुः ॥ ३ ॥

ततस्तनूजं विबुधप्रधानं बुधं सुधादीधितिरप्यसूत ।
बभूव तस्मादथ चक्रवर्ती पुरूरवाः पुण्यरवानुवर्ती ॥ ४ ॥

अभजत जनिमस्मादायुरायुः प्रजानां
नघुषपदनिदानं ज्योतिरासीत्ततोपि ।
नृपतिरथ ययातिः ख्यातिमानप्यमुष्मा-
दयमपि यदुमूर्तिं कीर्तिमाविश्चकार ॥ ५ ॥

यदोरदोषविशदैर्यशोभिरभिशोभितः
अन्ववायः स एवायमवाप यदुवंशताम् ॥ ६ ॥

ततः क्रोष्टा तस्मादजनि वृजिनीवानपि नृप-
स्ततो जज्ञे राज्ञः क्षितिपतिरिह स्वाहित इति ।
नृशङ्कुस्तत्पुत्रः समभवदथो चित्ररथ इ-
त्यतो जातः ख्यातः स किल शशबिन्दुर्नरपतिः ॥ ७ ॥

ततः पृथुश्रवा वीरस्तदनन्तरमन्तरः ।
ततः सुयज्ञ उशनाः सितेयुरिति च क्रमात् ॥ ८ ॥

सूनुस्तस्य मरुत्त इत्यनुपमः प्रोद्दामदोर्विक्रम-
स्तस्मात्कम्बलबर्हिरुज्ज्वलयशःप्रक्षालितक्ष्मातलः ।
एतस्मादुदियाय रुक्मकवचस्तस्मात्परावृत्तिभृत्-
स्तस्माद्भूरितुरंगमेधसुकृती राजाजनि ज्यामयः ॥ ९ ॥

ततो विदर्भः क्रथकुन्तिवृष्णिनिवृत्तिसंज्ञाः परतो दशार्हः ।
व्योमाच्छजीमूत इति क्रमेण जाता नरेन्द्रा विकृतिश्च वीरः ॥ १० ॥

तदनु भीमरथः पृथिवीपतिर्नवरथश्च ततो रथिनां वरः ।
दशरथः शकुनिश्च करम्भिरित्युपदिशन्ति पुराणपरायणाः ॥ ११ ॥

देवरातस्ततः श्रीमान्देवक्षेत्रस्ततो मधुः ।
ततः कुरुबलो राजा पुरुहोत्रः क्रमादभूत् ॥ १२ ॥
अथायुरासीदथ सत्वतोभूदथान्धकोस्माद्भजमानसंज्ञः ।
विदूरथस्तत्परतोपिशूररराशिः प्रतिक्षत्र इति क्षितीशः ॥ १३ ॥
बभूवाथ स्वयंभोजस्ततोपि हृदिकोभवत् ।
असूत सोपि धर्मात्मा राजानं देवमीढुषम् ॥ १४ ॥
निर्स्त्रिशनिःशेषितवैरिपूरस्ततः क्षितिं पालयति स्म शूरः ।
ततोपि राजा वसुदेवनामा यो विश्वहेतोरपि हेतुरासीत् ॥ १५ ॥
वृन्दारवृन्दारकवृन्दमौलिमन्दारमालासुरभीकृताङ्घ्रिः ।
आसीदमुष्मादसुरावतारभारापहाराय पुरा मुरारिः ॥ १६ ॥
बभूव प्रद्युम्नः किल कुसुमधन्वा मधुरिपो-
स्त्रिलोकीवीरोसौ तनयमनिरुद्धं प्रसुषुवे ।
ततो भूभृत्पक्षक्षपणनिपुणेन स्वमहसा
परिस्फूर्जन्वज्रः शतमखसखः प्रादुरभवत् ॥ १७ ॥
वज्रस्य सूनुः प्रतिबाहुरासीद्दासीकृतक्ष्मापतिचक्रवालः ।
ततोपि सम्राडभवत्सुबाहुः प्रासूत सोयं चतुरस्तनूजान् ॥ १८ ॥
तेन ते सार्वभौमेन तनया विनयान्विताः ।
विभज्य वसुधाचक्रं चक्रिरे पृथिवीश्वराः ॥ १९ ॥
यथाविभागं वसुधामशेषां तेषां तदा पालयतां चतुर्णाम् ।
दृढप्रहारी दिशि दक्षिणस्यां प्रभुर्बभूव प्रथमात्कनीयान् ॥ २० ॥
सर्वेपि पूर्वं मथुराधिनाथाः कृष्णादितो द्वारवतीश्वरास्ते ।
सुबाहुसूनोरनु दक्षिणाशाप्रशासिनो यादववंशवीराः ॥ २१ ॥
ततः स राजा निजराजधानीमधिष्ठितः श्रीनगरं गरीयः ।
लेभे सुतं सेउणचन्द्रसंज्ञं यत्संज्ञया सेउणदेशमाहुः । २२ ॥

अथ धाडियसो महीपतिस्तनयस्तस्य बभूव भिल्लमः ।
अजनिष्ट ततोपि राजुगिस्तदनु प्रादुरभूत्स बादुगिः २३

जज्ञे धाडियमस्ततः प्रतिभटक्ष्मापालकालानलः
तस्मादाविरभूत्प्रभूतविभवो भर्ता भुवो भिल्लमः ।
एतस्मान्महसां महानिधिरसौ श्रीवेसुगिर्जज्ञिवान्
हन्ता भीष्मभुजौजसामसुहृदां तस्मादभूदर्जुनः ॥ २४ ॥

अजस्रमाविष्कृतदानवारिः प्रभूतहस्तार्चितदानवारिः ।
ततः स राजा विरराज राजाश्रियो विलासैर्जितराजराजः ॥ २५ ॥

आसीद्विलासी नृपतेरमुष्मात्स भिल्लमः पल्लवितोरुकीर्तिः ।
स बादुगिः स्वादुगिरां कवीनां स्तोत्रैकपात्रं भवति स्म तस्मात् ॥२६॥

ततो महीं महीपालः पालयामास वेसुगिः ।
संहृतप्रोद्यदुद्दामधामसामन्तसंततिः ॥ २७ ॥

ततोपि नृपभिल्लमः समरसीमभीमक्रिया-
निरर्गलभुजार्गलायुगलकाललीलालयः ।
ततः समदमेदिनीपातिपतङ्गभङ्गव्रतः
प्रतापशिखिलङ्घितत्रिजगदङ्गणः सेउणः ॥ २८ ॥

समुद्धृतो येन महाभुजेन द्विषां विमर्दात्परमर्दिदेवः ।
आस्थापि चालुक्यकुलप्रदीपः कल्याणराज्येपि स एव येन ॥ २९ ॥

परम्मदेवः स ततो बभूव द्विषद्वधूनेत्रघनाम्बुवृष्टौ ।
प (ऐ ?) रम्मदेनेव रुचां चयेन यस्य प्रतापेन चिरं व्यराजि ॥३०॥

तस्मादनन्तरमनन्तभुजप्रतापः
क्षोणीपतिः समभवत्स ह सिंहराजः ।
तस्यानुजस्तदनु भूवलयं बलीयान्
अत्रायत त्रिजगतीविजयी स राजा ॥ ३१ ॥

लञ्जीपुरात्समानीय कर्पूरातिलकं गजम् ।
स कर्पूरव्रतं पूर्णमकरोत्परनन्दितः ॥ ३२ ॥

तस्मादप्रतिमल्लोभूत् मल्लुगिर्वल्लभः क्षितेः ।
उदजृम्भत जम्भारिभूरिदोर्दण्डचण्डिमा ॥ ३३ ॥

आसद्य सद्यः स्वनिवासहेतोः श्रीपर्णखेटं नगरं रिपुभ्यः ।
आहारि येनोत्कलभूमिपालादुत्तुङ्गमातङ्गघटा हठेन ॥ ३४ ॥

तस्मादमरगाङ्गेयः संबभूव भुवः पतिः ।
अथाविन्दत गोविन्दराजः साम्राज्यसंपदम् ॥ ३५ ॥

ततो मल्लुगिपुत्रोभूद्भूपालोमरमल्लगिः ।
अथ कालीयबल्लालः पालयामास मेदिनीम् ॥ ३६ ॥

महीपतेस्तस्य विहाय पुत्रान् गुणानुरक्ता यदुवंशलक्ष्मीः ।
श्रीभिल्लमं तस्य ततः पितृव्यमव्याजराजद्भुजमाजगाम ॥ ३७ ॥

यः श्रीवर्धनमाससाद नगरं क्षोणीपतेरन्तला-
द्यः प्रत्यण्डकभूभृतं च समरे दुष्टं व्यजेष्ट क्षणात् ।
यो वा मङ्गलवेष्टकं क्षितिपतिं श्रीबिल्लणं जाग्निवान्
कल्याणश्रियमप्यवाप्य विदधे यो होसलेशं व्यसुम् ॥ ३८ ॥

स दण्डिकामण्डलमण्डयित्रीमकम्पसंपत्प्रभवैर्विलासैः ।
चक्रे पुरं देवगिरिं गिरीशप्रसादसंसादितदिव्यशक्तिः ॥ ३९ ॥

